
मराठी
ISAAC ASIMOV
डॉ. मुग्धा धनंजय कर्णिक
PRELUDE TO FOUNDATION
फाउंडेशनची पूर्वपीठिका

# प्रिल्यूड टु फाउंडेशन

# फाउंडेशनची पूर्वपीठिका

## लेखक- आयझॅक आसिमॉव

अनुवाद- डॉ. मुग्धा धनंजय कर्णिक

ई साहित्य प्रतिष्ठान

प्रिल्यूड टु फाउंडेशन

फाउंडेशनची पूर्वपीठिका

लेखक आयझॅक आसिमॉव

अनुवाद- डॉ. मुग्धा धनंजय कर्णिक


# ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

Thane.

Whatsapp: **9987737237 (विनामूल्य पुस्तकांसाठी नाव गाव कळवा)**

**प्रकाशन- १० डिसेंबर २०२३**



©esahity Pratishthan®2023

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादिकेचा परिचय

डॉ. मुग्धा धनंजय कर्णिक

जन्म १९६०

शिक्षण एम् ए समाजशास्त्र

अनुवादशास्त्रात डॉक्टरेट



डॉ. मुग्धा कर्णिक या १९९१ पासून २०१८पर्यंत- संचालक- बहिःशाल शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ होत्या. सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात मुंबई विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण विभागाच्या संचालक म्हणून २७ वर्षे कार्यरत होते. २०१८ साली निवृत्त झाल्या.

या काळात त्यांनी कोकणच्या ग्रामीण जिल्ह्यांत २००२ पर्यंत विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले

त्यांच्या राजकीय लिखाणामुळे त्या मराठी परिघात समाज माध्यमांतून प्रसिद्ध आहेत. गेली अनेक वर्षे वृत्तपत्रांतूनही सामाजिक-राजकीय लेखन केले आहे. अनेक अनुवाद केले आहेत.द कुकिंग विच या नावाने त्यांनी केलेले खाद्यपदार्थांच्या कृतीचे लेखनही लोकप्रिय आहे. शैक्षणिक शिबिरांचे डिझाइनिंग आणि अंमल. यात गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, पोषणशास्त्र, जीवशास्त्रातील वनस्पती आणि प्राणीशास्त्रविषय, पर्यावरणशास्त्र, अंधश्रध्दा निर्मूलन, नाट्यप्रशिक्षण, कला या विषयांवरील कार्यक्रम सुमारे पन्नास गावांतून केले. त्याच वेळी मुंबई शहरात विविध खुल्या- विनाअट प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची आखणी. इंडिया स्टडी सेंटर ट्रस्ट या शैक्षणिक ट्रस्टच्या त्या व्यवस्थापकीय ट्रस्टी असून या ट्रस्टमधून भारताचे भूशास्त्र,

जीववैविध्य आणि पुरातत्वीय अभ्यास या क्षेत्रात काम केले जाते. निवृत्तीनंतर त्या या ट्रस्टचे पूर्णवेळ काम पाहातात. कोविड काळात ७५ ऑनलाईन अभ्यासक्रमांचे आरेखन आणि आयोजन त्यांनी केले.

त्यांची आजवरची प्रसिद्ध पुस्तके:

सहस्रकातील विज्ञान, वृक्षराजी मुंबईची, सेंट्रीज ऑफ मुंबई या तीन पुस्तकांचे संकल्पन आणि संपादन, प्रकाशन.

आयन रॅन्ड लिखित अॅटलस श्रग्ड, द फाउंटनहेड या दोन महाकादंबऱ्याचा अनुवाद.

मालाकाईट कॅस्केट या उरालच्या लोककथांचा अनुवाद

जे आर आर टॉल्कीनच्या लॉर्ड ऑफ द रिंग्ज या जगद्विख्यात अद्भुत महाकादंबरीचा अनुवाद

क्लायमेट चेंज रिकन्सिडर्ड या पुस्तिकेचा अनुवाद


आय ॲम अ ट्रोल, शॅडो आर्मीज, द गॉड डिल्यूजन, ऑन टिरनी, द रीयुनियन या राजकीय पुस्तकांचे अनुवाद.


७० हून अधिक इंग्रजी कवितांचे अनुवाद.


याच बरोबर त्यांनी विपुल स्फुटलेखन केले आहे.


मुग्धा कर्णिक यांचे ई साहित्यवरील इतर साहित्य.

कव्हरवर क्लिक करताच पुस्तके उघडतील.




# लेखक आयझॅक आसिमॉव बद्दल



जन्म- १९२०

मृत्यू- १९92

विज्ञान कथाकादंबऱ्यांचा जागतिक पातळीवरचा सम्राट मानला जाणारे आय़झॅक आसिमॉव रशियात स्मोलेन्स्क येथे १९२०मध्ये जन्मले आणि वयाच्या तिसऱ्या वर्षीच त्यांच्या पालकांसोबत अमेरिकेत आले. ब्रुकलिन येथे ते शाळेत गेले आणि वयाच्या आठव्या वर्षी त्यांना नागरिकत्व मिळाले. उत्तम स्मरणशक्तीमुळे सोळावे वर्ष पूर्ण होण्याआधीच त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर ते कोलंबिया विद्यापीठात गेले आणि वडिलांच्या मनाप्रमाणे वैद्यकीय शिक्षण घ्यायला नकार देऊन त्यांनी रसायनशास्त्राचा अभ्यास करण्याची निवड केली.

रसायनशास्त्रात पदवी मिळाल्यानंतर ते काही काळ सैन्यात भरती झाले. त्यानंतर त्यांनी १९४९मध्ये डॉक्टरेट केली आणि बॉस्टन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ मेडिसीनमध्ये ते शिकवू लागले. १९५५मध्ये असोसिएट प्राध्यापक झाल्यानंतर न्यूक्लेइक ॲसिडवर त्यांनी संशोधन सुरू केले. पण त्याच वेळी त्यांना लेखनात रस आला होता. संशोधनाच्या कामामुळे लेखनाला वेळ देता येत नसल्यामुळे १९५८नध्ये त्यांनी निवृत्ती घेऊन पूर्ण वेळ लेखन सुरू केले. पण विद्यापीठाशी त्यांचे संबंध अव्याहत सुरू राहिले.

विज्ञान लेखक म्हणून त्यांचे स्वप्नवत् करीअर १९३९मध्ये सुरू झाले होते. एका लघुकथेने त्याची सुरुवात झाली होती. अमेझिंग स्टोरीज या प्रकाशनात मरून्ड ऑफ्फ् व्हेस्टा ही कथा छापून आली होती. त्यानंतर ते विज्ञानकथांच्या विविध नियतकालिकांत नियमित लिहू लागले, यात अस्टाउंडिंग, अस्टॉनिशिंग स्टोरीज्, सुपर सायन्स स्टोरीज् आणि गॅलक्सी या नियतकालिकांचा समावेश होता.

त्यांना चार वेळा ह्युगो पुरस्कार मिळाला आणि नेब्युला पुरस्कार एकदा मिळाला. त्यांनी सुमारे पाचशे पुस्तके लिहिली आहेत आणि शेकडो लेख लिहिले आहेत. त्यांची सर्जनशीलता कोणत्याही मापदंडानुसार विपुल अशीच म्हटली पाहिजे.

त्यांच्या जागतिक कीर्तीच्या कादंबऱ्यांसोबतच आसिमॉव यांनी डिटेक्टिव कथाही लिहिल्या, उत्तर अमेरिकेच्या इतिहासाचे चार खंड लिहिले, बायबलचे मार्गदर्शक म्हणून दोन खंड लिहिले, एक चरित्रात्मक शब्दकोष लिहिला. ज्ञानकोष, पाठ्यपुस्तके आणि विज्ञानाच्या अनेक अंगांवरील लेखन त्यांनी केले. शिवाय त्यांचे आत्मवृत्तही दोन खंडांत आहे.

आयझॅक आसिमॉव यांचा १९९२ साली वयाच्या ७२व्या वर्षी मृत्यू झाला.

# प्रिल्यूड टु फाउंडेशन

## फाउंडेशनची पूर्वपीठिका

भाग पहिला

लेखक : आयझॅक आसिमॉव

अनुवाद : मुग्धा कर्णिक

## अनुवादिकेची प्रस्तावना

अॅटलस श्रग्ड आणि फाउंटनहेडच्या अनुवादानंतर मी लेकीच्या आग्रहाखातर लॉर्ड ऑफ द रिंग्जचा अनुवाद पूर्ण केला. मग लेक म्हणाला आता आसिमॉवची फाउंडेशन सिरीज् कर. माझीही अत्यंत आवडती मालिका.

ही मालिका तर फारच प्रचंड मोठी. पण हो म्हणाले होते. नंतर भारतात सुरू झालेल्या फॅशिझमच्या उदयानंतर इतर कामांत व्यग्र झाले. तरीही वेळ काढत काढत २०२२मध्ये पहिला भाग पूर्ण केला. पुढचे भाग माझ्याच्याने होतील की नाही माहीत नाही. याच्या प्रकाशनालाही हात लावायला कुणी पुढे यायचं तर सगळे भाग अनुवादित व्हायला हवेत.

मरेपर्यंत उरलेले सहा भाग माझ्याकडून पूर्ण होतील? दुसरा भाग करायला सुरू केला आहे पण माहीत नाही...

मराठी लोकांनी ही महान विज्ञान-कादंबरी मालिका वाचावी म्हणून ही धडपड करायला घेतली होती...

हा पहिला भाग ईबुक म्हणून प्रकाशित करायला सुनीळ सामंताच्या ई साहित्य प्रतिष्ठानकडे सोपवला होता. कदाचित् हा वाचून पुढले भाग अनुवाद करण्यासाठी आणखी कुणी पुढे आलं तरी चालतंय की.

काम तडीस गेल्याशी कारण.

प्रकाशकांबरोबरच ईवाचकांचे आभार!

डॉ. मुग्धा धनंजय कर्णिक

# प्रिल्यूड टु फाउंडेशन

# फाउंडेशनची पूर्वपीठिका

# गणितज्ञ

क्लिऑन १-

पहिला क्लिऑन- एन्टन राजघराण्यात जन्मलेला, संपूर्ण दीर्घिका साम्राज्याचा हा अखेरचाच सम्राट. त्याचा जन्म दीर्घिका वर्ष ११९८८मध्ये झाला. याच वर्षी हॅरी सेल्डनचाही जन्म झाला होता. (सेल्डनच्या ट्रॅन्टॉरवरील आगमनानंतर त्याची आणि क्लिऑनची भेट झाली होती. कुणीकुणी असं मानतात की सेल्डनची जन्मतारीख जी वादग्रस्त मानली जाते- ती सेल्डन ट्रॅन्टॉरवर आल्यानंतर क्लिऑनच्या जन्मतारखेशी जुळवून घेण्यात आली होती.)

वयाच्या बाविसाव्या वर्षी पहिला क्लिऑन फाउंडेशनपूर्व २०१०मध्ये साम्राज्याच्या सिंहासनावर बसल्यानंतर त्याची कारकीर्द अगदी शांततेत पार पडली. सारा काळ धामधुमीचा असताना ही राजकीय शांतता थोडीशी बुचकळ्यात पाडणारी आहे हे तर खरंच. या यशाचे श्रेय निश्चितपणे त्याचा प्रशासकीय प्रमुख एटो डेमेर्झेल याच्या कौशल्यालाच द्यावे लागते. एटो डेमेर्झेलने स्वतःला सार्वजनिक जीवनापासून इतक्या काळजीपूर्वक दूर ठेवले होते, की त्याच्याबद्दलची फारशी माहिती कुठेही नोंदली गेलेली नाही.

क्लिऑन स्वतः...

१-

जांभई रोखण्याचा प्रयत्न करीत क्लिऑन बोलू लागला, “डेमेर्झेल, तू हॅरी सेल्डन नावाच्या माणसाबद्दल काही ऐकलं आहेस का कुठे?”

क्लिऑनची कारकीर्द सुरू होऊन नुकतीच उणीपुरी दहा वर्षं उलटली होती, आणि साम्राज्याच्या कारभारात काही समारंभांना राजवस्त्रे-प्रावरणे अंगावर चढवून राजस दिसण्यात तो बऱ्यापैकी यशस्वी झाला होता. त्याच्या या दिवाणखान्यातल्या भिंतीतील एका कोनाड्यात त्याचा जो होलोग्राफ(प्रकाशप्रतिमा) बसवला होता त्यातही तो राजेशाही थाटात दिसत होता. हा कोनाडा इतर सर्व कोनाड्यांपेक्षा अधिक उठावदार होता. उरलेल्या कोनाड्यांत त्याच्या पूर्वजांचे होलोग्राफ्स होते.

त्याचा हा होलोग्राफ तसा अगदीच जसाच्या जसा नव्हता. म्हणजे क्लिऑनच्या केसांचा रंग प्रत्यक्षात आणि होलोग्राफमधे सारखाच भुरकट पिंगट असला तरीही होलोग्राफमधे त्याचे केस तसे दाट दिसत होते. तसेच प्रत्यक्षात त्याच्या चेहऱ्याच्या दोन्ही बाजू थोड्याशा असमान होत्या. कारण त्याच्या ओठांची डावी बाजू उजव्या बाजूपेक्षी किंचित वर उचललेली होती. पण होलोग्राफमधे मात्र ते जाणवत नव्हते. आणि तो त्या होलोग्राफच्या शेजारीच उभा राहिला असता तर त्या प्रतिमेपेक्षा तो उंचीत दोन सेंटीमीटर कमी भरला असता. होलोग्राफमधली त्याची उंची १.८३ मीटर होती, आणि त्याची खरी देहयष्टीही जरा अधिकच जाडीजुडी होती.

अर्थात्, हा होलोग्राफ त्याच्या राज्याभिषेकाच्या वेळचा होता, आणि तो तेव्हा तरुणही होता. तो अजूनही तरूण दिसायचा आणि तसा बऱ्यापैकी तरतरीतही. राज्यकारभारात लागणारा कठोर मुखवटा चढवलेला नसेल तेव्हा त्याची मुद्रा छान साध्या सुस्वभावी माणसाची मुद्रा असल्यासारखीच दिसायची.

डेमेर्झेल आपल्या कमावलेल्या आदरयुक्त स्वरात उत्तरला, "हॅरी सेल्डन? नाव तरी ओळखीचं नाही वाटत मला. माहीत असणं गरजेचं आहे कां?"

"काल रात्री आपल्या विज्ञान मंत्र्यांनी मला त्याच्याबद्दल सांगितलं. मला वाटलं तुला माहीत असेल कदाचित्."

डेमेर्झेलच्या कपाळावर सूक्ष्म आठी पडली, पण अगदी ओझरतीच, कारण सम्राटांच्या उपस्थितीत कुणी कपाळाला आठ्या घालून उभं रहात नसतात.

"विज्ञानमंत्र्यांनी या मनुष्याबद्दल प्रशासक प्रमुख या नात्याने प्रथम माझ्याशी बोलायला हवं होतं, सम्राट. तुमच्यावर चारी बाजूंनी असा माहितीचा मारा-"

क्लिऑनने एक हात वर उचलताच डेमेर्झेल जिथल्यातिथे थांबला.

"प्लीज, डेमेर्झेल, सारा वेळ, सारा काळ कुणी औपचारिकता सांभाळत बसत नाही. काल रात्रीच्या समारंभात त्यांची माझी गाठ पडली आणि बोलताबोलता त्यांनी मला सहजच सांगून टाकलं. मी नको कसं म्हणणार –आणि बरंच झालं मी ऐकत राहिलो. कारण फारच उत्कंठाजनक होतं ते सारं."

"कसली उत्कंठा, सम्राट?"

"वेल, आता तसं विज्ञान आणि गणिताबद्दल भयंकर उत्कंठा वाटावी असं काही राहिलं नाही. ते जुने दिवस सरले आता... कदाचित सर्व प्रकारचे शोध लावून झाले, संशोधनं पूर्ण झाली म्हणून असेल, नाही कां? पण अजूनही काही उत्कंठावर्धक गोष्टी त्या क्षेत्रात घडत आहेत असं दिसतंय. निदान मला जे सांगितलं गेलं, ते तरी बऱ्यापैकी छान वाटलं मला."

"विज्ञानमंत्र्यांनी सांगितलेलं का काही, सम्राट?"

“होय. ते म्हणाले की या हॅरी सेल्डनने इथे ट्रॅन्टॉरमधे एका गणितपरिषदेत भाग घेतला होता. दर दहा वर्षांनी ती होते म्हणे. आणि ते म्हणाले की त्याने म्हणे असं सिध्द केलंय की भविष्याचा वेध गणिताच्या सहाय्याने घेता येणं शक्य आहे.”

डेमेर्झेलने मुद्रेवर हलकीशी स्मितरेषा उमटू दिली. “मला वाटतं, आपले विज्ञानमंत्री- जरा कमीच समज आहे त्यांना- किंवा तो गणितज्ञ कुणीतरी एकजण चूक करत असणार. भविष्य सांगणे वगैरे गोष्टी म्हणजे पोरासोरांना पडणारी जादूबिदूची स्वप्नंच म्हणायची.”

“खरंच का, डेमेर्झेल? लोकांचा या गोष्टींवर विश्वास असतो.”

“लोकांचा अनेक गोष्टींवर विश्वास असतो, सम्राट.”

“पण असतोच असल्या गोष्टींवर विश्वास. त्यामुळे, भविष्यकथन खरं निघो वा खोटं याने काहीही फरक पडत नाही. एखाद्या गणितज्ञाने माझी राजवट प्रदीर्घ असेल, आनंददायक असेल, साम्राज्यात सर्वत्र शांतता आणि समृध्दी नांदेल असं भविष्य वर्तवलं तर ते चांगलंच असेल ना?”

“ऐकायला फार छान वाटेल, हे तर नक्कीच, पण त्यातून साध्य काय होणार, सम्राट?”

“पण जर लोकांचा त्यावर विश्वास बसला तर, ते त्यानुसार वागू लागतील ना. अनेक भविष्यकथने, केवळ त्यावर विश्वास ठेवला गेल्यामुळे सत्यात उतरल्या हे खरंय. स्वयंसिध्द भविष्यवाणी म्हणू शकतो आपण. खरं तर, आता मला आठवलं, प्रथम तूच एकदा मला हे समजावून सांगितलं होतंस.”

डेमेर्झेल उत्तरला, “मला वाटतं, हो मीच सांगितलं होतं.” त्याचे डोळे आपल्या सम्राटाकडे बारकाईने न्याहाळून पाहात होते. जणू तो स्वतःच्या बुध्दीने

कुठवर जाऊ शकतो हे तो आजमावत होता. “तरीही, तसंच असलं तर मग कोणत्याही व्यक्तीने भविष्य सांगितलं तरी काहीही फरक पडणार नाही.”

“सगळ्याच माणसांवर काही लोक सारखाच विश्वास दाखवणार नाहीत, डेमेर्झेल. पण एखादा गणितज्ञ, जेव्हा आपल्या भविष्यवाणीला काही गणिती सूत्रांची किंवा परिभाषेची जोड देईल- जी कुणालाही कळणारही नाहीत- लोक नक्की त्याच्यावर अधिक विश्वास ठेवतील.”

डेमेर्झेल म्हणाला, “काय बोलू, सम्राट, आपले बोलणे तर नेहमीप्रमाणेच विचारी आहे. आपला हा काळ फार कठीण आहे आणि लोकांना शांत ठेवण्यासाठी फार खर्चिक उपाय न करता किंवा युध्द वगैरे सारखे उपाय... जे आजकाल एकंदरीत तोट्याचेच ठरतात. चांगलं काही हाती लागत नाही, संकटांत भरच पडते- त्यापेक्षा हे फार चांगलं.”

“अगदी बरोबर, डेमेर्झेल,” सम्राट उत्साहाने बोलू लागले. “या हॅरी सेल्डनला गुंडाळून घे. तू नेहमी म्हणतोस ना, या जगातल्या प्रत्येक खळबळत्या ग्रहाचीही सूत्रे तुझ्या हातात असतात... अगदी माझं सैन्य जिथे जाऊ धजणार नाही, तिथेही... मग हजर कर त्या गणितज्ञाला. मला भेटायचंय त्याला.”

“करतोच, सम्राट,” डेमेर्झेल म्हणाला. त्याने सेल्डनचा ठावठिकाणा आधीच शोधून ठेवला होता. विज्ञानमंत्र्यांनी आपलं काम चोख बजावल्याबद्दल त्यांचं आठवणीने कौतुक करायचंय याची नोंदही त्याच्या मेंदूत केली गेली.

--- ----

-२-

या सुरुवातीच्या काळात हॅरी सेल्डनचं व्यक्तिमत्त्व फार काही छाप पडण्यासारखं नव्हतं. सम्राट क्लिऑनप्रमाणेच तो सुध्दा बत्तीस वर्षांचाच होता. पण त्याची उंची फक्त १.७३ मीटर इतकीच होती. त्याचा चेहरा आनंदी होता, तुळतुळीत होता आणि त्याचे केस गडद तपकिरी होते- जवळपास काळेच. आणि त्याच्या अंगावरचा पोषाख तो कुठल्याशा मागास भागातून आल्याची थेट साक्ष देत होता.

नंतरच्या काळात, लोक जेव्हा त्याला दंतकथेतला देवमाणूस समजू लागले त्या काळात, त्याच्या डोईवर पांढरे शुभ्र केस नसणे, सुरकुतलेला चेहरा नसणे, आणि ओठांवर बुध्दीनिदर्शक चमकदार हसू नसणे म्हणजे अगदी मूर्तीभंजनासारखेच वाटले असते. तो व्हीलचेअरवर नसणे तर कल्पनातीत. त्याच्या वार्धक्यातही त्याचे डोळे कसे प्रसन्नपणे हसरे असत. पण ते काही असो- आत्ता होतं ते हे असं होतं.

पण त्याचे डोळे आत्ता मात्र आनंदाने खरेखुरे लकाकत होते. कारण त्याचा शोधनिबंध या दशक-परिषदेत निवडला गेला होता. आणि बऱ्याच लोकांना त्यात थोडाथोडा रस वाटलेला. अगदी ज्येष्ठ गणिती ओस्टरफिथ यानेही त्याच्याकडे पाहून मान हलवत सांगितलेलं- “अगदी नवीकोरी संकल्पना आहे बरं तुझी, बेटा, फारच नवीन.” ओस्टरफिथच्या तोंडून एवढं निघणं म्हणजे फारच चांगलं समजायला हरकत नव्हती. फारच समाधानदायक.

पण आता अचानक काहीतरी नवीनच सामोरं आलेलं. सेल्डनला नक्की कळत नव्हतं की यातून आपलं समाधान वाढणार आहे की कसं... ही आनंदाची बाब आहे की कसं?

त्याच्या समोर उभ्या असलेल्या गणवेषधारी उंच तरुणाकडे तो एकटक पाहात राहिला. त्याच्या अंगरख्यावर डाव्या बाजूला अवकाशयान आणि त्यावर प्रकाशणारा सूर्य अशी प्रतिमा नीटसपणे रेखलेली.

"मी लेफ्टनंट आल्बान वेलिस." सम्राटाच्या सेवेतला तो अधिकारी आपले ओळखपत्र पुन्हा परत खिशात सारतासारता म्हणाला, "आता आपण माझ्यासमवेत याल का, साहेब?"

वेलिस अर्थातच शस्त्रसज्ज होता. दाराबाहेर आणखी दोन रक्षक तैनात होते. सारे काही विनम्रपणे चालले असले तरीही आपल्यासमोर जाण्याशिवाय दुसरा पर्याय नाही हे सेल्डनला स्पष्टच कळलं होतं. पण अधिक माहिती मिळवण्यास काही आडकाठी नव्हती. त्याने विचारलं, "सम्राटांना भेटायला कां?"

"प्रासादात तुम्हाला घेऊन जायचं एवढीच आज्ञा आहे आम्हाला. तिथे गेल्यावर पुढील सूचना मिळतील आम्हाला."

"पण कां?"

"कां ते मला ठाऊक नाही, साहेब. आणि तुम्ही माझ्याबरोबर कसंही करून यायलाच हवं अशी मला कडक सूचना देण्यात आली आहे."

"पण याचा अर्थ असाही होतो की मला अटक करून नेलं जात आहे. मी तसं काहीही केलेलं नाही."

"असं म्हणू, की तुम्हाला अतिशय सन्मानपूर्वक घेऊन जातो आहोत आम्ही. तुम्ही अधिक उशीर केला नाहीत तरच अर्थात."

सेल्डनने मग आणखी उशीर केला नाही. त्याने जणू मनातले पुढले प्रश्न थोपवायला ओठ घट्ट मिटून घेतले आणि मान डोलावत पाऊल पुढे टाकलं. अगदी सम्राटाला भेटायला जायचं असेल आणि तो त्याचा सत्कार करणार असेल तरीही

त्याला त्यात फार काही आनंद वाटत नव्हता. तो साम्राज्याच्या बाजूनेच होता तसा- म्हणजे जगातली मानवतेची सारी ठाणी, सारे ग्रह शांतीत नांदावेत, एकत्र असावेत असं त्याला वाटायचं, पण सम्राटाबद्दल काही विशेष प्रेम नव्हतं त्याला.

लेफ्टनंट त्याच्या पुढे चालत होता आणि बाकीचे दोघे मागून. सेल्डन जवळून जाणाऱ्या लोकांकडे पाहून स्मितहास्य करीत होता. आपण काळजीत असल्याचं दिसू देत नव्हता. होटेलच्या बाहेर पडल्यावर ते अधिकृत वाहनात बसले. (सेल्डनने आतल्या आसनांच्या कापडांवरून हात फिरवला. इतक्या अलंकृत आसनावर तो यापूर्वी कधीच बसला नव्हता.)

ट्रॅन्टॉरमधल्या एका संपन्न भागातून ते चालले होते. इथे घुमटाची उंची खूपच जास्त होती. जणू आपण मोकळ्यावर आहोत असा भास व्हावा इतपत उंच. हॅरी सेल्डनसारख्या खुल्या आकाशाखाली आयुष्य काढलेल्या माणसानेही तिथं खराखुरा सूर्यप्रकाश आहे असं शपथेवर सांगितलं असतं. ऊन नव्हतं, सावल्या नव्हत्या, पण हवा छान होती, सुगंधी होती.

आणि मग ते तिथून बाहेर आले. घुमटाची कड खाली उतरली आणि भिंती दिसू लागल्या आणि काही क्षणांतच ते एका भुयारी रस्त्याने जाऊ लागले. त्या भुयाराच्या भिंतींवर अंतराअंतराने अवकाशयान आणि सूर्य यांचे ते चिन्ह होते. हा रस्ता नक्कीच केवळ शासकीय वाहनांसाठी असणार असा विचार हॅरी सेल्डनने केला.

एक दार उघडले आणि ती जमिनीवर धावणारी गाडी त्यातून वेगातच घुसली. जेव्हा ते दार मागे बंद झालं, तेव्हा ते खरोखरच्या खुल्या नभाखाली आले होते. खरोखर खुलं. ट्रॅन्टॉरवर खऱ्या अर्थाने खुल्या नभाखालचा हा एकमेव असा २५० चौरस किलोमीटरचा जमिनीचा तुकडा होता. त्यावरच सम्राटाचा राजप्रासाद

होता. या मोकळ्या जागेत फिरायला सेल्डनला खूप आवडलं असतं. तिथे राजप्रासाद होता म्हणून नव्हे- तर तिथे साऱ्या दीर्घिकेसाठी खुलं असलेलं गॅलॅक्टिक विद्यापीठ होतं, शिवाय गॅलॅक्टिक ग्रंथालयही होतं.

पण ट्रॅन्टॉरच्या अवगुंठित जगातून बाहेर पडल्यावर त्याला जाणवलं, की झाडाझुडुपांनी भरलेल्या या बागशाही जागेत आकाश ढगाळ होतं आणि अंगावरच्या शर्टला थंडी झटत होती. त्याने कळ दाबून खिडकीची काच बंद करून घेतली.

बाहेरचा दिवस खिन्नसा वाटत होता.

--- ---

३-

आपली भेट सम्राटाशी होणार याची सेल्डनला फारशी खात्री नव्हती. जास्तीत जास्त कुठल्यातरी चौथ्यापाचव्या पायरीवरचा अधिकारी सम्राटांचा प्रतिनिधी म्हणून आपल्याशी बोलेल असंच त्याला वाटत होतं.

कितीशा लोकांनी सम्राटाला पाहिलं असेल? प्रकाशप्रतिमेत नव्हे- प्रत्यक्षात? सेल्डन आता जिथून जात होता त्या राजभूमीचा परिसर सोडून सम्राट कधीही कुठे जात नसे- हाडामांसाचा सम्राट अभावानेच कुणाला भेटत असेल. मानवी वस्ती असलेल्या दोनशेपन्नास कोटी ग्रहांवर सरासरी शंभर कोटी प्रत्येकी अशी लोकसंख्या होती. आणि अशा परार्धावधी माणसांपैकी किती जणांच्या दृष्टीस सम्राट खऱ्या अर्थाने पडला असेल... हजारभर?

आणि कुणाला पर्वा होती त्याची? सम्राट हा अखेर त्या अवकाशयान-सूर्याच्या चिन्हासारखा होता- प्रतीकात्मक. उलट त्याचे अस्तित्व चिन्हापेक्षाही कमी

जाणवत असे, फारच वरवरचे. त्याचे सैनिक, त्याचे अधिकारी तेवढे सगळीकडे वळवळत, सळसळत फिरत असत आणि साम्राज्याचे खरे प्रतिनिधी तेच होते. लोकांना ओझं झालं होतं ते त्यांचं- सम्राटाचं नव्हे.

त्यामुळे जेव्हा सेल्डनला एका थोड्या प्रशस्त आणि अतिशय सुंदर महागड्या सजावटीच्या दालनात आणलं गेलं अन् तिथे एक तरुण माणूस खिडकीच्या महिरपीजवळच्या टेबलवर एक पाय जमिनीवर टेकवून, एक पाय हलवत बसलेला दिसला तेव्हा त्याला नवलच वाटलं... कुणी अधिकारी इतक्या प्रसन्न मुद्रेने सहजपणे त्याच्याकडे कसा काय पाहू शकतो? त्याला हा अनुभव वेळोवेळी आलेला. शासकीय अधिकारी- विशेषतः सम्राटाच्या थेट सेवेत असलेले अधिकारी सदोदित अत्यंत गंभीर दिसत... जणू साऱ्या दीर्घिकेचा भार त्यांच्याच खांद्यावर होता. त्यांचे महत्त्व जितके कमी तितके त्यांच्या चेहऱ्यांवरचे भाव अधिक गंभीर, अधिकच जरबेचे.

म्हणजे हा जो कोणी अधिकारी आहे तो जरा उच्चपदस्थ असला पाहिजे. हातातील सत्तेचा सूर्य इतका झळाळता असावा की आठ्या घालून त्यावर अभ्रे आल्याचं दाखवण्याची गरज पडत नसावी त्याला.

सेल्डनला कळेना, आपण फार प्रभावित झाल्यासारखं दाखवायचं की नाही... सगळ्यात उत्तम म्हणजे गप्प रहावं आणि या इसमालाच काय ते बोलू द्यावं हे बरं.

तो अधिकारी बोलू लागलाच, "तुम्ही हॅरी सेल्डन असणार, मला वाटतं. गणितज्ञ सेल्डन."

सेल्डनने पटकन् उत्तर देऊन टाकलं, "होय, साहेब." आणि तो थांबला.

त्या तरुण माणसाने हात जरासा झटकला. “तुम्ही मला ‘सम्राट’ म्हणायला हवं, पण मलाही या रीतीरिवाजांचा वैतागच येतो. सारखं तेच चालतं. आपण दोघेच आहोत इथे. त्यामुळे जरा स्वतःची आवड पुरवू दे मला आणि रिवाज टाळू देत. बसा, प्रोफेसर.”

तो बोलत असताना मधेच कधीतरी सेल्डनच्या डोक्यात प्रकाश पडला की आपण खरोखरच सम्राट क्लिऑनशीच बोलतो आहोत... त्या नावाचा तो पहिला सम्राट... -आणि त्याची जणू हवाच निघून गेली. त्याच्या अधिकृत होलोग्राफशी त्याचं थोडंफार साम्य जुळत होतं- हे आता नीट पाहाताना त्याला जाणवलं. तो होलोग्राफ सतत बातम्यांत झळकत असायचा. पण त्यात क्लिऑन नेहमीच अधिक उंच, धीरोदात्त आणि हिमकठोर मुद्रेचा दिसत असे.

आणि इथे हा- होलोग्राफची मूळ प्रत... -अगदी साधासुधा दिसत होता.

सेल्डन हलला नाही.

सम्राटाच्या भाळी थोडी आठी उमटली. आज्ञा देण्याची पध्दत इतकी अंगवळणी पडली होती की थोड्या वेळासाठी, पध्दत टाळतानाही त्याच्या स्वरात सहजसा आज्ञार्थ होताच, “मी म्हणालो, ‘बसा’. त्या खुर्चीवर. पटकन्.”

सेल्डनला शब्दच सुचत नव्हते. तो बसला. अगदी “होय, सम्राट.” म्हणायचंही त्याला सुचलं नाही.

क्लिऑन हसला. “हां, आता बरंय. आता आपण दोन साध्या माणसांसारखं बोलू शकतो. या पध्दतींना फाटा दिला तर- खरं म्हणजे सगळं सोपं असतं, हो की नाही, हां?”

सेल्डन सावधपणे उत्तरला, “महाराजाधिराजांना तसं मानण्यात आनंद वाटत असेल तर निश्चितच.”

“ओः, एवढं काळजीपूर्वक सावधपणे कां बोलताय? मला तुमच्याशी समान पातळीवर येऊन बोलायचंय. त्यातच मला आनंद आहे. करा माझ्या मनासारखं बरं.”

“होय, सम्राट,”

“नुसतं होय म्हणा हो. तुम्हाला कळत नाहीये कां?”

क्लिऑन सेल्डनकडे पाहात राहिला, आणि सेल्डनला त्याच्या नजरेतलं औत्सुक्य, जिवंतपणा जाणवला.

अखेर सम्राटच बोलू लागला, “तुम्ही गणितज्ञासारखे दिसत नाही.”

आणि मग सेल्डनला खरंच हसू आलं. “गणितज्ञाने कसं दिसलं पाहिजे... मला काही कल्पना नाही, महाराजाधि-”

क्लिऑनने त्याचे शब्द थांबवायला हात उंचावला आणि सेल्डनने शब्द तिथेच गिळले.

क्लिऑन म्हणाला, “केस पिकलेला... असू शकतो. दाढीवालाही कदाचित् चालेल. वयोवृध्द तर नक्कीच.”

“पण अगदी गणितज्ञांनाही सुरुवातीला कधीतरी तरुण असावंच लागतं.”

“पण मग त्यांची ख्याती वगैरे पसरलेली नसते. दीर्घिकेत नावारुपाला येईपर्यंत त्यांचं रुपडं मी म्हटल्याप्रमाणेच झालेलं असतं.”

“मला वाटतं- माझीही काही ख्याती पसरलेली नाहीये अजून.”

“आणि तरीही तुम्ही इथल्या त्या गणित परिषदेत भाषण केलंत.”

“अनेक गणितज्ञ होते. काहीतर माझ्यापेक्षाही तरुण होते. कुणीही फारसं लक्ष देत नव्हतं आमच्याकडे.”

“पण तुमच्या भाषणाने माझ्या काही अधिकाऱ्यांचं लक्ष वेधलं हे तर खरं. मला असं सांगण्यात आलं की, भविष्याचा वेध घेणं शक्य आहे असं काहीसं तुम्ही सूचित केलंत.”

सेल्डनला अचानक खूप थकवा जाणवून गेला. आपल्या सिध्दांताचा हा असा चुकीचा अर्थ यापुढे सतत लावला जाणार हे मान्यच करायला हवं... आपण तो शोधनिबंध वाचायलाच नको होता असं त्याला वाटून गेलं.

तो उत्तरला, “तसंच नाही काही. मी जे मांडलंय ते खूपच मर्यादित स्वरुपाचं आहे. अनेक व्यवस्थांच्या गुंत्यात एक परिस्थिती अशी उद्भवते की त्यात काही प्रचंड अनागोंदी घडून येते. म्हणजेच, एखादा आरंभबिंदू धरला तर पुढची परिणती काय असेल त्याबद्दल काही आडाखे बांधता येणे अशक्य आहे. साध्या सरळ अशा व्यवस्थांमध्ये हे सत्य ठरते, पण जसजशी व्यवस्था गुंतागुंतीची होते तसतशी ही अनवस्था, अनागोंदीची परिणती अधिकाधिक संभवते. आपण नेहमीच हे गृहीत धरतो की मानवी समाजातली गुंतागुंत ही नेहमीच बिकट परिस्थितीकडे परिणत होऊ शकते आणि त्याबद्दल निश्चित अशी भाकितं करता येत नाहीत. मी जे केलंय, ते एवढंच, की एखादा आरंभबिंदू निवडून, काही निवडक शक्यता मानून, ही अनागोंदी टाळता येऊ शकेल. त्यातून भविष्याचा अदमास लागेल, अगदी तपशीलवार अंदाज अर्थातच नाही, पण काही विस्तृत आवाक्याची निरीक्षणे, फारशी सुनिश्चित नसलेली, पण बऱ्यापैकी शक्यता मांडणारी ढोबळ निरीक्षणे नक्कीच मांडता येतील.”

सम्राट काळजीपूर्वक ऐकत होता, तो म्हणाला, “पण याचाच अर्थ तुम्ही भविष्य वर्तवण्याचा मार्ग सांगितला असाच होतो ना?”

“जवळपास तेच- पण अगदी नेमकं तसंच नाही. मी एवढंच म्हटलंय की सैध्दांतिक पातळीवर ते शक्य आहे, पण त्याहून अधिक काही नाही. यापेक्षा पुढली

पायरी गाठायची तर- आपल्याला आरंभबिंदू निश्चित करताना काटेकोर निवड करावी लागेल आणि मग ठराविक काळाच्या मर्यादेत राहून सारी गणिते मांडावी लागतील. माझ्या गणिती युक्तीवादात यापैकी कोणतीही गोष्ट कशा प्रकारे करावी याचा काहीही उहापोह नाही. आणि हे जरी करणे शक्य झाले, तरी आपण फार फार तर केवळ शक्यताच तपासू शकतो. भविष्य वर्तवण्यापेक्षा फार वेगळे असेल हे. कायकाय घडणे शक्य आहे एवढा अंदाजच त्यातून करता येईल. प्रत्येक यशस्वी राजकारणी, व्यावसायिक किंवा काहीतरी कृती करणारा कोणीही माणूस भविष्यासाठी ही गणिते मांडतच असतो- आणि चांगल्याप्रकारे मांडत असतो- न पेक्षा तो किंवा ती यशस्वी होऊच शकणार नाही."

"ते तर हे सारे अंदाज गणिताच्या मदतीशिवाय करतात."

"खरंय, त्यांचे हे अंदाज अंतःप्रेरणेने केलेले असतात."

"या बाबतीत शिस्तबध्द गणिते मांडली तर कुणालाही या शक्यतांचा अंदाज येऊ शकेल. मग कुणी विशेष अंतःप्रेरणेचे वरदान असलेला विरळाच माणूस ते करू शकेल अशी परिस्थिती उरणार नाही."

"खरंय, पण मी केवळ इतकंच म्हटलंय की व्यवस्थेचं गणिती विश्लेषण शक्य आहे. ते प्रत्यक्षात कसं आणायचं याचा विचार मी केलेला नाही."

"कोणतीही गोष्ट शक्य आहे, पण प्रत्यक्षात येण्यासारखी नाही... असं कसं शक्य आहे?"

"असं आहे की, या दीर्घिकेतील प्रत्येक जगाला भेट देणं आणि त्यावरच्या प्रत्येक माणसाशी बोलणं मला शक्य आहे असं मी सैद्धांतिक पातळीवर म्हणू शकतो. पण प्रत्यक्षात माझ्या आयुष्याचा वेळ पाहाता त्या गोष्टीला खूपच जास्त वेळ लागेल, अगदी मी अमर असलो तरीही, ज्या गतीने माणसे जन्माला येतात ती

गती मी किती वृध्द माणसांशी किती वेळात बोलू शकेन या गतीपेक्षा कैक पटींनी जास्त असेल. शिवाय मी पोहोचण्याआधीच अनेक वृध्द माणसे मृत्यूही पावत रहातील.”

“आणि हे तुझ्या भविष्याच्या गणिताबद्दलही खरं असेल कां?”

सेल्डन थोडा अडखळला, पण मग बोलू लागला, “गणितशास्त्रापुरतं पाहिलं तर या गोष्टीला खूपच वेळ लागेल. अगदी विश्वाइतका प्रचंड कॉम्प्युटर मदतीला असला, आणि तो प्रकाशगतीहून अधिक- हायपरस्पाशियल वेगाने जरी काम करीत असला तरीही ते शक्य होणारे नाही. जोवर काही उत्तर मिळेल, तोवर इतकी वर्षे सरलेली असतील की ती परिस्थिती बदलण्याचे सर्व प्रयत्न निरर्थक ठरतील.”

“ही प्रक्रिया सोपी कां नाही करता येणार?” क्लिऑनने तिखट स्वरात विचारलं.

“महाराजाधिराज,” सेल्डनला जाणवलं, मनासारखी उत्तरं मिळेनात तेव्हा सम्राट स्वतःच बऱ्याच औपचारिक पध्दतीने बोलू लागला होता. “एक विचारात घ्यावे, वैज्ञानिकांनी परमाणूंच्या उपकणांबद्दल अभ्यास करताना कशा प्रकारे काम केले होते. या उपकणांचे वैविध्य प्रचंड होते. त्यातला प्रत्येक आपापल्या वेगवेगळ्या गतींनुसार हालचाल करीत होता किंवा थरथरत होता... आणि त्यांच्या हालचाली अगदीच अनिश्चित, मुक्त अशा होत्या. पण या साऱ्या गोंधळातही एक अंतर्गत अशी सुव्यवस्था होती. त्यामुळे आपण क्वांटम मेकॅनिक्सचा वापर करून आपल्याला पडलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधू शकलो. समाजाचा अभ्यास करताना या अणूंच्या उपकणांच्या जागी आपल्याला माणसांचा विचार करायचा आहे. पण आता यात आणखी एक भर पडते- मानवी मनाची. कणांची हालचाल होताना त्यात विचार

नसतो- माणसं मात्र विचार करतात. प्रत्येकाचे दृष्टीकोन, मानसप्रेरणा यांमुळे एकंदर गुंतागुंत इतकी वाढत जाते की साऱ्याचा विचार करण्यासाठी वेळ पुरणार नाही."

"विचारशून्य हालचालींप्रमाणेच मनोव्यापारातही काही अनुस्यूत अशी शिस्त नसेल?"

"असेलही. माझे गणिती विश्लेषण असे सुचवते की प्रत्येक गोष्टीला- ती कितीही अस्ताव्यस्त दिसू देत, काही ना काही शिस्त असतेच. पण त्या अनुस्यूत शिस्तीचे नियम कसे शोधावेत याची काहीच कल्पना अजूनतरी येऊ शकलेली नाही. पहा, मानवी वस्तीची जगे असतील निदान दोनशेपन्नास कोटी, त्या सर्वांची वैशिष्ट्ये, संस्कृती हे सारे एकमेकांपासून किती निरनिराळे असेल. त्यातल्या प्रत्येकात शंभर कोटींपेक्षा जास्त माणसे- ज्यांतील प्रत्येकाला वेगळे मन आहे... ही सारी जगे एकमेकांशी संवाद साधतात त्यातही किती वैविध्य! सैध्दांतिक पातळीवर मानसैतिहासिक- सायकोहिस्टॉरिकल विश्लेषण शक्य आहे असं कितीही म्हटलं, तरीही ते प्रत्यक्षात साध्य करणे शक्य वाटत नाही."

"सायकोहिस्टॉरिकल? काय अर्थ आहे याचा?"

"भविष्यातील शक्यतांचा सैध्दांतिक अंदाज घेणे याला मी सायकोहिस्ट्री असा शब्द वापरतो."

सम्राट अचानक उठून उभा राहिला, दालनाच्या दुसऱ्या टोकाकडे चालत गेला, वळून पुन्हा परतला आणि अजूनही बसून असलेल्या सेल्डनच्या पुढ्यात थांबला.

"उभे रहा!" त्याने आज्ञा केली.

सेल्डन उभा राहिला आणि आपल्यापेक्षा थोड्या उंच अशा त्या सम्राटाकडे पाहात राहिला. त्याने प्रयत्नपूर्वक नजर भिडवून ठेवली.

अखेर क्लिऑन म्हणाला, “ही तुझी सायकोहिस्ट्री... जर व्यवहार्य स्वरुपात आली तर त्याचा फार मोठा उपयोग होईल, होय की नाही?”

“प्रचंड उपयोग होईल, नक्कीच. भविष्यात काय वाढून ठेवलंय ते समजून घेता आलं- अगदी केवळ शक्यतांचा अंदाज म्हणून, ढोबळ अंदाज म्हणूनही जमलं तरीही आपल्या सर्व कृतींसाठी एक दिशादर्शक साधन मिळेल. जे यापूर्वी कधीही मानवजातीच्या हाती नव्हतं. पण अर्थात्-” तो थबकला.

“काय?” क्लिऑन अधीर स्वरात म्हणाला.

“वेल, असं होईल की काही निर्णयकर्त्यांनाच याबद्दलची माहिती व्हावी लागेल. लोकांसाठी ते अज्ञात रहावं लागेल.”

“अज्ञात रहावं लागेल!” क्लिऑन आश्चर्याने उद्गारला.

“स्पष्टच आहे. मला सांगायचा प्रयत्न करू दे. जर हे सायकोहिस्टॉरिकल विश्लेषणाचे निष्कर्ष लोकांना कळू दिले तर, मानवजातीच्या भावभावना, प्रतिक्रिया संपूर्णपणे बदलून जातील. सायकोहिस्टॉरिकल विश्लेषण करताना आपण भविष्याची काही माहिती नसताना त्यांच्या भावभावना आणि प्रतिक्रिया लक्षात घेऊन त्यावर आधारित विश्लेषण केले असेल... त्यामुळे त्या पायाभूत संदर्भात असा बदल घडताच ते विश्लेषण निरर्थक होऊन जाईल. कळतंय तुम्हाला?”

सम्राटाचे डोळे लकाकले आणि तो मोठ्याने हसला, “ मस्तच आहे हे!”

त्याने सेल्डनच्या खांद्यावर हाताने थोपटले आणि सेल्डन त्या वजनाने किंचित कडमडला.

“तुला दिसत नाही का रे, माणसा?” क्लिऑन म्हणाला, “नाही दिसत? हाच तर तुझा उपयोग आहे. तू भविष्य वर्तवण्याची गरजच नाही. केवळ एका चांगल्याशा, उपयोगी भविष्याची निवड कर... तेच वर्तव आणि त्यातून मानवी भावभावना,

त्यांच्या प्रतिक्रिया बदलून जाऊ देत... त्या मार्गानेच तुला हवं ते भविष्य प्रत्यक्षात आणता येईल. काहीतरी वाईट भविष्य वर्तवण्यापेक्षा चांगलं भविष्य घडवणं अधिक श्रेयस्कर असेल.''

सेल्डनच्या कपाळावर आठ्या पडल्या, ''मला कळतंय तुम्हाला काय म्हणायचंय ते, सम्राट, पण ते तितकंच अशक्य आहे.''

''अशक्य?''

''हं, अव्यवहार्य तर नक्कीच. तुम्हाला कळू शकेल- पहा... आपल्याला मानवी भावना आणि प्रतिक्रियांच्या पायावर त्यातून सिध्द होऊ शकणारं भविष्य वर्तवता येणार नसेल तर त्याच्या उलट प्रक्रियाही आपण करू शकणार नाही. एक भविष्य निवडून ते वर्तवून त्यातून कोणाकोणाच्या कशा भावना असतील, कशा प्रतिक्रिया असतील हेही सांगता येणार नाही.''

क्लिऑनच्या मुद्रेवर निराशा उमटली. त्याने ओठ घट्ट मिटल्यासारखे केले. ''आणि मग तुझा तो शोधनिबंध? ... शोधनिबंधच म्हणतात ना? ... त्याचा उपयोग तरी काय?''

''तो केवळ एक गणिती सिध्दांताचा प्रकार होता. गणितज्ञांना त्यातून काही आकर्षक मुद्दे मिळाले. पण त्याचा असा प्रत्यक्ष काही उपयोग होईल हा विचारही माझ्या मनात नव्हता.''

''हे तर अगदीच वाईट.'' क्लिऑन रागानेच म्हणाला.

सेल्डनने खांदे उडवले. आता तर आपण हा शोधनिबंध कदापि वाचायला नको होता याची त्याला खात्रीच पटली. आपण याला हेतुतः मूर्ख बनवलं असं काहीतरी याने डोक्यात घेतलं तर आपलं काय होणार?

आणि खरोखरच क्लिऑनच्या चेहऱ्यावरचे भाव जवळपास तसेच होते.

"तरीही एक आहेच," तो म्हणाला, "जर तू भविष्य वर्तवलंस- गणित वगैरेचं काही स्पष्टीकरण असो वा नसो. असं भविष्य- जे वर्तवल्यामुळे योग्य त्या भावना उत्पन्न होतील, प्रतिक्रिया येतील हे काही तज्ज्ञ शासकीय अधिकाऱ्यांना, लोकमानस जाणणारांना कळतं- तेच वर्तवलं तर?"

"ते करायला तुम्हाला माझी काय गरज? ते तज्ज्ञ शासकीय अधिकारी, ती माणसं तसली भाकितं स्वतःच करू शकतील. आणखी एका मध्यस्थाची गरज नाही त्यात."

"शासकीय अधिकारी ते तितकंसं परिणामकारकरित्या करू शकणार नाहीत. ते तसली काही भाकितं अधुनमधून करत असतात. त्यांच्यावर सगळे विश्वास ठेवतातच असं नाही."

"माझ्यावर तरी का ठेवतील?"

"तू गणितज्ञ आहेस. तू भविष्य वर्तवण्याआधी गणितं मांडलेली असशील- ती काही अंतःप्रेरणेची भाकितं नसतील."

"पण मी तसं काहीच केलेलं नसेल."

"ते कुणाला कळणार आहे?" क्लिऑन डोळे बारीक करून त्याच्याकडे पाहात राहिला.

एक क्षण तसाच थबकून राहिला. सेल्डनला सापळ्यात अडकल्यासारखं वाटलं. सम्राटाची थेट आज्ञा झाली तर... ती नाकारणे सुरक्षित असेल? नकार दिल्यास त्याला कैद होऊ शकली असती... कदाचित् मृत्यूदंडही झाला असता. खटला वगैरे चालला असता अर्थातच. पण एका बलाढ्य नोकरशाहीच्या इच्छेविरुध्द कोणत्याही खटल्याचा निकाल जाणे फारच कठीण होते... गॅलेक्सीच्या सम्राटाच्या हाताखालच्या नोकरशाहीविरुध्द तर नक्कीच नाही.

अखेर तो उत्तरला, “तसं होऊ शकणार नाही.”

“कां नाही?”

“मला जर काहीतरी धूसर, सर्वसाधारण काही पिढ्यांनंतर प्रत्यक्षात येऊ शकणारं भविष्य वर्तवायला सांगितलं, तर कदाचित् काही फरक पडणार नाही. पण त्या तशा भविष्यवाणीकडे लोक दुर्लक्षच करतील. शतकादोनशतकांनंतर काय होईल याची तशी कुणालाच फिकीर वाटणार नाही.

“काही हाती लागण्यासाठी,” सेल्डन बोलत राहिला, “मला काहीतरी चांगलं परिणामकारक, निर्णायक भविष्य वर्तवावं लागेल, नजिकच्या भविष्यकाळाशी निगडीत असलेलं. लोक काही प्रतिसाद देतील तर तो यालाच. पण लवकरच कधीतरी, ही भाकितं खरी ठरली नाहीत की मग माझा उपयोग संपलेला असेल. त्याच बरोबर तुमची लोकप्रियताही घटेल. आणि त्यापेक्षाही वाईट म्हणजे- भविष्यात कधीतरी सायकोहिस्ट्रीचा विकास होण्यासाठी, त्यात गणिती प्रज्ञेने काही चांगले मार्ग सुचवले तरीही, आणि त्याचे ज्ञान व्यवहार्य होण्याची शक्यता निर्माण झाली असली तरीही त्यावेळी त्याला कुणीही पाठिंबा देणार नाही.”

क्लिऑनने धाडकन् एका खुर्चीत अंग टाकले आणि तो सेल्डनकडे आठ्यांच्या जाळयातून पाहू लागला. “तुम्ही गणितज्ञ केवळ एवढंच करू शकता की काय? अशक्य काय आहे तेच सांगत रहाणं, बस्स?”

सेल्डनने प्रयत्नांची पराकाष्ठा करून मृदू स्वरात उत्तर दिले, “सम्राट, आपणच अशक्य ते करण्याचा आग्रह धरता आहात.”

“मला तुझी परीक्षा करू दे. समज, मी तुला सांगितलं, की तुझ्या गणिताचा वापर करून मला सांग की माझी कधीकाळी हत्या होईल कां? तर तू काय उत्तर देशील?”

“माझी गणिताची पद्धत इतक्या विवक्षित प्रश्नाचं उत्तर देऊ शकणार नाही, अगदी सायकोहिस्ट्रीचे संपूर्ण कसब वापरले तरीही नाही. जगातलं संपूर्ण क्वांटम मेकॅनिक्स कामाला लावलं तरीही कुणी एका विशिष्ट इलेक्ट्रॉनचे वर्तन कसे असेल हे सांगू शकत नाही. त्याद्वारे एकंदर साऱ्या इलेक्ट्रॉन्सच्या सर्वसाधारण वर्तनाचेच नियम मांडता येतात.”

“तुला तुझं गणित अर्थातच माझ्यापेक्षा चांगलंच येत. त्याच्या आधारे एक चांगलासा अंदाज व्यक्त कर. माझी कधीतरी हत्या होईल कां?”

सेल्डन हलकेच उत्तरला, “तुम्ही माझ्यासाठी सापळा रचताय, सम्राट. तुम्हाला कोणतं उत्तर अपेक्षित आहे ते मला सांगा- ते मी तुम्हाला देईन. किंवा मग मला मोकळेपणाने उत्तर देऊ दे- त्यासाठी मला शिक्षा होणार नाही या आश्वासनासह.”

“तुला योग्य वाटेल तेच बोल.”

“तुम्ही वचन देता आहात, सम्राट?”

“लिहून हवंय कां?” क्लिऑनने उपरोधाने विचारलं.

“तुमचं तोंडी वचन पुरेसं आहे.” सेल्डन म्हणाला, पण त्याच्या पोटात खड्डा पडलेला कारण ते खरोखरच पुरेसं असेल याची त्याला फारशी खात्री वाटत नव्हती.

“मी वचन दिलं.”

“मग मी तुम्हाला सांगेन, गेल्या चार शतकांत होऊन गेलेल्या सम्राटांपैकी अर्ध्यांच्या हत्या झाल्या. त्यामुळे तुमचीही हत्या होण्याची शक्यता दोनांत एक इतकी आहे.”

“हे उत्तर तर कुणीही मूर्ख देऊ शकेल.” क्लिऑन तुच्छतेने म्हणाला, “हे सांगायला गणितज्ञाची गरज नाही.”

“मी तुम्हाला आत्ताच अनेकदा सांगितलंय, की माझं गणित व्यवहारात उपयोगाचं नाही.”

“माझ्या दुर्दैवी पूर्वजांकडून मी एवढाही धडा घेतला नसेल असं वाटतं का तुला?”

सेल्डनने खोलखोल श्वास घेतला आणि मग उडी घेतली, “नाही, सम्राट. सारा इतिहास साक्षी आहे, की आपण भूतकाळाकडून कोणतेही धडे शिकत नाही. उदाहरणार्थ, तुम्ही मला इथे एकट्याला बोलावून घेतलंत. माझ्या मनात तुमची हत्या करायचा विचार असता तर? तसं जरी नाहीये- सम्राट,” त्याने घाईघाईत जोड दिली.

क्लिऑनच्या हास्यात प्रसन्नता नावालाही नव्हती. “बाबा, आमचा कारभार किती परिपूर्ण आहे याबद्दल आणि तंत्रज्ञान किती पुढे गेलंय याबद्दलही तुला काहीच कल्पना नाही. तुझा साद्यंत इतिहास, सर्व नोंदी आमच्याकडे आहेत. तू आत शिरतानाच तुला स्कॅन करून झालंय. तुझ्या मुद्रेवरचे भाव, तुझ्या आवाजाची छाप यांचं विश्लेषण झालंय. आणि तुझी भावनिक मनःस्थिती काय होती हे सारे तपशील आमच्याकडे आहेत. तुझ्या मनात काय विचार चालले होते हे सर्व आम्हाला जवळपास माहीत आहे. तू निरुपद्रवी आहेस याबद्दल यत्किंचितही शंका आमच्या मनात असती, तर तुला माझ्या जवळपासही कुणी फटकू दिलं नसतं. किंबहुना तू आता जिवंतही राहिला नसतास.”

सेल्डनच्या मनावर घृणेची एक लहरच आदळली, पण तो पुढे बोलू लागला. “कुणाही बाहेरच्या व्यक्तीला सम्राटांच्या निकट पोहोचणं नेहमीच अवघड होतं- तंत्रज्ञान जरा मागास होतं तेव्हाही. पण, बहुतेक सर्व सम्राटांच्या हत्या या

राजप्रासादात रचल्या गेलेल्या कारस्थानांतूनच घडल्या आहेत. सम्राटांच्या अगदी सतत सान्निध्यात असलेल्या व्यक्तीच त्यांना धोकेशीर ठरल्या आहेत. त्या धोक्यासमोर- बाहेरच्या व्यक्तींची तपासणी ही बिनमहत्त्वाचीच ठरते. आणि तुमचे स्वतःचे अधिकारी, तुमचे रक्षक, तुमचे निकटवर्ती यांना तुम्ही माझ्याशी जसे वागता आहात, तशी वर्तणूक देऊ शकत नाही."

क्लिऑन म्हणाला, "मला हे माहीत आहे, निदान तुझ्याइतकंच चांगलं माहीत आहे. आणि त्याचं उत्तर एवढंच आहे, की मी माझ्या निकटवर्तीयांशी भलेपणाने वागतो आणि त्यांना माझा संताप यावा असं मी कधीही वागत नाही."

"वेडेपणा-" सेल्डनने सुरुवात केली आणि मग तो गोंधळून थांबला.

"बोलत रहा," क्लिऑन रागात म्हणाला, "मी तुला मोकळेपणाने बोलायची परवानगी दिली आहे. माझा काय वेडेपणा आहे?"

"सम्राट, तो शब्द चुकून तोंडात आला. मला म्हणायचंय की निरर्थक. तुम्ही तुमच्या निकटवर्तीयांशी कसे वागता हा मुद्दा निरर्थक आहे. तुम्ही संशयाने तर पाहातच असणार. तसं न वाटणं अमानवीच असेल. एखादा निष्काळजीपणे तोंडातून निघालेला शब्द- जसा आता मी वापरला, एखादी सहजपणे फार विचार न करता केलेली हस्तमुद्रा, चेहऱ्यावर उमटलेली शंका आणि डोळे बारीक करून पहाण्याची लकब. आणि अशा अनेक गोष्टी- संशयाचा लेशही त्यात असला तर एक दुष्टचक्र सुरू होते. तुमच्या निकटवर्तीयांना तो संशय जाणवेल, आणि त्यांना त्याचा राग येईल, त्यांच्या वर्तनात कितीही प्रयत्न केला तरी बदल होणारच. तुम्हालाही ते जाणवेल आणि तुम्ही अधिकच संशयाने पाहू लागाल आणि अखेर मग त्या कुणाचा तरी मृत्यू ओढवेल किंवा तुमची हत्या होईल. ही प्रक्रिया गेल्या चार शतकांतील

सम्राटांना टाळता आलेली नाही, आणि साम्राज्य चालवण्यात वाढणाऱ्या अडचणींचे हे केवळ एक लक्षणमात्र आहे.”

“म्हणजे, मी काहीही केले तरीही मला माझी हत्या होणे टाळता येणार नाही.”

“नाही, सम्राट,” सेल्डन म्हणाला, “पण कदाचित् तुम्ही सुदैवीही ठराल.”

क्लिऑन हाताच्या बोटांचा ठेका खुर्चीच्या हातावर धरत बसून होता. मग तो कठोर आवाजात म्हणाला, “तू अगदीच कामाचा नाहीस- आणि तुझी ती सायकोहिस्ट्रीसुध्दा. जाऊ शकतोस.” एवढं बोलून सम्राटाने नजर वळवली आणि अचानक तो बत्तीस वर्षांपेक्षा खूपच जास्त वयाचा दिसू लागला.

“मी आधीच म्हणालेलो, माझं गणित तुमच्या दृष्टीने निरुपयोगीच असेल, सम्राट. मी आपली मनापासून क्षमा मागतो.”

सेल्डन झुकून अभिवादन करणार इतक्यात दोन रक्षक कुठल्याशा अदृश्य संकेतासरशी आत आले आणि त्याला बाहेर घेऊन गेले. त्या राजेशाही दालनातून क्लिऑनचा आवाज त्याच्या मागोमाग आला, “या मनुष्याला जिथून आणलं तिथेच पोहोचवा.”

--- ----

४-

एटो डेमेर्झेल आत आला, आणि त्याने सम्राटाकडे योग्य त्या आदराने नजर टाकली. तो म्हणाला, “सम्राट, आपण जवळपास क्रोधाच्या आहारी गेला होतात असं दिसतंय.”

क्लिऑनने वर पाहिले आणि मग प्रयत्नपूर्वक त्याने चेहऱ्यावर स्मित आणले.

"वेल, ते तर झालंच. या माणसाने माझी घोर निराशा केली."

"पण तरीही त्याने त्याच्या दाव्यापेक्षा अधिक आश्वासनंही दिली नाहीत."

"त्याने काहीच दावा केला नाही."

"आणि कसलं आश्वासनही दिलं नाही, सम्राट,"

"माझा तर पुरता अपेक्षाभंग झाला."

डेमेर्झेल म्हणाला, "अपेक्षाभंगापेक्षाही जास्त, कदाचित्. हा माणूस तसा धोकेशीर ठरू शकेल, ढिला सोडलेला तोफखाना, सम्राट."

"ढिला सोडलेला -काय, डेमेर्झेल? तू एकेक नवीनच वाक्प्रचार वापरत असतोस. तोफखाना म्हणजे काय?"

डेमेर्झेलने गंभीरपणे उत्तर दिलं. "तरुणपणी कधीतरी हा वाक्प्रचार ऐकलेला मी, सम्राट. साऱ्या साम्राज्यात असे अनेक चित्रविचित्र वाक्प्रचार आहेत आणि त्यातले अनेक ट्रॅन्टॉरवर वापरलेही जात नाहीत, आणि ट्रॅन्टॉरवरचे अनेक वाक्प्रचार, शब्द बाहेरच्या जगांत माहीत नसतात."

"तू काय मला साम्राज्य किती प्रचंड आहे ते समजावून सांगतोस की काय आता? तो मनुष्य म्हणजे ढिला सोडलेला तोफखाना आहे म्हणजे नेमकं काय ते सांगणार आहेस का?"

"म्हणजे मला इतकंच म्हणायचंय, की तो अगदी निर्हेतुकपणे काहीतरी संकट उभं करू शकतो. त्याला अजून त्याचं बलस्थान कळलेलं नाही. महत्त्वही कळलेलं नाही."

"असा निष्कर्ष तू काढलास, डेमेर्झेल?"

“होय, सम्राट. तो अगदीच मागास प्रातांतून आलाय. तो यापूर्वी कधीही आपल्या या ग्रहावर आलेला नव्हता, तो उच्चकुलीन नाही आणि दरबारी रीतीभाती त्याला माहीत नाहीत. तरीही तो तुमच्या समोर टिकला.”

“त्यात काय? मी त्याला बोलायला अनुज्ञा दिली. मी रीतीभाती बाजूला ठेवल्या. मी त्याला समान पातळीवर वागवलं.”

“अगदीच काही तसं नव्हतं, सम्राट. इतरांना समान पातळीवर वागवण्याची तुम्हाला कधी सवयच नाही. आज्ञा सोडणं अंगवळणी पडलंय. आणि अगदी एखाद्या माणसाला तुम्ही सहजपणे वागवलंत, तरीही फार कमी लोकांना त्याचा स्वीकार करता येतो. बरेच लोक तर वाचा गेल्यासारखे उभे रहातील किंवा आणखी वाईट म्हणजे ते अत्यादराने झुकून जातील, तोंडपुजेपणा करतील. हा मनुष्य तुम्हाला ताठ सामोरा उभा राहिला.”

“तू कर त्याचं कौतुक, डेमेर्झेल, पण मला काही तो आवडला नाही.” क्लिऑनची मुद्रा थोडी विचारमग्न, थोडी वैतागलेली होती. “तू पाहिलंस कां, त्याने त्याचं गणित मला समजावून देण्याची जराही तसदी घेतली नाही ते? जणू त्याने गृहीत धरलेलं की मला त्यातलं एक अक्षरही कळणार नाही.”

“पण ते तुम्हाला कळलंही नसतं, सम्राट. तुम्ही काही गणितज्ञ नाही आहात, कुठल्याही शाखेचे वैज्ञानिक नाही आहात, कलावंत नाही आहात. अशी अनेक क्षेत्रे आहेत की ज्यांच्याबद्दल इतरांना तुमच्यापेक्षा खूप जास्त कळतं. ते ज्ञान वापरून तुमची सेवा करणं ही त्यांची जबाबदारी आहे. तुम्ही सम्राट आहात, त्या सर्वांचं ज्ञान एकीकडे आणि तुमचे मूल्य एकीकडे.”

“खरंच की काय? वर्षानुवर्षे एकाच क्षेत्रात घालवलेल्या एखाद्या वयोवृध्द माणसाकडून मला अशी अज्ञानी असल्याची वागणूक मिळाली असती तर मला

काही वाटलं नसतं. पण हा माणूस, सेल्डन, तो तर माझ्याच वयाचा आहे. त्याला इतकी कशी काय माहिती असेल?"

"त्याला इतरांना आज्ञेत ठेवायची सवय जडवून घेण्याची कधी गरज पडली नाही, अनेकांच्या जीवनांवर परिणाम करणारे निर्णय घेण्याची कला त्याला आत्मसात् करावी लागली नाही."

"डेमेर्झेल, मला कधीकधी वाटतं, की तू माझा उपहास करतो आहेस की काय."

"सम्राट?" डेमेर्झेल नापसंतीने म्हणाला,

"बरं ते जाऊ दे. तुझ्या त्या ढिल्या तोफखान्याबद्दल बोल. तू त्याला धोकेशीर का मानतोस? तो तर मला अगदीच भाबडा, खेडवळ माणूस वाटला."

"ते तर आहेच. पण त्याच्या हातात त्याचं हे गणिताच्या वापराचं अस्त्र आहे."

"तो म्हणतो ते निरुपयोगी आहे."

"तुम्हाला वाटलं होतं, की ते उपयोगी ठरेल. तुम्ही मला समजावून सांगितल्यानंतर, मलाही त्याचा उपयोग वाटला. इतरांनाही वाटू शकतो. त्याला स्वतःलाही तसं पुढेमागे वाटू शकतं, कारण आता तो त्यावरच विचार करत रहाणार आहे. आणि काय सांगावं, त्याचा उपयोग कसा करून घ्यावा याचा काहीतरी मार्ग तो शोधूनही काढू शकेल. तसं झालं, तर मग भविष्याचा वेध घेण्याची क्षमता- कितीही ढोबळपणे असो- मोठीच शक्ती ठरेल ती कुणाच्याही हातातली. त्याला स्वतःला ती शक्ती वापरण्याची इच्छा नसली तरीही, माझ्या मते असं कुणी स्वतःला वंचित ठेवणं अवघड असतं- पण कुणीतरी दुसरं त्याचा वापर करेल."

"मी त्याचा वापर करण्याचा प्रयत्न केला. तो तसं करू देणार नाही."

“त्याने त्यावर काहीही विचारच केला नव्हता. आता कदाचित् करेल. आणि त्याला तुमच्याकडून वापरून घेण्याच रस नसला तरीही- त्याचं मन वळवणारे इतरही काहीजण असू शकतात की नाही- उदाहरणार्थ- वाय प्रांताच्या महापौर?”

“तो वायला मदत करेल आणि आपल्याला नाही, याचं काय कारण असणार?”

“तो म्हणाला तसंच, व्यक्तींचे वर्तन, भावना यांचा अंदाज लागणं कठीण असतं.”

क्लिऑन रागावून विचार करत बसला. “तुला खरंच वाटतं का, की तो ही त्याची सायकोहिस्ट्री खरोखर उपयुक्त होईल अशा प्रकारे विकसित करेल असं? तो तर अगदी ठामपणे नाही म्हणतो.”

“काही काळानंतर, ही शक्यता आपण नाकारत होतो हे चूक असल्याचं त्याला वाटू शकतं.”

क्लिऑन म्हणाला, “म्हणजे... मी त्याला थांबवून घ्यायला हवं होतं तर.”

डेमेर्झेल म्हणाला, “नाही, सम्राट. तुम्ही त्याला जाऊ दिलंत, ही तुमची अंतःप्रेरणा अगदी बरोबर होती. कितीही छानपैकी लपवली तरी कैद ही कैदच असते, आणि त्यामुळे मनात कटुता आणि निराशा तर निर्माण होतेच कैद्याच्या. तसं करून त्याला त्याच्या संकल्पनांचा विस्तार करण्यासाठी उत्साह वाटला नसताच, शिवाय आपल्याला मदत करावी अशीही उत्सुकता राहिली नसती. त्याला जाऊ देणं- जे तुम्ही केलंत- आणि मग अदृश्य असा लगाम त्याच्या गळयात सतत ठेवणं हेच योग्य. अशा तऱ्हेने त्याचा वापर आणखी कुणीही करणार नाही, तो केवळ तुम्हालाच उपलब्ध राहील याची काळजी आपण घेऊ शकतो, सम्राट. योग्य वेळी, त्याने त्याचं शास्त्र पूर्णपणे विकसित केलेलं असेल, तेव्हा आपण तो लगाम खेचू

आणि त्याला आत आणू. त्यानंतर आपण- त्याचं मन वळवण्याचा अधिक प्रयत्न करू."

"पण त्याला आपल्या कुणी शत्रूने किंवा साम्राजाच्या शत्रूने, कारण अखेर मी म्हणजे साम्राज्यच-उचलून नेलं किंवा तो स्वतःहून शत्रूकडे गेला- शक्य आहे तेसुध्दा बर कां- तर?"

"शक्य आहेच. असं होणार नाही याची मी स्वतः काळजी घेईन. पण साऱ्या प्रयत्नाना दाद न देता तसं घडलंच, तर मग तो चुकीच्या हाती पडण्यापेक्षा कुणाच्याच हाती न पडणं अधिक हिताचं ठरेल."

क्लिऑन अस्वस्थ दिसत होता. "ते मी तुझ्या हाती सोपवतो, डेमेर्झेल. पण आपण मला वाटतं, घाई करता कामा नये. काय सांगावं तो खरोखरच केवळ सैद्धांतिक पातळीवर विचार करणारा वैज्ञानिक असेल... त्याचं गणित व्यवहार्य नसेलही खरोखरच."

"सर्वस्वी शक्य आहे ते, सम्राट. पण हा माणूस महत्त्वाचा आहे किंवा ठरू शकतो असं गृहीत धरणं केव्हाही अधिक श्रेयस्कर ठरेल. एका बिनमहत्त्वाच्या माणसाशी आपली गाठ पडली होती असं कळलं तरीही निदान आपण कमीत कमी वेळ, फक्त वेळच घालवलेला असेल त्याच्यामागे. पण एका महत्त्वाच्या व्यक्तीकडे केवळ दुर्लक्ष केल्यामुळे आपण संपूर्ण दीर्घिका गमावू शकतो."

"फारच छान, मग झालं तर," क्लिऑन म्हणाला, "पण या प्रकरणाचे तपशील जर काळे असतील तर मला त्याबद्दल न कळलेलंच बरं."

"तशी वेळ येऊ नये ही आशा करू या." डेमेर्झेल उत्तरला.

--- ----

५-

सम्राटाबरोबर झालेली भेट पचवायला सेल्डनला एक अख्खी संध्याकाळ, एक रात्र आणि एक अर्धीमुर्धी सकाळ इतका वेळ लागला. निदान चालण्याच्या वाटांवरून, फिरत्या मार्गिकांमधून, चौक आणि ट्रॅन्टॉरच्या राजेशाही भागातील बागबगीचांमधून जाताना बदलत गेलेल्या प्रकाशाच्या रंगछटा एक संध्याकाळ, एक रात्र, एक सकाळ सरल्याचं दर्शवत होत्या.

तो एका छोट्याशा बागेत एका प्लास्टिकच्या खुर्चीत बसला. ती खुर्ची त्याच्या शरीराच्या आकारासरशी आपला आकार बदलून छान सोयीची झाली. आता लख्ख सकाळचा उजेड होता आणि हवा अगदी सुखकर थंडगार होती. बोचरेपणा नावालाही नव्हता.

हे नेहमी असंच असतं का इथे? सम्राटाला भेटायला जाताना खुल्या आकाशाखालचा मळकट दिवस त्याला आठवला. आणि मग त्याला हेलिकॉन-त्याच्या घराचा ग्रहावरचे मळकट दिवस, थंडगार दिवस, उकाड्याचे दिवस, पावसाळी दिवस आणि बर्फाळ दिवस आठवले. ते दिवस हवेसे वाटतील असं कधी होईल कां... ट्रॅन्टॉरच्या एखाद्या बागेत बसून अशी मस्त हवा दिवसामागून दिवस अनुभवता येत असेल, कसलाच त्रास नसेल, तर मग चावरी थंडी, घोंघावता वारा आणि श्वास कोंडेल अशी आर्द्रता यांची कशासाठी आठवण होईल?

कदाचित् होईलही. पण अगदी पहिल्या-दुसऱ्या किंवा सातव्या दिवशीच नाही होणार. आता त्याच्यापाशी हा एकच दिवस होता ट्रॅन्टॉरवरचा. उद्या त्याला निघायचं होतं. शक्य तितकं हे सारं अनुभवायचं होतं त्याला. ट्रॅन्टॉरवर कदाचित् पुन्हा कधीच येता येणार नव्हतं.

तरीही, ज्या माणसाच्या हातात कुणालाही कैद करण्याची किंवा मृत्यू फर्मावण्याची किंवा निदान पद-मान-मरातब काढून घेऊन आर्थिक-सामाजिक घात करण्याची सत्ता आहे त्याच्याशी आपण जरा जास्तच स्वतंत्र बाण्याने बोललो की काय अशी शंका त्याला सतावत होती... तो मधूनच अस्वस्थ होत होता.

झोपण्यापूर्वी सेल्डनने होटेलच्या खोलीतल्या कॉम्प्युटरवर दीर्घिकाकोष काढून पहिल्या क्लिऑनसंबंधीची माहिती वाचून काढली होती. सम्राटाची खूपच स्तुती होती त्यात. अर्थात, कोणत्याही सम्राटाच्या जीवनात त्यांनी काहीही केलेलं असो नसो, स्तुती असणारच होती. सेल्डनने तो स्तुतीपाठ बाजूला सारला, पण त्याला क्लिऑनच्या जीवनात रस होता. क्लिऑनचा जन्म या राजप्रासादात झाला होता, आणि त्यानंतर तो एकदाही त्या प्रासादाच्या परिसराबाहेर गेला नव्हता. अगदी ट्रॅन्टॉरच्या कुठल्याही भागातही, कुठल्याही घुमटांकित प्रदेशातही तो फिरला नव्हता. कदाचित् हे सारे सुरक्षेचे उपाय होते, पण त्याचा अर्थ एकच होता- सम्राट स्वतःशी हे मान्य करो वा न करो- तो कैदेत होता. दीर्घिकेमधला सर्वात विलासी, ऐषारामी तुरुंग असेल- पण अखेर तुरुंगच होता तो.

आणि सम्राट जरा सौम्य, मृदूभाषी वाटला, त्याच्या अनेक पूर्वजांप्रमाणे तो हिंसक हुकूमशहा वाटत नसला तरीही त्याचे लक्ष वेधून घेणे काही फारसे हितावह नव्हते. उद्या हेलिकॉनला घरी परतायचंय ही कल्पनाच सेल्डनला खूप सुखद वाटली. हिंवाळा असणार होता,- आणि तिथला हिंवाळा महाभयंकर असतो- तरीही.

त्याने वर पाहिलं. तो सौम्यसा तरीही लख्ख उजेड... इथे कधीही पाऊस पडत नसे तरीही हवा अगदी कोरडी होती असंही नाही. त्याच्या जागेपासून जवळच एक कारंज उडत होतं. सारी झाडंझुडपं हिरवीगार होती. त्यांना कधीही पाण्याचा ताण जाणवलाच नसावा. क्वचित कधीतरी त्या झुडुपांतून खसफस होत होती, जणू कुणी

लहानसहान प्राणीपक्षी त्यात दडलेले असावेत. मधमाशांची गुणगुणही त्याच्या कानावर येत होती. साऱ्या दीर्घिकेमधे ट्रॅन्टॉर हा ग्रह धातू आणि काचा वगैरेंचा बनलेला असल्याचे प्रसिध्द असले तरीही या छोट्याशा बागेत तो अगदी नैसर्गिक वाटत होता.

त्या बागेत आणखीही काही लोक फिरायला आले होते. सर्वांच्या डोक्यांवर हॅट्स् होत्या, काहींच्या हॅट्स् अगदी छोट्याशा होत्या. पलिकडे थोड्या अंतरावर एक सुंदर दिसणारी तरुणी होती, पण ती व्ह्यूअरमधे वाकून काहीतरी पाहात होती आणि त्यामुळे तिचा चेहरा त्याला नीटसा दिसत नव्हता. त्याच्या बाजूने एक माणूस चालत गेला. त्याने त्याच्याकडे सहजच नजर टाकली आणि मग त्याच्या समोरच्याच खुर्चीत बसत त्याने टेलिप्रिन्ट्सच्या गठ्ठ्यात डोके खुपसले. त्याने फिकट गुलाबी ट्राउझर घातलेली. पाय एकावर एक टाकून तो बसला होता.

या जगातले पुरुष फिकट छटांचे रंगीत कपडे घालत आणि गंमत म्हणजे स्त्रिया मात्र पांढरेशुभ्रच कपडे सहसा वापरत. इतक्या स्वच्छ हवेत जगताना फिकट छटा वापरणे योग्यच होते. त्याने आपल्या हेलिकोनियन पोषाखाकडे जरा मजेनेच पाहिले. त्याच्या अंगावरचे कपडे मळखाऊ तपकिरी रंगाचे होते. ट्रॅन्टॉरवर फार दिवस रहायचं असतं तर असले काही कपडे आपल्याला घ्यावे लागले असते नाही तर सगळयांच्या कुतूहलभरल्या नजरांचं लक्ष्य होणं ठरलेलंच. काही लोकांना तर त्याच्या कपड्यांच्या रंगाबद्दल तिरस्कारही वाटला असता. आता हा समोर बसलेला माणूस त्याच्याकडे पुन्हा एकदा पाहात होता. त्याच्या कपड्यांबद्दलचं कुतूहल त्याच्या नजरेत स्पष्टच दिसत होतं. तो कुठल्यातरी बाहेरच्या जगातला आहे हे स्पष्टच जाणवत होतं पाहाणाऱ्याला.

तो त्याच्याशी हसला नाही हे पाहून सेल्डनला सुटल्यासारखंच वाटलं. आपण चेष्टेचा विषय होतो आहोत हे त्याने चालवून घेतलं असतं खरं, पण त्यात काही आनंद वाटून घेण्याची गरज नव्हती.

सेल्डनने लक्षात येणार नाही अशा रीतीने त्या माणसाचं निरीक्षण चालवलं होतं. कारण तो मनुष्य कसल्यातरी दुविधेत असल्याचं जाणवत होतं. क्षणभर त्या माणसाने त्याच्याकडे पाहिलं, जणू आता तो बोलण्यासाठी तोंड उघडणार- इतक्यातच त्याने विचार बदलला. पण पुन्हा एकदा त्याला बोलायची इच्छा झाली असावी. काय निष्पन्न होणार असल्या संभाषणातून- सेल्डनला प्रश्न पडला.

तो त्याच्याकडे निरखून पाहात राहिला. तो चांगला उंच होता, रुंद खांदे होते, पोट सुटलेलं नव्हतं, त्याचे केस गडद होते, किंचित् पिंगट, त्याने चांगली घोटीव दाढी केलेली, चेहऱ्यावर गंभीर भाव होते, तो चांगला बळकट असावा पण स्नायूंचा पीळदारपणा कपड्यातून जाणवावा इतकाही नव्हे. त्याची चेहरेपट्टी नीटस होती. भला वाटत होता पण देखणा म्हणावा असं काहीच नव्हतं त्यात.

त्या माणसाने आपल्या मनातील दुविधा दूर केली होती- जिंकला की हरला कोण जाणे- आणि तो बोलण्यासाठी पुढे झुकला. हा माणूस बरा वाटतोय- सेल्डनने मनाशीच ठरवलं.

तो माणूस बोलू लागला, “क्षमा करा, पण तुम्ही त्या दशवार्षिक परिषदेत आला होतात का? गणिताच्या?”

“हो, मी होतो तिथे.”

“मला वाटलंच की मी तुम्हाला तिथेच पाहिलं. तसं वाटलं मला, म्हणूनच मी इथे बसायला थांबलो. मी तुमच्या खाजगी वेळात व्यत्यय आणला असेल तर क्षमा करा मला.”

“अजिबात नाही, मी केवळ रिकामा वेळ मजेत काढतोय एवढंच.”

“मला कितपत आठवतंय पाहू दे मला, तुम्ही म्हणजे प्रोफेसर सेल्डन ना?”

“सेल्डन. हॅरी सेल्डन. बरोबर ओळखलंत. आणि तुम्ही?”

“मी चेटर ह्युमिन.” तो माणूस थोडासा अवघडून म्हणाला, “अगदीच घरगुती नाव आहे माझं.”

“मी कधी कुठल्या चेटर्सना भेटलेलो नाही,” सेल्डन म्हणाला, “किंवा हमिन्सनासुध्दा. त्यामुळे मला वाटतं, तुम्ही तसे अद्वितीयच ठरता माझ्यासाठी. इतके अगणित हॅरी जगात असताना हे फारच चांगलं म्हणायचं. सेल्डनही तसं बऱ्याच लोकांचं आडनाव असतं.”

सेल्डनने आपली खुर्ची ह्युमिनच्या खुर्चीजवळ सरकवली. तिथल्या स्थितीस्थापक सिरॅमॉइड फरशांवर ती किंचित चरचरली.

“घरगुती वरून आठवलं,” तो म्हणाला, “मी हे जे एकदम विचित्र असे माझ्या जगातले कपडे घातलेत त्याचं काय? मी ट्रॅन्टोरियन कपडे घ्यायला पाहिजेत असं मला कधी सुचलंच नाही.”

“तुम्ही विकत घेऊ शकता,” ह्युमिनच्या नजरेत पुसटशी नापसंती होती.

“मी उद्या निघणार आहे, आणि शिवाय मला ते परवडलंही नसतं. गणिती लोक मोठमोठ्या संख्या हाताळतो खऱ्या, पण उत्पन्न म्हणून नव्हे. तू सुध्दा गणितीच आहेस असं मी धरून चालतो, ह्युमिन.”

“नाही. अगदी शून्य अक्कल आहे मला त्यात.”

“ओः,” सेल्डनचा उत्साह उणावला, “पण तू म्हटलास, की तू मला दशवार्षिक परिषदेत पाहिलंस.”

“ते मी केवळ प्रेक्षक म्हणून आलेलो. मी पत्रकार आहे.” त्याने आपल्या हातातले टेलिप्रिंट्सचे कागद दाखवले. आणि मग अचानक ते हातात असल्याचं भान येऊन, त्याने ती चवड जाकिटाच्या खिशात सारली. “मी होलोकास्टवरच्या प्रक्षेपणासाठी वरच्या बातम्यांसाठी साहित्य पुरवतो.” मग थोडा विचार करत पुढे म्हणाला, “खरंतर, मला त्या का`माचा आता अगदी कंटाळा आलाय.”

“नोकरीचा?”

ह्युमिनने मान डोलावली. “सगळया जगातून विविध प्रकारचा मूर्खपणा नोंदत रहायचा वीट आलाय मला. दिवसेंदिवस सारं गरगरत तळाला चाललंय.”

त्याने सेल्डनकडे थोडा अंदाज घेत पाहिलं. “कधीकधी काहीतरी चांगलं हाती लागतं म्हणा. अं... मी असं ऐकलं की तुम्ही सम्राटाच्या रक्षकांसमवेत प्रासादाच्या दिशेने जाताना दिसला होतात. तुमची आणि सम्राटाची भेट वगैरे झाली नाही ना?”

सेल्डनच्या चेहऱ्यावरचं हसू मावळलं. तो सावकाश बोलू लागला, “समजा भेटलो असेन तरीही मी त्याबद्दल एखाद्या बातमीदाराकडे बोलण्याची काहीच शक्यता नाही.”

“नाही, नाही, बातमीदाराशी नाही. सेल्डन, तुला हे माहीत नसेल तर मीच तुला प्रथम सांगून टाकतो. या बातम्यांच्या खेळाचा पहिला नियम असा आहे, की सम्राट, त्याचे खाजगी कर्मचारी यांच्याबद्दल काहीच कुठे लिहिलं जात नाही. जे त्यांच्याकडून अधिकृतपणे प्रसिध्दीसाठी पाठवलं जातं तेच फक्त. हे चुकीचं आहे अर्थातच, कारण सत्यापेक्षा अफवांचाच प्रवास वेगाने होत असतो. पण आहे हे असं आहे.”

“पण तुला बातमी देता येणार नसेल, तर चौकशी करून काय उपयोग?”

“माझं स्वतःचं कुतूहल म्हणून. विश्वास ठेव, ज्या बातम्या प्रसृत होतात त्यापेक्षा कित्येक पटींनी जास्त माहिती माझ्याकडे असते. कामाचा भागच आहे तो. चल मला अंदाज करू दे. मला काही तुझा शोधनिबंध नीट कळला नाही, पण मला एवढं कळतं, की तू भविष्याचा अंदाज घेण्याच्या शक्यतेबद्दल काहीतरी बोलत होतास.”

सेल्डनने मान झटकत हलकेच म्हटलं, “चूक केली.”

“काय म्हणालास?”

“काही नाही.”

“वेल, भविष्याचा वेध- अचूक वेध घेता आला तर सम्राटाला त्यात नक्कीच रस असेल. शासनसत्तेतील कोणत्याही माणसाला असेल. त्यामुळे मी साधा अंदाज करतो- आपला सम्राट- क्लिऑन नामे प्रथमप्रसिध्द- सम्राट याबद्दल तुझ्याशी बोलला असावा... ‘तुम्ही मला थोडे तरी काहीतरी भविष्याबद्दलचे अंदाज सांगा ना’...”

सेल्डन ताठरपणे उत्तरला, “मला या विषयावर काहीही बोलायचे नाही.”

ह्युमिनने खांदे किंचित् उडवले. “तिथे एटो डेमेर्झेल असेलच म्हणा.”

“कोण?”

“म्हणजे, तू एटो डेमेर्झेलचं नाव कधी ऐकलेलं नाहीस?”

“कधीच नाही.”

“क्लिऑनचा बहिश्चर प्राण, क्लिऑनचा भेजा, क्लिऑनची पापबुध्दी. त्याला ही सर्व नावे मिळाली आहेत. काही तर फारच जहरी नावं आहेत- ती सोडून देऊ आपण. तो तर तिथे असलाच पाहिजे.”

सेल्डन गोंधळात पडलेला दिसत होता. ह्युमिन म्हणाला, "कदाचित् तो तुझ्या नजरेला पडला नसेल, पण तो तिथे असणारच. आणि तुला भविष्यवेध घेता येईल असं त्याला वाटत असेल तर मग-"

"पण मला भविष्यवेध घेता येत नाही." सेल्डन जोरात मान झटकत म्हणाला, "तू माझा शोधनिबंध ऐकला असशील तर, तुला एवढंतर नक्कीच कळेल की ती केवळ एक सैध्दांतिक शक्यता म्हणून मी मांडली होती."

"तरीही, त्याला जर तू भविष्य वर्तवू शकशील असं वाटत असेल, तर तो तुला इथून जाऊ देणार नाही."

"त्याने जाऊ दिलंय मला. हा इथे आहे ना मी."

"त्याला काही फारसा अर्थ नाही. तू कुठे आहेस हे त्याला माहीत आहे, आणि ते त्याला माहीत होत राहील. त्याला हवं तेव्हा, वाट्टेल तिथून तो तुला ताब्यात घेऊ शकतो. तुझा काही उपयोग आहे असं त्याला वाटलं तर, तुझा पुरता वापर करून घेतल्याशिवाय तो तुला सोडणार नाही. आणि त्याला वाटलं की तू धोकादायक आहेस, तर तुझे प्राण घेतल्याशिवाय तुला तो सोडणार नाही."

सेल्डन पाहातच राहिला. "तुझं काय चाललंय, मला घाबरवतोयस की काय?"

"मी फक्त तुला सावध करतोय."

"तू जे म्हणतोस त्यावर माझा विश्वासच बसत नाही."

"नाही? थोड्याच वेळापूर्वी तू म्हणालास की काहीतरी चूक होती. तो शोधनिबंध वाचणं ही ती चूक होती... आणि त्यामुळे तू कसल्यातरी नको त्या भानगडीत सापडणार म्हणूनच ना?"

सेल्डनने खालचा ओठ अस्वस्थपणे दातात धरला. हा याचा आडाखा सत्याच्या बऱ्याच जवळ होता. आणि त्याच क्षणी त्याला कुणीतरी जवळ आल्याचं जाणवलं.

सौम्य प्रकाशामुळे त्यांच्या सावल्या पडल्या नव्हत्या. डोळयाच्या कोपऱ्यातून त्याला त्यांची फक्त हालचाल जाणवली होती. मग ती थांबली.

---- ------ -----

# पलायन

ट्रॅन्टॉर- ...पहिल्या दीर्घिकासाम्राज्याच्या राजधानीचा ग्रह... पहिल्या क्लिऑनच्या अधिपत्याखाली त्याचे संधिप्रकाशातले अस्तित्व सुरू झाले होते. वरवर पाहाता, त्या वेळी त्याच्या संपन्नतेची परिसीमा झालेली होती. त्यावरचा २० कोटी चौरस किलोमीटरचा भूभाग राजप्रासादाचा भाग वगळता संपूर्णपणे उंच घुमटांखाली झाकला होता. त्या घुमटांखाली होते ते जणू अनंतमार्गे पसरलेले, भूमीखंडांच्या खालपर्यंत पसरलेले शहर. त्याची लोकसंख्या होती ४०० कोटी आणि जरी सारी दुश्चिन्हे स्पष्ट होती (मागे वळून पाहाताना तर ती अधिकच स्पष्टपणे जाणवतात) आणि अनेक समस्यांना तोंड फुटू लागलं होतं, तरीही त्या काळात ट्रॅन्टॉरवर रहाणाऱ्या सर्वांना अजूनही त्यांच जग अनंत काळपर्यंत अबाधित राहील असं परीकथेतलं जग वाटत होतं आणि त्यांची अपेक्षाच नव्हती की ते कधी...

दीर्घिका ज्ञानकोष

६-

सेल्डनने वर पाहिलं. एक तरूण त्याच्यासमोर उभा होता आणि त्याच्याकडे तुच्छतेने पाहात होतो. त्याला त्याची गंमत वाटत असावी. त्याच्या शेजारीच आणखी एक पोरगेलासा तरूण होता. दोघेही चांगले धट्टेकट्टे, तगडे होते.

त्यांच्या अंगावरचे कपडे अगदी ट्रॅन्टॉरच्या अत्याधुनिक फॅशनप्रमाणे होते याचे नोंद घेत सेल्डन पाहात राहिला. विरुध्द रंगसंगती, रुंद पट्टे, रुंद काठांच्या गोल हॅट्स आणि त्यांच्या मागून मानेवर रुळणारी गुलाबी रिबन.

सेल्डनच्या डोळ्यांनाही त्यांचे कपडे गमतीशीर वाटले आणि तो हसला.

त्याच्यासमोरचा तो तरूण खेकसला, “काय रे गबाळ्या, दात कशाला काढतोस?”

सेल्डनने त्याने वापरलेल्या संबोधनाकडे दुर्लक्ष केलं आणि तो मृदूपणे म्हणाला, “माझ्या स्मिताकडे लक्ष देऊ नका, प्लीज. मी केवळ तुमच्या पोषाखाकडे कौतुकाने पाहात होतो.”

“माझा पोषाख? आणि? आणि तू काय चढवलंयस ते अंगावर? ही सडकी लक्तरं- याला तू कपडे म्हणतोस की काय?” त्याने हात सेल्डनच्या जाकिटाच्या कॉलरवर टेकवला. सेल्डनला वाटलं, आपलं जाकिट त्याच्या हलक्याफुलक्या कपड्यांसमोर किती बोजड वाटतंय.

सेल्डन म्हणाला, “काय करणार, हे माझे बाहेरच्या जगातले कपडे आहेत बाबा, आणि हेच आहेत माझ्याकडे.”

त्याच्या लक्षात आलं, की सभोवार बसलेल्या लोकांपैकी अनेकजण उठून चालते होऊ लागले होते. जणू आता काहीतरी नको ते घडणार याची चाहूल लागून आपण दूर असलेलं बरं असा विचार करून ते तिथून कटत होते. सेल्डनला वाटलं, त्याचा नवा मित्र ह्युमिनसुध्दा आता जाईल, पण या समोरच्या मुलावरून नजर ढळवणं योग्य ठरलं नसतं. त्याने खुर्ची किंचित मागे सरकवली.

त्या तरुणाने विचारलं, “तू बाहेरून आला आहेस का?”

“हो ना. त्याच मुळे तर हे असे कपडे.”

“त्याच मुळे? हा कसला शब्द? बाहेरच्या जगातला शब्द?”

“म्हणजे मला असं म्हणायचंय, की म्हणून माझे कपडे तुम्हाला विचित्र वाटतात. मी इथे प्रवासी म्हणून आलोय.”

“कुठल्या ग्रहावरून?”

“हेलिकॉन.”

त्या तरुणाने भुवया जुळवत म्हटलं, “कधी ऐकलं नाही.”

“फारसा मोठा ग्रह नाही तो.”

“तू परत का नाही जात तिथे?”

“जायचंय. उद्या निघणार मी परत.”

“लवकर जा. आत्ता जा.”

त्या तरुणाने आपल्या साथीदाराकडे पाहिलं. सेल्डननेही त्याच्या दिशेने पाहिलं. आणि त्याला ह्युमिन दिसला. तो गेला नव्हता. पण बाकीची बाग आता रिकामी झालेली. तो स्वतः, ह्युमिन आणि ती दोन पोर इतकेच चौघे उरले होते.

सेल्डन म्हणाला, “आजचा दिवस फेरफटका मारावा इथे असा विचार करत होतो मी.”

“नाही. असलं काही करायचं नाही. तू आत्ताच्या आत्ता घरी जा.”

सेल्डन हसून उत्तरला, “सॉरी, नाही जाणार.”

तो तरूण आपल्या दोस्ताला म्हणाला, “मार्बी, तुला त्याचे कपडे आवडलेत?”

मार्बीने पहिल्यांदाच तोंड उघडलं. “छे. गचाळ. पोटात ढवळलं माझ्या.”

“त्याला फिरू दिलं तर सगळ्यांची पोटं ढवळून निघतील, मार्बी. लोकांच्या तब्ब्येतीला बरं नाही ते.”

“नक्कीच नाही, आलेम,” मार्बी म्हणाला.

आलेमने दात विचकले, “वेल, तू ऐकलंस, मार्बी काय म्हणाला ते.”

आणि आता ह्युमिन बोलला. “हे पहा, तुम्ही दोघे, आलेम, मार्बी- जी काय तुमची नावं असतील ती- झाली गंमत करून आता. आता तुम्ही जायचं बघा.”

आलेम सेल्डनवर झुकून उभा राहिलेला. तो ताठ होत वळला, “आणि तू कोण?”

“तुझ्याशी काही संबंध नाही त्याचा.” ह्युमिनने खडसावलं.

“तू ट्रॅन्टॉरियन आहेस कां?” आलेमने विचारलं.

“त्याच्याशीही संबंध नाही तुझा.”

आलेमने कपाळाला आठ्या घातल्या आणि म्हणाला, “तू ट्रॅन्टॉरियन कपडे घातलेयस. तुझ्यात आम्हाला काही रस नाही. त्यामुळे उगीच स्वतःवर बिलामत ओढवून घेऊ नकोस.”

“मी इथेच थांबणार आहे. म्हणजेच आम्ही दोघे आहोत इथे. दोनविरुध्द दोन- तुझ्या मनाजोगती मारामारी नाही वाटत. तू जा इथून आणि आणखी काही दोस्तांना घेऊन ये, म्हणजे दोन माणसांशी मुकाबला करायला बरं पडेल, कसं?”

सेल्डन म्हणाला, “मला वाटतं तू इथून गेलास तरी चालेल, ह्युमिन. माझं रक्षण करायला थांबलास हा तुझा चांगुलपणा आहे, पण यातून उगाच तुला त्रास व्हायला नको.”

“हे काही फार घाबरण्यासारखे लोक नाहीत, सेल्डन. कुठलेतरी आवारागर्दी करणारे पोऱ्ये आहेत झालं.”

“पोऱ्ये!” या शब्दाने त्यांचा संतापसंताप झाला जणू. हेलिकॉनपेक्षा ट्रॅन्टॉरवर याचा अर्थ अधिक अपमानकारक असावा असा निष्कर्ष सेल्डनने काढला.

“चल, मार्बी,” आलेम गुरगुरतच म्हणाला. “तू या मोठ्या पोऱ्याकडे बघ. मी या सेल्डनच्या कपड्यांच्या चिंध्या करतो. खरा आपल्याला तोच हवाय. चल-”

त्याचे हात सेल्डनच्या जाकिटाच्या कॉलरकडे झेपावले तोच सेल्डन सहजपणे खुर्चीसकट मागे सरला. त्याने त्याच्याकडे झेपावलेले दोन हात पकडले- लाथ उगारली, त्याची खुर्ची मागे उलटली. काय होतंय ते कळायच्या आता आलेमने त्याच्या डोक्यावरून कोलांटी खाल्ली आणि कोलांटी खाताखाता वळल्याने तो सेल्डनच्या मागच्या बाजूला मानेवरच पडला. खुर्ची पडायच्या आत सेल्डन आपल्या पायावर उभा होता. त्याने आलेमकडे पाहिलं आणि मग मार्बीकडे पाहिलं. आलेम हालचाल करत नव्हता. त्याचा चेहरा वेदनेने पिळवटलेला. त्याचे अंगठे मुरगळलेले, त्याच्या मांड्यांच्या मधे जबरदस्त दुखापत झालेली, आणि कण्यालाही चांगलीच इजा झालेली.

ह्युमिनने डाव्या हाताने मार्बीचा गळा मागून पकडलेला आणि उजव्या हाताने त्याचा उजवा हात त्याने पिरगाळून धरलेला. श्वासासाठी धडपडताना मार्बीचा चेहरा लालबुंद झालेला. त्यांच्या जवळच जमिनीवर एक धारदार चाकूचं लेझर बसवलेलं पातं पडलेलं.

ह्युमिनने आपली पकड थोडी सैल केली आणि जरा काळजीनेच विचारलं, “या दुसऱ्याला चांगलाच जखमी केलेलं दिसतंयस तू.”

सेल्डन उत्तरला, “हो, बहुतेक... तो जरा आणखी कुशीवर पडला असता, तर त्याची मानच मोडली असती.”

ह्युमिन म्हणाला, “तू कसला गणिती आहेस, म्हणायचं?”

“हेलिकोनियन आहे मी,” त्याने वाकून चाकू उचलून घेतला आणि तो निरखून पाहात म्हणाला, “एकदम वाईट आणि घातक.”

ह्युमिन म्हणाला, "साधं पातं आहे ते, कोणत्याही विशेष ऊर्जेशिवाय काम करू शकतं. पण चला, मला वाटतं आपण यांना इथेच सोडून देऊ. यांना पुन्हा मारामारी करायची इच्छा नसावी."

त्याने मार्बीला सोडलं. तो खांदे आणि मान चोळत छातीत श्वास भरून घेऊ लागला. या दोघांकडे तो अतिशय द्वेषाने पाहात होता.

ह्युमिन जोरात म्हणाला, "तुम्ही दोघांनी ताबडतोब इथून रस्ता सुधरावा हे बरं. नाहीतर आम्ही तुमच्याविरुध्द पुराव्यासह तक्रार देऊ. हल्ला आणि खून करण्याचा हेतू. हा चाकू तुमच्याकडे होता एवढं पुरेसं आहे."

मार्बीने आलेमला आधार देत पायावर उभं केलं आणि मग लडबडत चालवत नेलं. तो वेदनेने अजूनही वाकलेला. त्यांनी एकदोनदा मागे वळून पाहिलं, पण सेल्डन आणि ह्युमिन शांतपणे पाहात होते.

सेल्डनने हात पुढे केला. "मी तुझे आभार तरी कसे मानावेत मला कळत नाही? एका अनोळखी माणसाला दोन हल्लेखोरांपासून वाचवायला तू किती सहजपणे पुढे आलास. त्या दोघांना मी एकट्याने झेलू शकलो नसतो."

ह्युमिनने ते बाजूला सारल्यासारखा हात हलवला. "मला काही त्यांची भीती वाटली नाही. उगीच अकारण रस्त्यात मारामाऱ्या करणारे मवाली होते ते. त्यांच्यावर हात टाकला- तू ही टाकलास म्हणा- की तेवढं पुरेसं होतं."

"तुझी पकड चांगलीच जीवघेणी होती म्हणायची," सेल्डन म्हणाला.

ह्युमिनने खांदे उडवले, "तुझीही." मग तो त्याच स्वरात म्हणाला, "चल, आपण इथून गेलेलं बरं. वेळ घालवतोय आपण फुकट."

सेल्डनने विचारलं, "आपण कशासाठी जायचं इथून? ते दोघे परत येतील अशी भीती वाटतेय की काय तुला?"

"ते तर या जन्मात आपल्याकडे फिरून पाहाणार नाहीत. पण या बागेतले काही शूरवीर लोक स्वतःला त्रास नको म्हणून इतक्या पटकन् इथून कटले... त्यातल्या काहींनी पोलिसांना कळवलं असेल."

"छानच मग. आपल्याकडे त्या गुंडांची नावं आहे, आपण त्यांचं वर्णन करू शकतो चांगल्यापैकी."

"वर्णन? आणि पोलिसांना कशाला लागेल ते?"

"त्यांनी हल्ला केला होता आपल्या-"

"वेडा आहेस की काय. आपल्यावर एक साधा ओरखडाही उमटलेला नाहीये. आणि ते दोघे तर हॉस्पिटलमधेच भरती झाले असणार. आलेम तर नक्कीच. आरोप ठेवला जाईल तो आपल्यावर."

"पण हे तर अशक्यच आहे. लोक होते ना साक्षीदार-"

"कुणाचीही साक्ष निघणार नाही. –सेल्डन, एक गोष्ट डोक्यात नीट घे. हे दोघे फक्त तुझ्या शोधातच आलेले. त्यांना हे सांगण्यात आलेलं की तुझ्या अंगावर हेलिकॉनियन पोषाख असेल. अगदी तंतोतंत वर्णन केलं असणार तुझं. कदाचित् तुझा होलोग्राफही दाखवला असेल. मला अशी शंका येतेय- की पोलिसांवर नियंत्रण असलेल्याच कुणीतरी त्यांना पाठवलं असणार- त्यामुळे इथे थांबण्यात अर्थ नाही."

ह्युमिन सेल्डनचा दंड घट्ट पकडून घाईघाईने चालू लागला. त्याच्या पकडीतून सुटणं सेल्डनला शक्य नव्हतं. एखाद्या दांडग्या दाईने मुलाचा हात पकडून फरफटवत न्यावं तसं काहीसं सेल्डनला वाटलं.

ते एका कमानदार मार्गात शिरले आणि सेल्डनचे डोळे त्या जरा कमी प्रकाशाला सरावेपर्यंत त्यांच्या कानावर एक वाहन कचकन् ब्रेक दाबून थांबल्याचा आवाज आला.

“आलेच ते.” ह्युमिन पुटपुटला, “जरा भरभर चाल, सेल्डन.” ते एका हलत्या मार्गिकेवर चढले आणि गर्दीत हरवले.

--- ----

७-

आपल्याला होटेलमधे परत जायचंय असं सेल्डनने ह्युमिनला निक्षून सांगण्याचा प्रयत्न केला, पण ह्युमिन अजिबात ऐकणार नव्हता.

“तू काय वेडा आहेस का रे?” तो कुजबुजला, “ते तुझी वाटच पाहात असतील तिथे.”

“पण माझं सगळं सामानही तिथे माझी वाट बघतंय.”

“पाहू दे वाट.”

आणि मग ते एका छोटेखानी पण छानदार अपार्टमेंटमधे आले. कुठेही असू शकलं असतं ते- सेल्डनला सांगता आलं नसतं. एका खोलीची ती जागा होती. तो पाहात राहिला. एक टेबल, एक खुर्ची, एक पलंग आणि कॉम्प्युटरचं आउटलेट एवढ्यानेच ती जागा भरून गेलेली. तिथे जेवण्यासाठी, आंघोळपांघोळीसाठी काहीच सोय नव्हती. खाली हॉलमधे ह्युमिनने त्याला वॉशरुममधे नेऊन आणलेलं. तिथे सेल्डनचं होण्याच्या आतच कुणीतरी आत शिरलेलं. त्याने सेल्डनकडे जराशा संशयानेच पाहिलं होतं- सेल्डनकडे म्हणण्यापेक्षा त्याच्या कपड्यांकडेच- आणि मग नजर वळवली होती.

सेल्डनने ह्युमिनला हे सांगितलं. तो मान झटकत म्हणाला, “आपल्याला तुझे कपडे प्रथम बदलायला हवेत. हेलिकॉन कपड्यांच्या बाबतीत इतकं मागास आहे हे वाईटच-”

सेल्डन जरा वैतागूनच म्हणाला, “यापैकी खरं किती आणि तुझा कल्पनाविलास किती, ह्युमिन? तू मला थोडं फार पटवू शकला आहेस- पण तरीही कदाचित् हा सारा केवळ तुझा... हा तुझा...”

“तू ‘भयगंड’ या शब्दासाठी चाचपडतोयस कां?”

“हो, तेच. केवळ भीतीपोटी तुला हे सारं सुचत असेल.”

ह्युमिन म्हणाला, “विचार कर जरासा, बरं का? मी काही गणितज्ञाच्या शैलीत युक्तीवाद करू शकणार नाही, पण तरीही- तू सम्राटाला भेटला आहेस. उगीच नाकारू नकोस. त्याला तुझ्याकडून काहीतरी हवं होतं आणि तू ते त्याला दिलं नाहीस. तेही नाकारू नकोस. मला अशी शंका आहे, की त्याला तुझ्याकडून भविष्याचे तपशील हवे होते आणि तू ते नाकारलेस. कदाचित् डेमेर्झेलला वाटत असेल की तू ते तपशील केवळ अधिक किंमत मिळण्याच्या लालसेपोटी नाकारले आहेस... किंवा तुला ते इतर कुणासाठी तरी राखून ठेवायचे असतील असंही त्याला वाटू शकेल. कोण जाणे? मी तुला सांगितलं, की डेमेर्झेलला तू हवा असशील तर तो तुला कुठूनही कब्जात घेईल. ते दोघे बिनडोक तरूण तिथे येण्याआधीच मी तुला तसं सांगितलं होतं. मी पत्रकार आहे आणि ट्रॅन्टॉरियन आहे. या गोष्टी कशा घडतात मला चांगलं कळतं. तो आलेम मधेच म्हणाला होता- खरा आपल्याला तोच हवाय- आठवतं?”

“हं,” सेल्डन म्हणाला, “आठवतंय मला.”

“त्याच्या दृष्टीने मी केवळ एक मोठा पोऱ्या होतो- दूर ठेवायला हवा इतकाचा महत्त्वाचा. त्याचं खरं काम- तुला पकडण्याचं- होतं. तेवढंच करायला तो तुला भिडला होता.”

ह्युमिन खुर्चीत बसला आणि पलंगाकडे बोट दाखवत म्हणाला, “जरा आडवा हो, सेल्डन. जरा विसावा घे. ज्या कुणी त्या दोघांना पाठवलं -तो म्हणजे डेमेर्झेलच असणार- ते आणखीही कुणाला पाठवू शकतात असं मला वाटतं. त्यामुळे प्रथम तुझे हे कपडे आपण नष्ट करू. या भागात कुणीही असले कपडे घालून फिरणारा हेलिकॉनियन असेल तर त्या बिचाऱ्याला त्रास होणार आहे. आपण सेल्डन नाही हे तो सिध्द करेपर्यंत छळ होईल त्याचा.”

“ओः! काय म्हणतोस!”

“खरंच सांगतोय. ते कपडे काढून ठेव, आपल्याला त्यांचं विघटन करायला हवं. विघटक युनिटच्या जवळ कुणालाही न दृष्टीस पडता पोहोचू शकलो तर. ते करण्याआधी, मला तुझ्यासाठी ट्रॅन्टॉरियन कपडे आणले पाहिजेत. तू माझ्यापेक्षा जरा लहानखुरा आहेस. ते लक्षात घेऊन मी खरेदी करेन. नाही नीट बसले तरीही काही हरकत नाही.”

सेल्डनने मान हलवली. “ते खरेदी करण्यासाठी माझ्याकडे काहीच क्रेडिट्स नाहीत. आहेत ते आत्ता तरी जवळ नाहीतच. जे काही थोडे फार आहेत ते होटेलवर आहेत.”

“त्याची चिंता आपण नंतर करू. मी तुला लागणारे कपडे घेऊन येतो, तोवर तुला इथे एक तास दोन तासभर थांबावं लागेल.”

सेल्डनने असाहाय्य झाल्यासारखे हात पसरले आणि सुस्कारला. “ठीक आहे, तुला हे एवढं महत्त्वाचं वाटत असेल तर थांबतो मी.”

“तू तुझ्या होटेलमधे परतायचा प्रयत्न करणार नाहीस? मला वचन देतोस?”

“गणितज्ञाला शोभेलसं वचन. पण तू माझ्यासाठी जो काही त्रास घेतो आहेस त्यामुळे मला पार अवघडून जायला होतंय. आणि आता खर्चही करणार. हे सगळं

तू जे काही डेमेर्झेलबद्दल सांगतो आहेस- पण ते काही मला उचलून घेऊन जायला निघाले नव्हते, किंवा त्यांना मला इजाही करायची नव्हती. त्यांना केवळ माझे कपडेच फाडायचे होते.''

''अजिबात नाही. ते तुला अवकाशतळावर नेणार होते आणि हेलिकॉनकडे जाणाऱ्या हायपरशिपमधे बसवून देणार होते.''

''ती केवळ एक पोकळ धमकी होती- ती काय गांभीर्याने घ्यायची?''

''का नाही?''

''मी हेलिकॉनला परत जाणारच आहे. मी त्यांना सांगितलं तसं. मी उद्या निघतोच आहे.''

''आणि उद्या जाण्याचा तुझा खरोखरच विचार आहे की काय?'' ह्युमिन म्हणाला.

''नक्कीच. का नाही?''

''का नाही... फार महत्त्वाची आहेत कारणं.''

सेल्डनला अचानक खूप संताप आला. ''काय चाललंय, ह्युमिन, मला हा खेळ आणखी पुढे खेळायचा नाहीये. माझं इथलं काम संपलंय आणि मला घरी जायचंयय माझी परतीची तिकिटं होटेलमध्ये आहेत नाहीतर मी ती बदलून आजचीच करून घेतली असती. मी अगदी गंभीरपणे बोलतोय हे.''

''तू हेलिकॉनला परतू शकत नाहीस.''

सेल्डन चिडलाच, ''का नाही? ते काय आता माझी तिथेही वाट पाहात असतील की काय?''

ह्युमिनने होकारार्थी मान हलवली, ''चिडू नकोस, सेल्डन. ते तुझी तिथेही वाट पाहात असतील. ऐक माझं. तू हेलिकॉनला गेलास, तर तू डेमेर्झेलच्या हाती

पडल्यासारखाच आहेस. हेलिकॉन हा अगदी छान, सुरक्षित असा साम्राज्याचा हिस्सा आहे. हेलिकॉनने कधी बंड केलंय, कधी सम्राटाच्या विरोधात असलेल्यांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहिलेत ते?”

“नाही, कधीच नाही- आणि ते योग्यच होतं. आमच्या भोवताली असलेली सगळी जगे प्रचंड आहेत. सुरक्षेसाठी आम्हाला साम्राज्याच्या बरोबरच रहावं लागतं, तरच शांती लाभते.”

“अगदी बरोबर! साम्राज्याचं सैन्यच तिथे असल्यानंतर स्थानिक प्रशासनाचं संपूर्ण सहकार्य त्यांना मिळणार यात काही शंकाच नाही. तुला सतत नजरकैदेत ठेवता येईल. डेमेर्झेलला हवं तेव्हा तो तुझ्यापर्यंत पोहोचू शकेल. आणि केवळ मी तुला सावध करतो आहे म्हणून- नाहीतर हे तुला कधीही कळलं नसतं. आणि तू मोकळेपणाने काम करत राहिला असतास- सुरक्षिततेच्या खोट्या कल्पनेत मग्न राहिला असतास.”

“हे मला हास्यास्पद वाटतंय. त्याला मी जर हेलिकॉनवर जायला हवा असतो, तर त्याने मला तसंच सोडून दिलं असतं ना? मी उद्या जाणारच होतो. त्या दोन गुंडांना पाठवून माझ्या जाण्याची वेळ काही तासांनी आधी करायचा प्रयत्न करून त्याने मला सावध कशाला केलं असतं?”

“तू सावध होशील असं त्याला कशाला वाटेल? मी तुझ्याबरोबर असेन हे काही त्याला माहीत नव्हतं... तुझ्या मते माझा जो भयगंड आहे त्यात मी तुला पार चिंब भिजवेन असंही त्याला माहीत नव्हतं.”

“मला सावध करण्याचा मुद्दा सोडून देऊ, पण मी काही तास लवकर निघावं यासाठी इतका गोंधळ घालण्याचं काय कारण असेल?”

“तू तुझं मन पालटशील अशी भीती वाटत असेल त्याला.”

"आणि मग घरी नाही तर कुठे जाणार मी? मला हेलिकॉनवरून उचलणं त्याला शक्य असेल तर कुठूनही उचलणं शक्य असेल... मी आनाक्रॉनवर जायचं डोक्यात घेतलं तर... इथून दहा हजार पार्सेक अंतरावरच्या आनाक्रॉनवरही त्याला मला उचलता येईल. प्रकाशवेगापेक्षा अधिक वेगाने जाणाऱ्या यानांसाठी अंतर काय महत्त्वाचं असणार? मी अगदी हेलिकॉनसारख्या साम्राज्यापुढे झुकणाऱ्या ग्रहापेक्षा वेगळ्या ग्रहावर जायची जागा शोधली, तरीही- कोणतं जग अगदी उघडपणे साम्राज्याच्या विरुध्द आहे? साम्राज्यात शांती वसते आहे. काही जगे भूतकाळात घडलेल्या अपमानकारक घटना विसरू शकत नाहीत आणि त्यांना साम्राज्याचा राग येतो हे खरं असलं तरीही कोणीही केवळ मला संरक्षण देण्यासाठी साम्राज्याच्या सत्तेला आव्हान देणार नाही हे नक्की. शिवाय मी इतरत्र कुठेही गेलो तरीही मी तिथला नागरिक नसेन, आणि मग केवळ तत्वासाठी तरी साम्राज्याला दूर ठेवण्याचा प्रश्न उभा रहाणार नाही."

ह्युमिन शांतपणे ऐकून घेत होता, मान हलवत होता, पण त्याच्या चेहऱ्यावरचे गंभीर आणि अगदी स्थितप्रज्ञ होते. तो म्हणाला, "तुझं तुझ्या दृष्टीने बरोबर आहे. पण एक जागा अशी आहे, की जी सम्राटाच्या नियंत्रणाबाहेर आहे. मला वाटतं, डेमेर्झेलला त्याचीच भीती वाटत असावी."

सेल्डन विचारात पडला. अलिकडच्या इतिहासाची मनाशी उजळणी करू लागला. असं कोणतं जग साम्राज्याच्या नियंत्रणाबाहेर होतं. अखेर त्याने विचारलं, "कोणतं जग आहे असं?"

ह्युमिन उत्तरला, "तू त्यावरच आला आहेस. डेमेर्झेलच्या नजरेतून पाहाता हीच गोष्ट जास्त जोखमीची आहे, असं मला वाटतं. तू हेलिकॉनवर जावंस म्हणून

तो आतुर झालेला नसून, तुला ट्रॅन्टॉरवरच रहायची इच्छा झाली, पर्यटक म्हणून तू मुक्काम वाढवलास तर काय अशी त्याला चिंता वाटत असावी.”

ते दोघेही काही क्षण गप्प बसून राहिले. अखेर सेल्डन कुत्सितपणे हसत म्हणाला, “ट्रॅन्टॉर! साऱ्या साम्राज्याची राजधानी, ज्याच्या भोवतीने सतत अनेक अंतराळतळ घिरट्या घालत असतात, त्यांची तळछावणी, सैन्याची सर्वोत्तम फळी इथेच तैनात असते. तुला जर खरंच असं सुचवायचं असेल की ट्रॅन्टॉर हाच तो साम्राज्यापासून सुरक्षित ग्रह असेल, तर मग तू आता भयगंडापासून थेट काल्पनिक कथेकडे प्रवास करतो आहेस.”

“नाही! तू बाहेरच्या जगातून आला आहेस, सेल्डन. तुला माहीत नाही ट्रॅन्टॉर काय चीज आहे. इथे चारशे कोटी लोक रहातात... याच्या एक दशांश लोकसंख्या असलेले ग्रहही फार थोडे आहेत. यात तंत्रज्ञान आणि संस्कृती यांच्या ज्या गुंतागुंती आहेत त्या केवळ अकल्पनीय आहेत. आपण आता आहोत तो राजेशाही भाग- इथलं जीवनमान दीर्घिकेच्या कुठल्याही भागापेक्षा उच्चतर आहे. इथे केवळ सम्राटाचे शासकीय कर्मचारी रहातात. पण अर्थात उर्वरित ग्रहावर असे आठशे विभाग आहेत, आणि त्यांत रहाणाऱ्या लोकांच्या संस्कृती इथल्यापेक्षा अगदी वेगळया आहेत. आणि त्यातल्या काही तर साम्राज्यशक्तीच्या दृष्टीने अस्पृश्यच आहेत.”

“अस्पृश्य कां?”

“साम्राज्याची शक्ती ट्रॅन्टॉरच्याच विरोधात वापरणं योग्य ठरणार नाही. तसं केलं तर कुठे ना कुठे तरी हा ग्रह ज्या तंत्रज्ञानावर टिकून आहे ते तंत्रज्ञान विस्कळित होईल. इथली तंत्रज्ञानाची वीण इतकी एकमेकांत गुंतलेली आहे, की एक धागा इथे तुटला तर त्याचं दुसरीकडे गुंतलेलं टोकही ढिलं पडेल... आणि सारी यंत्रणाच

अडचणीत येईल. विश्वास ठेव माझ्यावर, सेल्डन, आम्ही ट्रॅन्टॉरवरचे लोक पाहात असतो- भूकंप झाला तर तो कह्यात आणण्याचा प्रयत्न, ज्वालामुखीचा उद्रेक झाला तर तो थांबवण्याचा प्रयत्न, वादळ शमवण्याचा प्रयत्न किंवा कोणतीही बारीकशी मानवी चूक –वेळच्यावेळी सारं सावरलं गेलं नाही तर सारा ग्रह दोलायमान होतो. तोल सांभाळण्याचा प्रयत्न वेळच्या वेळीच व्हावा लागतो."

"असलं काही कधी ऐकलं नव्हतं मी."

ह्युमिनच्या चेहऱ्यावर अगदी किंचितसं हसू उमटलं. "अर्थातच ऐकलं नसणार. या साम्राज्याच्या अगदी आतल्या कप्प्यातले कच्चे दुवे काय आहेत, याची जाहिरात थोडीच करणार का कोणी? मला पत्रकार या नात्याने बऱ्याच गोष्टी माहीत आहेत. बाहेरच्या जगांना हे माहीत होत नसतं, ट्रॅन्टॉरवरही अनेकांना माहीत नसतं, साम्राज्याला सारी माहिती दडपून टाकण्यात रस असतो- तेव्हाही मला सारं माहीत होत रहातं. विश्वास ठेव! ट्रॅन्टॉरला विचलित करणं म्हणजे साऱ्या साम्राज्याचा विनाश ओढवून घेण्यासारखं आहे, हे तुला नसेल माहीत, पण सम्राटाला माहीत आहे, आणि एटो डेमेर्झेललाही माहीत आहे."

"आणि म्हणून मी ट्रॅन्टॉरवरच रहावं असं तुला सुचवायचंय की काय?"

"होय. मी तुला ट्रॅन्टॉरमधल्या अशा ठिकाणी घेऊन जाऊ शकतो, की तिथे तू डेमेर्झेलपासून अगदी सुरक्षित असशील. तुला तुझं नावही लपवावं लागणार नाही. तू अगदी मनःपूत काम करू शकशील आणि तो तुला बोटही लावू शकणार नाही. म्हणूनच त्याला तुला ताबडतोब ट्रॅन्टॉरच्या बाहेर काढायचं होतं. नियतीचा झटका म्हणायचा, की त्याच वेळी तू आणि मी एका ठिकाणी होतो... आणि तुझी स्वसंरक्षणाची कलाही उपयोगी पडली म्हणून, नाहीतर त्याचा डाव यशस्वी झाला असता."

“पण मी कितीकाळ ट्रॅन्टॉरवर रहायचं?”

“जोवर तुझ्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे तोवर, सेल्डन. कदाचित् सारं आयुष्यभर.”

--- ----

८-

हॅरी सेल्डनने ह्युमिनच्या प्रोजेक्टरवरून दिसणारा स्वतःचा होलोग्राफ पाहिला. आरशातल्या प्रतिबिंबापेक्षा तो अधिक उपयोगी आणि अधिक नाट्यमय दिसत होता. असं वाटत होतं की त्या खोलीत दोन सेल्डन उभे आहेत.

सेल्डनने आपल्या नव्या ट्युनिकची बाही चाचपली. त्याच्या हेलिकॉनियन पार्श्वभूमीमुळे त्याला हे रंग जरा जास्तच दिखाऊ वाटत होते. पण त्याने ह्युमिनचे आभार मानले की इथले काही लोक घालतात त्यापेक्षा जरा फिके, शांत रंग त्याने निवडले होते. (त्या दोन हल्लेखोरांचे कपडे आठवून तो आतल्या आत शहारलाच.)

तो म्हणाला, “आणि ही हॅट घालणं मला भागच आहे, म्हणतोस.”

“या राजविभागात- हो नक्कीच. या भागात डोकं उघडं ठेवून फिरणं म्हणजे, खानदानी नसणं असं मानलं जातं. इतरत्र हे नियम जरा वेगळे असतात.”

सेल्डन सुस्कारला. ही गोल हॅट एका मऊ कापडापासून बनवलेली आणि डोक्यावर चढवताच ती स्वतःच नीट चापूनचोपून बसली. तिची कड सर्व बाजूंनी चांगली रुंद होती, पण त्या दोन मवाल्यांच्या हॅट्सपेक्षा निरुंद होती. घातल्यानंतर ती कड छानदार वळत होती, हे पाहून सेल्डनने स्वतःची समजूत घातली.

“हनुवटीखाली पट्टा नाहीये हिला.”

“अर्थातच. ती अगदी नवी फॅशन आहे- तरूण चिकण्यांसाठी.”

“तरूण कोणासाठी?”

“चिकणे- म्हणजे- जे केवळ धक्कातंत्र म्हणून काहीतरी घालतात त्यांच्यासाठी शब्द आहे तो. तुमच्या हेलिकॉनवरही असले नमुने असतीलच ना.”

सेल्डनने नाक उडवलं. “हो असतात ना. कुणी त्यांचे केस एका बाजूने खांद्यांपर्यंत वाढवतात आणि दुसऱ्या बाजूने तुळतुळीत गोटा करतात.” त्याला आठवणीनेच हसू आलं.

ह्युमिनने तोंड वाकडं केलं, “काय भयंकर दिसत असेल ते, कल्पना करू शकतो.”

“फारच वाईट. त्यात पुन्हा डावीकडे भादरणारे नि उजवीकडे भादरणारे असे दोन तट आहेत. आणि त्यांना दुसरी बाजू भादरणारे भयंकर वाटतात. अनेकदा त्यांच्यात मारामाऱ्याही होतात.”

“मग तुला ही बिनपट्ट्याची हॅट बरी वाटतेय तर.”

सेल्डन म्हणाला, “होईल सवय.”

“तुझ्या हॅटकडे लोकांचं लक्ष वेधलं जाणारच आहे. ती फारच फिकट रंगाची आहे हे एक- आणि दुसरं म्हणजे तू सुतकात आहेस की काय असंही वाटेल लोकांना. ती नीट बसत नाहीये तुला. आणि तुला जरा ती गैरसोयीची आहे हेही दिसतंय. पण आपण या राजविभागात फार वेळ थांबणार नाही. झालं ना पाहून?” त्याचा होलोग्राफ विझला.

सेल्डन म्हणाला, “किती खर्च आला तुला यासाठी?”

“काय फरक पडतो?”

“तुझ्या कर्जात रहायला मला आवडणार नाही.”

“काळजी करू नकोस. ही माझी निवड होती. पण आता आपण इथे थांबल्याला फार वेळ लोटला. माझंही वर्णन केलंच असेल त्यांनी. खात्रीच आहे मला. ते माझा पत्ता शोधून काढतील आणि इथे येऊन पोहोचतील.”

“तसं असेल तर मग,” सेल्डन म्हणाला, “तू माझ्यावर जी क्रेडिट्स खर्च करतोयस ती क्षुल्लकच बाब म्हणायची. तू माझ्यासाठी स्वतःला धोक्यात घालतोयस. व्यक्तिगत धोका आहे तुला!”

“ते मला माहीत आहे. आणि मी माझी निवड करू शकतो. माझी स्वतःची काळजीही मी घेऊ शकतो.”

“पण कशासाठी-”

“त्यामागच्या तत्वज्ञानावर आपण नंतर चर्चा करू. मी तुझ्या कपड्यांची विल्हेवाट लावली, बरं कां. कुणी पाहिलं नसावं मला. अर्थात एनर्जी सर्ज झाला की त्याची नोंद घेतली जातेच म्हणा. त्यावरून कुणीतरी काय घडलं ते ताडू शकेल. शोध घेणारे डोळे आणि बुध्दी तल्लख असली म्हणजे काहीही लपून रहात नाही. पण तरीही, त्यांना सगळा छडा लागण्याच्या आत आपण बऱ्यापैकी सुरक्षित अंतरावर पोहोचलेलो असू अशी आशा करू या.”

९-

सौम्य, पिवळसर प्रकाशातल्या रस्त्यांवरून ते चालत निघाले. ह्युमिनची नजर सतत भोवतालचा वेध घेत होती, तो गर्दीच्या वेगाच्या बरोबरीनेच चालत होता. कुणालाही पुढे जाऊ देत नव्हता, कुणाच्या पुढे जात नव्हता.

चालताचालता वेगवेगळ्या विषयांवर ते दोघे काहीबाही संथपणे बोलत राहिले.

सेल्डन थोडासा अस्वस्थ होता, आणि त्याच्याइतक्या संथपणे, शांतपणे वागणं त्याला जमत नव्हतं. तो म्हणाला, “इथे खूपच चालावं लागतं असं दिसतंय. दोन्ही दिशांनी रस्त्यांच्या रांगाच रांगा दिसतायत. चौकांच्या दोन्ही बाजूंने जातायत.”

“का नसावं?” ह्युमिन म्हणाला, “छोट्या अंतरांसाठी अजूनही सगळ्यात चांगला पर्याय चालणं हाच आहे? सर्वात सोयीचा. स्वस्त आणि सर्वात आरोग्यदायी. तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली तरीही यात बदल झालेला नाही. तुला उंचीची भीती वगैरे वाटते का, सेल्डन, एक्रोफोबिक आहेस?”

सेल्डनने उजवीकडच्या कठड्यावरून वाकून पाहिलं. त्या दोन रस्त्यांच्या मधून एक खोल खोल विभाजन होतं. तो थोडासा थरकापला. “साधारण उंचीची भीती वाटत नाही मला. पण तरीही खाली पाहाताना फार काही छान नाही वाटत. किती खोलवर खाली आहे हे?”

“या इथून चाळीस ते पन्नास पातळ्या असतील खाली. या विभागात किंवा आणखी काही पुढारलेल्या भागांत ही अशी रचना अगदी सर्रास सापडते. बाकी बऱ्याचशा ठिकाणी आपण जमिनीच्या पातळीवरच चालतो.”

“यामुळे आत्महत्यांचे प्रयत्न खूपच होत असतील.”

“तसं फारसं नाही होत. सोप्या पध्दतीही आहेतच. शिवाय आत्महत्या हा विषय काही फारसा सामाजिकदृष्ट्या टीकास्पद नाही राहिला ट्रॅन्टॉरवर आता. जर आधी थोडी मनोविकारचिकित्सा घेण्याची तयारी दर्शवली तर मग नंतर काही मार्ग ठरवून दिलेले आहेत, त्यापैकी कोणताही एक निवडून आपलं आयुष्य संपवण्याची मुभा असते. त्यासाठी काही केंद्रही कार्यरत आहेत. क्वचित कधीतरी अपघातही

होतात. पण मी त्यासाठी तुला एक्रोफोबिया आहे का हे विचारलं नाही. आपण आता एका भाड्याच्या एअर-टॅक्सीसाठी चाललोय- मला पत्रकार म्हणून ओळखतात तिथे. मी त्यांना बरेचदा मदत केलीय, त्यामुळे तेही मला मदत करतात. ते आता माझी आणि माझ्या सोबत्याची नोंद ठेवणार नाहीत. अर्थात मला त्यासाठी वेगळे पैसे द्यावे लागतील, आणि तरीसुध्दा जर डेमेर्झेलच्या माणसांनी जास्तच विचारलं तर त्यांना खरं काय ते सांगावं लागेल, हिशेबाचा गोंधळ झाल्याचं कारण पुढे करावं लागेल... पण तरीही त्याला बराच वेळ लागेल."

"यात ऍक्रोफोबिया कुठून आला?"

"वेल, आपण ग्रॅव्हिटिक लिफ्टने गेलो तर लवकर पोहोचू. फार लोक वापरत नाहीत ती- एवढंच काय मलाही फारसं आवडत नाही तिने जायला. पण तुला चालणार असेल तर, आपण जाऊ या."

"ग्रॅव्हिटिक लिफ्ट म्हणजे काय?"

"अजून प्रायोगिक तत्वावर आहे ते. कधीतरी ट्रॅन्टॉरवर त्याचा चांगला प्रसार होईल, फक्त लोकांना ते पटलं पाहिजे. मानसिक तयारी असली पाहिजे. मग, कदाचित्, त्याचा प्रसार इतरत्रही होईल. ही लिफ्ट म्हणजे केवळ एक स्तंभ असतो- त्यात लिफ्टचा डबा नसतो. आपण केवळ रिकाम्या अवकाशात पाऊल ठेवायचं आणि संथपणे खालीखाली जायचं किंवा गुरुत्वाकर्षणरोधात वरवर यायचं. अँटीग्रॅविटीचा हा एकच उपयोग आतापर्यंत सिध्द झालाय. याचं कारण तो सर्वात सोपा उपयोग आहे."

"आपण ऐन प्रवासात असतानाच पॉवर गेली तर?"

"तुला जे वाटतंय तेच होणार. आपण तळाच्या अगदी जवळच असलो तर ठीक नाहीतर मृत्यू ठरलेलाच. पण असं कधी आजवर झालेलं नाही, विश्वास ठेव-

कारण झालं असतं तर मला नक्की कळलं असतं. सुरक्षेच्या कारणांसाठी कदाचित् आम्ही बातमी दिली नसती- वाईट बातम्या लोकांपासून लपवायच्या असल्या की त्यांचं ते ठरीव कारण असतं पण मला कळलं असतंच. बघ तुला जमणार नसेल तर आपण नको जायला. पण त्या कॉरिडॉर्समधून जात रहायचं तर वेळ लागतो, फार संथ आणि गुंतागुंतीचे असतात ते- काहीजणांना तर तिटकारा बसतो त्यांचा.''

ह्युमिन एका क्रॉसओवरपासी वळला. तिथे बरेच स्त्रीपुरुष रांगेत उभे होते. एकदोघांकडे लहान मुलेही होती.

सेल्डन हळूच म्हणाला, ‘‘मी याबद्दल घरी काही ऐकलं नव्हतं. अर्थात, आमच्याकडची बातमीदारी फारच स्थानिक आहे. पण निदान असलं काहीतरी अस्तित्वात आहे याचा उल्लेखतरी व्हायला हवा होता.''

ह्युमिन म्हणाला, ‘‘हे अगदी प्रायोगिक तत्वावर आहे आणि फक्त राजविभागातच आहे. त्याच्या योग्यतेपेक्षा जरा जास्तच पॉवर खातं हे नवीन प्रकरण. त्यामुळे शासनाला त्याची फार प्रसिध्दी करण्यात आणि त्याबद्दल गाजावाजा करण्यात फारसा रस नाही. क्लिऑनच्या आधीचा सम्राट स्टॅनेल सहावा- तो आपल्या बिछान्यातच मरून गेला बरं का- त्यामुळे सगळेच आश्चर्यचकित झालेले- तर त्याने हे काही ठिकाणी बसवण्यात यावं असा आग्रह धरलेला. अँटीग्रॅविटीच्या संशोधनाशी आपलं नाव जोडलं जावं असं त्याला वाटायचं म्हणे- इतिहासात आपलं नाव राहिलं पाहिजे असं वाटायचं त्याला- फार काही क्षमता नसलेल्या म्हाताऱ्यांना वाटतंच ते म्हणा.''

‘‘त्यातून पुढे काय विकसित व्हावं असं वाटतंय त्यांना आता?'' सेल्डनने विचारलं.

“अँटीग्रॅविटी अंतराळ उड्डाण. अर्थात त्यासाठी कितीतरी काम करावं लागेल अजून. बरेच प्रयोग करावे लागतील आणि माझ्या माहितीप्रमाणे तरी बरेचसे वैज्ञानिक अजूनही हे अशक्य आहे असंच मानतात. पण अखेर अनेक काळापर्यंत ग्रॅविटिक लिफ्ट्सबद्दलही लोक असंच म्हणत होते.”

त्यांच्या पुढ्यातली रांग भराभर कमी होत होती आणि अचानक सेल्डनला जाणवलं की तो ह्युमिनच्या सोबत एका खोल रिकाम्या अवकाशाच्या काठावर उभा होता. समोरची हवा हलकेच चमचमत होती. त्याने सहजच हात पुढे केला आणि त्याला थोडासा धक्का बसला. इजा होण्याइतका नाही, पण त्याने झटकन हात मागे घेतला.

ह्युमिनने घशातल्या घशात आवाज केला. “कुणी कंट्रोल सुरू करण्याआधीच कडेवरून पुढे जाऊ नये म्हणून ही अगदी प्राथमिक काळजी घ्यावी लागली.” त्याने समोरच्या कंट्रोल बोर्डवर काही बटणं दाबली आणि ती चमचम नाहीसी झाली.

सेल्डनने पुढे होत खाली वाकून पाहिलं.

“कदाचित् तुला हे अधिक सोपं किंवा बरं वाटेल.” ह्युमिन म्हणाला, “आपण हातात हात घालू आणि डोळे मिटून घे. थोड्याशा सेकंदांचा प्रश्न आहे.”

सेल्डनपुढे त्याने फारसा पर्याय ठेवलाच नाही. त्याने त्याचा हात हातात गुंफला आणि पुन्हा एकदा त्याच्या पकडीतून सुटता येत नाही हे सेल्डनला कळलं. ह्युमिनने त्या रित्या अवकाशात पाय ठेवला, सेल्डनने अनभावितपणे छोटीशी किंकाळी फोडली (त्याला ते जाणवल्यानंतर कसंसंच झालं) आणि तोही त्याच्यासह पुढे गेला.

त्याने डोळे घट्ट मिटून घेतले आणि मग मात्र त्याला पडल्यासारखं वाटलं नाही, हवा बाजूने सरकताना जाणवली नाही. तोल किंचित गेल्यासारखा तो मागेपुढे झाला, पण मग तोल सावरत उभा राहिल्यावर त्याला कळलं की तो चांगल्या घट्ट जमिनीवर उभा होता.

त्याने डोळे उघडले आणि विचारलं, "पोचलो आपण?"

ह्युमिन शांतपणे उत्तरला, "मेलो नाही आपण." आणि तो चालायला लागला. त्याची सेल्डनच्या दंडावरची पकड तशीच होती, त्यामुळे सेल्डनही गेला.

"म्हणजे आपण हवं तिथे उतरलो कां?"

"अर्थातच."

"आपण खाली येतानाच जर दुसरं कुणी वर येत असतं तर?"

"दोन भिन्न जागा आहेत जाण्यायेण्यासाठी. एका बाजूने सगळे एकाच वेगाने खाली उतरतात. दुसऱ्याबाजूने सगळे एकाच वेगाने वर चढतात. तो स्तंभ एकमेकांपासून सगळे दहा फूट अंतरावर असतील तेव्हाच चालू होतो. सगळं नीट सुरळीत चालू राहिलं तर कुणी कुणावर आपटणार नाही."

"मला काहीच जाणवलं नाही."

"कशाला जाणवेल? कुठे वेग वाढला नाही की कमी झाला नाही. पहिल्या एक दशांश सेकंदानंतर आपण स्थिरच होतो आणि भोवतीची हवा आपल्याच वेगाने खाली सरकत होती."

"मस्तच आहे हे."

"एकदम मस्त. पण आर्थिकदृष्ट्या न परवडणारं. आणि त्यादृष्टीने काही प्रयत्न व्हावेत असं कुणाला फारसं वाटतही नाहीये. सगळीकडे तोच सूर निघतोय. 'आपल्याला नाही जमणार. हे होणार नाही.' हे आजकाल सगळयालाच लागू

होतंय.” ह्युमिनने वैतागाने खांदे उडवले आणि पुढे म्हणाला, “ते जाऊ दे, हे बघ, आपण पोहोचलो टॅक्सीतळाजवळ. चला जाऊ या.”

--- ----

१०-

सेल्डनला त्या एअर-टॅक्सी टर्मिनसवर सहजपणे वावरणं, सर्वसाधारण असल्याचं भासवणं अवघड जात होतं. कुणाचंही लक्ष वेधलं जाणार नाही अशा रीतीने वावरायचं तर समोरून येणाऱ्या माणसांपासून चेहरा लपवणं किंवा तिथली वाहनं नीट लक्ष देऊन पाहाणं अशा गोष्टी करून चालणार नव्हतं. अगदी निष्पापपणे सामान्य असल्यासारखं वागणं एवढंच अपेक्षित होतं. पण निष्पापपणे सामान्य म्हणजे नेमकं काय? त्याला आपल्या अंगावरचे कपडे गैरसोयीचे वाटत होते. त्या कपड्यांना खिसेच नव्हते, त्यामुळे हात कुठे ठेवायचे ते कळत नव्हतं. त्याच्या कंबरेवरच्या पट्ट्याच्या दोन बाजूंनी दोन बटवे लोंबत होते. त्याने जरा हालचाल केली की ते हलून त्याच्या मांड्यांवर आपटत होते, त्यामुळे त्याला सारखं वाटायचं की कुणीतरी आपल्याला ढोसलं की काय.

आजुबाजूने जाणाऱ्या बायकांकडे पाहायचा प्रयत्न त्याने केला. त्यांच्या कंबरेवर बटवे नव्हते, निदान लोंबत तरी नव्हते. पण त्यांच्याकडे छोटे बॉक्सेस होते. ते बॉक्सेस कधी या तर कधी त्या बाजूला मागे अडकवून त्या चालत होत्या. कशाने अडकवलेले ते बॉक्सेस ते कळत नव्हतं. काहीतरी स्यूडोमॅग्नेटिक सोय असावी. त्यांच्या अंगावरचे कपडे फार काही ‘दाखवणारे’ नव्हते. एकीच्याही गळ्याची खोली फार जास्त नव्हती. क्वचित काही ड्रेसेस जरा कुल्यांचे आकार व्यवस्थित दिसावेत अशा तऱ्हेने शिवलेले वाटत होते एवढंच.

इकडे ह्युमिन अगदी नेहमीप्रमाणे कामात गुंतल्यासारखा वावरत होता. त्याने आवश्यक ती क्रेडिट्स देऊन सुपरकंडक्टिव सिरॅमिकची चकती घेतली. ही चकती वापरून त्यांचं विवक्षित यान चालणार होतं.

"बस आत, सेल्डन," ह्युमिन एका छोट्याशा दोन आसनी यानाकडे इशारा करत म्हणाला.

सेल्डनने विचारलं, "तुला तुझं नाव द्यावं लागलं का, ह्युमिन?"

"अजिबातच नाही. ते ओळखतात मला आणि उगीच बाऊ करत बसत नाहीत कशाचा."

"तू काय करतोयस असं वाटेल त्यांना?"

"त्यांनी विचारलं नाही, आणि मी स्वतःहून काहीही सांगितलं नाही." त्याने ती चकती आत सरकवली आणि ते यान सुरू होताना सेल्डनला थोडीशी थरथर जाणवली.

"आपण डी-७च्या दिशेने चाललोय." ह्युमिनने काहीतरी म्हणून बोलायला सुरुवात केली.

आता डी-७ म्हणजे काय ते सेल्डनला माहीतच नव्हतं, त्यामुळे हे कुठल्यातरी मार्गाचं नाव असेल असं त्याने गृहीत धरलं.

ती एअरटॅक्सी इतर जमिनीवरच्या गाड्यांच्या बाजूने पुढे गेली आणि मग एक चढणीची वाट घेऊन तिने हलकेच वेग घेतला. आणि मग किंचितसा धक्का खात ते वर उचलले गेले.

एका जाळीदार पट्ट्यात सेल्डन आपोआप अडकला आणि बैठकीवर जणू घट्ट बसवला गेला. वरूनही त्याला त्या जाळीचा ताण जाणवत होता.

तो म्हणाला, "हे काही गुरुत्वविरोधासारखं जाणवलं नाही."

“नव्हतंच ते,” ह्युमिन म्हणाला, “ही एक छोटीशी जेट क्रिया आहे. भुयारांपर्यंत पोहोचवायला पुरेशी.”

अनेकानेक गुहांच्या दारांनी भरलेला असा एक दगडी कडा त्यांच्यासमोर उभा ठाकला. खेळाच्या पटासारखा दिसत होता तो. ह्युमिनने डी-७ या क्रमांकाच्या दारापाशी त्याचं वाहन नेलं. इतर भुयारांकडे चाललेल्या एअर टॅक्सीज् त्याने सहज टाळल्या.

“किती सहज अपघात होऊ शकला असता आत्ता.” सेल्डनने घसा खाकरत म्हटलं.

“सारं काही माझ्या संज्ञांवर अवलंबून असतं तर नक्कीच होऊ शकला असता. पण ही टॅक्सी कॉँम्प्युटराइज्ड आहे आणि कॉम्प्युटर माझा निर्णय झटक्यात बाजूला ठेवून योग्य तो निर्णय घेऊ शकतो. बाकीच्या गाड्यांच्याबाबतीतही तेच. - चाललो आपण.”

ते डी-७मध्ये जणू खेचले गेले आणि बाहेरच्या मोकळ्यावरच्या प्रखर उजेडापेक्षा आता सभोवार मऊसूत सोनेरी प्रकाश पसरलेला दिसत होता.

ह्युमिनने नियंत्रक कामाला लावले आणि मग तो आरामात बसला. खोलवर श्वास घेत तो म्हणाला, “चला, एक पायरी तर आपण काही अडचणीशिवाय ओलांडली. आपल्याला कदाचित् स्टेशनवर थांबवता आलं असतं त्यांना. आता इथे मात्र आपण बऱ्याच अंशी सुरक्षित आहोत, म्हणू शकतो.”

ही यात्रा तशी सरळ होती. भुयाराच्या भिंती कडेने सरसर घसरत जात होत्या. जवळपास काहीच आवाज नव्हता. टॅक्सी पुढे जात असताना एक मखमली गुरगुर जाणवत होती तेवढीच.

“आपला वेग किती आहे साधारण?” सेल्डनने विचारलं.

ह्युमिनने एक नजर कंट्रोल्सकडे टाकली, "ताशी तीनशेपन्नास किलोमीटर्स."

"मॅग्नेटिक प्रॉपल्जन?"

"होय. तुमच्या हेलिकॉनवरही आहे बहुतेक, हो ना?"

"हो. एकच लाइन आहे. मी त्यातून कधी प्रवास केलेला नाही. करायचाकरायचा म्हणत राहून गेला. पण ते तिथलं याच्यासारखं असणं शक्य नाही मला वाटतं."

"नक्कीच नसणार. ट्रॅन्टोरवर या असल्या भुयारांचं एक हजारो किलोमीटर्सचं मोहोळच आहे जमिनीखाली... आणि जरा उथळ समुद्रांच्या खालूनही ही भुयारं सापासारखी वळवळत जातात. लांबवरचा प्रवास करण्यासाठी हे सर्वात महत्त्वाचं साधन आहे आमचं."

"अजून किती वेळ लागेल आपल्याला?"

"म्हणजे आपल्या पुढल्या टप्प्यापर्यंत? पाच तासांपेक्षा थोडा जास्त वेळ लागेल."

"पाच तास!" सेल्डन हिरमुसला.

"एवढा वैतागू नकोस. दर वीस मिनिटांनंतर विश्रांतीची सोय आहे. भुयारातून बाहेर पडून, जरा पाय मोकळे करता येतात. अंग ताणायला, बाकी विधी उरकायला वाव असतो. अर्थात मला आपण शक्य तितक्या कमी वेळा थांबलं तर बरं वाटेल."

ते काही वेळ शांततेत प्रवास करीत राहिले आणि मग अचानक समोर उजवीकडे प्रखर दिवे आले तसा सेल्डन दचकलाच. तिथे त्याला दोन एअर टॅक्सीज् दिसल्या.

"तोच ते रेस्ट एरिया." ह्युमिनने त्याच्या मूक प्रश्नाला उत्तर दिलं.

सेल्डनने विचारलं, “तू जिथे कुठे मला नेतो आहेस तिथे मी खरंच सुरक्षित असणार आहे का रे?”

ह्युमिन उत्तरला, “साम्राज्याच्या बाजूने काहीही उघड धोका होऊ शकणार नाही, इतका सुरक्षित नक्कीच. अर्थात्, जेव्हा एखादा हेर, किंवा त्यांचा हस्तक किंवा भाडोत्री मारेकरी मागे लागण्याची शक्यता असेल तेव्हा काळजी घ्यावीच लागेल. त्यामुळे मी तुला एखादा शरीररक्षक देईन सोबत.”

सेल्डन अस्वस्थ झाला. “भाडोत्री मारेकरी? खरंच म्हणतोस की काय? ते खरंच मला ठार करू पाहातील?”

ह्युमिन म्हणाला, “डेमेर्झेल नाही तशी इच्छा करणार. खात्री आहे मला. त्याला तुला ठार करण्यापेक्षा तुझा वापर करण्यात जास्त रस असेल असं मला तरी वाटतं. तरीही, इतर काही शत्रू वळतीलच तुझ्याकडे... किंवा काही दुर्दैवी घटना क्रमाने घडत जाऊ शकतात. आता झोपेत चालल्यासारखं जगून चालणार नाही तुला.”

सेल्डनने मुंडी हलवली आणि दुसरीकडे पाहिलं. तो विचार करत होता, केवळ अठ्ठेचाळीस ,तासांपूर्वी मी एक बिनमहत्त्वाचा, कुणालाही ओळख नसणारा, बाहेरच्या जगातला एक गणितज्ञ होतो... ट्रॅन्टोरची प्रेक्षणीय स्थळं पाहावीत, या भव्य जगाची भव्यता आपल्या खेडवळ डोळयात साठवून घ्यावी यातच समाधानी होतो. आणि आता... आता त्याला अखेर जाणीव झाली होती- तो एक वॉन्टेड माणूस होता... साम्राज्याला आपल्या पाशात हवं असलेलं सावज होता. या भयंकर परिस्थितीची जाणीव मनापर्यंत पोहोचताच तो थरकापला.

“आणि तुझं काय- तू नेमकं काय करतो आहेस?”

ह्युमिन विचारात बुडाल्यासारखा उत्तरला, “हं... ते काही माझी फार गय करणार नाहीत मला वाटतं. कदाचित् कुणा अज्ञात हल्लेखोराकरवी माझं मस्तक छिन्नविच्छिन्न होऊन पडेल किंवा माझी छाती फुटलेली सापडेल.”

हे बोलताना ह्युमिनचा स्वर जराही कापला नाही, किंवा त्याच्या चर्येवरची शांती ढळली नाही, पण सेल्डनचा चेहरा मात्र पिळवटला.

सेल्डन म्हणाला, “तुझी गत अशी होऊ शकते याची तुला कल्पना असेल असं मीही गृहीत धरलं. पण तुला त्याची- फारशी फिकीर दिसत नाही.”

“मी बनचुका ट्रॅन्टोरियन आहे. या ग्रहाची जास्तीत जास्त तपशीलवार माहिती मलाच आहे. मी खूप लोकांना ओळखतो, आणि त्यातले अनेकजण बऱ्यापैकी माझ्या उपकारांच्या ओझ्याखाली असतील. शिवाय मला वाटतं, मी चांगल्यापैकी खेळिया आहे, मला फारसं कुणी फसवू शकत नाही. थोडक्यात, बरं का सेल्डन, मला खात्री आहे की मी स्वतःची फार उत्तम प्रकारे काळजी घेऊ शकतो.”

“मला आनंदच वाटला हे ऐकून आणि तुझा विश्वास खरा ठरो हीच माझी मनोकामना आहे, ह्युमिन. पण तरीही माझ्या डोक्यात हे शिरत नाही, की तू या भानगडीत पडावंस का... मी कोण लागतो तुझा? एका संपूर्णपणे अनोळखी व्यक्तीसाठी अगदी बारीकशी तरी जोखीम तू का पत्करावीस?”

ह्युमिनने लक्षपूर्वक सगळे कंट्रोल्स तपासले आणि मग त्याने पूर्ण वळून सेल्डनकडे तोंड केलं. त्याची स्थिर पाहाणारी नजर अगदी गंभीर होती.

“सम्राटाला तुला ज्या कारणासाठी वापरायचंय, त्याच कारणासाठी मलाही तुला वाचवायचंय. तुझ्या भविष्यकथनक्षमतेसाठी.”

सेल्डनला निराशेचा झटकाच बसला. अखेर हा केवळ आपल्याला वाचवण्याचा प्रश्न नव्हता तर. केवळ दोन शिकाऱ्यांमधल्या स्पर्धेत सापडलेलं सावज आहोत आपण. तो रागात म्हणाला, "मी कधीही ते दशकोत्तर परिषदेतील निवंधवाचन विसरू शकणार नाही. वाटोळं करून घेतलं मी आयुष्याचं."

"नाही. अरे गणितीबाबा, असा घाईघाईने निष्कर्षावर पोहोचू नकोस. सम्राट आणि त्याच्या अधिकाऱ्यांना तू हवा आहेस ते केवळ एकाच गोष्टीसाठी. त्यांची कारकीर्द अधिक सुरक्षित बनवण्यासाठी. सम्राटाची सत्ता वाचवण्यासाठी, त्याच्या पुत्रासाठी मार्ग सुकर रहावा म्हणून, त्यांची व्यवस्था, आसने, एकंदर प्रशासन सुखात नांदावं म्हणून त्यांना तुझा वापर करायचाय म्हणून त्यांना तुझ्या या क्षमतेत रस निर्माण झालाय. मला मात्र, तुझ्या या क्षमतेचा उपयोग संपूर्ण दीर्घिकेला व्हावा असं वाटतंय."

"यात फार काही फरक आहे?" सेल्डनने चिडून तिखटपणे विचारलं.

आणि ह्युमिनने उत्तर दिलं तेव्हा त्याच्या कपाळावर किंचितशी आठी उमटली होती. "तुला यातला फरक दिसत नसेल तर तुला लाज वाटायला हवी. या दीर्घिकेत मानवजात वस्तीला आहे ती या सम्राटाच्या खूप आधीपासून. त्याचा वंश सत्तेवर आला त्याच्याही कितीतरी आधीपासून. या साम्राज्याच्याही स्थापनेच्या आधीपासून. मानवता ही या साम्राज्यापेक्षा फार प्राचीन आहे. या दीर्घिकेतल्या पंचवीस दशलक्ष जगांपेक्षाही प्राचीन असेल मानवता. जेव्हा मानवता केवळ एकाच ग्रहापुरती सीमित होती अशा काळाच्याही दंतकथा सांगितल्या जातात अजूनही."

"दंतकथा!" सेल्डन खांदे उडवत म्हणाला,

"होय, दंतकथाच, पण तसं वीसेक हजार वर्षांपूर्वी खरोखरच नसेल असं का मानायचं मला कळत नाही. मानवजातीच्या सुरुवातीच्या काळातच त्यांना

हायपरस्पाशियल प्रवासाची तंत्र अवगत असतील असं काही नाही. प्रकाशापेक्षा अधिक वेगाने प्रवास करता येत नसेल अशा कुठलातरी काळ कधी ना कधी तरी असेलच... त्या काळात मानवजात एकाच ग्रहापुरती बंदिस्त राहिली असेलच की. आणि आपण भविष्यकाळात डोकावू लागलो तर या दीर्घिकेच्या जगातील मानवजात येणारी अनेक वर्षे टिकून राहील... तू आणि हा सम्राट मेल्यानंतर, किंवा त्याचा संपूर्ण वंश संपल्यानंतर, साम्राज्याच्या सर्व हस्तकसंस्था जीर्ण झाल्यानंतरही कितीतरी काळापर्यंत. आणि मग केवळ व्यक्तींचा, सम्राट किंवा त्याच्या वंशाच्या दिव्याचा विचार करणं फारसं महत्त्वाचं रहात नाही. अगदी साम्राज्याचं काय होणार याचीही चिंता करण्याचं कारण नाही. या दीर्घिकेतल्या अब्जअब्जावधी लोकांचं काय? त्याचं काय?"

सेल्डन उत्तरला, "ती जगं आणि त्यातले लोक जगतच रहातील मला वाटतं."

"ते कोणत्या परिस्थितीत जगत रहातील याचा थोडा गांभीर्याने विचार करावा असं वाटत नाही तुला?"

"आहे त्याच परिस्थितीत जगत रहातील बराच काळपर्यंत, असं गृहीत धरू शकतो आपण."

"गृहीत धरू शकतो. पण तू हे जे तंत्र विकसित करता येणं शक्य आहे म्हणतोस, त्या आधारे आपल्याला नक्की काय होईल तेही कळेल, नाही का?"

"मी त्याला मानसेतिहास म्हणतो. सायकोहिस्ट्री. सैध्दांतिक पातळीवर कळू शकेल."

"आणि ते तंत्र प्रत्यक्ष उपयोगात आणायला हवं याबद्दल तुला काहीही आस्था वाटत नाही."

“मला तसा प्रयत्न करायला आवडेल, ह्युमिन, पण तशी इच्छा असणं म्हणजे आपोआप तशी क्षमता असणं असा अर्थ होत नाही. मी सम्राटाला हेच सांगितलं की सायकोहिस्ट्रीची संकल्पना प्रत्यक्ष वापराचं तंत्र म्हणून विकसित करता येणार नाही. आणि तुलाही तेच सांगणं मला भाग आहे.”

“ते तंत्र विकसित करण्याचा प्रयत्न करण्याचंही तुझ्या मनात नाही?”

“नाही, खरंच नाही. ट्रॅन्टोरच्या आकाराचे अनेक दगडगोटे घेऊन ते मोजून मग ते आकारांच्या उतरत्या भाजणीने मांडायचे असं काम मला कुणी सांगितलं ते करायला मी जितकी असमर्थता दाखवेन- तेवढीच असमर्थता मी यातही दाखवतोय. जे करणं माझ्या संपूर्ण उर्वरित आयुष्यात मला जमणार नाही, ते करून पाहायचा लटका प्रयत्न मी करणार नाही. तेवढा वेडा नाही मी.”

“मानवजातीच्या भविष्यात काय वाढून ठेवलं असण्याची शक्यता आहे याची खरीखुरी कल्पना तुला दिली तर तू प्रयत्न करशील?”

“हा तर केवळ अशक्य प्रश्न आहे. मानवजातीची खरी परिस्थिती काय आहे? तुला ती माहीत आहे असं तुला सुचवायचंय की काय?”

“होय. मला माहीत आहे. पाच शब्दांत मी ते तुला सांगू शकतो.” ह्युमिनची दृष्टी पुन्हा समोरच्या बाजूला वळली. समोरून अंगावर येणाऱ्या भुयाराच्या कोऱ्या पोकळीत स्थिरावली. पुढ्यात येताना विस्तारणारी आणि मागे पडताना आकुंचित होणारी ती पोकळी. मग अगदी भयगर्भ स्वरात त्याने ते पाच शब्द उच्चारले.

तो म्हणाला, “दीर्घिकेचे साम्राज्य लयाला चालले आहे.”

------

# विद्यापीठ

स्ट्रीलिंग विद्यापीठ... प्राचीन ट्रॅन्टोरच्या स्ट्रीलिंग प्रांतातील उच्चविद्याशिक्षणाची एक प्रख्यात संस्था. आज हे विद्यापीठ स्मरणात राहिले आहे ते त्याच्या मानव्य आणि विज्ञान शाखांतील भरघोस यशप्राप्तीमुळे नाही. त्या काळच्या अनेक विद्वानांना काही काळानंतर या विद्यापीठाची ख्यातीकीर्ती कुणी हॅरी सेल्डन नावाचा इसम पलायनाच्या मार्गावर असताना इथे काही काळ थांबला होता, राहिला होता, म्हणून टिकून रहाणार हे ऐकून धक्काच बसला असता.

दीर्घिका ज्ञानकोष

११-

ह्युमिनच्या शांतपणे उच्चारलेल्या त्या विधानानंतर, हॅरी सेल्डन अस्वस्थपणे स्तब्ध बसून राहिला. आपल्या मर्यादा अचानकपणे लक्षात येऊन तो अधिकाधिक आकसत स्वमग्न झाला. त्याने एका नव्या विज्ञानविचाराला जन्म दिला होता- मानसेतिहास- सायकोहिस्ट्री. शक्यतांचे नियम हलकेच अगदी नव्या प्रकारे ताणून... नवनवीन गुंतागुंती, अनिश्चितता या सर्वांना अंतर्भूत करून असंख्य अज्ञात घडामोडींबद्दल या शक्यतांचे नियम काम करू शकतील... अनंत अशी संख्या असेल ती- त्यालाही माहीत नव्हतं.

पण हा केवळ गणिताचा खेळ होता त्याच्यासाठी- अधिक काही नाही.

त्याच्या हाती सायकोहिस्ट्रीचा विचार होता- निदान सायकोहिस्ट्रीचा पाया तरीह होताच. पण केवळ गणिती औत्सुक्य एवढच त्याचं स्वरूप होतं. त्यातील समीकरणांना अर्त देण्यासाठी लागणारं इतिहासाचं ज्ञान कुणाकडे होतं?

त्याच्याकडे काहीही नव्हतं. त्याला कधीही इतिहासात रस नव्हता. त्याला हेलिकॉनचा इतिहास जुजबीच माहीत होता. हेलिकोनियन शाळांमध्ये या छोट्याशा मानवी जगातील इतिहास शिकणं सक्तीचंच होतं. पण त्यापलिकडे काय? बाकी होत्या त्या केवळ इकडूनतिकडून कानावर पडलेल्या अर्धवट दंतकथा, त्याही अगदी वरवरच्याच, आणि त्यातल्या किती कर्णोपकर्णी प्रवास करताना मुळापासून बदलून गेलेल्या असतील कोण जाणे.

तरीही, दीर्घिकेच्या साम्राज्याचा लय होतो आहे, असं कुणी कसं काय म्हणू शकतं?

गेली दहा हजार वर्षं, हे साम्राज्य सर्वांनी स्वीकारलं होतं आणि टिकून होतं. आणि त्याआधीही ट्रॅन्टॉर ही एका बलाढ्य राज्याची राजधानी होती, दोन हजार वर्षेपर्यंत ते अघोषित साम्राज्य म्हणून सर्वांना ओळखीचं होतंच.

सुरुवातीची काही शतके, जेव्हा दीर्घिकेतील काही विभाग आपलं स्वतंत्र अस्तित्व विसर्जित करायला नकार देत असत, तेव्हाही साम्राज्य तग धरून राहिलं. क्वचित कधी होणारे उठाव, दोन राजवंशांतील युध्दे, काही अशांत कालखंडांतील तापदायक घटना असं सारं होऊनही साम्राज्य टिकून राहिलं. या असल्या गोष्टींचा परिणाम बऱ्याचशा जगांवर होतच नसे. ट्रॅन्टॉर स्वतःही विस्तारत, वाढत गेलं होतं... साऱ्या दीर्घिकेत त्यांचं अस्तित्व शाश्वत जग म्हणून ओळखलं जात असे.

हे खरंय, की गेल्या चार शतकांतील घटना पाहाता अस्वस्थतेचे प्रमाण वाढते होते. राजकुलातील व्यक्तींच्या हत्या आणि सत्ता बळकावण्याचे प्रकार वाढत

चालले होते. पण ते सुध्दा अलिकडे हळुहळू शांत होत चालले होते. आणि आत्ता तर दीर्घिका पूर्वी कधी नव्हती इतकी शांत, स्थिर होती. पहिला क्लिऑन आणि त्याचा पिता सहावा स्टॅनेल यांच्या राजवटींत सारी जगे तशी समृध्दीचा अनुभव घेत होती. आणि क्लिऑन स्वतःही काही जुलमी सम्राट नव्हता. ज्यांना साम्राज्याचं प्रेम नव्हतं अशांनाही क्लिऑनच्या विरुध्द फार काही वाईट बोलण्यासारखे मुद्दे सापडत नसत. टीका करायची झाली तर ते एटो डेमेर्झेलवर करीत.

मग दीर्घिकेचे साम्राज्य लयाला जाते आहे असं विधान एवढ्या खात्रीपूर्वक ह्युमिन का करीत असेल?

ह्युमिन हा पत्रकार होता. त्याला कदाचित् दीर्घिकेचा इतिहास तपशीलात माहीत असेल. आणि वर्तमानातील घडामोडींचीही त्याला अधिक चांगली कल्पना असेल. त्याच्या विधानाला या माहितीचा आधार असू शकेल का? आणि असेल तर मग ती कोणती माहिती असेल?

सेल्डनने बऱ्याचदा हे विचारायचा प्रयत्न केला, पण ह्युमिनच्या मुद्रेवरच्या गंभीर रेषांत काहीतरी खंबीर असं होतं... तो थांबून राहिला. आणि त्याच्या स्वतःच्या मनात खोलवर रुतून बसलेला विश्वास... की दीर्घिकेचे साम्राज्य ही एक अत्युच्च स्वयंसिध्द कल्पना... तिला धक्काच पोहोचू शकत नव्हता कधी. त्यामुळेही तो हा प्रश्न विचारायला चाचरत होता. आपला विश्वास चूक ठरला असेल तर... त्याला माहीत करून घेणं नकोसं वाटत होतं.

ना... आपला समज चुकीचा असेल असं त्याला खरंच वाटत नव्हतं. दीर्घिकेचं साम्राज्य संपेल अशी कल्पना करणं म्हणजे विश्वाचाच अंत झाल्याची कल्पना करण्यासारखं असेल. किंवा विश्वाचा अंत झाला तर, आणि तरच साम्राज्याचा अंत होईल.

सेल्डनने डोळे मिटून घेतले आणि झोपायचा प्रयत्न केला... ते शक्य होत नव्हतं. सायकोहिस्ट्रीचा सिध्दांत पुढे न्यायचा तर आपल्याला साऱ्या विश्वाचा इतिहास समजून घेण्याची गरज पडेल कां?

कसं शक्य आहे हे? पंचवीस दशलक्ष जगांचा इतिहास, प्रत्येकाची काही ना काही वेगळी गुंतागुंत असणार. सगळ्याचा अभ्यास करायचा म्हटला तरी कसा करणार? दीर्घिकेच्या इतिहासावरील बुकफिल्म्सचे खंडच्या खंड भरलेले असतील, त्याला माहीत होतं. त्याने एकदा कसल्यातरी- कोण जाणे कसल्या कारणाने ते उघडून नजर फिरवलीही होती. आणि त्याला अगदी अर्ध्यापर्यंत पोहोचतानाही कंटाळा आला होता.

काही महत्त्वाच्या जगांचा इतिहास त्याने चाळला होता. काहींचा इतिहास तिथे इत्थंभूत दिलेला, काहींचा इतिहास केवळ काही महत्त्वाच्या घडामोडींपुरताच होता. आणि मग सगळं धूसर होतं. त्याला आठवलं आपण हेलिकॉनचा इतिहासही सापडतो का हे डेक्समधे पाहिलं होतं. एकच एक संदर्भ एका पानावर देण्यात आला होता त्याचा. त्याने बरीच शोधाशोध केली होती आणि मग त्या पानावर त्याला सापडलेलं की एकदा ट्रॅन्टोरच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या पण त्यात अपयशी ठरलेल्या कुणा दावेदारामागे काही थोडी जगे उभी राहिली होती, त्यात हेलिकॉनही होतं. त्या वेळी हेलिकॉनला अद्दल घडवण्याचा काही प्रयत्न झाला नाही, कारण कदाचित् त्याचं महत्त्वच इतकं कमी होतं की शिक्षा देण्याचीही लायकी नव्हती त्याची.

या असल्या इतिहासाचा कसा काय उपयोग होणार? सायकोहिस्ट्रीतून काही निष्पन्न व्हायचं असेल तर वेचून प्रत्येक जगातील घडामोडींचा, त्यांच्या एकमेकांवरील परिणामांचा प्रतिक्रियांचा साकल्याने विचार करावा लागेल. पंचवीस

दशलक्ष जगांतील परस्परावलंबी घडामोडींचा अभ्यास कसा काय होऊ शकतो? अशक्य कोटीतील काम ठरलं असतं हे. आणि त्यामुळे सायकोहिस्ट्री हा केवळ सैध्दांतिक विचार आहे या तात्पर्याला आणखीएक पाठिंबा मिळत होता. याचा कधीही प्रत्यक्ष वापर करता येणं शक्य नाही.

सेल्डनला किंचितसा धक्का जाणवला, तो पुढे ढकलला गेला. एअरटॅक्सीचा वेग कमी झाला असणार हे त्याने ताडलं.

“काय झालं?” त्याने विचारलं.

“मला वाटतं आपण पुरेसे दूरवर आलो आहोत,” ह्युमिन म्हणाला, “थोडं खाण्यापिण्यासाठी आणि वॉशरुमला जाण्यासाठी थांबायला हरकत नाही आता.”

आणि पुढच्या पंधरा मिनिटातच एअर टॅक्सी सावकाश संथावली. भरपूर उजेडात न्हाऊन

निघालेल्या एका ठिकाणी ती आत शिरली आणि इतर पाचसहा टॅक्सींच्याबरोबर पार्क झाली.

१२-

ह्युमिनची नजर सराईतपणे ती जागा विंचरून काढत गेली... बाकीच्या टॅक्सीज्, उपहारगृहे, तिथले रस्ते, स्त्रीपुरुष या सर्वांवरून ती फिरली. सेल्डनने प्रयत्नपूर्वक सर्वसाधारण दिसण्याकडे लक्ष केंद्रित केलं. आणि ते जमेना तशी त्याने ह्युमिनला गुपचूप न्याहाळायला सुरुवात केली.

ते एका लहानशा टेबलपाशी बसले आणि त्यांनी आपल्या ऑर्डर्स पंच केल्या. तेव्हा कुठे सेल्डनने तोंड उघडलं आणि बेफिकीरपण विचारल्यासारखं विचारलं, “ठीकै का सगळं?”

“असं दिसतंय.” ह्युमिन उत्तरला.

“कशावरून सांगतोस?”

ह्युमिनने क्षणभर आपले काळे डोळे सेल्डनवर खिळवले. “सहजप्रवृत्ती म्हण.” तो म्हणाला, “वर्षानुवर्षं बातम्या गोळा करतोय. पाहिलं की समजतं, ‘इथे काहीही बातमी नाहीये.’ “

सेल्डनने मान डोलावली. त्याला सुटल्यासारखं वाटलं. ह्युमिन कदाचित् हे थोड्या चेष्टेनेही म्हणाला असेल, पण तरीही त्यात तथ्य असणारच.

त्याचं समाधान सॅंडविचच्या पहिल्या घासापर्यंतही टिकलं नाही. तोंडात घास तसाच घोळवत त्याने ह्युमिनकडे पाहिलं... त्याच्या मुद्रेवर आश्चर्य होतं, त्याचा विरस झाल्याचं स्पष्ट दिसत होतं.

ह्युमिन म्हणाला, “हे रस्त्यातलं अन्न आहे, मित्रा. स्वस्त, लवकर समोर येणारं आणि फारसं चांगलं नसलेलं. हे अन्न इथंच बनलेलं आहे, आणि त्यात वापरलेलं यीस्ट जरा तीव्र चवीचं आहे. ट्रॅंटोरियन पोटांना सवय असते याची.”

सेल्डनने कसाबसा घास गिळला. “पण होटेलमधलं जेवण तर-”

“तू तेव्हा सम्राटाच्या निवासक्षेत्रात होतास. तिथलं अन्न बाहेरून आयात केलेलं असतं. आणि सूक्ष्मान्ने वापरतात-मायक्रोफूड्स- तीही अतिशय उत्तम दर्जाची असतात. ते महागही असतं.”

सेल्डन आणखी एक घास घ्यावा की नाही विचार करत राहिला. “म्हणजे मी ट्रॅन्टॉरवर असेपर्यंतहे असंच-”

ह्युमिनने त्याला ओठांनीच गप्प रहाण्याचा इशारा केला. “तुला चांगल्यातल्या अन्नाची सवय आहे असा कुणाचा समज होता कामा नये. ट्रॅन्टॉरवर काही जागा अशा आहेत, की जिथे तुम्ही उमरावी पार्श्वभूमीतून आला आहात

म्हटल्यावर तुम्ही बाहेरच्या जगातून आला आहात म्हणण्यापेक्षा जास्त त्रास होऊ शकतो. इतरत्र कुठेही इतकं वाईट अन्न खावंही लागणार नाही, याची खात्री बाळगू शकतोस. या असल्या थांब्यांवरचं अन्न जरा खासच वाईट असतं. हे सँडविच तू खाऊन संपवू शकलास तर मग ट्रॅटॉरवर तू कुठेही आरामात जगू शकशील. आणि हे खाऊन तुला काहीही त्रास नक्कीच होणार नाही. ते काही शिळंपाकं नाही, खराब नाही. चव थोडी कडक आहे एवढंच. सवय होऊन जाईळ तुला, खरं सांगतो. मला काही ट्रॅन्टॉरियन्स असेही भेटलेत, की जे चवदार अन्न थंकून देतात, घरची चरचरीत चव या अन्नाला नाही म्हणतात.”

“ट्रॅन्टॉरवर बरीच पिकं किंवा अन्नपदार्थ वगैरे उत्पादन केलं जातं का?” सेल्डनने विचारलं. त्याने झटकन् तिरप्या नजरेने पाहून घेतलेलं, आजुबाजूला कुणीच नव्हतं. तो हळू आवाजात बोलत राहिला. “मी नेहमी ऐकत आलोय, की आसपासची वीस जगे ट्रॅन्टॉरला लागणारे सारे अन्न पिकवतात आणि त्या अन्नाने भरलेली शेकडो याने दररोज ट्रॅन्टॉरकडे पाठवली जातात.”

“खरंय. आणि तितकीच याने ट्रॅन्टॉरने तयार केलेला कचरा, मल बाहेर वाहून नेतात. आणि हे ऐकायला जरा आणखी जबरदस्त वाटावं म्हणून सांगतो- जी यानं अन्न घेऊन येतात, तीच कचरा घेऊन जातात. आम्ही बरंच अन्न आयात करतो हे खरंय, पण त्यातलं बरंचसं चैनबाजीचं अन्न असतं. आणि आम्ही बराच कचरा निर्यात करतो- त्याची दुर्गंधी वगैरे पार नाहीशी होईल इतकी प्रक्रिया त्यावर केलेली असते- सेंद्रिय खत म्हणून त्याचा खूपच उपयोग असतो. आम्हाला अन्न मागवणं जितकं महत्त्वाचं असतं, तितकाच महत्त्वाचा हा कचरा असतो इतर जगांच्या दृष्टीने. पण हा तर साऱ्या व्यवहाराचा एक लहानसा भाग झाला.”

“असं?”

“हो. समुद्रातले मासे तर आहेतच, शिवाय अनेक ठिकाणी बागा आहेत, ट्रक-शेती केली जाते. फळझाडं आहेत, कोंबड्या, ससे वाढवले जातात, शिवाय यीस्ट फार्म्स म्हणून ओळखली जाणारी प्रचंड मायक्रोऑर्गॅनिझम फार्म्स असतात- त्यात यीस्ट फार थोडं असतं खरं तर. आमचा कचरा बहुतांशाने इथेच वापरला जातो. या सगळ्या पिकांसाठी. खरं पाहिलं तर, ट्रॅन्टोर हा एखाद्या प्रचंड, अस्ताव्यस्त पसरलेल्या अवकाशतळासारखाच आहे. तू पाहिला आहेस कधी त्यातला एखादा?”

“होय, पाहिलाय ना.”

“अवकाशतळ म्हणजे मुख्यतः बंदिस्त अशी शहरं असतात, त्यातली प्रत्येक गोष्ट कृत्रिमरित्या पुनर्वापरात आणली जाते. कृत्रिम प्रकाश, कृत्रिम हवा, कृत्रिम दिवस नि रात्र आणि बरंच काही. ट्रॅन्टॉरमधे आणि अशा अवकाशतळांमधे एकच मोठा फरक आहे, तो म्हणजे सर्वात मोठ्या अवकाशतळाची लोकसंख्या एक कोटी असते तर ट्रॅन्टॉरची लोकसंख्या त्याच्या चारहजारपट आहे. आणि अर्थातच आमच्या कडे खरंखुरं गुरुत्वाकर्षण आहे. आणि आमच्याकडच्या सूक्ष्मान्नांशी कोणताही अवकाशतळ बरोबरी करू शकत नाही. आमच्याकडे यीस्टचे रांजण आहेत, बुरशीच्या अवाढव्य चटया आहेत, शेवाळांचे डोह तर अकल्पनीय वाटावेत. कृत्रिम चवींच्या बाबतीत आम्ही एकदम तरबेज आहोत, त्यांचा वापर करण्यातही. तू जे काही खातो आहेस, त्याला चव आणण्यासाठी तेच कारणीभूत आहे.”

सेल्डनने त्याचं सँडविच बरचसं संपवलं होतं आणि पहिल्या घासाला ते जितकं वाईट लागलेलं, तितकं आता वाईट लागत नव्हतं.

“याचा माझ्यावर काही विपरित परिणाम नाही ना होणार?”

“कधीकधी आपल्या आंतड्यांतल्या सूक्ष्मजीवसृष्टीवर त्याचा थोडा हल्ला होता. क्वचित कधीतरी बाहेरच्या ग्रहावरून आलेल्या एखाद्या प्रवाशाला जुलाब वगैरे होतात- पण क्वचितच. आणि ताबडतोब प्रतिकारशक्ती तयार होतेच. पण ठीकै, तुझा मिल्कशेक पिऊन टाक. तोही तुला आडणार नाही. पण त्यात जुलाब न होण्यासाठी काहीतरी मिसळलंय. त्यामुळे तुला या गोष्टींचा त्रास होणार असला तरीही तू बचावशील.”

सेल्डन वैतागून म्हणाला, “ह्युमिन, त्याविषयी काहीच बोलू नकोस. मला केवळ विषय काढल्यानेच त्रास व्हायचा.”

“तो मिल्कशेक संपव आणि विषय विसरून जा.”

त्यांनी न बोलता जेवण संपवलं आणि पुन्हा एकदा मार्गाला लागले.

१३-

आता ते भुयारी मार्गाने फार वेगात जाऊ लागले. सेल्डनने अखेर गेला तासभर मनात ठुसठुसणारा प्रश्न विचारायचं ठरवलं.

“दीर्घिकेचं साम्राज्य लयाला जातंय, असं तू का म्हणतोस?”

ह्युमिनने सेल्डनकडे वळून पाहिलं. “एक पत्रकार या नात्याने, माझ्याकडे विविध ठिकाणांहून इतकी माहिती येते की कानांतून पाझरू लागते शेवटी. त्यातलं फार थोडं मला प्रसिध्द करता येतं. ट्रॅन्टॉरची लोकसंख्या घटते आहे. पंचवीस वर्षांपूर्वी, ती पंचेचाळीस अब्ज इतकी होती.

“ही घट अंशतः जननाचे प्रमाण घटल्यामुळे आहे. ट्रॅन्टॉरचा जन्मदर कधीच फारसा जास्त नव्हता. ट्रॅन्टॉरमधून फिरताना तुझ्या लक्षात आलं असेल, की इथे फारशी मुलंबाळं दिसत नाहीत. एवढी लोकसंख्या असूनही. पण तरीही तो आता

अधिकच घटतो आहे. शिवाय स्थलांतर होतंय लोकांचं. लोक फार मोठ्या संख्येने ट्रॅन्टॉर सोडून चाललेत. येणारांची संख्या कमी आहे.”

“एवढी मोठी लोकसंख्या आहे म्हटल्यावर,” सेल्डन म्हणाला, “त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीच नाही.”

“पण तरीही हे खूपच अनपेक्षित आहे, कारण पूर्वी कधीही असं झालेलं नाही. पुन्हा साऱ्या दीर्घिकेतले व्यापारव्यवहार तंडावत चालले आहेत. कुठेच कुणी बंड, उठाव वगैरे करीत नाहीत, सगळं तसं शांत आहे म्हणून लोकांना वाटतं सगळं चांगलंच चाललंय. गेल्या काही शतकांत अनुभवलेली कठीण परिस्थिती आता सरली. पण आता एकंदर सगळीकडे एक प्रकारचं थकिस्त वातावरण आहे. सारं शांत आहे याचं कारण लोकांत समृध्दी आली आहे, ते समाधानी आहेत असं काहीही नसून ते निव्वळ थकलेले आहेत, सोडून दिलीय त्यांनी सारी आशा.”

“ओह्... माहीत नाही मला.” सेल्डन शंकित स्वरात म्हणाला.

“मला माहीत आहे ना. मी मघा तुला सांगितलेला अँटि-ग्रॅव तंत्रज्ञानाचा किस्सा याचंच उदाहरण आहे. आमच्याकडे थोड्या ग्रॅव्हिटिक लिफ्ट्स आहेत, पण नवीन बसवल्या जात नाहीयेत. त्यात फायदा नाही आणि त्यातून फायदा निघेल अशा पध्दतीने त्या चालवून पाहाण्यात कुणाला रसच उरलेला नाही. तंत्रज्ञानातील प्रगतीचा दर गेली काही शतके खालीखाली येतो आहे. आता तर तो अगदीच संथपणे रेंगतो आहे. काही ठिकाणीतर काहीच प्रगती होत नाहीये. हे तरी तू बघितलंस की नाही? अखेर तू एक गणितज्ञ आहेस.”

“मी त्यावर फारसा विचारच केलेला नाही, म्हणेन मी.”

“कुणीच करत नाहीये. सगळे ते केवळ मान्य करून टाकतात. आजकालचे वैज्ञानिक काय अशक्य आहे, काय अव्यवहार्य आहे, काय निरुपयोगी आहे हे

सांगायला पटापट तोंडं उघडतात. कुणी काही शक्यता वर्तवल्या तर ताबडतोब त्यांना मोडीत काढतात. उदाहरणार्थ, तू- तुला सायकोहिस्ट्रीसंबंधी काय वाटतं? हे सैध्दांतिक पातळीवर फार छान आहे. पण व्यवहारात त्याचा उपयोग शून्य आहे. हो ना?"

"हो... आणि नाहीही." सेल्डन वैतागून म्हणाला, "व्यवहाराच्या दृष्टीने त्याचा उपयोग शून्य आहे, पण हे मी म्हणतो ते मला काही नवीन करून पाहाण्याचा आता कंटाळा आला आहे म्हणून नव्हे. खरंच सांगतो. त्याचा उपयोग खरंच होणार नाही."

"निदान तसं तुला वाटतंय," ह्युमिनच्या स्वराला उपरोधाची झालर होती, "या साम्राज्यातल्या सगळ्या ऱ्हासाच्या वातावरणात."

"हा ऱ्हासाचं वातावरण आहे-" सेल्डनने रागात म्हटलं, "असा तुझा समज आहे. तुझं कदाचित् चुकतही असेल ना?"

ह्युमिन थबकला आणि थोडावेळ विचारात पडल्यासारखा बसून राहिला. मग म्हणाला, "होय, माझं चुकतही असेल. मी केवळ माझ्या अंतःप्रेरणेतून बोलतो आहे, अंदाज बांधतो आहे. मला हवंय सायकोहिस्ट्रीचं एक किमान व्यवहार्य तंत्र."

सेल्डनने खांदे उडवले आणि त्याच्या गळाला अडकायचं नाकारलं. तो म्हणाला, "माझ्याकडे असलं काहीही तंत्र नाही. पण समज तुझं बरोबर असेल. समज साम्राज्याचा ऱ्हास सुरू झाला आहे आणि ते लवकरच लयाला जाईल आणि विच्छिन्न होईल. मानवजात तरीही टिकून राहीलच."

"कोणत्या परिस्थितीत, बाबा, कोणत्या परिस्थितीत?? जवळपास बारा हजार वर्षांपासून, ट्रॅन्टॉरने साऱ्या दीर्घिकेतील शांतता चांगली राजवट दोऊन बऱ्यापैकी टिकवून ठेवली आहे. थोडी खीळ क्वचित बसली आहे. कुठे बंड, नागरी

युध्दं, अनेक दुर्घटना- सगळं होत राहिलं- पण तरीही सर्वसाधारणपणे बहुतांश जगे शांततेत नांदली. हेलिकॉन इतकं साम्राज्याच्या बाजूने का उभं आहे ठामपणे? तुझं जग... कारण ते लहानसं जग आहे आणि साम्राज्याने त्याचं रक्षण केलं नाही तर शेजारे ग्रहांवरील जगांच्या दाढेत सापडेल ते.''

''साम्राज्य ढासळून पडलं, तर साऱ्या विश्वात युध्द, अराजक माजेल असा अंदाज करतो आहेस का तू?''

''अर्थातच. मला या सम्राटाचं किंवा साम्राज्याच्या हस्तक संस्थांचं काही प्रेम नाही. पण त्यांना पर्याय नाही. या विश्वातील शांती टिकवण्यासाठी दुसरं काय प्रभावी ठरेल मला माहीत नाही. आणि दुसरं काही हाती असेपर्यंत जे आहे ते जाऊ द्यायला मी तयार नाही.''

सेल्डन म्हणाला, ''तू असा काही बोलतो आहेस की जसं काही तुझ्या हाती साऱ्या दीर्घिकेची सूत्र आहेत. तू हाती आहे ते जाऊ द्यायला तयार नाहीस? तुझ्या हातात आधी काहीतरी असलं पाहिजे? तू कोण असा लागून गेलास असं बोलायला?''

''मी हे असं सर्वसाधारण बोलतोय,'' ह्युमिन म्हणाला, ''मला चेटर ह्युमिनची व्यक्तिशः काही चिंता नाही. निदान माझ्या जीवनकाळापुरतं तरी हे साम्राज्य टिकेल. एवढंच काय, माझ्या आयुष्यात त्यात थोडी सुधारणा झालेलीही मला कदाचित् पाहायला मिळेल. विनाशाची वाट काही सरळसोट नसते. संपूर्ण विनास ओढवण्याआधी कदाचित् हजार वर्षंही लोटतील. आणि तोवर मी मरून गेलेला असेन असं धरायला हरकत नाही, आणि एक तर नक्कीच मी काही माझे वारस सोडून जाणार नाही इथे. स्त्रियांशी संबंध म्हणशील तर माझे तसे किरकोळ आणि अल्पजीवी संबंध येतात तेवढेच. मला मुलंबाळं नाहीत आणि व्हावीत असा काही

हेतूही नाही. मी भविष्याकडे कुणालाही ओलीस ठेवलेलं नाही- मी तुझी माहिती घेतली होती, तुझ्या भाषणानंतर. तुलाही मुलंबाळं नाहीतच.”

“मला आईवडील आहेत आणि दोन भाऊ आहेत. पण मुलं नाहीत.” तो कसनुसा हसला. “मी एका मुलीच्या प्रेमात पडलो होतो पूर्वी. पण तिला वाटलं की मला माझ्या गणिताचं प्रेम जरा जास्तच आहे...”

“तसं होतं कां खरंच?”

“मला तसं वाटत नव्हतं. पण तिला वाटलं. त्यामुळे तिने मला सोडून दिलं.”

“आणि त्यानंतर मग कुणीच नाही?”

“नाही. अजूनही ते दुःख मनात तसंच्या तसं आहे.”

“ठीक तर, आपण दोघांनीही वाट पाहायला हरकत नाही असं वाटू शकेल. आपल्या काळाच्या नंतर काय होईल, भविष्यात लोक काय झेलतील वगैरे चिंता त्यांच्यावरच सोडून देऊ असंही वाटू शकेल. पण हे सारं, कदाचित् मी यापूर्वी वाटून घेतलं असतं- पण आता नाही. कारण आता माझ्या हाती एक हत्यार आहे- आणि मी निर्णय माझ्या हातात आहे.”

“कसलं हत्यार आहे तुझ्या हाती?” उत्तर माहीत असूनही सेल्डनने विचारलं.

“तू!” ह्युमिन म्हणाला.

आणि सेल्डनला ह्युमिनचं उत्तर काय असणार हे माहीत असल्यामुळे त्याने धक्काबिक्का बसल्याचं दर्शवण्यात वेळ घालवला नाही. त्याने सांतपणे मान हलवली आणि म्हणाला, “तू चुकतोस. मी काही वापरण्याजोगं हत्यार नाही.”

“का नाही?”

सेल्डन सुस्कारला. “कितीवेळा सांगू मी तुला? सायकोहिस्ट्री हा काही व्यवहार्य अभ्यास नाही. यातली अडचण अगदीच मूलभूत आहे. साऱ्या विश्वातला

अवकाश आणि वेळ एकत्र करूनही त्यातल्या कळीच्या समस्या शोधायला पुरेसं ठरणार नाही.”

“खात्री आहे तुझी?”

“दुर्देवाने, आहे.”

“संपूर्ण दीर्घिकेच्या भवितव्याचा विचार तू मांड असं कुणीच म्हणणार नाही. प्रत्येक जगातल्या प्रत्येक माणसाचं भवितव्य काय असेल याच्या तपशीलातही जाण्याची तुला गरज नाही. काही विवक्षित प्रश्नांची उत्तरं तू द्यायला हवीस. दीर्घिकेचे साम्राज्य कोसळून पडेल का- आणि पडणार असेल तर कधी? त्यानंतर मानवजातीची परिस्थिती कशी असेल? ही परिस्थिती सावरण्यासाठी किंवा विनाश टाळण्यासाठी काही करता येणे शक्य आहे कां? मला वाटतं, हे प्रश्न तसे तुलनेने सोपे आहेत.”

सेल्डन मान हलवत दुःखाने हसला. “गणितशास्त्राचा इतिहास हा अगदी साध्यासाध्या प्रश्नांनी भरलेला आहे... त्यांची उत्तरे अतिशय गुंतागुंतीची असतात किंवा मग उत्तरच नसतात.”

“काहीच करता येणार नाही कां? साम्राज्य ढासळते आहे हे मला दिसतंय, पण मी सिध्द करू शकत नाही. माझे सारे निष्कर्ष व्यक्तिगत आहेत आणि माझं चुकत नाहीये हे मी सिध्द करू शकत नाही. कारण असा दृष्टीकोन ठेवणं फारच अस्वस्थ करून सोडणारं आहे. आणि माझं हे व्यक्तिगत मत चुकीचं आहे यावर विश्वास ठेवायला लोकांना सोयीचं वाटेल. आणि हा विनाश टालण्यासाठी किंवा निदान त्याचा झटका जरा कमी बसावा म्हणून काहीही करता येणं अशक्यप्राय होऊन बसेल. विनाश होणार हे सिध्द तरी करावं लागेल किंवा मग पार खोडून तरी काढावं लागेल.”

“पण मी हेच तर करू शकत नाही. मला तुला कोणत्याही प्रकारे पुरावा देऊ शकत नाही... काही नाहीच. एक गणिती प्रक्रिया व्यवहार्य करून देणं मला शक्य होत नाहीये... कारण तसं खरंच शक्य नाही. दोन सम संख्यांची बेरीज घेऊन तिच्यातून विषम संख्या काढून देणं कधीच शक्य नाही- तुझ्या अख्ख्या दीर्घिकेला त्या विषम संख्येची गरज असली तरीही ते शक्य नाहीच.”

ह्युमिन म्हणाला, “ठीक तर मग, तूही या ऱ्हासाचा एक भाग आहेस तर. अपयश मान्य करून टाकायला सज्ज.”

“आणखी काय पर्याय आहे माझ्यासमोर?”

“तू प्रयत्न नाही करू शकणार? तुझा प्रयत्न तुला कितीही निरुपयोगी वाटत असला तरीही... आयुष्यात यापेक्षा खूप काही महत्त्वाचं करायचं आहे का तुला? दुसरं काही उदात्त ध्येय आहे तुझ्या डोळ्यासमोर? काहीतरी करून तुला आपलं अस्तित्व स्वतःच्या लेखी समर्थनीय ठरवता येईल असं इतर काही आहे?”

सेल्डनच्या डोळ्यांची भराभर उघडझाप होऊ लागली. “लक्षावधी जगे, कोट्यवधी संस्कृती, अब्जावधी लोक, परार्धावधी नातीगोती... आणि मी या सर्वांचा एक नेटका सारांश काढावा असं सुचवतो आहेस तू.”

“नाही, मी म्हणतोय फक्त प्रयत्न कर. या साऱ्या लक्षावधी जगांसाठी, कोट्यवधी संस्कृतींसाठी, आणि अब्जावधी लोकांसाठी. सम्राटासाठी नव्हे. डेमेर्झेलसाठी नव्हे. मानवतेसाठी.”

“मी अपयशी ठरेन त्यात,” सेल्डन म्हणाला.

“त्यानेही आपल्याला फारसा फरक पडणार नाही. तू प्रयत्न करशील कां?”

आणि मग स्वतःच्या मनाविरुध्द... नकळत सेल्डनच्या कानावर स्वतःचेच बोल पडले.

"मी करीन प्रयत्न."

आणि त्याच्या आयुष्याचा मार्ग ठरून गेला.

१४-

त्यांचा प्रवास अखेर संपला आणि एअर टॅक्सी एका मोठ्याशा तळाकडे सरकली. त्यांनी नाश्ता केला होता त्या जागेपक्षा बराच मोठा तळ होता तो. (सेल्डनला परत एकदा त्या सँडविचची चव आठवली आणि त्याने ओठ मुडपले)

ह्युमिन टॅक्सी परत करून आला आणि त्याने आपली क्रेडिट स्लिप शर्टाच्या आतल्या बाजूच्या खिशात सरकवली. तो म्हणाला, "आता तू इथे उघड किंवा थेट हल्ल्यापासून पूर्णपणे सुरक्षित आहेस. हा आहे स्ट्रीलिंग प्रांत."

"स्ट्रीलिंग?"

"इथे पहिली वसाहत करणाऱ्या एकाचं नाव असणार ते. बऱ्याचशा प्रांतांना कुणाचं ना कुणाचं नाव देण्यात आलंय, त्यामुळे सगळीच नावं तशी वाईटच आहेत आणि उच्चारायलाही कठीण. तरीही आपण ही नावं बदलायचा प्रयत्न केला म्हणजे स्ट्रीलिंग ऐवजी आपण या प्रांताला स्वीटस्मेल- सुगंधी असं म्हणू वगैरे सुचवलं तर इथले रहिवासी भांडायलाच उठतील."

"अर्थातच्," सेल्डन नाक उडवत मोठ्याने म्हणाला, "आणि इथे स्वीटस्मेल तर अजिबातच नाहीये."

"ट्रॅन्टॉरवर कुठेच नसतो तो. पण सवय होईल तुला."

"बरं झालं आपण इथे आलो." सेल्डन म्हणाला, "म्हणजे मला काही हे फार आवडलंय अशातला भाग नाही, पण टॅक्सीत बसूनबसून उबलो मी. ट्रॅन्टॉरवर

फिरणं म्हणजे वैतागच दिसतोय. हेलिकॉनमधे आम्ही अगदी सहजपणे इथून तिथे जाताना हवाई प्रवास करतो. हे इथे दोन हजार किलोमीटर्सपेक्षा कमी अंतर पार करायला आपल्याला जितका वेळ लागला त्यापेक्षा फार कमी वेळात.''

''आमच्याकडेही एअर-जेट्स आहेत.''

''पण मग-''

''एअर टॅक्सीची तजवीज करण्यासाठी मला कुठेही माझं नाव द्यावं लागलं नाही. आणि इथे कितीही सुरक्षित वगैरे असलं तरीही, डेमेर्झेलला आपण कुठे आहोत हे नेमकं न कळलेलं बरं असं मला वाटतं. आणि बरं का- आपला प्रवास अजून पूर्ण झालेला नाही. अजून एकदा आपल्याला एक्स्प्रेसवेने जायचंय.''

म्हणजे काय ते सेल्डनला माहीत होतं. ''म्हणजे त्या उघड्या मोनोरेल्स-इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्डवाल्या- तेच ना?''

''बरोबर.''

''हेलिकॉनवर नाही ही सोय. खरं म्हणजे आम्हाला गरजच नाही पडत त्यांची. मी पहिल्या दिवशी ट्रॅन्टॉरमधे आलो तेव्हा घेतलेला मी एक्स्प्रेसवे. एअरपोर्टपासून होटेलपर्यंत त्यानेच आलो मी. एक नवीन अनुभव म्हणून ठीक होता. पण रोज वापरायची वेळ आली तर तो आवाज, ती गर्दी सगळंच जरा अवघड वाटू शकतं.''

ह्युमिनला गंमत वाटलेली. ''रस्ताबिस्ता चुकलेलास की काय?''

''नाही. सगळीकडे चांगल्या पाट्या वगैरे होत्या. वर चढण आणि खाली उतरणं जरा कठीण गेलं मला. पण कुणीतरी मदत केली. मी बाहेरून आलेला आहे हे तर स्पष्टच दिसत असणार माझ्या कपड्यांवरून- हे आत्ता कळतंय. पण ते सगळे

अगदी अगत्याने मदत करीत होते. माझं धडपडणं, चाचपडणं त्यांना गमतीदार वाटत असणार.”

“आता तू एक्स्प्रेसवे प्रवासात पटाईत झाला आहेस, त्यामुळे धडपडणार नाहीस किंवा चाचपडणारही नाहीस.” सेल्डन प्रसन्नपणे म्हणाला, पण त्याच्या ओठांच्या कोपऱ्यांतून हसू फुटू पाहात होतं. “चल तर मग.”

ते सावकाश वॉकवेवर आले. त्यावर धूसर ढगाळ दिवसाचा असतो तसला प्रकाश होता. आणि मधूनच सूर्य डोकवावा तसा तो मधेमधे उजळ होत होता. खरंच सूर्य दिसतोय की काय पाहायला सेल्डनने चटकन् वर पाहिलं. पण वरचं ‘आकाश’ अगदी कोरं होतं.

ह्युमिनच्या ते लक्षात आलं आणि तो म्हणाला, “हा असा बदल, मधूनच प्रकाश उजळ होणं मानवी मनाला फार बरं वाटत असावं. कधीकधी दिवसचे दिवस बाहेर झळझळीत उजेड असतो, आणि कधीकधी आता आहे तसा ढगाळलेला.”

“पण पाऊस किंवा बर्फ नसतं?”

“अंहं... गारपीटही नाही आणि बर्फाळ पाऊसही नाही. फार आर्द्रता वाडत नाही, कडाक्याची थंडी पडत नाही. ट्रॅन्टॉरच्या काही मस्त खासियती आहेत, सेल्डन, अगदी आत्तासुध्दा.”

दोन्ही बाजूंनी लोक चालताना दिसत होते आणि तरूण लोकांचा भरणा होता त्यात. काही प्रौढांबरोबर लहान मुलेही चालताना दिसत होती... ह्युमिन जन्मदराबद्दल जे काही बोलला ते इथंतरी फारसं खरं दिसत नव्हतं. सगळेच तसे सुस्थितीतले आणि सुजन वाटत होते. स्त्रीपुरुष दोघेही समसमान संख्येने होते. आणि मुख्य म्हणजे या सर्वांचे कपडे शाही प्रभागातल्या लोकांपेक्षा बरेच सौम्य होते. ह्युमिनने त्याच्यासाठी निवड केलेल कपडे इथे अगदी चपखल बसत होते. अगदी

थोड्या लोकांच्या डोईवर हॅट्स होत्या. त्यामुळे सेल्डनने मनोमन खूष होत आपली हॅट उतरवली आणि हातावर अडकवली.

वॉकवेच्या दोन बाजवांना विलग करणारी खोलखोल घळ इथे नव्हती. ह्युमिनने सांगितल्याप्रमाणे इथे ते जमिनीच्या पातळीवरच चालत होते. वाहनंही नव्हती फारशी. सेल्डनने त्याबद्दल ह्युमिनला टोकलं.

ह्युमिन उत्तरला, "वाहनं... शाही प्रभागात ती बरीच आहेत कारण अधिकारी लोक वाहनं वापरतात. इतरत्र खाजगी वाहनं अगदीच थोडी आहेत. आणि जी आहेत त्यांच्यासाठी स्वतंत्र भुयारी रस्ते असतात. वाहनांचा वापर फारसा आवश्यक नाही. कारण आमच्याकडे एख्स्प्रेसवेज् आहेत, छोट्या अंतरांसाठी फिरत्या मार्गिका आहेत आणि शिवाय पायांचा वापर करायचाच असतो."

सेल्डनच्या कानावर मधूनमधून थोडी घरघर, करकर येत होती. त्याने पाहिलं, काही अंतरावरूनच एक्स्प्रेसवेच्या गाड्यांची रांग चाललेली दिसत होती.

"ते पहा," त्याने बोट दाखवलं.

"माहीत आहे, पण चला आता आपण बोर्डिंग स्टेशनला जाऊ. तिथे खूप गाड्या असतात. आणि चढायलाही बरं पडतं."

एक्स्प्रेसवेच्या एका गाडीत ते चढून बसले तेव्हा सेल्डन ह्युमिनकडे वळून बोलू लागला, "मला फार आश्चर्य वाटतं. हे एक्स्प्रेसवे किती शांत वाटतात. फारसा आवाजच नाही. त्या सर्वांचं मास प्रॉपेलिंग होतं, विद्युतचुंबकीय क्षेत्रातून ते साध्य होत असणार वगैरे सगळं कळतंय मला- तरीही अगदीच कमी आवाज वाटतो." क्वचितच कधीतरी त्यांची गाडी जराशी शेजारच्या गाडीकडे सरकली की थोडाफार धातूच्या आवाजाची करकर यायची.

“हो. फार छान नेटवर्क आहे हे.” ह्युमिन म्हणाला, “पण हे जेव्हा खरोखर पूर्ण क्षमतेनिशी वापरलं जायचं तेव्हा तू पाहिलेलं नाहीस. मी तरूण होतो तेव्हा आत्तापेक्षाही शांत असायचं हे. आणि काही लोक तर सांगतात अगदी कुजबुजीइतका आवाजही येत नसे पन्नास वर्षांपूर्वी. अर्थात जुन्या आठवणी सांगताना लोक जराशी अतिशयोक्ती करतात हेही खरंय.”

“मग आता कां नाहीये तसं?”

“कारण आता त्याची देकभाल होत नाही नीटशी. मी सांगितलं ना तुला घसरणीबद्दल.”

सेल्डनने कपाळाला आठ्या घातल्या. “हे पहा, लोक असं तर नक्कीच करत नसणार. की सगळं आता घसरणीलाल लागलंच आहे, तर जाऊ दे. एक्स्प्रेसवेची वाट खुशाल लागू दे.”

“नाही, असं नाही. कुणी काही ठरवून करत नाही. बिघडलेलं दुरुस्त केलं जातं, खराब झालेल्या गाड्या बदलल्या जातात. चुंबक नवे लावले जातात. पण जे काही होतं ते ठिगळजोड प्रकारात मोडतं. त्यात काही नियोजन नसतं, काळजीपूर्वक करणं नसतं... मधे वेळही खूप जातो. त्यासाठी पुरेशी क्रेडिट्स उपलब्धच नसतात कधी.”

“जातात कुठे सगळी क्रेडिट्स.”

“इतर गोष्टींत. आमच्याकडे गेली कित्येक शतकं असंतोष आहे. आमचं नौदल केवढंतरी प्रचंड आहे. पूर्वीपेक्षा त्यावरचा खर्च वाडलाय. सैन्यातल्या लोकांना खूप चांगला पगार असतो. कारण त्यांना संतुष्ट राखून गप्प बसवणं महत्त्वाचं असतं. असंतोष, बंड, बारीकसारीक नागरी युध्द यांचं शमन करण्यातही बराच खर्च होतो.”

“पण आजकाल क्लिऑनच्या राज्यात तसं सगळं शांत आहे. गेली पन्नास वर्षं तशी शांतताच नांदतेय.”

“हो. पण ज्या सैनिकांना इतका काळपासून चांगले पगार होते, त्यांना आत्ता केवळ शांतता नांदतेय म्हणून कमी पगारावर काम करणं रुचणार नाही. आपापली जहाजं नुसती ठेवून देणं अडमिरल्सना रुचत नाही. काही करायला नाही म्हणून आपापल्या पदांची प्रतिष्ठा कमी केलेली ते चालवून घेणार नाहीत. त्यामुळे सगळी क्रेडिट्स अनुत्पादक खर्चात व्यस्त होतात. सैन्य राकण्यात खर्च होत रहातो आणि समाजकल्याणाच्या महत्त्वाच्या गोष्टी सडत जाऊ दिल्या जातात. त्यालाच तर मी घसरणं म्हणतो. तुला नाही वाटत? तुला नाही वाटत, की कधीतरी तू सुध्दा अशा प्रकारचा दृष्टीकोन तुझ्या सायकोहिस्टॉरिकल कल्पनांमध्ये गुंफून घेऊ शकशील म्हणून?”

सेल्डन जागच्या जागी अस्वस्थपणे चुळबुळला. “बरं मला हे सांग, आता आपण चाललोय कुठे?”

“स्ट्रीलिंग विद्यापीठात.”

“हां हां. म्हणून मला ते नाव ओळखीच वाटत होतं. मी ऐकलंय या विद्यापीठाबद्दल.”

“नवल नाही. ट्रॅन्टॉर ल उच्च शिक्षणाच्या ढिगाने- म्हणजे जवळपास एक लाख संस्था आहेत. आणि स्ट्रीलिंग हे त्या ढिगाऱ्याच्या टोकावर बसलेलं विद्यापीठ आहे.”

“मी तिथेच रहायचंय कां?’

“काही काळ निश्चितच. विद्यापीठांचे परिसर खूपच सुरक्षित असतात. तिथं कुणाचं काही चालत नाही. तू तिते सुरक्षित असशील.”

“पण मी तिथे गेलेलं तिथल्या लोकांना आवडेल कां?”

“हो. का नाही? आजकाल गणितज्ञ मिळणं मोठं मुश्कील झालंय. तुझा वापर करून घेतील ते आणि तूही त्यांचा उपयोग करून घेऊ शकशील... फक्त लपण्यासाठीच नव्हे. इतर अनेक कामांसाठीही.”

“म्हणजे, मी माझ्या संकल्पनेवर तिथे राहून काम करू शकतो असं...”

“तू वचन दिलंयस.” ह्युमिन गंभीरपणे म्हणाला.

“मी प्रयत्न करायचं वचन दिलंय.” सेल्डन उत्तरला आणि त्याच्या मनात आलं... वाळूपासून दोरखंड वळायचं वचन दिल्यासारखंच आहे हे.

१५-

त्यानंतर त्या दोघांतलं संभाषण जरा आटलंच. सेल्डन बाजूने सरकणाऱ्या स्ट्रीलिंग भागातल्या इमारती वगैरे पाहात राहिला. त्यातल्या काही अगदीच बुटक्या होत्या आणि काही ‘आकाशा’ला भिडत होत्या. अधूनमधून बऱ्याच गल्ल्या गेलेल्या दिसत होत्या. लांबरुंद रस्ते आडवे जात होते.

एका ठिकाणी त्याला जाणवलं, की जशा या इमारती वर उंचावर जात होत्या तशा खालीही खोलात शिरत होत्या. कदाचित् त्या उंचीपेक्षा जास्त खोलात गेलेल्याही असतील. आणि मग त्याची तशी खात्रीच पटली.

क्वचित कुठेतरी मागच्या बाजूला हिरवळ दिसत होती, एक्स्प्रेसवेपासून जरा दूर मागच्या बाजूला लहानलहान झाडंही दिसत होती.

तो बराच वेळ बाहेर बघत राहिला आणि मग त्याला अचानक जाणवलं की बाहेरचा उजेड मंदावत चालला होता. त्याने डोळे बारीक करत ह्युमिनकडे वळून पाहिलं तेव्हा ह्युमिनने त्याच्या मनातला प्रश्न ओळखला.

“दुपार ढळली आता,” तो म्हणाला, “रात्र पडायची सुरुवात झाली.”

सेल्डनच्या भुवया उंचावल्या आणि त्याच्या ओठांचे कोपरे मडपले. “मस्तच आहे हे. संपूर्ण ग्रह काळोखात बुडालेला आणि मग पुन्हा उजेडात न्हायलेला असं चित्र माझ्या डोळ्यासमोर येतंय.”

ह्युमिन मोजकंच हसला. “तसं नाही, सेल्डन. हा ग्रह पूर्णपणे अंधारात किंवा उजोडात कधीच नसतो. संधिप्रकाशाच्या छाया संपूर्ण ग्रहावर हलकेच पसरत जातात. आणि मग अर्ध्या दिवसानंतर पहाटेचा उजेड होऊ लागतो. घुमटाच्या बाहेर जो खराखुरा दिवस आणि रात्र असतात त्याच्या पाठोपाठ हे होत रहातं. त्यामुळे ऋतूनुसार दिवसरात्रीची लांबी कमीजास्त केली जाते.”

सेल्डनने मान हलवली, “संपूर्ण ग्रह असा झाकून घ्यायचा आ मग बाहेरच्या दिवसरात्रीची नक्कल करायची यात काय हंशील आहे?”

“कारण, मला वाटतं, लोकांना तसंच जास्त बरं वाटतं. ट्रँन्टॉरियन्सना संपूर्ण ग्रह झाकून घेण्याचे फायदे बरे वाटतात, पण तसं केल्याची सततची आठवण मात्र त्यांना नकोशी वाटते. तुला अजून ट्रॅन्टॉरियन मनोभूमिका नीट कळायच्या आहेत, सेल्डन.”

सेल्डन थोडासा वरमला. तो अखेर केवळ एक होलिकॉनियन होता आणि हेलिकॉन बाहेरच्या लक्षावधी जगांबद्दल त्याला अगदीच थोडकीशी माहिती होती. त्याचं अज्ञान फक्त ट्रॅन्टॉरपुरतंच मर्यादित नव्हतं. आपल्या सायकोहिस्ट्रीच्या सिध्दांताचं व्यवहार्य रूप या तोकड्या ज्ञानानिशी आपण कसं काय मांडणार आहोत?

अगदी कितीही माणसं जमवली तरी ती एकत्रपणेही जास्तीत जास्त किती ज्ञान जमवू शकतात? सेल्डनला लहानपणीच्या एका कोड्याची आठवण झाली.

प्लॅटिनमच्या एका साधारण लहानशा तुकड्याला हाताने पकडण्यासाठी हॅंडल्स लावली तरीही तो अनेक लोकांच्या शारीरिक ताकदीच्या बळावर उचलला जाऊ शकणार नाही, असा तुकडा असू शकतो कां?

उत्तर होतं, होय.

प्लॅटिनमचा एक मीटरचा घन साधारण गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीमध्ये २२,४२० किलो इतका भरेल. प्रत्येक माणूस किंमान १२० किलोचं वजन वर उचलू शकतो असं गृहीत धरलं, तर १८८ माणसं हा तुकडा उचलायला पुरतील. पण एक घनमीटरच्या तुकड्याभोवती १८८ माणसं हँडलला हात घालण्यापुरती जागा धरून उभी राहू शकणार नाहीत. त्याच्याभोवती जास्तीत जास्त नऊ माणसं उभी राहू शकतात. तरफेचा वापर किंवा इतर काही साधनं वापरण्याची परवानगी नाही. केवळ सरळसोट शारीरिक ताकद वापरायची आहे. त्यामुळे हे शक्य नाही.

त्याच प्रकारे सायकोहिस्ट्रीसाठी आवश्यक असं ज्ञान मिळवण्यासाठी पुरेशी माणसं मिळवणं शक्य नाही. अगदी कॉम्प्यटर्सऐवजी सगळं ज्ञान मानवी मेंदूंमध्ये साठवलेलं असलं तरीही. ज्ञानाच्या साठ्याभोवती अमुक एवढीच माणसं गोळा होऊन ते ज्ञान प्रवर्तित करू शकतात.

ह्युमिन म्हणाला, “तू तुझ्याच विचारात मग्न दिसतो आहेस, सेल्डन.”

“मी माझं स्वतःचं अज्ञान जोखतोय.”

“उपयुक्त काम. या कामात अब्जावधी लोक तुला सामील होऊ शकतील बाब. पण चल आता. उतरायचंय आपल्याला.”

सेल्डनने वर पाहिलं. “तुला कसं कळलं?”

“ट्रॅन्टॉरवर आल्याच्या पहिल्या दिवशी तुला एक्स्प्रेसवे कळला तसंच. पाट्या बघतो मी.”

तेवढ्यात सेल्डनला शेजारून गेलेली पाटी दिसली. – स्ट्रीलिंग विद्यापीठ-३ मिनिटे.

“आपण पुढत्या स्टेशनवर उतरायचंय. सांभाळून.”

सेल्डन ह्युमिनच्या पाठोपाठ खाली उतरला. आता बाहेर आकाश गर्द जांभळं दिसत होतं आणि सगळे वॉकवेज्, मार्गिका, इमारती पिवळसर प्रकाशात उजळून निघाल्या होत्या.

हेलिकॉनियन रात्रीसारखंच भासत होतं सारं. डोळे बांधून त्याला इथे कुणी उतरवलं असतं, आणि मग पट्टी सोडली असती, तर त्याला नक्कीच आपण हेलिकॉनवरच्या कुठल्यातरी मोठ्या शहरातल्या अंतर्भागातल्या सधन वस्तीत आहोत असं वाटलं असतं.

“मला इथे स्ट्रीलिंग विद्यापीठात किती काळ थांबावं लागेल, ह्युमिन?” त्याने विचारलं.

ह्युमिनने त्याच्या नेहमीच्या शांत आविर्भावात उत्तर दिलं, “कठीण आहे ते सांगण, सेल्डन. कदाचित् साऱ्या आयुष्यभरही.”

“काय!”

“कदाचित् नाहीही. पण तू तो सायकोहिस्ट्रीवरचा निबंध वाचलास, आणि तुझं जीवन केवळ तुझं असण्याचा भाग संपलाच. सम्राट किंवा डेमेर्झेल या दोघांनी तुझं महत्त्व ताबडतोब ओळखलं. मीही ओळखलं. अनेकांनी ओळखलं असेल- मी काय सांगू? म्हणजेच, इथून पुढे तुझा तू मोकळा जगू शकणार नाहीस, हे नक्कीच.”

--- ----

# ग्रंथालय

वेनाबिली डॉर्स-- ... इतिहासकार. जन्म सिन्ना ग्रहावर. स्ट्रीलिंग विद्यापीठात दोन वर्षे काढल्यानंतर तिचे आयुष्य सर्वसामान्यांसारखेच गेले असते कदाचित्. पण पलायनादरम्यान तिची गाठ हॅरी सेल्डनशी पडली आणि मग सगळंच बदललं...

दीर्घिका ज्ञानकोष

१६-

शाही प्रभागात ह्युमिनची खोली जेवढी होती, त्यापेक्षा थोड्याशाच मोठ्या खोलीत हॅरी सेल्डनची रहाण्याची सोय झाली होती. एका कोपऱ्यात वॉशरूमची सोय असलेली एक बेडरूम होती ती. जेवण करण्या-जेवण्यासाठी आवश्यक त्या सुविधा अजिबातच नव्हत्या. खिडकीही नव्हती. फक्त छतात बसवलेला एक व्हेंटिलेटर मधूनमधून सुस्कारे सोडल्यागत आवाज करीत होता.

सेल्डनने जरा हिरमुसून सगळीकडे नजर टाकली.

ह्युमिनने त्याच्या मुद्रेवरचे भाव त्याच्या नेहमीच्या पध्दतीने टिपून घेतले आणि तो म्हणाला, “आजच्या रात्रीपुरतीच आहे ही सोय, सेल्डन. उद्या सकाळी कुणीतरी येऊन तुला विद्यापीठात घेऊन जाईल, मग तुझी रहाण्याची व्यवस्था जरा चांगल्या ठिकाणी करतील ते.”

“रागवू नकोस विचारल्याबद्दल, ह्युमिन, पण हे तुला कसं माहीत?”

“मीच करवून घेणार आहे ते. मी इथल्या एकदोन लोकांना चांगला ओळखतो.” तो किंचित हसला. पण त्यात गंमतीचा भाग नव्हता. “-आणि काही उपकार केलेत काहींवर, त्याची परतफेड करून घेऊ शकतो मी. चल, आता जरा तपशील नक्की करू.”

त्याने सेल्डनकडे नजर खिळवली आणि पुढे म्हणाला, “तुझ्याकडे त्या होटेलमधे असताना जे काही होतं ते सगळं आता कायमचं गेलं. त्यात काही अमोल- कायमचा तोटा होईल असं- आणि अगदी तेच मिळवायला हवंच असं काही होतं कां?”

“तसं काहीच नाही. माझ्या भूतकाळाशी संबंधित अशा काही वस्तू होत्या त्यात... पण गेल्या तर गेल्या म्हणेन मी. आणि अर्थात माझ्या त्या शोधनिबंधावरची काही टिपणं आहेत. काही आकडेमोडी आहेत. आणि तो शोधनिबंधही आहे.”

“तो आता जरी सार्वजनिक असला तरीही, कुणीतरी तो लवकरच धोकादायक म्हणून जाहीर करून बाजूला काढून ठेवतील. तरीही मी एखादी प्रत मिळवेनच. तरीही, तू त्याचं पुनर्लेखन करू शकशीलच हो ना?”

“हो, नक्कीच. म्हणून तर म्हटलं मी, कायमचा तोटा होईल असं काहीच नाही. शिवाय साधारण हजार क्रेडिट्स होते माझ्याकडे, ते गेले. पुस्तकं, कपडे, माझं हेलिकॉनचं परतीचं तिकिट... असंच काहीबाही.”

“सगळंच आवाक्यातलं आहे. आता मी तुला माझ्या नावाने एक क्रेडिट टाइल देण्याची व्यवस्था करतो. माझ्या नावे बिलं येतील. बारीकसारीक खर्च त्यातून करू शकशील तू.”

“तू खूपच उदार आहेस, पण असं कसं मी काही घेणार. छे.”

“यात काही उदारपणा नाहीये. कारण मी साम्राज्य वाचवण्याचा प्रयत्न करतोय, त्याचा भाग आहे हा. तुला घेतलंच पाहिजे.”

“पण तुला एवढा खर्च कसा परवडेल, ह्युमिन? मला ते वापरताना किती टोचणी लागेल कल्पना कर.”

“जरा बऱ्यापैकी जगण्यापुरता खर्च परवडू शकतो मला. आता अगदी विद्यापीठाचं जिम्नॅशियमच खरेदी करू नकोस त्यावर किंवा लाखभर क्रेडिट्सचा दानधर्म करू नकोस म्हणजे झालं.”

“काळजी करू नकोस. पण माझं नाव इथे उघड झालं तर-”

“होईलही. पण काही काळजीचं कारण नाही. सम्राटाच्या कुणाही अधिकाऱ्यांना, शासकीय सत्तेला विद्यापीठ किंवा तिथल्या सदस्यांवर काहीही नियंत्रण ठेवण्याची मुभा नाही. संपूर्ण स्वातंत्र्य आहे त्यांना. इथे काहीही चर्चा केल्या जाऊ शकतात. काहीह बोललं जाऊ शकतं.”

“आणि काही गुन्हाच घडला तर? अगदी हिंसक गुन्हा?”

“मग विद्यापीठाचे अधिकारीच ते प्रकरण हाताळतात. विचारपूर्वक, काळजीपूर्वक हाताळतात. आणि इथे अशा प्रकारचे हल्ले किंवा गुन्हे होतच नाहीत. इथल्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांनाही आपलं स्वातंत्र्य प्रिय आहे आणि त्याबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्यांची जाणीव आहे. इथे जराजरी हुल्लडबाजी वाढली, दंगेधोपे-रक्तपात झाला तर शासन ताबडतोब हा अलिखित कायदा तोडू पाहील. सैन्य पाठवील. असं व्हायला कुणालाच नको आहे. शासनालाही नको आहे ते. हा जरासा नाजूक तोल सगळेच सांभाळतात. म्हणजेच- दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर, डेमेर्झेललासुध्दा तुला या विद्यापीठातून उचलून नेता येणार नाही. गेल्या दीड शतकात जे झालं नाही असं काही घडत नाही तोवर त्याला इथे हात घालता येणार

नाही. मात्र एक, विद्यार्थ्यांमधल्या कुणी दलालांनी तुला भलवून विद्यापीठाच्या बाहेर नेण्याचा प्रयत्न केला तरच गडबड होऊ शकते.”

“विद्यार्थ्यांच्यात दलाल आहेत?”

“ते कसं सांगणार मी? असू शकतात. कुणीही साधासुधा नागरिक धमक्यांना बळी पडू शकतो, किंवा फसवला जाऊ शकतो किंवा सरळ विकत घेतला जाऊ शकतो... आणि म्हणून डेमेर्झेलच्या किंवा तशा कुणाच्याही सेवेत राहू शकतो. त्यामुळे मी एवढं बजावून सांगतो, की तू बऱ्याच अंशी सुरक्षित आहेस. संपूर्ण सुरक्षेची हमी कुणाला असते? काळजीपूर्वक वावरावं लागेल. पण मी तुला सावध करतोय याचा अर्थ असा नाही की तू सतत भिऊन जगायला पाहिजे. तू बाहेर कुठेही असतास, हेलिकॉनला परतला असतात किंवा ट्रॅन्टॉर सोडून दीर्घिकेतल्या इतर कोणत्याही ग्रहावर गेला असतात तर जितका सुरक्षित असतास, त्यापेक्षा कैक पटींनी तू इथे सुरक्षित असशील.”

“आशा करतो तशी,” सेल्डन अनुत्साही स्वरात म्हणाला.

“मला खात्री आहे त्याची,” ह्युमिन म्हणाला, “नाहीतर मी तुला इथे सोडून गेलो नसतो.”

“सोडून?” ह्युमिनने झटकन् वर पाहिलं, “असं नाही करू शकत तू. तुला इथली माहिती आहे. मला नाही.”

“ज्यांना इथली माहिती आहे अशांच्या बरोबर अशशील तू. या इथली माहिती त्यांना माझ्यापेक्षा अधिक चांगली असेल. मला तर आता जायलाच हवं. मी अख्खा दिवस तुझ्याबरोबर आहे. आणि आता मला माझी कामं करायलाच हवीत. माझ्याकडे उगीच लक्ष जायला नको कुणाच. तुझ्यासारखेच माझेही स्वतःचे काही प्रश्न आहेतच शेवटी.”

सेल्डन वरमला. “बरोबर आहे. माझ्यामुळे तुझ्यावर कोणतीही बिलामत नको यायला. आशा करतो- की तुझं आधीच फार नुकसान झालेलं नसेल.”

ह्युमिन शांतपणे म्हणाला, “कोणी सांगावं? आपण जगतोय कठीण काळातच. एवढंच लक्षात ठेव, की आपल्यासाठी नाही तरी निदान आपल्या नंतरच्यांसाठी हे जग सुरक्षित बनवण्याचा प्रयत्न कुणी करू शकणार असेल तर तो तूच आहेस. हा विचार तुला प्रेरणा देवो, सेल्डन.”

१७-

सेल्डनला झोप चकवा देत होती. अंधारात तो या कुशीवरून त्या कुशीवर होत तळमळत होता, विचार करत होता. ह्युमिनने त्याचा हात हाती घेऊन माथा थोडासा झुकवून निरोप घेतला तेव्हापासून त्याला फार एकटं, फार असाहाय्य वाटत होतं. अनोळखी जगात, अनोळखी जगाच्या अनोळखी प्रांतात. एक दिवसभराचा- मैत्री तरी म्हणायची का ती- मित्रही त्याच्यापासून आता दूर गेलेला. कुठे जायचं, काय करायचं, उद्या किंवा भविष्यात काय करायचं त्याला माहीत नव्हतं.

मनात एवढं काहूर असताना झोप येणं शक्यच नव्हतं... अखेर त्याने ठरवलं की जाऊ दे झोपायचा प्रयत्नही नाही करायचा... पुन्हा कधीतरी झोप येणार आहे की नाही माहीत नव्हतं... आणि असं ठरवत असतानाच थकव्याने त्याच्या जागृतीवर मात केली.

तो उठला तेव्हा अजूनही अंधार होता... की नव्हता- खोलीच्या टोकाला असलेला एक लाल दिवा उघडझाप करीत होता आणि त्याबरोबरच एक कर्कश घंटी थांबूनथांबून वाजत होती... याच आवाजाने त्याला जाग आली होती.

आपण कुठे आहोत हे आठवायचा प्रयत्न करत तो थांबला. त्याच्या डोक्यात शिरणाऱ्या संकेतांचा अर्थ त्याला नीटसा लागत नव्हता. त्या दिव्याची उघडझाप थांबली. घंटीचा आवाजही थांबला. आणि मग दारावरची उतावीळ टकटक त्याला जाणवली.

ती टकटक दारावरच होत असावी. पण दार कुठे आहे ते त्याला आठवत नव्हतं. बहुतेक कुठेतरी स्विच असणार... खोलीत उजेड करण्यासाठी तो शोधायला हवा होता. पण तेही त्याला आठवलं नाही.

तो उठून पलंगावर बसला आणि डाव्या हाताने भिंत चाचपडू लागला. त्याने मोठ्याने ओरडून सांगितलं- "क्षणभर थांबा, प्लीज."

अखेर त्याला तो स्विच सापडला. आणि खोलीत सौम्यसा उजेड झाला.

तो कसाबसा धडपडत पलंगावरून उठला आणि दार शोधू लागला. मग त्याला आठवलं, सावध रहायला हवं- आणि मग तो कडक आवाजात ओरडला, "कोण आहे?"

एका स्त्रीच्या मऊसूत आवाजात उत्तर आलं, " माझं नाव, डॉर्स वेनाबिली आणि मी डॉ. हॅरी सेल्डनना भेटायला आले आहे."

ती स्त्री दारातच उभी होती. दार तर उघडलेलंही नव्हतं.

क्षणभर हॅरी सेल्डन आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे पाहातच राहिला. मग त्याच्या लक्षात आलं त्याच्या अंगावर फक्त एक चड्डी होती. त्याच्या घशात किंकाळी अडकली आणि तो पलंगाकडे धावत गेला. तेवढ्यात त्याला कळलं की तो पाहात होता एका होलोग्रामकडे. खऱ्याखुऱ्या वस्तूची रेखीव किनार त्या प्रतिमेला नव्हती. शिवाय ती स्त्री त्याच्याकडे पाहातही नव्हती. ती केवळ त्याला आपण कोण ते दिसावं यासाठी होलोग्राम दाखवत होती.

तो थांबला. त्याचा श्वास जोरात चाललेला. मग त्याने बाहेर आवाज जाईल इतपत मोठ्याने दाराच्या दिशेने ओरडत सांगितलं. "तुम्ही थोडं थांबलात तर मी बाहेर येतोच. मला जरा वेळ- अर्धा तास द्या."

ती स्त्री -की तिचा होलोग्राम- म्हणाली, "थांबते मी." आणि मग तिचा होलोग्राम नाहीसा झाला.

तिथं शॉवर नव्हता. त्यामुळे त्याने फक्त अंग पुसून घेतलं. वॉशरूमच्या कोपऱ्यात थोडा चिखल झाला. तिथे टूथपेस्ट होती पण टूथब्रश नव्हता. त्यामुळे त्याने बोट वापरलं. आणि काल घातलेलेच कपडे घालून तो तयार झाला. आणि अखेर त्याने दार उघडलं.

मग त्याला आठवलं, की तिने फक्त स्वतःचं नाव सांगितलेलं, बाकी काहीच ओळख दिली नव्हती. ह्युमिनने त्याला कोण भेटेल वगैरे काहीच तपशील सांगितले नव्हते. ही डॉर्स की कोम तीच की आणखी कुणी. एका चांगल्या व्यक्तिमत्वाच्या तरुण मुलीचा होलोग्राफ पाहिल्यावर त्याला सुरक्षित वाटलेलं खरं. पण तिच्या मागोमाग अर्धा डझन टगी पोरं असली असती तर.

त्याने सावधपणेच डोकावून पाहिलं. पण ती एकटीच होती. आणि त्याने तिला आत शिरण्यापुरता दरवाजा उघडून धरला आणि ती आत येताच पुन्हा दरवाजा बंद करून घेतला.

"मला क्षमा करा हं," तो म्हणाला, "किती वाजले असतील?"

"नऊ," ती उत्तरली, "दिवस केव्हाच सुरू झाला."

अधिकृत वेळ म्हणून ट्रॅन्टॉरची वेळ ही दीर्घिकेत प्रमाणवेळ म्हणून मान्य होती. तसं होतं म्हणूनच आंतर-तारामंडळांमधील व्यापार-व्यवहार, शासकीय

व्यवहार नीटपणे चालणं शक्य होतं. पण शिवाय प्रत्येक जगाची स्थानिक वेळही असायचीच. पण अजूनही सेल्डनला ट्रॅन्टॉरची वेळ वापरणं अंगवळणी पडलं नव्हतं.

“सकाळ उलटली?” त्याने विचारलं.

“अर्थात्.”

“या खोलीला खिडक्याच नाहीत,” तो स्वतःची बाजू सावरत म्हणाला.

डॉर्स त्याच्या पलंगापर्यंत चालत गेली आणि तिने भिंतीतल्या एका काळसर ठिपक्याला स्पर्श केला. त्याच्या उशीच्या वरच्या बाजूला थेट छतावर लाल रंगातले आकडे दिसू लागले. ०९०३.

ती सहजच हसली. “क्षमा करा,” ती म्हणाली, “मला वाटलं, चेटर ह्युमिनने मी नऊ वाजता येईन हे तुम्हाला सांगून ठेवलं असेल. त्याला सारं काही माहीत असण्याची इतकी सवय झाली आहे, की तो बाकीच्यांना काहीकाही गोष्टी माहीत नसतात हे विसरून जातो. मी रेडियो-होलोग्राफिक ओळखपत्र दाखवायला नको होतं. मला वाटतं हेलिकॉनवर नसणार हे- मी दचकवलं असणार तुम्हाला.”

सेल्डन आता जरा सैलावला. ती अगदी सहज मित्रत्वाने बोलत होती, आणि ह्युमिनचा उल्लेख केल्यावर त्याला फारच बरं वाटलं. तो उत्तरला, “हेलिकॉनबद्दल तुमचं चुकीचं मत झालंय, मिस-”

“मला डॉर्स म्हणा प्लीज.”

“हं, तर तुझी हेलिकॉनबद्दलची माहिती चुकीची आहे, डॉर्स. आमच्याकडेही रेडियो होलोग्राफी आहे, पण मला कधी ती सामग्री घेणं परवडलं नाही. माझ्या वर्तुळात कुणालाच नाही. त्यामुळे मला त्याचा अनुभव कधी आलेला नव्हता. पण तसं मला झटकन् कळलं बरं का.”

तो तिच्याकडे निरखून पाहात राहिला. फार उंच नव्हती ती. साधारण स्त्रीएवढीच उंच. तिचे केस फार भडक नव्हे पण लालसर-सोनेरी होते आणि तिच्या चेहऱ्याभोवती कुरळ्या केसांची वलयं तरंगत होती. (ट्रॅन्टॉरवरच्या बऱ्याच स्त्रियांची केसरचना अशी होती हे त्याने पाहिलं होतं. स्थानिक फॅशन असणार. हेलिकॉनवरचे लोक हसलेच असते.) ती फार काही सुंदर नव्हती, पण छान वाटत होती. तिचे ओठ हसरे, मांसल असल्यामुळे तिला पाहून अधिकच प्रसन्न वाटलं होतं. ती सडपातळ होती पण चांगली कमावलेली शरीरयष्टी दिसत होती तिची. आणि तशी खूपच तरूण होती. (जरा जास्तच तरूण- त्याने अस्वस्थ होत विचार केला- फार काही उपयोग होणार नाही आपल्याला बहुतेक.)

"झाले का मी परीक्षेत पास?" तिने विचारलं. (हिच्याकडेही ह्युमिनसारखी दुसऱ्याच्या मनातले विचार ताडण्याची क्षमता आहे की आपल्यालाच आपल्या मनातलं लपवता येत नाही, सेल्डन विचार करत राहिला.)

तो म्हणाला, "क्षमा कर मला, मी पाहातच राहिलो. पण मी खरंच तुझा अंदाज घेत होतो. मी अनोळखी ठिकाणी आलोय. मी इथे कुणालाच ओळखत नाही, आणि कुणी मित्र तर नाहीतच."

"प्लीज, डॉ. सेल्डन, मला मित्र मानायला हरकत नाही. मि. ह्युमिननी मला तुमची काळजी घ्यायला सांगितली आहे."

सेल्डन किंचित् खेदाने हसला, "हे काम करण्यासाठी तू फार लहान आहेस."

"तसं नाही हे लवकरच कळेल तुम्हाला."

"बरं. मी शक्य तितका कमी त्रास देई तुला. तुझं नाव परत एकदा सांगशील कां?"

“डॉर्स वेनाबिली.” तिने तिच्या आडनावाचं स्पेलिंग सांगितलं आणि दुसऱ्या व्यंजनावर जोर दिला. “मी सांगितलंय तुम्हाला, मला डॉर्स म्हणूनच हाक मारा. आणि तुमची स्वतःची फार हरकत नसेल तर मीही तुम्हाला हॅरी म्हणेन. आम्ही इथे या विद्यापीठात तसं प्रयत्नपूर्वक अनौपचारिक वागतो. आपापली पदं, सन्मानदर्शक बिरुदं वगैरे कुणीच मिरवत नाही.”

“अगदी जरूर. मला हॅरीच म्हण.”

“छान. मग आता मीही अनौपचारिकपणेच बोलते. उदाहरणार्थ- औपचारिकतेची जी काही सहजप्रवृत्ती असते ना- असते का खरंच- त्यानुसार मला बसायची परवानगीही विचारावी लागते. पण एकदा अनौपचारिक व्हायचं म्हटलं की मी सरळ बसूच शकते.” ती त्या खोलीतल्या एकमेव खुर्चीवर बसली.

सेल्डनने घसा खाकरला. “स्पष्टच आहे. मी अजूनही नीटसा भानावर आलेलो नाहीये. मी तुला केव्हाच बसायला सांगायला हवं होतं.” तो स्वतः आपल्या चुरगळलेल्या बिछान्याच्या कडेवर टेकला. तो जरा नीटनेटका करायला हवा होता- पण आपल्याला एक आश्चर्याचा धक्काच मिळाला तर करणार तरी काय असा विचार करत बसला.

ती प्रसन्न स्वरात बोलू लागली. “हे बघ, हॅरी, आपण आता कायकाय करायचंय ते मी तुला सांगून टाकते. प्रथम आपण विद्यापीठाच्या एखाद्या कॅफेमधे जाऊन नाश्ता करू. मग मी तुझी एखाद्या ठिकाणी रहाण्याची सोय करते. याच्यापेक्षा बरीच चांगली जागा असेल ते. खिडकीही असेल. ह्युमिनने मला सांगून ठेवलंय की त्याच्या नावाने क्रेडिट टाइल घेऊन तुला द्यायची आहे म्हणून. पण तरीही त्या सगळ्या भानगडीला विद्यापीठाची नोकरशाही एकदोन दिवस सहज लावेल. ते होईपर्यंत मी तुझा खर्च करीन आणि तो तू मला नंतर परत कर. आणि आम्ही तुझा

चांगला वापर करू शकतो. चेटर ह्युमिनने मला सांगितलंय की तू गणितज्ञ आहेस आणि काय कोण जाणे- पण आमच्याकडे कधीच चांगले गणिती फारसे नसतात.”

“मी चांगला गणितज्ञ आहे असं ह्युमिनने सांगतलं कां?”

“खरं सांगायचं तर, हो, त्यानेच सांगितलं तसं. तो म्हणाला की तू फार विलक्षण माणूस आहेस.”

“वेल,” सेल्डन बोटांच्या नखांकडे नजर लावत म्हणाला, “तसं म्हणवून घ्यायला आवडलं असतं मला, पण ह्युमिन मला केवळ एक दिवसापुरता भेटलाय. त्याने माझा शोधनिबंध ऐकला होता, पण त्याचा दर्जा ठरवणं त्याला शक्य नाही. मला वाटतं की तो केवळ विनयाने तसं म्हणत असावा.”

“मला नाही वाटत तसं,” डॉर्स म्हणाली, “तो स्वतःच एक विलक्षण माणूस आहे. आणि त्याला लोकांचा खूप अनुभव आहे. मी तरी त्याच्या मताला मान देते. आणि ते तसं आहे की नाही, हे सिध्द करायची तुला भरपूर संधी मिळेलच. तुला कॉम्प्युटर्स प्रोग्रॅम करता येतात की नाही?”

“अर्थातच.”

“मी शिकवण्याबद्दल बोलतेय, कळतंय ना, -अद्ययावत गणितशास्त्रातील विविध पध्दती शिकवण्याचे प्रोग्रॅम्स त्यावर करण्यासंबंधी विचारतेय.”

“हो. तो तर माझ्या कामाचाच भाग आहे. मी हेलिकॉन विद्यापीठात गणिताचा असिस्टंट प्रोफेसर म्हणूनच काम करतो.”

ती म्हणाली, “होय, ह्युमिनने सांगितलं मला. म्हणजे अर्थातच तू ट्रॅन्टॉरियन नाहीस हे सर्वांना कळेल. पण त्याने काही फार गंभीर प्रश्न उद्भवणार नाहीत. इथे विद्यापीठात बरेच लोक ट्रॅन्टॉरियन्स आहेत. पण तरीही बऱ्यापैकी संख्या बाहेरच्या जगातून आलेल्या तज्ज्ञांचीही आहे. आणि ते इथे स्वीकारलं जातं. आपापल्या

ग्रहाची महत्ता सांगण्याचा प्रयत्न होतोच इथे, नाही असं नाही... पण ट्रॅन्टॉरियन्सपेक्षा बाहेरच्या ग्रहांवरून आलेले लोकच ते अधिक करतात. मी स्वतःपण बाहेरचीच आहे बरं कां."

"ओः?" तो जरासा घुटमळला, पण मग विचारून घेणंच चांगलं दिसेल असं त्याने ठरवलं. "तू कुठून आलीस?"

"मी सिन्नाहून आलेय. ऐकलंयय कधी नाव?"

विनम्रता दाखवायला खोटं बोललं तर पकडले जाऊ म्हणून त्याने खरंखुरं उत्तर दिलं. "नाही."

"वाटलंच मला. हेलिकॉनपेक्षाही कमी महत्त्वाचा आहे आमचा ग्रह. ते सोड, गणित शिकवणारे कॉम्प्युटर्स प्रोग्रॅम करण्याबद्दल बोलत होतो आपण. मला वाटतं हे चांगल्याप्रकारे करण्याचा किंवा सुमार पध्दतीने करण्याचाच फक्त फरक आहे."

"अगदी."

"आणि तू ते नीट करशीलच."

"असं वाटतं खरं."

"झालं तर मग. विद्यापीठ तुला त्यासाठी पगार देईल. चल तर मग, आता बाहेर जाऊ या आणि काहीतरी खाऊन घेऊ या. बरं, पण तुझी झोप नीट झाली होती कां?"

"चांगला झोपलो, मलाच आश्चर्य वाटलं इतका गाढ."

"आणि आता भूक लागलीय की नाही?"

"हो, पण-" तो अडखळला.

ती हसून म्हणाली, "हं- पण तुला इथलं खाणं कसं असेल याचीच काळजी वाटते आहे, हो ना? वेल, काळजी नको करूस. मी सुध्दा बाहेरचीच आहे, मलाही त्यांच्या त्या तीव्र वासाच्या अन्नाची भीतीच वाटायची. पण विद्यापीठातलं अन्न तसं वाईट नसतं. निदान शिक्षकांच्या डायनिंग हॉल्समधेतरी नक्कीच. विद्यार्थ्यांना थोडा त्रास होत असावा. पण ठीक आहे, त्यामुळे ते जरा टणके होतात."

ती उठून दाराकडे वळली. तेवढ्यात सेल्डनने विचारलं, "तू पण शिक्षकांपैकी आहेस का?"

ती वळली आणि त्याच्याकडे बघून खट्याळपणे हसली. "मी तेवढी प्रौढ वाटत नाही कां? मला माझी डॉक्टरेट दोन वर्षांपूर्वीच मिळालीय. सिन्नामधे. आणि तेव्हापासून मी इथेच आहे. अजून दोन आठवड्यांत मी तीस वर्षांची होईन."

"सॉरी," सेल्डन हसत म्हणाला, "पण चोवीस वर्षांइतकं दिसायचं, आणि मग आपल्या अकेडेमिक स्टेटससंबधी संशय येणार नाही अशी अपेक्षा करायची- जमण्यासारखं नाही."

"किती चांगला आहेस तू!" डॉर्स म्हणाली, आणि सेल्डनला आतून खूप सुखावल्यासारखं वाटलं. अखेर एका आकर्षक तरुणीबरोबर गप्पा मारताना अगदीच कोरडा कसा राहील माणूस...

१८-

डॉर्सचं बरोबरच होतं. नाश्ता अजिबात वाईट नव्हता. अंड्याच्या वासाचं काहीतरी होतं, आणि मांसही छानपैकी धुरकट वासाचं होतं. चॉकोलेटचं पेय-

ट्रॅन्टॉरवर चॉकोलेट चांगलंच लोकप्रिय होतं हे सेल्डनला छानच वाटलं- बहुतेक कृत्रिम असावं, पण तरीही चवदार होतं. आणि पावाचे रोल्सही चांगले छानदार होते.

तो एवढंच म्हणाला, "खूप छान नाश्ता होता हा. पदार्थ, परिसर आणि- सगळंच."

"बरं वाटलं तुला आवडलं म्हणून," डॉर्स म्हणाली.

सेल्डनने इकडेतिकडे पाहिलं. एका भिंतीवर खिडक्यांची रांग होती आणि खरोखरचा सूर्यप्रकाश जरी त्यातून आत येत नव्हता तरीही चांगला उजेड होता तिथे. खरं तर चांगला लख्ख उजेड होता तिथे. कारण स्थानिक हवामान कॉम्प्युटरने त्यादिवशी आजचा दिवस स्वच्छ लख्ख असणार हे ठरवून टाकलेलं. त्याच्या मनात आलं, कधीतरी आपल्याला या मवाळलेल्या उजेडाची सवय होईल का... कधी आपण जमिनीवरचे उन्हाचे तुकडे, कवडसे शोधायचे थांबू?

तिथली टेबल्स चौघाचौघांची होती आणि बऱ्याच जागा भरलेल्या होत्या. पण डॉर्स आणि सेल्डन त्यांच्या टेबलवर दोघेच बसून राहिले. डॉर्सने आसपासच्या इतर काही स्त्रीपुरुषांना हाका मारून जवळ बोलावून घेतलं आणि सेल्डनशी ओळख करून दिली. सगळेजण अगदी विनम्रपणे बोलले, पण कुणीही तिथं बसायला थांबलं नाही. डॉर्सचा हेतू तोच असणार, पण ते तिने साध्य कसं केलं ते सेल्डनला कळलं नाही.

तो म्हणाला, "तू माझी ओळख एकाही गणितज्ञाशी मात्र नाही करून दिलीस, डॉर्स."

"मला कुणी ओळखीचा भेटलाच नाही तर. बरेचसे गणिती फार लवकर दिवसाची सुरुवात करतात, आणि त्यांचे वर्गच आठ वाजता सुरू होतात. मला

वाटतं, गणित घेण्याची चूक करणारा कुठलाही विद्यार्थी अभ्यासक्रमाचा तो भाग लवकरात लवकर उरकून टाकण्याच्या मागे असणार.”

“तू गणितातली नाहीस हे ओघानेच आलं.”

“तेवढं सोडून काहीही-” ती हसत म्हणाली, “काहीही दुसरं. मी इतिहासात काम करते. मी ट्रॅन्टॉरच्या उदयावर काही अभ्यास करून प्रसिध्द केलाय. म्हणजे अगदी प्राचीन राज्याबद्दलचं काम आहे ते. आधुनिक ट्रॅन्टॉरवरचं नाही. मला वाटतं, तेच माझं कायमचं कार्यक्षेत्र असेल. ट्रॅन्टॉरचे राजघराणे.”

“मस्तच,” सेल्डन म्हणाला.

“मस्त?” डॉर्स त्याच्याकडे नवलाने पाहू लागली, “तुलाही ट्रॅन्टॉरच्या राजघराण्यांत रस आहे की काय?”

“एका अर्थी. ते किंवा तत्सम इतर गोष्टी. मी कधीच इतिहासाचा अभ्यास केलेला नाही. करायला हवा होता.”

“असं वाटतं तुला? तू इतिहासाचा अभ्यास केला असतास तर मग गणित शिकायला कधी वेळ काढला असतास- गणितज्ञांची फार गरज पडते बाबा, निदान या विद्यापीठात तरी नक्कीच. इथे ढिगाने इतिहासतज्ञ पडलेत,” ती म्हणाली, “अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्राचेही तज्ञ भरपूर आहेत. पण विज्ञान आणि गणिताचे तज्ञ फार कमी. चेटर ह्युमिननेच हे माझ्या लक्षात आणून दिलेलं. तो त्याला विज्ञानाची अधोगती म्हणालेला. आणि हे सर्वत्रच दिसून येतंय असंही म्हणालेला तो.”

सेल्डन म्हणाला, “अर्थातच, मी इतिहासाचा अभ्यास करायला हवा होता असं म्हणतो म्हणजे माझं सारं आयुष्य त्याला वाहून घ्यायचं होतं, असं मला नाही म्हणायचं. मला एवढंच म्हणायचंय की मी थोडं लक्ष द्यायला हवं होतं... गणिताला

मदत व्हावी म्हणून. एवढ्यासाठीच. सामाजिक रचनेचे गणिती विश्लेषण हा माझ्या अभ्यासाचा मुख्य विषय आहे.”

“हे काहीतरी भयंकरच वाटतंय.”

“एका अर्थाने भयंकरच आहे. फार गुंतागुंतीचं आहे आणि समाजांची उत्क्रांती कशी झाली ते नीट माहीत झाल्याशिवाय त्याला यश येण्याची काही आशाच नाही. सगळं चित्र एकदम थांबूनच गेलेलं आहे ना?”

“मी काय सांगू, कारण मला तर काहीच माहीत नाहीये. चेटरने मला सांगितलं की तू सायकोहिस्ट्री- मानसेतिहास- नावाचं काहीतरी विकसित करू पाहातो आहेस. आणि ते महत्त्वाचं आहे. बरोबर ना? सायकोहिस्ट्री?”

“बरोबर. मी त्याला सायकोसोसियोलजी म्हणायला हवं होतं. पण तो शब्द मला एकदमच बेकार अगडबंब वाटला. किंवा कदाचित् मला अंतःप्रेरणेने वाटलं असेल की इतिहासाचं ज्ञान यात आवश्यक असेल म्हणून... मग फार जास्त विचार करत राहिलो नाही त्यावर.”

“सायकोहिस्ट्री नक्कीच जास्त बरं वाटतं ऐकायला. पण म्हणजे काय ते नाही कळलेलं मला.”

“मलातरी कुठे नक्की कळलंय...” तो थोडावेळ विचार करीत तिच्याकडे पाहात राहिला. या स्त्रीमुळे कदाचित् आपला अज्ञातवास थोडा सुसह्य होईल असं त्याच्या मनात आलं. काही वर्षांपूर्वी त्याच्या जीवनात आलेल्या त्या स्त्रीचाही विचार मधेच त्याच्या मनात डोकावून गेला. पण प्रयत्नपूर्वक त्याने तो दूर सारला. आता दुसरी कुणीही साथीदार निवडायची तर तिला विद्वत्ता म्हणजे काय, आणि तशी असलेल्या माणसाला कायकाय करावं लागतं याची चांगली समज असायलाच पाहिजे होती.

त्याने मन पुन्हा एकदा वळवून नव्या विषयावर आणलं, “चेटर ह्युमिनने मला सांगितलं की या विद्यापीठाला शासनाकडून कसलाही त्रास होऊ शकत नाही.”

“अगदी बरोबर सांगितलं त्याने.”

सेल्डनने मान हलवली, “साम्राज्याचं शासन फारच सहनशील आहे म्हणायचं. हेलिकॉनवरच्या शैक्षणिक संस्था शासकीय दबावापासून कधीच मुक्त नसतात.”

“सिन्नामधेही ती परिस्थिती आहे. बाहेरच्या कुठल्याच जगात नसेल. कदाचित् एक दोन मोठे ग्रह अपवाद असतीलही. पण ट्रॅन्टॉरची गोष्टच निराळी.”

“हो, पण कसं काय हे?”

“कारण ते या साम्राज्याच्या केंद्रस्थानी आहे. इथल्या विद्यापीठांची प्रतिष्ठा प्रचंड आहे. इतर कुठल्याही विद्यापीठांतून व्यावसायिक शिकून बाहेर पडतात. पण साम्राज्याचे प्रशासक म्हणून काम करणारे उच्चाधिकारी, साम्राज्याच्या भुजा म्हणून काम करणारे असंख्य लोक, दीर्घिकेच्या कानाकोपऱ्यात पोहोचणारे हस्तक या इथे ट्रॅन्टॉरवरच शिक्षण घेतात.”

“मी कधी हे स्टॅटिस्टिक्स पाहिलेलं नाही.” सेल्डन म्हणाला.

“मी सांगतेय त्यावर विश्वास ठेव. साम्राज्याच्या अधिकाऱ्यांची काहीतरी एक सामायिक अशी पार्श्वभूमी असणं महत्त्वाचं आहे. काहीतरी खास अशी साम्राज्याबद्दल ममत्वाची भावना त्यांच्यात असावी लागते. आणि तसं असायचं तर सगळे ट्रॅन्टॉरियन्स शासनात घेणंही योग्य रहाणार नाही. बाहेरच्या जगातले लोकही असावेच लागतील. म्हणजे ट्रॅन्टॉरला बाहेरच्या जगातल्या लाखो लोकांना शिक्षणासाठी इथे बोलावून घेणं क्रमप्राप्त आहे. ते कुठून आलेत, त्यांचे उच्चार कसे आहेत, त्यांची संस्कृती कशा प्रकारची आहे वगैरेने काहीच फरक पडत नाही. त्यांनी

ट्रॅन्टॉरचा रंग उचलला पाहिजे, ट्रॅन्टॉरच्या शैक्षणिक वातावरणाबद्दल त्यांना अभिमान वाटला पाहिजे. साम्राज्याला एकत्र धरून ठेवणारी तीच एक गोष्ट आहे. आपल्याच ग्रहांवरचे, जन्माने आणि संस्कारांनी आपलेच असे लोक शासकीय अधिकारी म्हणून येतात तेव्हा बाहेरच्या ग्रहावरच्यां लोकांनाही जरा कमी अस्वस्थ वाटत असेल."

सेल्डनला एकदम अवघडल्यासारखं वाटलं. या गोष्टीचा त्याने कधी विचारच केला नव्हता. फक्त गणित आणि गणितच येणारा कुणीही मनुष्य थोर गणिती म्हणवला जाऊ शकतो का- त्याला प्रश्न पडला.

"ही गोष्ट सर्वांना माहीत असते कां?" त्याने विचारलं.

"नसेल माहीत अनेकांना." डॉर्स थोडी विचारात पडून म्हणाली, "जगात इतकी माहिती, इतकं ज्ञान आहे की त्या त्या विषयातले तज्ज्ञ आपली विशेषतज्ञता एखाद्या ढालीसारखी वापरतात. आपल्या विषयाशिवाय बाकी काही आपल्याला माहीत असण्याची गरज नाही हे सोयीचं असतं. ज्ञानाच्या पुरात बुडून जायला नको तर हे टाळावंच लागतं."

"पण तरीही तुला मात्र हे माहीत होतं."

"कारण, माझा अभ्यासाचा विषय आहे तो. मी इतिहासतज्ञ आहे- ट्रॅन्टॉरची राजेशाही आणि त्यांचं प्रशासकीय कौशल्य यामुळेच तर ट्रॅन्टॉरचा प्रभाव विस्तारत गेला. आणि ट्रॅन्टॉरच्या राजेशाहीची उत्क्रांती साम्राज्यशाहीपर्यंत झाली."

सेल्डन स्वतःशी पुटपुटल्यासारखा म्हणाला, "विशेषतज्ञ म्हणून एकारलेला अभ्यास करीत रहाणं हे तसं हानीकारकच आहे. ज्ञानाचे किती शतखंड होतात... आणि रक्तस्राव होत रहातो मग त्यातून."

डॉर्सने खांदे उडवले, “काय करणार?- पण हे बघ, ट्रॅन्टॉर बाहेरच्या जगातून लोकांना इथल्या विद्यापीठांत आकर्षित करीत असेल, तर आपलं जग सोडून येण्याच्या बदल्यात ट्रॅन्टॉरला त्यांना काहीतरी देऊ करावं लागेलच ना? एका कृत्रिम जगात, खूप वेगळ्या जगात येऊन स्थिरावणं काही सोपं नसतं. मला इथे येऊन दोन वर्षं झाली, आणि तरीही मला नीटसं अंगवळणी नाही पडलं सारं. मला कदाचित् कधीच सवय होणार नाही इथली. पण अर्थात, मला काही प्रशासकीय अधिकारी होण्यात रस नाही, त्यामुळे ट्रॅन्टॉरियन होणं मला अत्यावश्यक नाही.

“आणि या सर्वांच्या बदल्यात ट्रॅन्टॉर फक्त उच्च पद, प्रतिष्ठा, सत्ता, आणि पैसाच देऊ करतंय असं नाही. इथे स्वातंत्र्यही आहे. विद्यार्थी शिक्षण घेत असताना, शासनाचा धिक्कारही करू शकतात, त्यांच्याविरुध्द निदर्शनेही करू शकतात. आपापली मतं, तत्वप्रणाली घडवू शकतात. मजा वाटते त्यांना... कित्येक लोक तर केवळ स्वातंत्र्याची चव चाखायला म्हणूनच इथे येतात.”

“पटण्यासारखंय,” सेल्डन म्हणाला, “थोडा मनावरचा ताणही दूर होत असेल त्यामुळे. एखाद्या तरूण क्रांतीकारकाला जे समाधान अनुभवायला मिळेल, ते ही मिळवलं जात असेल, मनातला तापसंताप दूर होत असेल आणि मग साम्राज्याच्या अधिकारशाहीच्या उतरंडीत आपापली जागा घेताना स्वस्थपणे आज्ञाधारक होऊन, चाकोरीबध्द आयुष्यासाठी सज्ज होत असतील.”

डॉर्सने मानेनेच होकार भरला. “तुझं बरोबर आहे. आणि ते काहीही असलं तरीही, शासन या एवढ्या एका कारणासाठी विद्यापीठांचं स्वातंत्र्य अगदी अलगद अबाधित ठेवतं. यात कुठेही ते फार सहिष्णू आहेत वगैरे असं मनातही आणू नकोस. ते फक्त खूप बिलंदर आहेत.”

“आणि मला सांग, तुला प्रशासकीय सेवेत जायचं नसेल तर मग तू काय होणार आहेस पुढे?”

“इतिहासकार. मी शिकवणार, माझ्या स्वतःच्या बुकफिल्म्स करून प्रोग्रॅमिंगमधे टाकणार.”

“त्यात फार काही उच्चप्रतिष्ठा नसावी मला वाटतं.”

“फारसा पैसा नाही म्हण, हॅरी- तो जास्त महत्त्वाचा असतो. प्रतिष्ठेचं म्हणशील तर त्यातल्या खेचाखेचीत मला जराही रस नाही. दूरच रहाणं पत्करीन मी. खूप पाहिलेत, लब्धप्रतिष्ठित. पण त्यातला एकही आनंदी असा सापडेल तर शपथ. ती प्रतिष्ठा तुमच्या बुडाखाली स्वस्थ बसून रहात नाही. तिला स्थिर तरंगत ठेवण्यासाठी तुम्हाला सतत झगडावं लागतं. नाहीतर गेलीच ती तळाला. बरेचदा राजे नि सम्राटही अखेर वाईट अंताकडेच जातात. कधीतरी मी पुन्हा सिन्नाला जाईन आणि तिथे प्राध्यापक म्हणून काम करीन.”

“आणि ट्रॅन्टॉरियन शिक्षणामुळे तुला तिथे प्रतिष्ठा मिळेल.”

डॉर्स हसली. “मिळेलही, पण सिन्नावर त्याची फारशी पर्वा कुणाला असणार? फार संथ जग आहे आमचं. शेतं आहेत, गुरंढोरं आहेत… चार पायांची आणि दोन पायांचीही.”

“ट्रॅन्टॉरचा अनुभव घेतल्यानंतर तुला तिथे कंटाळवाणं नाही वाटणार?”

“नक्कीच. तेच तर करून पाहायचंय. आणि अतीच कंटाळा आला तर कुठूनतरी ग्रांट्स वगैरे मिळवीन इतिहासाचा अभ्यास करायला आणि फिरेन इकडेतिकडे. माझ्या विषयात तो मोठा फायदा आहे.”

“आणि गणितातला माणूस म्हणजे-” त्याच्या स्वरात थोडासा कडवट भाव होता… यापूर्वी त्याला ही कमतरता कधी जाणवली नव्हती. “कॉम्प्युटरसमोर बसून

विचार करत रहाणार. आणि- हो कॉम्प्युटरचा विषय निघाला ते बरं झालं-" तो थोडासा चाचरला. नाश्ता झाला होता आणि त्याला वाटलं आता तिला तिच्या कामाला जायचं असेल की काय.

पण तिला निघायची घाई आहे असं वाटत नव्हतं. "हं? बोल ना, कॉम्प्युटरचं काय?"

"मला इतिहास विभागाच्या लायब्ररीत बसण्याची परवानगी मिळेल कां?"

आता ती थोडीशी घुटमळली. "मला वाटतं... मिळेल. तू गणिताच्या प्रोग्रॅमिंगवर काम करणार असशील तर तुला शिक्षकांपैकीच एक असं समजतील आणि मी तुला तशी परवानगी मिळावी असं लिहीनही. पण एवढंच-"

"एवढंच काय?"

"मला तुला दुखावायचं नाहीये. पण तू तर गणिती आहेस, आणि तुला इतिहासाची तशी काहीच माहिती नाहीये म्हणालास. इतिहासाच्या लायब्ररीचा वापर करायचं तुला कळेल?"

सेल्डन हसला. "कां... मला वाटतं गणिताच्या लायब्ररीचा जसा वापर करतात तसाच इतिहासाच्या लायब्ररीचा करत असावेत."

"हो, पण प्रत्येक विषयात कॉम्प्युटर्सचा वापर करतानाची वैशिष्ट्यं वेगवेगळी असतात. तुला सर्वसाधारण संदर्भाच्या बुकफिल्म्स कोणत्या ते माहीत नाहीये. त्यातूनच बरेचसे पुढले संदर्भ आणि माग सापडत जातात. काय टाळायचं, काय घ्यायचं ते माहीत असायला लागतं. तुला कदाचित् तुमचा हायपरबॉलिक इंटरवल अंधारातही सापडेल-"

"तुला हायपरबॉलिक इंटेग्रल म्हणायचंय," सेल्डनने हलकेच अडवलं.

डॉर्सने त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. "पण पोल्डार्कच्या तहाची कलमे शोधायची तर तुला दीड दिवस तरी लागेल... कळणारच नाही कुठे शोधायचं ते."

"शिकून घेता येईल ना."

"जर... म्हणजे पहा..." ती थोडीशी काळजीत पडल्यासारखी बोलत होती, "तुला पटत असेल तर मी एक सुचवू शकते. मी एक कोर्स चालवते- आठवडाभर- रोज एक तास. क्रेडिट्स नाहीत. लायब्ररीचा वापर कसा करायचा हेच त्यात शिकवते मी. तो कोर्स अंडरग्रॅज्युएट्ससाठी असतो. अशा कोर्सला बसायला आपल्याला शोभणार नाही वगैरे वाटेल का तुला? बघ आणि ठरव. तीन आठवड्यांतच सुरू होतेय पुढली तुकडी."

"तू मला खाजगीत शिकवू शकणार नाहीस कां..." आपल्या स्वरात मिसळलेला सूचक भाव ऐकून सेल्डनलाच आश्चर्य वाटलं.

तिच्याही ते लक्षात आलं. "घेऊ शकेन ना, पण मला वाटतं, जरा औपचारिक पध्दतीने शिकलास तर तुला फायदाच होईल. आम्ही लायब्ररीचा वापर करीतच शिकवतो, माहीत आहे ? आणि एका आठवड्यात तुला काही विशिष्ट माहिती लायब्ररीतून शोधून काढायचं काम दिलं जाईल. इतर विद्यार्थ्यांबरोबर थोडी स्पर्धा राहिली तर तू पटापट शिकशील. खाजगीत शिकवण्याचे तितकेसे फायदे नाहीत असं मला वाटतं. पण तुला आपल्यापेक्षा फार लहान वयाच्या मुलांबरोबर बसायला अडचण वाटेल हे मी समजू शकते. त्यांच्याइतकी प्रगती केली नाहीस तर तुला लाजल्यासारखं होईलही. पण एकच लक्षात ठेव, की त्यांनी इतिहासाच्या प्राथमिक अभ्यासाचं वर्ष पुरं केलं आहे... जे तुझं झालेलं नसेल."

“झालेलं नाहीच. नसेल कशाने- नाहीच. पण त्यांच्याशी स्पर्धा करायची मला भीती नाही वाटत. आणि लाजबिज वाटण्याचंही मी मनावर घेणार नाही... इतिहासाचे संदर्भ शोधण्याचं तंत्र शिकता आलं तर एवढं चालेल.”

सेल्डनला स्वतःलाच स्पष्ट उमगत चाललं होतं- ही तरूण स्त्री त्याला आवडली होती आणि तिच्याकडून काहीतरी शिकण्याची संधी तो सोडणार नव्हता. त्याला हेही कळत होतं की आता तो मनातच एका वळणापाशी उभा होता.

व्यवहार्य सायकोहिस्ट्रीवर काम करायचा आपण प्रयत्न करू असं वचन त्याने ह्युमिनला दिलं होतं... पण ते एक कोरडं वचन होतं. त्यात भावनेचा मागमूस नव्हता. आता सायकोहिस्ट्री व्यवहार्य करता यावी म्हणून तो त्या विषयाचं नरडं पकडायलाही तयार होता... हा परिणाम बहुधा डॉर्स वेनाबिलिच्या सहवासाचाच असावा.

की ह्युमिनने याचाही विचार करून ठेवलेला? सेल्डनने मनाशी खूणगाठ बांधली- हा ह्युमिन नावाचा इसम चांगलाच पोहोचलेला असावा.

## १९.

पहिल्या क्लॉनचं रात्रीचं भोजन उरकलं होतं, दुर्दैवाने एक औपचारिक समारंभ होता तो. म्हणजेच तो अजिबात ओळखत नसलेल्या कुणाकुणा अधिकाऱ्यांसोबत त्याला वेळ घालवावा लागला होता. प्रत्येकासोबत ठरीव, मोजकंच पण तरीही त्यात्या माणसाच्या कायम लक्षात राहतील अशी वाक्ये बोलून, त्याची निष्ठा कायम राजमुकुटाशी समर्पित रहाण्याची तजवीज करायची होती. म्हणजेच त्याच्यासमोरचं अन्न जे अगोदरच जेमतेम गरम होतं... ते खाईपर्यंत अगदीच थंडगार झालेलं होतं.

हे टाळण्यासाठी काहीतरी मार्ग असलाच पाहिजे. कदाचित त्याच्या एकदोन निकटवर्तीयांसोबत जरा आरामात जेवून मग असली जेवणं करता आली असती... मग एखादं बाहेरच्या जगातून आणवलेलं पेअर वगैरेसारखं फळ त्या जेवणात खाल्लं की झालं. त्याला पेअर्स फार आवडत. पण मग निमंत्रित पाहुण्यांच्या सोबत नीट न जेवणं म्हणजे सम्राटाने जाणूनबुजून अपमान केला असाही त्यांचा ग्रह होऊ शकत होता.

त्याची पत्नी या बाबतीत मदत करायला निरुपयोगी होती... ती तिथे असण्यानेच त्याच्या वैतागात भर पडली असती. त्याने तिच्याशी लग्न केलेलं कारण ती राजघराण्याशी सतत वाद उकरत राहिलेल्या घराण्यातली कन्या होती. तिच्याशी लग्न करून नातं जोडल्यामुळे त्यांचे संबंध सुधारतील अशी एक शक्यता होती. पण तिच्याशी असलेले संबंध मात्र कधीही सुधारू नयेत अशी क्लिऑनची मनोमन इच्छा होती. घराण्याचा वारस जन्माला घालण्यापुरते आवश्यक संबंध ठेवणे सोडले तर तिचं तिने स्वतःच्या अवकाशात जगावं हेच बरं होतं. कारण ती त्याला अजिबात आवडत नसे. आणि आता एकदा घराण्याचा वारस जन्माला आल्यानंतर तिच्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करणं शक्य झालं होतं.

टेबलवरून उठताउठता त्याने मूठभर बदामगर खिशात घातले होते, ते तोंडात टाकत त्याने हाक मारली, “डेमेर्झेल!”

“सम्राट?”

डेमेर्झेल नेहमीच क्लिऑनच्या हाकेसरसा ताबडतोब उपस्थित होत असे. तो सतत दरवाजाजवळ, हाकेच्या अंतरात घिरट्या घालत असायचा की काय कोण जाणे... की आज्ञा झेलायची सवय इतकी अंगवळणी पडली होती की सम्राट आता काही वेळात आपल्याला बोलावेल हे त्याला अंतःप्रेरणेने कळायचं कोण जाणे...

पण तो यायचा खरा, आणि ते सर्वात महत्त्वाचं, क्लिऑनने विचार करून टाकला. अर्थात काही वेळा डेमेर्झेल साम्राज्याच्याच कामासाठी दूर गेलेला असायचा. क्लिऑनला अशा वेळी फार नकोसं वाटे. तो फार अस्वस्थ होत असे.

"त्या गणितज्ञाचं काय झालं? नाव विसरलो मी त्याचं."

डेमेर्झेलला चांगलं कळलं की सम्राटाच्या मनात कुणाबद्दल विचारायचं आहे. पण सम्राटाला किती आठवतंय ते कदाचित् त्याला जोखायचं असावं. त्याने विचारलं, "कोणत्या गणितज्ञाबद्दल विचारताय, सम्राट?"

क्लिऑनने थोड्या अधीरेपणी हात उडवला, "तो भविष्यवाला. तोच- मला भेटायला आलेला तो."

"आपण त्याला बोलावून घेतलेलं तो?"

"बरंबरं- आपण बोलावून घेतलेला. तो आलेला मला भेटायला. तू पुढची सगळी काळजी घेणार म्हणालेलास मला वाटतं. घेतलीस का?"

डेमेर्झेलने घसा खाकरत उत्तर दिलं, "सम्राट, प्रयत्न केला मी."

"आः! म्हणजे तुला अपयश आलं असंच ना?" एका दृष्टीने क्लिऑनला आनंदच झाला. डेमेर्झेल हा त्याचा एकमेव मंत्री असा होता की जो स्वतःचं अपयश लपवूनछपवून ठेवत नसे. बाकीचे कुणीही आपलं अपयश मान्यच करीत नसत. आणि अपयश तर येतच असे अनेकदा- मग तो घोळ निस्तरणंही कठीण होऊन बसायचं. डेमेर्झेलला अपयश मान्य करणं सहज शक्य होत असावं कारण तो क्वचितच कधीतरी अपयशाचा धनी होत असे. क्लिऑनच्या मनात आलं, की डेमेर्झेल नसता तर प्रामाणिकपणा कसा असतो ते आपल्याला कधीच कळू शकलं नसतं. कदाचित् कुठल्याच सम्राटाला हा फायदा मिळाला नसावा... आणि कदाचित् हेच कारण असावं की हे साम्राज्य...

त्याने स्वतःच स्वतःच्या विचारातून मन काढून घेतलं आणि मग त्याला तो गप्प उभा आहे याची काळजी वाटू लागली. आता मनातल्या मनात डेमेर्झेलच्या प्रामाणिकपणाचं कौतुक करून झालं होतं त्यामुळे पुढे जायला हरकत नव्हती- त्याने जोरातच विचारलं, "तू अपेशी ठरलास, होय ना?"

डेमेर्झेल अजिबात गांगरला नाही. "सम्राट, काही अंशी अपयश आलंय. मला वाटलं होतं, की ट्रॅन्टॉरवर त्याला राहू देणं म्हणजे आपल्या समस्यांत भर टाकण्यासारखं ठरेल. तो त्याच्या स्वग्रही रहाणं सोयीचं ठरेल असं मला वाटलं होतं. त्याचा दुसऱ्या दिवशीच परतायचा कार्यक्रम होता, पण काहीतरी विपरीत घडून त्यात बदल होऊ नये म्हणून मी दोन तरूण मवाल्यांना त्याला त्याच दिवशी विमानात बसवायची व्यवस्था करायला सांगितलं."

"तुझ्या संपर्कात मवालीही असतात का, डेमेर्झेल?" क्लिऑनला गंमत वाटली.

"तेही महत्त्वाचंच असतं, सम्राट... खूप प्रकारच्या लोकांशी संपर्क असावा लागतो. प्रत्येकाचा काही ना काही उपयोग असतो. मवाल्यांचा तर नक्कीच. पण ते जाऊ दे- त्या मवाल्यांना यश नाही आलं खरं."

"जरा विचित्रच वाटेल, सेल्डनने त्यांच्याशी दोन हात केले."

"त्या गणितज्ञाला मारामारी करता आली?"

"होय, गणित येणाराला मार्शल आर्टस् येऊ नयेत असा काही नियम नाही. नंतर मला कळलं, की त्याच्या ग्रहावर- म्हणजे हेलिकॉनवर गणितापेक्षा मार्शल आर्टस् अधिक लोकप्रिय आहेत. हे मला आधी माहीत झालं नाही, हेच माझं अपयश होतं, सम्राट आणि त्यासाठी मी आपली क्षमा मागतो."

“पण मग, तो आपल्या ठरलेल्या कार्यक्रमानुसार दुसऱ्या दिवशीतरी घरी गेलाच असेल ना!”

“दुर्दैवाने या घटनेचा उलटा परिणाम झाला. तो दचकला असावा. त्याने स्वग्रही न परतण्याचा निर्णय घेतला. तो ट्रॅन्टॉरवरच राहिला. त्यावेळी तिथून जात असलेल्या कुणी आगंतुकाने त्याला त्या दृष्टीने काही सल्ला दिला असावा असं दिसतंय. ही आणखी एक गुंतागुंत झाली.”

सम्राटाच्या कपाळावर आठ्या पडल्या, “म्हणजे मग आपला हा गणिती- काय बरं त्याचं नाव?”

“सेल्डन- सम्राट, हॅरी सेल्डन.”

“मग हा सेल्डन आता आपल्या कह्यात नाही राहिला.”

“एका दृष्टीने होय, सम्राट. पण त्याचा माग आम्ही काढला आणि आत्ता तो स्ट्रीलिंग विद्यापीठात आहे असं कळलंय. तिथे असेपर्यंत त्याला हात लावता येणार नाही.”

सम्राटाची मुद्रा थोडी तापली आणि तो थोडासा लाल झाला, “हात लावता येणार नाही- हे मला अजिबात पसंत नाही. माझ्या साम्राज्यात कुठलीही अशी जागा नाही की जिथे माझे हात पोहोचणार नाहीत... आणि इथे- माझ्या स्वतःच्या जगात तू मला सांगतोस की अमक्या ठिकाणी कुणाला हात लावता येणार नाही. असह्य वाटतं हे मला!”

“तुमचे हात विद्यापीठापर्यंत अवश्य पोहोचू शकतात, सम्राट. हवं तेव्हा लष्कर पाठवून तुम्ही सेल्डनला कधीही ताब्यात घेऊ शकता. पण तसं करणं केवळ- अयोग्यच ठरेल ते.”

“ ‘अव्यवहार्य’ म्हण ना. तू आता अगदी त्या भविष्यवाल्या गणितज्ञासारखाच बोलतो आहेस. ते शक्य आहे पण अव्यवहार्य आहे... मी- एक सम्राट- ज्याला सारं काही शक्य आहे- पण फार थोडं व्यवहार्य. लक्षात ठेव, डेमेर्झेल, जर सेल्डनपर्यंत पोहोचणं व्यवहार्य नसेल, तरी तुझ्यापर्यंत पोहोचणं मात्र सहज शक्य आहे.”

एटो डेमेर्झेलने हे शेवटचं वाक्य तसंच विरून जाऊ दिलं. सिंहासनामागचा तो मनुष्य आपलं महत्त्व या सम्राटाला किती आहे हे जाणून होता... असल्या धमक्या त्याने यापूर्वीही ऐकल्या होत्या. सम्राट संतापून पाहात होता तोवर तो शांतपणे वाट पाहात राहिला. खुर्चीच्या हातावर बोटाने ताल धरत क्लिऑनने विचारलं... “बरं तर, हा गणिती जर स्ट्रीलिंग विद्यापीठातच रहाणार असेल तर आपल्याला काय उपयोग?”

“वाईटातून चांगलं निघणंही शक्य आहे, सम्राट. विद्यापीठामधे असताना तो कदाचित् सायकोहिस्ट्रीवर अधिक काम करायचा निर्णय घेईल.”

“ते अव्यवहार्य आहे असं वाटत असूनही?”

“त्याचं मत चुकीचं असेल- आणि आपण चुकतोय हे कदाचित् त्याला कळेलही. आणि तसं कळलं तर आपणही त्याला विद्यापीठाच्या बाहेर काढण्याचा काहीतरी मार्ग काढू. किंवा कदाचित् तो स्वतःहूनच आपल्याकडे चालत येईल.”

सम्राट थोडावेल विचारांत बुडून गेला. आणि मग म्हणाला, “आणि समज, आपल्या आधीच दुसऱ्याच कुणीतरी त्याला तिथून काढून नेलं तर?”

“तसं कोण करणार, सम्राट?” डेमेर्झेलने हलकेच विचारलं.

“वाय प्रांताचे महापौर करू शकतात, उदाहरणार्थ.” क्लिऑन अचानक ओरडू लागला, “तो अजूनही साम्राज्यावर कब्जा करण्याची स्वप्न पाहातोय.”

“म्हातारपणात त्याचे सुळे झिजले आता, सम्राट.”

“असं काहीही गृहीत धरू नकोस, डेमेर्झेल.”

“आणि त्याला सेल्डनमधे काही रस आहे किंवा त्याला त्याच्याबद्दल काही माहितीही आहे असं आमच्यापर्यंत तरी आलेलं नाही, सम्राट.”

“अहो, डेमेर्झेल महाशय, जर आपल्या कानावर त्याच्या शोधनिबंधाची बातमी आली तर वायच्याही कानावर जाणारच. आपल्याला सेल्डनचं महत्त्व कळलं तर वायलाही कळेलच.”

“तसं झालं तर,” डेमेर्झेल म्हणाला, “किंवा तसं होण्याची थोडी जरी शक्यता असेल तर, मग आपण कठोर पावलं उचलणं समर्थनीय ठरेल.”

“किती कठोर?”

डेमेर्झेल सावधपणे उत्तरला, “वायच्या हाती सेल्डन पडण्यापेक्षा तो कुणाच्याच हाती न पडणं चांगलं ठरेल असं आपण म्हणू शकतो. म्हणजे तो अस्तित्वातच रहायला नको.”

“म्हणजे त्याची हत्या घडवायची, म्हणतोस,” क्लिऑन म्हणाला.

“तुम्हाला तसं म्हणायचं असेल तर तसं, सम्राट.” डेमेर्झेल म्हणाला.

२०.

हॅरी सेल्डन त्याला दिलेल्या कोनाडेवजा जागेतल्या खुर्चीत विसावला होता. डॉर्स वेनाबिलीच्या शब्दामुळे त्याला ही जागा देण्यात आली होती.

त्याच्या मनात असामाधान दाटून आलेलं.

हे शब्द जरी त्याच्या मनात आले होते तरीही ते पुरेसे नव्हते. त्याच्या मनातल्या भावनेला त्याने तसे सौम्यच शब्द योजले होते. असमाधान नव्हे तर

संतापच झाला होता त्याचा. आणि तो संताप अधिकच वाढत होता, कारण त्याला आपल्या संतापाचं नेमकं कारण कळत नव्हतं. हा संताप इतिहासांबद्दल होता? लेखक आणि इतिहासकार यांच्याबद्दल होता? की ज्या लोकांमुळे आणि ज्या जगांमधून हे इतिहास घडत गेले त्यांच्याबद्दलचा संताप होता?

त्याच्या संतापाचं नेमकं लक्ष्य काय असावं त्याला समजत नव्हतं... पण तेही महत्त्वाचं नव्हतं. महत्त्वाचं होतं ते एवढंच की त्याची टिपणं निरुपयोगी होती, त्याचं नवीन कमावलेलं ज्ञान निरुपयोगी होतं... सगळंच निरुपयोगी होतं.

विद्यापीठात येऊन त्याला आता सहा आठवडे झाले होते. त्याला अगदी लगोलग कॉम्प्युटर मिळाला होता. आणि त्याचबरोबर त्याचं काम चाचपडत सुरू झालं होतं. गणितावरच्या कामाचा जो अनुभव होता त्याच पायावर त्याने स्वयंस्फूर्तीने काम सुरू केलं होतं. फार मंद गतीने, अडखळत चाललेलं काम होतं, पण तरीही त्यात त्याला स्वतःच्या प्रश्नांची स्वतः उत्तर मिळवण्यासाठी काही पध्दती ठरवता येत होत्या आणि त्यातून आनंदही मिळत होता.

मग डॉर्सच्या वर्गात बसण्याचा आठवडा सुरू झाला. त्यातून त्याला वीसपंचवीस शॉर्टकट्स मिळाले आणि थोडे अवघडल्यासारखं वाटणारे दोन अनुभव. एक म्हणजे सोबतच्या लहान विद्यार्थ्यांच्या तिरप्या, चोरट्या नजरा... त्याच्या वयाची चांगलीच जाणीव होती त्यांना. डॉर्स त्याला सन्मानपूर्वक डॉक्टर म्हणूनच हाक मारत असे त्यामुळे त्यांच्या कपाळावर थोड्या आठ्याही जमत.

“तू कुणीतरी मागासबुध्दीचा गतीमंद विद्यार्थी आहेस, आणि म्हणून जुनेच धडे पुन्हा गिरवतो आहेस असा त्यांचा ग्रह होऊ नये-” डॉर्स म्हणाली, “हे मला महत्त्वाचं वाटतं.”

“पण आता ते केलंस ना पुरेसं साध्य... आता मला फक्त सेल्डन म्हणून हाक मारायला हरकत नाही.”

“नाही,” डॉर्स अचानक खुदकन् हसली, “शिवाय मलाही तुला डॉ. सेल्डन म्हणायला आवडतं. तू दरवेळी कसा हडबडून जातोस ते पाहाणं मोठं गंमतीदार असतं.”

“ही तुझी विनोदबुध्दी म्हणायची की छळ. सॅडिस्टिक कुठली.”

“मग? मला मनाई करणार आहेस?”

का कोण जाणे त्याला यावर हसू फुटलं. खरंतर त्याने सॅडिझम आहे हे तिने मान्य करताच तिला थांबवायला हरकत नव्हती. पण ते तिने संभाषणात मान्य केलं, आणि टोला परतवलाही याची त्याला फार गंमत वाटली. या विचारातून पुढचा प्रश्न अगदी सहजच उद्भवला.

“तू इथे विद्यापीठात टेनिस खेळतेस की नाही?”

“इथे टेनिस कोर्ट आहे, पण मी नाही कधी खेळत.”

“फारच छान. मी शिकवतो तुला. आणि ते शिकवताना मी तुला प्रोफेसर वेनाबिली म्हणेन.”

“पण वर्गात तू मला तेच तर म्हणतोस.”

“टेनिस कोर्टवर तसं म्हणणं किती हास्यास्पद वाटेल ते बघशीलच तू.”

“कदाचित् मला तेच आवडू लागेल.”

“तसं असेल तर मग, तुला आणखी कायकाय आडतं तेही शोधायचा मी प्रयत्न करीन.”

“हं... बघतेय मी. तुझा विनोद जरा छंदीफंदीच व्हायला लागलाय.”

तिने जाणीवपूर्वक टोला असा परतवलेला आणि तो म्हणाला, “मग? मला मनाई करणार आहेस की काय?”

ती हसली. आणि मग नंतर टेनिस कोर्टवर पाहातो तर तिची कामगिरी फारच छान होती. “तू खरंच यापूर्वी कधीच टेनिस खेळली नव्हतीस?” एका डावानंतर त्याने धापा टाकत विचारलं.

“अगदी नक्की.” ती उत्तरली.

दुसरं अवघडलेपण जरा खाजगी स्वरुपाची होतं. त्याने इतिहास संशोधनाची आवश्यक तंत्र आत्मसात् केली. आणि मग आपले सुरुवातीचे चुकलेले प्रयत्न आठवून त्याला लाज वाटत राहिली. गणितावर काम करताना जी मनोभूमिका असते त्यापेक्षा संपूर्ण वेगळ्या बैठकीची गरज इतिहास संशोधनावर काम करताना लागते हे त्याला कळलं. आणि ती बैठकही तर्कशुध्दच होती- कारण त्यातून आखलेल्या पध्दतींचा वापर करून हव्या त्या दिशेने, न चुकता, सातत्याने हवे ते शोधून काडता येत होते. पण त्याला सवयीच्या तर्कशास्त्रापेक्षा हे फार वेगळं होतं खरं.

पण मार्गदर्शन नसताना आणि आता ते मिळाल्यानंतर- आधी अडखळत आणि आता भराभर जरी तो पुढे जात असला तरीही त्यातून निष्पन्न मात्र काहीच होत नव्हतं.

त्याचा वैताग प्रथम व्यक्त झाला तो टेनिस कोर्टवर. डॉर्सने इतकी भराभर प्रगती केली होती की शिकाऊ म्हणून तिच्याकडे सोपे चेंडू टाकण्याची गरज राहिली नव्हती. त्यामुळे ती नवशिकी आहे याकडे दुर्लक्ष करता येणं सोपं झालं होतं. त्याने स्वतःचा राग आपल्या रॅकेटच्या फटकाऱ्यातून व्यक्त करायला सुरुवात केली. तो चेंडू अशा वेगात परतवत होता की जणू लेझरचा सॉलिड किरणच आदळावा.

ती थांबली आणि चालत जाळीजवळ येऊन म्हणाली, "तू मला ठार मारू इच्छित असशील तर मी समजू शकते- मी कितीवेळा चेंडू चुकवलेत हे पाहून तू वैतागला असशीलच. पण माझ्या डोक्यापासून केवळ तीन सेंटीमीटर अंतरावरून चेंडू घालवण्याची किमया तू कशी साध्य केलीस? म्हणजे मला घासूनही नाही गेला चेंडू. त्यापेक्षा अधिक काही करू शकत नाहीस की काय?"

सेल्डन हादरलाच. त्याने स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या तोंडून कसेबसे काहीतरी निरर्थक शब्द बाहेर पडले.

ती म्हणाली, "हे बघ. मी काही आता तुझे चेंडू परतवण्याच्या मनस्थितीत नाहीये. चल शॉवर घेऊ आणि मग चहा घेऊ. मग तू मला सांग, की तू नेमकं काय ठार करण्याच्या प्रयत्नात होतास. तुझा हेतू माझंच मस्तक विच्छिन्न करण्याचा नसेल- आणि खरा शत्रू तुझ्या छाताडातच लपून बसलेला असेल, तर मग जाळीच्या पलिकडल्या बाजूला मी रहाणं आणि तुझ्या खऱ्या लक्ष्याचा पर्याय बनणं चांगलंच धोकेशीर ठरेल नाही कां!"

चहा घेताना तो म्हणाला, "डॉर्स, मी एकेक करून कितीतरी इतिहास नजरेखालून घातले. चाळले... पाहिले. अजून फार खोलवर अभ्यास करायला संधी मिळालेली नाही. तरीही, एक गोष्ट सहजच कळतेय. साऱ्या बुकफिल्म्स त्याच त्या घटनांभोवती गरगरत रहातात."

"पण महत्वाच्या घटनांभोवती. ऐतिहासिक महत्त्वाच्या."

"ही तर नुस्ती सबब झाली. त्या घटना केवळ एकमेकांची नक्कल असते. बाहेर पसरलेल्या दोनशेपन्नास लक्ष जगांतील जेमतेम पंचवीस जगांचे उल्लेख सापडतात यात."

डॉर्स म्हणाली, “तू केवळ दीर्घिकेचा सर्वसाधारण इतिहास वाचतो आहेस. जरा कमी महत्त्वाच्या जगांतील विशेष ऐतिहासिक घटना काढून वाच ना. प्रत्येक लहानसहान जगात- अगदी कितीही लहानसे असू दे- लहान मुलांना स्थानिक इतिहासाची माहिती दिली जाते. त्यांच्या जगाच्या बाहेर एवढं मोठं दीर्घिकेचं विश्व आहे असं कळण्याअगोदर त्यांना त्यांचा स्थानिक इतिहास माहीत झालेला असतो. तुला स्वतःला ट्रॅन्टॉरबद्दल किंवा आंतरतारकाविश्वयुध्दाची जेवढी माहिती आहे त्यापेक्षा हेलिकॉनबद्दल जास्त माहिती असेलच की नाही?”

“ती माहितीसुध्दा मर्यादितच आहे,” सेल्डन खिन्नपणे म्हणाला, “मला हेलिकॉनियन भूगोल माहिती आहे. वसाहतीच्या प्रारंभीच्या कथा मला माहीत आहेत. किंवा जेनिसेक ग्रहाच्या- आमचा परंपरागत शत्रू- चुका आणि घोडचुकांचा इतिहास माहीत आहे. आमचे शिक्षक अर्थातच ‘परंपरागत स्पर्धक’ असा शब्द वापरण्याचा आग्रह धरत. पण हेलिकॉनने दीर्घिकेच्या इतिहासात काय भर टाकली आहे वगैरेबद्दल मला कधीच काही समजलं नाही.”

“कदाचित् नसेल काही तसं.”

“वेडी आहेस का! अर्थात तसं होतं. हेलिकॉनवरून फार मोठी अवकाशयुध्दे खेळली गेली नसतील, किंवा बंडखोरी झाली नसेल किंवा शांततेचे तह झाले नसतील. कुणी राजमुकुटाच्या स्पर्धकाने हेलिकॉनची छावणी बनवून कारस्थाने केली नसतील. पण काही हलकासा प्रभाव टाकणारे मुद्दे जरूर असतील. इतर परिसरावर काहीही प्रभाव पडू शकणार नाही असं क्वचित्च काही घडत असेल. तरीही मला मदत होईल असं काहीही मला सापडलेलं नाही. हे बघ, डॉर्स, गणितामध्ये सारं काही कॉम्प्युटरवर सापडतं. आपल्याला माहीत असलेलं सारं, गेल्या वीस हजार वर्षांत हाती लागलेलं सारं ज्ञान तिथे सापडतं. पण इतिहासाच्या

बाबतीत तसं होत नाही. इतिहासकार आपापली निवड करतात. आणि बहुतेकजण जवळपास तेच निवडतात.”

“पण, हॅरी,” डॉर्स म्हणाली, “गणित हे एक शिस्तबध्द असं, मानवाने शोधलेलं तंत्र आहे. एकापाठोपाठ एक गोष्ट आपसूक येतेच. त्यात व्याख्या असतात, परम सिध्दान्त असतात, आपल्याला सारेच माहीत होऊ शकतात. ते सारं... ते सारं... एकसंध असतं. इतिहासाचं तसं नाही. अब्जावधी, परार्धावधी मनुष्यप्राण्यांच्या कृत्यांचा, विचारांचा अजाणता घडलेला एकत्रित परिणाम असतो तो. इतिहासकारांना नोंद करताना निवड करावीच लागते.”

“तेच तर,” सेल्डन म्हणाला, “पण सायकोहिस्ट्री नियमांत बांधायची तर मला संपूर्ण इतिहास समजून घेतलाच पाहिजे.”

“तसं असेल तर तुला कधीच सायकोहिस्ट्रीचे नियम बांधता येणार नाहीत.”

ही चर्चा काल झालेली. आता सेल्डन त्याच्या कोनाड्यातल्या खुर्चीत बसून होता. आणखी एक पूर्णपणे अपेशी दिवस सरला होता. डॉर्सचा आवाज त्याच्या कानात गुंजत होता, “तसं असेल तर तुला कधीच सायकोहिस्ट्रीचे नियम बांधता येणार नाहीत.”

त्याला सुरुवातीपासून हेच तर वाटत होतं आणि त्या उलट ह्युमिनचा अढळ विश्वास नसता आणि स्वतःच्या विश्वासाच्या जोरावर सेल्डनलाही पेटवून उठवायची त्याची ती अजब क्षमता नसती तर सेल्डनही हाच विचार करत राहिला असता.

पण तो हा विचार आता मात्र पूर्णपणे सोडून देऊ शकत नव्हता. काहीतरी मार्ग नसेल?

आत्तातरी त्याला काहीही सुचत नव्हतं.

# अपरसाईड

ट्रॅन्टॉर- ... अवकाशातून हे जग कसे दिसते याची प्रतिमा सहसा कुणीही चित्रित करीत नाही. सर्वसाधारणपणे मानवजातीच्या मनात हे जग म्हणजे अंतर्रचनेचंच जग होतं. अनेकानेक घुमटांखाली माणसांनी बुजबुजलेली पोळी... पण तरीही त्याला बाहेरूनही काही आकार होता. आणि अवकाशातून घेतलेले अजूनही टिकून असलेले होलोग्राफ्स होते... यात विविध अंशांतून तो ग्रहपृष्ठ कसे दिसते याचे चित्रण होते. घुमटांनी भरलेले हे ग्रहपृष्ठ या प्रचंड ग्रहशहराचे आच्छादन होते. त्याच्यावर खरे वातावरण होते... या ग्रहपृष्ठाला त्या काळात 'अपरसाईड' असे म्हणत आणि ते...

दीर्घिका ज्ञानकोष

२१.

तरीही दुसऱ्या दिवशी हॅरि सेल्डन पुन्हा एकदा लायब्ररीमधे आला. एक म्हणजे ह्युमिनला दिलेल्या वचनाला तो बांधील होता. प्रयत्न करायचं वचन दिलं होतं त्याने आणि मग प्रयत्नच करायचा तर तो कसाबसा करणं त्याला शक्य नव्हतं. स्वतःशीसुध्दा वचनबध्द असतोच की माणूस. अपयश मान्य करायला लागणं हे अगदी नकोसं वाटलं असतं त्याला. निदान काहीतरी दिशा पकडून तो सूत्रं गोळा करत राहील तोवर तसं करण्याची गरज नव्हती.

त्यामुळे आता पुन्हा तो संदर्भ शोधण्यासाठी बुकफिल्म्सच्या आतापर्यंत न धुंडाळलेल्या यादीकडे पाहात, यातला कुठला कंटाळवाणा धागा चावला म्हणजे काहीतरी रस सापडेल असा विचार करीत बसला. यातला प्रत्येक संदर्भ चाळून

यापैकी एकही नाही अशा पर्यायावर येऊन ठेपणारच होता तो, इतक्यात कोनाड्याच्या भिंतीवर झालेल्या टकटकीमुळे दचकला.

सेल्डनने वर पाहिलं आणि कोनाड्याच्या भिंतीच्या वरच्या कडेवर त्याला दिसला लिसुंग रॅन्डाचा थोडासा बावरलेला चेहरा. सेल्डन रॅन्डाला ओळखत होता, डॉर्सनेच ओळख करून दिली होती. त्याच्या आणि इतरही अनेकांच्या सोबत रात्रीची जेवणं घ्यायचा योग आला होता अनेकदा.

बुटकासा, जाडाजुडा, आनंदी, सदा हसतमुख चेहऱ्याचा रॅन्डा हा मानसशास्त्राचा शिक्षक होता. त्याचा वर्ण फिकुटलेला पिवळटसर होता आणि अनेक जगांमधून पाहायला मिळणारे बारीक केल्यासारखे मिचमिचे डोळे. सेल्डनला हे रूप परिचयाचे होते, कारण अनेक थोरथोर गणितज्ञ अशाच घडणीचे होते. त्याने त्यांचे होलोग्राम्स अनेकदा पाहिले होते. पण हेलिकॉनवर मात्र हे पौर्वात्य लोक क्वचितच पाहायला मिळत.( कारण कुणाला माहीत नव्हतं, पण त्यांना परंपरेनेच हे नाव पडलं होतं. या पौर्वात्यांना या आपल्या नावाबद्दल थोडासा राग असे, पण त्याचंही कारण कुणालाच माहीत नव्हतं.)

“आमच्यातले लक्षावधी लोक आहेत ट्रॅन्टॉरवर,” पहिल्याच भेटीत सेल्डन आपल्या मुद्रेवरचे दचकलेले भाव पूर्णपणे लपवू शकला नव्हता तेव्हा रॅन्डा हसत म्हणालेला. त्याच्या बोलण्यात वैषम्याचा लवलेशही नव्हता. “तुला इथे गडद वर्णांचे, घट्ट कुरळ्या केसांचे दाक्षिणात्यही भेटतील. पाहिलंयस कधी त्यातल्या कुणाला?”

“हेलिकॉनवर तर कधी नाही पाहिलं.” सेल्डन पुटपुटला.

“हेलिकॉनवर सगळे पाश्चिमात्यच असतात की काय? किती कंटाळवाणं! पण ठीक आहे... नानापरीची दुनिया असते.” ( पौर्वात्य असतात, पाश्चिमात्य

असतात, दाक्षिणात्य असतात- पण उत्तरात्य नसतात हे कसं, अशा विचारात सेल्डन पडला. नंतर त्याने याचे संदर्भ शोधण्याचा बराच प्रयत्न केला होता, पण काहीच हाती लागलं नव्हतं.)

आणि आता रॅन्डाचा सुस्वभावी वाटणारा चेहरा त्याच्याकडे जरा कळजीनेच टक लावून पाहात होता. "बरा आहेस ना, सेल्डन?" त्याने विचारलं.

सेल्डन पाहातच राहिला. "हो, हो. मला काय झालंय?"

"मी ऐकत होतो, मित्रा. तू किंचाळत होतास."

"किंचाळत होतो?" सेल्डनने त्याच्याकडे अविश्वसून, दुखावल्या नजरेने पाहिलं.

"मोठ्याने नव्हे. हे असं." रॅन्डाने दातावर दात रगडत घशातून एक दबका चिरका स्वर काढला. "माझं चुकलं असेल, तुझ्या कामात आगंतुकपणे व्यत्यय आणला मी- क्षमा कर मला."

सेल्डनने मान खाली घातली. "तुला क्षमा केली, लिसुंग. मी असे आवाज करत असतो- बऱ्याचजणांनी सांगितलंय मला. मला अजिबात भान नसतं- जाणीवच नसते मी असं काही करतो याची."

"तसं कशामुळे करतोस हे माहीत आहे का तुला?"

"हो. हताशा. निराशा."

रॅन्डाने सेल्डनला जवळ सरकण्याचा इशारा केला आणि आवाज खाली आणत तो बोलू लागला, "आपल्यामुळे इतर लोकांना त्रास नको. आपल्याला कुणी बाहेर काढण्याअगोदर आपणच बाहेर लाउंजमधे जाऊ."

लाउंजमधे ते दोघे सौम्यशी ड्रिंक्स घेत बोलत बसले. "मी व्यावसायिक कुतूहल म्हणून विचारू का एक- कसली निराशा आलीय तुला एवढी?"

सेल्डनने खांदे उडवले. "का येते कुणाला निराशा? मी कशावरतरी अभ्यास करतोय... पण काही प्रगतीच होत नाहीये."

"पण तू तर गणिती आहेस, हॅरी. तू इतिहासाच्या लायब्ररीत बसून निराश होण्याइतकं कशावर काम करतो आहेस?"

"तू काय करतो आहेस इथे?"

"मी शॉर्टकट घ्यायचा म्हणून इथून चाललो होतो. जाताजाता तुझा चीत्कार कानावर पडला म्हणून थांबलो. आणि बघ-" तो हसला, "शॉर्टकट तर नाहीच, उशीरच झाला. पण मला आनंदच आहे त्यात."

"मीसुध्दा नुसता इतिहासाच्या लायब्ररीतून चालत निघालो असतो तर किती बरं झालं असतं, पण मी एक गणितातलं प्रमेय सोडवू पाहातोय आणि त्याला इतिहासाच्या अभ्यासाची गरज आहे. आणि मी काही फार छान काम करत नाहीये त्याबाबतीत."

रॅन्डा सेल्डनकडे जरा जास्तच गंभीरपणे पाहात राहिला. मग म्हणाला, "आधीच क्षमा मागतो तुझी- कारण आता तुला माझा रागच येईल बहुतेक. मी तुझं कॉम्प्युटरींग करत होतो."

"माझं कॉम्प्युटरींग!" सेल्डनचे डोळे विस्फारले. आणि त्याला खरोखरच राग आला.

"आलाच तुला राग. पण तुला सांगतो, माझे एक काका गणितज्ञ होते. तू ऐकलं असशील त्यांचं नाव कदाचित्. कियांगटौ रॅन्डा."

सेल्डनचा श्वास रोधला गेला. "तू रॅन्डाचा नातेवाईक आहेस?"

“होय. ते माझ्या वडिलांचे थोरले भाऊ. आणि मी त्यांच्या वाटेवरून गेलो नाही म्हणून माझ्यावर रागावलेले ते. त्यांना स्वतःचं मूलबाळ नव्हतं. मला वाटलं की माझ्या ओळखीत एक गणितज्ञ आहे म्हटल्यावर त्यांना जरासा आनंद होईल. म्हणून तुझी माहिती काही गर्वाने सांगण्यासारखी आहे का पाहात होतो... म्हणून गणिताच्या लायब्ररीतून माहिती काढली मी.”

“असं का. हे करत होतास तर तू तिथे. वेल, पण सॉरी. माझी ओळख काही फार सांगण्यासारखी नाही.”

“चुकतोस तू. मी चांगलाच प्रभावित झालोय तुझ्या कामाबद्दल वाचून. अर्थात तुझ्या विषयातल्या पेपर्सबद्दल मला ओ की ठो कळत नाही, पण तरीही तुझी माहिती चांगलीच दमदार वाटली. आणि बातम्यांच्या फाइल्स चाळल्या तेव्हा मला हेही कळलं की तू दशक संमेलनात आला होतास या वर्षाच्या सुरुवातीला. पण ते- सायकोहिस्ट्री काय प्रकरण आहे? अर्थातच त्यातल्या पहिल्या तीन अक्षरांमुळे मला थोडासा रस वाटला आहे.”

“हं... त्या शब्दापर्यंत पोहोचलास तर तू.”

“म्हणजे माझा संपूर्ण गैरसमज झालाय की काय माहीत नाही... पण असं वाटलं की तू भविष्यात काय इतिहास घडेल त्याचा अंदाज मांडू शकतोस.”

सेल्डनने जरा थकल्यासारखी मान हलवली, “सायकोहिस्ट्रीचा थोडाबहुत अर्थ तो आहे असं म्हणू शकतो आपण- किंवा निदान त्याचा हेतू तरी तो आहे.”

“पण हा खरोखरचा गंभीर अभ्यास आहे ना?” रॅन्डा हसतच म्हणाला, “म्हणजे काटक्या टाकून भविष्य वर्तवण्याचा भाग नाही हा, हो ना?”

“काटक्या टाकून?”

“माझ्या घरी- होपारा ग्रहावर मुलं हा खेळ खेळतात- तेवढाच संदर्भ. या खेळातून भविष्य सांगता येतं असा दावा असतो. जरा चलाख पोरं असली तर त्यातून बरेच काही अर्थ काढून सांगत बसतात. म्हणजे एखाद्या होणाऱ्या आईला सांगायचं की तुझं मूल एकदम सुंदर निपजेल किंवा असलं तर त्याचं लग्न श्रीमंत व्यक्तीशी होईल. एकदम सोप्प- आणि तिथल्या तिथे अर्ध क्रेडिट मिळण्याची शाश्वती. ती बाई काही तुमचं भविष्य कथन खरं निघण्याची वाट पाहाणार नाही- फक्त चांगलं बोलल्याबद्दल बक्षीस देणार.”

“अस्स होय. नाही, मी काटक्या टाकत नाही. सायकोहिस्ट्री हा एक तसा अमूर्त असा अभ्यास आहे. अगदीच अमूर्त. त्यात व्यवहार्य असं काहीच नाही- अपवाद इतकाच-”

“अपवाद आहे ना- मग मजा आहे. अपवादांतूनच तर कायकाय निघतं.”

“अपवाद इतकाच की मला ते व्यवहार्य करण्याचा प्रयत्न करायचाय. इतिहासाची जाण मला थोडी अधिक असती तर बरं झालं असतं.”

“हां, म्हणून तू इतिहास वाचतो आहेस होय?”

“हो, पण काहीही बरं म्हणावं इतकंही साध्य झालेलं नाहीये.” सेल्डन विषण्ण मुद्रेने म्हणाला, “नको इतका इतिहास आहे- पण त्यातून सांगितलं गेलंय ते अगदीच कमी.”

“यामुळे निराशा आलीय?”

सेल्डनने मानेनेनच होकार भरला.

रॅन्डा म्हणाला, “पण, हॅरी, तू इथे येऊन अगदी थोडेसेच आठवडे लोटलेत.”

“खरंय, पण मला दिसतंय ना-”

“एवढ्या कमी आठवड्यांत तुला काहीही दिसणार नाही. कदाचित् सारं आयुष्य काढावं लागेल तुला एक पायरी ओलांडायला. असल्या प्रश्नाची उकल करायला, त्याची खरी नस सापडायला गणितज्ञांच्या पिढ्या नि पिढ्या खर्ची पडतील.”

“ते मला कळतंय, लिसंग, पण त्यामुळे मला काही समाधान मिळत नाही. मला काहीतरी दृश्य प्रगती करायची आहे. स्वतःची स्वतः.”

“वेल, हे असं स्वतःवर ओझं लादून घेऊन काय होणार? तुला बरं वाटेल कदाचित् ऐकून- एख उदाहरण देतो. मानवी इतिहासापेक्षा जरा कमी गुंतागुंतीच्या एक प्रश्नावर लोक गेला किती काळ काम करीत आहेत माहीत नाही- आणि काहीही विशेष प्रगती न करता. मला माहीत आहे, कारण इथेच- याच विद्यापीठात एक गट त्या विषयावर काम करतोय. निराशा! तुला माहीतच नाहीये खरी निराशा कशी असते!”

“कोणता विषय?” सेल्डनला थोडंसं कुतूहल वाटलं.

“हवामानशास्त्र.”

“हवामानशास्त्र!” सेल्डनच्या कुतूहलाचा एकदम बोऱ्या वाजला.

“आधीच तोंडं करू नकोस. हे बघ. प्रत्येक मानवी वस्तीच्या जगात वातावरण असतं. प्रत्येक जगाचं आपापलं वैशिष्ट्यपूर्ण असं वातावरण असतं... तापमान, भ्रमणगती आणि परिवलनाचा दर वेगवेगळा असतो प्रत्येकाचा. त्यांचा अक्ष किती तिरका आहे, जमीन आणि पाणी यांचं प्रमाण काय आहे- सगळंच. आपल्याकडे २५ दशलक्ष वेगवेगळे अशे प्रश्नच आहेत म्हण. आणि त्यातून एक सामान्य नियम तयार करायचा तर अजून कुणालाही यश आलेलं नाही.”

“कारण वातावरणाचं वर्तन अगदी सहजपणे अनियमित होऊ शकतं. सर्वांनाच माहीत आहे ते.”

“माझा मित्र जेम्स लेगेनही तेच म्हणतो. तू भेटलाएस त्याला.”

सेल्डनने आठवायचा प्रयत्न केला. “तो उंचसा आहे तो? लांब नाकाचा? फारसा बोलत नाही तोच ना?”

“तोच. आणि ट्रॅन्टॉर स्वतःच एक भलं मोठं कोडं आहे- दुसऱ्या कुठल्याही जगापेक्षा. आपल्या नोंदींनुसार, या ग्रहाचं हवामान सुरुवातीच्या वसाहतीच्या दिवसांत अगदी सर्वसामान्य होतं. मग लोकसंख्या वाडत गेली, नागरीकरण वाढत गेलं, ऊर्जेचा वापर वाढला, वातावरणात अधिकाधिक उष्णता फेकली जाऊ लागली. बर्फाचं आवरण कमी झालं, ढगांचं आवरण जाड होत गेलं... आणि हवामान अगदीच बिघडलं. त्यामुळे जमिनीखालची वस्ती आणि कामं वाढू लागली आणि- एका दुष्टचक्राची सुरुवात झाली. जसजशी हवा अधिकाधिक बिघडू लागली तसतशी जास्त उत्साहाने जमिनीखाली बांधकामं होऊ लागली आणि वर घुमट बांधले जाऊ लागले. हवा अधिकच घाण झाली. आता हा ग्रह म्हणजे सतत ढग आणि संततधार पावसाने वेढलेले जग झाला आहे. शिवाय थंडी वाढली की बर्फ पडतंच. फक्त प्रश्न असा आहे, की या हवेच्या वर्तनाचे नियम काही कुणाला समजत नाहीत. हवा अशी नेमकी का बिघडली आहे, याचं विश्लेषण कुणालाही करता येत नाहीये, किंवा दैनंदिन बदलांचे तपशील कसे असतील त्याची भाकितं कुणालाही नोंदवता येत नाहीयेत.”

सेल्डनने खांदे उडवले, “हे फार काही महत्त्वाचं आहे कां?”

“एकाद्या हवामानशास्त्रज्ञासाठी नक्कीच महत्त्वाचं आहे ते. तू तुझ्या प्रश्नाबद्दल जसा कासावीस होतोस, निराश होतोस तसेच तेही होऊ शकतात ना? की तुझं तेवढं महत्त्वाचं? आपल्या विषयाचा एवढा टेंभा नको.”

सम्राटाच्या प्रासादात जातानाचं ढगाळ, दमट वातावरण सेल्डनला आठवलं.

तो म्हणाला, “मग त्याबद्दल काही करतायत का हे लोक?”

“वेल, मोठाच प्रकल्प आहे तो विद्यापीठातला, आणि जेनर लेगेन त्यात काम करतो. त्यांना असं वाटतंय, की ट्रॅन्टॉरच्या हवामानातील बदलांबाबत समजून घेता आलं तर हवामानशास्त्राचे मूलभूत असे नियम समजून घ्यायला मदत होऊ शकेल. तुला सायकोहिस्ट्रीच्या नियमांबद्दल जेवढी कळकळ आहे तेवढीच लेगेनला हवामानशास्त्राच्या नियमांबद्दल आहे. त्याने अपरसाईडवर इतकी उपकरणे मांडून ठेवली आहेत... म्हणजे तुला कळलं ना- घुमटांवर. त्यातून फारसं काहीच हाती लागलेलं नाही. आणि गेल्या काही पिढ्यांपासून वातावरणावर काम करीत आहेत ते लोक... काहीही फलनिष्पत्ती नसताना. आणि तू मानवी इतिहासावर काही आठवडे काम केल्यानंतर लगेच कुरकुर कशी काय करतोस?”

रॅन्डाचं बरोबर आहे... सेल्डन विचार करू लागला. आपलं चुकतंय, किती चिडचिड करतोय आपण. पण तरीही- तरीही- ह्युमिन म्हणेल की विज्ञानाच्या प्रश्नांवर तुटून पडण्यातलं अपयश हे या ऱ्हासपर्वाचंच द्योतक आहे. त्याचं बरोबर असेलही, पण तो सर्वसाधारण ऱ्हास आणि त्याचे परिणाम याबद्दल बोलत होता. सेल्डनने स्वतःच्या बुध्दीचा, क्षमतेचा ऱ्हास झाल्याचा विचार मनातून काढून टाकला.

तो थोडा रस दाखवत म्हणाला, “म्हणजे ते लोक इथून बाहेर पडून बाहेर उघड्या वातावरणात, घुमटांवर जातात म्हणतोस की काय?”

"हो. अपरसाईड. फार मजेशीर आहे बरं कां हे. ट्रॅन्टॉरचे नागरिक असलेले कुणीही यात सहभागी होत नाहीत. त्यांना अपरसाईडवर जायला अजिबात आवडत नाही. कल्पनेनेच भोवळ येते नाहीतर कसंसं होतं म्हणतात. बाहेरच्या जगांतून आलेलेच लोक हवामानशास्त्र या विषयात काम करताना दिसतात."

सेल्डन खिडकीबाहेर पाहू लागला. विद्यापीठ परिसरातील हिरवळी, छोटे बगीचे छानशा प्रकाशात न्हाऊन निघालेले. सावल्या नव्हत्या, प्रखर ऊनही नव्हतं. तो विचारमग्न होत म्हणाला, "ट्रॅन्टॉरियन्सना ही आतल्या बाजूची सोय अधिक आवडते याबद्दल त्यांना दोष नाही देऊ शकत मी मला वाटतं, पण निदान कुतूहलापोटीतरी अपरसाईडवर जावंसं वाटलं पाहिजे. निदान मला तरी आहे बाबा असं कुतूहल."

"तुला पाहायचाय का हवामानाचा अभ्यास चाललेला? प्रत्यक्ष?"

"मला आवडेल. कसं जातात अपरसाईडवर?"

"ते सोपंय. एक एलेवेटर वर जातो. दार उघडतं की पोचलो आपण. मी गेलोय. जरा- नवीनच अनुभव."

"निदान या सायकोहिस्ट्रीच्या विचारापासून थोडा काळ सुटका मिळेल मला." सेल्डन सुस्कारत उद्गारला. "फार बरं वाटेल मला."

"आणि इकडे," रॅन्डा म्हणाला, "माझे काका म्हणायचे, सारं ज्ञान हे अंतिमतः एकच असतं- बरोबरही असेल त्यांचं. सायकोहिस्ट्रीत मदत होईल असं काहीतरी तुला हवामानशास्त्रातूनही शिकायला मिळेल कदाचित्. शक्य आहे की नाही?"

सेल्डन कसनुसा हसला, "काय काय कितीतरी शक्य असतं..." तो मनात म्हणाला- पण व्यवहार्य नसतं.

२२.

डॉर्सला फारच गंमत वाटली या प्रकाराची.

"हवामानशास्त्र?"

सेल्डन म्हणाला, "हो. उद्यासाठी त्यांची काही काम ठरलीत म्हणे, आणि मी जातोय त्यांच्याबरोबर."

"का- इतिहासाला कंटाळलास वाटतं?"

सेल्डनने गंभीरपणे मान डोलावली, "हो, खरंच कंटाळलो. थोडा बदल मिळाला तर बरं होईल. शिवाय रॅन्डा म्हणतोय की ते स्वतः पाहिल्यानंतर हा प्रश्न गणिताच्या अंगानेही सायकोहिस्ट्रीइतकाच प्रचंड आहे. आणि त्यामुळे माझी परिस्थिती एकमेवाद्वितीय अशी नाही हे तरी मला नीट कळेल."

"तुला नवख्या जागेची भीती वाटण्याचा रोग तर नाहीये ना- अगोराफोबिया?"

सेल्डन हसला, "नाही. मी नाहीये. पण तू का विचारते आहेस ते कळलं मला. रॅन्डा सांगत होता, की बरेच ट्रॅन्टॉरियन्स भितात- अगोराफोबिक असतात- आणि अपरसाईडवर कधीच जात नाहीत. मला वाटतं त्यांना त्यांच्या संरक्षक कवचाशिवाय सुरक्षित वाटत नसावं."

डॉर्सने मान डोलावली. "हं, बरेचदा स्वाभाविक असतं ते. पण तरीही बरेच ट्रॅन्टॉरियन्स दीर्घिकेचं पर्यटन करतात, तेही प्रशासकीय सेवेत असतात, सैन्यातही असतात. शिवाय बाहेरच्या जगातल्याही अनेकांना अगोराफोबिया असतोच."

“असेलही तसं, डॉर्स, पण मला काही तो प्रश्न नाही. मला कुतूहल आहे आणि बदलही हवासा वाटतोय. त्यामुळे उद्या जाईनच मी त्यांच्याबरोबर.”

डॉर्स थोडीशी अडखळली, “मीसुध्दा तुझ्या सोबत जायला हवं, पण उद्याचा दिवस खूपच कामाचा आहे. पण तू अगोराफोबिक नसशील तर तुला तसा काही त्रास होणार नाही. मजाच येईल तुला. फक्त त्या सर्वांच्या बरोबर रहा. तिकडे वर गेलेले लोक रस्ता चुकून भरकटल्याच्या कथा ऐकल्यात मी.”

“काळजी घेईन मी. बऱ्याच दिवसांत खरोखरचा कुठेच हरवून गेलो नाहीये मी.”

२३.

जेनार लेगेनच्या मुद्रेवर जरा काळोखीच होती. त्याचा वर्ण काही काळा नव्हता- गोरीच कातडी होती त्याची. त्याच्या जाडजूड, काळया भुवयांमुळेही तसं वाटायचा प्रश्न नव्हता. पण त्या भुवया त्याच्या खोलखोल खोबणीतल्या डोळयांवर एकवट झुकलेल्या आणि त्याचं नाक लांबलचक होतं... त्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर फारच खत्रूड भाव दिसत होते. त्याच्या डोळयांतून कधीच हसू पाझरत नसे आणि तो क्वचितकधीतरी बोलायचा तेव्हा त्याचा भरदार, गंभीर आवाज त्याच्या बारक्या कुडीला शोभायचा नाही.

तो म्हणाला, “तुला यापेक्षा जरा जास्त गरम कपडे घालून यायला हवं होतं, सेल्डन.”

सेल्डन म्हणाला, “ओः, हो का?” त्याने सभोवार पाहिलं.

तिथे दोन पुरुष आणि दोन स्त्रिया लेगेनबरोबर जाण्याच्या तयारीत होते. आणि सेल्डन सहावा. त्या सर्वांनी सॅटिनसारख्या गुळगुळीत कापडाच्या ट्रॅन्टॉरियन

वस्त्रांवर जाडजूड लोकरीचे, रंगीबेरंगी, ठळक, भडक नक्षीचे स्वेटर्स घातले होते. अगदी वेगवेगळी नक्षी होती सर्वांची.

सेल्डनने स्वतःकडे पाहिलं आणि म्हणाला, “सॉरी, मला माहीत नव्हतं हे- पण माझ्याकडे असे काही गरम कपडेच नाहीत.”

“मी देतो तुला एक. इथे असेल एखादा- निदान पातळसा तरी स्वेटर घातला तर काहीच न घालण्यापेक्षा बरं.”

“असल्या स्वेटर्सनी खूपच गरम होत असेल मला वाटतं.” सेल्डन म्हणाला.

“इथे वाटेल,” लेगेन म्हणाला. “पण अपरसाईडवर परिस्थिती वेगळी असते. थंडगार वारा असतो. दुर्दैवाने माझ्याकडे अजून एखादा लेगिंग्जचा जोड नाही किंवा बूट नाहीत. तुला नंतर त्यांची गरज भासेल.”

त्यांनी सोबत एक गाडीभरून उपकरणं घेतलेली. ते ती सारी उपकरणं नीट तपासून घेत होते. सेल्डनला त्यांचं काम फारच संथपणे चालल्यासारखं वाटत होतं.

“तुमच्या ग्रहावर कसं- थंडच वातावरण असतं कां?” लेगेनने विचारलं.

सेल्डन म्हणाला, “काहीकाही भागांत थंड असतंच. पण मी रहातो तो हेलिकॉनचा भाग तसा सौम्य तपमानाचा आणि पावसाळी असतो.”

“मग कठीण आहे. तुला काही अपरसाईडची हवा आवडणार नाही.”

“मला वाटतं वर जेवढा वेळ असेन तेवढा वेळ मी सहज सहन करू शकेन जे काही असेल ते.”

सगळी तयारी झाल्यावर ते सारे ‘फक्त अधिकृत कामांसाठीच’ असं लिहून ठेवलेल्या लिफ्टमधे शिरले.

“हे लिहिलंय कारण ही लिफ्ट अपरसाईडवर जाते.” त्यांच्यापैकी एक तरूणी म्हणाली, “आणि लोकांना विनाकारण वर जायला परवानगी नसते.”

सेल्डनची आणि तिची पूर्वी कधी ओळख झालेली नव्हती. पण तिचं नाव क्लौझिया होतं हे त्याला संभाषणातून कळलं होतं. ते तिचं नाव होतं की आडनाव होतं की टोपणनाव होतं त्याला माहीत नव्हतं.

आजवर पाहिलेल्या एलेवेटर्सपेक्षा ही वेगळी होती. ट्रॅन्टॉर किंवा हेलिकॉन कुठेच असली लिफ्ट नव्हती. (त्याने आणि ह्युमिमने ग्रॅविटिक लिफ्ट वापरलेली तो अपवाद), पण ही लिफ्ट ग्रहाच्या सीमेवर घेऊन जाते आहे, वरच्या रित्या अवकाशात नेते आहे ही भावनाच थोडी वेगळी होती. एखाद्या अंतराळयानात बसल्यासारखं वाटलं त्याला.

सेल्डन स्वतःच्या कल्पनारम्य विचाराला हसला.

एलेवेटर थोडासा थरथरला, आणि पुन्हा एकदा सेल्डनला ह्युमिनच्या दीर्घिका-ऱ्हासाच्या व्यथित भाकिताची आठवण झाली. लेगेन इतर सर्वांसोबत गोठल्यासारखा वाट पाहात होता. जणू बाहेर निघेपर्यंत त्यांनी सर्व हालचालींबरोबरच विचारशक्तीही बंद करून टाकली होती. पण क्लौझिया मधूनमधून त्याच्याकडे पाहात होती. त्याची बरीच छाप पडली होती तिच्यावर जणू.

सेल्डन तिच्या दिशेने थोडासा झुकला आणि त्याने इतरांना ऐकू जाणार नाही, त्रास होणार नाही अशा आवाजात विचारलं, “आपण खूपच उंचावर जाणार आहो कां?”

“उंचावर?” ती म्हणाली. ती सहज बोलत होती. इतरांना आपल्या बोलण्याने त्रास होईल वगैरे तिच्या मनातही आलं नाही. ती अगदीच लहान होती

आणि सेल्डनला जाणवलं की अजून शिकत असणार. कदाचित् मदतनीस म्हणून आली असणार.

"खूपच वेळ लागतोय आपल्याला. हे- अपरसाईड म्हणजे हवेत फारच उंचावर असणार."

क्षणभर ती गोंधळून पाहात राहिली. मग म्हणाली, "नाही नाही. अजिबात उंचावर नाही. आपण खूप खालून खोलातून सुरुवात केली. विद्यापीठ अगदी खालच्या पातळीवर वसलंय. आपल्या विद्यापीठाला ऊर्जेची खूपच गरज असते आणि जर आपण खाली असलो तर मग त्यावरचा खर्च बराच कमी होतो."

तेवढ्यात लेगेन बोलला, "चला. पोहोचलो आपण. चला सामान उतरवा."

थोडं थडथडत एलेवेटर थांबला आणि समोरचा रुंद दरवाजा झर्रकन उघडला. तपमान झटकन् खाली आलेलं आणि सेल्डनने लगोलग उबेसाठी हात खिशात घातले, स्वेटर घातलंय म्हणून बरं. थंडगार बोचरा वारा त्याच्या केसात शिरला. हॅट घेतली असती तर उपयोगी पडली असा विचार तो करतोय न करतोय तोच लेगेनने आपल्या स्वेटरमधून काहीतरी बाहेर काढलं, खटकन् उघडत डोक्यावर चढवलं. बाकीच्यांनीही तेच केलं. फक्त क्लौझिया जराशी थबकली. डोक्यावर टोपी ठेवताठेवताच तिने ती सेल्डनच्या पुढ्यात धरली.

सेल्डन मानेनच नकार देत म्हणाला, "तुझी हॅट मी नाही घेणार, क्लौझिया."

"घेऊन टाक. माझे केस लांब आहेत आणि दाटही. तुझे तोकडेही आहेत आणि थोडेसे... विरळही."

हे नाकारायला सेल्डनला आवडलं असतं आणि दुसऱ्या एखाद्या वेळी त्याने नक्कीच तसं केलं असतं. पण आता मात्र त्याने ती हॅट घेतली आणि कसंबसं पुटपुटला, "थॅंक्यू. तुला वारा सहन होईनासा झाला तर सांग, मी परत देईन ती."

ती तेवढी काही लहान नसावी. तिचा गोल चेहरा लहान मुलीसारखा होता. तिने केसांचा उल्लेख केला म्हणून त्याने नीट पाहिलं, तिच्या केसांवर सुंदरशी तांबूस तपकिरी झाक होती. हेलिकॉनवर असल्या रंगाचे केस त्याने कधी पाहिले नव्हते.

बाहेर खूपच ढगाळ वातावरण होतं. तो सम्राटाच्या प्रासादाकडे चालत गेलेला तेव्हासारखंच. तेव्हापेक्षाही आता इथे खूपच थंडगार होतं, पण ते होणं स्वाभाविकच असणार कारण आता हिंवाळा सुरू होऊन सहा आठवडे लोटले होते. आदल्या वेळेपेक्षा आता ढगांची दाटी जास्त होती आणि दिवस अंधारलेला, भेडसावणारा होता... की रात्र पडायला झाली होती कळत नव्हतं. महत्त्वाचं काम करायचं तर भरपूर दिवसाचा उजेड मिळेल अशी वेळ निवडायला हवी होती. की अगदी कमी वेळात आपलं काम होईल असं वाटत होतं या सर्वांना?

त्याला हे विचारून घ्यावंसं वाटत होतं. पण आता प्रश्न विचारून त्यांच्या कामात व्यत्यय आणलेला त्यांना कदाचित रुचणार नाही असं वाटून तो गप्प राहिला. सगळेचजण उत्तेजित दिसत होते, नाहीतर रागात तरी.

सेल्डनने आजुबाजूला नजर फिरवली.

आपण कसल्याशा धातूच्या पृष्ठभागावर उभे आहोत असं त्याला जाणवलं. त्याने हळूच पाय आपटून पाहिला, तेव्हा त्या आवाजाने त्याची खात्रीच पटली. पण त्या धातूवर कसलंसं आवरण होतं. तो चालत गेला तेव्हा त्यावर त्याची पावलं उमटलेली. त्या पृष्ठभागावर पातळसा, अगदी बारीक धुळीचा थर होता. त्याने कुतूहलाने एक चिमूटभर धूळ उचलून पाहिली.

क्लौझिया त्याच्याजवळ आली होती. तो काय करतोय हे तिने पाहिलं, आणि जणू आपलं एखाद्या महत्त्वाच्या कामाकडे दुर्लक्ष झाल्यावर एखादी गृहिणी कशी शरमून जाईल तशी ती घाईने म्हणाली, “आम्ही इथे नेहमी झाडून घेतो तसं-

या उपकरणांच्या दृष्टीने स्वच्छता राखावी लागते. अपरसाईडवर अनेक ठिकाणी याहूनही जास्त धूळ असते, पण त्याने फार काही बिघडत नाही. तो थर तसा दुलईसारखा उपयोगीच पडतो- हवेपासून संरक्षण करायला."

सेल्डनने हुंकार दिला आणि पुन्हा इकडेतिकडे पाहायला लागला. त्या धुळीतूनच उगवून आल्यासारखी वाटणारी ती उपकरणे नेमकी कसल्या कामांची आहेत हे समजून घेणं अशक्यच होतं. त्यातून काय साध्य होतं, कसलं मोजमाप करता येतं वगैरे त्याला काही माहीतच नव्हतं.

लेगेन त्याच्या दिशेने चालत आला. तो हलकेच पावलं टाकत होता. आपल्या उपकरणांना धक्के जाणवू नयेत या दृष्टीने साभाळून चालत होता. सेल्डननेही असं चालायला हवं याची नोंद घेतली.

"ए! सेल्डन!"

सेल्डनला त्याच्या बोलण्याची पध्दत अजिबात आडली नाही. त्याने थंडपणे उत्तर दिलं, "बोला, डॉ. लेगेन?"

"बरंबरं, डॉ. सेल्डन-" तो थोडा उतावीळपणे बोलू लागला, "तो आपला छोट्या- रॅन्डा- त्याने मला सांगितलं की तू गणितज्ञ आहेस म्हणून. तू- म्हणजे- खरंच एकदम निष्णात आहेस की?"

"मला आवडेल तसं म्हणायला- पण अशी खात्री देणं कठीणच नाही कां!"

"आणि तुला गुंतागुंतीच्या कठीण प्रश्नांत रसही आहे ना?"

सेल्डनने अगदी मनापासून उत्तर दिलं, "मी स्वतःच अडकलोय अशा एका प्रश्नात."

“मी दुसऱ्या एकात अडकलोय. तू मोकळेपणाने बघ सारं काही. तुला काही विचारायचं असेल तर आमच्या या इंटर्नला विचार- क्लौझियाला- ती सांगेल. आम्हालाही तुझी मदत होऊ शकते.”

“मला फार आनंद होईल. पण मला हवामानशास्त्राची काहीच माहिती नाही...”

“ते ठीक आहे, सेल्डन. या सगळ्याची थोडीफार माहिती घे, आणि मग आपण मला हव्या असलेल्या गणिती प्रश्नावर बोलू.”

“अगदी नक्की. सेवेस हजर आहे मी.”

लेगेन जायला वळला, त्याचा लांबुळका खत्रुड चेहरा अधिकच गंभीर भासत होता. मग तो मागे वळून पुन्हा बोलला, “तुला थंडी- म्हणजे फारच थंडी लागली तर एलेवेटरचं दार उघडंच आहे. आत शीर आणि युनिवर्सिटी बेस असं लिहिलेल्या बटनावर बोट टेक. तू खाली पोहोचलास की एलेवेटर आपोआप पुन्हा वर येईल. विसरलास तर क्लौझिया दाखवेलच तुला.”

“नाही विसरणार मी.”

आता मात्र तो गेला आणि सेल्डन त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात राहिला. स्वेटरमधून थंड वारा धारदार पात्यांसारखी घुसत होता. क्लौझिया पुन्हा त्याच्याकडे परतली. वाऱ्याने त्याचा चेहरा लाल झालेला.

सेल्डन म्हणाला, “डॉ. लेगेन जरा चिडल्यासारखे वाटतात. की ते नेहमीच तसे असतात?”

ती खुदकन् हसली, “ते बरेच वेळा तसे दिसतात, पण आत्ता ते खरंच वैतागलेत.”

सेल्डनने सहजच विचारलं, “कां बरं?”

क्लौझियाने किंचित मागे वळून पाहिलं, तिचे लांब केस वाऱ्याने हेलकावले. मग ती म्हणाली, “ते कारण मला माहीत असता कामा नये- पण माहीत आहे मला. डॉ. लेगेननी आज गृहीत धरलेलं, की ढगांचं आच्छादन थोडं दूर होईल आणि मग सूर्यप्रकाशात काही विशिष्ट निरीक्षणं नोंदवायची होती त्यांना. पण हे बघा- काय वातावरण पसरलंय.” सेल्डनने मुंडी हलवली.

“इथे होलोव्हिजन रिसीवर्स आहेत- त्यामुळे नेहमीपेक्षा अधिकच वाईट ढगाळ वातावरण आहे हे त्यांना माहीत होतं. आणि मला वाटतं, त्यांना आशा असावी की उपकरणांत काहीतरी दोष निर्माण होईल आणि मग म्हणता येईल की माझा सिध्दांत बरोबर आहे पण उपकरणांमधे दोष निर्माण झाला आहे. पण अजूनही त्यांना त्यात काहीही दोष सापडलेला नाहीये.”

“म्हणून ते एवढे दुःखी दिसतायत.”

“हं- तसे ते कधीच आनंदी दिसत नाहीत म्हणा.”

सेल्डनने डोळे बारीक करत दूरवर चौफेर नजर टाकली. ढग असूनही उजेड तसा प्रखर होता. तेवढ्यात त्याला जाणीव झाली, की पायाखालचा पृष्ठभाग अगदी सपाट नव्हता. तो एका पसरट घुमटावर उभा होता. आणि दृष्टी पोहोचेल तिथवर, असेच अनेक विविध आकारांचे, उंचीचे घुमट पसरलेले दिसत होते.

“अपरसाईड फारच वेडीवाकडी दिसते,” तो म्हणाला.

“बरीच. मला वाटतं, रचना करतानाच तशी केली आहे.”

“त्यासाठी काही कारण?”

“काही खास नाही. मी ऐकलंय- म्हणजे मी पाहिल्यानंतर विचारलं- तुमच्यासारखंच... फार वर्षांपूर्वी लोक काही जागांवर घुमट बांधत. शॉपिंग मॉल्स, खेळाची उद्याने अशा विशिष्ट गोष्टी. मग त्यांनी अख्खी शहरं घुमटाखाली आणली.

त्यामुळे मग वेगवेगळ्या लांबीरुंदीव्यासाचे अनेक घुमट उभे राहिले. सगळे एकत्र आल्यावर ते चित्र वेडंवाकडंच दिसणार ना. पण तोवर हे असंच असणार हे सर्व लोकांनी मान्यच करून टाकलेलं.''

''म्हणजे? अपघाताने सुरू झालेली गोष्ट परंपराच बनून गेली असं का?''

''हां- बहुतेक... असंही म्हणता येईल खरं.''

(जर काहीतरी अगदी अपघाताने घडलेलं परंपरेत परिवर्तित होत असेल- आणि मग ती परंपरा अगदी अपरिवर्तनीय होत असेल तर मग- सेल्डन विचार करीत होता- हा सायकोहिस्ट्रीचा नियम बनू शकतो का? हे अगदीच फडतूस वाटतं- पण असे कितीएक फडतूस वाटणारे नियम बनू शकतील? लाखो? करोडो? काही सर्वसाधारण नियम असे असतील का की असले कित्येक फडतूस वाटणारे नियम त्यांचे पूरक नियम ठरतील किंवा त्यांच्या सिध्दतेतूनच स्फुरलेले असतील? काय म्हणू शकतो? थोडा वेळ विचारात बुडून गेल्यानंतर त्याला वाऱ्याच्या चावऱ्या फटकाऱ्यांचाही विसर पडला.)

क्लौझियाला मात्र तो वारा जाणवत होता. ती शहारली आणि म्हणाली, ''भयंकरच वारा आहे हा, घुमटांच्या खाली किती छान वाटतं.''

''तू ट्रॅन्टॉरियन आहेस कां?'' सेल्डनने विचारलं.

''हो. बरोबर.''

सेल्डनला आठवलं रॅन्डा म्हणालेला की ट्रॅन्टॉरियन्स अगोराफोबिक असतात- आणि त्याने विचारलं, ''इथे वर यायला तुला बरं वाटतं का मग?''

''अगदी वैताग वाटतो मला,'' क्लौझिया म्हणाली, ''पण मला डिग्री हवीय, प्रतिष्ठा, प्राविण्य सगळंच... आणि डॉ. लेगेन म्हणतात की थोडं तर फील्डवर्क केल्याशिवाय मला काहीही मिळणार नाही. त्यामुळे कितीही वैतागले तरी मला

यावंच लागतं इथे. ही अशी थंडी असते तेव्हा तर नकोसंच वाटतं. पण अशी थंडी असूनही- इथे काही खरीखुरी झाडंझुडं वाढतात याची कल्पना करू शकता तुम्ही?"

"हो?" त्याने क्लौझियाकडे तिखटपणे निरखून पाहिलं, त्याला वेड्यात काढण्यासाठी ती काहीतरी चेष्टा करू पाहातेय की काय. पण ती अगदी निष्पापपणे बोलत होती, पण या पोरसवदा चेहऱ्यामागे खरंच काय दडलेलं असेल कसं ओळखणार?

"हो, खरंच. अगदी इथे सुध्दा वाढतात वनस्पती, हवेत जरा ऊब असते तेव्हा. तू इथली माती पाहिलीस ना? आम्ही सगळं झाडून घेतो कारण आमच्या कामासाठी ते आवश्यक आहे. पण इतर ठिकाणी, ती माती जमा होत रहाते. विशेषतः दोन घुमटांच्या मधल्या खोलगट जागेत तर बरीच साठते आणि तिथेच झाडं वाढतात."

"पण ही माती ते कुठून?"

"जेव्हा हे घुमट सगळ्या ग्रहावर नव्हते, तेव्हा वाऱ्याने उडून आलेली धूळमाती वर थोडीथोडी साठत राहिली. मग जेव्हा संपूर्ण ट्रॅन्टॉर घुमटाखाली आला आणि आम्ही आणखीआणखी खोलात खालीखाली गेलो, तेव्हा त्यातली चांगली माती बघून वर अंथरण्यात आली."

"अरे, पण त्याच्या वजनाने घुमट मोडतील ना..."

"छे छे. हे घुमट अगदी चांगले दणकट आहेत आणि सर्वांना चांगले भक्कम आधार आहेत खालून. मी एक बुकफिल्म पाहिली होती- त्यात लिहिलेलं की इथे वर अपरसाईडवर शेती करावी अशी आधी कल्पना होती. मग असं लक्षात आलं की घुमटाखालीच शेती करणं जास्त सोयीचं आणि व्यवहार्य आहे. यीस्ट आणि शेवाळ तर घुमटांच्या आतच वाढवतात. नेहमीच्या पिकांवरचा भार थोडा कमी

करायला ते बरं पडतं. मग अपरसाईडवर रान वाढू द्यायचं असं ठरलं. इथे वर पशुपक्षीही आहेत. फुलपाखरं, मधमाशा, उंदीर, ससे असं बरंच काही आहे."

"पण मग झाडांच्या मुळांमुळे घुमटांची हानी नाही होत?"

"गेल्या हजारो वर्षांत तरी असं काहीही झालेलं नाही. या घुमटांवर केलेल्या प्रक्रियेमुळे मुळं आत शिरूच शकत नाहीत. गवतच जास्त वाढतं. पण झाडंही आहेत म्हणा. आता थंडी आहे म्हणून, नाहीतर इथून किंवा थोडं दक्षिणेकडे सरकल्यावर अगदी नीटच दिसतात ती झाडं. किंवा अंतराळयानातूनही दिसतात." तिने तिरप्या नजरेने त्याच्याकडे पापण्या फडफडवत पाहात विचारलं, "तू इथे येताना, अवकाशातून ट्रॅन्टॉरकडे पाहिलंस का?"

"नाही, क्लौझिया, नाही पाहिलं मी. आमचं हायपरशिप नीट बाहेरचं काही दिसेल असं नव्हतंच. तू पाहिलं आहेस कधी ट्रॅन्टॉरकडे अवकाशातून?"

ती केविलवाणं हसून म्हणाली, "मी कधीच अवकाशात गेलेले नाहीये अजून."

सेल्डनने इकडेतिकडे पाहिलं. सगळाच आसमंत करड्या-राखी छटेत रंगलेला दिसत होता.

"माझा खरंच विश्वास बसत नाही," तो म्हणाला, "अपरसाईडवर रान वाढतं यावर."

"खरंय पण ते. मी तुमच्यासारख्याच बाहेरच्या जगातून आलेल्या प्रवाशांकडून ऐकलंय हे. की अवकाशातून ट्रॅन्टॉर अगदी हिरवागार दिसतो- हिरवळ अंथरल्यासारखा... कारण सगळीकडे गवत आणि झुडपी रान आहे. पण झाडंसुध्दा आहेत खरोखरची. एक छोटं रान इथून फार लांब नाही. मी पाहिलंय ते जाऊन. तिथे सदाहरित प्रकारची झाडं आहेत. आणि सहा मीटर उंचीपर्यंत वाढलेली आहेत ती."

“कुठे?”

“इथून नाही दिसत. या घुमटाच्या बरोबर पलिकडच्या बाजूला आहे ते. ते”

बारीकशी हाक कानावर आली. (आपण दोघे बोलताबोलता जरा इतरांपासून दूरवर चालत आलो हे तेव्हा कुठे सेल्डनला कळलं.)

“क्लौझिया, इकडे ये. तुझी गरज आहे इथे.”

“अह्, ओह्... आलेच. सॉरी, डॉ. सेल्डन, मला जायला हवं.” क्लौझिया पळत निघाली. पळतानाही अगदी हलकेच पावलं पडतील याची काळजी घेत होती ती.

ती माझ्याशी खेळ करतेय की काय? एका भाबड्या नवागताला गंमत म्हणून काहीतरी खोटंनाटं सांगून मनोरंजन करून घेत असेल का ती? अशा गोष्टी सगळीकडे होत असतात. प्रत्येक जगात, प्रत्येक काळात. प्रामाणिकपणाचा आंव तर काय सहज आणता येतो. किंबहुना असले खेळ करणारे आपण प्रामाणिक वाटू असा खास प्रयत्न करीत असतात.

खरंच इथे अपरसाईडवर सहा मीटर उंचीची झाडं असतील? फारसा विचार न करता तो क्षितिजावर दिसणाऱ्या सर्वात मोठ्या घुमटाकडे निघाला. अंगात ऊब यावी म्हणून तो आपले हात जोरजोरात हलवीत होता. पण त्याची पावलं मात्र बुटांच्या आत थंड पडली होती.

क्लौझियाने त्याला कुठलीही दिशा दाखवली नव्हती. कुठल्या बाजूला ते रान आहे हे निदान हाताने तरी दाखवता आलं असतं तिला, पण नाही. का नाही दाखवलं? अरे हां, तिला कुणीशी हाक मारून बोलावून घेतलेलं नाही कां!

हे सगळे घुमट फारसे उंच नसून पसरट होते. नाहीतर तिथून चालत जाणं जरा अवघडच ठरलं असतं. पण दुसरीकडे, घुमटाच्या पलिकडे जायचं तर बरंच अंतर

चालून जाणं भाग होतं. आधी मध्यावर पोहोचायचं आणि मग पलिकडे पाहायचं- बराच लांबचा पल्ला असणार होता.

अखेर तो त्या घुमटाच्या टोकावर पोहोचून पलिकडल्या बाजूला पाहू शकला. त्याने मागे वळून पाहिलं, तो हवामानशास्त्रज्ञांचा घोळका आणि त्यांची उपकरणं वगैरे सारं अजूनही दिसत होतं. ते आता चांगलेच दूर राहिलेले. पण स्पष्ट दिसत होते. फारच छान.

पण इथून कुठलंही रान, झाडांचा पुंजका दिसत नव्हता. पण पलिकडच्या दोन घुमटांतून निघालेला एक खोलगट भाग दिसत होता. त्या घडीवर मातीचा थर थोडासा जाडसर असावा. आणि हिरवट रंगाची झलक अधुनमधून दिसत होती. खुरटं गवत असेल. जर या खोबणीच्या कडेकडेने गेलं, आणि तिथे माती असेल तर मग कदाचित् झाडंही असतील.

त्याने मागे वळून पाहिलं. जमिनीवरच्या काही खुणा लक्षात ठेवायचा प्रयत्न केला, पण सर्वदूर केवळ घुमटाघुमटांचे वरखाली झालेले आकारच भरून होते. तो थोडासा बिचकला, डॉर्सने त्याला सावध केलं होतं... तिथे वर माणसं हरवतात म्हणून. तेव्हा तिची ती सूचना अगदीच अस्थानी वाटलेली... पण आता पटत होतं. पण तरीही त्याला एक कळत होतं की ती खोबण एकाद्या वाटेसारखी दिसत होती. थोडा वेळ त्यावरून चालून पाहून मग मागे वळून इथेच परतता आलं असतं.

मनाशी निर्णय घेऊन तो निघाला. त्या खोबणीसारख्या वाटेवर उतरून त्याने पाऊल घातलं. वर कुठूनतरी बारीकशी घरघर ऐकू येत होती. पण त्याने लक्ष दिलं नाही. झाडं कुठे आहेत ते बघायचंच असं त्याच्या मनाने घेतलं होतं आणि आत्ता तेवढंच सुचत होतं.

तिथलं मऊ खुरटं गवत जरा दाट झालं आणि गालिचासारखं पुढे उलगडत जाऊ लागलं होतं. कुठेकुठे मधूनच गवताचे उंच झुबके दिसत होते. अपरसाईडवरच्या एकंदर रखरखाटाला न जुमानता ते गवत छान ताजं तरतरीत हिरवं दिसत होतं. आणि सेल्डनला जाणवलं की या ढगांनी ओथंबलेल्या ग्रहावर पाऊसही बराच पडत असणार.

ती खोबणवाट थोडीथोडी वळत होती, आणि पुढच्याच घुमटाच्या पुढे आकाशाच्या काळसर राखी पार्श्वभूमीवर त्याला एक आणखी काळसर गडद डाग जाणवू लागला. हे नक्कीच रान होतं- त्याला खात्रीने वाटलं.

आणि मग जणू त्या झाडांच्या अस्तित्वाची खूण पटल्यावर त्याचं मन इतर गोष्टींचीही नोद घेऊ लागलं. आधी बेसावधपणे नोंद घेतलेली ती घरघर आता त्याला नीटच जाणवू लागली. कसल्यातरी यंत्रांचा आवाज असेल म्हणून त्याने आधी त्याकडे दुर्लक्ष केलं होतं. आता तो नीट विचार करू लागला- हा यंत्राचा आवाज असेल?

असू शकतो. तो त्या लाखो मैल दूरवर पसरलेल्या जागतिक शहराच्या घुमटांकित पृष्ठभागावरल्या एका घुमटावर उभा होता. या घुमटांखाली अनेक ठिकाणी वायूविजनासाठी मोटर्स बसवलेल्या असतील. आणि त्यांचाच आवाज येत असेलही... शहरातले इतर सारे आवाज बंद झाले की हे आवाज ऐकू येत असतीलही.

फक्त इतकंच की हा आवाज पायाखालच्या जमिनीखालून येत नव्हता. त्याने वरच्या निर्विकार, एकरंगी आकाशाकडे नजर टाकली. काहीच नव्हतं.

तो आकाश निरखत राहिला. त्याच्या डोळ्यांवर उभ्या आठ्या उमटल्या... दूरवर नजर फेकत होता तो.

त्या करड्या पार्श्वभूमीवर एक लहानसा गडद ठिपका दिसू लागला. आणि ते जे काही होतं ते अचानक दिशा सापडल्यासारखं पुढे निघालं. तेवढ्यात ढगांच्या पडद्याखाली झाकलं गेलं.

आणि मग अचानक त्याच्या मनात विचार आला- ते माझ्या मागावर आहेत.

आणि काही ठरवण्याच्या आतच त्याने कृतीही केली होती. तो त्या खोबणीसारख्या वाटेवरून झाडांच्या दिशेने धावत सुटला. आणि तिथे झर्रकन पोहोचता यावं म्हणून डावीकडे वळून तो एका बसक्या घुमटावरून धावू लागला. पायाखाली सुकलेल्या नेच्यासारखा मातकट गवती थर होता आणि लालचुटुक फळांनी लहडलेल्या काही काटेरी वेली.

२४.

सेल्डन धापा टाकत एका झाडाला बिलगून उभा राहिला. ती उडती वस्तू पुन्हा दिसावी म्हणून तो लक्ष ठेवून होता. दृष्टीस पडताच पटकन् खारीसारखी धाव घेऊन झाडामागे लपता येईल अशा बेताने तो उभा होता.

त्या झाडाच्या खोडाचा खरखरीत स्पर्श थंडगार होता. सुखावह तर नव्हताच. पण निदान लपायला तरी जागा होती. पण तेही पुरेसं ठरेलच असं नव्हतं. उष्णतेचा माग काढत त्यांनी शोध घेतला असता तर- पण कदाचित त्या थंडगार खोडामुळे त्याच्या शरीराची उष्णताही झाकली गेली असती.

त्याच्या पायाखाली गच्च कोंदलेली माती होती. अगदी लपण्याच्या मनस्थितीत असतानाही, पाठलाग करणाराला आपण दिसता कामा नये यासाठी अंग चोरत असतानाही त्याच्या मनात त्या मातीच्या थराबद्दल प्रश्न उठत होते. किती जाड

असेल हा थर... किती काळ गेला असेल हा एवढा थर जमायला... ट्रॅन्टॉरच्या उष्ण कटिबंधातले अनेक घुमट जंगलाने झाकलेले असतील कां आणि हे वृक्ष फक्त दोन घुमटांमधल्या खोबणींतच वाढत असतील का... आणि बाकीच्या उंचवट्यांवर फक्त गवत, झुडुपं एवढंच वाढत असेल की काय-

त्याला ती वस्तू पुन्हा दिसली. ते काही हायपरशिप नव्हतं. अगदी साधं एअरजेटही नव्हतं. जेट-डाऊन म्हणतात त्यातलं होतं ते. त्याला त्या षट्कोनाच्या कडांवरून आयन्सच्या शेपट्यांची लकाकी दिसली. गुरुत्वाकर्षणाचा जोर रोडावण्यासाठी त्यांचा उपयोग होत होता. आणि एखादा अवाढव्य पक्षी पंखांच्या बळावर तरंगत रहावा तसं ते दिसत होतं. ग्रहाचा पृष्ठभाग नीट न्याहाळण्यासाठी, जागच्या जागी घुटमळत, फिरत रहाता यावं अशी त्याची रचना होती.

ढगांच्या दाटीमुळेच केवळ तो वाचला होता. त्यांनी उष्णताशोधकाचा वापर केला असता तरी त्यातून केवळ खाली काही लोक आहेत एवढंच कळलं असतं. तिथे नेमकी किती माणसं आहेत आणि त्यात हवा तो माणूस आहे का हे कळण्यासाठी त्या जेट-डाऊनला ढगांच्या छताखाली खाली सूर मारावा लागला असता.

ते जेट डाऊन आता थोडं जवळ आलेलं, पण त्याच्या नजरेपासून ते लपून राहिलं नाही. एंजिनाची घरघर छपत नव्हती आणि जोवर शोध घ्यायचा आहे तोवर त्यांना एंजिन बंद करता आलं नसतं. सेल्डनला जेट-डाऊन्सबद्दल माहिती होती. कारण हेलिकॉनच्या खुल्या घुमटविहीन आकाशात ढगांच्या लपंडावासोबत अनेक जेट-डाऊन्स आकाशात फिरत. अगदी सामान्य दृश्य होतं ते- खाजगी मालकीचीही जेट-डाऊन्स असत.

जिथे सगळे मानवी व्यवहार घुमटांखाली चालत, ढग सतत ओथंबलेले असत, त्या ट्रॅन्टॉरवर जेट-डाऊन्सचा काय उपयोग होत असेल बरं- ती शासकीय वाहने असली तर केवळ घुमटांच्या वर गेलेल्या माणसाला उचलण्यासाठीच?

असू शकतं. शासनाचं सैन्य विद्यापीठाच्या प्रांगणात शिरू शकत नसलं तर- आता तरी सेल्डन विद्यापीठ कार्यक्षेत्राच्या बाहेर होता. तो ज्या घुमटांवर होता तिथे स्थानिक प्रशासनाचा अधिकार चालत नसेलही. साम्राज्याचे कुठलेही वाहन घुमटांच्या कुठल्याही भागात संचार करायला मुक्त असेल आणि तिथे सापडलेल्या कुणाही माणसाला चौकशीसाठी ताब्यातही घेऊ शकत असतील ते. ह्युमिनने याबाबत त्याला सावध केलं नव्हतं, पण कदाचित् त्याला असं होऊ शकेल वगैरे सुचलंही नसेल.

आता ते जेट-डाऊन अधिकच जवळ आलं होतं, वासावर सावजाचा माग काढत येणाऱ्या एखाद्या आंधळ्या शिकारी प्राण्यासारखं भासत होतं ते. या झाडांच्या दाटीत शोध घ्यावा असं सुचेल का त्यांना? खाली उतरून एखाददुसरा सशस्त्र सैनिक या रानात पाठवण्याचा विचार करतील का ते?

आणि तसंच झालं, तर काय करणार आपण? तो निशस्त्र होता आणि त्याचं चापल्य वगैरे सारं काही न्युरॉनिक चाबकाच्या वेदनादायक फटकाऱ्यापुढे निष्प्रभ ठरण्यातलं होतं.

किंवा-

एक नवीनच विचार त्याला सुचला. कदाचित् ते पाठलागावर आलेलं नसेलच. हवामानशास्त्राच्या अभ्यासासाठीही ते आलेलं असू शकतं. नक्कीच- हवामानशास्त्राच्या अभ्यासासाठी वातावरणाच्या अगदी वरच्या थरातून निरीक्षण घेणंही आवश्यक असेलच की.

आपण असं लपून मूर्खपणा करतोय की काय?

आता आभाळ अधिकच काळवंडत चाललं होतं. ढग आणखी दाट झालेले... किंवा कदाचित् रात्र पडत चालली असावी.

थंडीही वाढली होती... आणखी वाढण्याची शक्यता होती. केवळ एका विचित्र भीतीने अचानक घेरला गेल्यामुळे एका अगदी निरुपद्रवी यानापासून लपण्याचा प्रयत्न करताकरता आपण या गोठवणाऱ्या थंडीत थांबून रहाणार आहोत की काय? इथून धावत जाऊन पुन्हा त्या हवामाननिरीक्षणतळावर पोहोचावं असं त्याला तीव्रतेने वाटू लागलं.

अखेर, ह्युमिनला ज्याची प्रचंड भीती वाटत होती त्या डेमेर्झेलला सेल्डन इथे अपरसाईडवर एकटाच फिरतो आहे हे कसं कळणार होतं?

एक क्षणभर त्याची याबद्दल खात्रीच पटली आणि तो थंडीने काकडत झाडाआडून पुढे आला.

आणि पुढच्याच क्षणी तो पुन्हा मागे गेला. ते यान खूपच जवळ आल्याचं दिसलं त्याला. ते कोणत्याही प्रकारे काही हवामान विषयक निरीक्षण करीत असेल असं दिसत नव्हतं. कसले नमुने घेणं, मोजमाप घेणं किंवा काही तपासणं असं काहीही तिथे चालल्याचं दिसत नव्हतं. तसं काही चाललं असेल तर ते आपल्याला दिसू तरी शकेल का? त्या जेट-डाऊनमधे कसली उपकरणं असतील, ती कशी काम करत असतील त्याला काहीच कल्पना नव्हती. त्यांचं काम चालू असलं तरीही त्याला कळलं नसतं.- पण तरीही उघड्यावर येण्याची जोखीम पत्करावी का? त्याला प्रश्न पडलेला.

अखेर डेमेर्झेलला तो अपरसाईडवर गेला आहे हे कळलं असेल तर- विद्यापीठात त्याने पेरलेला माणूस असू शकतो... त्याने सांगितलं असेल तर. रॅन्डा-

तो छोटुसा, हसरा पौर्वात्य माणूस... त्यानेच त्याला अपरसाईडला जायचं सुचवलं होतं. त्याने ते अगदी उत्साहात सुचवलेलं आणि खरं तर हा विषय सहजपणे निघालेला नव्हता... फार सहजपणे नक्कीच नाही. तो शासनाचा हेर असणं आणि त्यानेच ही माहिती डेमेर्झेलला दिलेली असणं शक्य असेल कां?

शिवाय लेगेन- त्याने त्याला स्वेटर दिलं होतं. स्वेटर उपयोगी पडलं होतं नक्की, पण स्वेटरची गरज पडेल हे त्याला आधीही सांगता आलं असतं. त्याला स्वतःचं स्वेटर घेऊन येता आलं असतं. का नाही केलं त्याने? त्याने घातलेलं स्वेटर काही वेगळं होतं कां? त्याचा रंग जांभळा होता. बाकीच्यांची स्वेटर्स ट्रॅन्टॉरियन फॅशननुसार भडक रंगीबेरंगी होती. वरून पाहाताना कुणालाही या बाकीच्या भडक रंगांमधून एकच एक एकरंगी स्वेटर घातलेला ठिपका वेगळा काढता आला असता. आणि कोणामागे जायचं ते कळलं असतं.

आणि क्लौझिया? अपरसाईडवर ती अभ्यास करायला, आणि इतर शास्त्रज्ञांना मदत करायला आली होती. ती कशी काय एवढ्या सहजपणे त्याच्याशी बोलायला आली, बोलत थांबली... आणि मग बोलतबोलत तिने त्याला इतरांपासून दूरही नेलं होतं... असं वेगळं काढल्यानंतर त्याला शोधणं सोपंच झालं असतं मागावरच्या शिकाऱ्यांना.

आणि मग डॉर्स वेनाबिलीचं काय? तो अपरसाईडवर जाणार हे तिला तर माहीत होतंच. तिने त्याला थांबवलं नाही. तिला त्याच्या सोबतही येता आलं असतं. पण ती कामात होती- किती सोयिस्कर.

हे कारस्थान होतं. नक्कीच कारस्थान.

आता त्याची खात्रीच पटलेली, आणि या झाडीतून बाहेर पडण्याचा कणभरही विचार आता त्याला शिवणार नव्हता. त्याचे पाय म्हणजे बर्फाच्या

कांबीच झालेल्या जणू, आणि जमिनीवर कितीही आपटले तरीही त्यात जीव भरत नव्हता. हे जेट-डाऊन जाणार आहे की नाही कधी इथून?

हा विचार त्याच्या मनात येतोय ना येतोय तोच एंजिनाची घरघर अचानक वाढली आणि ते जेट-डाऊन वरवर जाऊ लागलं... ढगात शिरून दिसेनासं झालं.

सेल्डन जिवाचा कान करून ऐकत राहिला, अगदी बारीकसा आवाजही श्रुतीतून निसटू नये... अखेर ते गेल्याचं नक्की झालं. आणि मग अगदी ते गेल्याची खात्री पटलेली असूनही, त्याला वाटलं, की केवळ तो झाडीतून बाहेर निघावा म्हणून केलेली ही युक्ती तर नसेल? तो आहे तिथंच थोडावेळ थांबून राहिला... मिनिटांमागून मिनिटे गेली आणि रात्र पडत चालली.

अखेर जागच्या जागी गोठून जाऊन संज्ञा हरपण्यापेक्षा आता बाहेर पडणंच श्रेयस्कर असं वाटलं तेव्हा तो झाडीबाहेर आला, आणि सावधपणे चालू लागला.

अगदीच झांझर संधिप्रकाश होता. उष्णताशोधक असता तरच त्याचा पत्ता त्यांना लागला असता. पण तसं झालं आणि ते जेट-डाऊन परतलंच तर आवाज कानावर पडलाच असता. तो त्या झाडीच्या सीमेवर येऊन छोट्याशा चाहुलीसरशी पळण्याच्या तयारीतच पण मनाशी आकडे मोजत थांबला. पण त्यांना तो खरंच सापडला तर तो काय करणार होता...

सेल्डनने अवतीभवती पाहिलं. ते हवामानशास्त्रज्ञ सापडले असते, तर त्यांच्याकडे नक्कीच उजेडाचं काहीतरी साधन असेल... पण नाहीतर काहीही दिसणार नव्हतं.

अजूनही आसमंत अंधुकअंधूक दिसत होता, पण अजून पंधरावीस मिनिटांत किंवा जास्तीत जास्त अर्ध्या तासात सारं अंधारात गुडुप होणार होतं.

आकाशात ढगांचा पडदा आणि खाली दिवे नाहीत... दाट काळा अंधार असेल... अगदी काळाकुट्ट.

अशा आंधळया काळोखात अडकण्याचे भय फार मोठे होते. आलेल्या खोबणवाटेतूनच आला रस्ता शोधत शक्य तितक्या झटपट परतायचं आहे याची त्याला जाणीव झाली. उबेसाठी त्याने हातानेच अंगाला मिठी घातली, आणि तो साधारण आल्या वाटेची दिशा पकडून घुमटांमधल्या त्या खोबणीतून चालत निघाला- निदान असं त्याला वाटत तरी होतं.

पण अर्थात, हीच ती खोबण असं नक्की नव्हतं- त्या रानापासून अशा एकाहून अधिक वाटाही निघालेल्या असू शकत होत्या. पण अंधारात लाल रंगाऐवजी काळपट दिसणाऱ्या बेरीजची वेल त्याला दिसली... कदाचित् येताना दिसली होती तीच. आता उशीर करून चालणार नव्हता. रस्ता बरोबरच असेल असं समजून अंधुक उजेडाच्या आधाराने आणि झुडुपांच्या खुणा शोधत झपझप कापायला हवा होता.

पण त्याला त्या खोबणवाटेला धरून फार वेळ चालता येणार नव्हतं. जवळच्या एका त्यातल्या त्यात उंच वाटणाऱ्या घुमटापाशी तो येऊन पोहोचला आणि मग त्याच्या वाटेला काटकोनात छेदणारी आणखी एक खोबणवाट त्याला दिसली. आता उजवीकडे वळून मग थेट डावीकडे वळलं की मग हवामानसंशोधकांचा तळ असलेला घुमट येईल असं त्याला साधारण स्मरत होतं.

सेल्डन डावीकडे वळला आणि त्याने जरा वर पाहिलं. तिथल्या अगदी किंचितशा उजळ आभाळाच्या पार्श्वभूमीवर घुमटाची वळणदार रेष दिसत होती. हाच असणार तो!

की आपण केवळ सोयिस्कर समजूत करून घेतोय?

तसं नसावं यावर विश्वास ठेवण्यापलिकडे त्याच्या हाती काहीच नव्हतं. घुमटाच्या कळसाकडे नजर खिळवून तो त्या दिशेने शक्य तितक्या सरळ रेषेत जाण्याचा प्रयत्न करीत होता. जवळ पोहोचता पोहोचताना तो घुमट अधिकाधिक अस्पष्ट होत गेला... आपलं बरोबर असेल तर लवकरच चढावर पोहोचताच पलिकडच्या बाजूचे खालचे दिवे दिसतील. हवामानसंशोधकांच्या तळावरचे दिवे.

त्या काजळकाळोखात वाटेत काय आडवं येतंय वगैरे काहीही दिसत नव्हतं. थोडे तारे तरी बाहेर डोकावले असते तर काहीतरी दिसलं असतं त्याला वाटलं. आंधळं असणं म्हणजे हे असंच असेल का. त्याने आपले दोन्ही हात समोर धरून जरा हलवले. जणू पुढचं काही दिसण्याच्या दोन अँटेना होत्या त्या.

मिनिटामिनिटाला थंडी वाढत चालली होती. मधूनच थबकत तो हातांच्या मुठींवर तोंडाने फुंकत होता. आणि तळवे काखेत दाबून धरत होता. पावलांसाठीही असंच काहीतरी करता आलं असतं तर किती बरं झालं असतं असं त्याला राहूनराहून वाटत होतं. आणि त्याच्या मनात विचार आला, आता कदाचित् ढग झरतील... बर्फ पडेल की त्याहूनही भयंकर- बर्फाळ पाऊस येईल...

चल पुढे, चल पुढे. दुसरं काहीही करता येण्यासारखं नाहीये.

अखेर त्याच्या पावलांना उतार जाणवला. आता हे मनाचे खेळ की तो खरंच घुमटाच्या माथ्यावर पोहोचलेला.

तो थबकला. जर तो माथ्यावर पोहोचलेला असेल, तर मग त्या हवामान संशोधन तळावरचे दिवे त्याला दिसायला हवे होते. त्यांच्या हातांतही असणार ते. त्यांची काजव्यांसारखी लुकलुक एव्हाना इथे तिथे नाचताना दिसायला हवी होती.

सेल्डनने अंधाराचा जणू सराव व्हावा म्हणून अंधारातच डोळे मिटून घेतले आणि मग पुन्हा उघडले. पण हा वेडेपणाच होता. डोळे मिटले तरीही तितकाच

काळोख, आणि उघडले तरीही तितकाच घट्ट काळोख होता... जराही उजळत नव्हता तो.

बहुधा लेगेन आणि त्याचे सारे लोक निघून गेलेले. आपले दिवे बरोबर घेऊन आणि तळावरचे दिवे विझवून गेले असावेत. किंवा मग आपण चुकीच्या घुमटावर पाय टाकला. किंवा मग त्याच घुमटाच्या विरुध्द बाजूलाच असू आपण. की भलतीच वाट धरली आपण? झाडीपासून भलत्याच दिशेला आलो की काय?

आता काय करावं?

आपण चुकीच्या दिशेला तोंड करून उभे असलो, तर मग तिथले दिवे निदान डावीकडे नाहीत उजवीकडे तरी दिसायला हवेत. पण तसं काहीच नव्हतं. चुकीच्या वाटेने आलो असलो तरीही आता पुन्हा उलट जाऊन झाडी सापडण्याची काही शक्यताच नाही. तिथून नवी वाट सापडण्याची काही शक्यताच नव्हती.

आता एकच आशा होती- की घेतलेली दिशाच बरोबर आहे हे गृहीत धरून समोर तळाच्या दिशेने चालत जायचं... ते सारे गेले असले तरीही तळ तिथेच असणार होता.

चला तर मग... निघा पुढे. यश येण्याची शक्यता अगदी थोडी होती पण तेवढीच तर शक्यता होती.

त्या तळापासून घुमटाच्या माथ्यापर्यंत पोहोचायला मघाशी त्याला अर्धा तास लागला असेल. त्याताल थोडा वेल क्लौझियाबरोबर तो रमतगमत चालला होता, झपझप नव्हे. आता या किर्र अंधारात त्याची चाल रमतगमत म्हणावी अशी नसली तरी संथच होती.

सेल्डन चिवटपणे पुढे सरकत राहिला. किती वाजलेत ते कळलं असतं तर बरं झालं असतं... त्याच्याकडे टाइमबॅन्ड होता- पण अंधारात- तो थबकला.

त्याच्याकडचा टाइमबॅन्ड ट्रॅन्टॉरियन होता, ज्यात सर्व टाइमबॅन्ड्समधे असते तशी दीर्घिकेची प्रमाणवेळ दिसत असे- आणि शिवाय ट्रॅन्टॉरचीही स्थानिक वेळ दिसत असे. बरेचदा टाइमबॅन्ड्स अंधारात दिसू शकणारे, फॉस्फोरेसन्ट असत. अगदी काळयाकुट्ट अंधारात, बेडरूममधेही वेळ दिसावी अशी सोय असे. हेलिकॉनियन टाइमबॅन्डमधे जर ही सोय होती तर ट्रॅन्टॉरियनमधे का नसेल?

त्याने शंकेनेच आपल्या टाइमबॅन्डकडे पाहिलं, आणि त्यावरचं एक लहानसं बटण चाचपडून दाबलं. टाइमबॅन्ड जरासा लकाकला आणि त्याला वेळ कळली- 1847. एवढ्यात रात्र पडली म्हणजे- बरोबर हिंवाळा होता. सर्वात लहान दिवस होऊन गेलेला की अजून दूर होता? इथे ग्रहाचा अक्ष किती कलतो? यांचं वर्ष किती मोठं असतं? आत्ता आपण विषुवववृत्तापसून किती दूर असू? या प्रश्नांना उत्तरं मिळणार नव्हती. पण हा प्रकाशाचा ठिपका दिसत रहाणार होता, हे महत्त्वाचं होतं.

तो आंधळा झाला नव्हता! त्या टाइमबॅन्डच्या त्या इवल्याशा प्रकाशामुळे त्याला नव्याने आशा वाटू लागली.

त्याच्या मनाने पुन्हा उचल घेतली. तो ठरवल्या दिशेनेच पुढे जात रहाणार होता. अर्धा तास चालत रहायचं. काहीच मिळालं नाही तर आणखी पाच मिनिटं- पाचच मिनिटं- जास्त नाही. तरीही काही सापडलं नाही तर मग थांबून विचार करायचा. म्हणजे अजून पस्तीस मिनिटं. तोवर फक्त चालण्यावर लक्ष केंद्रित करायचं. त्याने मनाशी थंडी झटकून टाकली, ऊब आल्यासारखं वाटून घेतलं, बुटांमधे त्याने पावलांची बोटं हलवली. अजून त्यात संवेदना शिल्लक होती.

तो चालत राहिला. आणि अर्धा तास संपला. तो विचारात पडून थोडा थांबला आणि मग आणखी पाच मिनिटं चालला.

आता मात्र काय करायचं ठरवायलाच हवं होतं. काहीच करण्यासारखं नव्हतं. तो कुठेही असू शकत होता... त्या घुमटाच्या दारापासून कितीही दूर असू शकत होता. किंवा कदाचित् अगदी हात दोन हात अंतरावर कुठल्याही दिशेला तो तळ असू शकेल... किंवा घुमटाचं दार असू शकेल. पण ते उघडं तर नक्कीच नसणार.

आता काय?

ओरडाआरडा करण्यात तरी काही अर्थ असेल का? चहुबाजूला घनघोर शांतता होती. वाऱ्याची शीळ तेवढी घुमत होती. कुणी प्राणी, पक्षी, किडेमकोडे या घुमटांवरच्या हिरवाईत असले तर या मोसमात, या रात्रीच्या अवेळी, या जागी तरी नक्कीच नव्हते. वारा अंगाला झोंबत-चावत होता. गारठलेला तो.

मी ओरडाआरडा करतच यायला हवं होतं साऱ्या रस्त्याने. या थंड हवेत आवाज चांगला दूरवर पोहोचला असता. पण आवाज ऐकायला इथे कुणी असेल तरी का?

घुमटाच्या आत त्याचा आवाज जाऊ शकेल कां? वर अपरसाईडवर चाललेली हालचाल टिपण्याची काही यंत्र, उपकरणं बसवलेली असतील का यांनी? आतल्या बाजूला पहारेकरी असतील कां?

हास्यास्पदच वाटतंय हे. पण त्याच्या पावलांचे आवाज त्यांना ऐकायला जायला हवेत नाही कां?

तरीही-

तो ओरडू लागला- "वाचवा! वाचवा! कुणीतरी मदत करा मला, ऐकतंय का कुणी?"

त्याची ती आरोळी जरा अवघडलेली, दबलेलीच होती. या काळयाकुट्ट अंधारावर ओरडणं म्हणजे वेडेपणाच वाटत होता.

पण अशी परिस्थिती ओढवलेली असताना, तसं करायला लाजणं है तर अधिकच वेडेपणाचं ठरलं असतं. आता त्याच्या मनात भयकंप उसळला. त्याने एक खोलवर, छातीभर श्वास गेतला आणि त्याने एक जोरदार किंकाळी फोडली. आणखी एक श्वास- आणखी एक किंकाळी... आणि मग आणखी एक.

सेल्डन थांबला. त्याला दम लागला. कुठेही काही दिसत नसताना तो मान फिरवूनफिरवून आजुबाजूला पाहू लागला. पण एखादा हलकासा प्रतिध्वनीही उमटत नव्हता. आता सूर्योदयाची वाट पाहात थांबण्यापलिकडे हाती काहीच नव्हतं. पण या ऋतूत इथली रात्र किती लांबीची असते? आणि थंडी कितपत वाढत जाईल बरं?

एक लहानसा बोचरा स्पर्श त्याच्या चेहऱ्याला झाला. मग थोड्या वेळाने आणखी एक.

त्या आंधळ्या तमातून अदृश्य हिमवर्षा होऊ लागली होती. आणि कुठेही आडोसा मिळण्याची शक्यताच नव्हती.

त्याला वाटलं, त्या जेट-डाऊनला आपण दिसलो असतो तर बरं झालं असतं... त्यांनी उचलून नेलं असतं मला. आत्ता मी कैदी असतो, पण निदान उबेत, सुखात बसलो असतो.

किंवा, ह्युमिनने ही नस्ती ढवळाढवळ केलीच नसती माझ्या बाबतीत तर मी हेलिकॉनवर केव्हाच पोहोचलो असतो. नजरकैदेत असतो- पण उबेत, सुखसोयीत बसलेलो असतो. आता बाकी काहीही नको... फक्त उबदार, सुखद आसरा हवा होता.

पण तो केवळ वाटच पाहू शकत होता या क्षणी. अंगाची जुडी करून तो खाली बसला... रात्र कितीही लांबलचक असली तरीही झोप काढण्याचं धैर्य होणार

नव्हतं. त्याने आपले बूट काढले आणि बर्फासारखी थंड पडलेली पावले जोरात चोळली. मग झटकन् पुन्हा त्याने बूट चढवले.

हे सतत करावं लागणार होतं. गरज पडली तर रात्रभर हातांचे तळवे, कान, नाक आणि पावलं चोळत रहावं लागणार होतं. तरच रक्ताभिसरण सुरू राहिलं असतं. पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे, झोप आवरायलाच हवी. नाहीतर मृत्यू ठरलेलाच.

आणि असा सगळा विचार मनाशी करताकरताच त्याचे डोळे मिटले, आणि बर्फाळ पावसाच्या थेंबातून त्याच्यावर झोप सांडली.

# सुटका

लेगेन, जेनर- ... याचं हवामानशास्त्रातील योगदान जरी महत्त्वाचं असलं तरीही ‘लेगेन विवाद’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रकरणामुळे ते महत्त्व दुय्यम ठरले. त्याच्या काही कृतींमुळे हॅरी सेल्डनचा जीव धोक्यात आला यात काहीही संशय नाही, परंतु या त्याच्या कृती सहेतुक होत्या की निर्हेतुक, की ते एक कारस्थान होते यावर अजूनही चर्चा झडतात. दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तीवाद होतात आणि यावर केले गेलेले अनेक चौकशीचे प्रयत्न फार काही निष्पन्न न होता वाया गेले. तरीही, या प्रकरणातून जे संशयाचे वातावरण निर्माण झाले त्यामुळे नंतरच्या वर्षांत लेगेनचे खाजगी आणि संशोधनात्मक जीवन विषारी झाले हे सत्य आहे...

... दीर्घिका ज्ञानकोष

२५.

डॉर्स वेनाबिलीने जेनर लेगेनला शोधायला सुरुवात केली तेव्हा दिवस अगदीच मावळला नव्हता. तिने लेगेनला अभिवादन केले तेव्हा ती थोडी अधीरपणेच बोलत होती. पण लेगेनने केवळ घशातल्या घशात गुरगुरून, मान किंचित हलवून तिला प्रतिसाद दिला.

“वेल,” ती उतावीळपणे पुढे बोलू लागली, “कसा काय होता तो वर?”

लेगेन त्याच्या कॉम्प्युटरमधे डाटा फीड करताकरता उत्तरला, “कोण कसा होता?”

“माझा लायब्ररीचा विद्यार्थी, हॅरी. हॅरी सेल्डन. तो तुझ्याबरोबर आलेला. काही मदत झाली का त्याची?”

लेगेनने कॉम्प्युटरच्या कीबोर्डवरून हात बाजूला केले आणि गर्रकन खुर्ची वळवत म्हणाला, “तो हेलिकॉनियन? काहीच उपयोग झाला नाही त्याचा. त्याला कशात रसच नव्हता. तिथं पाहायला काही नव्हतं तरी तो इकडेतिकडे कसले देखावे पाहात होता माहीत नाही. विचित्रच आहे तो. त्याला कशासाठी वर पाठवलंस तू?”

“मी नाही पाठवलं. त्यालाच जायचं होतं. मला काही कळत नाही. तो फारच रस दाखवत होता तेव्हा. आहे कुठे तो?”

लेगेनने खांदे उडवले. “मला काय माहीत? असेल कुठेतरी.”

“तुमच्याबरोबर खाली आल्यानंतर कुठे गेला तो? काही बोलला?”

“तो आमच्याबरोबर नाही आला. सांगितलं ना त्याला कशातच रस नव्हता.”

“मग कधी आला तो खाली?”

“मला नाही माहीत. मी काय त्याच्यावर लक्ष ठेवून नव्हतो. खूप कामं होती मला. वर दोनेक दिवसांपूर्वी वादळ आणि पाऊसवगैरे झाला असणार. अपेक्षा नव्हती तशा. आमच्या यंत्रांतून आम्हाला या अचानक पावसाचं कारण कळलं नाही. आणि आज ऊन पडेल अशी अपेक्षा असतानाही जराही ऊन नव्हतं हेसुध्दा गोंधळाचंच आहे. चल आता, मी त्यातून काहीतरी निष्कर्ष निघतील का पाहातोय. आणि तू माझा वेळ खातेयस.”

“म्हणजे तो खाली कधी आला ते तू पाहिलं नाहीस?”

“हे बघ. माझं त्याच्याकडे अजिबात लक्ष नव्हतं. तो मूर्ख धड गरम कपडेही घालून आला नव्हता. अर्ध्या तासापेक्षा जास्त तो तिथली थंडी सहन करू शकणार

नाही हे तर मला दिसतच होतं. मी त्याला एक स्वेटर दिलं पण पाय आणि पावलांसाठी त्याचा काहीच उपयोग नव्हता. मी एलेवेटर त्याच्यासाठी उघडा ठेवला आणि खाली कसं जायचं ते त्याला समजावून सांगितलं. तो खाली गेल्यानंतर एलेवेटर आपोआप वर येईल हेही सांगितलं. अगदी साधं होतं ते. मला खात्री आहे, थंडी असह्य होऊन तो खाली गेला असणार. आणि मग नंतर कधीतरी आम्हीही खाली आलो.''

''पण तो नक्की कधी खाली गेला ते तुला माहीत नाही?''

''नाही माहीत. सांगितलं ते मी तुला. मी कामात होतो. आम्ही निघालो तेव्हा तो तिथे नव्हता हे नक्की. आणि तोवर अंधार पडू लागलेला. बर्फाचा पाऊस पडण्याची शक्यता दिसत होती. म्हणजे तो नक्कीच खाली गेला असणार.''

''दुसऱ्या कुणी पाहिलं त्याला खाली जाताना?''

''मला माहीत नाही. क्लौझियाने पाहिलं असेल कदाचित्. ती थोडा वेळ त्याच्याबरोबर होती. तिला विचार ना.''

क्लौझिया तिच्या घरीच होती, नुकतीच शॉवर घेऊन बाहेर आलेली.

''खूप थंडी होती वर,'' ती म्हणाली.

डॉर्सने विचारलं, ''अपरसाईडवर तू हॅरी सेल्डनसोबत होतीस का?''

क्लौझियाच्या भुवया उंचावल्या, ''हो. थोडावेळ होते. त्याला इकडेतिकडे भटकायचं होतं, आणि वरच्या वनस्पतींबद्दल प्रश्न विचारायचे होते त्याला. एकदम हुषार माणूस आहे हं तो, डॉर्स. त्याला सगळ्या गोष्टींत रस होता. मला जेवढं जमलं तेवढं मी त्याला सांगितलं. मग लेगेनने हाक मारली म्हणून मी परत गेले. तो कसाय माहीतै ना- वैतागलेलाच होता. हवामान वाईट होतं आणि तो-''

डॉर्सने तिला मधेच तोडलं, “मग म्हणजे तो एलेवेटरमधून परतल्याचं तू पाहिलं नाहीस?”

“लेगेनने हाक मारल्यानंतर मी गेले त्यानंतर तो मला दिसलाच नाही.- पण तो इथे आलाच असेल परत. आम्ही निघालो तेव्हा तो नव्हता तिथे.”

“पण मला तो कुठेही सापडत नाहीये.”

क्लौझिया थोडी काळजीत पडलेली दिसली. “हो? पण तो इथेच खाली कुठेतरी असेल- नक्कीच.”

“नाही. तो खालीच असेल असं काही सांगता येत नाही.” डॉर्स म्हणाली. आता तिची चिंता तिच्या मुद्रेवर स्पष्ट झळकू लागली. “जर तो वरच राहिला असेल तर?”

“शक्यच नाही. नव्हता तो तिथे. आम्ही अर्थातच त्याच्यासाठी इकडेतिकडे पाहिलं निघताना. पण लेगेनने त्याला खाली कसं जायचं ते सांगून ठेवलेलं. त्याच्या अंगावर पुरेसे गरम कपडे नव्हते. आणि हवा एकदम बेकार होती. लेगेनने त्याला सांगितलेलं की थंडी वाजायला लागली तर आमच्यासाठी न थांबता सरळ खाली जा. त्याला थंडी तर वाजत होतीच. ते मला दिसत होतं! मग तो खाली नाही जाणार तर काय करणार?”

“पण कुणीच त्याला खाली जाताना प्रत्यक्ष पाहिलेलं नाही. वर असताना त्याला काही त्रास झालेला का?”

“काहीच नाही. मी त्याच्याबरो होते तेवढ्या वेळात तर नाहीच. त्याला थंडी वाजत होती, यापलिकडे बाकी सर्व ठीक होतं.”

आता डॉर्स चांगलीच अस्वस्थ झालेली. ती म्हणाली, “त्याला कुणी खाली जाताना पाहिलं नाही- तो अजूनही वरच असू शकेल. आपण वर जाऊन शोधायला हवं असं नाही वाटत तुला?”

क्लौझिया जरा विचलित होत म्हणाली, “आम्ही निघण्यापूर्वी तो कुठे दिसतोय का ते पाहिलं होतं. तोपर्यंत उजेडही होता. आणि खरंच तो कुठेही जवळपास नव्हता.”

“तरीही पाहायला हवं.”

“पण मी तुला वर नाही नेऊ शकणार. मी फक्त इंटर्न आहे आणि अपरसाईडचा घुमट उघडण्याची अंकांची किल्ली माझ्याकडे नसते. तुला डॉ. लेगेनकडेच जावं लागेल त्यासाठी.”

## २६.

आता लेगेन सहजगत्या वर येणार नाही हे डॉर्सने गृहीतच धरलं. त्याला जबरदस्तीनेच न्यावं लागेल.

तिने प्रथम लायब्ररी आणि डायनिंग हॉल वगैरेतून चक्कर मारून पुन्हा एकदा खात्री केली. मग ती सेल्डनच्या खोलीवर आली. तिने दरवाजा ठोकला. तो उघडला गेला नाही तेव्हा तिने तिथल्या मॅनेजरकडून दार उघडून घेतलं. सेल्डन आत नव्हताच. मग गेल्या काही आठवड्यात तो ज्यांच्याज्यांच्या ओळखीचा झालेला त्या सर्वांकडे तिने त्याची चौकशी केली. कुणीच त्याला आज पाहिलं नव्हतं.

म्हणजे आता लेगेनला वर अपरसाईडवर घेऊन जाणं भाग होतं. एव्हाना रात्र पडली होती. तो अगदी निकराने तिला विरोध करणार हे ठरलेलंच. आणि कितीवेळ त्याच्याशी वाद घालण्यात घालवायचा हा प्रश्नच होता. हॅरी सेल्डन वर अडकून

पडलेला असेल- त्या मरणाच्या थंडीत, बर्फाचा पाऊस पडत असताना... वेळ घालवून चालणार नव्हता.

तिच्या मनात एक विचार आला. आणि ती धावतच विद्यापीठाच्या एका कॉम्प्युटरकडे गेली. या कॉम्प्युटरमधे सगळे विद्यार्थी, शिक्षक आणि इतर कर्मचारी काय करतात याचा माग ठेवला जात असे.

तिची बोटं कीबोर्डवर धावू लागली. आणि जे हवं ते तिला झटक्यात सापडलं.

ते तिघेजण होते. विद्यापीठ परिसराच्या दुसऱ्या भागात होते ते. तिने एका ग्लाईडकार्ट- घसरगाडीला बोलवून घेतलं आणि तिथे पोहोचली. त्यांचे पत्ते सापडले होते. तिघांपैकी एकजण तरी नक्कीच हाती लागेल.

नशिबाने सात दिली. पहिलाच दरवाजा ठोठावला त्यावर ‘ओळख दाखवा’चा दिवा लागला. तिने आपला ओळखक्रमांक त्यावर टाकला. तिच्या विभागाचं नावही आलं. दरवाजात एक जाडाजुडगा मध्यमवयीन पुरुष उभा राहिला. जेवायला जाण्याआधी तो तयार होत होता. त्याचे गडद तपकिरी केस जरासे विस्कटलेले. आणि त्याने शर्टही चढवला नव्हता.

तो म्हणाला, “सॉरी. मी जरा अवतारातच आहे. काय हवंय तुम्हाला डॉ. वेनाबिली?”

ती धापा टाकल्यासारखी बोलू लागली, “तुम्ही रॉजेन बेनास्ट्रा, प्रमुख भूकंपशास्त्रज्ञ, बरोबर?”

“होय.”

“ही अत्यंत निकडीची परिस्थिती आहे असं समजा. मला गेल्या काही तासातले अपरसाईडवरचे भूकंपनाचे रेकॉर्डस् पाहायचेत.”

बेनास्ट्रा तिच्याकडे पाहातच राहिला. “कां? काहीच झालेलं नाहीये. मला समजलंच असतं, तसं काही असतं तर. भूकंपाचे आलेख दिसतच रहातात आम्हाला.”

“मी कुठल्याही उल्कापाताबद्दल वगैरे बोलत नाहीये.”

“मीही नाही बोलत त्याबद्दल. त्यासाठी सेस्मोग्राफ लागत नाही. मी तडे वगैरे जाण्याबद्दल बोलतोय.”

“तेही नाही. प्लीज, मला सेस्मोग्राफ दाखवा. आणि तो मला वाचून दाखवा. हा जीवनमरमाचा प्रश्न आहे.”

“मला जेवायला जायचंय कुणाबरोबर तरी.”

“हा खरोखर जीवनमरणाचा प्रश्न आहे. खरंच सांगतेय.”

बेनास्ट्रा म्हणाला, “मला कळत नाही...” पण डॉर्सच्या तिखट नजरेपुढे त्याचे शब्द विरून गेले. त्याने तोंड पुसून घेतले. निरोपाच्या रिले मशीनवर निरोप ठेवला आणि मग धडपडत एक शर्ट चढवला. डॉर्सच्या निर्दय आग्रहामुळे ते दोघे धावतच भूकंपमापन इमारतीपुढे जाऊ पोहोचले. डॉर्सला सेस्मॉलजीचं शून्य ज्ञान होतं. तिने विचारलं, “हे काय? आपण खाली का चाललोत?”

“आपण रहिवासी क्षेत्राच्या खाली चाललोत. सेस्मोग्राफ हा अगदी तळच्या खडकावर रुतवावा लागतो. शहराच्या कोलाहलाच्या, आणि हालचालींमुळे उठणाऱ्या तरंगांच्या खाली जावं लागतं.”

“पण वर अपरसाईडवर काय चाललंय ते इतक्या खालून कसं कळणार?”

“सेस्मोग्राफची जोडणी घुमटातल्या एखाद्या ठिकाणी बसवलेल्या प्रेसर ट्रान्सड्यूसर्सशी केलेली असते. अगदी एखाद्या वाळूच्या कणाचाही मारा झाला तर

तेही मोजमाप इंडिकेटरवर दिसतं. अगदी जोराच्या वाऱ्यामुळे घुमटांवर जो दाब पडतो तोही कळतो. आणि-”

“होय होय,” डॉर्स घाईघाईने म्हणाली. आता ही उपकरणं, यंत्र कशी छान आहेत वगैरेवर व्याख्यान नको होतं तिला. “मानवी पावलांची चाहूल कळते का यातून?”

“मानवी पावलांची चाहूल?” बेनास्ट्रा गोंधळून गेला. “पण अपरसाईडवर ते कसं असेल?”

“अर्थात शक्य आहे. आजच हवामान शास्त्रज्ञांचा एक अख्खा चमू अपरसाईडवर दुपारी गेला होता.”

“ओः. पावलांचा वेध मिळणं ... फारसं लक्षात येण्यासारखं नाही ते.”

“नीट पाहिलं तर लक्षात येईल. आणि माझी इच्छा आहे, तेच तुम्ही आता करावं.”

तिच्या स्वरातल्या आज्ञार्थाचा बेनास्ट्राला थोडा रागही आला असेल, पण तसं काही त्याने दर्सवलं नाही. त्याने एका बटणाला स्पर्श केला आणि कॉम्प्युटरचा पडदा झळाळून उठला.

अगदी उजवीकडच्या पट्टीत मध्यावर एक गोल ठिपका होता प्रकाशाचा. तिथून एक बारीकशी आडवी रेष निघून डावीकडे स्क्रीनच्या कडेपर्यंत जात होती. किंचितशी थरथरत होती ती रेष. कधीकधी अचानक तिला हलकेसे गचके बसत होते. डॉर्स भूल पडल्यासारखी त्या रेषेकडे पाहात राहिली.

बेनास्ट्रा म्हणाला, “ही रेष जवळपास अशीच, इतकीच शांत असते. जी काही थरथर इथे दिसते आहे ती हवेचा दाब, पावसाचे थेंब, आणि दूरवरच्या कुठल्याही यंत्रसामग्रीच्या थरथरीमुळे. वर तिथे काहीच नाहीये.”

“बरं, पण काही तासांपूर्वीच्या नोंदींचं काय? उदाहरणार्थ, पंधराशेची वेळ होती तेव्हाची नोंद तपासून पहा. असतात ना तुमच्याकडे नोंदी?”

बेनास्ट्राने कॉम्प्युटरला आवश्यक त्या सूचना दिल्या आणि एक दोन सेकंदांसाठी पडद्यावर हलकल्लोळ माजल्यासारखं काहीतरी घडलं. मग तो स्थिरावला आणि पुन्हा एकदा ती आडवी रेष दिसू लागली.

“मी ती शक्य तितकी जवळ आणतो तपासायला,” बेनास्ट्रा पुटपुटला. आता ते गचके अधिकच स्पष्ट दिसू लागले. आणि डावीकडे सरकत जाताना त्यांचा पॅटर्न बदलत गेला.

“हे काय आहे?” डॉर्स म्हणाली, “मला सांगा.”

“वर लोक होते असं म्हणताय ना तुम्ही, वेनाबिली, म्हणजे मग त्यांच्या पावलांचा बदलता भाग, बुटांची दणदण हेच यात दिसत असावं. वर लोक होते हे माहीत नसतं तर मला हे कशामुळे झालंय ते कळलंही नसतं, मला वाटतं. या तरंगांना आम्ही निरुपद्रवी समजतो. यांच्यामुळे काहीही धोका नसतो हे माहीत आहे आम्हाला.”

“किती माणसं होती काही सांगू शकाल?”

“असं बघून तर नाही कळणार. आपल्याला सर्वांचा एकत्रित परिणाम इथे पाहायला मिळतोय.”

“तुम्ही ‘बघून’ नाही कळणार, म्हणताय. पण हा एकत्रित परिणाम कॉम्प्युटरकरवी विश्लेषण करून घेता येईल कां?”

“शंका आहे मला. बाकी सारा जो कल्लोळ आहे, त्यातून हा परिणाम अगदीच थोडासा जाणवणारा आहे. त्यातून काही मिळालंच तरीही फारसं विश्वासार्ह नसेल.”

“बरं तर. थोडं पुढच्या वेळेकडे सरका. हा पावलांचा परिणाम जिथे थांबतो तिथवर न्या. फास्ट फॉर्वर्ड करता येईल का हे?”

“तुम्ही म्हणताय तसं केलं तर फक्त या सरळ रेषेचा एक अंधुक फटकारा दिसेल. वरखाली जरासं धुकट दिसेल. मी एक करू शकतो. पंधरा पंधरा मिनिटांच्या पायऱ्यांनी हे पुढे न्यायचं, आणि पाहायचं असं करायला जमेल.”

“छानच. करा ना मग तसं!”

दोघेही पडद्याकडे पाहात राहिले. बेनास्ट्रा अखेर म्हणाला, “पहा, आता काहीच दिसत नाहीये, पाहिलंत?”

पुन्हा एकदा ती रेष दिसू लागली. आता फार काही थरथर नव्हती. एखादा चुकार गचका येत होता.

“पावलांचा परिणाम दिसायचा कधी थांबला?”

“दोन तासांपूर्वी. थोडा जास्त असेल.”

“आणि तो थांबला तेव्हा आधीपेक्षा कमी थरथर होती कां?”

बेनास्ट्रा चकित होऊन पाहातच राहिला, “ते मी काय सांगू? अगदी बारकाईने केलेलं विश्लेषणही असं काही सांगू शकणार नाही.”

डॉर्सने ओठ घट्ट मिटून घेतले. मग ती म्हणाली, “तू हे जे काय ट्रान्सड्यूसर काय आहे म्हणतोस ते हवामानसंशोधन तळाजवळच आहे कां?”

“हो. तिथेच आहेत ती उपकरणे. आणि हवामानशास्त्रज्ञांचा चमू तिथेच जमला असला पाहिजे.”

आणि मग अविश्वसून त्याने विचारलं, “तुम्हाला तिथून काही अंतरावर कुणी आहे का असं पाहायचंय की काय? एकेक करून?”

“नाही. इथेच थांबा. पण पंधरा मिनिटांच्या अंतराने पुढे जात रहा. जो कुणी मागे राहिला असेल तो प्रयत्न करून या तळापर्यंत पोहोचलाही असेल कदाचित्.”

बेनास्ट्राने मान झटकली आणि तो काहीतरी पुटपुटला.

पडद्यावरील रेष सरकली आणि डॉर्सने झटकन् विचारलं, “ते काय आहे?” ती बोटाने निर्देश करीत होती.

‘माहीत नाही. असंच काहीतरी.”

“नाही. पहा, ते बरोबर लयीत येतंय. एका माणसाच्या पावलांचा परिणाम दिसतोय का?”

“असेलही, पण इतरही काहीही असू शकतं. डझनभर कारणं असू शकतात.”

“पावलांमधला अवकाश जेवढा असतो तेवढाच अवकाश आहे की नाही या थरथरीमध्ये?” मग क्षणभर थांबून ती म्हणाली, “थोडं पुढे जा बरं.”

तो पुढे गेला आणि मग पडदा स्थिरावल्यावर ती म्हणाली, “ही जी काही अनियमितता आहे ती जरा मोठीच होतेय असं नाही वाटत?”

“शक्य आहे. आपण मोजू शकतो.”

“नको मोजायला. दिसतंय की ते वाढतंय. पावलांची चाहूल ट्रान्सड्यूसरकडे सरकतेय. जा आणखी पुढे. कुठे थांबतेय ते पाहू.”

थोड्या वेळाने बेनास्ट्रा म्हणाला, “वीसेक मिनिटांपूर्वी थांबलंय ते.” मग सावधपणे त्याने पुढे म्हटलं, “जे काही असेल ते.”

“ती पावलांचीच चाहूल होती,” डॉर्स प्रचंड खात्रीने म्हणाली. “वर एक माणूस आहे, आणि तू आणि मी इथे फुकट वेळ दवडतोय, तोवर तो खाली

कोसळलाय. आता गारठून मरेल तो. आता जे काय असेल ते म्हणत राहू नकोस. हवामान संशोधनवाल्यांना फोन कर आणि मला जेनर लेगेनशी जोडून दे. जीवनमरणाचा प्रश्न आहे, सांगतेय मी. तसंच सांग!"

बेनास्ट्राचे ओठ थरथरत राहिले. आता या विचित्र, हट्टी बाईला विरोध करण्याच्या पलिकडे पोहोचलेला तो.

त्याने लेगेनला फोन लावला आणि त्याचा होलोग्राम निरोपाच्या तबकडीवर दिसू लागला. तोही जेवताजेवता उठून आलेला दिसत होता. त्याच्या एका हातात नॅपकिन होता आणि खालच्या ओठावर काहीतरी तेलकट लागलेलं.

त्याचा लांबोळका चेहरा भयंकर चिडका दिसत होता. "जीवन-मरण? काय चाललंय काय? तुम्ही कोण?" तेवढ्यात त्याला डॉर्स दिसली. ती बेनास्ट्राच्या जवळ सरकलेली. तो म्हणाला, "परत तूच. हे निव्वळ त्रास देणं चालवलं आहेस तू."

डॉर्स म्हणाली, "तसं अजिबात नाहीये. मी रॉजेन बेनास्ट्राशी बोलले आहे- हा आपल्या विद्यापीठाचा प्रमुख भूकंपशास्त्रज्ञ आहे. तू आणि तुझे लोक अपरसाईडवरून खाली आल्यानंतर तिथे एका माणसाच्या पावलांची चाहूल दिसत राहिली होती. अगदी स्वच्छ. आणि तो आहे माझा विद्यार्थी हॅरी सेल्डन- जो तुझ्या जबाबदारीवर वर गेला. आणि आता अगदी खात्रीने तिथे थंडीने काकडून कोसळून पडलाय अपरसाईडवर. आणि फार काळ जगणारही नाही कदाचित्. त्यामुळे तू मला आत्ताच्या आत्ता वर घेऊन चलायचंय. आवश्यक ती साधनं बरोबर घेऊन नीघ. तू तसं केलं नाहीस तर मी विद्यापीठाच्या सुरक्षाविभागाकडे जाईन. विद्यापीठाच्या अध्यक्षांकडे जाईन गरज पडली तर. मी काहीही करून वर जाई. आणि तू केलेल्या उशीरामुळे हॅरी सेल्डनला काही झालंच तर मी तुला निष्काळजीपणा, ना-लायकी या कोणत्याही आरोपावरून पकडून देईन. जे काही लागू पडेल ते वापरून तुझी सारी

प्रतिष्ठा नष्ट करीन. शैक्षणिक क्षेत्रातून तू बाद होशील असं पाहीन. आणि तो मेला असला तर, मग निष्काळजीपणामुळे मृत्यूस कारणीभूत झाल्याचा आरोप लागेलच तुझ्यावर. किंवा त्याहूनही वाईट- कारण मी तुला तो मरण्याची शक्यता आहे हे स्पष्ट सांगितलंय.

जेनर संतप्त झालेला. तो बेनास्ट्राकडे वळून म्हणाला, "तुला तसं दिसलं-"

पण डॉर्सने त्याचं वाक्य तोडलं. "त्याने तसं मला सांगितलंय आणि तेच मी तुला सांगितलंय. तू त्याला गोंधळात टाकायचा प्रयत्न करशील तर याद राख. तू येतो आहेस की नाही? आत्ताच्या आत्ता?"

"तुझी काहीतरी चूक होतेय असा काही विचार करून पाहिलास का?" जेनरचे ओठ संतापाने पातळ झालेले. "तुला हे माहीत आहे का की ही जर खोटीच आवई असेल, तर मी तुझं काय करू शकतो? प्रतिष्ठा नष्ट होणे- दोन्ही बाजूंनी शक्य आहे."

"खूनाचा आरोप नाही." डॉर्स उत्तरली, "हकनाक त्रास देण्याचा आरोप सोसेन मी. खुनाचा आरोप ठेवून चाललेला खटला तू सोसणार आहेस?"

जेनर लालेलाल झाला. या धमकीपेक्षा शरण जावं लागतंय यानेच त्याचा भडका उडालेला. "मी येईन, पण तुझा हा विद्यार्थी गेले तीन तास याच घुमटाखाली सुरक्षित होता असं सिध्द झालं तर मी तुला अजिबात दयामाया दाखवणार नाही, हे लक्षात ठेव, बाई."

२७.

ते तिघे एकदम सुन्न शांततेत एलेवेटरमधे गेले. लेगेन त्याचं जेवण अर्ध्यावर टाकून, बायकोला काही धड न सांगताच टेबलवरून उठून आला होता. बेनास्ट्राचं

जेवण झालेलंच नव्हतं. आणि बहुतेक त्याने त्याच्या मैत्रिणीला नाराज केलं होतं... तेही नीट काही कारण न देता. डॉर्स वेनाबिलीनेही काही खाल्लं नव्हतं. आणि या तिघांमध्ये तीच सर्वात दुःखी दिसत होती, ताणाखाली होती. तिने सोबत एक थर्मल ब्लँकेट घेतलेलं आणि दोन फोटॉनिक फाउंट्स.

ते अपरसाईडच्या दरवाजात पोहोचले तेव्हा लेगेनने दातओठ आवळत आपला ओळखक्रमांक त्यात टाकला आणि दार उघडलं. थंडगार बोचरा वारा त्यांच्यावर आदळलाच. बेनास्ट्रा घशातल्या घशात गुरगुरला. त्यांनी कुणीही पुरेसे गरम कपडे घातले नव्हते. पण वर जास्त काळ रहाण्याचा त्या दोघां पुरुषांचा अजिबात विचार नव्हता.

डॉर्स उद्गारली, “बर्फ पडतोय.”

लेगेन म्हणाला, “ओलसर बर्फ आहे ते. अगदी गोठणबिंदूजवळचंच तापमान आहे. अगदी ठारच मारेल असं फ्रॉस्ट नाहीये.”

“ते यात कोण कितीवेळ पडून रहातंय त्यावर अलंबून राहील नाही कां?” डॉर्स म्हणाली, “वितळणाऱ्या बर्फात भिजत पडून रहाण्याने काही फार मदत होत नाही.”

लेगेन गुरगुरला. “बरं, आहे कुठे तो?” तो वैतागूनच अंधारात नजर खिळवत उभा राहिला. मागच्या दारातल्या उजेडामुळे पुढ्यातला अंधार अधिकच गडद झालेला.

डॉर्स म्हणाली, “डॉ, बेनास्ट्रा, हे ब्लँकेट जरा माझ्या हातातून घ्या. आणि डॉ. लेगेन, ते मागचं दार लॉक न लावता ओढून घ्या.”

“त्यावर ऑटोमॅटिक लॉक नाहीये. आम्हाला काय वेडे समजता काय?”

“नसालही. पण तुम्ही ते आतून बंद करून बाहेरच्यांना बाहेर तर ठेवू शकताच ना. जेणेकरून बाहेरच्याला घुमटात आत शिरता येऊ नये.”

“कोणी बाहेर असलाच तर दाखवाच आता. दाखवाच मला.” लेगेन म्हणाला.

“तो कुठेही अशू शकतो.” डॉर्सने फोटॉनिक फाउंटस् गुंडाळलेली दोन्ही मनगटं वर धरली.

“आपल्याला सगळीकडेच तर शोधता येणार नाही.” बेनास्ट्रा केविलवाण्या स्वरात बोलला.

ते फाउंट्स लख्ख उजळले आणि त्यांचा उजेड सारीकडे पसरला. हिमकणिका काजव्यांच्या प्रचंड थव्यासारख्या लखलखू लागल्या. आता तर काही दिसणं आणखी कठीण झालं.

“पावलांची चाहूल वाढत गेली होती.” डॉर्स म्हणाली, “तो नक्कीच ट्रान्ड्युसरच्या जवळ येत होता. तो कुठे ठेवलाय?”

“मला नाही माहीत,” लेगेन खेकसला, “ते माझ्या कार्यक्षेत्राच्या बाहेर आहे. माझ्यावर जबाबदारी नाही त्याची.”

“डॉ. बेनास्ट्रा?”

बेनास्ट्राचं उत्तर डळमळीत होतं. “मलाही नक्की माहीत नाही. खरं सांगायचं तर मी कधीच इथे वर आळेलो नाहीये पूर्वी. मी येण्यापूर्वीच तो तिथे बसवला गेला होता. कॉम्प्युटरमधे असेल नोंद. पण ते पाहावं असं कधी सुचलं नाही.- मला खूप थंडी वाजतेय. माझा इथे काहीच उपयोग नाही.”

“तुम्हाला इथे थांबावंच लागेल.” डॉर्सने ठामपणे सांगितलं. “माझ्यामागे या. मी या दरवाजाभोवतीच्या गोलात बाहेर जात फिरणार आहे.”

“या बर्फात काही दिसतच नाहीये.” लेगेन म्हणाला.

“बर्फ नसता तर इतक्यात तो आपल्याला दिसला असता. नक्कीच. तरीही- काही वेळ तर लागेलच. तेवढं सहन करावंच लागेल.” पण तिच्या शब्दांतला आत्मविश्वास तिच्या मनात नव्हता.

ती चालायला लागली. दूरवर प्रकाश पडेल अशा तऱ्हेने हात वर धरून बर्फात कुठेतरी काळसर आकार दिसतोय का हे नजरेने शोधत फिरू लागली.

आणि बेनास्ट्रा ओरडूनच म्हणाला, “ते काय आहे तिथं?”

डॉर्सने दोन्ही फाउंटसचा प्रकाश एकत्र आणत एकच झोत तयार केला. आणि त्याने दाखवलेल्या दिशेला ती धावत निघाली. ते दोघेही धावले.

तो सापडला होता. अंगाची जुडी करून, चिंब भिजून पडलेला. दारापासून दहा मीटर अंतरावर, आणि एका यंत्रापासून पाच मीटरवर. डॉर्सने त्याची नाडी लागतेय का पाहायचा प्रयत्न करण्याआधीच, तिच्या स्पर्शानिशी तो जरासा थरथरला आणि कण्हला.

“ते ब्लँकेट द्या माझ्याकडे, डॉ. बेनास्ट्रा,” थकलेल्या पण ताण ओसरलेल्या स्वरात ती बोलली. “त्याला त्यावर उचलून ठेवा. मी त्याला गुंडाळून घेते. मग त्याला तसंच खाली नेऊ.”

एलेवेटरमधे सेल्डनच्या देहाच्या गुंडाळीतून वाफा निघत होत्या. ब्लँकेटच्या आत त्याच्या रक्ताचं तपमान वाढत गेलं.

डॉर्स म्हणाली, “त्याच्या खोली आपण पोहोचलो की मग- डॉ. लेगेन तुम्ही डॉक्टरला घेऊन या. चांगला डॉक्टर आणा आणि तो लगोलग येईल असं पहा. डॉ. सेल्डन यातून फार काही गुंतागुंत न होता वाचला तर मी कशाबद्दलही काही बोलणार नाही. पण तो व्यवस्थित जगला तरच. लक्षात ठेव-”

“मला भाषण द्यायची गरज नाही,” लेगेन थंडपणे म्हणाला, “मलाही वाईट वाटतंय. आणि मी जेजे शक्य आहे ते करीन,- पण माझी एकच चूक झाली- या माणसाला वर यायची परवानगी दिली हीच चूक.”

ब्लँकेटमधे जराशी हालचाल झाली आणि अगदी बारीकसा आवाज फुटला.

बेनास्ट्रा दचकला, कारण सेल्डनचं मस्तक त्याच्या हाताच्या दुमडीवर टेकलेलं. तो म्हणाला, “तो काहीतरी बोलायचा प्रयत्न करतोय.”

डॉर्स म्हणाली, “ऐकलं मी. तो म्हणतोय- इथे काय चाललंय?”

डॉर्सला थोडंसं हसू आलंच. अगदी स्वाभाविकसा प्रश्नच होता तो.

२८.

डॉक्टरला फारच आनंद झाला.

“मला कधी अशी केस पाहायला मिळाली नव्हती. उघड्यावर आल्यामुळे तब्येत बिघडण्याचे प्रसंग ट्रॅन्टॉरमधे कुणावरच येत नाहीत.” तो म्हणाला.

“ते ठीक आहे,” डॉर्स जरा ताठर स्वरातच बोलू लागली, “तुम्हाला अशी संधी मिळाली याचा आनंदच आहे मला... पण म्हणजे डॉ. सेल्डनवर कोणते उपचार करायचे हे तुम्हाला माहीत नाही असं समजायचं कां?”

तो टक्कल पडलेला, छोटीशी पिकलेली मिशी असलेला वयस्कर डॉक्टर रागावलाच. “अर्थात माहीत आहे. बाहेरच्या जगांत उघड्यावर आल्यामुळे त्रास होण्याच्या अनेक घटना घडतात. रोजचंच आहे ते. आणि मी बरंच वाचलंय त्याबद्दल.”

एक अँटीवायरल सेरम आणि मायक्रोवेव गुंडाळयांचा वापर एवढेच उपचार करायला लागणार होते.

“एवढ्याने होऊन जाईल सगळं नीट,” डॉक्टर म्हणाला. “बाहेरच्या जगांत ते बरंच कायकाय करतात. हॉस्पिटल्समधे बरेच काही उपचार करतात. पण आपल्याकडे ट्रॅन्टॉरवर ते काहीच नाही. हे मी उपचार सांगतोय ते तसे जरा सौम्य केससाठीच आहेत. आणि त्यांचा उपयोग होईल अशी मला खात्री आहे.”

डॉर्सला नंतर विचार करताना वाटून गेलं, सेल्डन बाहेरच्या जगातला होता म्हणूनच इतक्या चांगल्या प्रकारे यातून लवकर वाचला, सावरला. अंधार, थंडी आणि बर्फ हे त्याला अगदीच अनोळखी नव्हतं. एकादा ट्रॅन्टॉरियन तर अशा परिस्थितीत मेलाच असता- शारीरिक इजेपेक्षा मानसिक धक्क्याने मेला असता.

अर्थात ती स्वतः ट्रॅन्टॉरियन नसल्यामुळे हे तिला खात्रीने म्हणता आलं नसतं म्हणा.

तिने एक खुर्ची ओढून घेतली आणि विचार करतकरतच हॅरि सेल्डनच्या पलंगाजवळ ती वाट पाहात बसून राहिली.

२९.

दुसऱ्या दिवशी सकाळी सेल्डन जागा झाला आणि डॉर्सकडे पाहू लागला. ती बुकफिल्म पाहात, नोट्स काढत बेडजवळ बसून होती.

त्याने अगदी नेहमीसारख्या आवाजात विचारलं, “तू अजून इथेच आहेस, डॉर्स?”

तिने बुकफिल्म खाली ठेवली. “तुला एकटं सोडू मी, शक्य आहे? माझा कुणावरही विश्वास नाही.”

“मला वाटतं, मी जेव्हाजेव्हा जागा झालो, तेव्हातेव्हा तुला इथेच पाहिलं. तू सारा वेळ इथेच आहेस?”

“जागी किंवा झोपलेली, पण होतेच.”

“आणि तुझे वर्ग?”

“माझा साहाय्यक थोडावेळ सांभाळेल सगळं.”

डॉर्सने पुढे झुकून हॅरीचा हात हातात घेतला. त्याचं अवघडलेपण लक्षात येताच तिने तो सोडून दिला. अखेर तो बेडमधे होता.

“हॅरी, काय झालं? मी किती घाबरून गेलेले.”

सेल्डन म्हणाला, “मला एक कबुली द्यायची आहे.”

“काय झालं, हॅरी?”

“मला वाटलं होतं- की तू सुध्दा या कारस्थानाचा भाग आहेस की काय-”

“कारस्थान?” तिने दचकून विचारलं.

“म्हणजे, मला इथून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातून बाहेर न्यायचं, अपरसाईडवर घेऊन जायचं आणि मग सम्राटाच्या सैन्याने मला उचलायचं हे कारस्थान.”

“पण अपरसाईडचा घुमट विद्यापीठ कार्यक्षेत्राच्या बाहेर येतच नाही. ट्रॅन्टॉरवर एखाद्या प्रभागाचं कार्यक्षेत्र जमिनीवरच्या जागेपासून ते पार आकाशापर्यंत धरलं जातं.”

“ओः. हे मला नव्हतं माहीत. पण तू माझ्याबरोबर आली नाहीस- कामात आहेस म्हणालीस आणि मी जेव्हा भेदरून संशयाने पछाडलो होतो तेव्हा मला

वाटलं तू मला मुद्दमच सोडून दिलंस. मला क्षमा कर. हे तर स्पष्टच आहे की- तूच मला खाली आणलंस. आणखी कुणाला काळजी होती कां?"

"सगळे आपापल्या कामात-" ती काळजीपूर्वक उत्तरली, "त्यांना वाटलं तू अगेदरच खाली उतरून आलास. तसं वाटणं स्वाभाविक होतं."

"क्लौझियालाही तसंच वाटलं?"

"ती लहानशी इंटर्न? हो तिलाही तसंच वाटलं."

"वेल, अजूनही मला वाटतं- हे कारस्थानच असावं. म्हणजे तू नाहीस त्यात पण बाकीचे."

"नाही, हॅरी, ती माझीच चूक आहे. तुला असं अपरसाईडवर जाऊ द्यायचा मला काहीएक हक्क नव्हता. तुझं रक्षण करणं हे माझं काम होतं. जे झालं त्याचा दोष सर्वस्वी माझाच आहे... तू हरवलाच होतास."

"ए, ए, थांब जरा," सेल्डन अचानक चिडखोरपणे बोलला, "मी हरवलो नव्हते. मी काय लहान पोर वाटलो काय तुला?"

"मग काय म्हणायचं त्याला- सांग. सगळे निघाले तेव्हा तू जवळपास कुठेही नव्हतास. आणि तू दरवाजापाशी पोहोचला नाहीस. अंधार पडेपर्यंत दाराच्या जवळही नव्हतास फारसा."

सेल्डनने तिला सगळी हकीकत सांगितली. त्याला सारे तपशील नीट आठवत होते. आदल्या दिवशी तो त्या दुःस्वप्नांतच वावरत होता.

डॉर्स कपाळाला आठ्या गालून ऐकत राहिली.

"पण हे तर अशक्य आहे. जेट-डाऊन आलेलं? तुला खात्री आहे?"

“अर्थात खात्री आहे. मला काय भास होत होते असं वाटतंय की काय तुला?”

“पण साम्राज्याचं सैन्य तुला कशासाठी शोधणार. तुला अपरसाईढवरून अटक करून नेणं- सगळीकडून जबरदस्त विरोध झाला असता. इथे पोलिस पाठवून तुला नेलं तर होईल तसंच झालं असतं.”

“मग तू याचा काय अर्थ लावतेस?”

“मला नक्की नाही माहीत,” डॉर्स म्हणाली, “पण मी वर अपरसाईडवर आले नाही त्याचा फारच वाईट परिणाम होऊ शकत होता. आणि ह्युमिन माझ्यावर संतापेलच आता.”

“मग त्याला सांगायचंच नाही हे,” सेल्डन म्हणाला, “शेवट तर चांगला झाला.”

“त्याला सांगावंच लागेल,” डॉर्स गंभीरपणे म्हणाली, “हा शेवट नसेल कदाचित्.”

३०.

त्या दिवशी संध्याकाळी जेनर लेगेन त्याला भेटायला आला. जेवणं झाली होती आणि तो आळीपाळीने सेल्डनकडे आणि डॉर्सकडे बघत बसला. काय बोलावं त्याला सुचत नव्हतं. त्या दोघांपैकी कुणीही त्याला बोलणं सुरू करायला मदत केली नाही. ते वाट पाहात राहिले.

तो काही फार संभाषणचतुर नाही हे दोघांनाही माहीत होतं.

अखेर तो सेल्डनला म्हणाला, “मी तुझी तब्बेत कशी आहे खबरबात घ्यायला आलो.”

“अगदी व्यवस्थित.” सेल्डन म्हणाला, “थोडी झोप येत रहातेय. डॉ. वेनाबिलींनी सांगितलंय की या उपचारांमुळे मला काही दिवस थकल्यासारखं वाटेल. बहुतेक पुरेशी विश्रांती मिळावी म्हणूनच असेल ते.” तो हसला, “आणि खरंच सांगतो, मला बरंच वाटतंय.”

लेगेनने मोठ्ठा श्वास घेतला आणि सावकाश सोडला. मग तो अडखळत, सक्तीने बोलावं लागल्यासारखा बोलू लागला, “मी जास्त वेळ नाही खाणार तुमचा. तुम्हाला विश्रांतीची गरज आहे हे मला समजतंय. मला फक्त एवढंच म्हणायचं होतं, हे जे घडलं त्याचं मला खरंच मनापासून वाईट वाटतं. मी असं गृहीत धरायला नको होतं की तुम्ही एकटेच खाली गेला असाल म्हणून. तुम्ही नवखे होता- मी अधिक जबाबदारीने वागायला हवं होतं. अखेर मीच तुम्हाला वर यायची परवानगी दिली होती. मला क्षमा करू शकाल- आशा करतो मी. मला खरंच तेवढंच सांगायचं होतं.”

सेल्डनने तोंडावर हात ठेवत जांभई दिली. “क्षमा करा. सगळं नीट झालं ना- आता उगाच मनात काही वाईट आणून काय उपयोग. एका अर्थी तुमचा काहीच दोष नव्हता. मीच भटकत दूर जायला नको होतं. आणि शिवाय जे झालं ते-”

डॉर्सने त्याला थांबवलं, “आता पुरे, हॅरी, गप्पा मारत बसायचं नाहीये. आराम कर. मला जरा डॉ. लेगेनशी बोलायचं आहे, ते जाण्यापूर्वी. एक म्हणजे, डॉ. लेगेन, मला समजू शकतंय की या प्रकरणाचा तुमच्यावर काय परिणाम होईल याची काळजी तुम्हाला वाटणं स्वाभाविक आहे. डॉ. सेल्डन यातून नीट बचावले तर मी पुढे काहीही करणार नाही हे मी तुम्हाला सांगितलंच होतं. तसं होताना दिसतंय. त्यामुळे तुम्ही उगाच ताण घेऊ नका. पण मला तुम्हाला एक प्रश्न विचारायचा आहे-

दुसऱ्याच विषयावर. आणि या वेळी तुम्ही माझ्याशी मोकळेपणाने सहकार्य कराल अशी मी आशा करते.”

“प्रयत्न करतो, डॉ. वेनाबिली,” डॉ. लेगेन ताठर स्वरात उत्तरले.

“तुम्ही सारे वर होता, तेव्हा विचित्र वाटावं असं काही घडलं कां?”

“घडलं ते तुम्हाला माहीती आहे. डॉ. सेल्डन हरवले... मी नुकतीच क्षमा मागितली त्याबद्दल.”

“स्पष्टय पुरेसं, मी त्याबद्दल बोलत नाहीये. दुसरं काही अनपेक्षित असं घडलं होतं कां?”

“नाही. काहीच नाही. अगदी काहीसुध्दा नाही.”

डॉर्सने सेल्डनकडे पाहिलं. सेल्डनच्या कपाळावर आठी चढली. डॉर्स आपल्या सांगण्यावर विश्वास नसल्यामुळे त्याला हे स्वतंत्रपणे विचारून घेते आहे की काय असं त्याला वाटलं. मी काय त्या जेट-डाऊनची फुकटची कल्पना लढवली असं वाटतंय की काय हिला? त्याने रागाने मधे बोलण्याचा प्रयत्न केला, पण तिने त्याला हातानेच शांत केले. त्याने काहीही बोलता कामा नये अशीच तिची इच्छा दिसत होती. तो गप्प राहिला- थोडा तिच्यामुळे आणि थोडा झोप कोसळत असल्यामुळे. लेगेन फार वेळ थांबणार नाही अशी आशा होती त्याला.

“नक्की खात्री आहे तुम्हाला?” तिने विचारलं, “बाहेरून कुणीही तिथे आलं नव्हतं?”

“अर्थात नाही. ओः-”

“काय, डॉ. लेगेन?”

“जेट-डाऊन आलेलं तिथे.”

“त्यात तुम्हाला काही विशेष वाटलं का?”

“नाही. काहीच नाही.”

“का बरं?”

“ही माझी उलटतपासणी घेतली जातेय असंच वाटतंय मला, डॉ. वेनाबिली. मला पटत नाही हे.”

“ते मला समजू शकतं, डॉ. लेगेन. पण हे प्रश्न डॉ. सेल्डनच्या या भरकटलेल्या साहसाशी संबंधित आहेत. हे सारं प्रकरण मला वाटलं होतं त्यापेक्षा अधिक गुंतागुंतीचं असण्याची शक्यता आहे.”

“कोणत्या अर्थाने?” त्याच्या स्वराला आता धार आलेली, “आता नवीन प्रश्न काढून नव्याने क्षमा मागायला लावणार आहात का? तसं असेल तर मला आता हे थांबवून निघावं लागेल.”

“जोवर तुम्ही मला तिथल्यातिथे भिरभिरत राहिलेलं जेट-डाऊन तुम्हाला विशेष का वाटलं नाही हे सांगत नाही तोवर नाहीच.”

“अहो बाई, कारण इतकंच की ट्रॅन्टॉरवरच्या अनेक हवामान-निरीक्षण तळांवर डेट-डाऊन्स आहेत. ढग आणि त्यावरचं वातावरण यांच्या अभ्यासासाठी ती वापरली जातात. आमच्या संशोधन केंद्राकडे त्यातलं एकही नाही.”

“का बरं? उपयुक्त ठरेल ते नाही कां?”

“नक्कीच. पण आमची काही आपसात स्पर्धा नाही आणि काही गुपितंही नाहीत. आम्ही आमचे अहवाल प्रसिध्द करतो आणि ते त्यांचे. त्यामुळे प्रत्येकाच्या पध्दती वेगळ्या असल्या तरीही चालत, बरंच असतं. सर्वांनी तेचतेच प्रयोग करण्याने उगाच द्विरुक्ती होते. जेट-डाऊन्सवर आण्ही जो पैसा आणि मनुष्यबळ खर्च करू त्यात आम्हाला मेसॉनिक रिफ्रॅक्टोमीटर्स घेता येतील. बाकीचे यावर खर्च न करता त्यावर करतील. सगळ्या सेक्टर्समधे आपसात कितीही विग्रह असले तरीही विज्ञान

हे एक क्षेत्र वेगळं आहे. ते एकच क्षेत्र- सर्वांना एकत्र धरून ठेवतं. हे तुम्हाला माहीत असावं, मला वाटतं.” त्याने तिरकसपणे शेवट केला.

“हो, माहीती आहे ना. पण ज्या दिवशी तुम्ही वर तुमच्या तळावर जाणार तेव्हाच नेमकं कुणीतरी जेट-डाऊन तिथे पाठवणं, हे जरा जास्तच योगायोगाचं वाटतं नाही का?”

“अजिबात योगायोग नाही. आम्ही त्या दिवशी वर जाणार आहोत हे घोषित केलेलं. त्यामुळे दुसऱ्या कोणत्याही तळावर असं वाटलं असेल की आपणही त्याच वेळी नेफेलोमॅटिक मोजमापं घेऊ. ढगांची मोजमापं. सर्व निरीक्षणांचा एकत्रित परिणाम अधिक उपयुक्त ठरू शकतो.”

सेल्डन अचानक झोपाळू आवाजात म्हणाला, “अच्छा··· तर ते नुसतेच मोजमापं घेत होते कां?’ त्याने पुन्हा जांभई दिली.

“हो.” लेगेन म्हणाला, “नाहीतर अजून काय करणार?”

डॉर्सच्या पापण्या फडफडल्या. ती झरझर विचार करत होती. “हे बरोबर वाटतंय. हे जेट-डाऊन कुठल्या तळावरून आलेलं असेल?”

लेगेनने मुंडी हलवली, “डॉ. वेनाबिली, ते मी कसं काय सांगू शकणार?”

“मला वाटलं प्रत्येक हवामानतळाच्या जेट-डाऊनचं काहीतरी खास चिन्ह वगैरे असेल.”

“असेलही. पण मी वर पाहून त्याचं काही निरीक्षण करत नव्हते. मला माझी कामं होती. ते त्यांचं काम करीत होते. त्यांचा अहवाल आला की कळेल ते कुणाचं होतं.”

“आणि त्यांनी अहवाल दिलाच नाही तर?”

“त्याचा अर्थ असा असेल की त्यांची यंत्रणा काम करीत नव्हती. असं होतं कधीकधी.” आता त्याने आपल्या उजव्या हाताची मूठ वळलेली, “संपलं का आता?”

“थांबा. ते जेट-डाऊन साधारणपणे कुठून आलं असेल असा अंदाज आहे काही?”

“कोणताही तळ असेल- ज्यांच्याकडे जेट-डाऊन्स आहेत. एक दिवसाची आगाऊ सूचना दिली की ही यानं कुठूनही आमच्यापर्यंत पोहोचतात.”

“पण तरीही शक्यता काय आहे?”

“सांगता येणं कठीण आहे. हेस्टेलोनिया, वाय, झिगोरेथ, नॉर्थ डामियानो... या चौघांपैकी असण्याची जास्त शक्यता आहे. पण आणखी चाळीस तळ आहेत असे.”

“एकच प्रश्न, डॉ. लेगेन, जेव्हा तुम्ही वर जायचं घोषित केलंत, तेव्हा गणितज्ञ हॅरी सेल्डन तुमच्याबरोबर असणार आहे असं कुठे लिहिलं होतंत?”

लेगेनच्या मुद्रेवर अगदी प्रामाणिकपणे आश्चर्य उमटलं. आणि मग ते भाव तुच्छतेच बदलले. “मी कशाला नावं लिहिणार? आणि त्यात कुणाला काय रस असणार?”

“ठीक तर,” डॉर्स म्हणाली, “असं आहे, की डॉ. सेल्डनना ते जेट-डाऊन दिसलं आणि ते अस्वस्थ झाले. मला असं का झालं ते नेमकं कळलेलं नाही. त्यांनाही ते नीटसं आठवत नाहीये. ते त्या जेट-डाऊनपासून जवळपास पळालेच. आणि मग लपले. उजेड कमी होईपर्यंत त्यांची बाहेर येण्याची हिंमत झाली नाही. आणि मग अंधारात ते आपल्या घुमटापर्यंत पोहोचू शकले नाहीत. त्यासाठी तुम्हाला दोषी धरण्याचा प्रश्नच नाही. त्यामुळे ही घटना आपण विसरून जाऊ.”

“मान्य,” लेगेन म्हणाला, “गुड बाय!” तो झटक्यानेच वळला आणि चालता झाला.

तो गेल्यावर डॉर्स उठली, आणि तिने सेल्डनच्या पायातल्या स्लिपर्स काढून ठेवल्या. त्याला सरळ झोपवलं आणि नीट पांघरूण घातलं. तो अघदी गाढ झोपला होता.

मग ती बसून विचार करू लागली. लेगेनने जे सांगितलं त्यातलं खरं किती आणि शब्दांआड दडवलेलं किती? कळत नव्हतं.

--- ---- -----

**मायकोजेन**- ... प्राचीन काळापासून ट्रॅन्टॉरवर असलेला एक प्रभाग. आपल्याच दंतकथांच्या भूतकाळात गुरफटून राहिलेला हा भाग- या ग्रहावर कोणताच प्रभाव टाकत नव्हता. स्वमग्न-समाधानात स्वतःला बऱ्याच अंशी वेगळं काढून...

दीर्घिका ज्ञानकोष

३१.

सेल्डन उठला तेव्हा त्याच्याजवळ एक नवीनच चेहरा न्याहाळत बसून होता. क्षणभर त्याने कपाळावर आठ्या घातल्या- आणि मग उद्गारला, “कोण, ह्युमिन?”

ह्युमिन थोडासाच हसला. “मी आठवणीत आहे तर तुझ्या?”

“एकच दिवस तर होतो आपण सोबत, तेही जवळपास दोन महिन्यांपूर्वी. तुला अटक वगैरे झाली नाही तर- किंवा इतर काही...”

“पाहातो आहेस. मी इथे आहे, अगदी जसाच्या तसा, आणि सुरक्षित. पण” त्याने बाजूला उभ्या असलेल्या डॉर्सकडे पाहिलं, “इथे येणं तसं फार सोपं नाही गेलं मला.”

सेल्डन म्हणाला, “फार बरं वाटलं तुला भेटून.- तुझी हरकत नसेल तर?” त्याने अंगठ्याने बाथरूमकडे निर्देश केला.

ह्युमिन म्हणाला, “हवा तेवढा वेळ घे. नाश्ताही करून घे.”

ह्युमिनने त्यांच्याबरोबर नाश्ता घेतला नाही. डॉर्सनेही नाही. ते काही बोलतही नव्हते. ह्युमिनने एक बुकफिल्म चाळायला सुरुवात केली आणि तो त्यात गुंतून गेला. डॉर्स आपली नखं तपासत बसली थोडा वेळ, आणि मग तिने मायक्रोकॉम्प्युटरवर स्टायलसने काहीतरी लिहून ठेवायला सुरुवात केली.

सेल्डन खाताखाता विचार करत त्यांच्याकडे बघत होता. त्यानेही संभाषण सुरू करायचा प्रयत्न केला नाही. त्यांचे मौन कदाचित् ट्रॅन्टॉरियन रिवाजानुरूप असेल- आजारी माणसाजवळ जास्त बडबड करू नये वगैरे. पण आता त्याला अगदी छान वाटत होतं. त्यांना ते कळत नसावं.

अखेर शेवटचा घास संपल्यानंतर, दुधाचा शेवटचा थेंब रिकामा झाल्यानंतर (आता त्याला त्या दुधाची सवय झालेली. त्याची चव आता विचित्र वाटत नव्हती.) ह्युमिन बोलू लागला.

“कसं वाटतंय तुला, सेल्डन?” त्याने विचारलं.

“अगदी छान वाटतंय, ह्युमिन. बरंच बरं वाटतंय मला... उठून फिरायला लागलो हेच बरंय.”

“बरं वाटलं हे ऐकून,” ह्युमिन कोरड्या आवाजात म्हणाला, “हे झालं त्याचा बराचसा दोष डॉर्स वेनाबिलीवर येतो.”

“नाही. अपरसाईडला जायचं हा माझा हट्ट होता.” सेल्डन कपाळाला आठ्या घालत म्हणाला.

“असेल ना. पण काहीही झालं तरी तिने तुझ्याबरोबर यायलाच हवं होतं.”

“तिने बरोबर येऊ नये असं मीच तिला सांगितलं.”

“हे बरोबर नाही, हॅरी. उगीच स्त्रीदाक्षिण्य म्हणून माझा बचाव करू नकोस.” डॉर्स म्हणाली.

सेल्डन रागारागाने बोलू लागला, “पण डॉर्सनेच अपरसाईडवर येऊन मला शोधूनही काढलं. त्यांचा एवढा विरोध असतानाही. माझा जीव तिच्यामुळेच वाचला. आणि यात काहीही खोटं नाहीये. तुझं जे काही मूल्यमापन चाललंय त्यात त्याचाही विचार कर, ह्युमिन.”

डॉर्सने पुन्हा त्याला अडवलं. ती अवघडून गेली होती. “प्लीज, हॅरी, मी तुला वर जाण्यापासून रोखायला हवं होतं, किंवा निदान तुझ्याबरोबर जायला तरी हवं होतं अशी चेटर ह्युमिनची अपेक्षा आहे ती योग्यच आहे. नंतर मी जे काही केलं त्याची स्तुती केलीय त्याने अगोदरच.”

“तरीही,” ह्युमिन म्हणाला, “जे झालं ते झालं. भूतकाळ झाला. सोडून देऊ ते. पण अपरसाईडवर नक्की काय झालं, ते मला पुन्हा सांग, सेल्डन.”

सेल्डनने अवतीभवती पाहिलं आणि सावधपणे विचारलं, “इथे सांगणं ठीक होईल कां?”

ह्युमिन किंचित हसत उत्तरला, “डॉर्सने ही खोली डिस्टॉर्शन फील्डमधे टाकली आहे. म्हणजे इथे बोललेलं बाहेर कोणत्याही प्रकारे ऐकता येणार नाही. साम्राज्याच्या कुठल्याही हेराला अगदी परवडत असलं तरीही काहीही ऐकता येणार नाही. तू तसा फार संशयी मनुष्य दिसतोस, सेल्डन.”

“मूळ स्वभाव संशयी नाही माझा,” सेल्डन म्हणाला, “पण त्या बागेत बसलो होतो तेव्हापासून ते नंतरपर्यंत तू जे जे काही सांगितलंस- तू सुध्दा हट्टीच आहेस. मागे लागलास की सोडत नाहीस. तुझ्याच सांगण्यामुळे मला एटो डेमेर्झेल प्रत्येक सावलीमागे दडला असेल अशी शंका येऊ लागली.”

“खरंच तसा तो असतो असं मलाही वाटतं,” ह्युमिन गंभीरपणे म्हणाला.

“असलाच तर,” सेल्डन म्हणाला, “तो तोच आहे हेही मी ओळखू शकणार नाही. तो दिसतो तरी कसा?”

“त्याने काहीही फरक पडत नाही. त्याची इच्छा असेल तरच आणि तेव्हाच तो तुला दिसू शकेल. आणि तोवर सगळा खेळ संपलेला असेल. आपण तेच तर थोपवून धरायला हवं. चल आता, तू जे डेट-डाऊन पाहिलंस त्याबद्दल मला सांग.”

“मी सांगितलं ना, तुझ्यामुळे माझ्या मनात एटो डेमेर्झेलची जरा जास्तच भीती बसली आहे. मी ते डेट-डाऊन पाहिलं आणि मला असं वाटू लागलं की ते माझ्याच मागावर आलंय. मी स्ट्रीलिंग विद्यापीठाची सुरक्षितता सोडून अपरसाईडवर जाण्याचा मूर्खपणा केला... मला वाटू लागलं मला सर्वांनी काट करून भुलवून वर नेलं की काय... मला सहजपणे उचलता यावं हाच त्यांचा हेतू असावा असं माझ्या मनाने घेतलं.” सेल्डन म्हणाला.

डॉर्स म्हणाली, “आणि लेगेन म्हणतोय की-”

सेल्डनने विचारलं, “तो काल रात्री इथे आलं होता ना?”

“होय. कां, तुला आठवत नाही?”

“अंधुकपणे आठवतंय. मी खूपच थकून गेलो होतो. माझ्या आठवणीत सगळंच धूसर झालंय.”

“वेल, लेगेन काल इथे आला होता आणि तो म्हणाला, ते केवळ दुसऱ्या हवामान संशोधन तळावरचं निरीक्षणं घेणारं जेट-डाऊन होतं. अगदी नेहमीचं. अगदी निरुपद्रवी.”

“काय?” सेल्डन उद्गारला, “माझा विश्वासच नाही बसत यावर.”

ह्युमिन म्हणाला, “आता प्रश्न असा आहे, तुझा यावर विश्वास का नाही? या जेट-डाऊनने असं काय केलं की तुला ते धोकादायक वाटावं? काहीतरी विशेष घडलं का? मी तुझ्या डोक्यात घातलेली भीती बाजूला ठेवून विचार कर.”

सेल्डन खालचा ओठ चावत थोडा विचार करत राहिला. मग तो बोलू लागला, “ ते दिसतंच होतं तसं. ढगांच्या कडेवर त्याचा पुढचा भाग टेकला होता, जणू ते काहीतरी शोधत होतं. मग ते अचानक दुसऱ्या एखाद्या ठिकाणी तसंच जाऊन उभं राहायचं. मग आणखी दुसऱ्या, मग आणखी पलिकडे... असं चालूच होतं त्याचं. ते जणू अपरसाईडच्या पृष्ठभूमीचा संगतवार शोध घेत होतं. एकेक टप्पा पार करत माझ्या दिशेने सरकत होतं.”

ह्युमिन म्हणाला, “तू कदाचित् तसा समज करून घेत असशील, सेल्डन. जणू एखादं जनावर हुंगत तुझ्या दिशेने येतंय असं वर्णन करतो आहेस तू. ते काही जनावर नव्हतं. हवामानसंशोधनाचं जेट-डाऊन होतं ते. आणि त्याचं वर्तन आणि कृती त्यानुसारच होत्या.”

“मला नाही वाटलं तसं.” सेल्डन उत्तरला.

ह्युमिन म्हणाला, “नक्कीच तुला तसं वाटलं नाही. पण आपल्याला त्या दृष्टीने दुसरी काहीच माहिती मिळत नाहीये. तू धोक्यात होतास असा तुझा समज झाला. लेगेन म्हणतो की हे जेट-डाऊन हवामान-संशोधन तळाचं होतं हासुध्दा एक समज अशू शकतो.”

सेल्डन हटवादीपणे म्हणाला, “ही घटना एक अगदी निरुपद्रवी घटना होती यावर माझा विश्वासच नाही.”

“बरं तर,” ह्युमिन म्हणाला, “आपण अगदी वाईटात वाईट शक्यता गृहीत धरू. ते जेट-डाऊन तुलाच शोधत होतं. पण ज्यांनी ते तुझ्या मागावर पाठवलं त्यांना तू तिथेच आहेस हे कसं कळलं असेल?”

डॉर्स मधेच म्हणाली, “मी डॉ. लेगेनना विचारलं होतं, की त्यांनी वर जाण्याचं घोषित केलं तेव्हा हॅरी त्यांच्याबरोबर असेल हे कुठं लिहिलं होतं कां. पण तसं करण्याचा काही प्रश्नच नव्हता- कारण ते कधीच नावं देत नाहीत असं ते म्हणाले. माझ्या प्रश्नाचं त्याला आश्चर्यच वाटलेलं. माझा त्यांच्यावर विश्वास बसला.”

ह्युमिन विचारात पडून म्हणाला, “लगेच विश्वास ठेवायची गरज नाही त्याच्यावर. तसं केलं असलं तरीही तो ते नाकारणारच ना? आता असा विचार कर, त्याने आधी सेल्डनला आपल्याबरोबर येण्याची परवानगीच कशी दिली? त्याने सुरुवातीला नको म्हटलं होतं, हे आपल्याला माहीती आहे. मग त्याने विशेष कुरकुर न करता त्याला येऊ दिलं. लेगेनच्या स्वभावात हे फारसं बसत नाही, असं मला वाटलं.”

डॉर्सच्या कपाळावर जाळी झाली. ती म्हणाली, “मला वाटतं, म्हणजे हे सारं त्यानेच घडवून आणल्यासारखं दिसतंय. हॅरीला उचलता यावं अशाच हेतूने त्याने त्याला येऊ दिलं असेल. त्याला तशा सूचनाही असतील. आपण असंही म्हणू शकतो की, त्याने त्याच्या त्या तरूण इंटर्नलाही हॅरीला बोलण्यात गुंतवून बाजूला घेऊन जायला सांगितलं असेल- तो एकटा बाजूला पडावा यासाठी. आणि तसंच असेल तर खाली जायची वेळ आली तेव्हा हॅरी सोबत आहे की नाही याची खात्री करायची गरज त्याला वाटली नाही हे सुध्दा विचित्र वाटत नाही. मग हॅरी आधीच खाली निघून गेलाय हे तो ठासून सांगत रहाणार हे सुध्दा समजू शकतं. त्याने त्याची तयारी आधीच करून ठेवली होती... त्याने स्वतःच हॅरीला अगदी काळजीपूर्वक

खाली कसं जायचं ते दाखवून ठेवलं होतं. त्याच्या शोधात जाण्यासाठी त्याने जो काही प्रतिकार केला त्याचंही स्पष्टीकरण मिळतंय. जो तिथं मिळणारच नाही त्याच्या शोधात जाऊन वेळ वाया कशाला घालवायचा असा त्याचा हिशेब असू शकतो.”

ह्युमिन काळजीपूर्वक ऐकत होता. तो म्हणाला, “तू त्याच्याविरुध्द केस तर चांगलीच तयार केलीस. पण तीही आपण इतक्या झटकन् मान्य करता कामा नये. अखेर तो तुझ्याबरोबर वर आला तर खरा.”

“कारण पावलांची चाहूल लागली होती. प्रमुख सेस्मोलॉजिस्ट तसं सांगायला स्वतः हजर होता.”

“वेल, सेल्डन सापडल्यावर लेगेनला धक्का बसल्याचं, आश्चर्य वाटल्याचं दिसलं होतं का? म्हणजे आपल्या निष्काळजीपणामुळे कुणीतरी अडचणीत सापडलं याचा धक्का नव्हे. सेल्डन इथे कसा काय सापडला असं आश्चर्य त्याच्या चेहऱ्यावर दिसलं होतं? ‘त्यांनी’ सेल्डनला उचललं कसं नाही, हा प्रश्न पडल्याचं त्याच्या चेहऱ्यावरून दिसत होतं कां?”

डॉर्सने काळजीपूर्वक विचार केला, आणि ती म्हणाली, “ हॅरी तिथे सापडला तेव्हा त्याला स्वाभाविकपणे धक्का तर बसला होताच. पण त्या पलिकडे जाऊन त्याला नेमका कशाचा धक्का बसला असेल हे तपासण्याच्या परिस्थितीत मी नव्हते.”

“हं. बरोबर आहे.”

पण इतकावेळ त्यांच्याकडे बघत सगळं नीट ऐकत बसलेला सेल्डन म्हणाला, “ मला नाही वाटत लेगेनने हे केलं असेल.”

ह्युमिन त्याच्याकडे निरखून पाहू लागला, “असं का म्हणतोस तू?”

“एक म्हणजे- तूही ते पाहिलंस, की त्याची मला वर नेण्याची तयारीच नव्हती. एक अख्खा दिवस मी त्याच्याशी वाद घालत होतो. अखेर त्याने ते मान्य केलं कारण त्याला वाटलं होतं, की मी खूपच हुषार गणिती आहे आणि त्याच्या हवामानाच्या सिध्दांतात मी त्याला मदत करीन. मी अपरसाईडवर जाण्यात फारच रस दाखवला होता, आणि त्याला काही सूचना असत्या तर एवढा विरोध करण्याची त्याला गरज नव्हती.”

“त्याला तू केवळ तुझ्या गणितातल्या नैपुण्यासाठी हवा होतास असं मान्य करणं सयुक्तिक होईल? त्याने तुझ्याशी गणिताबद्दल काही चर्चा केली? त्याचा जो काही सिध्दांत आहे तो तुला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला त्याने?”

“नाही,” सेल्डन उत्तरला, “नाही केलं तसं काहीही त्याने. तो एवढंच म्हणाला की आपण नंतर यावर बोलू. पण कसं होतं ना- तो त्याच्या त्या उपकरणांवर काम करण्यात इतका मग्न होता... त्याला ऊन पडेल अशी अपेक्षा होती, आणि तसं झालं नाही. त्याला वाटलेलं उपकरणांमधला दोष निघाला तर मग त्याला ते एक कारण मिळेल. पण तसं काहीच झालं नाही. सगळी उपकरणं अगदी व्यवस्थित काम करत होती. मग तो अगदीच निराश झालेला. मला वाटतं हे जरा अनपेक्षित असल्यामुळे त्याची मनःस्थिती अगदीच बिघडली होती. फार चिडलेला तो. माझ्याकडे त्याने लक्षच दिलं नाही. ती मुलगी- क्लौझिया- तिच्या मनात काही असेल असं मला खरंच वाटत नाही. ती माझ्याशी बोलत थांबलेली- पण तिने मला मुद्दाम त्या गटापासून दूर नेलं असं काही मला वाटलं नाही. मीच चालायला लागलो होतो. अपरसाईडवर वाढणाऱ्या वनस्पतींबद्दल मला खूपच कुतूहल वाटू लागलं. मीच तिला बाजूला नेलं असं म्हणता येईल. मला दूर घेऊन जाण्यासाठी लेगेनने

तिला काही उत्तेजन दिलं असं अजिबात म्हणता येणार नाही. त्याने तिला हाक मारून बोलावून घेतलं होतं. मी- माझा मीच तिथून त्यांच्या दृष्टीआड दूर भटकत गेलो.”

“पण तरीही,” ह्युमिन बोलू लागला. मांडलेल्या प्रत्येक मुद्द्यावर काहीतरी हरकत घ्यायचीच असं जणू ठरवलेलं त्याने. “ते यान जर तुला शोधत असेल, तर आतल्या लोकांना तू कुठे आहेस ते माहीत असलंच पाहिजे. लेगेनकडून नाही तर कुणाकडून कळलं असेल ते त्यांना?”

“माझा संशय आहे,” सेल्डन बोलू लागला, “तो लिसुंग रॅन्डा नावाचा तरूण मानसशास्त्रज्ञ आहे, त्याच्यावर.”

“रॅन्डा?” डॉर्स म्हणाली, “माझा विश्वासच नाही. मी ओळखते त्याला. तो साम्राज्यासाठी कधीच काम करणार नाही. तो अगदी अंतर्बाह्य साम्राज्यविरोधी आहे.”

“तो तसा आविर्भाव आणू शकतो,” सेल्डन म्हणाला, “म्हणजे आपण साम्राज्याचे हेर आहोत हे लपवण्यासाठी त्याला बाह्यतः अगदी जोरदार, आक्रमक साम्राज्यविरोधी बोलणं भाग असेल.”

“पण तो तसा नाहीच,” डॉर्स म्हणाली, “तो कोणत्याच बाबतीत जोरदार किंवा आक्रमक नसतो. तो अगदी शांत, सुस्वभावी आहे. आणि तो आपली मतं तशीच अगदी शांतपणे, जरा भित्रटपणेच मांडत असतो. तो अगदी प्रामाणिकपणेच बोलतो ही माझी खात्री आहे.”

“पण तरीही लक्षात घे, डॉर्स,” सेल्डन गंभीर स्वरात म्हणाला, “त्यानेच प्रथम मला हवामान संशोधनाबद्दल सांगितलं. त्यानेच मला अपरसाईडवर जाण्यचा आग्रह केला. त्यानेच लेगेनचं मन मला सोबत घेऊन जाण्यासाठी वळवलं... माझं

गणिताचं कौतुक त्याने जरा बढाचढा के केलं. मी वर जावं याची त्याला एवढी का आंस लागावी, त्याने एवढे प्रयत्न का करावेत याचाही विचार करायला हवा.”

“तुझ्याच भल्यासाठी असेल. त्याला तुझ्यात रस होता, हॅरी, आणि हवामानशास्त्राचा सायकोहिस्टिरात काही उपयोग होईल असं वाटलं असेल त्याला. शक्य आहे ना?”

ह्युमिन अगदी शांतपणे म्हणाला, “आपण आणखी एका मुद्द्याचा विचार करू. रॅन्डाने तुला हवामानशास्त्राबद्दल सांगितलं तेव्हापासून तू प्रत्यक्ष अपरसाईडवर जाईपर्यंत मधे तसा बराच वेळ गेला. रॅन्डा जर निष्पाप असेल, तर या साऱ्याबद्दल गुप्तता बाळगावी असं त्याला सुचणारही नाही. तो जर सर्वांशी मिळूनमिसळून वागणारा खेळकर मनुष्य असेल, तर-”

“तसाच आहे तो,” डॉर्स म्हणाली.

“-तर मग त्याने हे कितीतरी मित्रांना बोलून दाखवलं असेल. म्हणजे मग ही माहिती देणारा कोण ते कसं सांगणार आपण. असंही आहे की रॅन्डा साम्राज्यविरोधक असेल तरीही- तो हेर नाही असंच काही नाही. मग प्रश्न असा विचारायला हवा. की कुणाचा हेर? तो कुणाच्या वतीने काम करत असेल?”

सेल्डन चकित झाला, “साम्राज्याहून वेगळं आहेच कोण हेरगिरी करायला? एटो डेमेर्झेलशिवाय दुसरं कोण?”

ह्युमिनने एका हातानेच त्याला थोपवलं, “तुला ट्रॅन्टॉरच्या राजकारणाची गुंतागुंत अजिबात माहीत नाही, सेल्डन.” तो डॉर्सकडे वळून म्हणाला, “मला सांग, ते हवामान वालं जेट-डाऊन कोणत्या चार प्रभागांतून आलं असेल असं डॉ. लेगेनचं म्हणणं होतं?”

“हिस्टेलोनिया, वाय, झिगोरेथ आणि नॉर्थ डॅमियानो.”

“तुझ्या प्रश्नातून त्याला काही शंका नाही ना आली? म्हणजे- तू कुठल्या प्रभागाचं नाव घेऊन विचारलं नाहीस ना?”

“नाही. अजिबात नाही. ते कुठून आलेलं असू शकेल एवढंच विचारलं मी.”

“आणि तू-” ह्युमिन सेल्डनकडे वळला, “त्या जेट-डाऊनवरची चिन्हं, लोगो वगैरे काही पाहू शकला होतास का?”

सेल्डनला जोरात प्रत्युत्तर करावंसं वाटलं- त्यावेळी ते यान ढगांत होतं. थोडे क्षण बाहेर आलं होतं. आणि मी काही त्यावरची चिन्हंबिन्हं पाहून ठेवण्याच्या मनःस्थितीत नव्हतो. मला सुटका करून घ्यायची होती फक्त. पण तो काही बोलला नाही. ह्युमिनला तर ते माहीतच होतं. त्याने सरळ उत्तर केलं, “नाही पाहिलं.”

डॉर्स म्हणाली, “ते जेट-डाऊन जर उचलायलाच आलेलं असेल, तर त्यांनी आपलं चिन्हं मिटवून टाकलेलं असण्याची शक्यता जास्त आहे.”

“हा विचार बरोबर आहे,” ह्युमिन म्हणाला, “तसं झालेलं असेलही. पण या आपल्या दीर्घिकेत प्रत्येक गोष्ट काही विचारपूर्वक होते असं नाही. पण सेल्डनने काही चिन्ह आहे नाही पाहिलेलंच नसेल, तर मग आपण केवळ अंदाजच करू शकतो. मी विचार करतोय- वाय.”

“व्हाय?” सेल्डनला वाटलं तो प्रश्न विचारतोय. “कारण त्यांना मला माझ्या सायकोहिस्ट्रीबद्दलच्या ज्ञानासाठी पळवून न्यायचं होतं.”

“नाही नाही.” ह्युमिनने एखाद्या लहान पोराला समजावून द्यावं तसं बोट वर केलं. “वाय म्हणजे डब्लू वाय ई- का या अर्थी व्हाय नव्हे. हे ट्रॅन्टॉरमधल्या एका फार महत्त्वाच्या प्रभागाचं नाव आहे. गेली तीन हजार वर्षे त्यावर एकाच घराण्यातील महापौरांची सत्ता चालते. वंशसातत्य टिकून आहे त्यांचं. पाचशे वर्षांपूर्वी एकदा, वायच्या महापौर घराण्यातून दोन सम्राट आणि एक सम्राज्ञी साम्राज्याच्या

सिंहासनावर आरूढ झाले होते. तो तसा लहानसा कालावधी होता. आणि त्यांच्यापैकी कुणीच फारसा ठसा उमटवू शकलं नव्हतं. पण वाय मधील नंतरच्या महापौरांना या राजेतिहासाचा कधीच विसर पडला नाही.

"आत्ता जो वाय प्रांताचा महापौर आहे तो खरोखरच हुषार आहे. आता म्हातारा झालाय, पण त्याची महत्त्वाकांक्षा अजून निवावेली नाही. क्लिऑनला काही झालं- म्हणजे अगदी नैसर्गिक मृत्यू आला तरीही त्याला संधी आहे, कारण क्लिऑनचा मुलगा अगदीच लहान आहे. दीर्घिकेच्या प्रजाजनांना सम्राट म्हणून कुणीतरी राजघराण्याची पार्श्वभूमी असलेला असावा असं अजूनही वाटतंच.

"त्यामुळे वायच्या महापौराने तुझ्याबद्दल काही ऐकलं असेल तर एक वैज्ञानिक भविष्यवेत्ता म्हणून स्वतःच्या घराण्याच्या वतीने तुला पुढे करणं त्याला उपयोगाचं वाटेल. क्लिऑनचा कोणत्याही सोयीस्कर रीतीने अंत घडवून आणण्यासाठी त्यांच्याकडे अगदी परंपरागत उद्दिष्ट आहे म्हण. आणि मग वायच्या महापौराकडे सत्ता येणे, आणि मग पुढली किमान हजार वर्षे शांती नि समृध्दी नांदेल असे भाकित तू वर्तवलेस की काम झाले. अर्थात्, एकदा का तो सत्तारूढ झाला की मग तुझा उपयोग संपेल आणि मग तू क्लिऑनच्या पाठोपाठ समाधिस्थ व्हायला हरकत रहाणार नाही."

सेल्डनने तिथली गंभीर शांतता थोड्या वेळाने मोडली. तो म्हणाला, "पण वायचा हो जो महापौर आहे तो माझ्यामागे लागला आहे असे काही आपल्याला ठामपणे म्हणता येत नाही ना अजून..."

"नाही- नक्की काहीच माहीत नाही. तुझ्यापाठी कुणी लागलंय की नाही तेच अजून नक्की नाही. ते जेट-डाऊन खरोखरच लेगेन म्हणतो त्याप्रमाणे हवामान निरीक्षणाचं यान असेल. पण तरीही- सायकोहिस्ट्री हे काही तरी महत्त्वपूर्ण आहे हे

जसजसं पसरत जाईल तसतशी तुझ्यामागे सर्वशक्तीमान, किंवा जरा कमी शक्तीमान असे ट्रॅन्टॉरवरचे किंवा अन्य ठिकाणचेही लोक तुझ्या मागे लागतील, तुझ्या क्षमतेचा वापर करून घेऊ पाहातील हे नक्की."

"म्हणजे मग," डॉर्स म्हणाली, "आपण काय करायचं?"

"तोच तर खरा प्रश्न आहे." ह्युमिन थोडा वेळ तसाच बसून विचार करत राहिला, आणि मग म्हणाला, "कदाचित् इथे येणं ही चूकच होती. एखाद्या प्राध्यापकासाठी लपण्याची जागा म्हणून विद्यापीठच निवडलं जाईल हे तर अगदी सरळ आहे. स्ट्रीलिंग विद्यापीठ अनेक विद्यापीठांपैकी एक असलं तरीही ते सर्वात मोठं आणि नामवंत आहे हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे इथून तितून चाचपत-चाचपडत येणाऱ्या स्पृशा अगदी आंधळेपमानेही इथे वाट काढू शकतील. मला वाटतं, लवकरात लवकर, आपण सेल्डनला इथून हलवलं पाहिजे. लपण्याची एखादी अधिक चांगली जागा शोधायला हवी आपल्याला. पण-" तो थबकला.

"पण काय?"

"कुठे ते मला सुचत नाहीये."

सेल्डन म्हणाला, "कॉम्प्युटरवर गॅटीअर उघडायचं आणि कुठली तरी जागा निवडायची."

"अजिबात नाही," ह्युमिन उत्तरला, "आपण तसं केलं तर जी जागा मिळेल ती पुरेशी सुरक्षित असेलच असं काही नाही. या जागेपेक्षा सुरक्षित जागा शोधतोय आपण. याचा नीटच विचार केला पाहिजे."

32.

ते तिघे बराच वेळ सेल्डनच्या खोलीत तसेच बसून राहिले. जेवणाची वेळ टळून गेली. त्या साऱ्या वेळात हॅरी आणि डॉर्स मधूनमधून वेगवेगळ्या विषयांवर बोलत राहिले, पण ह्युमिन मात्र अगदी गप्प बसून होता. तो ताठ बसला होता. त्याने फारसं काही खाल्लंही नाही. त्याची गंभीर मुद्रा- त्यामुळे तो खूप वयस्कर झाल्यासारखा दिसत होता- जराही बदलली नाही. शांत आणि मनाने कुठेतरी दूर.

सेल्डनला वाटलं तो मनातल्या मनात ट्रॅन्टॉरचा भौगोलिक नकाशा जणू इंचाइंचाने विंचरतो आहे... कुठला कोपरा लपायला आदर्श ठरेल. हे नक्कीच सोपं नव्हतं.

सेल्डनचा स्वतःचा ग्रह, हेलिकॉन ट्रॅन्टॉरपेक्षा थोडासा, काही अंशाच्या फरकाने मोठा होता. आणि त्यावरचा महासागर बराच लहान होता. ट्रॅन्टॉरियन भूपृष्ठापेक्षा हेलिकॉनचे भूपृष्ठ दहा टक्क्यांनी जास्त होते. पण हेलिकॉनची लोकसंख्या अगदीच कमी होती. त्यावर काही शहरे सर्वत्र विखुरलेली होती. ट्रॅन्टॉरचा ग्रह हा एक अखंड एकसंध शहरच होता. हेलिकॉनमध्ये वीस प्रशासकीय प्रभाग होते तर ट्रॅन्टॉरवर आठशेहून अधिक. शिवाय त्या आठशेंमध्येही पुन्हा उप-प्रभागही शेकड्यांनी होते.

अखेर सेल्डन हताश स्वरात म्हणाला.

“ह्युमिन, कदाचित् मला कुणा तरी एका उमेदवाराच्या हाती सोपवून दिलं तर कसं राहील हा विचार कर... जो त्यातल्या त्यात निरुपद्रवी असेल. आणि जो माझं इतर सर्वांपासून रक्षण करेल.”

ह्युमिनने मान वर केली आणि अगदी जडगंभीर स्वरात म्हणाला, “त्याची गरज नाही. मला असा एक उमेदवार माहीत आहे जो सर्वांपेक्षा बराच निरुपद्रवी आहे- आणि तू त्याच्या रक्षणात आहेसच.”

सेल्डन हसला, “तू काय स्वतःला वाय प्रांताचा महापौर आणि दीर्घिकेचा सम्राट यांच्या पंक्तीला बसवतोस की काय?”

“पद हाती असण्याच्या दृष्टीकोनातून नक्कीच नाही. पण तुझा ताबा स्वतःकडे ठेवण्याची इच्छा पाहिली तर मी नक्कीच त्यांच्याशी स्पर्धा करतोय. ते किंवा इतरही अनेकजण तुझा वापर स्वतःची सत्ता-संपत्ती अबाधित ठेवण्यासाठी करतील, आणि माझी तशी काहीच आकांक्षा नाही हा फरक आहे... दीर्घिकेचे हित एवढेच माझे उद्दिष्ट आहे.”

“मला शंका आहे,” सेल्डन कोरडेपणाने म्हणाला, “तुझ्या स्पर्धकांपैकी कुणालाही विचारलं तर तेही दीर्घिकेचं हित आपल्या मनात असल्याचंच ठासून सांगतील.”

“नक्कीच सांगतील,” ह्युमिन म्हणाला, “पण आजवर- तुझ्या म्हणण्याप्रमाणे माझ्या स्पर्धकांपैकी केवळ एकालाच तू भेटला आहेस आणि त्याने तुला त्याच्या राज्यसत्तेला आधार देणारं काल्पनिक भविष्यकथन करण्यास सुचवलं होतं. मी तुला असं काहीही सुचवलेलं नाहीये. तू सायकोहिस्ट्रीचं तंत्र नीट विकसित कर- ज्यातून गणितदृष्ट्या विचारार्ह वाटतील अशा, संख्याशास्त्रापुरत्या मर्यादित असली तरीही चालतील अशा भाकितांची मांडणी शक्य होईल.”

“खरंय, निदान अजूनपर्यंत तरी.” सेल्डन हसत म्हणाला.

“त्यामुळे आता मी हे विचारतो- त्या बाबतीत काय प्रगती? कसं काय चाललंय काम?”

सेल्डनला हसावं की रागवावं कळेना. थोडा वेळ तो थांबून राहिला. आणि मग न हसता, न रागावता त्याने शांतपणे उत्तर दिलं, “प्रगती? दोन महिन्यांच्या आत? ह्युमिन, या कामात माझं कदाचित् आयुष्य खर्ची पडेल. कदाचित् माझ्यानंतरही काम

करत रहाणाऱ्या बारा पिढ्यांची आयुष्यही खर्ची पडतील... आणि तरीही अखेरीस अपयश येऊ शकतं.''

''मी काही तुझ्याकडून अंतिम उत्तराची अपेक्षा करीत नाहीये. अगदी अंतिम उत्तराच्या जवळ नेणाऱ्या समाकरणाचीही अपेक्षा करीत नाहीये. सायकोहिस्ट्रीचे उपयोजन शक्य आहे पण व्यवहार्य नाही हे तू मला अनेकदा धडधडीतपणे सांगून झालेलं आहे. मी इतकंच विचारतो आहे, की ते व्यवहार्य होण्याची धूसरशी तरी आशा तुला दिसते आहे कां.''

''स्पष्टच सांगायचं तर- नाही.''

डॉर्स म्हणाली, ''माझं चुकत असेल तर क्षमा कर. मी काही गणितज्ञ नाही. त्यामुळे हा प्रश्न वेडेपणाचा असू नये म्हणजे झालं. पण एखादी गोष्ट शक्य आहे आणि व्यवहार्य नाही हे तुम्हाला कसं काय कळणार? तू हे म्हणाला आहेस, की सैद्धांतिक पातळीवर तू साम्राज्यातल्या सर्व माणसांना भेटणे शक्य आहे पण ते व्यवहार्य नाही, कारण आयुष्य तेवढं पुरणार नाही. हे ठीक आहे. पण सायकोहिस्ट्री त्याच प्रकारातली आहे असं तू कशावरून म्हणतोस?''

सेल्डनने डॉर्सकडे अविश्वासाने पाहिलं. ''याचं स्पष्टीकरण हवंय तुला.''

''होय.'' तिने इतक्या जोरजोरात मान हलवली की तिचे कुरळे केस हेलकावले.

''खरं म्हणजे,'' ह्युमिन म्हणाला, ''मलाही त्याचं स्पष्टीकरण ऐकायला आवडेल.''

''गणिताशिवाय?'' सेल्डनच्या ओठावर अगदी हलकंसं स्मित उमटलं.

''प्लीज,'' ह्युमिन म्हणाला.

“वेल-” तो जरा वेळ स्वतःशीच विचारात गढून गेला. हे कशा पध्दतीने मांडावं याचा विचार करत राहिला. मग बोलू लागला,- “आपल्याला जर विश्वाचा एखादाच भाग समजून घ्यायचा असेल तर, मग त्याचे सर्व गुणविशेष, वैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी आपल्याला त्याचे थोडे सुलभीकरण करावे लागते. एक वस्तू कशी पडते हे जेव्हा समजून घ्यायचं असतं तेव्हा ती वस्तू जुनी आहे की नवी आहे, लाल आहे की हिरवी आहे, तिला वास आहे वा नाही, वगैरे काहीही तपशील लागत नसतात. या गोष्टींवर विचार करणे वगळले की उगीच इकडेतिकडे गुंतणे, धडपडणे बंद होते. या सुलभीकरणाला आपण मॉडेल म्हणू शकतो किंवा प्रत्ययकारी म्हणू शकतो. आणि हे आपण कॉम्प्युटरवर दिसेल असं प्रत्यक्ष करून पाहू शकतो किंवा मग गणिती समीकरणातून सांगू शकतो. जर आपण नॉन-रिलेटिविटी आधारित- असापेक्ष अशा प्राथमिक सिध्दांतातील गुरुत्वाकर्षण नियमांचा विचार केला- “

डॉर्स ताबडतोब म्हणाली, “तू गणिताच्या भाषेत बोलणार नव्हतास. आता प्राथमिक वगैरे शब्द वापरून गणित घुसवू नकोस...”

“नाही नाही, प्राथमिक म्हणजे प्राचीन- अकसित या दृष्टीने म्हणतोय मी... आपल्याकडच्या ऐतिहासिक नोंदी जेवढ्या सापडतात, त्यात सापेक्षतेच्या सिध्दांताचा शोध कधी लागला वगैरे अगदीच धूसर आहे. चाकाचा शोध कुणी लावला जसं माहीत नाही, तसंच. ते काहीही असो. अशा मांडणीतले गुरुत्वाकर्षणाचे नियम आणि त्यातील समीकरणे ही ग्रहमालांच्या भ्रमणातून दिसतात, जोडताऱ्यांमधून दिसतात, भरती-ओहोटीतून कळतात... अनेक गोष्टी आहेत. अशा समीकरणांचा वापर करून आपल्याला द्विमिती चित्रांच्या मॉडेल्समधून ग्रहाचे ताऱ्याभोवतीचे भ्रमण किंवा दोन ताऱ्यांचे एकमेकांभोवती भ्रमण दाखवता येते किंवा आणखी थोडे गुंतागुंतीचे त्रिमिती होलोग्राफही तयार करता येतात. अशी प्रत्ययकारी

मॉडेल्स काही घडामोडी सोप्या पद्धतीने समजून घेण्यासाठी फार उपयोगी ठरतात. ती अख्खी कार्यपध्दती प्रत्यक्ष निरीक्षणातून समजून घेण्यापेक्षा खूपच सोपं. किंबहुना, गुरुत्वाकर्षणाच्या नियमांशिवाय आपले ग्रहगोलांच्या भ्रमणगतीविषयीचे ज्ञान, अंतराळातील चलनाचे नियम समजून घेणे अगदीच तोकडे राहिले असते.

"आता पहा, कोणत्याही घडामोडीबद्दल, त्यातल्या गुंतागुंतीबद्दल अधिक काहीही जाणून घ्यायचं असेल तर, अधिक विस्तृत अशी समीकरणं हवीत. अधिकाधिक तपशीलवार प्रोग्रॅमिंग हवे. आणि मग हाती लागणार समजायला अधिकच कठीण असे कॉम्प्युटराइज्ड प्रत्यंतर..."

"या प्रत्यंतराचे प्रत्यंतर घेता येणार नाही कां- सिम्युलेशनचे सिम्युलेशन?" ह्युमिनने विचारले, "समजून घेण्याच्या प्रवासातली काही पावलं आणखी सोपी होतील."

"तसं करायचं तर आपल्याला त्या घडामोडीची काही वैशिष्ट्ये काढून टाकावी लागतील आणि मग प्रत्यंतराचे मॉडेल निरुपयोगी ठरेल. ज्या घडामोडीचा अभ्यास करायचा तिचे अगदी किमान शक्यतेचे- लीस्ट पॉसिबल सिम्युलेशन- प्रत्यंतर प्रत्यक्ष घटनेपेक्षा जास्त गुंतागुंतीचे होऊ लागते आणि मग त्या घडामोडीतील गुंतागुंतीशी जुळत जाते. अशा तऱ्हेने हजारो वर्षांपूर्वी हे ठरून गेलं- की संपूर्ण विश्वाची सारी गुंतागुंत ही त्याच्यापेक्षा लहान प्रत्यंतररुपातून व्यक्त करता येणे अशक्य आहे.

"म्हणजेच, संपूर्ण विश्वाचे चित्र समाजावून घेण्यासाठी संपूर्ण विश्वाचाच अभ्यास करणे अनिवार्य ठरते. असंही दिसून आलंय की, विश्वाच्या एखाद्या लहानशा भागाचे प्रत्यंतररूप तयार करण्याचा प्रयत्न केला... आणि मग आणखी एका भागाचा, मग आणखी एका भागाचा असं करत गेलं, आणि त्या सर्वांना नंतर

एकत्र आणू असा विचार केला, तरीही अशा लहान भागांची अनंत प्रतिरुपे होतील. म्हणजेच संपूर्ण विश्व समजून घेण्यासाठी अनंत काळ लागेल... म्हणजेच त्या संबंधीचे ज्ञान मिळवणे अशक्य आहे असेच म्हणता येईल.''

''मला कळलंय तू काय म्हणतो आहेस ते.'' डॉर्सच्या स्वरात थोडं आश्चर्य होतं.

''बरं तर मग, यापेक्षा तुलनेने सोप्या गोष्टी समजून घेण्यासाठी प्रत्यंतररूपेही सोपीच असतात आणि गुंतागुंतीच्या व्यवस्थांची प्रत्यंतररूपेही गुंतागुंतीचीच असतात किंवा ही गुंतागुंत इतकी वाढलेली असते की प्रत्यंतररूप तयार करणेही अशक्य होत जाते. पण गुंतागुंतीच्या कुठल्या पातळीवर अशा तऱ्हेने प्रत्यंतररूप तयार करणं अशक्य होतं? वेल. मी हे दाखवून देतो आहे, की गेल्या शतकात शोधल्या गेलेल्या गणिती तंत्राचा वापर करून, अगदी फार प्रचंड ताकदीच्या कॉम्प्युटरचाही वापर केला तरीही, आपल्या दीर्घिकेचा समाज हे करू शकत नाही. त्यापेक्षा सोप्या प्रत्यंतरातून हे करता यायला हवे. आणि मग मी हे दाखवतो आहे, की पुढच्या घटनांचे संख्याशास्त्राच्या मदतीने भाकित करणे यात एकच शक्यता वर्तवण्यापेक्षा- घटनांचे पर्यायी संच देणे हे कदाचित् शक्य होऊ शकेल.''

''तसं असेल तर,'' ह्युमिन म्हणाला, ''तुला दीर्घिकेच्या अख्ख्या समाजाचं प्रत्यंतर अगदी व्यवस्थित करता येईल, फक्त ते करावं लागेल. त्यात अव्यवहार्य असं काय आहे?''

''मी एवढंच दाखवून देतोय की या कामासाठी अनंत काळ लागणार नाही, पण त्यासाठी अब्ज वर्षे लागत असली तरीही ते अव्यवहार्यच ठरेल. अनंत काळासाठी काम करीत रहाण्यासारखंच असेल ते.''

''खरोखरच एवढा वेळ लागेल कां? अब्ज वर्षे?''

“मी अजून तरी काही अंदाज बांधू शकलेलो नाही. पण मला शंका आहे तशी- किमान अब्ज वर्षे लागतीलच... म्हणून तर तो आकडा सांगितला मी.”

“पण तुला माहीत नाही ना अजून.”

“प्रयत्न करतोय मी.”

“त्यात काही आशादायक नाही म्हणतोस?”

“काहीच आशा नाही.”

“विद्यापीठाच्या लायब्ररीतून काही मदत झाली नाही?” ह्युमिनने प्रश्न विचारता विचारता डॉर्सकडे पाहिलं.

सेल्डनने मानेनेच नकार दिला. “काहीच नाही.”

“डॉर्सची काही मदत होणार नाही?”

डॉर्स सुस्कारली. “मला या विषयातलं काहीच कळत नाही, चेटर. मी फक्त कुठे काय शोधायचं ते सांगू शकते. हॅरीने पाहिलं आणि त्याला नाही सापडलं, तर मी काहीच करू शकत नाही.”

ह्युमिन उठून उभा राहिला. “तसं असेल तर, विद्यापीठातच रहाण्यात काही हंशील उरलं नाही. तुला दुसरीकडे कुठे नेऊन ठेवावं याचा विचार मलाच करावा लागेल.”

सेल्डनने हात लांबवला आणि त्याच्या बाहीला स्पर्श केला. “तरीही, एक कल्पना आहे माझ्या डोक्यात.”

ह्युमिन डोळे बारीक करून त्याच्याकडे पाहू लागला- आश्चर्याने की संशयाने कोण जाणे.

“कधी सुचली ही कल्पना? आत्ताच की काय?”

“नाही. अपरसाईडवर जाण्याअगोदरपासून ती माझ्या डोक्यात घोळत होती. वर गेल्यानंतर जे झालं त्यामुळे ती थोडी बाजूला पडली, पण लायब्ररीचा विषय निघाला आणि मला पुन्हा आठवण झाली.”

ह्युमिन पुन्हा खाली बसला, “सांग काय कल्पना आहे ती- पुन्हा एकदा आठवण देतो. फार गणिताच्या पाकात मुरलेली नसेल तर सांग मला.”

“अजिबात गणित नाही यात. लायब्ररीमधे इतिहास वाचताना मला अचानक जाणवलं की दीर्घिकेमधला समाज फार पूर्वी तसा कमी गुंतागुंतीचा होता. बारा हजार व्रषांपूर्वी, जेव्हा साम्राज्य स्थापन होऊ लागले होते. तेव्हा या दीर्घिकेत फक्त शंभर कोटी जगांवर मानवी वस्ती होती. वीस हजार वर्षांपूर्वी साम्राज्यपूर्व काळात एकंदर दहा हजार जेमेतेम जगांमध्ये मानवजात वसली होती. आणखी मागेमागे जावं तसं मानवीसमाज किती मर्यादित झालेला असेल कोण जाणे? कदाचित् केवळ एकाच जगाने सुरुवात जाली असेल या सर्वांची- तूच एकदा मला ती दंतकथा सांगितली होतीस, ह्युमिन.”

ह्युमिन म्हणाला, “म्हणजे दीर्घिकेतल्या प्राथमिक स्वरुपाच्या समाजाचं निरीक्षण करता आलं तर तुला सायकोहिस्ट्रीचे नियम शोधता येतील असं वाटतंय तुला?”

“होय, मला वाटतं ते जमेल मला.”

“मग तेव्हा,” डॉर्स उत्साहित होऊन बोलू लागली, “जर तू एकाद्या लहानशा गतसमाजावर आधारित सायकोहिस्ट्रीचे नियम शोधलेस, आणि समज तू पूर्वसाम्राज्यशाहीतील परिस्थितीवर आधारित भाकितं केलीस आणि मग हजार वर्षांनंतर साम्राज्यात खरोखर काय झालं हे तपासलंस तर तुला तू सत्याच्या किती जवळ पोहोचला आहेस हे कळू शकेल.”

ह्युमिन शांतपणे म्हणाला, "तुला हजार वर्षांपूर्वी दीर्घिकेच्या इतिहासात काय घडलं आहे हे माहीत असल्यामुळे ती कसोटी योग्य ठरणार नाही. तुला आधीच सारं माहीत असल्यामुळे त्याचा परिणाम तुझ्या आधीच्या कामावर नक्कीच होईल. तुझ्या नियमांत, समीकरणांत चपखल बसतील असंच काहीतरी तू शोधशील आणि योग्य ते निष्कर्ष मिळवशील असं होऊ शकतं."

"मला नाही वाटच तसं," डॉर्सम म्हणाली, "दीर्घिकायुग एक हजारमध्ये काय झालं ते आपल्याला नक्की काहीच माहीत नाही. बरंच संशोधन करावं लागेल त्यासाठी. अकरा हजार वर्षं लोटली त्याला."

सेल्डनच्या मुद्रेवर निराशा पसरली. "आपल्याला दीर्घिकायुग एक हजारमधे काय घडलं माहीत नाही? तेव्हाही कॉम्प्युटर्स होते- होते ना, डॉर्स?"

"अर्थात् होते."

"आणि मेमरी स्टोरेजेस असतील, डोळ्यांना दिसलेलं, कानावर आलेलं सारं नोंदून ठेवलं गेलं असेलच ना? आजच्या १२०२०मधल्या घटनांबद्दल आपल्याला जसं माहीत होऊ शकतं, तसंच दी.यु. १०००मधल्याही घटनांच्या नोंदींतून माहीत होईलच."

"सैद्धांतिक दृष्ट्या- होय- पण प्रत्यक्षात नाही... जसं तू सारखा म्हणतोस तसंच. दी.यु. १०००च्या नोंदी असणं शक्य आहे, पण त्या हाताशी मिळवणं व्यवहार्य असेलच असं नाही."

"होय, पण डॉर्स, मी जे म्हणत असतो ते गणिताच्या मांडणीबाबत. तेच ऐतिहासिक दस्तावेजांच्या बाबतीत लागू पडेल असं नाही."

डॉर्सने थोडा बचावात्मक पवित्रा घेत म्हटलं, "सगळे दस्तावेज काही कायम टिकून रहात नाहीत. मेमरी बँक्स नष्ट होऊ शकतात, किंवा कुठल्यातरी संघर्षांपोटी

खराब केल्या जाऊ शकतात. किंवा केवळ काळाच्या ओघात नाहीशा होतात. कोणताही संदर्भ बऱ्याच वर्षांत जर कुणी वापरला नसेल, तर इतर साऱ्या गदारोळात नाहीसा होऊ शकतो. इंपेरिअल लायब्ररीचा एक तृतीयांश भाग केवळ बेशिस्त गोंधळाचा आहे. पण परंपराच अशी आहे की कुठलेही दस्तावेज नष्ट केले जात नाहीत. काही लायब्ररीजमधे अशा परंपरा पाळल्या जात नाहीत. स्ट्रीलिंग विद्यापीठाच्या लायब्ररीत आम्ही दर दहा वर्षांनी निरुपयोगी गोष्टी काढून टाकतो.

"स्वाभाविकतः, काही दस्तावेज संदर्भासाठी सतत वापरले जातात आणि वेगवेगळया जगांमध्ये त्यांच्या प्रती निघत रहातात, खाजगी तसंच शासकीय लायब्ररीजमधे हजारो वर्षांपासून वापरले जातात- त्यात दीर्घिकेच्या इतिहासातील महत्त्वाचे मुद्दे अगदी साम्राज्यपूर्व काळापासूनच्या इतिहासातले महत्त्वाचे टप्पे जपले जातात. पण जसजसं आपण अधिकाधिक मागे जातो, तसतसे फार कमीकमी दस्तावेज नीट संवर्धित केलेले सापडतात."

"माझा विश्वासच बसत नाही यावर," सेल्डन म्हणाला, "कुठलाही दस्तावेज खराब होऊन नाहीसा होऊ नये म्हणून त्याच्या ताज्या नोंदी करायला हव्यात. ज्ञान असं नाहीसं झालेलं कसं खपवून घेतो आपण?"

"नकोसं असलेलं ज्ञान हा निरुपयोगी ज्ञान आहे," डॉर्स म्हणाला, "अशा वापरात नसलेल्या माहितीच्या पुनरुज्जीवनावर किती वेळ, शक्ती, प्रयत्न सातत्याने खर्च करत रहावं लागेल तुला समजतंय? आणि हा अनाठायी खर्च दिवसेंदिवस प्रमाणाबाहेर वाढत जाईल."

"हजार वर्षांतून एकदा कधीतरी कुठेतरी कुणालातरी हा असा निष्काळजीपणे फेकून दिलेला डाटा लागेल असा विचार तरी तुम्ही केला असेलच."

“एखादा संदर्भ हजार वर्षांत एकदा कुणालातरी लागेल यासाठी सगळंच जपून ठेवायचं हे परवडण्यासारखं नसतं. अगदी विज्ञानाच्या क्षेत्रातही. तू म्हणतोस, की गुरुत्वाकर्षणाची प्राथमिक सूत्र प्राचीन आहेत- प्राचीन अशामुळे की त्याचा कालखंड कोणता काय हे सगळं धूसर झालं आता. असं कां व्हावं? तुम्ही गणितज्ञ, वैज्ञानिक सारा डाटा, सारी माहिती क्रमवार सगळं जपून ठेवलं नव्हतंत कां- जेव्हा ही सूत्र शोधली गेली तेव्हाच्या काळापासून?”

सेल्डन घशातल्या घशात गुरगुरला आणि गप्प राहिला. मग तो म्हणाला, “वेल, ह्युमिन, हे झालं माझ्या कल्पनेचं. आपण जसे भूतकाळात शिरतो आणि समाज छोटा होत जातो, तसतशी सायकोहिस्ट्री उपयोगी ठरण्याची शक्यता वाढते. पण ज्ञान हे समाजाच्या आकारापेक्षा अधिक वेगाने कमी होत जातं, त्यामुळे सायकोहिस्ट्रीची शक्यता अतिशय कमी होत जाते- जास्त होण्यापेक्षा कमीच.”

“तसं एक तो मायकोजेन सेक्टर आहे खरा...” डॉर्स विचारात पडत म्हणाली.

ह्युमिनने चटकन् वर पाहिलं. “खरंच की, आणि सेल्डनसाठी ती अगदी उत्तम जागा आहे. मलाच सुचायला हवं होतं हे.”

“मायकोजेन सेक्टर,” हॅरीने त्या दोघांकडे आळीपाळीने पाहात म्हटलं, “काय आहे, कुठे आहे हा मायकोजेन सेक्टर?”

“हॅरी, प्लीज- तुला नंतर सांगतो सगळं. आता- मला आत्ताच्या आत्ता सगळी तयारी करायला हवी. तू आज रात्रीच निघायचंस इथून.”

## ३३

डॉर्सने सेल्डनला थोडी झोप घ्यायचा आग्रह केला. दिवे मालवल्यानंतर काही वेळानंतर आणि पहाटेच्या आधी काही वेळ निघायचं ठरलं होतं. रात्रीच्या आधाराने, बाकी सारं विद्यापीठ गुडुप झोपलेलं असताना प्रस्थान ठेवायचं होतं.

“आणि तुला परत जमिनीवर झोपायला लावू?” सेल्डनने विचारलं.

तिने खांदे उडवले. “आता पलंगावर एकजणच झोपू शकेल. दोघांनी गर्दी केली, तर दोघांपैकी कुणालाच झोप लागणार नाही.”

क्षणभर तो तिच्याकडे आसावून बघत राहिला आणि म्हणाला, “मग या वेळी मी जमिनीवर झोपतो.”

“नाही, अजिबात नाही. बर्फाच्या पावसात कोमामधे मी नव्हते गेले.”

आणि मग ते दोघेही झोपलेच नाहीत. खोलीत अंधार केलेला, ट्रॅन्टॉरचा नेहमीचा निनाद विद्यापीठाच्या आवारात जरासा सुम्म होता. सेल्डनला बोलावंसं वाटलं.

तो म्हणाला, “डॉर्स, माझ्यामुळे तुला या विद्यापीठात खूपच त्रास झालाय. तुझ्या कामात अडथळाच बनून राहिलोय मी. तरीही, तुला सोडून जाताना मला खूप वाईट वाटतंय.”

डॉर्स उत्तरली, “तू मला सोडून जात नाहीयेस. मी तुझ्याबरोबरच येतेय. ह्युमिन माझ्यासाठी रजा काढायची तजवीज करतोय.”

सेल्डन वरमून म्हणाला, “माझ्यासाठी तू असं करावंस असं मी नाही म्हणणार.”

“तू म्हणतच नाहीस हे. ह्युमिनने सांगितलंय. मला तुझ्यावर लक्ष ठेवलंच पाहिजे. अखेर अपरसाईडवर जे झालं तr माझीच चूक होती, आणि त्याची भरपाई केली पाहिजे मला.”

"मी सांगितलं ना तुला. त्याबद्दल तू उगीच अपराधी वाटून नको घेऊ. पण बरं का- तू बरोबर असलीस तर मला फार बरं वाटेल हे नक्की. तुझ्या आय़ुष्यात माझ्यामुळे उगीच गोंधळ झालाय एवढी खात्री वाटायला हवी मला."

डॉर्स हलकेच म्हणाला, "तसं काही नाही, हॅरी. झोप आता प्लीज."

हॅरी थोडावेळ शांत पडून राहिला, मग कुजबुजला, "डॉर्स, तुला खात्री आहे की ह्युमिन सारी व्यवस्था नीट लावील अशी?"

डॉर्स म्हणाली, "तो खूप वेगळा माणूस आहे. मला वाटतं, त्याच्या ओळखी इथे विद्यापीठात आहेत तशा इतरत्रही आहेत. माझ्यासाठी बेमुदत रजेची तजवीज तो करतो म्हणाला तर मग तो करणार तसं. खात्री आहे माझी. तो फार चिकाटीने काम करत रहातो."

"हं, माहीत आहे मला," सेल्डन म्हणाला, "कधीकधी मला वाटतं त्याला माझ्याकडून खरोखर काय अपेक्षा आहेत..."

"" डॉर्स उत्तरली, "त्याच्या मनातल्या कल्पना फार आदर्शवत् असतात- आणि फार तीव्रपणे विचार करतो तो त्यांचा."

"तू त्याला खूपच चांगली ओळखतेस असं दिसतंय, डॉर्स."

"हो हो. खूपच जुनी आणि चांगली ओळख आहे आमची."

"फार जवळची?"

डॉर्स कशीशीच खाकरली, "मला नक्की कळलं नाही तू काय सुचवतो आहेस, हॅरी, पण अगदी वाईट अर्थ काढून उत्तर द्यायचं झालं तर- नाही. मी त्याला तशी जवळून ओळखत नाही. आणि असला तरीही त्याचा तुझ्याशी काय संबंध असणार?"

“चुकलं माझं, सॉरी,” सेल्डन म्हणाला. “चुकून दुसऱ्या कुणाच्या मालमत्तेवर अतिक्रमण होऊ नये एवढाच हेतू होता माझा.”

“मालमत्ता? हा तर अधिकच मोठा अपमान. आता तू झोपावंस हे बरं राहील मला वाटतं.”

“पुन्हा एकदा सॉरी, डॉर्स, पण झोपच येत नाही. मी विषय बदलून बोलतो चल. मला तू अजूनही मायकोजेन सेक्टर म्हणजे काय ते सांगितलेलं नाहीस. मी तिथे जाणं चांगलं असेल तर ते कां? आहे तरी काय हा प्रकार?”

“तो भाग अगदी लहानसा आहे- मला वाटतं फारफार तर वीस लाख लोकसंख्या असावी. मायकोजिनियन्स त्यांच्या इतिहासातील काही जुन्या परंपरांचे पालन करतात अजूनही. त्यांच्याकडचे ऐतिहासिक दस्तावेज आणखी कुणालाही पाहायलाही मिळत नाहीत म्हणे. शक्य आहे, की तुझ्या साम्राज्यपूर्व काळातील अभ्यासासाठी पठडीबाज इतिहासकारांच्या नोंदींपेक्षा त्यांचा तुला अधिक फायदा होईल. आपली सारी प्राचीन इतिहासासंबंधीची चर्चा होत असताना या सेक्टरची आठवण झाली.”

“तू पाहिले आहेस कधी ते दस्तावेज?”

“छे, कुणीही पाहिलेले नसावेत ते.”

“मग ते अस्तित्वात आहेत याची खात्री कशी काय?”

“खरंतर मला नाही माहीत ते. नॉनमायकोजिनियन्सच्या दृष्टीने मायकोजिनियन्स म्हणजे वेड्यांचा बाजार आहे... पण तसं ठरवून टाकणं बरोबर नाही. त्यांच्याकडे दस्तावेज आहेत असं ते सांगतात, त्याअर्थी काहीतरी असतीलच. आणि काहीही असो, आपण निदान नजरेआड तर असू तिथे. मायकोजिनियन्स कुणातही मिसळत नाहीत एवढं नक्की. –आणि आता प्लीज झोप बाबा.”

आणि अखेर सेल्डनला कशीबशी झोप लागली.

34

हॅरि सेल्डन आणि डॉर्स वेनाबिली या दोघांनी पहाटे तीन वाजता विद्यापीठाच्या परिसरातून प्रयाण केले. डॉर्स रस्ता दाखवणार हे तर स्पष्टच होतं. सेल्डनपेक्षा दोन वर्षं आधी ती इथे आलेली, त्यामुळे तिला रस्ते थोडे जास्त माहीत होते. ह्युमिनची जवळची मैत्रीण होती ती (किती जवळची हा प्रश्न अजूनही त्याला टोकरत होताच) आणि त्याने दिलेल्या सूचना तिलाच नीट कळल्या होत्या.

ती आणि सेल्डन दोघांनीही चेहऱ्याला घट्ट आच्छादून घेणाऱ्या टोप्या घातलेल्या आणि खाली ढिलेढाले टीशर्टस्. ही फॅशन काही दिवस विद्यापीठात जोरात होती. विशेषतः तरुण विद्यार्थ्यांमध्ये. आता मात्र ती मागे पडलेली आणि त्यांना त्या वेषात पाहून लोक हसलेच असते. पण आता त्यामुळे त्यांना सहज, एका दृष्टीक्षेपात ओळखणं कठीण झालेलं हे नक्की.

ह्युमिन म्हणालेला, “शक्य आहे की अपरसाईडवर घडलेली घटना अगदी निरुपद्रवी घटना असेल, आणि तुझ्यामागे कुणीही लागलेलं नसेलही, पण वाईटात वाईटाची अपेक्षा ठेवून वागलेलं बरं.”

सेल्डनने विचारलेलं, “तू नाही का येणार आमच्याबरोबर?”

“आवडलं असतं मला,” ह्युमिन उत्तरला, “पण कामावरून इतक्या सुट्या घेणं बरोबर नाही मी. नाहीतर कुणीतरी माझ्याच मागे लागेल. समजतंय ना तुला?”

सेल्डन सुस्कारला. खरंच होतं ते.

एक्स्प्रेसवे कारमध्ये चढल्यावर त्यांनी अगदी दूरच्या कोपऱ्यातली जागा पकडली. थोडेसेच लोक आत होते. पहाटे तीन वाजता कुणी का एक्स्प्रेसवेमधे

चढावं, सेल्डन विचार करत होता. पण कुणीतरी होतं ते बरंच होतं- नाहीतर ते दोघे अगदीच नजरेत आले असते हेही त्याला सुचलं.

अनंतात जातेय की काय असं वाटणाऱ्या मोनोरेलच्या अमर्याद इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्डवरून जाणाऱ्या अगणित डब्यांच्या खिडक्यांतून समोरच्या असीम दृश्याकडे सेल्डनची नजर खिळली.

एक्स्प्रेसवे जात होता त्याच्या बाजूने निवासी घरं, इमारती होत्या. काही उंचच उंच आणि काही नक्कीच खोलवर खाली गेलेल्या. शेकडो लक्ष चौरस किलोमीटर्सचे शहर असेल तर चाळीस अब्ज लोकसंख्येसाठी फार उंच इमारती किंवा फार लहान घरे असण्याची गरज नव्हती. काही वेळा मोकळी जमीनही दिसत होती- तिथे पिकं काढत असणार, पण काही तर बागाच होत्या. काही इमारतींच्या रचना वेगळ्याच होत्या- कशासाठी असतील त्या- त्याला कळत नव्हतं. कारखाने? कार्यालयीन इमारती? कोणाला माहीत? एक भला मोठा गुळगुळीत सिलिंडर दिसला- तो बहुधा पाण्यासाठी असावा. ट्रॅन्टोर गोड्या पाण्याचा पुरवठा तर आवश्यकच होता. अपरसाईडवरून पावसाचं पाणी गोळा करत असतील का ते... मग गाळून, प्रक्रिया करून वापरत असतील? तसंच करावं लागत असणार.

पण हे दृश्य त्याला फार वेळ पाहाता आलं नाही. डॉर्स पुटपुटली, “उतरायचंय आपल्याला इथेच.” ती उभी राहिली. तिच्या कणखर बोटांची पकड त्याच्या दंडावर होती.

आता ते एक्स्प्रेसवेवरून जमिनीवर उतरलेले. डॉर्स पाट्या वाचू लागली. या पाट्या अगदी लहानशाच होत्या आणि बऱ्याच होत्या. सेल्डनच्या पोटात गोळा आला. त्यातल्या अकांवर चित्रे होती, आद्याक्षरे होती- स्थानिक लोकांना कळत असतील ती- पण बाहेरच्यांना काही पत्ता लागणार नाही.

“इकडून जायचंय,” डॉर्स म्हणाली.

“कुठून? तुला कसं कळलं?”

“हे पाहिलंस? दोन पंख आणि मग बाण आहे.”

“दोन पंख? ओः.” त्याला वाटलेलं ते उलटं डब्लू अक्षर आहे. जरासं पसरट, रुंद. पण आथा नीट पाहिल्यावर कळत होतं की ते पंखांचंच चित्र होतं. जरा अलंकारिक.

“लिहीत का नाहीत ते सरळ?” तो कुरकुरत म्हणाला.

“कारण प्रत्येक जगातले शब्द निरनिराळे असू शकतात. ज्याला इथे एअरजेट म्हणतात त्याला सिन्नावर सोअर म्हणतात. कुठेकुठे त्याला स्वूप म्हणतात. दोन पंख आणि बाण हे चिन्ह साऱ्या दीर्घिकेत विमानयानांसाठी वापरलं जातं. आणि ते सर्वांना समजतं. तुमच्या हेलिकॉनवर नाही वापरत?”

“फार नाही. हेलिकॉन तसं छोटंसंच आणि सांस्कृतिकदृष्ट्या एकजिनसी जग आहे. आम्ही आमच्या पध्दतीच पाळतो कारण तसंही आमच्या शेजाऱ्यांच्या दाट सावलीत जगावं लागतं आम्हाला.”

“पाहिलंस?” डॉर्स म्हणाली, “अशा ठिकाणीच तुझी सायकोहिस्ट्री डोकावते पहा. अगदी बोलीभाषांच्या वैविध्यासंदर्भातही काही ठरीव चिन्हे साऱ्या दीर्घिकेमध्ये एकत्वाचे तत्व आणू शकते.”

“त्याचा काहीही उपयोग नाही.” तो तिच्या मागोमाग एका सुनसान गल्लीतून चालला होता आणि त्याच्या मनात एकीकडे ट्रॅन्टोरवरची गुन्हेगारी आणि या भागात कितपत गुन्हेगारी आहे वगैरे विचारही चालला होता. “अनेक नियम असू शकतात- एकाच क्रियेसंदर्भात आणि तरीही त्यातून काहीही सामान्य निष्कर्ष काढता येणार नाहीत. मी जेव्हा म्हणतो की एखाद्या व्यवस्थेचा अर्थ लावायला तितकेच

गुंतागुंतीचे मॉडेल वापरावे लागते- त्याचा हाच अर्थ असतो. -डॉर्स, आपण एअरजेट पकडायला चाललो आहोत का?"

ती थांबली आणि त्याच्याकडे वळून पाहू लागली. तिच्या चेहऱ्यावर गंमत वाटल्याचे भाव होते. "आता एअरजेटच्या चिन्हाच्या दिशेने जाऊ लागलो असलो तर काय गोल्फकोर्सवर पोहोचणार आहोत कां? तुला भीती वाटतेय की काय एअरजेटची- अनेक ट्रॅन्टॉरियन्सना वाटते तशी?"

"नाही नाही, आम्ही हेलिकॉनवर अनेकदा विमानप्रवास करतो. फक्त एवढंच की आम्ही विद्यापीठाकडे यायला निघालो तेव्हा ह्युमिन म्हणालेला- एअरजेटसारखी व्यावसायिक वाहने टाळलेली बरी... आपला माग सहज काढता येतो."

"ते वेगळं. तू नेमका कुठे होतास हे त्यांना तेव्हा माहीत होतं, हॅरि, आणि ते तुझ्यामागे लागलेलेच तेव्हा. आता कदाचित् त्यांना माहीत नसेल तुझा ठावठिकाणा. आणि आपण अगदीच आडबाजूचं ठाणं निवडलंय- शिवाय एअऱजेट खाजगी आहे."

"आणि- ते चालवतंय कोण?"

"ह्युमिनचा मित्र असणार कुणी तरी."

"विश्वासार्ह असेल ना?"

"ह्युमिनचा मित्र असेल तर नक्कीच."

"तुझा ह्युमिनवर फारच विश्वास दिसतो." सेल्डनचा स्वर किंचितसा नाखुष होता.

"कारण आहे त्याला." डॉर्स अजिबात न शरमता म्हणाली, "तो आहेच तसा."

सेल्डनची नाखुषी तशीच राहिली.

“ते पहा एअऱजेट.” ती म्हणाली.

एक लहानसं एअरजेट होतं ते. पंखांचा आकार जरा वेगळाच होता. शेजारीच एक लहानखुरा माणूस उभा होता. ट्रॅन्टोरचे खास भडकरंगी कपडे घातलेले त्याने.

डॉर्स म्हणाली, “आम्ही सायको.”

तो पायलट उत्तरला, “आणि मी हिस्ट्री.”

ते त्याच्या मागोमाग एअरजेटकडे गेले. सेल्डनेन विचारलं, “हा संकेत कुणी ठरवला?”

“ह्युमिनने,” डॉर्स उत्तरली.

सेल्डनने नाक उडवलं, “ह्युमिनकडे एवढी विनोदबुध्दी असेल असं वाटलं नव्हतं मला. किती गंभीर दिसतो तो.”

डॉर्स मंद हसली.

# सनमास्टर

सनमास्टर चौदा-

... प्राचीन ट्रॅन्टोरच्या मायकोजेन सेक्टरचा नेता. या लहानशा स्वान्त सेक्टमधल्या सर्वच नेत्यांबाबत जे सांगता येत तेच याच्याबद्दलही. त्याच्याबद्दलची फारशी माहिती उपलब्द नाही. त्याची ऐतिहासिक भूमिका जी काही नोंदली गेली आहे ती केवळ हॅरि सेल्डनच्या पलायनाच्या दिवसांत त्याचा त्याच्याशी काही संबंध आला म्हणून.

दीर्घिका ज्ञानकोष

35

पायलटच्या मागे फक्त दोनच खुर्च्या होत्या. सेल्डन खाली बसताच एक मऊ पॅडिंगसारखं कापड अल्लाद त्याच्या पायांभोवती, कंबरेभोवती, छातीभोवती गुंडाळलं गेलं आणि कपाळावर, कानांवर एक टोपी सरकली. त्याला जणू कैद झाल्यासारखं वाटलं. आणि त्याने कसंबसं डावीकडे वळून पाहिलं... डॉर्सही त्याच्यासारखीच गुंडाळली गेली होती.

पायलट त्याच्या जागेवर बसला आणि त्याने सर्व कंट्रोल्स तपासले. मग तो बोलू लागला, “मी एन्डॉर लेव्हॅनियन, तुमच्या सेवेत हजर. तुम्हाला असे गुंडाळून टाकले आहे कारण आपण वर जाताजाता खूप वेग घेणार आहोत. एकदा उघड्यावर गेलो आणि सरळ उड्डाण करू लागलो की तुम्हाला सुटं होता येईल. मला तुमची नावं सांगू नका. मला त्याच्याशी काहीही कर्तव्य नाही.”

तो त्यांच्याकडे पाहून बसला. त्याचा बटाट्यासारखा चेहरा सुरकुतून गेला आणि ओठ आणखी पसरट झाले. “काही मानसिक गुंतागुंत नाही ना, बच्चे लोग?”

डॉर्स हसत म्हणाली, “मी बाहेरून आलेय, आणि सवय आहे मला उडण्याची.”

“माझंही तेच.” सेल्डन जरासा कुर्‍यात बोलला.

“फारच छान, बच्चे लोग. अर्थात हे काही नेहमीचं साधंसुधं एअरजेट नाही आणि तुम्ही अंधारात कधी प्रवास केला असेल माहीत नाही. पण मला वाटतं तुम्ही निभावून नेऊ शकाल.”

तो स्वतःही गुंडाळला गेला होताच, पण त्याचे हात पूर्णपणे मोकळे होते हे सेल्डनला दिसत होतं.

जेटच्या आतमध्ये एक गुणगुण गुंजत होती आणि ती हळुहळू वाढत चालली होती. ती वाढतही नव्हती नि कमीही होत नव्हती. पण आता वाढेल की काय अशी भीती मात्र वाटत राहिली. सेल्डनने कानातला आवाज कमी करायला मस्तक झटकण्याचा प्रयत्न केला, पण त्या थोडक्याशा हालचाली सरशी त्या कापडाची मस्तकावरची पकड दृढ झाली.

आणि मग ते जेट टुण्णकन उडालं- त्या उड्डाणाचं वर्णन करायला हाच शब्द सेल्डनला सुचला. आणि त्याला जाणवलं की तो त्याच्या बैठकीवर ढकलला गेला होता, आणि खाली चेपला गेला होता.

पायलटसमोरच्या काचेवर सेल्डनला जे दिसलं ते पाहून त्याला जराशी भीतीच वाटली. समोर एक भिंत दिसत होती आणि त्यात एक गोल भोक होतं. ह्युमिन आणि त्याने राजप्रासादाचा परिसर सोडला तेव्हा जी एअर टॅक्सी घेतली होती, ती अशाच एका गोल दारातून झेपावली होती. पण हे दार जेटच्या आकाराएवढंच असलं तरीही त्याच्या पंखांसाठी पुरेशी जागा दिसत नव्हती.

सेल्डनने शक्य होईल तितकी मना उजवीकडे वळवली- आणि त्याला क्षणभरासाठी उजवीकडचा पंख दुमडला जाताना दिसला.

जेट दारातून बाहेर झेपावलं आणि विद्युतचुंबकीय क्षेत्राने त्याचा ताबा घेतला. प्रकाशाने उजळलेल्या एका बोगद्यातून ते सणसणत पुढे निघालं. त्याचा वेग सतत वाढत होता आणि मधूनमधून क्लिकक्लिक आवाज येत होते. एकेका चुंबकासमोरून पुढे जाताना तो आवाज होत असावा असं सेल्डनला वाटलं.

आणि मग दहा मिनिटांच्या आतच ते जेट झूम्मकन् वातावरणात शिरलं- रात्रीच्या अंधारात त्याने मुसंडी मारलेली.

चुंबकीय क्षेत्राच्या बाहेर जेट आलं तेव्हा त्याचा वेग कमी झाला आणि त्या अंगाभोवतीच्या जाळीवर जणू तो ढकलला गेला. काही धपापते क्षण सरले...

आणि मग जाळीचा दाब कमी होत गेला, आणि ती जाळी नाहीशीच झाली.

"कसे आहात, बच्चे लोग?" पायलटचा खेळकर आवाज उमटला.

"सांगवत नाही," सेल्डन म्हणाला. डॉर्सकडे वळून त्याने विचारलं, "तू बरी आहेस ना?"

"अगदी," ती उत्तरली, "मला वाटतं मि. लेवॅनियन आपल्याला मुद्दाम या कसरतींतून नेत असावेत. आपण खरंच बाहेरचे लोक आहोत की काय ते पाहायला. हो की नाही, मि. लेवॅनियन?"

"काही लोकांना साहसाची मजा वाटते." लेवॅनियन म्हणाला, "तुम्हाला?"

"मर्यादित असलं तर ठीक." डॉर्स म्हणाली.

सेल्डनने दुजोरा दिला, "कुणाही शहाण्या माणसाला तसंच वाटतं."

मग तो पुढे म्हणाला, “साहेब, जेटचे पंख तुटले असते तर तुम्हाला त्यात काही विनोदी वाटलं नसतं बरं...”

“अजिबात नाही, सर. मी तुम्हाला सांगितलं ना, की हे काही नेहमीचं साधंसुधं जेट नाही. त्याचे पंख कॉम्प्युटराइज्ड आहेत. जेटचा वेग, वाऱ्याचा वेग आणि दिशा आणि आणखी डझनभर गोष्टींच्या बदलांनुसार त्याची लांबी, रुंदी, वळ, आकार सारेच बदलते. आणि जोवर खुद्द जेटवर काही भयंकर आघात होत नाही तोवर पंख अजिबात तुटणार नाहीत.”

खिडकीवर तडतड होत होती. “पाऊस पडतोय.” सेल्डन म्हणाला.

“बरेचदा असतोच पाऊस.” पायलट म्हणाला.

सेल्डन खिडकीतून बाहेर पाहू लागला. हेलिकॉन किंवा इतर कुठल्याही ग्रहावरच्या वातावरणातून मानवनिर्मित रोषणाई दिसली असती. पण ट्रॅन्टॉरवर मात्र अंधारच असे. पण अगदीच अंधारही नव्हता. मधेच एकदा एक प्रकाशझोत लखलखलेला दिसला. कदाचित् अपरसाईडवरचे धोक्याचा इशारा देणारे झोत असावेत.

नेहमीप्रमाणे सेल्डनची अस्वस्थता डॉर्सच्या लक्षात आली. त्याच्या हातावर किंचित थोपटत ती म्हणाली, “पायलटला आपलं काम चांगलं येतंय, हॅरी.”

“असं मलाही वाटतंय, पण त्याने आपल्याला थोडी माहिती दिली तर बरं होईल.” सेल्डन मोठ्याने म्हणाला.

“माझी काहीच हरकत नाही,” पायलट म्हणाला. “एक म्हणजे आपण वरच्या दिशेने चाललोय आणि काही मिनिटांतच ढगांच्याही वर जाऊ. मग पाऊस नसेल. शिवाय तारेही दिसतील.”

त्याचे हे शब्द जणू वेळ लावून योजलेले असावेत- कारण त्याच क्षणी थोडेथोडे तारे तुरळक पिसांसारख्या ढगांमधून लुकलुकू लागले. आणि पायलटने आतले दिवे बंद करताच आकाश जणू झळाळून उठलं. फक्त त्याच्या पॅनेलवरचे मंद दिवे तेवढे आतून बाहेरच्या तेजस्वी उधळणीशी स्पर्धा करीत होते.

डॉर्स म्हणाली, "गेल्या दोन वर्षांत मी प्रथमच तारे पाहातेय. काय सुंदर आहे हे, नाही? किती तेजस्वी आणि कितीकिती आहेत ते..."

पायलट म्हणाला, "ट्रॅन्टोरचं जग गॅलॅक्सीच्या केंद्राच्या बरंच जवळ आहे. बाकीची सारी जगे बरीच दूर आहेत केंद्रापासून."

हेलिकॉन ग्रह दीर्घिकेच्या एका कोपऱ्यात होता आणि त्याच्या आकाशात फारसे तारे नव्हते. सेल्डन अवाक् होऊन पाहात होता.

डॉर्स म्हणाली, "अचानक सारे आवाज शांत कसे झाले?"

"खरंच..." सेल्डन म्हणाला, "मि. लेवॅनियन, या जेटला ऊर्जा कुठून मिळते?"

"एक मायक्रोफ्यूजन मोटर आहे आणि गरम वायूचा बारीकसा प्रवाह."

"मला माहीत नव्हतं- आपल्याकडे मायक्रोफ्यूजनवर काम करणारी जेट्स आहेत हे. चर्चा होते त्याची पण-"

"अशी लहानलहान आहेत काही. फक्त ट्रॅन्टोरवरच आहेत ती. आणि फक्त शासनाचे उच्चपदस्थच ती वापरत असतात."

"असल्या प्रवासाचं शुल्क बरंच जास्त असेल." सेल्डन म्हणाला.

"खूपच जास्त असतं, सर."

"आणि मि. ह्युमिनना किती पैसे भरावे लागले असतील?"

“यावेळी काहीच खर्च नाही. मि. ह्युमिन या कंपनीच्या मालकांचे फार जवळचे मित्र आहेत.”

सेल्डन हुंकारला. मग त्याने विचारलं, “अशी जेट्स जास्त प्रमाणात का नाहीत?”

“फार महाग पडतात ती, सर. जी आहेत ती आहे त्या मागणीला पुरेशी आहेत.”

“मोठी जेट्स केलीत तर अधिक मागणी वाढेल.”

“शक्य आहे, पण मोठ्या एअर जेट्ससाठी लागणारी शक्तीमान मायक्रोफ्यूजन एंजिन्स कंपनीला कधीच तयार करता आली नाहीत.”

सेल्डनला आठवलं- ह्युमिन तक्रार करीत होता... तंत्रज्ञानाची प्रगती फारच खालावली आहे. “ऱ्हासपर्व.”

“काय?” डॉर्स म्हणाली.

“काही नाही,” सेल्डन उत्तरला, “ह्युमिन एकदा मला काहीतरी म्हणाला होता, ते आठवलं.” मग तो बाहेर बघत म्हणाला, “मि. लेवॅनियन, आपण पश्चिमेकडे चाललो आहोत का?”

“होय, तुम्हाला कसं कळलं?”

“कारण आपण पूर्वेकडे चाललो असतो तर एव्हाना सूर्योदयाची चाहूल लागली असती.”

पण ग्रहाचा पाठलाग करणाऱ्या सूर्याने त्यांना अखेर गाठलेच आणि सूर्यप्रकाश... खराखुरा सूर्यप्रकाश जेटच्या अंतर्भागात पोहोचला. पण तो फार वेळ टिकला नाही, कारण जेट एक वळण घेऊन खाली झेपावले आणि ढगांच्या

आच्छादनात घुसले. निळे, सोनेरी रंग अंतर्धान पावले आणि त्यांची जागा मळकट राखी रंगाने घेतली. खऱ्या सूर्यप्रकाशाचे काही क्षणसुध्दा पुरेसे मिळाले नाहीत म्हणून सेल्डन आणि डॉर्स दोघेही उसासले.

ढगांमध्ये शिरताच त्यांना अपरसाईडचा पृष्ठभाग दिसू लागला. निदान या जागी तरी थोडेफार रान दिसत होते आणि हिरव्या गवताने झाकलेले माळही. क्लौझियाने वर्णन केल्यासारखेच होते हे दृश्य.

पुन्हा काही चुटपुटते क्षणच बाहेरचं दृश्य दिसलं. त्यांच्या समोरच खाली एक प्रवेशवर्तुळ उघडलं होतं. त्याच्या कडेने अक्षरं चमकत होती- मायकोजेन.

आणि ते थेट आत घुसलेच.

३६-

जेटपोर्टवर ते उतरले तेव्हा सभोवार बारीक नजर फिरवूनही सेल्डनला कुणीही दिसलं नाही. पायलटचं काम संपलं होतं. त्याने हॅरी आणि डॉर्सचे हात हाती घेत निरोप घेतला आणि त्याने समोरच्या प्रवेशवर्तुळातून जेट सुसाट बाहेर काढलं.

मग फक्त थांबून वाट पाहाणंच हाती होतं. शंभरएक लोक बसू शकतील एवढी बाकं होती तिथे. पण अख्ख्या आसमंतात हॅरी आणि डॉर्स वेनाबिली एवढे दोघेच होते. ते पोर्ट आयताकृती होतं. जेट्सना आतबाहेर जाऊयेऊ देण्यासाठी त्याच्या भिंतीमधून भुयारांची वर्तुळाकार प्रवेशद्वार असणार- प्रवेशवर्तुळे. पण त्यांचं जेट निघून गेल्यानंतर तिथे एकही जेट दिसत नव्हतं. आणि ते थांबून होते तेवढ्या काळात नव्याने एकही आलंही नाही.

कुणीही माणसं येतजात नव्हती. कुणाचीच चाहूल नव्हती. ट्रॅन्टोरवरच्या कोलाहलाचा संततध्वनी जणू गप्प झालेला इथे.

या एकांतामुळे सेल्डन सैरभैर झाला. डॉर्सकडे वळून म्हणाला, “इथे आपण नेमकं काय करायचंय? तुला काही कल्पना आहे?”

डॉर्सने मानेनेच नकार दिला, “ह्युमिन मला म्हणालेला, इथे आपल्याला सनमास्टर फोर्टीन भेटेल. बाकी मला काहीच माहीत नाही.”

“सनमास्टर फोर्टीन? हे काय असतं?”

“माणूस असणार. नावावरून बाई की पुरुष ते समजत नाहीये मला नक्की.”

“विचित्रच नाव आहे.”

“नाव विचित्र आहे की काय ते आपापलं मन ठरवतं. मला प्रथमच भेटणाऱ्या अनेकांना नावावरून मी पुरुष असेन असं वाटलेलं म्हणे.”

“काय वेडे असतील ते!” सेल्डन हसत म्हणाला.

“अजिबात नाही. माझं नाव आहेच तसं. अनेक जगांमध्ये हे पुरुषाचं नाव आहे म्हणे.”

“मी नाही ऐकलं कधी.”

“कारण तू काही फार प्रवास केलेला नाहीस गॅलॅक्सीमधे. तुझंच नाव बघ. ‘हॅरी’ हे नाव अगदी सहज कुठेही ऐकू येतं. एक बाई होती माझ्या ओळखीची. तिचं नाव होतं हारी. फक्त आय ऐवजी इ असायचा स्पेलिंगमध्ये. आणि मला आठवतंय थोडंथोडं, मायकोजेनमध्ये काही नावं काही घराण्यांतच असतात आणि त्यांना नंबर दिलेले असतात.”

“पण सनमास्टर हे नाव कसं बेबंद आत्मप्रौढी मिरवणारंनाव आहे.”

“थोडी आत्मप्रौढी असली तर कुठे बिघडलं? आमच्या सिना ग्रहावर डॉर्सचा अर्थ होता- जुना वाक्प्रचार होता तो- वसंताची भेट.”

“तुझा जन्म वसंतातला?”

“नाही. सिनाच्या ऐन तळपत्या ग्रीष्मात मी जगात आले. पण माझ्या आप्तांना हेच नाव आवडलं. जुने अर्थ तोवर विरून गेले असले तरीही ते नाव छान वाटलं त्यांना.”

“तसं असेल तर मग कदाचित्- सनमास्टर-”

आणि एक गंभीर, कठोर वाटणारा आवाज उमटला-

“ते माझंच नाव आहे, टोळीवाल्या माणसा.”

सेल्डनने दचकून डावीकडे पाहिलं. एक उघडी कार तिथे अचानक जवळ येऊन ठेपलेली. अगदीच चौकोनी खोक्यासारखी, जुनाट होती ती. मालवाहू गाडीसारखी. आत कंट्रोल्सवर एक उंचसा म्हातारा बसला होता. वय जास्त असूनही तो चांगला तरतरीत दिसत होता. तो अगदी राजेशाही रुबाबात गाडीतून उतरला.

त्याने लांब सैल बाह्यांचा पांढराशुभ्र पायघोळ अंगरखा घातलेला. मनगटांजवळ बाह्यांना घट्ट चुण्या होत्या. पायघोळ अंगरख्यांतून डोकावत होत्या मऊ चामडी चपला आणि त्यातून दिसत होता त्याचा दणकट अंगठा. त्याचं डोकं अगदी प्रमाणबध्द होतं पण केसांचा लवलेशही नव्हता. त्याचे निळेशार डोळे त्या दोघांना शातपणे पाहून घेत होते.

“तुला अभिवादन करतो मी, टोळीवाल्या मनुष्या.” तो म्हणाला.

“अभिवादन, सर.” सेल्डन अंगवळणी पडलेल्या विनम्रतेने बोलून गेला. आणि मग अगदी न राहवून त्याने आपली शंका विचारली, “तुम्ही आत कुठून आलात?”

“प्रवेशद्वारातूनच. माझ्या पाठोपाठच बंद झालं ते. तुमचं लक्ष नव्हतं.”

“लक्ष नव्हतं खरं. कशाची अपेक्षा करावी तेच समजत नव्हतं. ते तर अजूनही कळत नाहीये आम्हाला.”

“टोळीवाल्या चेटर ह्युमिनने आम्हाला बांधवांना कळवलं की टोळीचे दोन सदस्य इथे येणार आहेत. आणि आम्ही तुमची काळजी वाहायची आहे.”

“म्हणजे तुम्ही ह्युमिनला ओळखता.”

“हो, ओळखतो. आम्हाला मदत झालीय त्याची. आणि तो एक चांगला टोळीवाला मनुष्य असल्यामुळे, आता त्यालाही मदत करणे आम्हाला भाग आहे. मायकोजेनमधे फार थोडे लोक येतात. आणि फारच थोडे इथून बाहेर जातात. तुमची सुरक्षा पाहाणं, तुम्हाला रहायला घर देणं आणि तुम्हाला कसलाही त्रास होणार नाही याची काळजी घेणं ही जबाबदारी माझी आहे. तुम्ही इथे सुरक्षित आहात.”

डॉर्स मस्तक किंचित झुकवत म्हणाली, “आम्ही कृतज्ञ आहोत, सनमास्टर-फोर्टीन.”

सनमास्टरने वळून तिच्याकडे पाहिलं. त्याच्या नजरेत कोरडी तुच्छता होती. “मला तुमच्या टोळीतील पध्दतींची थोडीफार कल्पना आहे,” तो म्हणाला, “मला माहीत आहे की त्यांच्यात स्त्री केव्हाही- तिच्याशी बोललेलं नसतानाही- बोलू शकते. त्यामुळे मी यात अपमान मानणार नाही. पण मी या स्त्रीला सांगू इच्छितो, की आमच्या बांधवांत वावरताना असे करू नये. ते यात अपमान मानतील कारण त्यांना टोळीवाल्यांच्या पध्दती माहीत नसतात.”

“खरंच की काय?” डॉर्स म्हणाली. सनमास्टरला अपमान वाटलेला असो नसो- तिला नक्कीच अपमानित वाटत होतं.

“खरंच,” सनमास्टरने होकार भरला. “आणि दुसरं- मी माझ्या गटापैकी एकटाच तुमच्याबरोबर असेन तेव्हा मला फक्त सनमास्टर एवढीच हाक मारली तरी

पुरे. आकड्याच्या उल्लेखाची गरज नाही. आणि आता आपण इथून बाहेर पडू या. ही जागा अगदीच टोळीछाप आहे. मला फार बरं नाही वाटत इथे.''

''सर्वांनाचा बरं वाटायचा प्रश्न आहे.'' सेल्डन जरा जास्तच जोरात म्हणाला, ''आणि मी इथून कुठेही हलणार नाहीये. कुठेही जाण्याअगोदर मला आश्वासन हवंय. आमच्या रीतीभातींच्या विरुध्द, आमच्या मनाविरुध्द तुमच्या इच्छांनुसार आम्हाला वागावं लागणार नाही याचं आश्वासन. आमची पध्दत आहे- स्त्रिया पुरुषांप्रमाणेच जेव्हा बोलावंसं वाटतं, काही सांगायचं असतं तेव्हा बोलतातच. आमची काळजी घेण्याची जबाबदारी तुम्ही घेतली असेल तर- कळाजी फक्त शरीराची नव्हे मनःस्थितीचीही घ्यायला हवी.''

सनमास्टरने सेल्डनकडे नजर रोखून पाहिलं आणि तो म्हणाला, ''तू फारच धीट आहेस, तरुण टोळीवाल्या. तुझं नाव?''

''मी हॅरी सेल्डन. हेलिकॉनचा रहिवासी. माझ्याबरोबर आहेत त्या-डॉर्स वेनाबिलि. सिनाच्या मूळ रहिवासी.''

सेल्डनने स्वतःचं नाव सांगितलं तेव्हा सनमास्टरने किंचित मस्तक झुकवलं. आणि डॉर्सचं नाव सांगितल्यावर काहीही प्रतिक्रिया दिली नाही. तो उत्तरला, ''मी टोळीवाल्या ह्युमिनला शपथपूर्वक वचन दिलंय, की मी तुमची काळजी वाहीन. त्यामुळे तुमच्या या महिला सोबतिणीचं रक्षण व्हावं म्हणून मी सारं काही करीन. तिने जर औद्धत्य दाखवलं तरीही मी तिला शक्य तितकं संरक्षण देईनच, ती निष्पाप आहे हे सांगेन. पण एका बाबतीत तुम्हाला नियम पाळावेच लागतील.'' आणि मग त्याच्या डोळ्यात तिरस्कार दाटून आला. त्याने त्या दोघांच्या मस्तकांकडे आळीपाळीने निर्देश केला.

''काय म्हणताय तुम्ही?'' सेल्डन म्हणाला.

“तुमच्या डोईवरचे केस.”

“त्याचं काय?”

“ते दिसता कामा नयेत.”

“आम्ही तुमच्यासारखं डोकं भादरायचं की काय? अजिबात नाही.”

“माझं डोकं भादरलेलं नाहीये, टोळीवाल्या सेल्डन. पौगंडावस्थेत आल्यावर माझे केस एकेक करून उपटून काढण्यात आले आहेत. केशलोचन म्हणतात त्याला. आमच्या सर्व बांधवांना आणि त्यांच्या स्त्रियांना हे करावं लागतं.”

“उपटून काढण्याचा तर विषयच नाही. कधीच नाही.”

“टोळीवाल्या मनुष्या, आम्ही तुम्हाला केस भादरायलाही सांगत नाही आणि उपटायलाही. तुम्ही आमच्यात वावरत असाल तेव्हा ते कुणाला दिसता कामा नयेत एवढंच.”

“ते कसं?”

“मी तुमच्यासाठी कातडीच्या टोप्या आणल्या आहेत. त्या तुमच्या माथ्यांवर आपसूक घट्ट बसतील. शिवाय भुवयांचे केस लपवण्यासाठी पट्ट्याही आहेत. आमच्याबरोबर असताना हे घालायचं. आणि शिवाय टोळीवाल्या सेल्डन, तू रोजच्या रोज- गरज वाटल्यास दिवसांतून दोनदा तीनदाही दाढी करायला हवीस.”

“पण हे का करायचं?”

“कारण आमच्या दृष्टीने चेहऱ्यावरचे केस हे अतिशय तिरस्करणीय आणि अश्लील समजतो आम्ही.”

“पण संपूर्ण गॅलॅक्सीतील सर्व जगांमध्ये डोक्यावरचे केस राखण्याची पध्दत आहे हे तुम्हा सर्वांना माहीत असणार.”

“माहीत आहे. आणि आमच्यापैकी जे बाहेरच्या टोळीवाल्यांच्या संपर्कात येतात त्यांना ते सहन करावं लागतं. पण सर्वच बांधवांना ते पाहायला लावण्याची सहन करायला लावण्याची काहीच गरज नाही.”

सेल्डन म्हणाला, “ठीक आहे, सनमास्टर- पण मला सांगा... डोक्यावर केस घेऊनच जन्माला येता ना तुम्ही आमच्यासारखेच? आणि ते केस चांगले किशोरवयापर्यंत ठेवले जातात. मग ते काढायला पाहिजेतच कशासाठी? केवळ परंपरा म्हणून की त्यामागे काही विचार आहे?”

आणि तो वृध्द मायकोजिनियन गर्वाने फुलून उत्तरला, “केशलोचन करण्यातून आम्ही किशोरांना हे दाखवून देतो की आता तुम्ही मोठे झालात. आणि टोळीवाल्यांपासून आपण वेगळे कसे आहोत हे तर केशलोचनामुळे सर्वांच्या कायम लक्षात रहाते.”

तो त्यांच्याकडून काही प्रतिसाद येण्याची वाट न पाहाता वळला. आणि खरं तर सेल्डनकडे प्रतिसादासाठी काही शब्दच नव्हते. सनमास्टर फोर्टीनने त्याच्या झग्यातल्या कुठल्यातरी छुप्या कप्प्यात हात घालून मूठभर रंगीत प्लास्टिकच्या पट्ट्या काढल्या. त्या दोघांच्याही चेहऱ्याकडे तो निरखून पाहात राहिला. मग एकेक पट्टी त्यांच्या चेहऱ्यांच्यासमोर आळीपाळीने धरून तपासत राहिला.

“रंग बऱ्यापैकी जुळायला हवेत,” तो म्हणाला, “तुम्ही ही टोपी घातलेली नसेल असं कुणालाही वाटणार नाहीच म्हणा. तरीही अगदी ठळकपणे तसं जाणवायला नको. फारच गचाळ वाटेल ते डोळ्यांना.”

अखेर सनमास्टरने एक पट्टी निवडून सेल्डनच्या हातात सारली. आणि ती खेचून तिची टोपी कशी ताणायची ते दाखवलं.

“घाल ती डोक्यावर, सेल्डन.” तो म्हणाला, “थोडं अवघड वाटेल सुरुवातीला. पण मग होईल सवय.”

सेल्डनने ती चढवली, पण मागे ओढून बसवायचा प्रयत्न करताना दोन वेळा ती सटकून खाली आली.

“भुवयांच्या जरा वरच बसवून बघ,” सनमास्टर म्हणाला. मदत करायला त्याची बोटं वळवळत होती. सेल्डनने हसू दाबत विचारलं, “तुम्ही मला मदत करताय का?”

आणि सनमास्टर झटका बसल्यासारखा मागे सरकला. “नाही नाही. त्यासाठी मला तुझ्या केसांना हात लावावा लागेल.”

सेल्डनने ती टोपी मागून-पुढून ओढतखेचत कशीबशी डोक्यावर बसवली. सगळे केस एकदाचे झाकले गेले. भुवईवरच्या पट्ट्या सहज बसल्या. डॉर्सने सारं नीट पाहून ठेवलं होतं त्यामुळे तिने अगदी सहज टोपी डोक्यावर बसवून टाकली.

“आता ही निघायची कशी?” सेल्डनने विचारलं.

“एखादी कड पकडायची की ती सहज सोलल्यासारखी निघून येईल. केस जरा कापून कमी केले तर टोपी घालणं नि काढणं सोपं होईल तुम्हाला.”

“नको, त्यापेक्षा थोडी धडपड करणं परवडतंय मला.” सेल्डन उत्तरला. मग डॉर्सकडे वळून पाहात तो खालच्या आवाजात म्हणाला, “तू अशीसुध्दा छानच दिसते आहेस, डॉर्स, पण तुझ्या चेहऱ्याची खासियत जरा मिटलीच आहे.”

“माझी खासियत आहेत तशीच आहे,” ती उत्तरली, “आणि तुला लवकरच माझ्या बिनकेसाच्या चेहऱ्याची सवयही होईल.”

आवाज आणखी खाली आणत सेल्डन म्हणाला, “याची सवय होण्याइतका दीर्घकाळ इथे रहायची मला अजिबात इच्छा नाहीये.”

सनमास्टर इतका वेळ या टोळीवाल्यांच्या कुजबुजीकडे तुच्छतेने दुर्लक्ष करीत होता, तो अखेर म्हणाला, “आता माझ्या गाडीत बसलात तर बरं. मायकोजेनमधे शिरायचंय.”

३७-

“खरं सांगू,” डॉर्स कुजबुजली, “विश्वासच बसत नाहीये माझा- आपण ट्रॅन्टोरवरच आहोत यावर.”

“म्हणजे, असलं कधी काही पाहिलंच नव्हतंस तू, म्हणतेस?” सेल्डन म्हणाला.

“मी ट्रॅन्टोरवर येऊन फक्त दोन वर्षं झाली. आणि त्यातला बराचसा काळ मी युनिवर्सिटीतच घालवलाय त्यामुळे मी काही फार फिरस्तेगिरी केली असं म्हणता येणारच नाही. तरीही इथेतिथे फिरून आलेय मी. आणि बरंच काही ऐकलंय... पण हे असलं काही कधी पाहिलं नाही आणि ऐकलंही नाही. सगळं किती सारखं आहे.”

सनमास्टर गाडी अगदी व्यवस्थित, सावकाश हाकत होता. रस्त्यावर आणखीही काही मालवाहू गाड्यांसारखी वाहने होती. सगळ्यांच्या कंट्रोल्सवर टकले पुरुष होते. दिवसाच्या उजेडात सर्वांची टकलं चकाकत होती.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना तिमजली इमारती होत्या. अगदी सरळसोट, काटकोनी-चौकोनी आणि सगळ्यांचा एकच रंग. राखाडी रंग.

“किती कंटाळवाणं आहे सारं,” डॉर्स पुटपुटली, “अगदीच रटाळ.”

“समतावादी,” सेल्डन कुजबुजला, “मला वाटतं, कोणताही बांधव इतर कुणाशीही कसलीही तुलना वगैरे करू शकणार नाही.”

पदपथांवर अनेक लोक चालताना दिसत होते. फिरते-सरकते रस्ते, किंवा एक्स्प्रेसवे वगैरे जवळपास असल्याचं काहीही चिन्ह नव्हतं, आवाज नव्हता.

डॉर्स म्हणाली, "मला वाटतं त्या राखी कपड्यांतल्या आकृत्या स्त्रियांच्या असाव्यात."

"कसं कळणार," सेल्डन म्हणाला, "त्यांचे ते झगे सगळंच लपवून टाकतात. आणि एक टकलू डोकं दुसऱ्या टकलूसारखंच दिसतं."

"पण राखी झगे जोडीजोडीने चालताना किंवा पांढऱ्या झग्यासोबत चालताना दिसतायत. पांढरे झगे एकेकट्याने चालताना दिसतायत. आणि सनमास्टरने पांढराच झगा घातलाय."

"बरोबर असावं तुझं," सेल्डनने जरा मोठ्याने विचारलं, "सनमास्टर, एक कुतूहल आहे."

"विचारायचं ते विचारू शकता. पण मी उत्तर द्यायला बांधील नाही."

"आपण जातोय तो भाग सगळा रहात्या घरांसारखा दिसतो आहे. व्यापार, कारखानदारी, उद्योग वगैरे कशाचीही चिन्हं दिसत नाहीत कुठे."

"आमचा समाज पूर्णपणे कृषक समाज आहे. तुम्हाला हे कसं माहीत नाही? कुठून आला आहात तुम्ही?"

"मी सांगितलं मघाशीच की बाहेरच्या जगातून आलो आहे." सेल्डन जरा ताठरपणे बोलला, "आणि ट्रॅन्टोरवर येऊन मला अवघे दोन महिने झाले आहेत."

"तरीही-"

"पण सनमास्टर, तुम्ही शेती करीत असाल तरीही- आपल्याला एकही शेत लागलं नाही वाटेत, हे कसं?"

“खालच्या पातळीवर असतात शेतं.” सनमास्टर तुटकपणे उत्तरला.

“म्हणजे मायकोजेनच्या आपण जातोय त्या पातळीवर फक्त निवासी भागच आहे कां?”

“आणखीही काही पातळ्यांवरही घरं असतात. तुम्हाला जे दिसतंय तेच आहे. प्रत्येक बांधवाकडे त्याच्या कुटुंबासाठी सारखी जागा असते. प्रत्येक घराण्याची समान जागा असते. सर्वांजवळ सारख्याच गाड्या असतात. आणि सगळे बांधव आपापल्या गाड्या चालवतात. इथे कुणीही चाकर नाहीत. कुणाचेही जीवन दुसऱ्याच्या श्रमांतून सुखकर वगैरे होत नाही. कुणीही कुणापेक्षा श्रेष्ठ ठरू शकत नाही.”

सेल्डनने डॉर्सकडे पाहात त्याची झाकलेली भुवई उंचावली, आणि म्हणाला, “पण काही लोक पांढरे झगे घालताना दिसतात तर काही राखी.”

“कारण त्यातले काही बंधू आहेत आणि काही भगिनी.”

“आणि आमचं काय?”

“तुम्ही टोळीवाले आहात आणि- पाहुणे. तू आणि तुझी-” तो थबकला आणि मग म्हणाला, “सोबतीण- तुम्हा दोघांवर मायकोजिनियन जीवनपध्दतीचे बंधन नाही. तरीही तुला पांढरा झगा घालावा लागेल आणि तुझ्या सोबतिणीला राखी. आणि तुमच्यासाठी आमच्याच घरांसारखं एक उतरघर दिलं जाईल तिथे तुम्ही रहायचं आहे.”

“सर्वांसाठी समानता- बरं वाटतंय तसं. पण तुमची संख्या वाढेल तेव्हा काय होईल? मग भाकरीचे तुकडे अधिकाधिक छोटे होत जाणार की काय?”

“संख्या वाढणार नाही. तसं झालं तर जागा जास्त लागेल. आम्हाला घेरून बसलेले टोळीवाले कदापि आम्हाला जास्त जमीन देणार नाहीत.. शिवाय आमच्या जीवनपध्दतीत नकोसे बदल होतील तेही नकोच.”

“पण समजा..” सेल्डन बोलू लागला.

पण सनमास्टरने त्याचं बोलणं तोडत म्हटलं, “एवढं पुरे, टोळीवाल्या मनुष्या. मी आधीच सांगितलेलं- मी उत्तरं द्यायला बांधील नाही. आमची जबाबदारी फक्त आमच्या टोळीवाल्या मित्राला- ह्युमिनला दिलेलं वचन पूर्ण करणं एवढीच आहे- तेही तुम्ही आमच्या जीवन पध्दतींना धक्का लावत नाही तोवरच. तेवढं करू. आणि तेवढंच करू. कुतूहल ठीक आहे, पण फार जास्त कुतूहल दाखवलंत तर आमची सहनशीलता संपू शकते.”

त्याचा स्वर बदललेला, आणि सेल्डनने गप्प रहाणंच पसंत केलं. ह्युमिनने सगळी मदत केली, पण नको त्या गोष्टीवर नाहक भर दिला होता. सुरक्षेचा प्रश्न महत्त्वाचा नव्हताच. म्हणजे फक्त सुरक्षेचा प्रश्न नव्हताच. माहिती मिळणं गरजेचं होतं आणि ती मिळणार नसेल तर इथं रहाण्यात काहीच अर्थ नव्हता.

३८-

त्यांच्या रहायच्या जागेत पोहोचल्यावर सेल्डन चांगलाच वैतागला. तिथे अगदी निरुंद असा असा स्वैपाकाचा ओटा होता. अगदी चिरकूट पण स्वतंत्र बाथरूम होती. दोन निरुंद पलंग. दोन कपाटे, एक टेबल आणि दोन खुर्च्या होत्या. म्हणजे थोडक्यात एका छपराखाली अडचणीत रहायची तयारी असलेल्या दोघांसाठी पुरेशी जागा होती.

“आमच्या सिन्नामध्येही प्रत्येक घरात स्वयंपाकाचा स्वतंत्र ओटा असे आणि बाथरूमही.” डॉर्स मख्ख स्वरात बोलली.

“आमच्याकडे हेलिकॉनमधे नव्हतं असलं. लहानसं जग होतं आमचं. पण मी रहात होतो ते शहर चांगलं आधुनिक होतं. मोठमोठी एकत्र किचन्स असत. आणि बाथरूम्सही. हा प्रकार म्हणजे केवढा अपव्यय आहे. हां एखाद्या होटेलमधे असं असेल तर समजू शकतो. थोड्या दिवसांसाठी रहायचं असेल तर ठीक आहे. पण सगळ्या शहरभर हा असलाच प्रकार असेल तर- कल्पना कर, केवढी किचन्स आणि केवढी बाथरूम्स... उगाच.”

“त्यांच्या समतावादाचा भाग दिसतोय.” डॉर्स म्हणाली, “आपल्या आवडीचं अमुकतमुक, मग त्यासाठी खेचाखेची टाळायचा मार्ग असावा. सर्वांना सारं सारखंच.”

“शिवाय कुणाला एकांत, खाजगीपणा नाहीच. मला काही फार फरक नाही पडत तसा, पण डॉर्स, तुला कदाचित् गरज पडेल. आणि मी तुझा गैरफायदा घेतोय असं नको व्हायला. आपण त्यांना सांगून टाकू की आपल्याला स्वतंत्र खोल्या लागतील. शेजारीशेजारी, पण स्वतंत्र.”

डॉर्स म्हणाली, “मला नाही वाटत काही उपयोग होईल त्याचा. जागा काही सहज उपलब्ध नसतात. मला खात्री आहे, त्यांनी हे जे औदार्य दाखवलंय तेच त्यांना फार मोठ्ठं वाटत असेल. आपण चालवून घेऊ, हॅरी. आपण तसे मोठे आहोत आता. आणि मी काही अगदी लाजरी तरुणी नाही. आणि तू काही फार मोठा बुजरा तरूण आहेस असं मी तरी वाटून घेऊ शकत नाही.”

“तुला इथे माझ्यामुळे यावं लागलं.”

“मग काय झालं? एक साहस आहे हे.”

“बरं तर. कुठल्या बाजूचा पलंग हवा? बाथरूमच्या जवळचा घेतेस कां?” तो दुसऱ्या पलंगावर बसलाही. “मला आणखी एक प्रश्न पडलाय. आपण इथे आहोत तोवर त्यांच्या दृष्टीने आपण टोळीवाले आहोत. अगदी ह्युमिनसुध्दा. आपण परक्या टोळीचे आहोत. त्यांच्यातले नाही. त्यांच्या गणगोतांतले नाही. त्यांच्या कुठल्याही गोष्टींशी आपला संबंध नाही. पण संबंध आहेच. त्यासाठीच तर मी इथे आलो आहे. त्यांना माहीत असलेल्या काही गोष्टी मला माहीत करून घ्यायच्या आहेत.”

“किंवा त्यांना आपल्याला माहीत आहे असं वाटतं.-” डॉर्स इतिहासकाराला शोभेलशा शंकेखोरपणे म्हणाली. “त्यांच्या काही दंतकथा फारच प्राचीन- अगदी मानववंशाच्या सुरुवातीच्या काळातल्या आहेत असं मानलं जातं. पण ते काही फार गंभीरपणे घ्यायला नकोय.”

“त्या दंतकथा काय आहेत हे कळल्याशिवाय आपण ते ठरवू शकत नाही. बाहेर त्याबद्दल काहीतरी नोंदी आहेत का?”

“मला तरी माहीत नाही. हे लोक आपल्या कोषातच आहेत. आपल्या गोष्टींना चिकटून रहाण्याची त्यांची सवय जवळपास मनोविकारासारखी झालेली दिसते. यांच्याशी संपर्क साधून आपल्याला इथे राहू द्यायची परवानगी ह्युमिनने मिळवली हे फारच लक्षणीय आहे म्हणेन मी.”

सेल्डन विचारा पडलेला. “कुठेतरी शिरकाव मिळायला हवा. मायकोजेन कृषिप्रधान समाज आहे हे मला माहीतच नव्हतं हे कळल्यावर सनमास्टरला आश्चर्यही वाटलेलं आणि रागही आलेला. ही गोष्ट लपवण्याची इच्छा नसणार त्यांची.”

“ते गुपित नाहीच. मायकोजेन हा शब्दच एका प्राचीन शब्दावरून आला आहे. यीस्टचे उत्पादक... असं मी ऐकलं होतं. मी काही प्राचीन भाषातज्ज्ञ नाही.

पण हे लोक सर्व प्रकारची सूक्ष्म अन्नद्रव्ये, यीस्ट्स आणि शैवालं, जीवाणू आणि बरंच कायकाय पिकवतात.”

“यात काय फार विशेष थोडंच आहे?” सेल्डन म्हणाला, “कितीतरी जगांमध्ये असली सूक्ष्मान्ने पिकवली जातात. हेलिक्रॉनवरही आहेत.”

“मायकोजेनसारखं नसतं ते. त्यांची खासियत आहे ती. त्यांच्या नावाइतक्याच प्राचीन परंपरागत पध्दतींनी ते सारं करतात. त्यांचा या सूक्ष्मद्रव्यांना खतपाणी देण्याचा गुप्त फॉर्म्युला आहे, वातावरणातले बदल करण्याची पध्दत आहे. कुणालाच माहीत नाही ते काय आहेत. सगळंच गुप्त आहे.

“ते इतक्या इर्ष्येने कोषात का वावरतात? अखेर काय- ते काही प्रथिनं तयार करतात, काही चवी तयार करतात. इतर जगात कुठेच तशा चवी मिळत नाहीत. कमी उत्पादन घेतात आणि किंमती प्रचंड ठेवतात. मी कधी त्याची चव घेतलेली नाही, तूही घेतलेली नसणार. पण ट्रॅन्टोरच्या राजमहालाच्या नोकरशाहीमध्ये, आणि जगातल्या इतर उच्च उत्पन्न गटांमध्ये त्यांना गिऱ्हाईक आहे. त्यांची अर्थव्यवस्था याच खरेदीदारांमुळे तगडी आहे. त्यामुळे ते या मूल्यवान अन्नाचे उत्पादक आहेत ही ओळख त्यांना हवीच आहे. निदान तेवढी गोष्ट गुप्त ठेवायची नाहीये त्यांना.”

“मायकोजेन श्रीमंत दिसतंय मग.”

“गरीब नक्कीच नाहीत. पण त्यांना संपत्तीचा सोस नसावा. त्यांना केवळ सुरक्षा हवी आहे. साम्राज्याकडून त्यांना सुरक्षा दिली जाते, कारण ते नसतील तर त्यांना ते चवदार अन्न, मसालेदार चवी मिळणं मुश्किल होईल. केवळ एवढ्याच भांडवलावर, मायकोजेनवाले स्वतःचं वेगळं अस्तित्व, वेगळ्या चालीरीती जपू शकतात, इतर शेजाऱ्यांशी उद्धटपणे वागूबोलू शकतात- ज्यांना हे मायकोजेनवाले अजिबात आवडतही नाहीत.”

डॉर्स खोलीकडे पाहात म्हणाली. "त्यांची रहाणी अगदीच साधी आहे. इथे होलोविजन्स नाहीत, बुकफिल्मसही दिसत नाहीयेत."

"एक मला दिसलं होतं- इथे कपाटात- एका फळीवर." सेल्डनने ते हात उंचावून काढलं आणि त्यावरचं नाव पाहून वैतागून म्हणाला, "स्वयंपाकावरचं आहे."

डॉर्सने ते घेण्यासाठी हात पुढे केला आणि त्याची बटणं दाबू लागली. ओळखीची पध्दत नव्हती, त्यामुळे जरा वेळच लागला. पण अखेर उघडलं ते. स्क्रीन उजळला आणि ती पान उघडून पाहू लागली.

"काही पाककृती दिल्या आहेत, पण बराचसा मजकूर केवळ आहारासंबंधी तत्वज्ञानच सांगणारा आहे."

तिने ते बंद करून मागच्या बाजूला पाहिलं. "यात फक्त एकच पुस्तक दिसतंय. हे उघडून यातलं कार्ड काढून दुसरं मायक्रोकार्ड घालायची काही सोय दिसत नाहीये कुठे. एका पुस्तकासाठी एक स्कॅनर. हा खराखुरा अपव्यय आहे."

"कदाचित् त्यांना हे एकमेव पुस्तकच सर्वांना पुरेसं आहे असं वाटत असेल." तो वाकून दोन पलंगांच्या मधल्या टेबलवर झुकला आणि त्याने आणखी एक वस्तू उचलली. "हा स्पीकर दिसतोय. फक्त कुठे स्क्रीन तेवढा दिसत नाहीये."

"कदाचित् आवाजच पुरेसा वाटत असेल."

"हे कसं काय काम करतं, कोण जाणे?" सेल्डन ती वस्तू हाती घेऊन सर्व बाजूंनी निरखून पाहू लागला. "कधी पाहिलं आहेस असलं काही?"

"ते तेच असेल का माहीत नाही. पण एकदा म्यूझियममधे पाहिलं होतं. मायकोजेनवाले मुद्दाम स्वताःचं प्राचीन रहाणीमान जपतात. त्यांच्या भोवतीच्या प्रचंड संख्येतल्या टोळीवाल्यांपासून स्वतःला वेगळं राखण्यासाठी हे असलं काही

करणं त्यांना आवश्यक वाटत असावं. त्यांच्या जुन्यापुराण्या चालीरीती, विचित्र रूढी यामुळे ते कुणालाही नकोसे वाटतात. तेच त्यांना हवं आहे असं काहीसं त्रांगडं आहे.”

सेल्डन अजूनही त्या वस्तूशी खेळत होता.

“उफ्फ्! हे चालू झालं. किंवा काहीतरी चालू झालं. पण मला काही ऐकू येत नाहीये.”

डॉर्सने कपाळाला आठ्या घालत टेबलवर पडलेली एक नळकांड्यासारखी वस्तू उचलली. तिने ती कानाला लावली. “यातून काहीतरी आवाज येतोय.” ती म्हणाली. “हे घे, ऐकून बघ.” तिने ते त्याच्या हातात ठेवलं.

सेल्डनने ते घेऊन कानाला लावलं. “आउच्! हे तर कानावर अडकलंच.” मग तो ऐकू लागला आणि म्हणाला, “हो, लागलं माझ्या कानाला. तुम्हाला माझा आवाज येतो आहे असं गृहीत धरतो. हो हो, ही आमची खोली आहे. नाही. मला नंबर नाही माहीत. डॉर्स, तू पाहिलास का कुठे खोलीचा नंबर?”

डॉर्स म्हणाला, “त्या स्पीकरवर काहीतरी नंबर दिसतोय. तोच असेल.”

“कदाचित्,” सेल्डनला शंकाच होती, “या यंत्रावर दिलेला नंबर आहे सहा एलटी तीन सहा चार आठ ए. हाच का? बरं, मग आता हे यंत्र नीट कसं वापरायचं ते कुठे वाचता येईल? आणि किचन कसं वापरायचं तेही? नेहमीसारखंच काम करतं- म्हणजे नेमकं कसं? यातून मला काहीही समजत नाहीये. मला नेहमीसारखंच काय असतं तेच माहीत नाहीये. हे पहा, आम्ही- मी टोळीवाला आहे- पाहुणा आहे इथे. मला तुमचे नेहमीचे मार्ग कसे माहीत असणार? हो- माझे उच्चार जरा वेगळे आहेत. सॉरी. तुम्हाला टोळीवाल्याचं बोलणं ऐकूनच ओळखता येतो टोळीवाला हे फारच चांगलंय. माझं नाव हॅरी सेल्डन आहे.”

बोलणं थांबलं. सेल्डनने डॉर्सकडे पाहिलं तेव्हा त्याचा चेहरा संतप्त होता. “त्याला माझी पार्श्वभूमी तपासायची आहे म्हणे. आणि मी नाही सापडलो तर काय करणार- माहीत नाही.- ओः सापडलो का मी? फारच छान. मग आता काही माहिती देऊ शकाल का? हो हो, हो- आणि मायकोजेनच्या बाहेरच्या कुणाशी बोलायचं असेल तर? बरं मग- सनमास्टर फोर्टीनशी बोलायचं असेल तर? नाही- मग त्याच्या सहाय्यकाशी- मदतनिसाशी- कुणाशीही? अः... बरं. थँक्यू.”

त्याने स्पीकर खाली ठेवला. कानाला अडकलेला इअरफोन जरा झटापट करून काढला. मग ते यंत्र पूर्णपणे बंद करून खाली ठेवत म्हणाला, “ते कुणालातरी पाठवतील आपल्याकडे, सगळी माहिती द्यायला. कधी ते सांगू शकत नाही म्हणाला. मायकोजेनच्या बाहेर कुणाशीही आपण बोलू शकत नाही या यंत्रावरून. त्यामुळे गरज पडली तरी ह्युमिनशी बोलता येणार नाही. आणि सनमास्टर फोर्टीनशी बोलायचं असलं तरीही भरपूर कसरती कराव्या लागतील. हा समाज समतावादी असेलही- पण काहीकाही अपवाद असतीलच, जरी कुणी मान्य करणार नाही ते.”

त्याने घड्याळाकडे पाहिलं. “ते काही असो, डॉर्स, मी काही ते कुकबुक पाहाणार नाही आणि त्याहून पुढे ते आहारावरचे निबंध अजिबातच वाचणार नाही. माझ्या घड्याळात अजूनही युनिवर्सिटीचीच वेळ दिसते आहे. त्यामुळे आता झोपायची अधिकृत वेळ झालीय की काय माहीत नाही. आणि या क्षणी मला त्याची पर्वाही नाही. गेली रात्र जागून काढलीय आपण. आणि आता झोपायला हवं मला.”

“मलाही. मीही दमलेय खूप.”

“थँक्स, आणि आपली झोप पूर्ण झाल्यानंत जेव्हाकेव्हा दिवस उजाडलेला असेल, मी त्यांना त्यांच्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची शेती दाखवयची विनंती करणार आहे.”

डॉर्स जराशी दचकलीच, "तुला त्यात रस आहे?"

"खरं तर नाही. पण त्यांना त्या एका गोष्टीचा एवढा अभिमान वाटत असेल, तर ते त्याबद्दल निदान बोलतील तरी. आणि एकदा बोलते झाले की मग त्यांना जरा पटवापटवी करून त्यांच्या दंतकथांसंबंधीही विचारता येईल. मला वाटतं ही मात्रा चांगली लागू पडेल."

"आशा करू," डॉर्स साशंक स्वरात उत्तरली, "पण मला तरी वाटतं, हे मायकोजेनियन्स तेवढे सहज सापळ्यात अडकायचे नाहीत."

"बघू," सेल्डन ठामपणे म्हणाला, "काहीही करून त्यांच्या दंतकथा मला हव्यातच."

३९-

दुसऱ्या दिवशी सकाळी हॅरी पुन्हा एकदा त्या ध्वनीयंत्राच्या पाठी पडला. तो खूप संतापलेला- कारण मुख्य म्हणजे त्याला खूप भूक लागलेली.

सनमास्टर फोर्टीनशी बोलण्याचे त्याचे प्रयत्न कुणीतरी हाणून पाडलेले. सनमास्टरना आता बोलावता येणार नाही असं सांगणारा कुणीतरी आवाज मधे होताच.

"का नाही?" सेल्डनने चवताळून विचारलं.

"या प्रश्नाचे उत्तर देण्याची गरज नाही हे तर अगदी स्पष्टच आहे." तो आवाज अगदी थंडगार होता.

"आम्हाला इथे कैदी म्हणून आणलेलं नव्हतं- किंवा उपासमार करून मारण्यासाठीही आणलं नव्हतं." सेल्डनही तितक्याच थंडगार स्वरात म्हणाला.

"तुमच्याकडे किचन आहे, शिवाय भरपूर दाणागोटा सामान पुरवलेलं आहे असं मला वाटतं."

"हो, आहे ना." सेल्डन म्हणाला, "आणि ते किचन कसं वापरायचं ते मला माहीत नाही. अन्न कसं शिजवायचं तेही मला माहीत नाही. कसं खाता तुम्ही. कच्चं, की शिजवून, की भाजून की तळून?"

"तुम्हाला इतक्या साध्या गोष्टी येत नसतील यावर माझा विश्वास नाही."

डॉर्स हा सारा वेळ येरझाऱ्या घालत होती. तिने जाऊन त्याच्या हातातून तो फोन घ्यायचा प्रयत्न केला. पण सेल्डनने तिला थोपवलं आणि कुजबुजला. "एका स्त्रीने बोलायचा प्रयत्न केला तर तो फोन ठेवेल."

मग तो खंबीर स्वरात बोलू लागला, "तुमचा माझ्या कशावर विश्वास आहे-नाही याने मला काही फरक पडत नाही. तुम्ही इथे कुणालातरी -मदत करू शकेल अशा कुणालाही पाठवा. नाहीतर माझा सनमास्टर फोर्टीनशी संपर्क झाल्यावर तुम्हाला जाब द्यावा लागेल."

तरीही मधे दोन तास उलटून गेले, आणि मग कुणीतरी आलं. तोवर सेल्डनचा पारा चढलेला. आणि त्याला शांत करताकरता डॉर्सची त्रेधा उडाली.

आलेला माणूस अगदीच पोरगेलासा होता. त्याच्या टकलावर लालसर ठिपके होते. केस असते तर अगदी लाल केस असते त्याचे नक्की.

तो येताना बरीचशी भांडी घेऊन आला होता. आणि सगळं समजावून सांगण्यासाठी आतुरही होता. अचानक तो अस्वस्थ झाला. आणि सेल्डनकडे पाठ वळवून उभा राहात म्हणाला, "टोळीवाले," त्याचा स्वर भेदरल्यासारखा कापत होता, "तुमची कातडीटोपी नीट बसलेली नाही."

सेल्डनची सहनशीलता आता अगदी संपली होती, “त्याचा मला काहीही त्रास होत नाहीये.”

डॉर्स मात्र म्हणाली, “मी नीट करून देते, हॅरी. इथे डावीकडच्या बाजूने ती जरा वर उचलली गेली आहे.”

मग सेल्डन गुरगुरला, “आता वळ इकडे, मुला. नाव काय तुझं?”

“मी ग्रेक्लाऊड फाइव्,” सेल्डनकडे सावधपणे वळून पाहात, तो उत्तरला. “मी आत्ताच दीक्षा घेतली आहे. मी तुमच्यासाठी जेवण आणलं आहे.” तो चाचरत पुढे म्हणाला, “माझ्या घरून आणलंय. माझ्या घरातल्या बायकांनी शिजवलंय ते, टोळीवाले.”

त्याने भांडी खाली ठेवली, आणि सेल्डनने झाकण उघडून संशयाने आत वाकून पाहिलं. मग तो डॉर्सला म्हणाला, “अरे वा, काही वाईट वास नाही याचा.”

डॉर्स म्हणाली, “हो, मलाही आला वास.”

ग्रेक्लाऊड म्हणाला, “असायला हवं तितकं गरम नाहीये जेवण. आणतानाच गार होत गेलं. तुमच्या किचनमध्ये थाळया, चमचे वगैरे असतील.”

डॉर्सने आवश्यक तेवढं सामान काढलं. ते जरा घाईघाईने, अधाशासारखंच जेवले. पोटात अन्न गेल्यानंतर सेल्डनला जरा माणसात आल्यासारखं वाटलं.

त्या मुलाबरोबर ती एकटी राहिल्यास त्याला फार अवघड वाटेल, आणि त्याच्याशी ती बोलली तर तो फारच शरमिंदा होईल हे डॉर्सला जाणवत होतं. मग सगळी भांडी आत नेण्याचं आणि धुण्याचं काम आपल्यावरच पडणार हे तिला समजलं. आत जाऊन धुण्याचं यंत्र तिने प्रयत्नपूर्वक सुरू केलं.

इकडे सेल्डनने आता स्थानिक वेळ विचारून घेतली होती. आणि मग तो शांतपणे म्हणाला, “म्हणजे आता जवळपास मध्यरात्र आहे इथे?”

“होय, टोळीवाले,” ग्रेक्लाऊड उत्तरला, “म्हणूनच आपल्याला हवं ते पुरवायला जरा वेळ लागला.”

सेल्डनच्या डोक्यात अचानक प्रकाश पडला- सनमास्टरला का बोलावता येणार नव्हतं ते त्याला आत्ता कळलं. ग्रेक्लाऊडच्या घरच्या स्त्रियांना अवेळी उठवून अन्न शिजवायला लावल्याच्या विचाराने त्याला फारच अपराधी वाटू लागलं.

“मला क्षमा करा,” तो म्हणाला, “आम्हा टोळीवाल्यांना किचनचा वापर कसा करायचा, जेवण कसं शिजवायचं हे काहीच माहीत नसतं. उद्या सकाळी कुणीतरी येऊन आम्हाला ते सगळं नीट समजावून देईल का?”

“मी काय करीन सांगू का, टोळीवाले,” ग्रेक्लाऊड समजुतीच्या स्वरात म्हणाला, “मी उद्या दोन भगिनींना इथे पाठवतो. स्त्रिया इथे येण्यामुळे तुम्हाला थोडं अवघडल्यासारखं नक्कीच होईल, पण या गोष्टी त्यांनाच जमतात.”

डॉर्स किचनमधून बाहेर आली आणि मायकोजिनियन नियमाचं स्मरण होण्यापूर्वीच तिच्या तोंडून गेलं, “फारच छान, ग्रेक्लाऊड, आम्हाला फार आवडेल भगिनींना भेटायला.”

ग्रेक्लाऊडने तिच्याकडे ओझरती बुजरी नजर टाकली, पण तो काहीच बोलला नाही.

सेल्डनला जाणवलं- तत्वाचा प्रश्न म्हणून हा तरुण मायकोजिनियन आपण या स्त्रीचं बोलणं ऐकलंच नाही असं भासवणार. मग तो पुन्हा म्हणाला, “फारच छान, ग्रेक्लाऊड, आम्हाला फार आवडेल भगिनींना भेटायला.”

त्याच्या चेहऱ्यावरचे चिंताग्रस्त भाव लगोलग निवळले. “मी दिवस उजाडताच त्यांना पाठवून देतो.”

ग्रेक्लाऊड गेल्यानंतर सेल्डन म्हणाला, "या भगिनी आपल्याला हवं ते देतील असं वाटतंय मला."

"असं? आणि ते कसं?" डॉर्सने विचारलं.

"वेल, आपण त्यांच्याशी माणुसकीने वागलो तर कृतज्ञतेपोटी त्या आपल्याला काही दंतकथा तर नक्कीच सांगतील."

"त्यांना काही माहीत असेल तर," डॉर्स शंका घेत म्हणाली, "माझा या मायकोजिनियन बांधवांवर जराही विश्वास नाही- आपल्या बायकांना काहीतरी शिकू दिलं असेल का त्यांनी, शंकाच आहे."

४०-

डॉर्स आणि सेल्डनची आणखी थोडी झोप काढली. आता तरी शरीराची घड्याळं नव्या वेळेशी जुळतील अशी आशा होती त्यांना. सहा तास उलटल्यावर त्या दोघी भगिनी आल्या. त्या दोघी त्यांच्या खोलीत अगदी लाजतबुजत शिरल्या. पावलांचा आवाजही होऊ न देता. त्यांचे झगे- मायकोजिनियन बोलीत त्यांना कर्टल्स म्हणत- राखी रंगाचे, कसल्याशा मऊ मखमलीचे होते. त्यांच्या पोतात थोड्या गडद राखी रंगाची जाळीदार वीण होती. दोघींच्या झग्यांमधे थोडाथोडा फरक होता. अगदीच अनाकर्षक नसले तरीही शरीराची ठेवण पूर्णपणे लपवणे साध्य होत होते.

आणि शिवाय त्यांची मस्तके अगदीच केशविरहित होती. चेहऱ्यावर कसलेही रंग नव्हते. डॉर्सच्या पापण्यांवरच्या निळ्या छटा आणि ओठांच्या कोपरांवरची लालसर छटा त्यांच्या चोरट्या नजरा वेधून घेत होत्या.

काही क्षण सेल्डनला प्रश्न पडला, या भगिनी नक्की भगिनीच आहेत हे कशावरून ठरवायचं. पण भगिनींनी विनम्र अभिवादन करताच या प्रश्नाचं उत्तर

मिळालं. दोघींचाही मंजुळ आवाज किणकिणला. सनमास्टर आणि ग्रेक्लाऊडच्या आवाजांची गंभीर, खंबीर पट्टी आठवून त्याला वाटलं की या समाजात स्त्रियांना हेतूपूर्वक गोड आवाजात बोलायला लावत असतील, बोलण्याच्या पध्दतीही वेगळ्या पाडल्या असतील.

"मी रेनड्रॉप फॉर्टीथ्री." एकजण म्हणाली, "आणि ही माझी धाकटी बहीण."

"रेनड्रॉप फॉर्टीफाइव." दुसरी किलबिलत म्हणाली. "आमच्या रेनड्रॉप घराण्यातल्या आम्ही साऱ्याजणी अगदी छान कणखर आहोत." ती खुदखुदली.

"फार आनंद झाला तुम्हाला भेटून," डॉर्स गंभीरपणे म्हणाली, "पण तुम्हाला हाका कशा मारायच्या ते सांगा. फक्त रेनड्रॉप म्हणून चालणार नाही, नाही कां?"

"नाही, आम्ही दोघी इथे असताना पूर्ण नाव घेतलं पाहिजे." रेनड्रॉप फॉर्टीथ्री म्हणाली.

सेल्डन म्हणाला, "मग केवळ फॉर्टीथ्री आणि फॉर्टीफाइव म्हटलं तर?"

त्यांनी त्याच्याकडे झटकन् चोरून नजर टाकली, पण काहीही बोलल्या नाहीत.

"मी बोलते त्यांच्याशी, हॅरी." डॉर्स हलकेच म्हणाली.

सेल्डन मागे सरकला. या बहुतेक अविवाहित मुली असाव्यात आणि त्यांनी पुरुषांशी बोलण्यावर बंधनं असावीत. त्यातली मोठी होती ती अधिक गंभीर दिसत होती आणि कदाचित् जास्त शुध्दतावादी. थोडक्याशा संवादातून, दृष्टभेटीतून नक्की काहीच कळण्यासारखं नव्हतं. पण तरीही त्याला जाणवलं खरं.

डॉर्स म्हणाली, "हे पहा, भगिनींनो, आम्हा टोळीवाल्यांना किचनचा वापर करताच येत नाही."

"म्हणजे- तुम्हाला स्वयंपाक करता येत नाही?" रेनड्रॉप फॉर्टीथ्री आश्चर्यचकित झालेली वाटली आणि नाराजही. रेनड्रॉप फॉर्टीफाइवने हसू दाबलं. (आपला अंदाज बरोबर आहे- सेल्डनने मनात नोंद घेतली.)

डॉर्स म्हणाली, "माझ्याकडे पूर्वी एक स्वतःचं किचन होतं. पण ते असं नव्हतं. आणि मला इथले सगळे अन्नपदार्थ माहीतही नाहीत, आणि ते कसे वापरायचे तेही माहीत नाही."

"अगदी सोपं आहे ते." रेनड्रॉप फॉर्टीफाइव म्हणाली, "आम्ही दाखवू सगळं."

"आम्ही छानपैकी अगदी पौष्टिक स्वयंपाक करू तुमच्यासाठी." रेनड्रॉप फॉर्टीथ्री म्हणाली, "आणि दोघांसाठीही करू." शेवटचे शब्द उच्चारताना ती थोडीशी चाचरली. पुरुषाच्या अस्तित्वाची दखल घेतल्याचे दाखवणे तिला जडच जात असणार.

"तुमची हरकत नसेल तर, मीही येऊ का किचनमधे- मला आवडेल," डॉर्स म्हणाली, "मला सगळं नीट समजावून सांगितलंत तर फार बरं वाटेल मला. तुम्ही रोज इथे येऊन तीनतीनवेळा जेवण करावं अशी अपेक्षा नाही माझी."

"आम्ही सगळं सांगू तुम्हाला," रेनड्रॉप फॉर्टीथ्री मान जरा ताठरपणेच झुकवत म्हणाली, "पण टोळीवाल्या स्त्रीला ते कठीण जाईल तसं... त्यासाठी लागणारी भावना तुमच्यात नसते."

"मी प्रयत्न करीन," डॉर्स प्रसन्नपणे उत्तरली.

त्या तिघी किचनमधे शिरल्या. सेल्डन त्यांच्याकडे क्षणभर पाहात राहिला आणि मग आता पुढे काय बोलावं, कसं वागावं वगैरे ठरवू लागला.

# मायक्रोफार्म्स- (सूक्ष्मान्नशेती)

मायकोजेन... मायकोजेनमधली मायक्रोफार्म्स इतिहासप्रसिध्द आहेत. बऱ्याच कथा सांगितल्या जात असत त्याबद्दल. पण आज त्या कथा केवळ काही म्हणींच्या रुपांत जेमतेम टिकून आहेत- उदाहरणार्थ असं म्हटलं जातं की ‘मायकोजेनच्या मायक्रोफार्म्सइतकं समृध्द’ किंवा असंही म्हणतात ‘मायकोजेनच्या यीस्ट इतकं चवदार.’ असल्या आठवणी आणि तुलना अधिकाधिक रुळत गेल्या. पण पलायनाच्या काळात हॅरी सेल्डनने या मायक्रोफार्म्सना स्वतः भेट दिली होती. आणि त्याच्या नोंदींवरून, आठवणींवरून हे समज योग्यच असावेत असे म्हणता येते...

दीर्घिकाकोष

४१-

“हे फारच छान होतं,” सेल्डन जोरात म्हणाला, “ग्रेक्लाऊडने आणलेल्या जेवणापेक्षा हे तर फारच छान होतं.”

डॉर्सने त्याला आठवण करून दिली, “काहीही पूर्वसूचना नसताना ग्रेक्लाऊडच्या घरातील स्त्रीने ऐन मध्यरात्रीतून केलेलं जेवण होतं ते.” ती थोडी थबकली आणि म्हणाली, “घरातील स्त्रीला ते पत्नी का नाही म्हणत कोण जाणे. बरं वाटेल जरा. स्त्रियांचा संदर्भ असा काही देतात की जणू त्या काहीतरी वाढीव सामान आहेत. माझं घर, माझा झगा- तसं माझी स्त्री. किती हिणकस वाटतं ते.”

“अगदी संतापजनक. पण सांगता येत नाही, ते पत्नी शब्दही अशाच स्वरात वापरतील की तीही वस्तूच वाटायची. पण ती त्यांची पध्दत आहे जगण्याची. आणि

भगिनींना काही वाटत नसावं त्याचं. तू आणि मी त्यावर काही बोलून फायदा नाही. बरं, हे सांग, तुला पाहायला मिळालं का त्या काय करत होत्या ते?”

“हो. पाहिलं ना. आणि त्यांनी सगळं सोपं आहे असंच सांगितलं असलं तरीही मला शंकाच आहे. त्या जे काही करत होत्या त्यातलं सगळंच माझ्या लक्षात नाही राहिलं, पण त्या म्हणत होत्या की लक्षात ठेवायची काही गरजच नाही. मी फक्त गरम करून दिलं तरी पुरे. ब्रेडमधे काहीतरी सूक्ष्मद्रव्य होतं- त्यामुळे तो फुगलाही आणि त्याला छान कुरकुरीतपणा आला. छानशी चव होती. मिरीसारखी असावी- नाही?”

“मला नीट कळलं नाही. पण जे काही होतं ते अजून थोडं हवं होतं. सूपही. त्यात कसल्या भाज्या होत्या कळलं तुला?”

“नाही.”

“आणि ते मांसाचे काप होते ते कसले? कळलं तुला?”

“मला वाटतं ते मांस नव्हतंच. सिन्नामध्ये आमच्याकडे मटण असायचं- कोकराचं. ते असंच लागायचं.”

“पण ते कोकराचं मटण नक्कीच नव्हतं.”

“ते मांसच नव्हतं असं म्हणतेय मी. मायकोजेनच्या बाहेर कुणालाही एवढं चविष्ट अन्न मिळत नसेल. अगदी सम्राटालाही. ते विकायला म्हणून जे काही बाहेर पाठवतात ते सगळं अगदी खालच्या दर्जाचं असणार. सर्वोत्तम पदार्थ ते स्वतःसाठीच राखून ठेवत असणार. आपण इथे फार काळ राहाता कामा नये. इथे इतकं चवदार जेवण्याची सवय झाली तर बाहेर जे काही कदान्न मिळतं त्यावर जगणं कठीणच जाईल नंतर.” ती हसू लागली.

तोही हसला. त्याने फळांच्या रसाचा आणखी एक घुटका घेतला. आधी कधीही चाखलेल्या कोणत्याही रसापेक्षा मस्त चवीचा रस होता तो. तो म्हणाला, "ऐक ना, ह्युमिनने मला पहिल्यांदा युनिवर्सिटीत नेलं ना तेव्हा आम्ही रस्त्यातल्या एक डायनरमधे थांबून खाऊन घेतलेलं. प्रचंड यीस्ट होतं त्यात. त्याची चव म्हणजे- जाऊ दे सांगायलाच नको- पण मला वाटलेलं की मायक्रोफूडची चव अशीच लागत असेल. त्या भगिनी गेल्या का- त्यांचे आभार मानायला हवे होते."

"आपल्याला जेवण किती आवडेल याची त्यांना अगदी चांगलीच कल्पना असावी. जेवण शिजताना किती छान वास सुटलाय असं मी म्हटलं तेव्हा त्या अगदी सहज म्हणाल्या, खाताना तर आणखी छान वाटणार आहे तुम्हाला."

"मोठी बहीण म्हणाली असणार, नक्की."

"हो. धाकटी फक्त खुदुखुदू हसत होती. आणि त्या परत येतीलच. त्या माझ्यासाठी कर्टल घेऊन येणार आहेत, म्हणजे मग मी त्यांच्याबरोबर बाजारात जाऊ शकेन खरेदीला. आणि त्यांनी मला स्पष्टच सूचना केली आहे. की बाहेर पडायचं असेल तर चेहरा स्वच्छ धुवून मगच बाहेर यायचं. मला चांगल्या प्रतीचे कर्टल्स कुठे घेता येतील ते त्या दाखवणार आहेत. शिवाय खाण्याचे तयार पदार्थ कुठे विकत मिळतात तेही दाखवणार आहेत. ते फक्त गरम केले की झालं. चांगल्या वळणाच्या भगिनी असं कधीही करीत नाही म्हणाल्या- त्या सग्ळं स्वत्ताः करतात म्हणाला. आपल्या जेवणातले काही पदार्थ असे तयार होते आणि त्यासाठी त्यांनी माफी मागितली. पण त्यांनी एकंदरीत असं सूचित केलं की टोळीवाल्यांकडून पाककलेचे सौंदर्य समजायला लागणारी संवेदना अपेक्षितच नाही. त्यामुळे आपण फक्त गरम करून घेण्याचे पदार्थ घ्यावेत नि खावेत. त्यांनी हेही गृहीत धरलेलं की सगळं शिजवणं, गरम करणं, खरेदी करणं हे माझंच काम असणार."

“आपण म्हणतोच ना- ट्रॅन्टॉरवर असताना ट्रॅन्टॉरकरासारखंच वागावं लागतं.”

“हो. ते तसं तू म्हणशील याची अपेक्षा होतीच.”

“मी एक सामान्य माणूस आहे बाबा, काय करणार.”

“ही सुध्दा नेहमीचीच सबब.” डॉर्स किंचित् हसली.

सेल्डन भरल्यापोटी सुखावून मागे रेलून बसला आणि म्हणाला, “तू गेली दोन वर्षे ट्रॅन्टॉरमध्ये आहेस, डॉर्स. ज्या गोष्टी मला समजत नाहीत त्या तुला समजत असतील. या मायकोजेनियन्सची ही जी काही समाजव्यवस्था आहे त्यात त्यांच्या पारलौकिक दृष्टीकोनाचाही भाग आहे का?”

“पारलौकिक?”

“हो. असं काही असल्याबद्दल तू कधी ऐकलं आहेस?”

“पण ‘पारलौकिक’ म्हणजे काय म्हणायचंय तुला?”

“अगदी स्पष्ट आहे. निसर्गनियमांना धरून न वागणाऱ्या, ऊर्जासंवर्धनाचे नियम न पाळणाऱ्या, किंवा सुप्त अशा गोष्टींच्या अस्तित्वाबद्दल विश्वास.”

“असं होय. म्हणजे तुला म्हणायचंय- मायकोजेन हा धार्मिक समाज आहे का असं.”

आता बुचकळ्यात पडण्याची पाळी होती सेल्डनची.”धार्मिक?”

“हो, फार पुरातन शब्द आहे तो, पण आम्ही इतिहासज्ञ वापरतो तो अनेकदा. आमचा अभ्यासविषय असल्या पुरातन संकल्पनांनी भरलाय. धार्मिक म्हणजे अगदी पारलौकिक असा अर्थ होत नाही- पण त्या परिघात अनेक पारलौकिक संकल्पना येतात. मी तुझ्या या प्रश्नाला नेमकं उत्तर देऊ शकत नाही म्हणा, कारण मी

मायकोजेनवर विशेष अभ्यास केला नाही कधी. तरीही, मी जेवढं काही पाहिलंय आणि इतिहासातून मिळालेलं धर्मसंकल्पनेचं ज्ञान यातून मी एवढं म्हणू शकते, की मायकोजेनियन समाज बराचसा धार्मिक प्रकारचा आहे."

"तसं असेल तर, मायकोजेनियन दंतकथाही धार्मिक प्रकारच्या असल्या तर आश्चर्य वाटायला नको, नाही कां?"

"बरोबर."

"म्हणजेच त्यांना इतिहासाचा आधार नसणार."

"असंच काही नाही. दंतकथांच्या गाभ्याला ऐतिहासिक सत्याचा आधार असूही शकतो. त्यात थोडी पारलौकिक कल्पनाविलासाची भेसळ होऊ शकते एवढं नक्की."

"ओः" सेल्डन उद्गारला. आणि आपल्या विचारांत हरवून गेला.

अखेर डॉर्सने शांततेचा भंग केला आणि म्हणाली, "हे काही फार निराळं नाहीये बरं का. अनेक जगांमध्ये थोडी फार धार्मिकता दिसते. साम्राज्याची परिस्थिती जसजशी डळमळीत होऊ लागली आहे तसतशी ही धार्मिकता वाढत चालली आहे असं दिसतं. निदान माझ्या जगात- सिन्नामध्ये एक चतुर्थांश लोकसंख्या त्रीईश्वरवाद मानते."

आपल्याला इतिहासाची किती कमी माहिती आहे हे जाणवून सेल्डन पुन्हा एकदा दुःखी झाला. तो म्हणाला, "आज आहे त्यापेक्षा धार्मिकता फार तीव्र होती असा काही काळ होता कधी इतिहासात?"

"नक्कीच. शिवाय अनेक ठिकाणी सतत धार्मिकतेचे नवनवे प्रकार अवतरत असतात. हा मायकोजेनचा धर्म जो काही आहे- तो तसा तुलनेने नवाच आहे. आणि

कदाचित् फक्त मायकोजेनपुरताच मर्यादित आहे. पण अभ्यास केल्याशिवाय नक्की काहीच सांगता येणार नाही.''

''पण आता आपण मुद्द्यापाशी आलो, डॉर्स. तुझं मत सांग- स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त धार्मिक असू शकतात असं आहे कां?''

डॉर्स वेनाबिलीने भुवया उंचावल्या. ''मला नाही वाटत आपण असं काहीतरी सरसकट मानू शकतो.'' मग क्षणभर विचार करत राहिली आणि म्हणाली, ''मला असं वाटतं अनेकदा- की एखाद्या लोकसमूहापैकी काहींना जर भौतिक साधनसंपत्तीत फारसा वाटा नसेल तर त्यांचा ओढा अशा पारलौकिक वगैरेमध्ये समाधान शोधण्याकडे असतो- गरीब, लुटले गेलेले, तळातले असे सारेच. धर्म आणि पारलौकिकत्व तसे फार वेगळे रहात नाहीत- त्यामुळे ते धार्मिकही असू शकतात. दोन्हीकडे बरेच अपवाद असतात अर्थात. अनेकदा अगदी साधनहीन लोक अजिबात धार्मिक नसतात आणि श्रीमंत, सत्ताधारी किंवा सर्व प्रकारची साधने हाती अशलेले लोक धार्मिक असू शकतात.''

''पण मायकोजेनमध्ये पहा,'' सेल्डन म्हणाला, ''स्त्रियांना अगदी तुच्छ-मानवी म्हणता येणार नाही अशी वागणूक मिळते- इथे त्या पुरुषांपेक्षा अधिक धार्मिक होऊ शकतात की नाही? प्रचलित दंतकथांत आणि त्या राखण्यात त्यांची अधिक भावनिक गुंतवणूक असेल- नाही कां?''

''अगदी पूर्ण खात्रीने म्हणणार नाही मी, हॅरी, पण थोड्या खात्रीने म्हणेन. छोटी पैज चालेल, जिवाची बाजी नाही.''

''छान,'' सेल्डन विचारातच गढलेला.

डॉर्स त्याच्याकडे पाहून हसली, “ही घे तुझी छोटीशी सायकोहिस्ट्री, हॅरी. नियम क्रमांक ४७,८५४- रंजलेगांजले लोक समृध्द लोकांपेक्षा अधिक धार्मिक असू शकतात.”

सेल्डनने मान हलवली. “सायकोहिस्ट्रीवर विनोद करू नकोस, डॉर्स. मी बारीकसारीक नियमांच्या मागे नाहीये. प्रचंड आवाक्याची सर्वसामान्य तत्वे आणि ती चालवण्यासाठी साधने कशी वापरायची याचा विचार करतोय मी. छोटेछोटे नियम चाळून त्यातून तौलनिक धार्मिकतेचे विश्लेषण करण्यात मला रस नाही. मला असं काहीतरी हवं की ज्याचा वापर गणिती सूत्रातून गुंफून मला काही तर्क मांडता येतील. म्हणजे असं की- आहा, माणसांचा हा गट इतरांपेक्षा अधिक धार्मिक होऊ शकतो- जर पुढीलप्रमाणे मापदंड पूर्ण झाले तर- आणि म्हणून मानवजातीला तीन प्रकारचे धक्के मिळाले तर त्यांचा प्रतिसाद असाअसा असेल.”

“काय भयंकर आहे हे,” डॉर्स म्हणाली, “तू माणसांचं चित्र असं काही रंगवतो आहेस की जणू ते कुणी यांत्रिक साधने आहेत. हे बटण दाबा की इथे झटका बसेल असं.”

“नाही, कारण इतकी बटणं एकाच वेळी दाबावी लागतील आणि त्यातून इतके वेगवेगळे झटके बसतील आणि त्यातून निर्माण होणारा कल्लोळ केवळ सांख्यिकी स्वरुपाचा असेल. त्यामुळे एकेक माणूस पुन्हा स्वतंत्रच राहील.”

“हे कशावरून सांगू शकतोस तू?”

“नाही सांगू शकत,” सेल्डन म्हणाला, “निदान मला नक्की काही माहीत नाही. पण काहीतरी जाणवतं. कसं असायला हवं ते मला कळतं असं मला वाटतं. मला जर सिध्दकल्पना काय ते कळलं तर, मानवी वर्तणुकीचे मूलभूत नियम कळले,

आणि मग त्याचे गणिती सूत्र गुंफता आले तर मला सायकोहिस्ट्री मांडता येईल. मी सैध्दांतिक पातळीवर हे मांडलं आहे... शक्यता दाखवून दिली आहे.''

''पण ते व्यवहार्य नाही, बरोबर?''

''असं म्हणत रहातो मी...''

डॉर्सच्या जिवणीवर किंचितसं स्मितहास्य खुललं, ''या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतो आहेस का, हॅरी?''

''माहीत नाही. खरंच सांगतो, माहीत नाही मला. पण चेटर ह्युमिनला हे उत्तर शोधण्याची खूप घाई लागली आहे- आणि काय सांगू- मलाही त्याला खूष करावंसं वाटतं खरं. तो किती पाठपुरावा करतो.''

''हो, माहीत आहे मला.''

सेल्डनच्या कपाळावर आठी उमटलीच. पण तरीही तो काही बोलला नाही.

सेल्डन पुढे बोलू लागला, ''ह्युमिन ठामपणे म्हणतो- की हे साम्राज्य सडत चाललंय. ते कधीही कोसळून पडेल. पण सायकोहिस्ट्री ही एकच आशा आहे ते वाचवण्यासाठी, किंवा निदान ते कोसळताना पार चक्काचूर होऊ नये एवढी काळजी घेण्यासाठी. या साम्राज्याच्या आधाराशिवाय सारी मानवजात नष्ट तरी होईल किंवा मग फार दीर्घ काळापर्यंत तिला बरंच काही सोसावं लागेल. ते थांबवण्याची जबाबदारी तो माझ्यावर टाकू पाहातोय. आता साम्राज्य निदान माझ्या मृत्यूपर्यंत तर टिकेलच. पण शांतपणे जगायचं तर खांद्यावरच्या या जबाबदारीचा भार हलका करायला हवा. सायकोहिस्ट्री ही कितीही छान सैध्दांतिक मांडणी असली तरीही ती पुढे विकसित करणं शक्य नाही, व्यवहार्य नाही हे मला आधी स्वतःला पटवावं लागेल मग ह्युमिनला पटवून द्यावं लागेल. त्यामुळे मी जमतील तितके मार्ग शोधतो

आहे. त्यावर काम करून त्यातला प्रत्येक मार्ग कसा निकामी ठरतो हे सिध्द करावं लागेल.”

“मार्ग? आत्तापेक्षा मानवी समाज लहान होता त्या काळात जाऊन मार्ग शोधायचे?”

“त्यापेक्षाही लहान. आणि कमी गुंतागुंतीचे.”

“आणि तरीही त्याचं उत्तर अव्यवहार्य आहे हे दाखवायचंय?”

“हो.”

“पण एवढ्या पूर्वीच्या जगाचं वर्णन कोण देणार तुला? प्राचीन दीर्घिकाविश्वाचं काही नीटस चित्र मायकोजेनियन्सना मांडता आलं असतं तरीही, सनमास्टर ते एका यःकश्चित टोळीवाल्यासाठी उघड करणार नाही. कुठलाच मायकोजिनियन तसं करणार नाही. हा एक अगदी कोषात गेलेला समाज आहे- कितीवेळ बोललो आपण हे? आणि यांच्या सगळ्या सदस्यांना टोळीवाल्यांबद्दल भयंकर अविश्वास वाटतो. ते आपल्याला काहीही सांगणार नाहीत.”

“काही मायकोजिनियन्सना विश्वासात घेऊन काहीतरी मार्ग काढू. उदाहरणार्थ या दोघी बहिणी.”

“त्या तर तुझ्याकडे पाहाणारही नाहीत. तू पुरूष आहेस. सनमास्टर जशी माझी दखलही घेत नाही, तसंच. आणि समज त्या बोलल्या तरीही- थोड्या म्हणी वाक्प्रचार यांच्या पलिकडे त्यांची मजल जाणार नाही.”

“कुठेतरी सुरुवात करायला तर हवी मला.”

डॉर्स म्हणाली, “ हं... विचार करते मी. ह्युमिन म्हणतो की मी तुझं संरक्षण करायला हवं आणि त्याचा अर्थ असाही आहे की मी तुला शक्य ती मदतही करायला हवी. मला धर्माबद्दल काय माहिती आहे? माझा तो अभ्यासाचा विषय नाही हे तू

जाणतोस. मी नेहमीच आर्थक इतिहासाचा अभ्यास करत आले आहे. तत्वज्ञानाशी संबंध नव्हता कधी. पण अखेर इतिहास काही असा अलगअलग तुकड्यांचा नसतो. उदाहरणार्थ, धर्माच्या यशाभोवती संपत्ती जमा होत जाते आणि मग कालांतराने त्या त्या समाजाच्या आर्थिक प्रगतीवर त्याचा परिणाम दिसतो. मानवी इतिहासाच्या अनेक नियमांपैकी एक इथे व्यक्त होतो- तुला त्यातून मानवी वर्तनाचे किंवा तू त्याला जे नाव देशील त्याचे मूलभूत नियम काढता येतील."

ती विचारात गढली आणि तिचा आवाज हळुहळू खाली येत विरत गेला. सेल्डन तिच्याकडे काळजीपूर्वक पाहात होता. तिचे डोळे चमकत होते. ती स्वतःच्या आत खोलवर कुठेतरी हरवली होती जणू.

अखेर ती पुन्हा बोलू लागली, "हा काही अपरिवर्तनीय नियम नाही. पण असं दिसतं की अनेकदा असं घडलंय की धर्माला काही किंवा एकतरी धर्मग्रंथ असतो. त्यात त्यांची कर्मकांडे, इतिहासाचा दृष्टीकोन, त्यांना पवित्र वाटणारी काव्ये आणि असंच कायकाय असतं. बरेचदा ही पुस्तकं सर्वांसाठी खुली असतात. आणि ते धर्मप्रचाराचं साधन असतं. क्वचितच ही पुस्तकं गुप्त ठेवली जातात."

"मायकोजेनमधे अशा प्रकारची पुस्तकं असतील असं वाटतं तुला?"

"खरं सांगायचं तर," डॉर्स विचारपूर्वक उत्तरली, "मी तरी कधी ऐकलं नाही. आणि ती खुलेपणाने उपलब्ध असती तर माझ्याकडे असती. तसं नाही याचा अर्थ ती नसतीलच किंवा मग गुप्त असतील. दोन्ही स्थितींत तुला काही ती पाहायला मिळणार नाहीत."

"निदान एक सुरुवात तरी सापडली काही शोधण्यासाठी."

४२-

हॅरी आणि डॉर्सचं दुपारचं जेवण झाल्यानंतर दोन तासांनी त्या दोघी भगिनी आल्या. दोघी हसत होत्या. आणि गंभीर वागणाऱ्या रेनड्रॉप फॉर्टीथ्रीने डॉर्सच्या पुढ्यात एक राखी रंगाचा कर्टल धरला.

“फारच छान आहे हा,” डॉर्स तोंडभरून हसली आणि मनापासून म्हणाली, “यावरचं भरतकाम किती देखणं आहे.”

“यात काही विशेष नाही,” रेनड्रॉप फोर्टीफाइव् हसत म्हणाली. “माझा जुना कर्टल आहे हा. आणि तुम्हाला नीट बसणारही नाही. कारण तुम्ही माझ्यापेक्षा उंच आहात. पण थोड्या वेळापुरता घालायला हरकत नाही. आम्ही तुम्हा सर्वात चांगल्या कर्टलीमध्ये घेऊन जातोय- तिथे तुम्ही आपल्या आवडीनिवडीप्रमाणे कर्टल घेऊ शकाल. बघाच तुम्ही.”

रेनड्रॉप फॉर्टीथ्री थोडंसंच हसत होती, फार काही बोलत नव्हती. तिची नजर जमिनीकडे लागलेली आणि तिने पांढरा कर्टलची घडी डॉर्सच्या हाती ठेवली. डॉर्सने तो न उलगडता तसाच सेल्डनच्या हातात दिला. “रंगावरून- तो तुझ्यासाठी पाठवलेला दिसतोय, हॅरी.”

“शक्य आहे,” सेल्डन म्हणाला, “पण परत कर तो. तिने तो मला दिलेला नाही.”

“ओः हॅरी,” डॉर्सने किंचित मान हलवत विरोध दर्शवला.

“नाही,” सेल्डन ठामपणे म्हणाला, “तिने तो मला दिलेला नाही. तो तिला परत कर. ती तो मला देईपर्यंत मी वाट पाहीन.”

डॉर्स थोडी थबकली, मग तिने नाखुषीनेच तो कर्टल रेनड्रॉपकडे परत द्यायचा प्रयत्न केला. पण तिने आपले हात मागे नेले आणि ती दूर सरकली. तिच्या चेहऱ्याचा

रंगच जणू उडाला. रेनड्रॉप फॉर्टीफाइवने सेल्डनकडे अगदी चोरटी नजर टाकली. मग ती रेनड्रॉप फॉर्टीथ्रीच्या जवळ गेली आणि तिच्या खांद्यांभोवती हात टाकले.

डॉर्स म्हणाली, "ए हॅरी, घे बघू हे. या स्त्रियांना नात्यागोत्यात नसलेल्या पुरुषांशी बोलायची परवानगी नाही हे स्पष्ट आहे. तिला बिचारीला का त्रास द्यायचा? यात तिचा काहीच दोष नाही.'

"मला नाही वाटत तसं." सेल्डन कठोरपणे म्हणाला, "नियम असलाच तर तो फक्त त्यांच्या त्या बांधवांना लागू असेल. यापूर्वी कधी तिला एकादा टोळीवाला भेटला असेल का- शंकाच आहे."

डॉर्स रेनड्रॉप फॉर्टीथ्रीला अगदी हलकेच म्हणाली, "तुम्हाला यापूर्वी कधी टोळीवाला पुरुष किंवा बाई भेटली होती का?"

बऱ्याच वेळाने त्यांनी नकारार्थी मना हलवली.

सेल्डनने हात पुढे केले. "बघ आता. न बोलण्याचा नियम असेल तर तो केवळ त्यांच्या बांधवांना लागू असेल. टोळीवाल्या पुरुषांशी बोलू नये असा नियम असेल तर त्यांनी मुळातच त्यांना आपल्याकडे येऊ दिले नसते ना?"

"पण कदाचित् असंही असेल हॅरी, की त्या फक्त माझ्याशी बोलतील आणि मग मी तुझ्याशी."

"काहीपण, माझा यावर विश्वासच नाही. आणि मी विश्वास ठेवणारच नाही. मी काही फक्त टोळीवाला नाहीये. मी मायकोजेनचा प्रतिष्ठित पाहुणा आहे. चेटर ह्युमिनने तसं सांगितलंय- आणि स्वतः सनमास्टर फोर्टीन मला घ्यायला आला होता. माझ्याशी वागताना, मी जणू काही अस्तित्वातच नाही असं वागलेलं मला चालणार नाही. मी सनमास्टर फोर्टीनशी बोलेन आणि याबद्दल तक्रार करेन."

रेनड्रॉप फॉर्टीथ्री हुंदके देऊ लागली. आणि रेनड्रॉप फॉर्टीफाइव जरी शांत असतील तरीही तिचा चेहरा लाल झाला.

डॉर्सने पुन्हा एकदा त्याला समजावण्यासाठी तोंड उघडलं पण सेल्डनने तिला हात उडवत रागारागाने तोपवलं. आणि मग तो संतप्त नजरेने रेनड्रॉप फोर्टीथ्रीकडे पाहू लागला.

आणि अखेर ती शांतपणे बोलू लागली. तिचा आवाज किंचित घोगरा, थरथरता होता, जणू एका पुरुषाशी बोलताना खूप प्रयत्न करून तिच्या घशातून आवाज निघत होता. तिच्या साऱ्या सहज प्रेरणा, इच्छा यांवर मात करून बोलणं अवघड जात होतं तिला.

“आमची तक्रार कशी करू शकता तुम्ही, टोळीवाले··· अन्याय होईल तो आमच्यावर. आमच्या लोकांमधल्या रूढी मोडायला भाग पाडता आहात तुम्ही मला. काय हवंय काय तुम्हाला माझ्याकडून?”

सेल्डन अगदी प्रसन्न खेळकर हसला आणि त्याने हात पुढे केले. “माझ्यासाठी आणलेला तो पोषाख. ते कर्टल.”

तिने काही न बोलता हात लांबवून त्याच्या हातात कर्टल ठेवला.

किंचित झुकून मृदू स्वरात तो म्हणाला, “थँक्यू.” मग डॉर्सकडे झर्रकन नजर टाकून तो जणू म्हणाला, ‘पाहिलंस?’ पण डॉर्सने रागारागाने नजर दुसरीकडे वळवली होती.

त्याने उलगडून पाहिलं, ते अगदी साधं कर्टल होतं. भरतकाम, सजावट वगैरे फक्त स्त्रियांसाठी असावी. पण त्यासबोत एक विणलेल्या दोरीचा पट्टा होता. तो काही विशिष्ट प्रकारे बांधणे अपेक्षित असावे. जमण्यासारखं होतं.

तो म्हणाला, “मी जरा बाथरूममधे जाऊन हे घालून येतो. मिनिटभरापेक्षा जास्त वेळ लागणार नाही.”

तो आत शिरला पण दार मागे बंद होईना. कारण डॉर्सही आत घुसत होती. अखेर ते दोघे आत गेले आणि दार बंद झालं.

“काय चालवलेलंस तू?” डॉर्स रागारागाने फिस्कारली, “किती दांडगाई केलीस तू, हॅरी. का त्या बिचारीशी असं वागलास?”

सेल्डन रागातच उत्तरला, “तिला माझ्याशी बोलायला लावण्याचा तोच एक मार्ग होता. काही माहिती मिळवायला तिचाच उपयोग होईल मला. तुला माहीतीये ते. थोडं क्रूर वागावं लागलं मला, पण तिचं भीती दूर करायचा तोच एक मार्ग होता.” आणि मग त्याने तिला बाहेर काढलं.

तो बाहेर आला तेव्हा डॉर्सही कर्टल घालून तयार होती.

कातडी टोपीमुळे केशविहीन दिसणारं मस्तक आणि तो आकारउकार नसलेला गबाळा कर्टल घालूनही डॉर्स छान दिसत होती. त्या झग्याची शिवण अशी होती की काहीही न दिसताही आकृती जाणवावी. तिचा कंबरपट्टाही थोडा रुंद होता. राखी रंगातलीच थोडी गडद छटा. आणि तो बांधण्यासाठी दोन चकाकते निळे खडेही होते. कितीही कठीण परिस्थितीत बायका छान दिसण्याचा प्रयत्न करतातच- हॅरीने विचार केला.

हॅरीकडे पाहात डॉर्स म्हणाली, “आता तू अगदी मायकोजेनियन दिसतो आहेस. आता दोघी भगिनी आपल्याला मोकळेपणाने दुकानांत घेऊन जाऊ शकतात.”

“हो, पण नंतर मला रेनड्रॉप फॉर्टीथ्री मायक्रोफार्म्समध्ये घेऊन जाणार आहे.” सेलडन म्हणाला.

रेनड्रॉप फॉर्टीथ्रीचे डोळे विस्फारले आणि ती एक पाऊल मागे सरली.

"मला बघायचे आहेत," सेल्डन शांतपणे म्हणाला.

रेनड्रॉप फॉर्टीथ्रीने चटकन् डॉर्सकडे पाहिलं आणि ती उद्गारली, "टोळीवाल्या बाई,"

सेल्डन म्हणाला, "तुला त्या फार्म्सबद्दल काहीच माहीत नसावं कदाचित्."

आणि ही मात्रा लागू पडली. तिने जरा रागातच हनुवटी वर उचलली आणि ती डॉर्सशी बोलू लागली, "मी स्वतः मायक्रोफार्म्सवर काम केलंय. इथले सारे बांधव आणि भगिनी आयुष्यात कधी ना कधी मायक्रोफार्मवर काम करतातच."

"मग ने मला ते दाखवायला," सेल्डन म्हणाला, "आणि पुन्हा एकदा तोच वाद घालू हवं तर. मी तुमच्या बांधवांपैकी नाही, त्यामुळे माझ्याशी बोलायचं नाही असा काही नियम असू शकत नाही. मी टोळीवाला आहे आणि सन्माननीय पाहुणा आहे तुमचा. मी ही टोपी आणि हा कर्टल घालतो ते माझ्याकडे उगाचच्या उगाच कुणाचं लक्ष वेधायला नको म्हणून. पण मी अभ्यासक आहे. आणि मला अभ्यास केलाच पाहिजे. इथे बसून मी काही भिंतींकडे, छताकडे बघत बसू शकत नाही. संपूर्ण गॅलेक्सीमध्ये जी केवळ तुमच्याचकडे आहे अशी एक गोष्ट मला बघायलाच हवी- तुमचे मायक्रोफार्म्स. मला वाटतं तुम्हाला ते दाखवण्यात अभिमान वाटला पाहिजे."

"आम्हाला अभिमान वाटतोच," अखेर सेल्डनकडे थेट पाहात रेनड्रॉप फॉर्टीथ्री म्हणाली. "मी दाखवेन ती तुम्हाला. आणि तुमचा तसा उद्देश असला तरी तुम्हाला त्यातून आमची कोणतीही गुपितं कळू शकणार नाहीत. उद्या सकाळी मी तुम्हाला मायक्रोफार्म्स पाहायला नेईन. तशी व्यवस्था करायला थोडा वेळ लागेल."

सेल्डन म्हणाला, "उद्या सकाळपर्यंत मी जरूर थांबेन. पण तसं वचन देणार? तुमचा शब्द हवाय मला?"

रेनड्रॉप फॉर्टीथ्री अगदी तुच्छतेने म्हणाली, “मी भगिनी आहे, आणि मी जे बोलते ते करते. अगदी टोळीवाल्याला दिलेला शब्दही मी पाळते.” तिचा स्वर शेवटच्या वाक्यावर थंडगार बोचरा झाला. तिचे डोळे टपोरले होते आणि लकाकत होते... हिच्या मनात काय चाललं असेल- सेल्डनला प्रश्न चाटून गेला.

४३-

त्या रात्री सेल्डनला कशीबशी झोप लागली. डॉर्सने जाहीर केलं होतं की तीही त्याच्यासोबत मायक्रोफार्म्सवर जाणार. तिच्याशी भरपूर वाद घालून झालेला.

“तिथं जाण्याचा सगळा हेतूच तिला मोकळेपणी बोलायला लावण्याचा आहे. एकटीने एका पुरुषाबरोबर – तेही टोळीवाल्या पुरुषाबरोबर बोलण्याचा वेगळाच अनुभव तिला द्यायचा आहे. त्यांच्या रूढी इतक्या तोडल्या- आथा पुढचं काम सोपं होईल. पण तू बरोबर असलीस तर ती तुझ्याशीच बोलत राहील आणि मी बारीकसारीक तुकडे वेचत राहीन.” सेल्डन म्हणाला.

“आणि मी नसताना, अपरसाईडवर झाला तसलाच काही प्रकार झाला तर?”

“काही होत नाही. प्लीज, मला मदत करायची असेल तर जरा थांब. दूर रहा. खरं सांगतोय, डॉर्स. हे माझ्या दृष्टीने खूप महत्त्वाचं आहे. मला तू खरंच खूप आवडतेस- पण या माझ्या कामगिरीच्या मधे येऊ नकोस.”

ती फार नाखुषीनेच तयार झाली. पण मग म्हणाली, “तू मला एक वचन दे, तिच्याशी नीट वागशील म्हणून.”

सेल्डन म्हणाला, “तू माझं रक्षण करायचं म्हणतेस की तिचं? मी तिच्याशी काय गंमत म्हणून कठोरपणे वागलो नाही. आणि तसं पुढंही करणार नाही.”

त्यांच्या या वादावादीची आठवण –पहिल्यांदाच त्यांच्यात वाद झाला होता- मनात ठेवून तो झोपायला गेला होता. शिवाय उद्या सकाळी त्या दोघी भगिनी आल्याच नाहीत तर, रेनड्रॉप थ्रीने वचन पाळले नाही तर या आशंकांमुळेही त्याला नीट झोप लागली नाही.

पण त्या आल्या खऱ्या. सेल्डन नुकताच थोडीशी न्याहारी करून बसला होता. तिथलं चवदार अन्न हादडून जाडं होता कामा नये असं त्याने मनाशी ठरवून टाकलं होतं. त्याचा कर्टल त्याला अगदी नेमका बसत होता. आणि त्याने पट्टाही व्यवस्थित बांधून घेऊन त्याची टोकं नीट सोडलेली.

रेनड्रॉप फॉर्टीथ्रीची नजर अजूनही टोचरीच होती. “तयार असलात, टोळीवाले सेल्डन महोदय, माझी बहीण रेनड्रॉप फॉर्टीफाइव इथे टोळीवाल्या वेनाबिलीबाईसोबत थांबेल.” तिचा आवाज थरथरत नव्हता, घोगरटही येत नव्हता. जणू तिने रात्रभर विचार करून आवाजावर काबू आणलेला. बांधव नसलेल्या एका पुरुषाशी कसं बोलावं याचा सराव केला असावा.

ही रात्रभर झोपली असेल का असा विचार सेल्डनच्या मनात आला. “हो, तयार आहे मी.” तो म्हणाला.

अर्ध्या तासानंतर रेनड्रॉप फॉर्टीथ्री आणि हॅरी सेल्डन एकेक पातळी खालीखाली उतरत जाऊ लागलेले. घड्याळानुसार दिवस सुरू होता. पण ट्रॅन्टॉरवर इतरत्र असे त्यापेक्षा इथला उजेड जरा सौम्य, मंद होता.

यामागचं कारण स्पष्ट होत नव्हतं. ट्रॅन्टॉरभर जो कृत्रिम प्रकाश फिरवला जात असे तोच इथेही असणार. पण मायकोजेनियन्सनी आपल्या आवडीप्रमाणे त्यात काही बदल केला असणार. काहीतरी प्राचीन कल्पना असेल- सेल्डन विचार करत होता. सेल्डनचे डोळे हळुहळू त्या मंद प्रकाशाला सरावले.

जाताजाता भेटणाऱ्या बांधवांकडे, भगिनींकडे शांतपणे पाहण्याचा प्रयत्न सेल्डन करीत होता. काही वेगळ्या हालचाली केल्या नाहीत, लक्ष वेधून घेतलं नाही तर रेनड्रॉप फॉर्टीथ्री आणि तो यांची जोडी इतर कोणत्याही मायकोजेनियन दांपत्यासारखीच दिसत असावी असा निष्कर्ष त्याने काढला.

दुर्दैवाने रेनड्रॉप फॉर्टीथ्रीला लक्ष वेधून घेण्यात रस असावासं दिसत होतं. ती मधूनमधून त्याच्याशी थोडंथोडं बोलत राहिली. तोंड घट्ट मिटून काही शब्द बोलून ती थांबायची. परक्या पुरुषाबरोबर जाण्याच्या कृतीने तिचा आत्मविश्वास अचानक भरकटल्यासारखा वाढला होता. सेल्डनला खात्री होती... तिला शांतवण्यासाठी म्हणून तो काही बोलला असता तर ती अधिकच अस्वस्थ झाली असती. तिच्या ओळखीचं कुणी भेटलं तर ती काय करेल सेल्डनला सांगवत नव्हतं. उतरत उतरत खालच्या मजल्यांवर ते पोहोचले तेव्हा माणसं अगदीच तुरळक दिसू लागली. तेव्हा कुठे सेल्डनला हायसं वाटलं.

खाली उतरण्यासाठी एलेव्हेटर्स नव्हत्याच. सरकते जिने होते. त्यांच्या दोनदोन जोड्या दिसत होत्या. एक वर जाणारा, एक खाली नेणारा. रेनड्रॉप फॉर्टीथ्री त्यांचा उल्लेख एस्केलेटर्स म्हणून करत होती. हा शब्द सेल्डनने प्रथमच ऐकलेला आणि आपण ऐकलं ते बरोबर का ते कळत नव्हतं त्याला.

जसजसे ते अधिकाधिक खालीखाली गेले, तसतशी सेल्डनच्या मनातली आशंका वाढत गेली. बऱ्याचशा जगांमध्ये मायक्रोफार्म्स असत, आणि ती सारी आपापली सूक्ष्मान्ने तयार करीत. हेलिकॉनमधे असताना सेल्डनने काही मायक्रोफार्म्सना भेटी देऊन काहीबाही स्वादांचे पदार्थ विकत घेतलेले. आणि तिथे गेल्यानंतर एक विशिष्ट दुर्गंध- अगदी पोट ढवळून टाकणारा दुर्गंध त्याने अनुभवला होता.

मायक्रोफार्म्सवर काम करणाऱ्या लोकांना त्याचं काही वाटत नसे. थोड्या वेळासाठी आलेले लोकही सुरुवातीला नाक उडवत दाबून धरत, पण काही वेळातच त्यांना त्याची सवय होत असे. पण सेल्डनला सवय होत नसे. त्याला वासाचा त्रास जरा जास्तच होत असे आणि आताही तो होणार अशी त्याला खात्रीच होती. आपण केवळ ज्ञानलालसेपोटी हे सारे धीरोदात्तपणे सहन करणार आहोत अशी त्याने स्वतःची समजूत काढली. पण तरीही केवळ कल्पनेनेच त्याच्या पोटात ढवळायला सुरुवात झालेलीच.

किती पातळ्या उतरत ते किती खाली गेले त्याचा आता त्याला अंदाजच येईनासा झाला. पण तरीही हवेत कसलाही वास जाणवत नव्हता. त्याने विचारलं, "मायक्रोफार्म्सच्या मजल्यावर कधी पोहचणार आपण?"

"पोहोचलोत आपण."

सेल्डनने खोल श्वास घेत विचारलं, "तिथे पोहोचल्यासारखं वाटत नाही वासावरून."

"वास? काय म्हणायचंय तुम्हाला?" रेनड्रॉप फॉर्टीथ्रीने रागातच विचारलं. तिचा स्वर चढला होता.

"माझा अनुभव असा आहे की मायक्रोफार्म्सच्या परिसरात फार घाण वास असतो. जीवाणू, यीस्ट, बुरशी वगैरेंना जी खतं आवश्यक असतात त्यांचा वास असतो तो."

"तुमचा अनुभव?" तिने जरा खालच्या आवाजात विचारले. "कुठे आला असा अनुभव तुम्हाला?"

"माझ्या स्वतःच्या ग्रहावरच्या जगात."

त्या भगिनीचा चेहरा घृणेने भरला, “आणि तुमचे लोक अशा खातेऱ्यात लोळतात?”

सेल्डनला हा शब्द कळला नाही, पण तिच्या मुद्रेवरून आणि स्वरावरून त्याला तिचा तिरस्कार कळला.

तो म्हणाला, “ते सगळं खाण्यायोग्य झालं की त्याला असा काहीही वास येत नाही बरं.”

“आमच्या इथे कुठल्याच टप्प्यावर असा काही वास येत नाही. आमच्या जैवतंत्रज्ञांनी अगदी परिपूर्ण जाती शोधल्या आहेत. शैवाले वाढतात ती अगदी शुद्ध प्रकाशात आणि त्यांना लागणारं इलेक्ट्रोलाइटचं द्रावण अगदी संतुलित असतं. सॅप्रोफाइट्स सेंद्रिय पद्धतीने वाढवलेल्या पोषक द्रव्यांवर जगतात. या सर्वांच्या कृती आणि मोजमापांची सूत्र टोळीवाल्या लोकांना कधीच समजू शकणार नाहीत. चला, आपण पोहोचलोत. कितीही वास घ्या. कसलाही वाईट वास सापडणार नाही. म्हणून तर आम्ही तयार केलेल्या सूक्ष्मान्नाला संपूर्ण गॅलेक्सीमध्ये प्रचंड मागणी आहे. सम्राट म्हणे फक्त इथलंच सूक्ष्मान्न खातो. खरं म्हणजे तशी काही लायकी नाही- आमचं इतकं चांगलं अन्न खाण्याची- स्वतःला सम्राट म्हणवून घेणाऱ्या टोळीवाल्याची.” तिच्या बोलण्यातला राग सेल्डनसाठीच होता हे स्पष्ट होतं. पण ते त्याला कळलं नाही असं व्हायला नको म्हणून ती पुढे म्हणाली, “किंवा स्वतःला सन्माननीय पाहुणा म्हणवून घेणाऱ्या टोळीवाल्याचीही.”

ते एका निरुंद मार्गिकेत आले होते. दोन्ही बाजूंना जाडजूड काचेच्या टाक्या होत्या. त्यात गढूळ हिरव्या रंगाचे पाणी होते आणि त्यात शैवाले सरसरून वाढताना दिसत होती. त्यातून उठणाऱ्या हवेच्या बुडबुड्यांच्या गतीसरशी ती शैवाले पाण्यात फिरत होती. यांत भरपूर कार्बन डाय ऑक्साइड असणार.

फार सुंदरसा गुलाबी रंगाचा प्रकाश त्या टाक्यांवर सोडण्यात आला होता. मार्गिकेमधल्या प्रकाशापेक्षा प्रखर. त्याने तसं म्हणून दाखवलं.

“अर्थातच,” ती उत्तरली, “ही शैवाले वर्णपटाच्या लाल किरणांमध्ये सर्वात चांगली वाढतात.”

“मला वाटतं,” तो म्हणाला, “सारंकाही स्वयंचलित दिसतंय.”

तिने उत्तर न देता खांदे उडवले.

“नाही म्हणजे, इथे फार जास्त बांधव किंवा भगिनी दिसत नाहीत.” त्याने मुद्दा लावून धरला.

“काम असतंच, आणि तुम्हाला दिसत नसले तरी काम करणारे असतातच. तुम्हाला अधिक तपशील मिळणार नाहीत. उगीच प्रश्न विचारून वेळ दवडू नका.”

“थांब, थांब, माझ्यावर रागवू नकोस. तुमची गुपितं जाणून घेण्यात मला काहीच रस नाही, कमॉन डिअर.” त्याच्या तोंडून निघून गेलं.

ती निघून चालली की काय असं वाटून त्याने तिचा हात धरला. ती थांबली होती, पण तिचं शरीर थरथरलेलं जाणवून त्याने वरमून हात सोडला.

तो म्हणाला, “एवढंच की मला हे स्वयंचलित असल्यासारखंच वाटतंय.”

“तुम्हाला काय वाटायचं ते वाटू दे. पण अखेर इथे मानवी बुध्दी आणि निर्णयक्षमता याला वाव आहेच. इथला प्रत्येक बांधव किंवा भगिनी आयुष्यात थोडा तरी काळ मायक्रोफार्म्सवर काम करतच असतो. काहीजण हेच काम कायमचं निवडतात.”

ती आता अधिक मोकळेपणाने बोलत होती पण बोलताना त्याचा हात दंडाला जिथं लागला होता तिथं तिचा हात सारखा जात होता. ती तो स्पर्श

झटकण्याचा प्रयत्न करत असावी हे पाहून त्याला अधिकच वरमल्यासारखं झालं. जणू त्याचा दंश झालेला तिला.

"हे फार्म्स काही किलोमीटर्स लांबीच्या परिघात पसरलेले आहेत." ती म्हणाली, "पण आपण इथून तिते वळलो तर तुम्हाला बुरशीचा भाग पाहायला मिळेल."

ते पुढे निघाले. सेल्डन पाहात होता. सारंकाही स्वच्छ चकचकीत होतं. काचा चमकत होत्या, पायाखालची फरशी ओलसर वाटत होता. त्याने सहज म्हणून खाली वाकून हात लावून पाहिलं तर ती अगदी कोरडी होती. कुठेही चिकट निसरडेपणा नव्हता. पण कदाचित अंगठा बाहेर ठेवणाऱ्या मायकोजेनियन चपलांचे तळ घसरायला होऊ नये म्हणूनच तयार केलेले असतील अशीही शक्यता होती.

रेनड्रॉप फॉर्टीथ्रीचं म्हणणं अगदी बरोबर होतं. काही तुरळक बांधव आणि भगिनी शांतपणे कामं करताना दिसत होते. कुणी प्रमाणं तपासत होतं, कुणी नियंत्रणाची व्यवस्था पाहात होतं, काहीजण तर तिथली सारी यंत्र मन लावून साफ करत होते. पण जे काही काम होतं ते करताना ते अगदी एकाग्र झाल्याचे दिसत होते.

सेल्डनने ते काय करताय वगैरे विचारलं नाही, कारण भगिनी रेनड्रॉपला अडचणीत टाकणं योग्य नव्हतं. एकतर तिला आपल्याला माहीत नाही असं सांगून शरमिंद व्हायला लागणं किंवा ही माहिती तुमच्यासाठी नाही असं सांगायला लावायचीही वेळ आणायची नव्हती.

ते एका दारातून आत गेले आणि सेल्डनला अगदी सूक्ष्मसा परिचित वास जाणवला. त्याने रेनड्रॉप फॉर्टीथ्रीकडे पाहिलं, पण तिला त्याची जाणीव झाली नसावी. काही क्षणातच त्यालाही त्या वासाची सवय होऊन गेली.

प्रकाशाचा पोत एकदम बदलून गेला होता. त्यातली गुलाबी छटा आणि प्रखरताही कमी झालेली. संधीप्रकाशात सारं काही न्हाऊन निघालेलं, फक्त काही यंत्रांवर स्पॉटलाइट टाकलेला दिसत होता. आणि जिथेजिथे असे स्पॉटलाइट्सहोते तिथेतिथे एखादा बांधव नाहीतर भगिनी बसलेली दिसत होती. काहीजणांच्या डोक्यावर मोतिया प्रकाशाने चमकत असलेले पट्टे बांधलेले दिसत होते. त्यामुळे थोड्याथोड्या अंतरावर प्रकाशाचे ठिपके इतस्ततः कसेही सरकताना, चमकताना दिसत होते.

चालताचालता त्याने चटकन् तिचा चेहरा कडेने पाहून घेतला. त्यावरूनच तेवढा काय तो अंदाज बांधता येत होता. एरवी तिचे मोठे टकले कपाळच त्याच्या नजरेत येत असे. बोडके डोळे, रंगहीन चेहरा. तिला काही व्यक्तित्वच नव्हतं असंच वाटे. जणू ती अदृश्यच होती. इथे बाजूने पाहाताना चेहरेपट्टी काहीतरी थोडीशी नीट दिसली. नाक, हनुवटी, मांसल ओठ, रेखीवपणा, सौंदर्य सारं होतं त्या चेहऱ्यात. जणू तिथल्या मऊसरशा प्रकाशात माथ्यावरचं बोडकं पठार थोडं लोपून गेलं.

तिने केस वाढवले आणि छान वळण दिलं तर किती सुंदर दिसेल ही, तो विचार करीत होता. आणि मग त्याच्या लक्षात आलं, तिचे केस कधीच वाढणार नाहीत. ती आय़ुष्यभर टकलीच राहील.

कां? कां असं करतात हे लोक? सनमास्टर म्हणालेला, यामुळे त्यांना सर्वांना आपण मायकोजेनियन्स आहोत हे कायमचं लक्षात राहातं. कशासाठी याला इतकं महत्त्व... टकलेपणाची विद्रूपता ही कुणाच्या अस्मितेचे चिन्ह कशी काय होऊ शकते?

मग दोन्ही बाजूंनी विचार करण्याच्या त्याच्या अंगवळणी सवयीनुसार तो मनात म्हणाला, रूढी हा अखेर स्वभावाचाच भाग बनून जात असावा. टकलाची

सवय अशी मुरून गेल्यानंतर माथ्यावरचे केस म्हणजे भयंकरच वाटत असतील, अगदी घृणास्पद. तो स्वतःही तर रोजच्या रोज दाढी करायचा. जरासे खुंट वाढले तरीही नकोसं वाटत असे. पण आपला चेहरा केशविहीन आहे आणि हे अनैसर्गिक आहे असा विचार कधीही त्याच्या मनात आला नव्हता. अर्थात दाढी कधीही वाढवता येते, पण तशी ती वाढवावी अशी त्याला कधी इच्छा झाली नव्हती. अनेक ग्रहांवरील जगांतून पुरुष दाढी काढत नाहीत हे त्याला माहीत होतं. काही ठिकाणीतर लोक थोडाही आकार न देता दाढी वाट्टेल तशी वाढू देत. त्याचा केशविहीन चेहरा, हनुवटी, गाल, ओठ पाहिले तर ते लोक काय विचार करतील?

एकीकडे तो रेनड्रॉपबरोबर चालत होता. वाट संपतच नव्हती. क्वचित कधीतरी ती त्याचं कोपर धरून योग्य दिशेला वळवून नेत होती. आता घाईघाईने हात काढून घेणंही बंद झालेल. तिला सवय झाली असावी. कधीकधी एक पूर्ण मिनिटभरही तिचा हात त्याच्या कोपरावर रहात होता.

“इकडे या! या बाजूला!” ती अचानक म्हणाली.

“काय आहे ते?” सेल्डनने विचारलं.

ते उभे होते एका लहानशा ट्रेसमोर. त्यात दोन सेंटिमीटर व्यासाचे गोळेगोळे होते. तो ट्रे एका बांधवाने नुकताच तिथे ठेवलेला. त्याने त्यांच्या दिशेला प्रश्नार्थक मुद्रेने पाहिलं.

रेनड्रॉपने सेल्डनला अगदी कुजुबुजत सांगितलं, “थोडेसे मागून घ्या.”

सेल्डनला कळलं, ती कुणाही बांधवाशी स्वतःहून बोलू शकत नव्हती. मग त्यानेच जरासं चाचरत विचारलं, “आम्ही यातले थोडे घेऊ का, बांधवा?”

“अगदी. ओंजळभर घे, बांधवा.” तो प्रसन्नपणे उत्तरला.

सेल्डनने त्यातला एक गोळा उचलला आणि रेनड्रॉपकडे देणार तोच त्याला दिसलं की रेनड्रॉपने आधीच त्यात हात घालून अगदी ओंजळभरून गोळे उचलले होते. त्याला मिळालेलं निमंत्रण अर्थताच तिलाही लागू होतं.

ते गोळेगोळे अगदी मुलायम, चकाकणारे होते. ते तिथून निघाले तेव्हा त्याने विचारलं, "हे खायचे असतात का?" त्याने एक गोळा सावकाश उचलून नाकाजवळ नेला.

"त्यांना वास नसतो." ती कडकपणे म्हणाली.

"काय आहे तरी काय ते?"

"फार चवदार असतं ते. कच्चंच खायचं. बाहेर पाठवताना आम्ही त्याला वेगवेगळे सुवास देतो. पण इथे मायकोजेनमध्ये आम्ही ते तसेच खातो. तसेच खायला हवं ते."

तिने त्यातला एक तोंडात घातला. "माझं मन कधीच भरत नाही हे खाऊन."

सेल्डननेही एक गोळा तोंडात सरकवला आणि तो क्षणार्धात विरघळून नाहीसा झाल्यासारखं वाटलं तोंडात. त्याच्या तोंडाचं जणू पाणी झालं आणि तो गोळा सहजपणे घशात उतरला.

तो क्षणभर चकित होऊन उभाच राहिला. थोडीशी गोड चव होती आणि खाली उतरल्यावर अगदी हलकीशी कडवट चवही उरत होती तोंडात. पण त्याला नीटसं कळलं नाही.

"मी आणखी एक घेऊ कां?" त्याने विचारलं.

"सहा घे." रेनड्रॉपने ओंजळ पुढे धरली. "एकासारखी एख चव कधीच नसते त्यांची. आणि त्यात कॅलरीज् काहीच नसतात. फक्त चव."

खरं होतं तिचं. तो पदार्थ त्याने तोंडात घोळवायचा प्रयत्न केला. चाटायचा प्रयत्न केला. एक गोळा चावायचा प्रयत्न केला. पण अगदी काळजीपूर्वक चाटलं तरीही ते नाहीसे होत होते. एक चावा काढल्यावर उरलेला गोळा चुरून जात होता. आणि प्रत्येकाची चव वेगळी- शब्जात न सांगता येण्यासारखी.

"एकच दुःख आहे, कधीतरी एखादी चव अशी सापडते की आपण कधीच विसरू शकत नाही ती. पण ती पुन्हा कधीच मिळत नाही. मी नऊ वर्षाची होते तेव्हा मला एक चव अशी मिळालेली. परत नाही." ती उत्फुल्लपणे सांगत होती. पण अछानक तिच्या चेहऱ्यावरचे हास्य मावळले आणि ती म्हणाली, "चांगलंच आहे ते. त्यामुळे या जगातील सर्व काही किती अशाश्वत आहे याची आठवण रहाते."

त्याला वाटलं, तिने यातून काहीतरी इशारा केला. ते बराच वेळ वाट्टेल तसे भटकत राहिले होते. तिला आता त्याची सवय झालेली आणि ती त्याच्याशी बोलत होती. आणि आता संवाद एका विशिष्ट टप्प्यावर येऊन ठेपला होता. आत्ता!

४४-

सेल्डन म्हणाला, "मी ज्या जगातून आलो आहे, ते जग खुल्या आभाळाखाली आहे. सगळ्याच ग्रहांवरच्या जगात असंच आहे. ट्रॅन्टॉर हा अपवाद. पाऊस पडतो, नाही पडत. नद्या सुकतात, पुराने फुसांडतात, तपमान प्रचंड वाढतं किंवा अगदी खाली जातं. याचा अर्थ पिकाचा हंगाम चांगला असतो किंवा नसतोही. इथे वातावरण पूर्णतः नियंत्रित आहे. पीक चांगलं येणारच याची खात्री असतेच. मायकोजेन खरंच फार सुदैवी आहे."

तो थांबून राहिला. अनेक प्रत्युत्तरे संभवत होती आणि त्याची पुढली कृती काय असेल ते त्यावरच ठरणार होतं.

आता ती बऱ्याच मोकळेपणाने बोलत होती आणि त्याच्या पुरुष असण्याचे भय नाहीसे झाले होते. त्यांच्या या भटकंतीतून एक उद्देश तरी साध्य झाला होता.

रेनड्रॉप फोर्टीथ्री म्हणाली, "वातावरणावर नियंत्रण ठेवणं तेवढं सोपं नसतं. क्वचित कधीतरी विषाणूंचा प्रादुर्भाव होतो आणि कधीकधी अनपेक्षितपणे, नको ती म्यूटेशन्स होतात. कधीकधी अख्खीच्या अख्खी सूक्ष्मान्ने नासून खराब होऊन जातात."

"अरे! आश्चर्यच वाटतंय हे ऐकून. आणि मग?"

"मग काय- खराब झालेलं सारं नष्ट करावं लागतं. अगदी नुसता संशय आला खराब झाल्याचा तरीही सगळं फेकून दिलं जातं. ट्रे, टाक्या सगळं जंतुविरहीत करून घ्यावं लागतं. कधीकधी त्यासकट सारं नष्ट करावं लागतं."

"एखाद्या शल्यकर्मासारखंच झालं की-" सेल्डन म्हणाला, "रोग लागलेला भाग काढून टाकायचा."

"होय."

"आणि हे टाळायला तुम्ही काय करता?"

"काय करणार आम्ही? आम्ही सतत कुठली म्युटेशन्स होत आहेत, कुठले विषाणू येत आहेत, अपघाताने काही संसर्ग होतो आहे का, वातावरणात काही फेरफार होत आहेत का याकडे बारकाईने लक्ष ठेवतो. क्वचितच काही चुका होतात. पण झाल्याच तर आम्ही अगदी कडक कृती करतो. त्यामुळे वाईट हंगाम तसे कमी असतात. आणि त्याचे परिणामही तसे मर्यादित रहातात. आमच्या सर्वात वाईट वर्षातही आमच्या उत्पादनातली घट फक्त १२ टक्के इतकीच होती. पण तरीही सर्वांना हाल काढावेच लागले. अगदी खूप काळजीपूर्वक विचार केला अशला

तरीही, आणि अगदी सर्वात पुढारलेल्या कॉम्प्युटर्सवर काम केलं तरीही अनाकलनीय असं जे काही होणार असतं त्याची भकितं करता येतच नाहीत."

सेल्डनच्या अंगावर काटा आला. जणू ती सायकोहिस्ट्रीसंबंधीच बोलत होती. पण ती तर केवळ त्यांच्या छोट्याशा समाजातील सूक्ष्मान्नांच्या उत्पादनाबद्दल बोलत होती... आणि तो या संपूर्ण गॅलॅक्सीच्या बलाढ्य साम्राज्याच्या सर्व कृतींसंबंधी विचार मांडू पाहात होता.

जरा विरस झाल्यासारखाच तो म्हणाला, "पण, सारंच काही अनाकलनीय नाही, आपली काळजी वाहणाऱ्या, आपल्याला मार्ग दाखवणाऱ्या काही शक्ती असतातच."

ती भगिनी एखदम ताठरल्यासारखी झाली. ती त्याला सामोरी झाली. तिचे डोळे जणू त्याला खोलवर निरखून घेत राहिले.

पण तिने विचारलं ते इतकंच, "काय?"

सेल्डनला अस्वस्थ वाटून गेलं, "मला असं वाटतं, की विषाणू आणि म्यूटेशन्सबद्दल बोलताना आपण नैसर्गिक गोष्टींबद्दल बोलतो, म्हणजे निसर्गनियमांना अनुसरून वागणाऱ्या गोष्टींबद्दल बोलतो. पण त्यातून आपण पारलौकिक पातळीवर चालणाऱ्या घडामोडी वगळतो नाही कां? ज्या गोष्टी निसर्गनियमांपार आहेत, किंवा निसर्गनियमांवर प्रभाव टाकू शकणाऱ्या एखाद्या वेगळ्या नियंत्रणाखाली आहेत त्या यातून वगळल्या जातात."

ती त्याच्याकडे टक लावून पाहात राहिली. जणू तो कोणत्याशा वेगळ्याच गॅलॅक्टिक भाषांहून वेगळ्या बोलीत बोलू लागला होता. ती घशातल्या घशात म्हणाली- "काय हे...'

तो बोलत राहिला. थोडा अवघडून ज्या शब्दांची ओळख धडपणे त्यालाही नव्हती ते शब्द टाकत राहिला. “तुम्ही कुठल्यातरी वेगळया शक्तीला आवाहन करू शकता··· एखाद्या महाशक्तीला. एखाद्या- मला नाही सांगता येत कुणाला ते.”

रेनड्रॉप फॉर्टीथ्री बोलू लागली तेव्हा तिचा आवाज खालच्या सुरातच होता पण त्यात धिक्काराचा स्वर चांगलाच चढा होता. “मला वाटलंच. मला वाटलंच की तुम्हाला तेच म्हणायचं असणार. पण माझा विश्वास बसत नव्हता. तुम्ही आमच्यावर धार्मिकतेचा आरोप करीत आहात. तसं सरळ का म्हणाला नाहीत? तो शब्द वापरायचं टाळलंत कां?”

ती उत्तराची वाट पाहात राहिली आणि या तिच्या हल्ल्यामुळे बावचळलेला सेल्डन म्हणाला, “कारण मी तो शब्द कधी वापरतच नाही. मी त्याला पारलौकिकतावाद म्हणतो.”

“काय हवं ते म्हणा. त्याचा अर्थ धर्म असाच होतो. आणि आमच्यात धर्म नाही. धर्म टोळीवाल्यांमध्ये असतो. हल-” ती तो शब्द प्रयत्नपूर्वक गिळण्यासाठी थांबली तेव्हा जणू तिची स्थिती गुदमरल्यासारखी झाली होती. तरीही सेल्डनला तो शब्द कोणता असणार ते समजलंच.

ती पुन्हा पूर्ववत झाली. सावकाश बोलू लागली तेव्हा तिचा किनरा आवाजही जरा खालीच होता. ती म्हणाली, “आम्ही धार्मिक लोक नाही. आमचं राज्य याच गॅलॅक्सीत आहे आणि राहील. तुम्ही धार्मिक असाल तर-”

सेल्डनला अचानक सापळयात अडकल्यासारखं वाटलं. या संवादाला हे वळण मिळेल अशी त्याने अपेक्षाच केली नव्हती. त्याने आपला हात उंचावत बचावाच्या पवित्र्यात सांगितलं, “तसं नाही. मी गणिती आहे आणि माझं राज्यही

याच गॅलॅक्सीतलं आहे. तुमच्या रूढी किती कर्मठपणे पाळल्या जातात ते पाहिल्यामुळे मला वाटलं की तुमचं राज्य-"

"तसा विचार मनात आणू नका, टोळीवाले महोदय. आमच्या रूढी कर्मठ आहेत याचं कारण आम्ही चहुबाजूंनी अब्जावधींनी घेरले गेलेले लाखभर लोक आहोत. तुमच्या थव्यांत, कळपांत आम्ही हरवून जाऊ नये म्हणून स्वतःची वेगळी ओळख शाबूत ठेवणं आवश्यक वाटतं आम्हाला. आम्हाला आमच्या केशविहीन डोक्यांमुळे वेगळेपणा मिळतो, आमच्या कपड्यांमुळे मिळतो, आमच्या वर्तनामुळे आणि आमच्या जीवनपद्धतीनेही मिळतो. आम्ही कोण आहोत याचे भान जागे ठेवणे ही आमची गरज आहे. आणि तुम्हा टोळीवाल्यांपेक्षा आम्ही वेगळे आहोत हे तुम्हालाही सतत दिसत राहिले पाहिजे. आम्ही आमच्या मायक्रोफार्म्समध्ये कष्ट घेतो ते तुम्हाला आमचं मोल वाटावं म्हणून. तुम्ही आम्हाला आमच्यावर सोडून द्यावं म्हणून. एवढंच मागणं आहे आमचं- आम्हाला आमच्यावर सोडा."

"तुम्हाला किंवा तुमच्या लोकांना कुठलीही इजा करण्याचा माझा हेतू नाही. मला केवळ माहिती हवी, ज्ञान हवं. इथेच नव्हे तर कुठेही."

"म्हणून तुम्ही आमच्या धर्माची चौकशी करून आमचा अपमान केला? जणू काही जे आम्ही करू शकत नाही त्यासाठी आम्ही कुणा गूढ, अदृश्य आत्म्याला वगैरे पाचारण केलंय..."

"अनेक ग्रहांवरच्या जगांमध्ये अशा पारलौकिक शक्तींवर या ना त्या प्रकारे विश्वास ठेवला जातो. धर्म म्हणा हवं तर. त्यांच्याशी आपले या बाबतीत पटणार नाही, ते जसे विश्वास ठेवण्यात चूक असतील तसे आपणही आपल्या अविश्वासात चुकू शकतो. काहीही असलं तरीही असे विश्वास कुणी बाळगत असतील तरीही

त्यात तिरस्करणीय असं काहीही नाही. आणि माझ्या प्रश्नांमागील हेतू अपमान करण्याचा तर नव्हताच नव्हता.”

पण ती शांत झाली नव्हती. “धर्म!” ती रागाने बोलू लागली. “आम्हाला गरज नाही त्याची.”

आता सेल्डन अगदीच हिंपुटी झाला. या संवादाचा हेतू पराभूत होत होता. रेनड्रॉप फॉर्टीथ्रीबरोबरची सारी भटकंती, बोलणे यातून शून्यच हाती लागले होते.

पण ती पुढे बोलत राहिली, “आमच्याकडे धर्मापेक्षा चांगले काहीतरी आहे. आमच्याकडे इतिहास आहे.”

आणि सेल्डनच्या मनाने जोरदार उसळी घेतली आणि त्याच्या ओठांवर स्मित झळकले.

----

# पुस्तक २

मांडीवर ठेवलेल्या हाताची गोष्ट... हॅरी सेल्डनला त्याच्या सायकोहिस्ट्री विकसित करण्याच्या संशोधनाला वळण देणारा पहिला महत्त्वाचा शोध लागला त्याबद्दलच्या एका गोष्टीचा त्याने असा उल्लेख केला आहे. पण दुर्दैवाने त्याच्या प्रकाशित साहित्यात ही गोष्ट सापडत नाही, त्यामुळे त्याबद्दलचे अंदाज बांधणं निष्फळ आहे. सेल्डनच्या जीवनातील अनेक गूढ, रहस्यमय घटनांतील ही एक आहे इतकेच म्हणता येते.

दीर्घिका ज्ञानकोष

४५

रेनड्रॉप फॉरेटीथ्री सेल्डनकडे रोखून पाहात राहिली. तिचे डोळे विस्फारलेले आणि तिचा श्वास जड येत होता.

"मी इथे थांबू शकत नाही," ती म्हणाली.

सेल्डनने इकडेतिकडे पाहिलं. "आपल्याकडे कुणाचंही लक्ष नाहीये. आपण ज्याच्याकडून ते चवदार गोलगोल घेतले त्यालाही आपल्या येण्यात काही वावगं वाटलं नाही. आपण एक सर्वसाधारण दांपत्य आहोत असंच त्याला वाटलं असणार."

"कारण प्रकाश अंधुक असतो तेव्हा सगळं सारखंच दिसतं. तुम्ही तुमचा आवाज खाली ठेवता तेव्हा टोळीवाल्यांचे वेगळे उच्चार जाणवत नाहीत. आणि मीही शांत असते." आता तिचा आवाज घोगरा येऊ लागला.

“मग आता काय झालं?”

“माझ्यावर ताण आलाय. मी अस्वस्थ झालेय. मला- घाम फुटलाय.”

“कुणाला दिसणार? काळजी नको करू. शांत हो.”

“इथे मी शांत होऊ शकणार नाही. मी लोकांच्या नजरेत आहे तोवर नाहीच.”

“मग कुठे जाणार आपण?”

“इथे विश्रांतीसाठी काही खोल्या आहेत. मी इथे काम केलंय त्यामुळे मला माहीत आहे ते.”

ती भराभर चालत निघाली. सेल्डन पाठोपाठ होता. एक छोटीशी फळी तिथं तिरकी लावलेली. ती नसती तर त्याला त्या अंधुक प्रकाशात ती दिसलीच नसती. तिथे सारख्या अंतराअंतरावर रांगेने दरवाजे होते.

“शेवटच्या दारापाशी जाऊ,” ती पुटपुटली. “रिकामी असली तर ठीक आहे.”

रिकामीच होती ती खोली. छोटासा आय़त चमकत होता आणि त्यावर लिहिलं होतं- नॉट इन युज्. दार किंचित उघडं होतं. रेनड्रॉप फॉर्टीथ्रीने झर्रकन इकडेतिकडे नजर टाकली आणि तिने सेल्डनला आत शिरण्याची खूण केली. त्याच्या मागोमाग ती आत आली. तिने दरवाजा लावून घेतला. दार लागताच छतावरचा प्रकाश उजळत गेला.

सेल्डन म्हणाला, “आत कुणी आहे हे बाहेरच्यांना कळायची काही सोय आहे?”

“दार लागल्याबरोबर आणि आत प्रकाश उजळल्याबरोबर ते आपोआपच झालं.” ती म्हणाली.

सेल्डनला खोलीमधली हवा हलकेच निश्वासासारखी आवाज करत फिरताना जाणवत होती... पण ट्रॅन्टॉरमध्ये एकही जागा अशी नव्हती की जिथे हा आवाज आणि जाणीव नसेल...

ती खोली फार प्रशस्त नव्हती. पण तिथे एक चांगली गादी घातलेला पलंग होता. अगदी स्वच्छ चादरी होत्या. एक टेबल-खुर्ची होती. एक छोटासा रेफ्रिजरेटर होता, आणि अन्न गरम करण्यासाठी छोट्या हॉटप्लेटसारखं दिसणारं काहीतरी होतं.

रेनड्रॉप फॉर्टीथ्री खुर्चीवर बसली. अगदी ताठ बसून ती स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न करत राहिली.

काय करावं नक्की हे न सुचून सेल्डन उभाच राहिला. तिनेच त्याला- थोडं वैतागतच- कॉटवर बसायला सांगितलं. तो बसला.

रेनड्रॉप फॉर्टीथ्री स्वतःशीच बोलत असल्यासारखी हलकेच म्हणाली, "मी इथे अशी एका पुरुषाबरोबर बसले असं बाहेर कळलं तर माझ्यावर बहिष्कारच टाकतील. अगदी तो साधा टोळीवाला होता हे कळलं तरीही."

सेल्डन पटकन उठून उभा राहिला, "मग नको थांबायला इथे."

"बसा खाली. मी असल्या मनःस्थितीत असताना मी बाहेर जाऊ शकत नाही. तुम्ही मला धर्माबद्दल विचारत होता. तुम्ही नेमके कशाच्या मागे आहात?"

ती पार बदलली होती, हे सेल्डनला जाणवलं. तिचा बुजरेपणा, पुरुषाच्या सोबतीत असतानाचा आखडलेपणा नाहीसा झालेला. डोळे बारीक करून ती त्याच्याकडे रोखून पाहात होती.

"सांगितलं मी तुम्हाला. ज्ञान हवंय मला. मी अभ्यासक आहे. माझा व्यवसाय आहे तो- आणि इच्छाही. लोकांबद्दल मला जाणून घ्यायचं आहे. त्यांचा इतिहास जाणून घेण्यात मला रस आहे. अनेक जगांमध्ये प्राचीन इतिहास म्हणून जे

काही असतं ते झिजून जाऊन केवळ दंतकथांमध्ये, कहाण्यांमध्ये परिवर्तित झालेलं दिसतं. आणि हे सारं त्यांच्या धर्मश्रद्धांमध्ये किंवा पारलौकिकतावादात एकवटतं. पण मायकोजेनमध्ये धर्म नसेल तर-"

"सांगितलं ना- आमच्याकडे इतिहास आहे."

"हो दोनदा सांगितलंस. किती जुना इतिहास ज्ञात आहे तुम्हाला?"

"वीस हजार वर्षे जुना."

"खरंच? आपण मोकळेपणाने बोलू. खराखुरा इतिहास आहे की दंतकथांचे रूप ल्यायलेला इतिहास?"

"खराच इतिहास आहे तो, निःसंशय."

तुला कसं माहीत हा प्रश्न तोंडावर आलेला सेल्डनने आवरला. वीस हजार वर्षे मागचा इतिहास खरंच सत्य असण्याची काय शक्यता होती? तो स्वतः इतिहासतज्ज्ञ नव्हताच, त्यामुळे हे डॉर्सला विचारावं लागलं असतं.

पण त्याला हे कळत होतं की बरीचशी जगं प्राचीन इतिहास माहीत असल्याचा दावा करतात तेव्हा त्यांच्या गाठीशी असते केवळ स्वतःची थोरवी गाणाऱ्या शौर्यकथा आणि नैतिकतेच्या किरकोळ, नाट्यपूर्ण कहाण्या- त्यातलं काहीच संपूर्ण सत्य नसतं. हेलिकॉनवरही हे असंच होतं. पण क्वचितच कुणी हेलिकोनियन अशा गोष्टींच्या ऐतिहासिकतेवर, सत्यावर अविश्वास दाखवताना सापडला असता. सारा खराच इतिहास आहे हे सर्वांनी शपथेवर सांगितले असते. त्यांनी अगदी हास्यास्पद वाटणाऱ्या गोष्टींवरही विश्वास ठेवला होता. हेलिकॉनवरची पहिली शोधमोहीम रंगवून सांगितली जात असे. त्या शोधमोहीमेतल्या लोकांना उडते सरिसृप मिळाल्याच्या कथा होत्या. खरे पाहाता एकाही जगावर मानवाच्या आगमनापूर्वी उडते सरिसृप असल्याचे पुरावे मिळाले नव्हते.

मग तो एवढंच म्हणाला, "या इतिहासाची सुरुवात कुठून होते?"

त्या भगिनीची दृष्टी जणू दूर अंतराळात खिळली... ती सेल्डनकडे पाहात नव्हती, खोलीतल्या कोणत्याही वस्तूकडे पाहात नव्हती. ती म्हणाली, "त्याची सुरुवात होते आमच्या जगाकडून. एकमेव जग."

"एकमेव?" सेल्डनला आठवलं, ह्युमिननेही मानवाच्या मूळ एकमात्र जगाबद्दलच्या दंतकथांचा उल्लेख केला होता.

"एकमेव जग. नंतर बरीच आली मागोमाग. पण आमचं जग हे पहिलं होतं. एकमेव जग... भरपूर मोकळं अवकाश, खुली हवा, आणि सर्वांसाठी पुरेशी जागा असलेलं, सुपीक मातीचं, शेती करणारं, उबदार घरकुलं, प्रेमळ कुटुंबांचं जग. हजारो वर्षं आम्ही तेथे राहिलो. आणि मग मात्र आम्हाला ते सोडावं लागलं. इथेतिथे जागा शोधत फिरावं लागलं. किती जागा सोडल्या किती अवहेलना सहन केली... अखेर या इथे ट्रॅन्टॉरच्या एक कोपऱ्यात येऊन पडलो आहोत, जिथे आम्ही अन्न तयार करायला शिकलो. आणि आता कुठे थोडी स्थिरता आणि सुरक्षा मिळवली आहे आम्ही. आणि इथे- या मायकोजेनमध्ये आम्ही आमच्या पद्धतीने जगतो आहोत, आमची स्वप्ने साकार करतो आहोत."

"आणि तुमचा इतिहास मूळ जगाचे सारे तपशील सांगतो? त्या एकमेव जगाचे तपशील?"

"हो तर, सारं काही आमच्या पुस्तकात आहे आणि ते आमच्याजवळ असतं. प्रत्येकाकडे असतं. आम्ही ते सतत बरोबर वागवतो. कधीही कुणालाही त्यातलं काहीही काढून वाचावंसं वाटलं तर ते हाताशी असतं. आपण कोण आहोत याचा विसर पडू देत नाही आम्ही स्वतःला. कधी ना कधीतरी आपण आपलं जग पुन्हा मिळवू असा निश्चय आमच्या मनात सतत जागा असतो."

“ते तुमचं जग कुठे आहे, आणि आता तिथे कोण रहातं माहीत आहे तुम्हाला?”

रेनड्रॉप फॉर्टीथ्री जराशी थबकली, आणि मग जोरात मानेला झटका देत उत्तरली, “नाही माहीत, पण केव्हा ना केव्हा आम्हाला सापडेल ते.”

“आणि ते पुस्तक आत्ताही तुमच्याजवळ आहे?”

“अर्थातच.”

‘मला पाहायला मिळेल?”

आता तिच्या चेहऱ्यावर एक पुसटसं हास्य उमटलं. ती म्हणाली, “अच्छा, तुम्हाला ते हवंय तर. मला एकटीला घेऊन मायक्रोफार्म्समधून फिरवायला सांगितलंत तेव्हाच मला वाटलं, की तुम्हाला काहीतरी वेगळंच हवं आहे.” ती आता थोडीशी अवघडली होती. “पण पुस्तक हवं असेल असं नव्हतं वाटलं मला.”

“मला फक्त तेवढंच पुरे.” सेल्डन सच्चेपणाने म्हणाला, “माझ्या मनात दुसरंतिसरं काहीही नव्हतं. मला दुसरं काही हवं असेल असं वाटून तुम्ही मला इथे आणलं असलंत तर-”

तिने त्याला वाक्य पुरं करू दिलं नाही.

“आता आलोच आहोत इथे. तुम्हाला ते पुस्तक हवंय की नकोय?”

“मला तुम्ही ते पाहायला देणार?”

“एका अटीवर.”

सेल्डन थबकला, काही फार मोठा बखेडा तर उभा रहायचा नाही ना यातून. या भगिनीची भीड जरा जास्तच चेपलेली दिसत होती. त्याच्या अपेक्षेहून खूपच जास्त.

"कसली अट?"

रेनड्रॉप फॉर्टीथ्रीने जीभ बाहेर काढून ओठांवरून फिरवली. आणि मग थरथरत्या आवाजात ती म्हणाली, "तुमची ती स्किनकॅप काढा."

४६-

हॅरी सेल्डन रेनड्रॉप फॉर्टीथ्रीकडे कोऱ्या नजरेने पाहातच राहिला. एक निमिषभर त्याला ती काय बोलतेय ते कळलंच नव्हतं. तो आपल्या डोक्यावरची ती चामडी टोपी विसरून केला होता.

मग त्याने आपला हात डोक्याकडे नेला आणि प्रथमच ती टोपी जाणीवपूर्वक हाताळून पाहिली. हाताला स्पर्श तुळतुळीतच होत होता. पण खाली असलेल्या केसांची हलकीशी जाणीव होत होतीच. फार नाही. त्याचे केस तसे पातळ होते आणि मऊही.

डोक्यावरून हात फिरवतच त्याने विचारलं, "कां?"

ती उत्तरली, "माझी इच्छा आहे. तीच अट आहे पुस्तक बघू द्यायला."

तो म्हणाला, "वेल, तुमची खरंच तशी इच्छा असेल तर..." त्याने चाचपत टोपीची कड पकडायचा प्रयत्न केला.

पण ती म्हणाली, "मला करू दे." ती त्याच्याकडे जणू अधाशीपणे पाहात होती.

सेल्डनने आपला हात खाली आणला आणि मांडीवर ठेवला. "करा मग."

ती भगिनी झटकन उठून त्याच्या शेजारी कॉटवर बसली. अगदी सावकाश, काळजीपूर्वक तिने त्याची टोपी कानाच्या वरच्या बाजूला उलगडली. तिने

ओठांवरून पुन्हा एकदा जीभ फिरवली आणि टोपी पूर्ण निघून उलट करेपर्यंत तिचा ऊर धपापू लागला होता. टोपी निघाल्यावर सेल्डनचे केस जणू सुटकेच्या आनंदात किंचित लहरले.

तो जरासा शरमून म्हणाला, “टोपीच्या खाली दडपून राहिल्यामुळे जरा घामट झाले असणार केस. डोक्यात घाम आलाय.”

त्याने केस ओलसर आहेत का पाहायला डोक्याकडे हात नेला, पण तिने त्याचा हात पकडून मागे नेला, “मला पाहू दे.” ती म्हणाली, “अटीचा भागच आहे तो.”

तिची बोटं हळुहळू, सावधपणे त्याच्या केसांवर फिरली आणि मग ती थांबली. पण पुन्हा परत तिने अगदी हळुवारपणे केसांवर थोपटलं.

“कोरडेच आहेत,” ती म्हणाली, “त्यांचा स्पर्श... छान वाटतोय.”

“या पूर्वी कधीच डोक्यावरच्या केसांना हात लावलेला नाही तुम्ही?”

“लहान मुलांच्या केसांना लावलाय क्वचित. पण हे... वेगळं आहे.” ती पुन्हा केसांतून हात फिरवत होती.

“ते कसं?” अवघडल्यासारखं वाटत असतानाही सेल्डनची उत्सुकता त्याला गप्प बसू देत नव्हती.

“सांगू नाही शकत. काहीतरी- वेगळं आहे खरं.”

काही वेळाने तो म्हणाला, “झालं समाधान?”

“नाही. घाई करू नका. तुम्ही आपले केस हव्या त्या दिशेने वळवू शकता?”

“नाही खरं. नैसर्गिक एक वळण आहे, पण त्यासाठीही कंगवा लागतो. आणि आत्ता तो नाहीये माझ्याजवळ.”

“कंगवा?”

“हं- म्हणजे असं... बारीक दाते असलेलं एक- जेवण्याच्या काट्यासारखं साधन असतं. फक्त त्याला जरा जास्त काटे- म्हणजे दाते असतात आणि ते अगदी जवळजवळ असतात, आणि कडक नसतात तितकेसे.”

“हाताची बोटं नाही का वापरता येत?” हे विचारताना तिची बोटं त्याच्या केसांतून फिरू लागली होती.

तो उत्तरला, “हं, चालतं. पण तेवढंसं नीट होत नाही ते.”

“मागच्या बाजूला किती टोचरे आहेत केस.”

“तिथे बारीक कापलेले असतात ना.”

रेनड्रॉप फॉर्टीथ्रीला काहीतरी आठवलं, “हां... भुवया.” ती म्हणाली, “भुवयाच म्हणतात ना?” तिने भुवयांवरच्या पट्ट्या ओढून काढल्या आणि मग उलट बाजूने त्यावरून बोट फिरवत नेलं.

“छान आहे हे,” ती हसत सुटली. तिच्या धाकट्या बहिणीच्या खुदखुदण्यासारखंच होतं ते हसू, “गोड वाटतंय...”

सेल्डन जरासा वैतागून म्हणाला, “तुमच्या या अटीत आणखी काही बाकी आहे कां?”

तिथल्या मंद प्रकाशात, रेनड्रॉप फॉर्टीथ्री पाहात राहिली. वाटलं क्षणभर ती हो म्हणायचा विचार करतेय की काय, पण ती काहीच बोलली नाही. मग तिने अचानक त्याच्या भुवयांवरून फिरणारा हात नाकाशी नेला. कसला वास येत असेल तिला, सेल्डनला प्रश्न पडला.

“किती विचित्र.” ती म्हणाली, “मी... मी पुन्हा कधीतरी- पुन्हा असं केलं तर चालेल कां?”

सेल्डन अवघडूनच उत्तरला, “ते पुस्तक मला नीट अभ्यासायला पुरेल इतक्या वेळासाठी दिलंत तर कदाचित्...”

रेनड्रॉप फॉर्टीथ्रीने कर्टलच्या आतल्या बाजूला हात घालून छुप्या खिशातून एक पुस्तक काढलं. चांगल्या चिवट बांधणीतलं पुस्तक होतं ते. त्याने आपला आनंद लपवत ते हातात घेतलं.

सेल्डन केसावर पुन्हा कातडी टोपी चढवू लागला तेवढ्यात रेनड्रॉप फॉर्टीथ्रीने आपला हात पुन्हा नाकाशी नेला आणि मग अगदी हलकेच, झटकन तिने आपलं बोट किंचित चाटलं.

४७-

“केसाला हात लावला तुझ्या?” डॉर्स वेनाबिली म्हणाली. ती सेल्डनकडे अशी बघत होती जणू तिच्याही मनात त्याच्या केसाला हात लावण्याची इच्छा होती.

सेल्डन जरासा बाजूला सरकला. “आता तू नको. त्या बाईने हात लावला ते मला इतकं विकृत वाटलं...”

“तिच्या दृष्टीने तो नक्कीच विकृत स्पर्श असेल. तुला त्यातून काहीच आनंद मिळाला नाही म्हणतोस?”

“आनंद? अंगावर काटा येत होता माझ्या. ती अखेर थांबली तेव्हा माझा श्वास पूर्ववत झाला. म्हटलं आता आणखी कोणत्या अटी घालणार ही बाई?”

डॉर्स हसली. “ती तुझ्यावर जबरदस्ती करील अशी भीती होती? की आशा?”

“अरे बाबा, मी काही विचारच करत नव्हतो. मला फक्त ते पुस्तक हवं होतं.”

आता ते आपल्या खोलीत होते आणि डॉर्सने बाहेर कुणाला काही ऐकू जाऊ नये म्हणून फील्ड डिस्टॉर्टर लावला होता.

मायकोजेनियातील रात्र नुकतीच सुरू झालेली. सेल्डनने टोपी काढून टाकली, कर्टल काढून टाकला. आंघोळ केली आणि केस अगदी नीट फेस करकरून दोनदा धुवून टाकले. मग तो कपाटात मिळालेला हलकासा नाईटगाऊन घालून कॉटवर बसला.

डॉर्सचे डोळे खट्याळ नाचरेपणाने चमकत होते. “तुझ्या छातीवर केस आहेत हे तिला माहीत होतं का?”

“असं काही तिच्या डोक्यात येऊ नये अशी मी आशा करत होतो.”

“बिचारा हॅरी. अगदी स्वाभाविकच होतं हे सारं. आता मी एखाद्या बांधवाबरोबर गेले असते तर मलाही असाच काही त्रास झाला असता... उलट जास्त वाईट होऊ शकलं असतं, कारण त्याला असं वाटलं असतं की मायकोजेनियन पद्धतींनुसार मी त्याच्या आज्ञा ताबडतोब पाळायला हव्यात.”

“नाही नाही, डॉर्स. तुला ते अगदी स्वाभाविक वगैरे वाटतंयय खरं, पण तू अनुभव नाही घेतलास. त्या बिचाऱ्या बाईची अवस्था वाईट होती. ती इतकी उत्तेजित झालेली... सगळ्या संज्ञा कामाला लावून तिने तो जो काय होता तो अनुभव घेतला. तिने केसांतून फिरलेल्या बोटांचा वास घेतला, ती चाटून पाहिली. केस वाडताना आवाज होतो सांगितलं असतं तर ती कान देऊन ऐकतही राहिली असती.”

“मी नैसर्गिक म्हणतेय ते याचसाठी. ज्या ज्या गोष्टीवर बंदी येते ती गोष्ट लैंगिक आकर्षणाचा भाग बनते. ज्या समाजात स्त्रीचे स्तन उघडेच टाकायची पद्धत आहे तिथे जगत असतास तर तुला स्त्रियांच्या स्तनांबद्दल फार काही आखर्षण वाटलं असतं कां?”

“मला वाटलं असतं बहुतेक.”

“पण ते लपवलेले असताना- बहुतेक समाजात प्रथा आहे तसंच- जास्त आकर्षण वाटेल नाही कां? ऐक मी तुला सांगते एक अनुभव. सिन्नावर असताना घडलेला किस्सा. मी सिन्नामध्ये असताना एका रिसॉर्टला गेले होते. तुमच्या हेलिकॉनवरही असतीलच ना- समुद्रकिनाऱ्यावरले रिसॉर्ट्स वगैरे?”

“अर्थातच.” सेल्डन जरासा वैतागून म्हणाला, “तुला हेलिकॉन म्हणजे वाटलं तरी काय- फक्त दगडाधोंड्यांचा आणि पर्वतांचा प्रदेश वाटला की काय? फक्त प्यायला पाणी विहिरींचं असतं असं वाटलं?”

“रागवू नकोस, हॅरी. तुला मुद्दा कळला पाहिजे एवढंच महत्त्वाचं. आमच्या सिन्नाच्या समुद्रकिनाऱ्यांवर आम्ही अंगावर काय घालतो, घालत नाही वगैरेबाबत चांगलेच बेफिकीर असतो.”

“नागडं फिरण्याचे किनारे?”

“तसंच काही नाही. पण समजा एखाद्याने सगळेच कपडे काढून टाकले तरीही फार काही वाटणार नाही कुणाला. कमीत कमी कपडे घालावेत अशा सभ्यतेची अपेक्षा असते. पण आम्ही जे सभ्य समजतो त्यातून फार काही झाकलं जात नाही खरं.”

सेल्डन म्हणाला, “आमच्याकडे हेलिकॉनमध्ये जरा जास्त झाकपाक सभ्य समजली जाते.”

“तू मला ज्या बारकाईने वागवतोस त्यावरून कळतंय मला ते. पण ज्याचं त्याच्याकडे. तर सांगत काय होते- मी अशीच एका छोट्याशा तलावाच्या काठावर बसले होते. आणि त्याच दिवशी ओळखीचा झालेला एक तरुण माझ्याकडे आला. भला मुलगा होता- मला काही वावगं वाटलं नाही. तो माझ्या खुर्चीच्या हातावर बसला आणि त्याने जरा सावरून बसताना त्याचा उजवा हात माझ्या डाव्या मांडीवर ठेवला. मांडी अर्थातच उघडी होती.

“थोडा वेळ बोलत होतो आम्ही. आणि मग तो खोडकरपणे हसत म्हणाला, बघ, माझी तुझी नीट ओळखही नाही. आणि तरीही मी तुझ्या मांडीवर हात ठेवून बसलोय हे मला अगदी साधंसरळ वाटतंय. एवढंच काय तुलाही ते स्वाभाविक वाटतंय. मी हात असाच ठेवून दिला तरीही तुला त्यात काही वावगं वाटणार नाहीसं दिसतंय.

“तेव्हा कुठे माझ्या लक्षात आलं की त्याचा हात माझ्या मांडीवर आहे असं. एवढ्या लोकांत अंग उघडं टाकण्याने मला वाटतं त्यातलं सुप्त लैंगिक आकर्षण वगैरे कमी होत असावं. मी म्हटलं तसं- ते लपवणं अधिक कळीचं आहे.

“आणि त्या मुलालाही तसंच वाटलं असणार. कारण तो पुढे म्हणाला, ‘आणि तरीही, एखाद्या औपचारिक ठिकाणी तू मला भेटलीस तर- तू गाऊन वगैरे घातला असशील तर तू मला तुझा गाऊन वर करून मांडीवर- आत्ता जिथे आहे तिथे हात ठेवू देणार नाहीस.’

“मी हसले आणि आम्ही इतर गप्पा मारू लागलो. पण अर्थात, आता हात मांडीवर असल्याची एवढी चर्चा झाल्यानंतर त्याला हात तसाच ठेवणे योग्य वाटले नाही. आणि त्याने हात दूर केला.

“त्या रात्री मी डिनरसाठी छान काळजीपूर्वक नटले, कपडे केले. तिथे आलेल्या इतर स्त्रियांपेक्षा मी जरा जास्तच सजलेले. मला तो मुलगा तिथे दिसला. तो एका टेबलपाशी होता. मी जाऊन त्याला भेटले. आणि म्हणाले, ‘हे बघ. आलेय मी गाऊन घालून. पण गाऊन खाली माझी मांडी उघडीच आहे. गाऊन वर कर आणि तुझा हात माझ्या मांडीवर तिथेच ठेव. मी तुला परवानगी देतेय.’

“त्याने प्रयत्न केला. सगळे लोक बघत असतानाही त्याने धाडस दाखवलं, कबूल करायला हवं त्याचं धाडस. मी त्याला थांबवलंही नसतं. आणि बाकी कुणीही थांबवलं नसतं अशी खात्री आहे माझी. पण त्याला नाही शक्य झालं ते. आधीच्या प्रसंगात जेवढे लोक आसपास होते तेवढेच आताही होते. आणि मी पुढाकार घेतला होता, माझी हरकत नव्हती हे स्पष्ट होतं. पण तरीही समाजमान्य वर्तनाच्या मर्यादा ओलांडून काही करणे त्याच्याच्याने झाले नाही. दुपारी जी परिस्थिती मांडीवर ठेवलेल्या हाताच्या वेळी होती ती आता नव्हती इतकाच फरक होता. तर्कसुसंगत काय होतं त्यापेक्षा ही परिस्थितीसापेक्षता महत्त्वाची होती.”

सेल्डन म्हणाला, “मी नक्कीच ठेवला असता हात तुझ्या मांडीवर.”

“नक्की का?”

“अगदी.”

“तुमच्याकडे सभ्यतेच्या झाकपाक मर्यादा आमच्यापेक्षा जास्त आहेत तरीही?”

“होय.”

डॉर्स स्वतःच्या कॉटवर पसरली आणि तिने हात डोक्यामागे घेतले. “म्हणजे आता मी नाइटगाऊनच्या खाली आतमध्ये पार काही घातलेलं नाही यामुळे तुला फार काही त्रास होत नाहीये ना?”

“मला धक्का वगैरे तर नक्कीच बसलेला नाही. आणि त्रासाचं म्हणशील तर, त्रासाची व्याख्या काय यावर बरंचसं अवलंबून आहे. तू काय कपडे घातले आहेस-नाहीस याची मला जाणीव तर नक्कीच आहे.”

“वेल, या इथे लहानशा जागेत आपण बराच काळ एकत्र रहाणार असलो तर मग असल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करायला शिकावं लागेल.”

“किंवा त्याचा फायदा उचलावा लागेल.” सेल्डन म्हणाला, “आणि मला तुझे केस आवडतात. दिवसभर तुला टकली बघितल्यानंतर, मला तुझे केस फारच आवडत आहेत.”

“वेल, त्यांना हात लावू नकोस. मी अजून धुतलेले नाहीत ते.” तिने डोळे झाकून घेतले. “मस्तच आहे हे, तू सभ्यतेची औपचारिक आणि अनौपचारिक पातळी वेगवेगळी करू टाकलीस. तू म्हणतोस की हेलिकॉनवर अनौपचारिक पातळीवर सभ्यता अधिक पाळली जाते आणि औपचारिक पातळीवर ती जरा अधिक ढिली होऊ शकते. बरोबर?”

“खरं म्हणजे मी केवळ तुझ्या मांडीवर हात ठेवणाऱ्या त्या तरुणाच्या आणि माझ्या संदर्भापुरतंच बोलत होतो. आपण दोघे सिन्ना किंवा हेलिकॉनचे कितपत प्रतिनिधीत्व करतो वगैरे मला ठाऊक नाही. दोन्ही जगांतल्या काही व्यक्ती अगदी परिपूर्ण असतील काही अगदी चक्रम असतील अशी कल्पना मी करू शकतो.”

“आपण सामाजिक दबाव-दडपणांबद्दल बोलतो आहोत. मी काही फार मोठी गॅलॅक्टिक प्रवासी आहे असं नाही. पण मी सामाजिक इतिहासाबद्दल बराच विचार करते. डिरौड या ग्रहावर काही काळ असा होता- जेव्हा मुक्त विवाहपूर्व शरीरसंबंध अगदी समाजमान्य होते. अविवाहित लोकांना कितीही लोकांशी शरीरसंबंध ठेवता येत असत. आणि सार्वजनिक जागांमध्ये सेक्स करण्याला केवळ

त्यामुळे ट्रॅफिक अडली तरच नावे ठेवली जात असत. आणि तरीही लग्न झाल्यानंतर मात्र एकपत्नित्व अगदी कठोरपणे पाळलं जात असे. अजिबात तडजोड नाही. असं म्हणतात, की सेक्सविषयीच्या सर्व रम्य कल्पना प्रत्यक्षात आणून झाल्यानंतर मग लोक आयुष्य गांभीर्याने जगायला सुरुवात करत असत."

"तसं खरंच होत होतं?"

"तीनशे वर्षांपूर्वी ही प्रथा बंद झाली. पण माझे काही सहकारी म्हणतात की इतर जगांकडून दबाव आल्यामुळे ते थांबवलं गेलं. कारण या एका कारणामुळे डेरौडमधला पर्यटनाचा उद्योग फारच धंदा खेचू लागला. अखेर संपूर्ण गॅलॅक्सीतला दबाव विचारात घ्यावा लागतोच."

"किंवा या बाबतीत, आर्थिक दबाव."

"कदाचित्. आणि मी विद्यापीठात असल्यामुळे मला सामाजिक दडपणांचा अभ्यास करता येतो. गॅलॅक्टिक प्रवास न करताही. ट्रॅन्टोरच्या आतल्या नि बाहेरच्या जागांतून आलेल्या अनेक लोकांना मी भेटू शकते. सगळ्या समाजशास्त्र विभागातला लाडका उद्योग आहे हा- सामाजिक दडपणांचा तुलनात्मक अभ्यास.

"इथे उदाहरणार्थ, मायकोजेनमध्ये, मला असं दिसतं की सेक्स करण्यावर फार कडक नियंत्रणं असावीत. अगदी कठोर नियम पार पाडल्यानंतरच परवानग्या मिळत असतील. त्यावर चर्चा वगैरे होत नसल्यामुळे नियमांची अंमलबजावणीही तशीच कडक असणार. स्ट्रीलिंगच्या प्रभागातही सेक्सवर चर्चा होत नाही, पण त्याला विरोधही नसतो. जेनाट प्रभागात, मी एखदा एक आठवडा राहिलेले अभ्यासासाठी- तिथे लोक सतत सेक्सवर चर्चा करतात आणि सेक्सचा एकंदरीत धिक्कार करतात. मला नाही वाटत... ट्रॅन्टोरवर किंवा ट्रॅन्टोरबाहेरच्या कोणत्याही दोन प्रभागांत सेक्ससंबंधी अगदी तंतोतंत जुळणारे दृष्टीकोन असतील."

सेल्डन म्हणाला, “तू जे बोलतेस ते कसं वाटतं माहीतीये? असं वाटेल की जणू-”

“मी सांगते कसं वाटेल ते. हे सगळं सेक्सबद्दल बोलल्यानंतर एक गोष्ट माझ्या मनात अगदी स्पष्ट आहे, मी तुला यानंतर कधीही माझ्या नजरेआड होऊ देणार नाही.”

“काय?”

“मी तुला एकट्याने दोनदा जाऊ दिलं. पहिल्यावेळी माझाच अंदाज चुकला म्हणून. आणि दुसऱ्यावेळी तू मला भाग पाडलंस म्हणून. दोन्ही वेळा चूकच झाली. पहिल्या वेळी काय झालं ते तुला माहीत आहे.”

सेल्डन सात्विक संतापाने म्हणाला, “पण दुसऱ्या वेळेला मला काहीही झालं नाही ना...”

“जवळपास तू अडचणीत आलाच असतास. भगिनीशी सेक्स करताना पकडला गेला असतास तर?”

“त्यात काहीही सेक्शुअल नव्हतं-”

“तूच म्हटलास की ती भयंकर उत्तेजित झाली होती.”

“पण-”

“चूक होतं ते. हॅरी, तुझ्या डोक्यात हे नीटच शिरवून घे. आजपासून पुढे तू कुठेही माझ्याशिवाय एकटा जाणार नाहीस.”

“हे बघ,” सेल्डन गोठवणाऱ्या स्वरात म्हणाला, “माझा हेतू होता, मायकोजेनियन इतिहासाचा शोध घेणे. आणि तू म्हणतेस त्या तथाकथित सेक्शुअल भेटीगाठीतून- मला पुस्तक मिळालं- ते पुस्तक.”

“हां ते पुस्तक! खरंच की- ते पुस्तक मिळालं नाही कां. बघूया तरी.”

सेल्डनने ते पुस्तक पुढे केलं आणि डॉर्सने विचारमग्न होत ते हाती घेतलं.

ती म्हणाली, “याचा फार काही उपयोग होईल असं वाटत नाही. मी पाहिलेल्या कोणत्याही प्रोजेक्टरवर हे पुस्तक बसण्यासारखं नाही. म्हणजे आपल्याला मायकोजेनियन प्रोजेक्टरच लागेल आणि तो कशासाठी हवा याचं कारण आपल्याला द्यावं लागेल. मग त्यांना कळेल की तुझ्याकडे हे पुस्तक आहे. आणि मग अर्थातच ते तुझ्याकडून पुस्तक काढून घेतील.”

सेल्डन हसला, “तुला जे गृहीत धरलं आहेस ते योग्य असेल तर तू काढलेलं तात्पर्य योग्य असेल. पण हे पुस्तक तुला वाटतंय तसलं पुस्तक नाही. हे प्रोजेक्ट करून वाचण्याचं पुस्तक नाही. त्यातला मजकूर पानांवर छापलेला आहे. आणि पानं एकेक करून उलटावी लागतात. रेनड्रॉप फॉर्टीथ्रीने मला एवढं नक्कीच समजावून सांगितलं.”

“छापलेलं पुस्तक!” डॉर्सला धक्का बसलेला की गंमत वाटलेली सांगता आलं नसतं, “ही तर अश्मयुगीन गोष्ट आहे.”

“साम्राज्यपूर्व काळातलं नक्कीच.” सेल्डन म्हणाला, “पण अगदी तसंच नाही. तू यापूर्वी कधी छापलेलं पुस्तक पाहिलं आहेस?”

“मी इतिहासतज्ज्ञ आहे, हॅरी. नक्कीच पाहिलंय.”

“याच्यासारखं दिसणारं?”

डॉर्सने पुस्तकाची पाने उलगडली. एक पान, मग दुसरं, मग तिसरं. “हे तर कोरंय.” ती म्हणाली.

“कोरं आहे असं वाटतं. मायकोजेनियन्स अगदी जुनाट आहेत. पण अगदी टोकाचे नाहीत. ते जुनाटपणाचा आविर्भाव जपतात. पण आवश्यक तिथे, सोयीचं असेल तिथे आधुनिक तंत्रज्ञान वापरतात. काय सांगावं?”

“शक्य आहे, हॅरी, पण तू नेमकं काय म्हणतो आहेस? मला कळलं नाही.”

“ही पानं कोरी नाहीत. त्यावर अगदी सूक्ष्म अक्षरांतला मजकूर आहे. दे ते पुस्तक इकडे. हे बघ, या कडेच्या आतल्या बाजूला हे बारीकसं टोक आलंय. ते दाबलं की- बघ आता.”

पुस्तकाच्या त्या पानावरच्या ओळी अचानक स्पष्ट दिसू लागल्या आणि वरवर सरकू लागल्या.

सेल्डन म्हणाला, “हा वर सरकण्याचा वेग आपल्याला कमीजास्त करता येतो. आपल्या वाचनाच्या वेगानुसार हे टोक मागेपुढे वळवायचं. आपण वाचत खाली पोहोचलो की अगदी वरच्या बाजूची ओळ खाली जाते आणि बंद होते. मग आपण पुढल्या पानावर जायचं.”

“यासाठी ऊर्जेचा पुरवठा कुठून होतो?”

“त्यात एक मायक्रोफ्यूजन बॅटरी लावलेली असते. पुस्तकाचं आयुष्य असेपर्यंत ती रहाते.”

“आणि ती संपली की?”

“फेकून द्यायचं पुस्तक. कधीकधी त्याआधीच पुस्तक फेकावं लागेल. झिजूनमोडून जाऊ शकतं ते. मग दुसरी प्रत घ्यायची. बॅटरी बदलायची गरजच नाही.”

डॉर्सने पुन्हा एखदा पुस्तक उलटपालटं करत निरखून पाहिलं. ती म्हणाली, “या असल्या पुस्तकाबद्दल कधीच ऐकलं नव्हतं बुवा.”

“मीही नाही ऐकलं. सगळी गॅलॅक्सी दृश्य माध्यमाच्या तंत्रज्ञानात एवढ्या झपाट्याने पुढे गेली की अशी काही शक्यता कुणी अंमलात आणून पाहिलीच नसावी.”

“हे सुध्दा दृश्यच आहे.”

“हो, पण नेहमीसारखं नाही दिसत. अशा पुस्तकाचेही फायदे आहेत. साधं दृश्य पुस्तक जसं दिसतं त्यापेक्षा यात खूप जास्त मावतं.”

डॉर्स म्हणाली, “ते सुरू करायचं टोक कुठेय? हां- बघू दे सुरू करून मला.” तिने एक मधूनच पान उघडलं आणि ओळी वर सरकवायचा वेग नक्की केला. मग म्हणाली, “यातून तुला काहीच मिळणार नाही फारसं, हॅरी. ही गॅलॅक्टिकपूर्व भाषा आहे. पुस्तक नव्हे. लिपी. भाषा...”

“तुला येतेय का ती वाचायला? इतिहासअभ्यासक म्हणून-”

“इतिहासाच्या अभ्यासासाठी मी प्राचीन भाषा शिकलेय पण अगदी जुजबी. ही तर फारच प्राचीन वाटतेय. मला थोडेफार शब्द कळतायत अधेमधे... पण फार उपयोगी नाही पडणार.”

“छानच.” सेल्डन म्हणाला, “खरोखर प्राचीन असेल तर ते उपयोगी ठरेलच.”

“पण वाचताच आलं नाही तर काहीच उपयोग नाही.”

“वाचता येतंय मला,” सेल्डन म्हणाला, “ते दोन भाषांतून आहे. रेनड्रॉप फॉर्टीथ्रीला प्राचीन लिपी वाचता येत असेल असं वाटलं की काय तुला?”

“तिला शिकवलं असेल नीट तर का नाही येणार?”

“कारण मला शंका आहे, की मायकोजेनमधल्या स्त्रियांना घरकामाव्यतिरिक्त काहीही शिकवलं जात असेल! जरा शिक्षित पुरुषांना हे वाचता येत असेल. पण बाकीच्यांना त्याचं भाषांतर लागतच असणार- गॅलॅक्टिकमधलं.” त्याने आणखी एक टोक दाबलं. “आणि हे पहा. हे भाषांतर इथं पुरवलंय.”

“मस्तच की.” डॉर्स कौतुकाने म्हणाली.

“आपल्यालाही या मायकोजेनियन्सकडून शिकता येईल, पण छे.”

“आपल्याला याचं अस्तित्वच माहीत नाही तर-”

“माझा विश्वासच बसत नाही. आता मला समजलंय. तुलाही समजलंय. बाहेरून मायकोजेनमध्ये येणारे कितीतरी प्रवासी असतील. व्यापारासाठी, राजकीय कारणांसाठी. नक्कीच- नाहीतर त्यांच्याकडे या कातडी टोप्या आणि पट्ट्या इतक्या सहज मिळाल्याच नसत्या. कधीतरी कुणालातरी हे पुस्तक दिसलं असणारच. ते कसं वाचता येतं तेही पाहिलं असणार. पण सर्वांनी ते दुर्लक्षित केलं. वेगळं आहे- पण एवढं काय पाहायचं त्यात असा विचार केला?- केवळ ते मायकोजेनियन आहे म्हणून?!”

“पण खरंच ते अभ्यासण्यासारखं आहे कां?”

“अर्थात, सगळंच असतं नीट अभ्यासण्यासारखं. असायला हवं. ह्युमिन बहुतेक या कुतूहलाच्या अभावाला या साम्राज्याच्या अधोगतीचं चिन्ह मानेल.”

त्याने पुस्तक उचललं आणि उत्साहात म्हणाला, “पण मला आहे कुतूहल. मी वाचेन ते. आणि कदाचित त्यातून मला सायकोहिस्ट्रीच्या मांडणीची दिशा सापडेल.”

“आशा ठेवू तशी,” डॉर्स म्हणाली, “पण माझा सल्ला मानशील तर आता तू झोप. आणि सकाळी ताजातवाना असताना भिड त्याला. पुस्तक समोर धरून डुलक्या काढल्यास तर फारसं काही शिकणार नाहीस.”

सेल्डन थबकला आणि मग म्हणाला, “तू म्हणजे एकदम काळजीवाहू मातेच्याच भूमिकेत शिरतेस!”

“तुझ्यावर लक्ष ठेवायचं कामच आहे माझं.”

“पण हेलिकॉनवर माझी आई जिवंत आहे अजून. तू माझी मैत्रीण झालीस तर अधिक बरं वाटेल मला.”

“तू भेटलास त्या दिवसापासून मैत्रीणच तर आहे मी तुझी.”

ती त्याच्याकडे पाहात हसत होती, पण सेल्डनला काय बोलावं कळेना. अखेर तो म्हणाला, “बरं, मग तुझा सल्ला मानतो- मैत्रीण म्हणून... आणि वाचायला घेण्याआधी झोप काढतो.”

त्याने ते पुस्तक दोन कॉट्सच्या मधल्या टेबलवर ठेवायला हात पुढे केला. पण मग विचार बदलत ते त्याने उशीखाली सारलं.

डॉर्स वेनाबिली हलकसंच हसली. “तुझ्याआधी मीच ते वाचून काढीन रात्रीत अशी भीती वाटतेय का तुला?”

“वेल,” सेल्डन जरासा वरमला पण तसं न दाखवता म्हणाला, “असेलही तसं. मैत्रीसुध्दा एवढ्याच मर्यादेपर्यंत ना. हे माझं पुस्तक आहे आणि सायकोहिस्ट्रीही माझीच आहे.”

“मान्य,” डॉर्स म्हणाली, “यावर मी अजिबात वाद घालणार नाही. पण मी तुला थांबवलं तेव्हा तू काहीतरी बोलणार होतास. आठवतंय काय ते?”

सेल्डनने आठवून पाहिलं आणि उत्तरला, “नाही.”

अंधारात त्याच्या मनात फक्त त्या पुस्तकाचाच विचार होता. मांडीवरच्या हाताच्या गोष्टीचा विचार त्याच्या मनात ठरला नाही. तो विसरला होता- निदान जागृत मनाला तरी नक्कीच विसर पडलेला.

४८.

वेनाबिली जागी झाली आणि घड्याळाकडे न बघताही तिला कळलं की रात्र जेमतेम अर्धीच सरली असेल. हॅरीच्या घोरण्याचा आवाज नव्हता यावरून हॅरीची कॉट रिकामी असल्याचं तिला कळलं. बाहेर गेला नसला तर बाथरूममध्ये असणार.

तिने दारावर हलकेच टकटक केली आणि हाक मारली, “हॅरी?”

तो तंद्रीत आतूनच उत्तरला, “ये आत,” आणि ती आत शिरली.

टॉयलेटचं झाकण बंद करून सेल्डन त्यावर बसून पुस्तक वाचत होता. मग तो विनाकारणच म्हणाला, “मी वाचतोय.”

“ते पाहातेय आहे मी. पण कां?”

“झोपच लागत नव्हती. सॉरी.”

“पण इथे बसून का वाचतोयस?”

“दिवा लावला असता तर तुला जाग आली असती.”

“पुस्तकातच प्रकाश येत नाही, पाहिलंस तू?”

"अगदी नक्की. रेनड्रॉप फॉर्टीथ्रीने ते कसं काम करतं ते दाखवलं तेव्हा त्यात दिवा लागण्याचा उल्लेख नव्हता. शिवाय, मला वाटतं ती सोय ठेवली अशती तर बॅटरीची शक्ती त्यातच जास्त खर्च झाली असती. मग ती फार काळ टिकली नसती."

तो जरा हिरमुसलेला दिसत होता.

डॉर्स म्हणाली, "चल आता, बाहेर ये. आता आळेच आहे तर मला वापरू दे बाथरूम."

ती बाहेर आली तेव्हा तो पायावर पाय टाकून, सर्व दिवे लावून वाचत बसला होता.

तिने विचारलं, "एवढा निराश दिसतो आहे तो- पुस्तकातून काही हाती लागत नाहीये की काय?"

त्याने डोळे बारीक करत वर पाहिलं. "हो. अगदीच. मी थोडंथोडं चाळलं पुस्तक अधेमधे. तेवढाच वेळ मिळालाय. हा म्हणजे एक माहितीकोषच आहे. आणि इंडेक्समध्ये माणसं नि जागांच्या नावांच्या याद्या भरल्यात. मला काही उपयोग नाही त्यांचा. गॅलॅक्टिक साम्राज्य आणि तत्पूर्वीची राज्य यांच्याबद्दल काहीच माहिती सापडली नाही. फक्त एकाच जगाबद्दल सगळी माहिती आहे आणि मला जेवढं समजलं त्यावरून त्यांच्या अंतर्गत राजकारणाचीच माहिती आहे त्यात."

"तू कदाचित् या पुस्तकाचा कालखंड समजून घेण्यात चूक करत असशील. तेव्हा खरोखरच एकच जग असेल तर... एकच मानवी वस्तीचं जग."

"हो, कळतंय मला." तो जरा अधीरपणाने म्हणाला, "तेच तर हवंय मला. फक्त त्याचा इतिहास हवा आहे. दंतकथा नकोत. माहीत नाही- पण केवळ मला विश्वास ठेवावासा वाटतो म्हणून विश्वास ठेवला असं नको व्हायला."

डॉर्स म्हणाली, “वेल, हे एका जगापासून साऱ्या गॅलॅक्सीत मानव पसरला वगैरे मुद्दे आजकाल फार जास्त चर्चिले जात आहेत खरे. संपूर्ण गॅलॅक्सीत सारखेपणाने पसरलेली एकमेव प्रजाती ही मानवाचीच आहे- त्यामुळे तिचा उद्भव कुठल्यातरी एका ठिकाणी झाला असणे शक्य आहे. निदान सध्या हे मत लोकप्रिय आहे. वेगवेगळया जगांत स्वतंत्रपणे एकच प्रजाती विकसित झाली असणे जरा असंभवच वाटते.”

“पण तो युक्तीवाद अगदी बिनतोड आहे असंही मला कधी वाटलं नाही.” सेल्डन म्हणाला, “वेगवेगळया जगांत वेगवेगळया मानवप्रजाती उद्भवल्या असतील, तर काही काळानंतर प्रजातीसंकर होऊन एक संमिश्र प्रजाती तयार झाली असणे शक्य आहे.”

“प्रजातींचा संकर होऊ शकत नाही. म्हणून तर त्यांना प्रजाती म्हणतात ना.”

सेल्डन क्षणभर विचारात पडला, आणि मग खांदे उडवत म्हणाला, “ती चर्चा मी जीवशास्त्रज्ञांवर सोडतो, जाऊ दे.”

“अर्थ् च्या अस्तित्वाचा सिद्धांत मांडण्यात तेच तर आघाडीवर आहेत.”

“अर्थ्? उद्भवाच्या जगाला अर्थ म्हणतात का?”

“तेच आहे त्याचं सर्वमान्य नाव. तसं काही असेल तर त्याला खरंच काय नाव होतं ते आता कुणालाही सांगता येणं शक्य नाही. आणि ते जग नेमकं कुठे असेल त्याची नेमकी जागाही कुणाला माहीत नाही.”

“अर्थ्!” सेल्डन ओठ मुडपत म्हणाला. “ढेकर दिल्यासारखं नाव आहे. पण ते असो- या पुस्तकात मूळ जगाची चर्चा असेल तर हे नाव अजूनतरी कुठेही वाचलं नाही. काय स्पेलिंग आहे त्याचं?”

तिने सांगितल्यावर त्याने पुस्तकाची पाने चाळली. “हे बघ. हे नाव इथे इंडेक्समधे तरी नाही. ते स्पेलिंग किंवा तत्सम काहीही नाही.”

“खरंच?”

“काही इतर जगांचा उल्लेख येतो अगदी ओझरता. त्यांची नावे दिलेली नाहीत. त्यांना त्यात काहीही रस नसावा. त्यांच्या त्या जगावर या दुसऱ्या जगांचा थेट प्रभाव पडला असेल तरच काही उल्लेख आहे. मी जेवढं वाचू शकलो त्यावरून हे दिसतं. एका ठिकाणी ते ‘ते पन्नास’ असा उल्लेख करतात. म्हणजे काय कळत नाही. पन्नास नेते? पन्नास शहरे? कदाचित् पन्नास जगांचा उल्लेख असेल असं वाटतं.”

“त्यांनी त्यांच्या जगाचं काही नाव दिलंय का- म्हणजे त्यांच्या ध्यानीमनी जे जग असतं त्याचं नाव?” डॉर्सने विचारलं. “ते त्याला अर्थ् म्हणत नसतील तर मग काय म्हणतात?”

“ते त्याचा उल्लेख अपेक्षेप्रमाणेच ‘ते जग’ किंवा ‘तो ग्रह’ किंवा ‘प्राचीनतम’ किंवा ‘उदयारंभाचे जग’ असा करतात... काहीतरी काव्यात्म म्हणायचं असावं, असं वाटतं, नक्की नाही. मला वाटतं अख्खं पुस्तक वाचायला लागेल, तेव्हा काही गोष्टी नीट कळू लागतील.” त्याने हातातल्या पुस्तकाकडे तोंड वाकडं करून पाहिलं. “फार वेळखाऊ काम आहे हे. आणि मला नाही वाटत त्यातून काही फार ज्ञानात भर पडेल असं.”

डॉर्स सुस्कारली. “अरेरे, हॅरी, एवढा निराशेने नको बोलू.”

“खरंच निराश झालोय मी. माझीच चूक आहे म्हणा. मी उगीच जास्त अपेक्षा केली. पण हां- एका ठिकाणी बरं का- त्यांनी त्यांच्या जगाला ‘ऑरोरा’ म्हटलं आहे.”

“ऑरोरा?” डॉर्सच्या भुवया उंचावल्या.

“नाव आहे असं वाटतंय खरं. बाकी काही अर्थ लागत नाही- मला तरी. तुला काही अर्थ माहीत आहे, डॉर्स?”

“ऑरोरा.” विचार करताकरता डॉर्सच्या कपाळाला किंचित आठी पडलेली. “मी कधी या नावाचा ग्रह आहे असं ऐकलेलं तरी नाही. गॅलॅक्टिक साम्राज्याच्या जडणघडणीच्या काळातल्या इतिहासात हे नाव कधी ऐकलेलं नाही. पण दोनशेपन्नास लक्ष ग्रहांमधल्या प्रत्येकाचं नाव मला तरी माहीत नाही. आपण विद्यापीठाच्या लायब्ररीत पाहू शोधून- स्ट्रीलिंगला परत गेलो तरच म्हणा. इथे मायकोजेनवर लायब्ररी शोधण्यात काही अर्थ नाही. मला वाटतं- त्यांचं जे काही ज्ञान आहे ते या पुस्तकातच सामावलेलं असावं. त्यात जे नसेल त्यात त्यांना रसच नसावा.”

सेल्डनने जांभई दिली आणि म्हणाला, “बरोबर आहे तुझं. काहीही असो, ते पुस्तक वाचण्यात फारसं हंशील नाही. आता माझे डोळेही उघडे रहाणं मुश्किल आहे. मी दिवे घालवले तर चालेल?”

“अगदी बरंच होईल, हॅरी. आणि सकाळी जरा उशीराच उठू या.”

मग थोड्या वेळाने अंधारातच हॅरी कुजबुजतच बोलू लागला, “अर्थात, ते काहीकाही दावे करतात ते अगदी हास्यास्पदच आहेत. उदाहरणार्थ ते म्हणतात की त्यांच्या त्या जगातल्या लोकांचं तीन ते चार शतकांचं आयुर्मान असे.”

“शतकांचं?”

“हो. आणि ते त्यांचं वय दशकांमध्ये मोजतात. वर्षांत नाही. फार विचित्र वाटतं. कारण बऱ्याचशा गोष्टी ते इतक्या वास्तवतेने मांडतात की मध्येच हे असलं

काहीतरी उपटलं की त्यावरही विश्वास टाकला पाहिजे की काय असं पटकन वाटू शकतं.”

“तुझा त्यावर विश्वास बसतोय अशी शंका आली तर एक लक्षात ठेव की बऱ्याचशा जुन्या दंतकथांमध्ये जुन्या नायकांचे आयुर्मान चांगलेच लांबवलेले असते. ते जरा जास्तच पराक्रमी रंगवले असले तर मग त्यांचं आयुष्यही प्रदीर्घ असायला हवं असा काहीतरी समज असतो.”

“हो?” सेल्डनने पुन्हा जांभई दिली.

“हो. आणि असल्या भाकडकथांवर विश्वास बसू नये म्हणून वेळच्या वेळी झोपणं आणि त्यावर उद्याच्या दिवशी विचार करणं शहाणपणाचं असतं.”

मग सेल्डन विचार करू लागला की प्रदीर्घ आय़ुष्य ही गॅलॅक्सीभरच्या लोकांना समजून घेण्यासाठी आवश्यक गोष्ट ठरेल- आणि त्याला झोप लागली.

४९.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर, छान ताजं तवानं वाटल्यावर सेल्डन अधीरपणे पुन्हा पुस्तकाकडे वळला. त्याने डॉर्सला विचारलं, “या रेनड्रॉप भगिनी किती वयाच्या असतील असा अंदाज आहे तुझा?”

“माहीत नाही. वीस... बावीस?”

“वेल, समजा, त्या तीन-चार शतके जगल्या-”

“हॅरी. हे हास्यास्पद आहे.”

“मी म्हणतोय, समजा. गणितामध्ये आम्ही सदासर्वकाळ ‘समजा’ असं म्हणत असतो. आणि मग त्यातून काहीतरी अगदीच चुकीचं किंवा स्पष्ट अंतर्विरोध असलेलं सापडून जातं. एवढा वाढीव आय़ुष्याचा काळ म्हणजे विकासाचा वेग

अत्यंत मंद असणार हे नक्कीच. म्हणजे त्या विशीतल्या दिसत असल्या तरीही साठीतल्या असू शकतात.”

“त्यांनाच विचार ना तू त्यांचं वय.”

“त्या खोटं बोलतील असं गृहीत धरावं लागेल.”

“त्यांचे जन्माचे दाखले बघून घे.”

सेल्डन खिन्न हसला, “मी कसलीही पैज लावतो तुझ्याशी- तुझी तयारी असेल तर- म्हणशील तेव्हा तुझ्याबरोबर गवतात शिरून गंमत करायला तयार आहे मी- त्या सांगतील आम्ही असले दाखले बिखले ठेवत नाही आणि असले तरी ते टोळीवाल्यांना दाखवत नाही.”

“काही नको पैज.” डॉर्स म्हणाली, “अणि तसं असेल तर मग त्यांच्या वयांबद्दल काहीही अंदाज लावण्यात अर्थ नाही.”

“नाही नाही. असा विचार कर. मायकोजेनियन्स जर साधारण माणसांपेक्षा जास्त जगत असतील तर त्यांना खूपच जास्त मुलंही होत असतील- म्हणजे लोकसंख्या खूपच वाढत असेल ना. तुला आठवतंय का, सनमास्टर काहीतरी लोकसंख्या वाढू न देण्याबद्दल बोलला आणि मग जरा घुश्शातच त्याने विषय थांबवला होता.”

डॉर्स म्हणाली, “तुला नेमकं काय सुचवायचंय?”

“मी रेनड्रॉप फॉर्टीथ्रीसोबत गेलो होतो तेव्हा मला मुलं दिसली नाहीत कुठे.”

“म्हणजे मायक्रोफार्म्सवर?”

“हो.”

“तिथे तुला मुलं दिसायची अपेक्षाच करता कामा नये. मी रेन्ड्रॉप फॉर्टीफाइवबरोबर खरेदीला गेले तेव्हा दुकानांत आणि घरांच्या अवतीभवती खूप

मुलं पाहिली. वेगवेगळ्या वयोगटांतली मुलं- तान्ही बाळंही पाहिली. बरीच पाहिली.”

“अस्सं...” आपला अंदाज खोटा ठरल्याचं सेल्डनला जरा वैषम्यच वाटलेलं. “म्हणजेच ते काही एवढे दीर्घायुषी नसावेत.”

डॉर्स म्हणाली, “तुझ्या युक्तीवादाचा धागा पकडून मीही म्हणेन की अजिबातच नाही. तुला काय खरंच वाटलं होतं की काय ते एवढे जगत असतील असं?”

“नाही, तसंच काही नाही. पण शेवटी आपण सर्व शक्यता तपासून पाहायला हव्यातच. अमुक एख शक्य नाहीच असं कसं ठरवणार...”

“तुझा बराच वेळ वाया जाऊ शकतो यावर. जे अगदी देखत हास्यास्पद आहे तेही चघळत राहिलं तर मग झालंच.”

“काही गोष्टी वरवर हास्यास्पद वाटल्या तरीही असतीलच असं नाही एवढंच. त्यावरून आठवलं- तू इतिहासाची अभ्यासक आहेस. तुझ्या अभ्यासात तुला कधी रोबॉट्स म्हणून संकल्पना किंवा वस्तूंचा उल्लेख आढळलाय?”

“आः. आता एका नवीन अधिक लोकप्रिय दंतकथेच्या मागे आहेस तर. बऱ्याच जगांमध्ये प्रागैतिहासिक काळात अशी माणसासारखी दिसणारी यंत्र असण्याची कल्पना अजूनही प्रचलित आहे. त्यांनाच रोबॉट्स म्हणतात. यंत्रमानव.

“बहुतेक एकाच दंतकथेत या कथांची मुळं असावीत. कारण तशा त्या वेगवेगळ्या वाटल्या तरी सर्वसाधारण साम्य आहेच. रोबॉट्सचा शोध लागला, मग त्यांची संख्या वाढली, क्षमताही वाडली आणि मग हळुहळू ते जरा जास्तच अतिमानवी झाले. मानवजातीला त्यांच्यापासून धोका उत्पन्न झाला. म्हणून मग त्यांचा नाश करण्यात आला. प्रत्येक कथेत त्यांचा नाश आज उपलब्ध असलेल्या

ऐतिहासिक नोंदी करण्याची सुरुवात होण्याआधी, खूप काळापूर्वी करण्यात आला. असं मानलं जातं, की गॅलॅक्सीचा शोध घेताना आपलं मूळ घर सोडून दूरदूरवरपर्यंत जाणाऱ्या मानवजातीला संभाव्य धोक्यांपासून सावध करण्याचा हेतू या कथांमध्ये असावा. प्रतिकात्मक कथा. कुठेतरी कुणीतरी मानवापेक्षा बुद्धीमान जीव सापडले तर- ही जी भीती सतत भेडसावत राहिली आहे त्यामुळे या कथांचा जन्म झाला असावा.''

''कदाचित एखाद्या काळात असतीलही असे रोबॉट्स, म्हणूनच दंतकथा जन्मली असेल.''

''फक्त एवढंच की आजवर सापडलेल्या कुठल्याही जगात, मानवपूर्व किंवा अमानवी बुध्दीमत्ता असण्याची कुठेही नोंद नाही.''

''पण मग रोबॉट्स असाच शब्द का तयार झाला? त्याला काही अर्थ आहे का?''

''मला माहीत नाही, पण आपण ज्याला ऑटोमॅटा म्हणतो त्याला समानार्थी आहे हा.''

''ऑटोमॅटा! मग तोच शब्द का नाही वापरत ते?''

''अरे, कारण लोकांना जुन्या दंतकथा सांगताना त्यांची रंगत वाढवण्यासाठी जरा जुने शब्द वापरायला आवडतात. बरं पण तू हे सगळं का विचारतो आहेस?''

''कारण या प्राचीन मायकोजेनियन पुस्तकात ते रोबॉट्सचा उल्लेख करतात आणि तो फार आदराने करतात. जरा ऐक, डॉर्स, तू आज दुपारी रेनड्रॉप फॉर्टीफाइवसोबत बाहेर जाणार होतीस ना?''

''हं, म्हणजे ती आली तर जाणार.''

''तिला काही प्रश्न विचारून उत्तरं मिळवशील तू?''

“प्रयत्न करेन. प्रश्न काय आहेत?”

“मला असं पाहिजेय- फार हुषारीने विचारावं लागेल- की मायकोजेनमध्ये काही महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या वास्तू आहेत का... भूतकाळाशी संबंधित अशी वास्तू... दंतकथांशी संबंधित अशी वास्तू... जी-”

डॉर्स हसू दाबत त्याला मधेच तोडत म्हणाली, “तुला विचारायचंय की मायकोजेनमधे मंदिर आहे का.”

आणि मग अर्थातच सेल्डनने विचारलं, “मंदिर म्हणजे काय?”

“आणखी एक प्राचीन संकल्पना- कुठून उगवली कळत नाही. पण महत्त्वाची, भूतकाळाशी संबंधित, दंतकथांशी संबंधित वगैरे हे सारं जे विचारलंस ते त्यात असतं. ठीक आहे, मी विचारून घेईन. पण असल्या गोष्टींबद्दल बोलणं त्यांना जरा जडच जाईल. टोळीवाल्यांशी तर नक्कीच.”

“तरीही, प्रयत्न तर कर.”

---------------------

# सॅक्रॅटोरियम- पवित्रालय

ऑरोरा- दंतकथांतून उल्लेख असलेलं एक जग. अतिप्राचीन प्रारंभकाळापासून त्यावर मानवी वस्ती असल्याचा समज आहे. अवकाशातून आंतरतारा प्रवासाची सुरुवात झाली तेव्हापासून. काही लोक असं मानतात की मानवाच्या उद्भवाचे जग हेच होते, आणि याचेच दुसरे नाव ‘अर्थ्’ असे होते. ट्रान्टॉरवरच्या प्राचीन प्रभागात, मायकोजेनमध्ये रहाणारा लोकसमूह, स्वतःला ऑरोराच्या मूळ मानवी प्रजेची उत्पत्ती मानतो आणि हा विशेष त्यांनी आपल्या अस्तित्वाशी, आपल्या श्रद्धांशी निगडित, केंद्रीभूत मानला आहे. त्यासंबंधी बाहेर जवळपास काहीच माहिती मिळत नाही...

दीर्घिका ज्ञानकोष

५०.

दोघी रेनड्रॉप्स सकाळ उलटताउलटता आल्या. रेनड्रॉप फॉर्टीफाइव्ह नेहमीसारखीच आनंदी दिसत होती, पण रेनड्रॉप फॉर्टीथ्री आत येताच जराशी थबकली, तिचा चेहराही जरासा उतरलेला आणि सावध दिसत होता. तिने नजर खाली वळवलेला आणि तिने सेल्डनकडे पाहिलंही नाही.

सेल्डनही थोडासा अनिश्चित होता, त्याने डॉर्सला खुणावलं. डॉर्स अगदी काहीच वेगळं न घडल्यासारखी आनंदात बोलू लागली, “एक मिनिट हं भगिनींनो, माझ्या या सोबत्याला काही सूचना द्यायला हव्यात नाहीतर दिवसभर काय करायचं तेच त्याला कळायचं नाही.”

ते दोघे बाथरूममधे आडोशाला गेले. डॉर्सने कुजबुजत विचारलं, “काहीतरी बिनसलंय?”

“हो. रेनड्रॉप फॉर्टीथ्री अगदीच ढासळल्यासारखी दिसतेय. तिला प्लीज सांग, की मी लवकरात लवकर ते पुस्तक तिला परत देईन.”

डॉर्सने सेल्डनकडे काहीक्षण आश्चर्याने निरखून पाहिलं. “हॅरी, तू फार गोड आहेस. तुला काळजी असते इतरांची. सर्व ठीक आहे. पण अमीबाला असतो तेवढाही शहाणपणा नाही तुझ्यात. मी पुस्तकाचा नुसता उल्लेख केला तरी तिला कळेल की काल घडलेलं सारं काही तू मला सांगितलं असणार. आणि मग ती पुरती ढासळेल. मी तिच्याशी नेहमी जशी वागते तसंच वागणं श्रेयस्कर.”

सेल्डनने मान डोलावली आणि अगदी हताश सुरात म्हणाला, “बरोबर आहे तुझं.”

डॉर्स जेवणाच्या वेळेआत संध्याकाळी परतली तेव्हा सेल्डन कॉटवर बसून पुस्तकाची पानं घाईघाईने चाळत होता.

त्याने रागीट मुद्रेने तिच्याकडे पाहिलं, आणि म्हणाला, “इथे आपण फार काळ रहाणार असलो तर आपल्याला एकमेकांच्या संपर्कात रहायला काहीतरी साधन लागेल. तू कधी परतणार ते काहीच कळत नव्हतं. काळजीत पडलेलो.”

“वेल, आले ना मी आता.” ती आपल्या डोक्यावरची कातडी टोपी हिसकून काढत म्हणाली. तिने त्या तुकड्याकडे तिरस्काराने पाहिलं. “मला छानच वाटलं तुला काळजीत पडलेलं पाहू. मला वाटलेलं, की तू त्या पुस्तकातच डुबक्या घेत बसला असशील आणि मी आहे की नाही याचाही विसर पडला असेल तुला.”

सेल्डन घशातल्या घशात गुरगुरला.

डॉर्स म्हणाली, “संपर्काच्या साधनाचं म्हणशील तर- मायकोजेनमध्ये ते कठीणच दिसतंय. ते सोपं असतं तर मग बाहेरच्या टोळीवाल्यांशीही संपर्क वाढला असता आणि मला शंका आहे, मायकोजेनच्या नेतृत्वाला आतल्यांचा बाहेरच्या विशाल जगाशी संपर्क शक्य तितका टाळायचाच असणार.”

“होय,” सेल्डन पुस्तक बाजूला फेकत म्हणाला, “या पुस्तकावरून तर ते तसंच दिसतंय. तुला काही कळलं का- ते तू काय म्हणालीस- मंदिर... त्याबद्दल काही कळलं?”

“हो,” ती भुवयांवरच्या पट्ट्या काढत म्हणाली. “आहेत. एका प्रभागात तसली बरीच आहेत म्हणे. पण त्यातली मध्यवर्ती अशी एक वास्तू आहे ती सर्वात महत्त्वाची आहे. तुला आश्चर्य वाटेल- पण एका बाईने माझ्या पापण्या पाहिल्या आणि म्हणाली, मी असं सार्वजनिक ठिकाणी फिरता कामा नये. मला वाटतं ती बहुतेक माझी तक्रार करणार असेल- असभ्य अंगप्रदर्शनासाठी.”

“एह्, ते जाऊ दे,” सेल्डन अधीरपणे म्हणाला, “ते मध्यवर्ती मंदिर नेमकं कुठेय ते कळलं तुला?”

“मला पत्ता कळलाय. पण रेनड्रॉप फॉर्टीफाइव्ह म्हणाली, की तिथे काही खास दिवस सोडले तर स्त्रियांना मनाई आहे. आणि इतक्यात कुठलेही खास दिवस येणार नाहीयेत. त्या जागेला सॅक्रेटोरियम म्हणतात.”

“काय म्हणतात?”

“सॅक्रेटोरियम.”

“काय गचाळ शब्द आहे. अर्थ तरी काय त्याचा?”

डॉर्सने मान हलवली, “मला नवीनच आहे. दोघी रेनड्रॉप भगिनींनाही माहीत नव्हता अर्थ. त्यांच्या दृष्टीने त्या वास्तूला काय म्हणतात ते महत्त्वाचं नव्हतं. ती काय

आहे तेच महत्त्वाचं होतं. त्याला ते तसंच का म्हणतात वगैरे विचारणं म्हणजे भिंतीला भिंत का म्हणतात असं विचारण्यासारखंच होतं.”

“त्यांना त्याबद्दल आणखी काही माहीत होतं?”

“अर्थातच, हॅरी. ते काय आहे ते त्यांना माहीत होतं. मायकोजेन व्यतिरिक्त असं काहीतरी जपणारी ती वास्तू आहे. त्यांच्या आधीच्या जगाची, त्यांच्या सुवर्णकाळाची सम्ती जपणारी ती वास्तू आहे.”

“म्हणजे त्यांच्या मूळ निवासाचं जग?”

“अगदी बरोबर. रेनड्रॉप फॉर्टीफाइव्ह जवळपास तसं म्हणालीच, पण तिला ते स्पष्ट म्हणता आलं नाही. तो शब्द उच्चारायचा नव्हता तिला.”

“ऑरोरा?”

“हो तोच. पण मला शंका आहे, तू जर हा शब्द मायकोजेनियन्सच्या एखाद्या घोळक्यजवळ मोठ्याने उच्चारलास, तर ते चकित होतील, भयभीत होतील. रेनड्रॉप फॉर्टीफाइव्ह म्हणाली- की ती सॅक्रेटोरियमची वास्तू स्मृत्यर्थ आहे- आणि थांबली. मग तिने तो शब्द आपल्या एका बोटाने हाताच्या तळव्यावर लिहिला. आणि मग ती लाजून चूर झाली... जणू तिने काहीतरी अश्लील कृत्य केलं होतं.”

“विचित्रच आहे,” सेल्डन म्हणाला, “हे पुस्तक जर अचूक वर्णन करीत असेल तर ऑरोरा ही त्यांची सर्वात प्रिय अशी स्मृती आहे. त्यांना एकत्र धरून ठेवणारे केंद्रक. मायकोजेनचे सारे जीवन त्याभोवती फिरते. त्याचा उल्लेख अश्लील का समजण्यात यावा? तुला नक्की खात्री आहे, तिच्या वागण्याचा अर्थ काय होता याबद्दल?”

“अगदी पूर्ण खात्री. आणि कदाचित् यात रहस्य असं काहीच नाही. त्याबद्दल फार जास्त बोललं गेलं तर ते टोळीवाल्यांपर्यंत पोहोचेल. ते गुप्त

ठेवण्यासाठी सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांनी स्वतःच त्याचा उल्लेख कमी करायचा- ते वर्ज्य मानायचं. टॅबू मानायचा.''

''टॅबू?''

''ही मानववंशशास्त्रातील विशेष पारिभाषिक संज्ञा आहे. एखादी कृती निषिद्ध किंवा वर्ज्य ठरवण्यासाठी फार गंभीरपणे सामाजिक दडपण तयार केलं जातं, त्याला टॅबू म्हणतात. स्त्रियांना सॅक्रेटोरियममध्ये प्रवेश नसणं हा एक टॅबूचाच प्रकार. एखाद्या भगिनीला तिथं जायला सुचवलं तरीही ती प्रचंड घाबरून जाईल याची खात्री आहे मला.''

''तुला जो काही पत्ता मिळालाय तो मी तिथे एकट्याने पोहोचण्यासाठी पुरेसा स्पष्ट आहे काय?''

''हे पहा, एक म्हणजे, तू कुठेही एकटा जाणार नाहीयेस. मी तुझ्याबरोबर असणारच आहे. मला वाटतं आपण यावर पुरेशी चर्चा केली आहे. मी तुला पुरेसं स्पष्ट केलंय की तुझं रक्षण बर्फाच्या पावसापासून करायचं असो वा हिंस्र स्त्रियांपासून- मला तुझ्यापासून फार अंतरावर असून भागणार नाही. दुसरं असं की तिथे चालत जाण्याचा विचारही करता येणार नाही. मायकोजेन हा तुलनेने लहान प्रभाग असला तरीही इतका काही लहानसा नाही.''

''मग एक्स्प्रेसवेने जायचं.''

''मायकोजेनच्या भूप्रदेशातून एकही एक्स्प्रेसवे जात नाही. तसं झालं तर मायकोजेनियन्स आणि टोळीवाले यांच्यातला संपर्क वाढेल. पण तरीही काही सार्वजनिक वाहने आहेत इथे. जरा कमी विकसित ग्रहांवर असतात तसली. खरं तर मायकोजेन प्रभाग हा एखाद्या अविकसित ग्रहसारखाच आहे. ट्रॅन्टोरच्या गोलात शिरलेला एक वेगळाच कपचा जणू. बाकी सर्व समाज एखाद्या गोधडीसारखा

असला तरीही विकसित आहे- यांचा अपवाद. आणि हॅरी ते पुस्तक वाचून लवकर परत करायला हवं. जोवर ते तुझ्याकडे आहे तोवर रेनड्रॉप फॉर्टीथ्री संकटात आहे- म्हणजे कुणालाही ते कळलं तर ती नक्कीच संकटात सापडेल.”

“टोळीवाल्याने वाचणं निषिद्ध असेल? टॅबू?”

“नक्कीच.”

“ते परत देण्यात फार काही नुकसान नाही. त्यातला ९५ टक्के भाग अगदीच कंटाळवाणा आहे. वेगवेगळ्या राजकीय गटांच्या आपसातल्या अनंत मारामाऱ्या, कुठल्यातरी धोरणांची समर्तने... मला काहीच कळू शकत नाही असल्या चर्चा. नैतिक प्रश्नांवरची धार्मिक वाटणारी भाष्ये,... जरा बुद्धीगम्य वाटली तरी नसतातच फारशी. आणि त्यातला आपण किती थोर हा अहंभाव तर वैतागवाणाच आहे. ते वाचून सगळे नियम तोडायचीच इच्छा होणार असं.”

“ते पुस्तक मी तुझ्याकडून काडून घेतलं तर मला वाटतं तुझ्यावर उपकारच होतील नाही का माझे? किती वैतागला आहेस तू!”

“पण तो उरलेला ५ टक्के मजकूर ऑरोराबद्दल चर्चा करतो ना... मला वाटतंय की त्यात काहीतरी सापडेल मला मदत होईल असं. म्हणून मला त्या सॅक्रेटोरियमबद्दल माहिती हवी होती.”

“ऑरोराच्या संकल्पनेबाबत काही माहिती सॅक्रेटोरियममध्ये मिळेल असं वाटतं तुला?”

“थोडंबहुत. त्या पुस्तकात ऑटोमॅटा किंवा त्यांच्या भाषेत रोबॉट्सबद्दल जे म्हटलंय त्यामुळेही मला ते सोडवत नाहीये. मला फार आकर्षण वाटतंय त्या संकल्पनेचं.”

“ए बाबा, तू काय ते गांभीर्याने घेतोस की काय?”

“हो बहुतेक. त्या पुस्तकातला एखादा उतारा अगदी शब्दशः अर्तीने वाचला तर असं दिसतं, की त्यांच्याकडे माणसांसारखे दिसणारे रोबॉट्स होते.”

“स्वाभाविकच आहे ते. माणसासारखं काम करणारं सिम्युलाक्रम- समदर्शीयंत्र- तयार करायचं असेल तर ते माणसासारखं दिसणारंही असावं लागेल. तशीच रचना करतील त्याची.”

“हो. सिम्युलाक्रम म्हणजे समदर्शी- सारखं दिसणारं... पण तो सारखेपणा जरा ओबडधोबडही असू शकतो. एखादा कलाकार काड्यांची आकृती काढेल आणि आपल्याला तरीही त्याला त्यातून माणूस सुचवायचाय हे कळेल. डोक्यासाठी एक वर्तुळ. शरीरासाठी उभी जाड रेष, चार वाकड्या रेषा हातापायांसाठी- झालं. पण रोबॉट्स हे खरोखरच माणसांसारखे दिसत. तपशीलवार.”

“हास्यास्पद आहे हे, हॅरी. कल्पना कर, धातूपासून मानवी शरीरासारखं काही तयार करायला किती वेळ जाईल- सगळी वळणं, तुकतुकितपणा, त्याखालचं स्नायूंचं जाळं... छे.”

“धातू? असं कोण म्हणतंय, डॉर्स? मला ते वाचून असं वाटलं की ते रोबॉट्स अगदी ऑर्गॅनिक -जैविक किंवा सुडोऑर्गॅनिक- छद्मजैविक असावेत. कातडीसारख्याच कशाने तरी आच्छादलेले. ते आणि खरी माणसं यांच्यातला फरक ओळखणं कठीण असावं.”

“त्या पुस्तकात तसं म्हटलंय?”

“असं अगदी स्पष्ट शब्दांत नव्हे. पण त्यात जे म्हटलंय त्यावरून निष्कर्ष असाच निघतो. पण-”

“हा निष्कर्ष तू काढलास, हॅरी. तू ते गांभीर्याने घेता कामा नयेस.”

“बघू मला प्रयत्न करून. त्या पुस्तकात रोबॉट्सबद्दल जे काही लिहिलंय ते पाहून, त्याबद्दलच्या सगळ्या इंडेक्समधल्या नोंदी पाहून मला चार गोष्टी कळल्यात. एक म्हणजे मी म्हणतो तसं, ते किंवा निदान त्यांच्यापैकी काहीजण अगदी माणसांसारखे दिसत होते. दोन त्यांचा जीवनकाल- किंवा काय म्हणशील त्याला ते- भरपूर लांबलचक होता असंही दिसतं.”

“त्यांचा कार्यकाल म्हण त्यापेक्षा-” डॉर्स म्हणाली, “नाहीतर तू खरंच त्यांचा माणूस म्हणूनच विचार करू लागशील.”

“तिसरं-” तिच्याकडे दुर्लक्ष करत तो म्हणाला, “त्यातील काहीजण, किंवा त्यातला एखादा तरी अजूनही- आत्तापर्यंत जिवंत आहे.”

“हॅरी, ही दंतकथातर भयंकर लोकप्रिय आहे आपल्याकडेही. तो प्राचीन नायक मरत नाही, तर त्याचा जिवंतपणा स्थगित आहे काहीकाळापुरता. मग काहीतरी प्रचंड अडचणीचा काळ आला की तो त्याच्या लोकांना वाचवायला परतून येणार... काय हे हॅरी...”

“चौथं-” सेल्डन अजूनही तिच्या मुद्द्यात अडकत नव्हता. “त्यातल्या काही ओळी असं सुचवतात की त्या मध्यवर्ती मंदिरात की ‘सॅक्रेटोरियम’मध्ये- हा शब्द काही मला या पुस्तकात सापडला नाही म्हणा- पण तिथे खरोखरचा रोबॉट ठेवलेला आहे.” तो थबकला, “कळलं आता?”

डॉर्स म्हणाली, “नाही कळलं. काय कळायला हवं होतं?”

“आपण या चारही गोष्टींची सांगड घातली, तर कदाचित माणसासारखा दिसणारा एक रोबॉट, जो अजूनही जिवंत आहे- गेली वीस हजार वर्षे जिवंत आहे म्हणजे- चालू स्थितीत आहे... त्या सॅक्रेटोरियममध्ये आहे.”

“चल रे हॅरी, तू असल्या गोष्टींवर कसा विश्वास ठेवतोस?”

“विश्वास नाही ठेवत अगदी, पण मी या गोष्टी अगदीच सोडून देऊ शकत नाही. समज, हे खरं असेल तर? अगदी लाखात एक शक्यता असली ते खरं असण्याची तरीही? तो माझ्यासाठी किती उपयोगी ठरू शकेल कळतंय का तुला? त्याला कुठल्याही ऐतिहासिक नोंदींच्या आधीचे गॅलॅक्सीचे स्वरूप माहीत असेल. तो सायकोहिस्ट्रीच्या बांधणीसाठी केवढी मदत करू शकेल.”

“अगदी ते खरं असलं तरीही, तुला वाटतं की की हे मायकोजेनियन्स तुला त्या रोबॅाटला भेटूबोलू देतील?”

“मी परवानगी विचारण्याचा विचारच नाही करत. मी निदान सॅक्रेटोरियमपर्यंत जाऊन तिथे कुणी बोलण्यासाठी आहे का नाही एवढी तरी खात्री करून घेतो.”

“आत्ता नाही. फारफार तर उद्या. आणि तुला उद्यापर्यंतही जरा शहाणपणा सुचला नाही तर मगच...”

“तूच म्हणालीस ना, की बायकांना तिथे मज्जाव आहे म्हणून!”

“बाहेरून पाहायला परवानगी असणार, नक्कीच. आणि आपल्याला बहुतेक तेवढंच करता येईल असं दिसतंय.”

आणि इथे ती हटूनच बसली.

तिने पुढाकार घ्यावा याचं हॅरी सेल्डनला बरंच वाटत होतं. कारण ती मायकोजेनच्या मुख्य रस्त्यावर फिरून आली होती. त्याच्यापेक्षा तिला जास्त माहिती होती.

डॉर्स वेनाबिलीच्या कपाळावर आठ्यांचं जाळं झालेलं. तिला या कामगिरीबद्दल अजिबात उत्साह वाटत नव्हता. ती म्हणाली, “आपण अगदी सहज रस्ता चुकू शकतो बरं का!”

“ही पुस्तिका बरोबर असताना? शक्यच नाही.”

तिने त्याच्याकडे जरा झटक्यानेच पाहिलं, “तुझं ध्यान जरा मायकोजेनवर येऊ दे, हॅरी. मला गरज आहे ती कॉम्प्युटोमॅपची. मला प्रश्न विचारता आले पाहिजेत असं काहीतरी. ही मायकोजेन आवृत्ती म्हणजे काय आहे! प्लास्टिकची घडी फक्त. मी कुठे आहे ते मी याला सांगू शकत नाही. मी त्याच्याशी बोलून काही सांगू शकत नाही, ना कुठली बटणं आहेत त्यात. ते मला काहीही सांगू शकत नाही. छापलेली निरुपयोगी गोष्टय ती!”

“मग त्यात काय लिहिलंय ते वाच ना.”

“तेच तर करायचा प्रयत्न करतेय. पण ज्यांना इथल्या सर्व गोष्टींची माहिती आहे त्यांच्यासाठीच तयार केलंय ते. आपल्याला तर विचारतविचारतच जावं लागेल.”

“नाही, डॉर्स. तो अगदी शेवटचा उपाय आहे. आपल्याकडे कुणाचं लक्ष वेधलं जायला नको. त्यापेक्षा प्रयत्न करू, थोडा धोका पत्करू. थोडं डावंउजवं चुकलं तर चुकलं.”

डॉर्स त्या पुस्तिकेची पानं चाळत बसली. आणि मग अनिच्छेने म्हणाली, “यात सॅक्रेटोरियमचा उल्लेख पुरेसं महत्त्व देऊन केला आहे. ते तर स्वाभाविकच असेल म्हणा. मायकोजेनमधल्या प्रत्येकाला तिथं कधी ना कधी जायचं असेलच.” मग थोडावेळ एकाग्र चित्त बसून पुस्तिका पाहात ती म्हणाली, “ऐक, सांगते. इथून तिथे थेट काहीही प्रवासाचं साधन नाही.”

“क्काय?”

“उतावीळ होऊ नकोस लगेच. एका जागेपर्यंत एका वाहनाने जाऊन मग तिथून पुढे दुसऱ्या वाहनाने जाता येतं. बदलाबदली करावी लागेल इतकंच.”

सेल्डन सुखावला, "हो, म्हणजे बरोबर. ट्रॅन्टॉरवरही एक्स्प्रेसवे सोडला की बदलाबदली करावी लागतेच बऱ्याच ठिकाणी."

डॉर्सने त्याच्याकडे रागावूनच पाहिलं. "तेही माहीत आहे मला. फक्त या गोष्टी मला झटकन सांगितल्या जाण्याची सवय आहे मला. तुमचं तुम्ही शोधायचं असतं तेव्हा साध्यासुध्या गोष्टी नजरेतून निसटतात."

"बरं बाई, रागवू नको. आता तुला रस्ता, दिशा, सगळं कळलं असेल तर चल, मी अगदी विनम्रपणे तुझ्या मागोमाग येईन."

आणि मग खरंच तो तिच्या मागोमाग जाऊ लागला. मग ते एका चौकात आले आणि थांबले.

पांढरे कर्टल्स घातलेले तीन पुरुष आणि राखी कर्टल्स घातलेल्या दोन बायका तिथेच थांबून होत्या. सेल्डनने एक वैश्विक छापाचा हसरा भाव चेहऱ्यावर आणला आणि त्यांच्याकडे पाहिले, पण त्याच्याकडे कोऱ्या नजरेने पाहून त्यांनी सरळ नजर वळवली.

मग त्यांचं वाहन आलं. हेलिकॉनवर या वाहनाला ग्रॅव्हीबस म्हणत. जुनाट प्रकार होता तो. आतमध्ये वीस बाकं होती. प्रत्येक बाकावर चार लोकं बसू शकतील अशी. प्रत्येक बाकासाठी बसच्या दोन्ही बाजूंनी दारं उघडत होती. ते थांबल्यावर प्रवासी दोन्ही बाजूंकडून उतरू लागले. सेल्डनला क्षणभर काळजीच वाटली की येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांखाली कुणी आलं तर... पण त्याने पाहिलं ती बस थांबल्याबरोबर सगळी वाहनं जिथल्या तिथे थांबून राहिली, आणि ती सुरू झाल्यानंतरच सुरू झाली.

डॉर्सने सेल्डनला जरासा धक्का दिला- दोन शेजारशेजारच्या जागा असलेल्या बाकाकडे लक्ष वेधलं. तो पुढे गेल्यावर ती मागोमाग गेली. पुरुष नेहमीच पुढे असत, आधी चढत, आधी उतरत हे त्याने पाहून ठेवलं.

“हे पहा,” तिने समोरच्या बाकाच्या पाठीवर असलेला चौकोन दाखवला. ते वाहन सुरू होताच त्या चौकोनात शब्द उमटले. पुढच्या स्टॉपचं नाव त्यात येत होतं. तिथल्या महत्त्वाच्या इमारती कोणत्या, चौक कोणते ही माहितीही येत होती.

“हां, म्हणजे आता आपल्याला आपण कुठे आहोत, बस कुठे बदलायची आहे वगैरे कळेल. चला अगदीच काही रानटी जागा नाही ही.”

“बरं झालं,” सेल्डन म्हणाला. थोड्या वेळाने डॉर्सकडे झुकून तो म्हणाला, “आपल्याकडे कुणीही पाहात नाहीये. सार्वजनिक जागी आपापलं खाजगीपण जपण्यासाठी जणू कृत्रिम भिंतीच उभारल्या आहेत. लक्षात आलं तुझ्या?”

“मी तर ते गृहीतच धरतेय. हा तुझा सायकोहिस्ट्रीचा नियम वगैरे बनवणार असलास तर कुणालाही त्याचं कौतुक वाटायचं नाही.”

डॉर्सला वाटलेलं त्याचप्रमाणे त्यांच्या समोरच्या चौकोनात त्यांच्या उतरण्याच्या जागेची माहिती आली. जिथून सॅक्रेटोरियमला जाण्यासाठी थेट बस मिळाली असती तो चौक.

ते बाहेर पडले आणि मग तिथं त्यांना थोडा वेळ थांबावं लागलं. त्या चौकातून काही बसेस आधीच गेल्या होत्या, पण आणखी एक ग्रॅव्हीबस येताना दिसलीच. ते एका गजबजलेल्या रूटवर होते यात नवल नव्हतंच. सॅक्रेटोरियम या प्रभागाच्या केंद्रस्थानी असणं स्वाभाविकच होतं.

ते ग्रॅव्हीबसमध्ये चढले आणि सेल्डन पुटपुटला, “आपल्याला पैसे भरायला-”

“या नकाशात म्हटलंय की सार्वजनिक वाहतूक व्यवस्था फुकट आहे.” सेल्डनने खालचा ओठ पुढे काढत म्हटलं, “हे किती सभ्यतेला धरून आहे. इथे काहीच एकसंध नाही. मागासलेपणा आणि जंगलीपणाही एकसंध नाही.”

५२.

सेल्डनची नजर किंचित बाजूला वळली. त्याच्या शेजारी बसलेला मनुष्य अगदीच बारीक होता आणि वयोवृद्धही वाटत होता. त्याचे डोळे गडद तपकिरी होते आणि रंग जरासा सावळा होता. सेल्डनला वाटलं की त्याचे केस उपटलेले नसते तर नक्की काळे केस दिसले असते त्याच्या डोक्यावर.

त्याने पुन्हा नजर समोर वळवली. हा बांधव जरा वेगळा वाटला. त्याने आत्तापर्यंत जरा निरखून पाहिलेले जे काही बांधव होते ते सगळे उंच, गोऱ्या रंगाचे आणि निळसर वा राखी डोळयांचे होते. अर्थात त्यावरून काही सर्वसाधारण नियम बनण्यासारखा नव्हता.

मग त्याला जाणवलं की त्याच्या कर्टलच्या उजव्या बाहीला हलकेच स्पर्श झालेला. आणि त्याने कुचमतच कडेला वळून पाहिलं. त्याच्या नजरेसमोर एक कार्ड आलं- त्यावर पुसट अक्षरांत लिहिलेलं- “काळजी घ्या, टोळीवाले!”

सेल्डन दचकलाच आणि त्याचा हात आपोआपच डोक्याकडे गेला. तो कडेचा माणूस हलकेच कुजबुजलेला- “केस.”

सेल्डनच्या हाताला कपाळावरच्या केसांचा स्पर्श झाला. कधीतरी ती टोपी हलली असणार. त्याने शक्य तितक्या जपून, कळणार नाही अशा बेताने टोपी नीट केली. आणि मग डोक्यावर थोपटल्याचा बहाणा करून त्याने ती घट्ट बसवली.

त्याने शेजारच्या त्या माणसाला कोपराने खुणावत अगदी पुसटशी मान झुकवत म्हटलं, “थॅन्क्यू.”

तो माणूस हसला आणि अगदी सहज बोलल्यासारखा म्हणाला, “सॅक्रेटोरियमला चाललात?”

“हो, चाललोय.”

“ते कळतंय. मी पण तिकडेच चाललोय. आपण एकत्रच उतरू.” तो छान हसत होता.

“मी मी... माझ्या-”

“तुमच्या सोबत तुमची स्त्री आहे. हो हो, अर्थातच. एकत्रच उतरू तिघेही.”

सेल्डनला काय प्रतिक्रिया द्यावी कळे ना.

त्याने झर्रकन दुसऱ्याबाजूला नजर फिरवली तेव्हा त्याला कळलं की डॉर्सची नजर सरळ समोर खिळलेली. पुरुषांच्या चर्चेत ती एखाद्या आदर्श भगिनीप्रमाणेच जराही दखल देत नव्हती. पण सेल्डनला गुडघ्यावर हलकेसे थोपटणे जाणवले. याचा अर्थ ‘ठीक आहे’ असाच असावा असं त्याने सोयीने गृहीत धरलं.

आणि सभ्यतेला धरूनच होतं ते. मग तो उत्तरला, “होहो, नक्कीच.”

मग सॅक्रेटोरियम जवळ आल्याची सूचना समोरच्या पाटीवर झळकेपर्यंत ते गप्प बसून राहिले. त्यांचा मायकोजेनियन मित्र उतरण्यासाठी उठला. ग्रॅव्हीबसने सॅक्रेटोरियमच्या वर्तुळाकार मैदानाच्या कडेने वळण घेतलं आणि थांबली. सगळेच उतरायच्या तयारीत होते आणि प्रथम पुरुष मागोमाग बायका असे सगळे उतरले.

त्या मायकोजेनियनचा आवाज वयपरत्वे जरासा कापत असावा, पण त्याचा आवाज आनंदी होता. तो म्हणाला, “लंचला खरं तर वेळ आहे अजून, मित्रांनो, पण

विश्वास ठेवा, लवकरच भयंकर गर्दी होईल इथे. तुम्ही काहीतरी थोडंसं विकत घेऊन बाहेरच बसून खाणार का? मला ही जागा चांगली माहितीची आहे- एक चांगलं ठिकाण माहीत आहे मला.''

सेल्डनला शंका आली, की हा भोळ्याभाबड्या टोळीवाल्यांना कैचीत पकडण्यासाठी चालवलेला प्रयत्न तर नसेल- काहीतरी भयंकर महाग किंवा फडतूस विकत घ्यायला लावण्यासाठी... पण मग त्याने करून बघायचं ठरवलं.

''किती चांगले आहात तुम्ही,'' तो म्हणाला, ''आम्हाला काही इथली फारशी माहिती नाही, त्यामुळे तुम्हीच दाखवा आता.''

त्यांनी एका उघड्या टपरीवरून खायला काहीतरी घेतलं. सॅंडविचेस आणि दुधासारखं दिसणारं काहीतरी पेय. दिवस मोठा प्रसन्न होता आणि तो म्हातारा मायकोजेनियन म्हणाला तुम्ही पर्यटक आहात, त्यामुळे आता सॅक्रॅटोरियमजवळच्या मैदानात बसून जरा परिसर न्याहाळता येईल तुम्हाला.

चालताचालता सेल्डनच्या लक्षात आलं की या सॅक्रॅटोरियमचा काही भाग काहीसा सम्राटाच्या प्रासादासारखा दिसत होता- आणि समोरचा बगीचासुद्धा प्रासादासमोरच्या बागेची प्रमाणबद्ध लघु प्रतिकृती. मायकोजेनियन्सना साम्राज्याचं काही कौतुक असेल अशी शंकाही त्याला आली नव्हती. उलट त्यांना त्यांचा द्वेषच वाटत असावा- पण तरीही सांस्कृतिक आकर्षण काही अंशी असावंच.

''किती सुंदर आहे हे,'' तो मायकोजेनियन गर्वानेच म्हणाला.

''अगदी,'' सेल्डन म्हणाला, ''दिवसाउजेडी तर सारे चमकते आहे.''

''ही भोवतीची बाग आहे ना,'' तो म्हणाला, ''ती आमच्या मूळ ग्रहावरच्या सम्राटाच्या बागेसारखीच तयार केली आहे. मिनिएचर आहे अर्थात्.''

“तुम्ही सम्राटाची बाग कधी पाहिली आहे?” सेल्डनने अगदी सावधपणे विचारलं.

मायकोजेनियनला प्रश्नाचा रोख कळला, तो नाराज न होता उत्तरला, “त्यांनीही आमच्या मूळ ग्रहावरच्या त्या बागेची शक्य तेवढी नक्कल केली आहे.”

सेल्डनला हे अशक्य वाटले, पण तो काहीच बोलला नाही. ते एका अर्धगोलाकार पांढऱ्या दगडासारख्या बाकापाशी आले. ते उजेडात छान चमचमत होते.

“फारच छान,” मायकोजेनियनच्या डोळ्यांत आनंद उतरला, “माझी जागा कुणी घेतलेली नाही. माझी म्हणजे- माझी लाडकी म्हणून हो. इथून सॅक्राटोरियमच्या कडेच्या भिंती झाडांच्या ओळीपलिकडे दिसतात ते दृश्य फार देखणं दिसतं. बसा बसा. हे बाक अजिबात गार नाही. आणि तुमच्या बरोबरच्या त्यांनाही सांगा बसायला. ती टोळीवाली स्त्री असल्यामुळे त्यांच्या प्रथा वेगळया असणार. त्यांना बोलायचं असेल तर बोलू देत.” डॉर्सने त्याच्याकडे जरा कठोर नजरेने पाहिलं आणि ती खाली बसली.

या मायकोजेनियनबरोबर काही काळ काढावाच लागणार हे उमजून सेल्डनने हात पुढे केला, आणि म्हणाला, “मी हॅरि आणि माझ्या या स्त्री सहकारी म्हणजे- डॉर्स. आम्ही आकडे वापरत नाही.”

“ज्याच्यात्याच्या पद्धती...” तो उत्साहाने म्हणाला, “मी मायसेलियम सेवन्टीटू. आमचा समूह खूप मोठा आहे.”

“मायसेलियम?” सेल्डनने जरा चाचरत विचारलं.

“आश्चर्य वाटतंय तुला,” मायसेलियम म्हणाला, “म्हणजे तुम्ही बहुतेक आमच्या ज्येष्ठ घराण्यातल्या लोकांनाच भेटले असणार आजवर. त्यांची नावं क्लाउड, सनशाईन आणि स्टारलाइट अशी एकदम खगोलीय असतात.”

“तसं दिसतंय खरं-” सेल्डन म्हणाला.

“हं, आता जरा खालच्या वर्गातल्यांना भेटून घ्या. आम्ही आमची नावं सगळी जमिनीतून घेतो, किंवा आम्ही जे सूक्ष्म जीव वाढवतो त्यांच्यावरून. अगदी व्यवस्थित प्रतिष्ठित.”

“नक्कीच,” सेल्डन म्हणाला, “आणि ते... मघाशी ग्रॅव्हीबसमध्ये माझ्या ते हे लक्षात आणून दिल्याबद्दल पुन्हा एकदा आभार बरं का.”

“हे बघा,” मायसेलियम सेव्हन्टीटू म्हणाला, “मी तुमचा बराच बराच त्रास वाचवला. मी पाहाण्याआधी एखाद्या भगिनीने ते पाहिलं असतं तर ती किंचाळलीच असती, आणि मग सारे बंधू तुम्हाला बसमधून बाहेर ढकलायला धावले असते. बस थांबायचीही वाट पाहिली न सती त्यांनी.”

डॉर्स जराशी पुढे झुकली. जणू सेल्डनकडे पाहाण्याच्या मिषाने त्याच्या दिशेने पाहात म्हणाली, “तुम्ही स्वतः अशा प्रकारे का बरं वागला नाहीत?”

“मी? मला टोळीवाल्यांबद्दल शत्रुत्व वाटत नाही. मी अभ्यासक आहे.”

“अभ्यासक?”

“हो, माझ्या समूहातला मी पहिलाच. सॅक्रॅटोरियम स्कूलमध्ये शिकलो आणि चांगली प्रगती केली. सगळ्या प्राचीन कलांमध्ये मी प्रवीण आहे आणि टोळीवाल्यांच्या बुकफिल्म्स आणि पुस्तकं ठेवतात तिथे त्या ग्रंथालयांत प्रवेश करण्याचे लायसन्स आहे माझ्याकडे- मला हवं ते मी वाचू शकतो, पाहू शकतो. आमच्याकडे कॉम्प्युटराइझ्ड लायब्ररी आहे तिचाही मी वापर करू शकतो. हे असं

वाचलं की मनाच्या कक्षा जरा रुंदावतातच. थोडे केस दिसले तर मला काही विशेष वाटत नाही. केस असलेले अनेक स्त्रीपुरुष चित्रात मी पाहिले आहेत." त्याने डॉर्सकडे झटकन दृष्टीक्षेप टाकला.

ते बराच वेळ काही न बोलता खात राहिले. मग सेल्डन म्हणाला, "सॅक्रेटोरियममध्ये शिरणारा प्रत्येक बांधव लाल सॅश गळ्याभोवती बांधून आत जातोय असं दिसतंय."

"हो हो," मायसेलियम सेव्हन्टीटू उत्तरला. "डाव्या खांद्यावरून घेऊन कंबरेच्या उजवीकडे बांधतात तो. बहुतेकजण फार सुंदर भरतकाम करून घेतात त्यावर."

"कशासाठी असतं ते?"

"त्याला ओबिआ म्हणतात. सॅक्रेटोरियममध्ये शिरताना जो आनंद होतो तो व्यक्त करण्यासाठी आणि त्याच्या रक्षणासाठी आम्ही रक्त सांडायलाही तयार आहोत हे व्यक्त करण्यासाठी."

"रक्त?" डॉर्सने आठ्या घालत विचारलं.

"केवळ प्रतीकात्मक. सॅक्रेटोरियमसाठी रक्त सांडल्याचं मी तरी कुणाकडून ऐकलेलं नाही. आणि हो एवढा काही आनंदही नसतो त्यात. हरवलेल्या जगासाठी विव्हळणे, शोक करणे आणि लोटांगणं घालणे हाच प्रकार जास्त असतो." त्याचा स्वर खाली आला- "अगदीच मूर्खपणा."

डॉर्स म्हणाली, "तुमची तशी श्रद्धा नाही?"

"मी अभ्यासक आहे," मायसेलियमच्या आवाजात अभिमान होता. तो हसताच त्याच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या अधिकच गडद झाल्या आणि त्याचे वय

दिसू लागले. हा मनुष्य किती वृद्ध असेल बरं- असा विचार सेल्डनच्या मनात आला. काही शतकं? नाही. तसं शक्य नव्हतं. पण तरीही.

“काय वय असेल तुमचं?” सेल्डनच्या तोंडून अचानक प्रश्न गेला.

पण मायसेलियम सेव्हन्टीटूच्या मुद्रेवर नाराजी उमटली नाही. न थबकता त्याने उत्तर दिलं, “सदुसष्ट.”

सेल्डनला रहावलं नाही, “मी असं ऐकलं की तुम्ही लोक असं मानता की पूर्वीच्या काळी लोक अनेक शतकं जगत असतं.”

मायसेलियमने सेल्डनकडे किंचित विचित्र नजरेने पाहिलं, “आता हे कुठून कळलं तुम्हाला? कुणीतरी नको तितकं बोललं आहे बहुतेक तुमच्याशी... पण खरंय हे म्हणा... तसा असतो काहीजणांचा विश्वास. फक्त अशिक्षित लोकच तसं मानतात. पण आमचे ज्येष्ठ लोक तसा विश्वास लोकांनी बाळगावा यासाठी प्रोत्साहनच देत असतात- कारण त्यामुळे आम्ही श्रेष्ठ आहोत असं होतं. पण वास्तवात आमची आयुर्मर्यादा जरा जास्तच आहे- याचं कारण आहे आमचं अन्न अधिक पोषक आहे. पण तरीही एक शतकभर जगणारे लोक अगदीच दुर्मिळ आहेत.”

“म्हणजे मायकोजेनियन्स श्रेष्ठ आहेत असं तुम्ही मानत नाही तर.” सेल्डन म्हणाला.

मायसेलियम सेव्हन्टीटू म्हणाला, “ठीक आहेत तसे मायकोजेनियन्स. ते कुणापेक्षा कमी प्रतीचे तर नक्कीच नाहीत. तरीही- मला वाटतं सगळी माणसं- आणि त्यात स्त्रियाही आल्या- समान आहेत.” तो डॉर्सकडे पाहात म्हणाला.

“मला नाही वाटत,” सेल्डन म्हणाला, “याच्याशी तुमच्यातले फार लोक सहमत असतील असं.”

“किंवा तुमच्यातलेही-” मायसेलियमच्या आवाजात फिकटशी नापसंती होती, “माझा त्यावर विश्वास आहे. एक अभ्यासक म्हणून असावाच लागतो. मी टोळीवाल्यांचं सारं महान साहित्य वाचून काढलंय. मला तुमच्या संस्कृतीची समज आहे बऱ्यापैकी. त्यावर मी लेखही लिहिलेत. मी इथे एखाद्या पक्ष्याबरोबर जितक्या आरामात बसेन तितक्याच आरामात तुमच्याबरोबरही बसू शकतो.”

डॉर्सने जराशा धारदार स्वरात विचारलं, “तुम्हाला टोळीवाल्यांच्या वर्तनाची समज आहे याचा तुम्हाला अभिमान दिसतो. कधी मायकोजेनच्या बाहेर प्रवास केला आहे?”

मायसेलियम सेव्हन्टीटू किंचित आकसल्यासारखा होत उत्तरला, “नाही.”

“का बरं? तसं केलंत तर तुमची आमच्याशी जास्त चांगली ओळख होऊ शकेल.”

“नाही बरोबर वाटत मला ते. मला विग घालायला लागेल. मला शरम वाटेल त्याची.”

डॉर्स म्हणाली, “विग कशाला? टक्कल असलं तरी चालतं.”

“छे,” मायसेलियम सेवन्टीटू म्हणाला, “एवढा वेडेपणा तर मी नक्कीच करणार नाही. सगळे केसवाले छळतील मला.”

“छळतील? कां?” डॉर्सने विचारलं, “ट्रॅन्टोरवर सगळीकडे नैसर्गिकरित्या टक्कल पडलेले अनेकजण आहेत. इतर जगांतही आहेत.”

“माझ्या वडलांना केव्हाच टक्कल पडलंय,” सेल्डन सुस्कारत म्हणाला, “आणि मला वाटतं, येत्या काही वर्षांत मलाही टक्कल पडेल. आत्ताच माझे केस जरा विरळ होऊ लागलेत.”

“त्याला टक्कल म्हणत नाहीत.” मायसेलियम सेवन्टीटू म्हणाला, “तुम्ही सगळे कडेने केस राखता आणि डोळ्यांवरही केस असतात तुमच्या. मी टक्कल म्हणतोय ते अगदी बिनकेसांचं.”

“शरीरावर कुठेही केस असता कामा नयेत?” डॉर्सने कुतूहलाने विचारलं.

पण आता मात्र मायसेलियम सेव्हन्टीटू जरा रागावल्यासारखा दिसला. तो गप्पच राहिला.

सेल्डनने संभाषणाची गाडी पुन्हा मूळपदावर आणायला घाईघाईने विषय बदलला, “मला सांगा, मायसेलियम सेव्हन्टीटू, टोळीवाले लोक केवळ पाहायला म्हणून सॅक्रॅटोरियममध्ये आत जाऊ शकतात का?”

मायसेलियमने जोरजोरात मान हलवली, “नाही नाही, कधीच नाही. फक्त उगवत्या जगाच्या पुत्रांसाठीच आत प्रवेश आहे.”

“फक्त पुत्रांसाठीच का?”

मायसेलियम सेव्हन्टीटूला धक्क्यातून सावरायलाच क्षणभर गेला, मग तो क्षमाशील स्वरात म्हणाला, “वेल, तुम्ही टोळीवाले आहात, उगवत्या जगाच्या कन्या काही विशिष्ट काळात, विशिष्ट वेळात तिथे जाऊ शकतात. तशी परंपरा आहे. ते काही मला पसंत आहे असं नाही, पण आहे ते आहे. माझ्यावर अवलंबून असतं तर मी म्हणालो असतो, जा खुशाल- बघा काही आनंद मिळतोय का. मी जात नाही, तरी तुम्ही घ्या जाऊन.”

“तुम्ही कधीच जात नाही आत?”

“मी लहान होतो तेव्हा माझे पालक मला घेऊन गेले होते पण-” त्याने मान झटकली, “लोक नुसतेच पुस्तकाकडे बघत, ते वाचत होते आणि मग गेलेल्या दिवसांसाठी उसासे टाकत, आसवं गाळत होते. फार वैतागवाणं होतं ते. एकमेकांशी

बोलायचं नाही, आपसात हसायचं नाही. एकमेकांकडे बघायलाही बंदी. एकाग्रचित्त होऊन केवळ हरवलेल्या जगाचाच विचार करायचा- अगदी पूर्णपणे.'' त्याने हाताने उडवून लावल्यासारखं केलं, ''मला नको तो प्रकार. मी अभ्यासक आहे आणि सगळं जग माझ्यासमोर खुलं व्हावं असं वाटतं मला.''

''छान,'' सेल्डनला जणू वाट सापडली, ''आम्हालाही तसंच वाटतं. आम्हीही अभ्यासक आहोत- डॉर्स आणि मी.''

''माहीत आहे मला ते.'' मायसेलियम सेव्हन्टीटू म्हणाला.

''तुम्हाला माहीत आहे? तुम्हाला कसं काय माहीत आहे?''

''असणारच ना. मायकोजेनवर फक्त सम्राटाचे अधिकारी किंवा मुत्सद्दी येतात किंवा मग मोठे व्यापारी किंवा अभ्यासक. आणि तुमच्यावर तर अभ्यासक असल्याची मुद्रा स्पष्टच आहे. त्यामुळेच तर मी तुमच्याकडे ओढला गेलो. अभ्यासक एकत्र येतातच.'' तो अगदी आनंदाने हसला.

''ते तर आहेच. मी गणितज्ञ आहे. डॉर्स इतिहासज्ञ आहे. आणि तुम्ही?''

''माझा संस्कृतींचा अभ्यास आहे. मी टोळीवाल्यांचं सारं महत्त्वाचं साहित्य वाचलंय- लिसॉर, मेन्टोन, नोव्हिगॉर-''

''आणि आम्हीही तुमच्याकडचं थोर साहित्य वाचलं आहे. उदाहरणार्थ मी तुमच्या हरवलेल्या जगासंबंधीचां पवित्र ग्रंथ वाचला आहे.''

मायसेलियम सेव्हन्टीटूचे डोळे आश्चर्याने विस्फारले. त्याचा रंग जणू फिकट पडला. ''वाचलाय? कसा? कुठे?''

''आमच्या विद्यापीठात त्याच्या प्रती आहेत आणि परवानगी मिळवून त्या वाचता येतात.''

"पवित्र ग्रंथाच्या प्रती?"

"होय."

"आमच्या ज्येष्ठांना माहीत असेल का हे?"

सेल्डन म्हणाला, "मी रोबॉट्सबद्दलही वाचलंय."

"रोबॉट्स?"

"हो. म्हणून तर मला सॅक्रॅटोरियममध्ये जायला मिळावं असं वाटतं. मला तो रोबॉट बघायचाय." (डॉर्सने त्याच्या घोट्याला हलकेच लाथ मारली. पण त्याने साफ दुर्लक्ष केलं.)

मायसेलियम सेव्हन्टीटू जरा अस्वस्थ होत उत्तरला, "माझा असल्या गोष्टींवर विश्वास नाही. अभ्यासकांनी ठेवूच नये." पण त्याने विचलित होत इकडेतिकडे पाहायला सुरुवात केली. जणू कुणी आपलं संभाषण ऐकेल अशी भीती त्याला वाटत होती.

सेल्डन म्हणाला, "मी ऐकलंय- की सॅक्रॅटोरियममध्ये अजूनही एक रोबॉट आहे."

मायसेलियम सेव्हन्टीटू म्हणाला, "असल्या फालतूगिरीबद्दल मला बोलायचंही नाहीये."

सेल्डनने धागा सोडला नाही, "तो सॅक्रॅटोरियममध्ये असलाच तर कुठे असू शकतो?"

"तो तिथे असला तरीही मी तुम्हाला काय सांगणार- मी तर तिथे अगदी लहानपणी गेलो होतो. त्यानंतर नाहीच."

"तिथे एखादी गुप्त जागा आहे का वगैरे काही माहीत आहे?"

“ज्येष्ठ गुरूंचे उच्चासन आहे तिथे- आय़री म्हणतात त्याला. तिथे फक्त ज्येष्ठच जातात. पण तिथे तसं काहीच नाहीये.

“तुम्ही तिथे गेला होतात कधी?”

“नाही, अर्थातच नाही.”

“मग तुम्हाला कसं माहीत असणार?”

“तिथे एखादं डाळिंबांच झाड नाही की काय मला माहीत नाही, तिथे लेझर-ऑर्गन नाही का मला माहीत नाही, तिथं असल्या हजारो वस्तू नाहीत की काय मला माहीत नाही. पण त्या तिथे नाहीत याबद्दलचं माझं अज्ञान त्या तिथे आहेत असं काही सिद्ध करतात काय?”

क्षणभर सेल्डन निरुत्तर झाला.

मायसेलियम सेव्हन्टीटूच्या चिंतित मुद्रेतून एक स्मित तरळले. तो म्हणाला, “एक अभ्यासकच अशी कारणमीमांसा देऊ शकतो. मला हाताळणं एवढं सोपं नाही बरं. तरीही मी तुम्हाला एक सल्ला अवश्य देईन, ज्येष्ठांच्या आयरीकडे वर जाण्याचा प्रयत्नसुद्धा करू नका. त्यांना एक टोळीवाला आत सापडला तर काय होईल ते तुम्हाला आवडण्यासारखं नक्कीच नसेल. चला तर मग, उगवत्या जगाकडून अनेकोत्तम शुभेच्छा.” तो अचानक उठून उभा राहिला आणि घाईघाईने चालता झाला.

सेल्डन चकित होऊन तो गेला त्या दिशेने पाहात राहिला. “हा असा का उठून गेला?”

“मला वाटतं,” डॉर्स म्हणाली, “कारण कुणीतरी या दिशेने येतंय.”

आणि खरंच कुणीतरी येत होतं. शुभ्र कर्टल घातलेला आणि त्यावर लाल चमकदार सुंदर सॅश घेतलेला एक उंच माणूस त्यांच्याच दिशेने झपझप येत होता.

त्याची मुद्रा गंभीर होती, त्यावर अधिकाराचा लक्षणीय ठसा स्पष्ट होता आणि त्यावरची नाराजीही लपत नव्हती.

## ५३

तो नवा मायकोजेनियन जवळ येतायेता सेल्डन उठून उभा राहिला. ही कृती विनम्रता दाखवणारी होती की नव्हती हे त्याला अजिबात माहीत नव्हतं- पण असं केल्याने नुकसान तर नक्कीच होणार नाही एवढं त्याला जाणवलं. डॉर्स वेनाबिलीसुद्धा उठून आणि नजर खाली लावून उभी राहिली.

तो माणूस समोर उभा राहिला. तोही वयोवृद्ध होता, पण मायसेलियम सेव्हन्टीटूच्या मानाने त्याचं वय जाणवत नव्हतं. वयामुळ त्याचा छानसा चेहरा अधिक डौलदार दिसत होता. त्याचं केशविहीन डोकं गोल गरगरीत होतं आणि डोळे अगदी निळेभोर. त्याच्या चमकदार लाल पटक्याच्या संगतीत ते फारच उठून दिसत होते.

हा नवागत म्हणाला, "तुम्ही टोळीवाले आहात असं दिसतंय." त्याचा आवाज सेल्डनच्या अपेक्षेपेक्षा जरा मोठाच होता, पण तो अगदी सावकाश शब्द उच्चारत होता. जणू प्रत्येक शब्दावर आपल्या अधिकाराचं वजन पडेल याची काळजी घेत बोलत होता.

"होय, आहोत." सेल्डन नम्रपणे पण ठाम स्वरात म्हणाला. समोरच्याचा मान राखताना आपल्याकडे कमीपणा घेण्याची गरज नव्हती.

"तुमची नावं काय?"

"मी हेलिकॉनचा हॅरि सेल्डन, या माझ्या सहकारी- सिन्नाहून आलेल्या डॉर्स वेनाबिली. आणि आपलं नाव काय आहे बरं?"

त्याने नाराजीने डोळे बारीक केले, पण त्यालाही सेल्डनच्या स्वरातील अधिकारवाणी जाणवली. “मी स्कायस्ट्रिप टू,” त्याने मस्तक आणखी उंचावत उत्तर दिले. “मी सॅक्रॅटोरियममध्ये ज्येष्ठ आहे. आणि तुमचे पद काय आहे, टोळीवाले?”

“आम्ही,” सेल्डनने सर्वनामावर विशेष जोर दिला, “आम्ही स्ट्रीलिंग विद्यापीठातले अभ्यासक आहोत. मी गणितज्ञ आहे, आणि या इतिहासतज्ञ आहेत. आम्हाला मायकोजेनियन आचारविचारांचा अभ्यास करण्यात रस आहे.”

“कुणाच्या हुकूमावरून?”

“सनमास्टर फोर्टीन यांच्या- त्यांनी आम्ही आल्यावर आमचे स्वागत केले होते.”

स्कायस्ट्रिप टू क्षणभर गप्प झाला, आणि मग त्याच्या मुद्रेवर किंचितसे हसू झळकले आणि त्याने अगदी मवाळ, दयार्द्र मुद्रा धारण केली. तो म्हणाला, “ते तर उच्चतर ज्येष्ठ आहेत. मी ओळखतो त्यांना.”

“असणारच.” सेल्डन ठाम स्वरात उत्तरला, “आणखी काही, ज्येष्ठ बंधू?”

“होय,” त्याने पुन्हा एकदा आपला अधिकार जमवण्याचा प्रयत्न केला, “मी येताना पाहून घाईघाईने चालता झालेला तो तुमच्याबरोबरचा माणूस कोण होता?”

सेल्डनने मान हलवली, “आधी कधी भेटलेलो नाही आम्ही त्याला. त्याच्याबद्दलची काहीही माहिती नाही आम्हाला. अचानक भेट झाली आणि आम्ही त्याला सॅक्रॅटोरियमबद्दल विचारत होतो.”

“काय विचारलंत?”

“दोन प्रश्न होते. ही इमारत म्हणजेच सॅक्रॅटोरियम आहे का आणि टोळीवाल्यांना आत प्रवेश असतो कां. त्याने पहिल्या प्रश्नाला होकार भरला आणि दुसऱ्याला नकार.”

"बरोबर आहे. तुम्हाला सॅक्रॅटोरियममध्ये काय रस आहे?"

"महोदय, आम्ही इथे मायकोजेनवरील जीवनपद्धतीची अभ्यास करायला आलो आहोत आणि सॅक्रॅटोरियम हे मायकोजेनचे हृदय आणि मन असल्यासारखे आहे ना?"

"ते केवळ आमचे आहे, आणि केवळ आमच्यासाठीच राखीव आहे."

"आमच्या अभ्यासासाठी सर्वोच्च ज्येष्ठाने आम्हाला परवानगी दिली असली तरीही?"

"तुम्हाला खरोखरच त्यांची परवानगी आहे काय?"

सेल्डन अगदी निमिषार्धासाठी थबकला, आणि डॉर्सची नजर खाली असतानाच त्याच्याकडे तिरपी वळली. त्याने ठरवलं, की जास्त खोटं बोलण्यात अर्थ नाही. तो उत्तरला, "नाही, अजूनतरी नाही."

"आणि कधीही मिळणार नाही," तो ज्येष्ठ म्हणाला, "मायकोजेनवर येण्यासाठी तुम्हाला अधिकृत परवानगी मिळाली असेलही, पण अगदी सर्वोच्च अधिकारी व्यक्तीसुद्धा लोकमताचा असा संपूर्ण अनादर करू शकत नाही. आम्हाला आमच्या सॅक्रॅटोरियमचे मोल केवळ अजोड आहे, आणि टोळीवाले मायकोजेनच्या इतर भागात असताना लोकांना जेवढे नकोसे वाटतात त्याच्या कैक पटींनी जास्त नकोसे असते त्यांचे सॅक्रॅटोरियमच्या सान्निध्यात असणे. एखादा फाजील उत्साही माणूस पुरेसा आहे- त्याने आरोळी ठोकली- आक्रमण... की संपलं- हा अगदी शांत वाटणारा जमावही खवळून तुमच्या चिंधड्या उडवायला सज्ज होईल. आणि हे अगदी शब्दशः असंच घडू शकतं. तुमच्या भल्यासाठी सांगतो, अगदी सर्वोच्च ज्येष्ठगुरूंनी तुम्हाला दया दाखवली असली तरीही- आता निघा, आत्ता!"

"पण सॅक्रॅटोरियम-" सेल्डन हट्टीपणे बोलत राहिला. डॉर्स त्याच्या कर्टलला किंचित ओढत होती.

"सॅक्रॅटोरियममध्ये काय आहे याच्याशी तुमचा काय संबंध?" ज्येष्ठ म्हणाला, "इथून दिसते आहे तेवढे पुरे आहे. आत काय आहे त्यात तुम्ही पाहावं असं काहीही नाही."

"तिथे एक रोबॉट आहे," सेल्डन म्हणाला.

तो ज्येष्ठगुरू सेल्डनकडे धक्का बसल्यागत बघत राहिला आणि मग सेल्डनच्या कानाजवळ तोंड आणून तो तीक्ष्ण स्वरात कुजबुजला, "आता इथून निघा, नाहीतर मी आक्रमणाची ललकारी देईन. सर्वोच्च ज्येष्ठाचा तुझ्या येण्यात सहभाग आहे म्हणून, नाहीतर मी एवढीही संधी तुला दिली नसती इथून निसटायची."

आणि मग डॉर्सने अनपेक्षितरित्या जोर लावून सेल्डनला खेचून काढलं. तो धडपडलाच असता, पण त्याने तोल सावरला आणि तिच्या मागोमाग चालता झाला.

५४

दुसऱ्या दिवशी सकाळी डॉर्सने नाश्त्याच्या वेळी हा विषय काढला- आणि तो ही अगदी सेल्डनला दुखावणाऱ्या रीतीने.

"वेल, कालचा गोंधळ फारच छान होता म्हटलं." ती म्हणाली.

सेल्डनला वाटलेलं हा विषय आता संपलाय. त्यामुळे त्याचा चेहरा खर्रकन उतरला. "तो गोंधळ कसा काय ठरतो?"

“हाकलून काढलं त्याने आपल्याला, आणि कशासाठी? आपण काय मिळवलं त्यातून?”

“तिथे रोबॉट आहे हे तर नक्कीच झालं ना.”

“मायसेलियम सेव्हन्टीटू म्हणालेला ना, तिथे असं काही नाही म्हणून.”

“म्हणाला ना. तो अभ्यासक आहे- निदान तसं समजतो तरी. आणि त्याला त्या सॅक्रॅटोरियमबद्दल जे माहीत नाही- त्याने बहुतेक त्याची ती लायब्ररी भरून जाईल. तू त्या ज्येष्ठगुरूची प्रतिक्रिया पाहिलीस ना.”

“पाहिली ना.”

“तिथे आत रोबॉट नसता तर त्याची प्रतिक्रिया अशी झालीच नसती. मला माहीत आहे हे पाहून तो प्रचंड घाबरला.”

“असं तुला वाटतंय, हॅरी. आणि समज असला तरीही आपण आत जाऊ शकणार नाही.”

“प्रयत्न तर करू ना. नाश्ता झाला की आपण बाहेर पडू. माझ्यासाठी ती ओबिआ की काय ते घेऊ. मी ती घालेन, अगदी भक्तीत लीन झालेल्या नजरेने खाली पाहात सरळ आत शिरेन.”

“ही कातडी टोपी घालून? तुला ते क्षणार्धात ओळखतील.”

“नाही ओळखणार. आपण लायब्ररीत जाऊ या. टोळीवाल्यांची माहिती जिथे आहे तिथे जाऊ या. लायब्ररी म्हणजे त्या सॅक्रॅटोरियमची मागचीच बाजू आहे असं मला वाटतं. तिथून बहुतेक सॅक्रॅटोरियममध्ये जायला दार असेल.”

“तिथून तर तुला लगेच उचलतील.”

“अजिबात नाही. तू ऐकलंस ना मायसेलियम सेव्हन्टीटू काय म्हणाला ते. सगळेजण खाली पाहात त्यांच्या त्या महान ऑरोरावरच्या हरवलेल्या जगाचा दुःखशोक करत असतात. कुणी कुणाकडे पाहात नाही. तसं करणं हा तर मोठाच शिस्तभंग असेल. मग मी ज्येष्ठगुरूंची ती आय़री की काय ती शोधून काढेन-”

“आपोआप?”

“मायसेलियम सेव्हन्टीटू एकदा म्हणाला की मी त्या ज्येष्ठांच्या आयरीकडे वर जाऊ नये असाच त्याचा सल्ला असेल. वर. म्हणजे ती त्या मनोऱ्यातच असणार कुठेतरी. मुख्य मनोऱ्यात.”

डॉर्सने मान हलवली. “मला त्या माणसाचे शब्द तसेच्या तसे आठवत नाहीयेत, आणि तुलाही आठवत नसणार. हा अगदीच कच्चा दुवा आहे.- पण थांब.” ती अचानक कपाळाला आठ्या घालत थांबली.

“काय झालं?” सेल्डनने विचारलं.

“एक प्राचीन शब्द आहे- आयरी. त्याचा अर्थ आहे- उंचावरचं घरटं.”

“आः! बघितलंस- तू ज्याला गोंधळ म्हणतेस त्यातून आपल्याला बऱ्याच गोष्टी कळल्या की. आणि जर मला एखादा जिवंत रोबॉट मिळाला- तो ही वीस हजार वर्षे जुना- आणि तो मला हे सांगू शकला-”

“समज- असं काहीतरी तुला सापडलंच- विश्वास ठेवण्यापलिकडचं आहे ते- तरीही- तरीही तू त्याच्याशी किती वेळ बोलू शकशील. तू पकडला जाईपर्यंत?”

“माहीत नाही. पण तो अस्तित्वात आहे असं कळलं- आणि तो मला सापडला तर मी काहीतरी करून त्याच्याशी बोलेन. आता मागे फिरणं शक्य नाही मला. सायकोहिस्ट्रीतून फार काही हाती लागणार नाही असं मी म्हणत होतो तेव्हाच मला ह्युमिनने सोडून दिलं असतं तर फार बरं झालं असतं. आता मला काही गोष्टी

शक्य वाटतायत, तर मी कुणालाही मला थांबवून देणार नाही... मारला गेलो तर वेगळी गोष्ट.''

''मायकोजेनियन्स ते करू शकतात, हॅरि. आणि ती जोखीम तू पत्करू नयेस.''

''पत्करणार. मी प्रयत्न तर करणारच.''

''नाही, हॅरि. माझ्यावर तुझी जबाबदारी आहे. आणि मी तुला तसं करू देणार नाही.''

''करू दे मला. सायकोहिस्ट्रीवर काम करणं मला माझ्या सुरक्षेपेक्षा जास्त महत्त्वाचं वाटतं. मी सायकोहिस्ट्रीवर पुढे काम करू शकलो तरच माझा जीव महत्त्वाचा आहे. मला हवं ते करू दिलं नाहीस, तर तुझ्यावरच्या जबाबदारीचा अर्थच नष्ट होतो. विचार कर.''

एका नव्या हेतूने प्रेरित झाल्यासारखं हॅरिला वाटू लागलं होतं. सायकोहिस्ट्री- त्याच्या मनातील धूसर सिद्धांत अगदी थोड्या काळापूर्वी त्याला सिद्ध करणे अशक्य वाटत होते... आणि आता तो त्याच्या मनाचा फार मोठा भाग व्यापून बसला होता. ते शक्य आहे असे त्याला वाटू लागले होते... त्याला पोटातून तसं वाटू लागलं होतं. जणू सगळे तुकडे जुळून येऊ लागले होते आणि संपूर्ण चित्र स्पष्ट झालं नसलं तरीही- त्याला वाटत होतं की सॅक्रॅटोरियममधून काही महत्त्वाचे तुकडे मिळू शकतील.

''मग मीसुद्धा येतेय तुझ्याबरोबर. काही झालंच तर मी मदतीला असेन, गधड्या.''

''स्त्रियांना प्रवेश नसतो तिथे.''

"मी स्त्री कशामुळे ठरणार? या राखी रंगाच्या कर्टलमुळे. माझी छाती अजिबात दिसत नाही कर्टलआडून. ही स्किनकॅप घातल्यावर स्त्रीची म्हणून जी काय केशभूषा असते तिचाही प्रश्न नाही. पुरुषासारखाच माझाही चेहरा कसल्याही रंगाशिवाय आहे... इथल्या पुरुषांच्या हनुवटीवर दाढीचे खुंटही नसतात. मला फक्त एक पांढरा कर्टल लागेल आणि ती लाल सॅश. आत सहज जाऊ शकेन मी. टॅबू मानत नसलेल्या कोणत्याही भगिनीलाही असंच आत जाता येईल. मला तर काहीच रोखू शकत नाही."

"मी रोखू शकतो. मी नाही येऊ देणार तुला. हे तर खूपच धोक्याचं आहे."

"तुला जितकं धोक्याचं आहे त्यापेक्षा जास्त काही नाही."

"पण मला तो धोका पत्करलाच पाहिजे."

"मग मलाही पत्करला पाहिजे. का- तुझी कर्तव्यभावना माझ्यापेक्षा जास्त आहे की काय?"

"कारण-" सेल्डन विचारात पडून थबकला.

"हे बघ, ही एक गोष्ट हजम कर." डॉर्सचा स्वर खडकासारखा कठोर भासला, "मी तुला तिथे एकटा जाऊ देणारच नाही. प्रयत्न केलास तर मी एका ठोशात तुला बेशुद्ध करीन आणि बांधून ठेवीन. हे मान्य नसेल तर एकट्याने जायचा विचार रद्द कर."

सेल्डन तोंडातल्या तोंडात रागाने पुटपुटला पण गप्प बसला. आतापुरता तरी.

५५

आकाश निरभ्र होते पण अगदी फिकट निळे. जणू विरळशा धुक्याच्या पडद्याआडचे. हे जरा बरं दिसतंय- सेल्डनला वाटलं. पण अचानक त्याला सूर्यदर्शन हवेसे वाटून गेले. अपरसाईडवर गेल्याशिवाय ट्रॅन्टोरवरच्या कुणालाही सूर्य दिसू शकत नसे- वर गेल्यावरही ढगांचा पडदा बाजूला झाला तरच.

जुन्या ट्रॅन्टोरियन्सना सूर्याची आठवण येत असेल का? ते त्याचा विचार तरी करत असतील का? कुणी बाहेरच्या एखाद्या जगात गेल्यावर खराखुरा सूर्य दिसताच डोळे दिपूनही नवलाने पाहात रहात असतील का?

इतके लोक कुठलेही प्रश्न न पडता कसे जगत रहात असतील- किंवा त्यांना प्रश्न पडायची सुरुवात तरी कशी काय होत नसेल? उत्तरं शोधण्यातील मजा इतर कुठल्यातरी गोष्टीत असते का आयुष्यात?

त्याची नजर सभोवार जमिनीकडे वळली. रुंदच रुंद रस्ते, बैठ्या इमारती- त्यातील बरीचशी तर दुकानेच होती. दोन्ही दिशांनी पळणाऱ्या वैयक्तिक कार्स होत्या. सगळ्या रस्त्याच्या उजव्या कडेने धावत होत्या. अगदी अँटिक्ससारख्या प्राचीन दिसणाऱ्या, पण सगळ्या विजेवर आणि आवाजही न करता शांतपणे धावणाऱ्या. अँटिक हा शब्द नेहमीच तुच्छतादर्शक असेल का. शांतता ही गतीपेक्षा महत्त्वाची वाटत असेल का कधी? आयुष्यात सतत घाईगडबड असावीच असं काही आहे कां?

कडेच्या पदपथांवर बरीच लहान मुले होती. सेल्डनने वैतागाने ओठ मुडपले. मायकोजेनियन्सना फार दीर्घायुष्य असणे अशक्यच असणार- बालहत्या करायला राजी असले तरच ते शक्य होईल. मुलेमुली दोघांनीही कर्टल्स घातलेले. मुलगे कोण मुली कोण ओळखणे अवघड होते. पण सगळ्यांचे कर्टल्स गुडघ्याच्या इंचभर

खालपर्यंतच होते. धावाधावी, पळापळी करायला सोयीचं असावं म्हणून निदान पायघोळ कर्टल्स घातले नव्हते त्यांना.

त्या मुलांच्या डोक्यांवर अजूनही केसही होते. अगदी फारफारतर इंचभर लांबीचे ठेवलेले. त्यातल्या जरा जास्त वयाच्या मुलांच्या कर्टल्सना हूड्सही शिवून टाकलेले. ते कपाळापर्यंत ओढून त्यांनी डोकी लपवलेली. जणू त्यांच्या वाढत्या वयानुसार त्यांचे केस अश्लील वाटू लागत असतील किंवा वाढत्या वयानुसार ते त्यांना लपवावेसे वाटत असतील... वाट बघत असावीत की कधी एकदा माझे केशलोचन केले जाईल.

अचानक सेल्डनला आठवलं. त्याने वळून डॉर्सला विचारलं, ‘‘डॉर्स, तू खरेदी केलीस तेव्हा पैसे कुणी दिले- तू की त्या रेनड्रॉप दोघींनी?’’

‘‘अर्थात मी दिले. त्या रेनड्रॉप दोघींकडे क्रेडिट टाईल नव्हतीच आणि त्यांनी कशासाठी द्यायचे? खरेदी आपल्यासाठी असणार होती- त्यांच्यासाठी नव्हे.’’

‘‘पण तुझ्याकडे तर ट्रॅन्टोरियन क्रेडिट टाईल आहे- टोळीवालीची क्रेडिट टाईल.’’

‘‘हो, पण त्याने काही अडचण नाही आली, मायकोजेनचे लोक त्यांची संस्कृती आणि विचार, सवयी ठेवू देत तशाच्या तशा- डोक्यावरचे केस काढू देत किंवा कर्टल्स घालू देत. पण क्रेडिट्स तर सर्व जगाचीच वापरणं भाग आहे त्यांना. तसं नाही केलं तर मग त्यांचा व्यापार संपेल आणि असं करायला ते काही वेडे नाहीत. क्रेडिट्स ही तर ताकद आहे, हॅरि.’’

‘‘आणि त्यांनी तुझी क्रेडिट टाईल स्वीकारली?’’

‘‘अजिबात कुरकुर न करता. आणि माझ्या स्किनकॅपबद्दल अवाक्षर काढलं नाही कुणी. क्रेडिट्स सगळं पवित्र करून घेतात.’’

“हं, हे छान झालं. म्हणजे मी काय हवं ते खरेदी करू शकतो.”

“तू नाही, जे काय घ्यायचं ते मी घेईन. क्रेडिट्स सगळ पवित्र करून घेतात खरं, पण टोळीवाल्यापेक्षा टोळीवालीकडून आली तर ती लवकर पवित्र होतात. बायकांकडे लक्ष न देण्याची सवय त्यांच्या अंगवळणी पडली आहे. माझ्याकडेही लक्ष देत नाहीत ते. हे घे- आलं आपलं दुकान.”

“मी इथेच थांबतो. माझ्यासाठी लाल सॅश घेशील ती जरा छान घे.”

“आपलं ठरलंय- विसरल्यासारखं दाखवू नकोस. मी दोन सॅश आणि दोन पांढरे कर्टल घेणार आहे. एक माझ्या मापाचा.”

“एक स्त्री पांढरा कर्टल विकत घेते हे त्यांना विचित्र नाही वाटणार?”

“अजिबात नाही. मी ते कुणा माझ्या मापाच्या पुरुषासाठी घेते आहे असं ते गृहीत धरतील. खरं तर माझी क्रेडिट टाईल पुरेशी असली तर ते कशाचाही विचार करणार नाहीत.”

सेल्डन बाहेर थांबून राहिला. कुणीतरी येऊन आपल्याला टोळीवाला म्हणून ओळखून अभिवादन करेल नाहीतरी काहीतरी बडबडेल अशी त्याची अपेक्षा होती, पण तसं काही झालं नाही. येणाऱ्याजाणाऱ्या कुणीही त्याच्याकडे पाहिलं नाही, ज्यांनी पाहिलं त्यांची नजर अगदीच कोरी होती. राखी कर्टल्सबद्दल तर तो अधिकच शंकित होता. शिवाय ज्या कुणी पुरुषांसोबत जात होत्या त्यांच्याबद्दल विशेषच. त्या बिचाऱ्या आधीच पददलित, दीन आणि दुर्लक्षित. एखाद्या टोळीवाल्याला पाहून किंचाळलं तर जरा तरी कुणाचं लक्ष वेधलं जाईल. पण त्याही तशाच पुढे गेल्या. कुणी टोळीवाला दिसेल अशी त्यांना अपेक्षाच नाही. त्यामुळे त्यांचं माझ्याकडे लक्ष जाणार नाही.

सॅक्रॅटोरियममध्ये जातानाही असंच होईल- ते बरंच असेल. तिथे कुणी टोळीवाले दिसण्याची अपेक्षाच नसेल त्यामुळे कुणाचंही लक्षच जाणार नाही!

डॉर्स बाहेर आली तेव्हा तो चांगलाच खुशालला होता.

“मिळालं सगळं?”

“सगळच्या सगळं.”

“चला मग, जाऊ या परत. आणि मग कपडे बदलून निघू या.”

डॉर्सला राखी कर्टल जितका व्यवस्थित बसला होता तितका हा पांढरा कर्टल बसला नव्हता. दुकानात तिला तो आधी घालून पाहाणं शक्यच नव्हतं. नाहीतर अगदी मद्दडातल्या मद्दड दुकानदारालाही संशय आला असता.

“कशी दिसते मी, हॅरि?” तिने विचारलं.

“अगदी मुलगाच दिसते आहेस.” सेल्डन म्हणाला, “चल आता सॅश घालून पाहू. किंवा ओबिआ. ओबिआ म्हणायचं लक्षात ठेवायला हवंय.”

डॉर्सने स्किनकॅप काढून केस मोकळे करून झटकले. खूप बरं वाटलं तिला. ती म्हणाली, “आत्तापासून घालू नकोस ती. मायकोजेनमधून मिरवणूक नकोय ती सॅश घालून. आपल्याकडे कुठल्याही प्रकारे लक्ष वेधलं जायला नकोय कुणाचं.”

“नाहीनाही, मी फक्त कशी दिसते ते पाहातोय.”

“ती नको घेऊ. ही घे, ही जास्त चांगली आहे आणि भरतकामही छानच आहे.”

“बरोबर आहे, डॉर्स. सगळं लक्ष माझ्याकडेच वेधलं गेलेलं बरं. तू स्त्री असल्याचं लक्षातही यायला नको कुणाच्या.”

“मी त्याचा विचार करत नाहीये हॅरि. तू जरा छान दिसावंस एवढंच बघतेय मी.”

“शतशः आभारी आहे- पण ते अशक्यच आहे नाही कां... हां, आता हे कसं घालायचं बरं?”

हॅरि आणि डॉर्स दोघेही ओबिआ घालायचा नि काढायचा सराव करू लागले. अखेर अगदी सहजगत्या ते करायला जमलं तेव्हाच थांबले. आदल्या दिवशी एका माणसाला डॉर्सने ओबिआ घालताना पाहून ठेवलं होतं, त्यामुळे तिने हॅरिला ती कशी घालायची ते शिकवलं.

हॅरिने तिच्या निरीक्षणशक्तीचं कौतुक केलं तेव्हा ती जराशी लाजली. “इतकं काही नाही, हॅरि, सहजच पाहिलं होतं.”

“मग तू सहज निरीक्षण करण्यात तज्ज्ञ आहेस.”

अखेर त्यांचं समाधान झालं आणि ते सुटेसुटे उभे राहून एकमेकांचं निरीक्षण करू लागले. हॅरिची ओबिआ चकाकत होती, त्यावरचं ड्रॅगनसारखं भरतकाम खालच्या त्याच रंगाच्या कापडावर उठून दिसत होतं. डॉर्सची ओबिआ जरा साधीशी होती. मधोमध एक बारीकशी भरतकामाची रेषा गेली होती- बस्स. तिचा लाल रंग ही सौम्य होता.

“हे बघ,” ती म्हणाली, “सदभिरुची दाखवण्यासाठी पुरेसं आहे.” तिने ती काढून ठेवली.

“चला,” सेल्डन म्हणाला, “आता आपण याची घडी घालून आतल्या खिशात ठेवून देऊ. इथल्या खिशात माझी ह्युमिनने दिलेली क्रेडिट टाईल आहे, या बाजूला त्यांचं पवित्र पुस्तक.”

“त्यांचं पुस्तक? ते असं बरोबर घेऊन फिरणं योग्य आहे कां?”

“ते तर बरोबर घ्यायलाच हवं मला. मला वाटतं सॅक्रॅटोरियममध्ये जाताना प्रत्येकजण आपापली प्रत बरोबर घेऊनच जात असणार. त्यातून ते वाचत असतील, पठण केल्यासारखं बहुतेक. गरज पडली तर आपण एकाच पुस्तकातून वाचू. कुणाच्या लक्षात येणार नाही बहुतेक. मग तयार?”

“या प्रकारासाठी तयार तर मी कधीच नसणार आहे. पण मी तुझ्यासोबत येणार हे नक्की.”

“ही आपली फेरी जरा अवघडच आहे. माझी स्किनकॅप जरा बघ बरं ठीकठाक आहे का ते- एकही केस दिसता कामा नये हां. डोकं खाजवू नकोस.”

“नाही खाजवत. सगळं ठीक आहे तुझं.”

“तुझंही ठीक आहे.”

“तूही भेदरलेला दिसतो आहेस.”

“का बरं, का बरं... ओळख बघू.” सेल्डन तोंड वाकडं करत म्हणाला.

- -- --

# आयरी- उंचावरचे घरटे

रोबॉट-... प्राचीन दंतकथांमध्ये ही संज्ञा अनेक जगांतून वापरली जात असल्याचे दिसते. त्या साठी ऑटोमॅटा हा शब्द अधिक प्रचलित आहे. रोबॉट्स हे मानवी आकार दिलेले, आणि धातूपासून बनलेले असतात- पण काही रोबॉट्स छद्मइंद्रिये असलेले असतात असेही समजले जाते. हॅरि सेल्डनने त्याच्या पलायनाच्या काळात एक असा खराखुरा रोबॉट पाहिल्याचा समज आहे. पण ही कथा कुठून प्रसृत झाली ते समजत नाही. हॅरि सेल्डनने केलेल्या विपुल लेखनात कुठेही रोबॉट्सचा उल्लेखही नाही, जरी...

दीर्घिका ज्ञानकोष

५६

त्यांच्याकडे कुणाचंही लक्ष गेलं नाही.

हॅरि सेल्डन आणि डॉर्स वेनाबिली दोघे पुन्हा एकदा आदल्या दिवशी जसे तिथे गेले होते तसेच पुन्हा गेले, आणि या वेळी त्यांच्याकडे कुणीही वळून पाहिलं नाही. वळून पाहाणं सोडा, कुणी साधी नजरही टाकली नाही. अनेकदा त्यांना गुडघे आत आकसून घेत कुणालातरी उतरून जायला जागा करून द्यावी लागली. कुणी नवीन माणूस चढला तर आतल्या बाजूला रिकामी जागा असल्यास आत सरकायचं त्यांना कळलं होतं.

या वेळी त्यांना न धुतलेल्या कर्टल्सच्या वासाने थोडंसं अस्वस्थही झालं. कारण या वेळी संपूर्ण लक्ष बाहेर असण्याचं कारण नव्हतं.

अखेर ते पोहोचले.

"ती पहा लायब्ररी," सेल्डन कुजबुजतच म्हणाला.

"हं, तीच असणार," डॉर्स म्हणाली, "काल मायसेलियम सेव्हन्टीटूने तिथेच बोट दाखवलं होतं."

ते सावकाश पावलं टाकत त्या दिशेने चालू लागले.

"दीर्घ श्वास घे," सेल्डन म्हणाला, "पहिला अडथळा सामोरा येतोय."

समोरचं दार उघडंच होतं, आणि आत मंद प्रकाश होता. वर जाणाऱ्या पाच लांबरुंद दगडी पायऱ्या दिसत होत्या. त्यांनी पहिल्या पायरीवर पाऊल ठेवलं आणि काही क्षण थांबून राहिले. आपल्या वजनाने पायऱ्या आपोआप हलत नाहीत हे त्यांच्या जरा उशीराच लक्षात आलं. डॉर्सने ओठ मुडपले आणि सेल्डनला पायी वर चलायला सुचवलं.

ते दोघे एकत्रच वर जाऊ लागले. मायकोजेनच्या मागासपणाबद्दल त्यांच्या मनात सहानुभूती दाटली. मग समोर एका डेस्कपाशी एक माणूस एका अगदीच प्राथमिक स्वरुपाच्या बेंगरूळ कॉम्प्युटरसमोर वाकून बसलेला दिसला.

त्या माणसाने त्यांच्याकडे पाहिलंही नाही. काही गरजच नव्हती. पांढरा कर्टलवाले, टक्कलवंत मायकोजेनियन्स इतके सारखे दिसत की त्यांच्यावरून कुणाचीही नजर घरंगळत पुढे जाईल. टोळीवाल्यांसाठी हे फायद्याचंच होतं.

त्या माणसाने आपल्या कामातून मान वर न करता विचारलं, "अभ्यासक?"

"अभ्यासक." सेल्डनने उत्तर दिलं.

त्या माणसाने मान उडवत दाराकडे निर्देश केला, "जा आत. एन्जॉय करा."

ते आत शिरले. लायब्ररीच्या त्या भागात ते दोघे सोडल्यास दुसरंतिसरं कुणीही नव्हतं. बहुधा या लायब्ररीत फारसे अभ्यासक येत नसावेत, किंवा एकंदरीत अभ्यासकच कमी होते.

सेल्डन म्हणाला, “मला वाटलेलं की काहीतरी परवानगीपत्र वगैरे दाखवावं लागेल... आपण ते कसं विसरलो वगैरे आर्जव करायच्या तयारीत होतो मी.”

“आपण आलो ते त्याला बरंच वाटलं असेल. अशी जागा कधी पाहिली आहेस? एखादी जागा माणसासारखी मेलेली असणं शक्य असेल तर- तर आपण एका प्रेताच्या आत आहोत.”

या विभागातील बरीचशी पुस्तकं छापील पुस्तकं होती- सेल्डनकडच्या पवित्र पुस्तकासारखीच. डॉर्स त्या पुस्तकांच्या कपाटांमधून पुस्तकं पाहात फिरू लागली. ती म्हणाली, “बरीचशी तर अगदीच जुनी पुस्तकं आहेत. काही अगदी प्राचीन महत्त्वाची, काही अगदीच बिनमहत्त्वाची.”

“काही बाहेरची पुस्तकं आहेत? म्हणजे मायकोजेनची नसलेली अशी?”

“हो आहेत. त्यांची स्वतःची पुस्तकं ठेवायला दुसरा विभाग असावा. हा विभाग बाहेरच्या जगावर अभ्यास करणारांसाठी असणार. बिचाऱ्या त्या कालच्या अभ्यासकासारख्या. हा संदर्भविभाग आहे- हा पहा साम्राज्याचा ज्ञानकोष- पन्नास वर्षं जुना असेल. आणि इथे एक कॉम्प्युटरही आहे.”

तिने कॉम्प्युटरच्या कीपॅडवर बोटं टेकली तोच सेल्डनने टोकलं. “थांब. काहीतरी गोंधळ झाला तर आपल्याला उशीर होईल.”

त्याने एका बाजूच्या फळ्यांवरच्या बाजूला एक लहानशी पाटी होती तिकडे तिचं लक्ष वेधवलं. चमकणारी अक्षरं होती- टु द सॅक्-टोरियम. मधली अक्षर विझली होती. अलिकडेच विझली असतील किंवा कुणी कधी लक्षच देत नसेल. (सगळ्याच

साम्राज्यात अशा विलयाच्या पाऊलखुणा दिसत आहेत- सेल्डन विचार करत होता- सर्वत्रच. अगदी मायकोजेनवरही.)

त्याने इकडेतिकडे पाहिलं. किती दीनवाणी लायब्ररी होती ही. केवळ मायकोजेनियन अस्मितेसाठीच उपयोगाची. कदाचित इथल्या ज्येष्ठगुरूंना मधूनमधून उपयोग होत असेल. आपल्या अंधश्रद्धा, अंधविश्वास जतन करण्यासाठी काही माहितीचे सोयिस्कर तुकडे इथून नक्कीच मिळत असतील त्यांना. आणि मग टोळीवाल्यांना मागास ठरवायला बरं. किती पोकळ... त्यांच्या पाठोपाठ कुणीही आत शिरलं नव्हतं.

सेल्डन म्हणाला, "जरा या बाजूला ये. त्या माणसाला सहज दिसणार नाही अशा ठिकाणी उभं राहू आणि त्या सॅशेस घालून घेऊ."

आणि मग त्या दरवाजापाशी गेल्यावर त्याला जाणवलं, इथून पुढे गेल्यावर मागे परतणे शक्य होणार नाही. तो म्हणाला, "डॉर्स, माझ्याबरोबर येऊ नकोस तू."

डॉर्सच्या कपाळावर आठ्या चढल्या. "का नको?"

"हे धोक्याचं काम आहे, आणि तू धोका पत्करू नयेस असं मला वाटतं."

"मी इथे तुझं रक्षण करायला आले आहे." तिच्या स्वरातील मार्दवात ठाम निर्धार होता.

"तू कसं रक्षण करणार माझं? मी माझं रक्षण करू शकतो. तुला वाटत नसेल तसं- तरीही. उलट तुझं संरक्षण करण्याचं काम मला करावं लागेल. कळत कसं नाही तुला?"

"माझी काळजी तू करताच कामा नये, हॅरि." डॉर्स म्हणाली, "काळजी करणे माझं काम आहे." तिने आपल्या छातीवर सॅशवर मूठ आपटली.

"कां, ह्युमिनने सांगितलंय म्हणून?"

“कारण मला तसा हुकूम आहे.”

तिने सेल्डनचा हात कोपरावर पकडला. तिच्या हाताची घट्ट पकड जाणवून सेल्डनला नेहमीप्रमाणेच आश्चर्य वाटतं. ती म्हणाली, “मला हे करणं पटत नाहीये, हॅरि, पण तुला आत जाणं गरजेच वाटत असेल, तर मलाही यावंच लागेल.”

“ठीक आहे. पण काही गडबड झालीच तर तू काहीही करून सटक यातून. माझी काळजी करू नकोस.”

“हॅरि, तू उगीच वाफ दवडणं थांबव. हे बोलून तू माझा अधिक्षेप करतो आहेस.”

सेल्डनने प्रवेशद्वाराला स्पर्श केला आणि ते बाजूला झालं. दोघेही एकसाथ आत शिरले.

ते दालन भव्य होते- अगदीच रिकामे असल्यामुळे त्याची भव्यता जरा जास्तच वाटत होती. खुर्च्या नाहीत, बाकं नाहीत, कसलीच बैठक व्यवस्था नाही, चौथरा नाही, पडदे नाहीत... कसलीही सजावट अशी नव्हतीच तिथे.

दिवेही नव्हते- होता केवळ सगळीकडे सारखाच पसरून राहिलेला मंद प्रकाश. भिंती अगदीच कोऱ्या नव्हत्या. ठराविक अंतराने नव्हे पण काही अंतरांवर, वेगवेगळया उंचीवर त्यांच्यावर अगदी जुनाट द्विमितीय टेलिव्हिडन स्क्रीन्स होते आणि ते सुरू होते. त्यातल्या एकावरही तिसऱ्या मितीचा स्पर्श नव्हता. खऱ्या होलोव्हिजनचा कुठेच पत्ता नव्हता.

तिथे काही लोक होते. फार नाही, अगदी तुरळक. आणि एकेकटेच उभे होते. टेलिव्हिजनचे पडदे जसे कसेही लावलेले तसेच. सगळ्यांनी पांढरे कर्टल्स घातलेले आणि त्यावर लाल सॅश.

अगदी शांतता होती. कुणीच नेहमीच्या पद्धतीने बोलत नव्हतं. अगदी क्वचित काहीजणांचे ओठ हलताना दिसत होते. त्यांची पुटपुट सुरू होती. आत शिरमारे लोक अगदी पाऊल न वाजवता येत होते, नजरा खाली वळलेल्या. सारे वातावरण अगदी पुरते सुतकी होते.

सेल्डन डॉर्सच्या दिशेने झुकला, तिने तत्क्षणी ओठांवर बोट टेकलं. आणि एका टेलिव्हिजन स्क्रीनकडे त्याचं लक्ष वेधलं. या स्क्रीनवर एक सुंदर बहरलेली बाग दिसत होती. कॅमेरा अगदी संथपणे त्या फुलांवरून फिरत होता.

ते अगदी बाकीच्यांप्रमाणेच संथ पावलं टाकत, पाऊल न वाजवता त्या पडद्याकडे सरकले.

स्क्रीनपासून दीडदोन फुटावर असताना त्यातून येणारा आवाज त्यांच्या कानांत शिरला. "हा आहे अॅन्टेनिनचा बगिचा. जुन्या पुस्तकांवरून त्यांची पुनर्रचना करण्यात आली असून तो इओसच्या बाहेर आहे. पहा नीट-"

डॉर्स सेल्डनला कुजबुजत सांगू लागली, "स्क्रीनच्या अगदी जवळ कुणी गेलं की मगच हा आवाज येतो. दूर गेलं की थांबतो. जवळ गेलो तर त्याच्या आवाजाच्या आड आपल्या बोलण्याचे आवाज दडू शकतात. पण माझ्याकडे न बघता बोल आणि कुणी इकडे येताना दिसलं तर बोलायचा थांब."

सेल्डनने मान खाली घालून, हात समोर जुळवून ठेवलेले- इतर सगळे असेच उभे होते हे त्याने पाहिलेलं. तो पुटपुटला, "असं वाटतंय की आता कोणत्याही क्षणी कोणीही हंबरडा फोडेल."

"शक्य आहे, ते आपल्या हरवलेल्या जगाबद्दल शोक करीत आहेत ना." डॉर्स म्हणाली.

“या फिल्म्स मधूनमधून बदलत असतील तर बरं. नेहमी त्याचत्याच फिल्म्स पाहाणं म्हणजे मरणच की.”

“सगळ्या वेगवेगळ्या आहेत त्या.” डॉर्स म्हणाली, तिची नजर सर्वत्र फिरत होती, “अधूनमधून बदलत असावेत. माहीत नाही...”

“थांब!” सेल्डनचा स्वर कणभर वाढलेला, मग त्याने चपापून आवाज प्रयत्नपूर्वक खाली आणला आणि म्हणाला, “ये जरा इकडे.”

डॉर्सला कळलं नाही, पण सेल्डनने मानेनेच निर्देश केला. आणि पुन्हा तशीच संथ पावलं टाकत पुढे जाऊ लागला- पण त्याच्या पावलांतलं अंतर मात्र वाढलं होतं. जरा वेगाने जायची गरज त्याला वाटत होती. डॉर्सने त्याला गाठत त्याचा कर्टल जरासा खेचला. त्याने वेग जरा कमी केला.

“इकडे रोबॉट्स दिसले मला,” त्याने टीव्हीच्या आवाजात आपली कुजबूज लपवत सांगितलं.

इथल्या चित्रात एक घर दिसत होतं, समोर हिरवळ पसरलेली आणि कुंपणाच्या बाजूने ज्या तीन आकृत्या दिसत होत्या- रोबॉट्स. ते धातूचे होते, आणि थोडेफार मानवाकार.

रेकॉर्डिंग म्हणत होतं, “हा देखावा अलिकडेच आम्ही पुनर्रचित केला आहे. ही आहे तिसऱ्या शतकातील सुप्रसिद्ध वेन्डोम एस्टेटमधील वास्तू. तिथे दिसत असलेल्या मधला रोबॉटचे नाव तेव्हाच्या परंपरेनुसार बेन्डार होते, आणि तो बावीस वर्षे कार्यरत होता असे प्राचीन नोंदींतून दिसते. त्यानंतर त्याची जागा दुसऱ्याने घेतली.”

“अलिकडेच पुनर्रचित- म्हणताहेत. म्हणजे ते अधूनमधून नवीन देखावे टाकत असावेत.”

"हो फक्त हे 'अलिकडेच पुनर्रचित' हे गेली हजार वर्षे बोलत नसले तर."

आणखी एका मायकोजेनियनचा आवाज त्यांच्या आणि देखाव्याच्या आवाजात मिसळला. तो अगदी हलकेच बोलू लागला- पण डॉर्स आणइ सेल्डनपेक्षा मोठ्यानेच बोलला तो. "अभिवादन बंधूंनो,"

त्याने सेल्डन आणि डॉर्सकडे पाहिलंदेखील नाही. आणि एकदाच चुकून, दचकून पाहिल्यानंतर सेल्डननेही नजर खालीच ठेवली. डॉर्सने संपूर्ण दुर्लक्षच केले.

सेल्डन जरासा कचरला. मायसेलियम सेव्हन्टीटूने सांगितलेलं की सॅक्रॅटोरियममध्ये कुणीही बोलत नाही. त्याने बहुतेक अतिशयोक्ती केली असणार. शिवाय तो अगदी लहानपणीच सॅक्रॅटोरियममध्ये गेला होता.

सेल्डनने ठरवलं की काहीतरी बोलू या. "तुम्हालाही अभिवादन, बंधू." तो कुजबुजला.

अभिवादनाला योग्य प्रतिक्रिया काय असावी हे त्याला माहीत नव्हतं. पण बहुधा ती योग्यच असावी- त्या मायोकजेनियनला त्याच्या बोलण्यात काही वावगं वाटल्याचं दिसलं नाही.

"ऑरोरातील तुम्हालाही." तो उत्तरला.

"आणि तुम्हालाही." सेल्डन म्हणाला. तो मायकोजेनियन पुढे कसलीशी वाट पाहात असल्यासारखं वाटलं म्हणून तो म्हणाला, "ऑरोरातील तुम्हालाही." ताण सरल्यासारखा भास झाला. सेल्डनला आपलं कपाळ थोडंसं घामाने ओलसर झाल्यासारखं वाटलं.

मायकोजेनियन म्हणाला, "किती सुंदर, हे मी या आधी कधी पाहिलं नव्हतं."

"छानच केलंय," सेल्डन म्हणाला. आणि मग अचानक धीर येऊन तो उद्गारला, "हे आपण कधीच विसरता कामा नये." तो मायकोजेनियन जरासा चकित झाला आणि म्हणाला, "अगदी अगदी..." आणि मग तो त्यांच्यापासून दूर गेला.

डॉर्स फिस्कारली, "उगीच जास्त करू नको. जे बोलायची गरज नाही ते बोलू नकोस."

"ते अगदी स्वाभाविक वाटलं. ते असो, हे नवीनच केलेलं आहे हे नक्की. पण हे रोबॉट्स अगदीच फुसके आहेत. ऑटोमॅटा जसे असणं अपेक्षित असतं तसे आहेत ते. मला ते सेंद्रिय प्रकारचे ह्युमनॉइड्स बघायचे होते."

"अस्तित्वात असले तर," डॉर्स जराशी शंकेने म्हणाली, "मला नाही वाटत ते बागकामासाठी वापरले जात असतील असं."

"खरंय," सेल्डन म्हणाला, "आता आपल्याला ज्येष्ठांची आयरी शोधायला हवी."

"ती ही अस्तित्वात असेल तर. मला वाटतं या पोकळ गुहेत फक्त ही पोकळ गुहाच असावी."

"चल पाहू."

ते भिंतीच्या कडेकडेने एकेक स्क्रीन पाहातपाहात, काहींच्या पुढ्यात थोडंथोडं घुटमळत जात राहिले. एका ठिकाणी डॉर्सने सेल्डनचा हात पकडून त्याला थांबवलं. दोन टीव्ही स्क्रीन्सच्या मधोमध एक फिकटशी आय़ताकृती चौकट दिसत होती.

"दरवाजा," ती म्हणाली, पण मग पुढे शंकाही व्यक्त केली, "तुलाही वाटतंय का असं?"

सेल्डनने आजुबाजूला चोरटी नजर टाकली. सगळ्याच नजरा जेव्हा टीव्हीवर खिळल्या नव्हत्या तेव्हा दुःखभराने जमिनीवर लागल्या होत्या, हे किती सोयीचं होतं.

सेल्डन म्हणाला, “ते कसं उघडायचं असेल असं वाटतं तुला?”

“एखादी लहानशी पट्टी असेल ढकलण्यासाठी.”

“मला तरी दिसत नाहीये.”

“स्पष्ट दिसत नाही कारण तो केवळ एक जरा रंग उडालेला भाग आहे. बघ. दिसतंय? किती हात लागले असतील? किती वेळा?”

“बघतो प्रयत्न करून. लक्ष ठेव. कुणी इकडे बघताना दिसलं तर जरा मला खुणाव. लाथेने.”

त्याने श्वास रोखला, आणि त्या रंग उडालेल्या भागाला स्पर्श केला- काहीही झालं नाही. मग त्याने संपूर्ण तळवा त्यावर टेकून जरा दाब दिला.

दार अगदी अलगद उघडलं. जराही आवाज न करता, न कुरकुरता. सेल्डन पटकन आत शिरला आणि डॉर्सही. त्यांच्या पाठोपाठ दार बंद झालं.

“प्रश्न एवढाच आहे,” डॉर्स म्हणाली, “की आपल्याला कुणी पाहिलं असेल का?”

“या दारातून ज्येष्ठ लोक बरेचदा ये-जा करत असणार.” सेल्डन उत्तरला.

“हो, पण आपण ज्येष्ठांपैकी आहोत असं कुणाला कशाला वाटेल?”

सेल्डन थांबून राहिला आणि मग म्हणाला, “आपल्यावर पाळत असती आणि कुणालाही काहीतरी चुकल्यासारखं वाटलं असतं तर हे दार आपण आत आल्याबरोबर काही सेकंदांत परत उघडलं असतं.”

“शक्य आहे,” डॉर्स रुक्षपणे उत्तरली, “किंवा मग दाराच्या या बाजूला फार काही पाहाण्यासारखं नसेलच. कुणालाही आत यावंसं वाटण्याची काहीच गरज वाटत नसेल.”

“ते अजून कळायचंय.” सेल्डन पुटपुटला.

ते आले होते ती एक छोटीशी खोली होती, थोडी अंधारी. पण ते पुढे येताच ती उजळली. तिथे आरामशीर खुर्च्या होत्या, छोटी टेबलं होती, आडवं व्हायला दिवाण होते, मोठा उंच रेफ्रिजरेटर होता, कपाटं होती.

“ही जर या ज्येष्ठांची आयरी असेल, तर ते अगदी आरामप्रिय दिसतात. सॅक्रॅटोरियम कितीही साधंसं कठोर का वाटेना.” सेल्डन म्हणाला.

“ते अपेक्षितच आहे,” डॉर्स म्हणाली, “सत्ताधारी वर्गात जाहीर देखाव्यासाठी सोडली तर संन्यस्त वृत्ती विरळाच दिसते. मानसशास्त्रीय सत्यांवरचं निरीक्षण म्हणून लिहून घे तुझ्या डायरीत.” तिने पुन्हा एकदा सभोवार पाहिलं, “आणि इथे रोबॉट नाही.”

सेल्डन म्हणाला, “आय़री म्हणजे उंचावरची जागा. आणि ही ती नक्कीच नाही. आणखी वर काही मजले असतीलच. तो पहा, तोच रस्ता असणार वर जायचा.” त्याने एका गालिचा अंथरलेल्या जिन्याकडे बोट दाखवलं. तो तडक तिकडे गेला नाही, त्याने इकडेतिकडे पाहिलं.

डॉर्सला साधारण अंदाज आला, तो काय शोधतो आहे याचा. ती म्हणाली, “सोडून दे एलेव्हेटर्स शोधण्याचा प्रयत्न. इथे मायकोजेनवर जितकं मागास राहू तितकं थोर मानण्याचा पंथच आहे. विसरलास की काय? इथे एलेव्हेटर्स नसणार आणि पायरीवर पाय ठेवताच त्या हलायलाही लागणार नाहीत. चढून जावं लागेल आपल्याला. कदाचित् भरपूर जिने असतील.”

"चढून जायचं?"

"हा जिना कुठे तरी उंचावर नक्कीच घेऊन जाणार आपल्याला- आयरीकडेही नेऊ शकतो. तुला जायचंय की नाही आयरीकडे?"

दोघेही जिन्याकडे गेले आणि पायऱ्या चढू लागले.

तीन जिने चढून गेले असतील आणि तिथला प्रकाश सावकाशीने कमीकमी होऊ लागलेला त्यांच्या लक्षात आला. सेल्डनने दीर्घ श्वास घेतला आणि म्हणाला, "मी चांगला तंदुरुस्त मानतो स्वतःला तसा- पण हे काही मला आवडत नाहीये."

"तुला या प्रकारच्या शारीरिक व्यायामाची सवय नाहीये." पण तिच्यावर मात्र दमल्याचं काहीही चिन्ह दिसत नव्हतं.

तिसरा जिना संपला आणि समोर आणखी एक दरवाजा आला.

"याला कुलूप असेल तर?" सेल्डन स्वतःशीच बोलल्यासारखा बोलला, "फोडायचा प्रयत्न करायचा की काय?"

पण डॉर्स म्हणाली, "खालचे दरवाजे बंद नव्हते, तर हा कशाला बंद असेल? हीच जर ज्येष्ठगुरूंची आय़री असेल तर मग या लोकांचा टॅबू असेलच. ज्येष्ठांशिवाय इतर कुणीही इथे येणारच नाही. आणि कुठलाही टॅबू हा अखेर कोणत्याही कुलुपापेक्षा बळकट असतो."

"टॅबू मानणारांसाठी हे खरंच असेल." सेल्डन म्हणाला खरा, पण तो दाराच्या दिशेने पुढे मात्र झाला नाही.

"अजूनही शंका वाटत असेल तर मागे फिरू शकतो आपण," डॉर्स म्हणाली, "मी तर सांगेन की जाऊ या मागे."

“मी जरासा थबकलोय- कारण आत जाऊन काय मिळेल आपल्याला काय माहीत... जर रिकामीच असेल तर-” आणि मग मोठ्याने म्हणाला, “तर असू दे रिकामी.” तो पुढे झाला आणि त्याने तिथल्या प्रवेशपट्टीवर हात ठेवून दार जोरात ढकललं.

दार अगदी आवाज न करता पण वेगाने आत गेलं आणि सेल्डन दचकून मागे झाला- आतून प्रखर प्रकाश ओतल्यासारखा अंगावर आला.

आणि तिथे- त्याच्या अगदी समोर होती एक मानवाकृती. डोळ्यांत प्रकाश पेटलेला, हात किंचित उचललेले, एक पाऊल पुढे टाकलेले आणि सर्वांगावर फिकट सोनेरी धातूसारखी चकाकी. काही क्षण असं वाटलं की त्याने काहीतरी झगा अंगावर घातला आहे. पण नीट पाहिल्यावर दिसलं की तो त्या वस्तूचा एक भाग होता.

“हा तर रोबॉट आहे,” सेल्डन विस्मित होऊन उद्गारला, “पण तो धातूचा आहे.”

“त्याहीपेक्षा वाईट-” डॉर्स पुढे येत म्हणाली कडेला उभी रहात म्हणाली, “त्याचे डोळे अजिबात हलत नाहीयेत. त्याचे हात जराही हालचाल करू शकत नाहीयेत. तो जिवंत नाहीच- रोबॉट्स जिवंत असतात असं म्हणायचं झालं तर.”

आणि एक माणूस- नक्कीच माणूस- त्या रोबॉटच्या मागून पुढे आला आणि म्हणाला, “तो नसेल कदाचित्, पण मी जिवंत आहे.”

आणि जणू प्रतिक्षिप्त क्रियेने डॉर्स पुढे होत सेल्डन आणि त्या अचानक उगवलेल्या माणसाच्या मध्ये उभी राहिली.

५८

सेल्डनने डॉर्सला बाजूला जरा जास्तच जोरातच ढकललं. “मला संरक्षणाची गरज नाही. हे तर आपले मित्र आहेत- सनमास्टर फोर्टीन.”

त्यांच्या समोरच्या त्या माणसाने दुहेरी सॅश घेतली होती- सर्वोच्च ज्येष्ठ म्हणून तो त्याचा हक्क असावा. तो म्हणाला, “आणि तू टोळीवाला सेल्डन आहेस.”

“अर्थात्,” सेल्डन म्हणाला.

“आणि ही- पुरुषी वस्त्र घातलेली असली तरीही टोळीवाली व्हेनाबिली असणार.”

डॉर्स काहीच बोलली नाही.

सनमास्टर फोर्टीन म्हणाला, “तुझं म्हणणं बरोबर आहे, टोळीवाल्या. माझ्याकडून तुला काहीही शारीरिक इजा होणार नाही. खाली बसा. दोघेही. तू, भगिनी नाहीस, टोळीवाल्या स्त्रिये, त्यामुळे तू मागे सरकायची गरज नाही. तुझ्यासाठीही एक खुर्ची आहे- असा फरक केला गेला याचं तुला काही विशेष वाटत असलं तर- तू ती वापरणारी पहिली स्त्री आहेस.”

“मला अशा विशेषत्वाचे काहीही वाटत नाही,” डॉर्स प्रत्येक शब्दावर भर देत उत्तरली.

सनमास्टर फोर्टीनने मान हलवली, “जशी तुझी मर्जी. मीही बसतो, कारण मला तुम्हाला काही प्रश्न विचारायचे आहेत. आणि ते उभं राहून विचारावेत असं मला वाटत नाही.”

आता ते तिघेही खोलीच्या एका कोपऱ्यात बसले. सेल्डनची नजर त्या धातूच्या रोबॉटकडे फिरूनफिरून वळत होती.

सनमास्टर फोर्टीन म्हणाला, “तो रोबॉटच आहे.”

“माहीत आहे मला.” सेल्डन तुटकपणे उत्तरला.

“ते तुला माहीत आहे हे मलाही माहीत आहे.” सनमास्टर फोर्टीन तितक्याच तुटकपणे बोलत होता. “पण आता ते झालं असेल तर सांगा, तुम्ही इथे का आला आहात?”

सेल्डनची नजर सनमास्टर फोर्टीनवर स्थिरावली आणि तो म्हणाला, “रोबॉट पाहायला.”

“इथे, या आय्रीमध्ये ज्येष्ठांशिवाय कुणालाही प्रवेश करायला परवानगी नाही हे तुम्हाला माहीत आहे काय?”

“माहीत नव्हतं, पण तशी शंका होती.”

“इथे, सॅक्रॅटोरियममध्ये कोणाही टोळीवाल्याला यायची परवानगी नसते हे तुम्हाला माहीत आहे काय?”

“असं मला सांगण्यात आलं होतं.”

“आणि तू त्याकडे दुर्लक्ष केलंस, असंच ना?”

“मी सांगितलं, मला रोबॉट पाहायचा होता.”

“तुला माहीत आहे का की सॅक्रॅटोरियममध्ये कुणाही स्त्रीला- ती भगिनी असली तरीही क्वचित, विशेष प्रसंग सोडल्यास आत यायला परवानगी नसते?”

“मला सांगितलं होतं हे.”

“आणि तुला हे माहीत आहे का, की कोणत्याही स्त्रीने कोणत्याही कारणासाठी पुरुषाचा वेष करायला परवानगी नसते? हा नियम मायकोजेनच्या सीमेअंतर्गत भगिनी किंवा टोळीवाली स्त्री यांच्या बाबतीत लागू आहे.”

“हे मला माहीत नव्हतं, पण मला यात आश्चर्यकारक काही वाटत नाही.”

"छान. हे सगळं तुला समजून घ्यायला हवं हीच इच्छा. आता सांग, तुम्हाला रोबॉट कशासाठी पाहायचा होता?"

सेल्डनने खांदे उडवले, "कुतूहल. मी कधीही रोबॉट पाहिला नव्हता. आणि अशी काही गोष्ट अस्तित्वात आहे हेही मला ठाऊक नव्हतं."

"आणि तो आहे आणि इथेच आहे हे तुला कसं काय समजलं?"

सेल्डन गप्प बसला, "या प्रश्नाचं उत्तर मी देऊ इच्छित नाही."

"यासाठीच तुला मायकोजेनवर पाठवलं होतं का टोळीवाल्या ह्युमिनने? रोबॉट्सची पाहाणी करण्यासाठी?"

"नाही, ह्युमिनने मला इथे पाठवलं ते मी इथे सुरक्षित राहू शकेन म्हणून. पण आम्ही दोघे, मी आणि व्हेनाबिली दोघेही संशोधक-अभ्यासक आहोत. आणि ज्ञान हा आमचा प्रांत आहे, ज्ञान मिळवणे हा आमचा हेतू आहे. मायकोजेनबद्दल बाहेरच्या जगात काहीच माहिती नाही आणि आम्हाला तुमच्या पद्धती, तुमच्या विचारपद्धतींबद्दल जाणून घेण्यात रस आहे. ही अगदी स्वाभाविक अशी जिज्ञासा आहे, आणि त्यात कुणालाही नुकसान नाही. उलट अशी जिज्ञासा कौतुकास्पदच असते."

"आह्... पण आम्हाला आमच्याबद्दल बाहेरच्या कुणालाही काहीही कळावं असं मुळीच वाटत नाही. ही आमची स्वाभाविक इच्छा आहे आणि आमचं नुकसान कशामुळे होतं वा होत नाही ते आम्ही ठरवतो. त्यामुळे मी तुला पुन्हा एकदा विचारतो, टोळीवाल्या,- तुला मायकोजेनवर रोबॉट आहे हे कसं कळलं, आणि तो इथे आहे हे कुठून कळलं?"

"अशी बाजारगप्प आहे खरी." सेल्डन सावकाश उत्तरला.

"हे तुझं पक्कं उत्तर आहे?"

“अगदी बाजारगप्प. पक्कच उत्तर आहे हे.”

सनमास्टर फोर्टीनचे निळे डोळे जणू तिखट झाले आणि तो आवाज न चढवता म्हणाला, “टोळीवाल्या सेल्डन, आम्ही फार वर्षांपासून टोळीवाल्या ह्युमिनबरोबर सहकार्य करीत आलो आहोत. टोळीवाला असूनही तो बराच सभ्य आणि विश्वासार्ह वाटला होता. टोळीवाला असूनही! त्याने तुम्हा दोघांना इथे आणलं आणि आमच्या संरक्षणाची मागणी केली तेव्हा आम्ही ती मंजूर केली. पण कितीही गुणी असला तरीही टोळीवाला ह्युमिन हा अखेर टोळीवालाच निघाला- आमचा गैरसमज झाला होता. तुमचे इथे येण्यामागचे खरे कारण काय असेल त्याची आम्हाला अजिबात खात्री वाटत नाही.”

“आमचा हेतू केवळ ज्ञान मिळवण्याचाच होता,” सेल्डन उत्तरला, “केवळ अभ्यासपूर्ण ज्ञान. टोळीवाल्या वेनाबिली बाई या इतिहासतज्ज्ञ आहेत. मलाही इतिहासात रस आहे. आम्हाला मायकोजेनच्या इतिहासात का रस वाटू नये बरं?”

“एक म्हणजे, आमची तशी इच्छा नाही. ते असो- आम्ही आमच्या दोन विश्वासू भगिनींना तुमच्याकडे तुमचा खरा हेतू जाणून घेण्यासाठी पाठवलं. तुमच्याशी सहकार्य करून, तुमच्या मनासारखं वागून तुमचा विश्वास त्यांनी संपादन केला. तुम्हाला अजिबात कळलंही नाही.” सनमास्टर फोर्टीन हसला, पण ते हसू हलकंफुलकं नव्हतं.

“रेनड्रॉप फॉर्टीफाइव्ह,” सनमास्टर फोर्टीफाइव्ह बोलत राहिला, “तुमच्या व्हेनाबिलीबरोबर खरेदीसाठी आली. या वेळी विशेष काही घडल नाही. अर्थात आम्हाला संपूर्ण अहवाल समजला. टोळीवाले सेल्डन महोदय, रेनड्रॉप फॉर्टीथ्रीने तुम्हाला आमची सूक्ष्मान्न शेती दाखवली. तिने तुमच्याबरोबर एकटीने यायची तयारी दाखवणं तुम्हाला कदाचित् संशयास्पद वाटलं असेल, कारण अशा गोष्टी

आमच्याकडे कधीही चालत नाहीत. पण तुम्ही सोयिस्कर अर्थ काढलात, की जे नियम एखाद्या बांधवाला लागू होतात ते तुम्हाला लागू होत नसतील. तुमच्या तकलादू कारणांमुळे तिचं मन जिंकलं असं वाटलं होतं तुम्हाला. तिने तुमच्या इच्छेनुसार वर्तन केलं. तिला बिचारीला त्याचा खूप मनस्ताप झाला. आणि नंतर तुम्ही तिच्याकडे आमचा पवित्र ग्रंथही मागितलात. ते तुम्हाला सहजपणे दिलं असतं तर तुम्हाला संशयास्पद वाटलं असतं, त्यामुळे तिने तुमच्याबद्दल विकृत आकर्षण वाटल्याचं नाटक वठवलं. तिचा हा स्वार्थत्याग कधीही विस्मरणात जाणार नाही- टोळीवाले, तुमच्याकडे अजूनही तो ग्रंथ आहे, आत्ता इथे तुमच्याकडे तो आहे असं समजतो मी. मला तो परत देता का?"

सेल्डन अगदी सुन्न बसून राहिला.

सनमास्टर फोर्टीनचा सुरकुतलेला हात पुस्तक घ्यायला पुढे झालेला, तो तसाच ताणलेला राहिला आणि मग तो म्हणाला, "तुमच्याकडून ते बळाने काढून घेण्यापेक्षा हे बरंच बरं राहील."

सेल्डनने ते देऊन टाकलं. सनमास्टर फोर्टीनने काही क्षण पुस्तकाची पानं उलटून पाहाण्यात घालवले- त्यातली काही पानं गेलेली तर नाहीत ना याची खात्री तो करून घेत होता.

मग तो सुस्कारत म्हणाला, "आता ही प्रत आम्हाला रीतसर नष्ट करावी लागेल. अरेरे... पण एकदा तुमच्या हाती हे पुस्तक पडल्यावर तुम्ही सॅक्रॅटोरियममध्ये आलात याचं आम्हाला अजिबात नवल वाटलं नाही. तुमच्यावर सतत नजर होती. तुम्हाला एक दृष्टीक्षेपातच कुणीही बंधूने वा भगिनीने ओळखलं असतं की तुम्ही टोळीवाले आहात म्हणून. तुम्हाला वाटलं की ते आपापल्या कामात गर्क असले तर त्यांचं तुमच्याकडे लक्ष जाणार नाही... मायकोजेनवर फक्त सत्तर स्किनकॅप्स आहेत.

सगळ्या कामासाठी आलेल्या टोळीवाल्यांसाठीच. पण ते आपापल्या कामापुरते आपापल्या शासकीय इमारतींतच रहातात. त्यामुळे तुम्ही बाहेर फिरताना सर्वांनी तुम्हाला ओळखलं. तुम्हाला भेटलेला तो वयस्कर बंधू- त्याने तुम्हाला लायब्ररी आणि सॅक्रॅटोरियमबद्दल मुद्दामच माहिती दिली. पण तुम्ही तिथे जाणं निषिद्ध आहे हेही त्याने तुम्हाला सांगितलं होतं. तुम्हाला सापळ्यात अडकवण्याची आमची इच्छा नव्हती. स्कायस्ट्रिप टूनेही तुम्हाला सावध केलं. जोरात सांगितलं. पण तरीही तुम्ही हटला नाहीत.

"ज्या दुकानातून तुम्ही ते पांढरे कर्टल्स घेतलेत त्यांनीही आम्हाला ताबडतोब कळवलं. आणि मग तुम्ही काय करणार हे आम्हाला स्पष्टच कळलं. लायब्ररी मुद्दामच रिकामी ठेवण्यात आली होती. लायब्रेरियनला तुमच्याकडे बघू नये अशा सूचना होत्या. सॅक्रॅटोरियममध्ये गर्दी आवरण्यात आली होती. एक बंधू चुकून तुमच्याशी बोलला, पण तुम्ही कोण ते कळताच तो घाईघाईने दूर गेला. मग तुम्ही इथे आलात.

"हे पहा, इथे येण्याचा तुमचा हेतू होताच, आम्ही तुम्हाला इथे फसवून आणलेलं नाही. तुम्ही स्वतः आलात, स्वतःच्या इच्छेने आलात- पुन्हा एकदा विचारतो- कशासाठी?"

या वेळी डॉर्सने उत्तर दिलं. तिचा आवाज कडक होता आणि नजर कठोर. "आम्ही तुम्हाला पुन्हा एकदा सांगतो, मायकोजेनियन. आम्ही अभ्यासक आहोत, आम्ही ज्ञानाला पवित्र मानतो आणि आम्ही ज्ञानाच्याच शोधात असतो. तुम्ही आम्हाला इथे भुलवून आणलेलं नाही, पण तुम्ही आम्हाला थांबवलंही नाही. या इमारतीत आम्ही शिरण्यापूर्वीच तुम्हाला ते करता आलं असतं. तुम्ही उलट सर्व अडथळे दूर केलेत आणि याला भुलवणं म्हणता येईल. आणि आम्ही काय नुकसान

केलं आहे? तुमच्या या इमारतीला, या दालनाला, तुम्हाला किंवा त्याला कोणतंही नुकसान आम्ही पोहोचवलेलं नाही.” तिने त्या रोबॉटकडे बोट दाखवलं, “हा तर एक मृतवत् धातूचा सांगाडा आहे इथे तुम्ही लपवून ठेवलेला. आणि आता ते आम्हाला समजलंय. की तो जिवंत नाही. एवढीच माहिती आम्हाला हवी होती. आम्हाला वाटलेलं की यापेक्षा अधिक काही असेल आणि आमची पार निराशा झाली. पण आता हे काय आहे हे कळल्यावर आम्ही इथून निघून जाऊ आणि तुमची इच्छा असल्यास मायकोजेनवरूनही निघून जाऊ.”

सनमास्टर फोर्टीनने चेहऱ्यावर काहीही भावन दर्शवता सारं ऐकून घेतलं आणि मग मा६ तो सेल्डनकडे पाहात बोलू लागला, “हा रोबॉट, जो तुम्ही पाहाता आहात, हे एक प्रतीक आहे- आमच्या हरवलेल्या जगाचं प्रतीक- आमच्याकडे जे उरलेलं नाही त्या साऱ्याचं प्रतीक... गेली हजारो वर्षे आम्ही याचा विसर पडू दिलेला नाही आणि कधीतरी पुन्हा ते जग आम्ही मिळवू असा आमचा उद्देश नक्कीच आहे. आमच्याकडे जे काही शिल्लक आहे ते हे एवढंच आहे- खरंखुरं आणि अस्सल. आणि जे आम्हाला प्रिय आहे त्याला तुझी ही स्त्री मृतवत् धातूचा सांगाडा म्हणते आहे. याच्याशी तू सुद्धा सहमत आहेस का, टोळीवाल्या सेल्डन?”

सेल्डन म्हणाला, “आम्ही अशा समाजातून आलो आहोत, जिथे हजारो वर्षांपूर्वीच्या भूतकाळाशी बांधून घेतलं जात नाही. भूतकाळ आणि आम्ही यातील नात्यात आम्ही जगत नाही. वर्तमानात जगतो. वर्तमान- हे भूतकाळाचे फलित असते. काळाच्या कुठल्यातरी एका टप्प्याला छातीशी कवटाळून बसणे हा वर्तमान नसतो. बौद्धिक पातळीवर आम्ही हे समजून घेऊ शकतो की हा रोबॉट तुम्हाला अर्थपूर्ण वाटत असेल. आणि तसं तुम्ही करत रहायला आमची काय हरकत

असणार. पण आम्ही जे पाहातो ते आमच्या डोळ्यांनी, जसे तुम्ही तुमच्या डोळ्यांनी पाहता. आमच्या दृष्टीने तो धातूचा मृतवत सांगाडाच आहे.''

''आणि आता-'' डॉर्स म्हणाली, ''आम्ही निघतो.''

''तुम्ही जाऊ शकत नाही.'' सनमास्टर फोर्टीन म्हणाला, ''इथे येऊन तुम्ही गुन्हा केला आहे. तुम्ही म्हणालच- की तो आमच्या दृष्टीने गुन्हा आहे.'' त्याच्या ओठांवर थंडगार हास्य उतरलं होतं. ''पण हा आमचा प्रदेश आहे आणि इथं आम्ही अर्थ ठरवतो. हा तुमचा गुन्हा आम्ही ठरवू त्या अर्थाने- मृत्यूदंडाच्या शिक्षेस पात्र आहे.''

''आणि तुम्ही आम्हाला गोळी घालणार?'' डॉर्स संतापून म्हणाली.

सनमास्टर फोर्टीनच्या चेहऱ्यावरचे भाव तुच्छतेचे होते, आणि तो सेल्डनशी बोलत राहिला. ''तुला आम्ही काय आहोत असं वाटतं, सेल्डन? आमची संस्कृती तुमच्याइतकीच जुनी आहे, तितकीच गुंतागुंतीची आहे आणि नागर आहे- तितकीच मानवीय आहे. माझ्याकडे शस्त्रे नाहीत. तुमच्यावर खटला चालेल आणि तुमचा गुन्हा स्पष्ट असल्यामुळे तुम्हाला कायद्यानुसार मृत्यूदंड दिला जाईल. चटकन् आणि वेदनारहित.

''तुम्ही इथून जाण्याचा प्रयत्न केलात, तर मी तुम्हाला थांबवणार नाही, पण खाली माझे बांधव आहेत. तुम्ही सॅक्रॅटोरियममध्ये शिरल्यानंतर बरेच बांधव जमा झाले आहेत- आणि तुमच्या कृतीबद्दलचा संताप इतका आहे की त्यांचा हात उचलेल आणि तुम्हाला त्यांना तोंड देणं कठीण होईल. आमच्या इतिहासात अशा घटना घडल्या आहेत आणि त्यांत काही टोळीवाले मृत्यूमुखी पडल्याचे दाखले आहेत. आणि ते काही फार सुखकर मृत्यू नव्हते- वेदनारहित तर अजिबातच नव्हते.''

“आम्हाला याची धमकी मिळाली होती,” डॉर्स म्हणाली, “स्कायस्ट्रिप टूने सांगितलं होतं- ही घ्या तुमची गुंतागुंतीची मानवीय सभ्यता.”

“भावनेच्या आहारी गेलेली माणसं हिंसा करू शकतात, सेल्डन,” सनमास्टर फोर्टीन शांतपणे बोलत राहिला, “त्यांची मानवता शांतीकाळात वेगळी असते. हे सर्व संस्कृतींमध्ये असंच असतं- तुझी ही स्त्री इतिहासतज्ञ आहे त्यामुळे तिला हे माहीत असायला हवं.”

सेल्डन म्हणाला, “आपण विवेकाने विचार करू, सनमास्टर फोर्टीन. स्थानिक बाबींत तुमचा शब्द म्हणजे शेवटचा असू शकेल. पण आमच्यावर तुमचा कायदा चालणार नाही हे तुम्ही जाणता. आम्ही दोघेही मायकोजेनचे नागरिक नसून साम्राज्याचे नागरिक आहोत. आणि सम्राट आणि त्यांचे कायदेशीर अधिकारीच आमच्या मृत्यूदंडालायक गुन्ह्याचा निवाडा करू शकतात.”

सनमास्टर फोर्टीन म्हणाला, “ते सगळं कागदावर आणि होलोव्हिजन स्क्रीन्सपुरतं खरं असेल. पण आपण आता सैद्धांतिक बडबड करत नाही आहोत. पावित्र्यभंगाच्या गुन्ह्यांची सजा मृत्यूदंडाने देण्याचे अधिकार ज्येष्ठगुरूकडे फार पूर्वीपासून आहेत आणि त्यात साम्राज्याच्या सिंहासनाकडून कधीही ढवळाढवळ झालेली नाही.”

“गुन्हा तुमच्या नागरिकांनी केलेला असेल तरच,” सेल्डन म्हणाला, “ते बाहेरचे लोक असतील तर सगळं बदलून जातं.”

“तुमच्याबाबतीत ते खरं नसावं. टोळीवाल्या ह्युमिनने तुम्हाला इथे आणलं ते फरार म्हणून. आणि आम्हा मायकोजेनियन्सच्या डोक्यांत काही यीस्ट भरलेलं नाही- तुम्ही सम्राटाच्या कायद्यापासूनच फरार झाला असणार. तो कशासाठी तुमच्या रक्षणासाठी हरकत घेईल?”

“कारण,” सेल्डन म्हणाला, “तो नक्कीच हरकत घेईल. आम्ही जरी त्यांच्या कायद्यापासून पळत असलो, आणि त्याला आम्हाला शिक्षा करायची असली तरीही, त्याला आमचा ताबा हवाच असेल. तुमच्या कायद्यांनुसार कोणत्याही कारणासाठी आम्हाला मारू देणं, अमायकोजेनियन लोकांना साम्राज्याच्या कायद्याबाहेर शिक्षा करणं ही सम्राटाच्या अधिकारांची पायमल्ली असेल- आणि कोणताही सम्राट ते चालवून घेणार नाही. मायक्रोफूडचा व्यापार विस्कळीत होऊ नये अशी त्याची इच्छा असेलही, पण तरीही साम्राज्याचे अधिकार अबाधित ठेवणं हे त्यांना अधिक महत्त्वाचं वाटेल हे निश्चित. आम्हाला मारण्याची तुम्हाला जी काही घाई सुटली आहे त्यातून सम्राटाचे सैन्य इथे येऊन तुमची शेतं नि घरं उद्ध्वस्त करू शकतील, तुमचं सॅक्रॅटोरियम अपवित्र करू शकतील आणि तुमच्या भगिनींचा गैरफायदा घेतील याची नोंद घ्या. विचार करा.”

सनमास्टर फोर्टीन पुन्हा एकदा हसला, पण अजिबात मवाळ झाला नाही. “मी विचार केला आहे त्याचा. आणि पर्याय आहेच. आम्ही तुमचा न्यायनिवाडा केला की तुमची शिक्षा लांबणीवर टाकू, त्या वेळात तुम्ही सम्राटाकडे स्वतःसाठी अर्ज करा. आम्ही त्यांच्या अधिकाराचा आदर केला याबद्दल सम्राटाला नक्कीच कृतज्ञता वाटू शकेल- तो तुम्हाला ताब्यात घेईल- त्याला तुमचा ताबा कशासाठी हवा आहे माहीत नाही- पणयात मायकोजेनचा फायदाच होईल. चालेल ना? करा सम्राटाकडे अर्ज सावकाशीने- आम्ही त्यांच्याकडे तुमचा ताबा देऊन टाकू, हो ना?”

सेल्डन आणि डॉर्सने एकमेकांकडे ओझरती नजर टाकली आणि ते गप्प राहिले.

सनमास्टर फोर्टीन म्हणाला, “मरण्यापेक्षा सम्राटाकडे सुपूर्द होणं तुम्हाला आवडेल मला वाटतं- पण त्यात फार काही फरक नसावा असं का बरं मला वाटतं आहे?”

“खरं म्हणजे,” एक नवाच आवाज उमटला, “मला वाटतं, दोन्ही पर्याय स्वीकारार्ह नाहीत, आपण तिसरा पर्याय शोधू.”

५९

डॉर्सने प्रथम त्या नवागताला ओळखलं, कदाचित् तिला त्याच्या येण्याची अपेक्षाच होती.

“ह्युमिन,” ती म्हणाली, “बरं झालं बाबा, तुला आम्ही सापडलो. हॅरि माझं ऐकत नाही हे स्पष्ट झाल्याबरोबर मी तुझ्याशी संपर्क साधला... हे-” तिने त्या खोलीकडे पाहात हात नाचवले.

ह्युमिनच्या मुद्रेवरचं स्मित अगदीच रेषेपुरतं होतं, त्याच्या चेहऱ्यावरचं गांभीर्य त्यामुळे कणभरही कमी झालं नाही. त्याचा सावधपणा अगदी हलकेच जाणवत होता.

“काय सांगणार.” तो म्हणाला, “मी इतर गोष्टींत व्यग्र होतो. अगदी थोड्या अवधीत सगळं टाकून येणं मला शक्य नसतं. आणि इथे पोहोचल्यावर मलाही पांढरा कर्टल, लाल सॅश आणि हो स्किनकॅपही घेणं जरूर होतं. पोहोचलो. थोडा आधी पोहोचलो असतो तर हे सगळं मी थांबवू शकलो असतो. पण मला जरा उशीरच झाला.”

सनमास्टर फोर्टीनला भयंकर धक्का बसलेला, तो किंचित सावरून बोलू लागला तेव्हा त्याच्या स्वरातलं नेहमीचं कमावलेलं गांभीर्य थोडं ओसरलं होतं. “तू इथे कसा आलास, ह्युमिन?”

“सोपं नव्हतं, ज्येष्ठ गुरू, पण व्हेनाबिली नेहमी म्हणते, की मी फार हट्टी माणूस आहे. इथल्या काही नागरिकांना अजूनही आठवतंय की मी त्यांच्या मायकोजेनसाठी पूर्वी कायकाय मदत केली होती वगैरे. मला तर सन्माननीय बंधू असल्याचा सन्मानही मिळाला आहे, की विसरलास तू, सनमास्टर फोर्टीन?”

तो उत्तरला, “विसरलो नाही मी. पण अगदी चांगल्यातली चांगली स्मृतीसुद्धा काही अपराधांपुढे फिकी पडते. या इथे- एक टोळीवाला आणि टोळीवाली. यापेक्षा मोठा अपराध कोणताही नाही. तू जे काही केलं होतंस आमच्यासाठी त्याने याची भरपाई होत नाही. माझे लोक कृतघ्न नाहीत. तुझ्या उपकाराची फेड वेगळ्या प्रकारे करू आम्ही कधीतरी. पण या दोघांना मरावं लागेल किंवा सम्राटाकडे सुपूर्द करावं लागेल.”

“मी सुद्धा आलो आहे इथे.” ह्युमिन शांतपणे म्हणाला, “तो सुद्धा गुन्हाच आहे ना?”

“केवळ तुझ्यासाठी,” सनमास्टर फोर्टीन म्हणाला, “विशेष अपवाद म्हणून- तू सन्मान्य बंधू आहेस म्हणून तुझ्या गुन्ह्याकडे एकदा दुर्लक्ष करू शकतो. या दोघांसाठी नाही.”

“का- तुला सम्राटाकडून बक्षीस अपेक्षित आहे म्हणून? काही मेहेरबानी? कसली सवलत? तू त्याच्या संपर्कात आहेस की काय- की त्याच्या प्रशासकीय प्रमुखाच्या संपर्कात- एटो डेमेर्झेलच्या?”

“तो चर्चेचा विषय नाही.”

“मिळाली की मला कबुली मग. चल चल, मी काही तुला सम्राटाने कसलं वचन दिलंय वगैरे विचारत नाही, पण ते काही फार नसणार हे सांगू शकतो. या सडक्या काळात तो फार काही देऊ शकत नाही.- त्याच्याकडेच काही नाही फारसं. चल, मी तुला एक प्रस्ताव देतो. या दोघांनी तुला सांगितलं का की ते दोघे अभ्यासक आहेत म्हणून?”

“सांगितलं.”

“आणि ते आहेतच. ते खोटं सांगत नाहीयेत. या टोळीवाल्या बाई इतिहासतज्ञ आहेत आणि हा टोळीवाला मनुष्य गणितज्ञ आहे. हे दोघे एकत्र येऊन इतिहासाचं गणित बसवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याला त्यांनी सायकोहिस्ट्री असं नाव दिलंय- मानसेतिहास.”

“मला या सायकोहिस्ट्रीचं काहीही माहीत नाही. आणि मला गरजही नाही. ते किंवा तुमच्या टोळीच्या अभ्यासाच्या कुठल्याच अंगात मला रस नाही.” सनमास्टर फोर्टीन म्हणाला.

“तरीही, तू माझं ऐकून घे असं मी सुचवेन.” ह्युमिन म्हणाला.

त्याला सारं समजावून द्यायला ह्युमिनला पंधरा मिनिटं लागली- अगदी थोडक्यात त्याने भविष्यात काय होईल याचा अगदी शक्य तितका अचूक अंदाज वर्तवण्यासाठी समाजाचे स्वाभाविक नियम रेखण्याची शक्यता काय असेल हे समजावून सांगितले. त्याच्या कथनात जणू तो उद्धृते देत असल्याचा स्वर होता.

त्याचं सांगून झालं आणि सनमास्टर फोर्टीन कोऱ्या चेहऱ्याने म्हणाला, “हा निव्वळ बिनबुडाचा जुगार वाटतो मला.”

सेल्डनच्या मुद्रेवर त्याचं म्हणणं मान्य असल्यासारखे भाव उमटले, आणि तो काही उद्गारणार तेवढ्यात ह्युमिनचा त्याच्या गुडघ्यावर असलेला हात किंचित आवळला.

"शक्य आहे, ज्येष्ठ गुरू, पण सम्राटाला तसं वाटत नाही. आणि मी जेव्हा सम्राट म्हणतो तेव्हा- तो तसा सौम्य प्रकृती इसम आहे- माझा इशारा डेमेर्झेलकडे असतो. त्याच्या महत्त्वाकांक्षांबद्दल मी तुम्हाला सांगायची गरज नाही. या दोघांना ताब्यात घेणं त्यांना फारच आवडेल- म्हणून तर मी त्यांना इथे आणलं. तुम्ही या अभ्यासकांना त्यांच्या सुपूर्द करून डेमेर्झेलचं काम करून द्याल ही माझी अपेक्षा नव्हती."

"त्यांनी जो अपराध केला आहे तो-"

"ते समजलं, ज्येष्ठ गुरू, पण केवळ तुम्ही म्हणता म्हणूनच तो अपराध आहे. त्यातून खरोखरच कुणालाही इजा झालेली नाही."

"आमच्या श्रद्धेला- आमच्या गाढ विश्वासाला इजा पोहोचली आहे-"

"पण विचार करा, सायकोहिस्ट्रीचे शास्त्र डेमेर्झेलच्या हाती पडले तर काय होईल. होय- त्यातून कदाचित् काहीही निष्पन्न होणार नाही, पण क्षणभरासाठी समजा की त्यातून खरोखरच भाकिते वर्तवता आली, आणि साम्राज्याच्या शासनाला त्या माहितीचा उपयोग करावासा वाटला, आपले भविष्य वेगळे घडावे यासाठी त्यांनी प्रयत्न करायचा ठरवला तर."

"तर?"

"ज्येष्ठ गुरू, मला सांगा साम्राज्याच्या सोयीचे पर्यायी भविष्य हे काय असेल याबाबत काही शंका असू शकते का? सगळी सत्ता एककेंद्री होईलच ना? गेली अनेक शतके, तुम्हाला ठाऊक आहे- साम्राज्याचे विकेंद्रीकरण होत चालले आहे. अनेक

जगांतून सम्राटाला केवळ नावापुरता मान दिला जातो, त्यांची राज्ये तेच चालवतात. इथे, ट्रॅन्टोरवरही विकेंद्रीकरण आहेच. मायकोजेनवरच पहा, सम्राटाचा हस्तक्षेप केवळ नाममात्रच असतो. तुम्ही ज्येष्ठ गुरू राज्य करता आणि कुणीही साम्राज्याचा अधिकारी तुमच्या कडेला बसून तुमच्या कामावर, निर्णयांवर लक्ष ठेवत नसतो. डेमेर्झेलसारख्या लोकांनी जर भविष्य स्वतःच्या मनाप्रमाणे आखून घ्यायचं ठरवलं तर ही स्थिती टिकेल असं वाटतं तुम्हाला?"

"अगदीच तकलादू वाटतंय हे-" सनमास्टर फोर्टीन म्हणाला, "पण अस्वस्थ करणारं आहे हे मान्य करतो मी."

"आणि दुसरी शक्यता पहा, या अभ्यासकांनी त्यांची कामगिरी पूर्ण केली, तर -तुम्हाला ते अशक्य वाटत असंलं तरीही- तुम्ही त्यांना मारून टाकणं शक्य असताना- सोडून दिलंत एवढं तर ते नक्कीच लक्षात ठेवतील. आणि भविष्याची पुनर्रचना करताना कदाचित् ते मायकोजेनला स्वतःचं जग द्यावं- त्या जगाची भूरचना हरवलेल्या जगासारखी असावी असं सुचवतील. ते दोघे विसरले तरीही मी त्यांना आठवण करेन."

"वेल-" सनमास्टर फोर्टीन घुटमळला.

"चल, चल," ह्युमिन म्हणाला. "तू काय विचार करतो आहेस हे ओळखणं काही मला अवघड नाही. टोळीवाल्यांपेक्षाही तुला डेमेर्झेलबद्दल जास्त अविश्वास आहे. आणि सायकोहिस्ट्रीतून कही निष्पन्न होण्याची शक्यता कितीही कमी असली- बघ मी प्रामाणिक नसतो तर हेसुद्धा कबूल केलं नसतं- ती शून्य तर नक्कीच नाही. आणि त्यातून हरवलेल्या जगाची पुनर्स्थापना होणार असेल, तर तुला आणखी काय हवं? एक छोटीशी संधी असली तरीही ती घ्यायला हवी ना? हे बघ, मी वचन देतोय- आणि माझं वचन असं सुखासुखी दिलं जात नसतं. या दोघांना सोडून दे

आणि तुझ्या मनातील इच्छा पूर्ण करण्याची छोटीशी का होईना संधी घे.- नाही तर मग कसलीच संधी नसेल.”

बराच वेळ शांतता पसरली. आणि मग सनमास्टर फोर्टीन सुस्कारला. “मला कळत नाही, टोळीवाल्या ह्युमिन, पण आपण जेव्हाजेव्हा भेटतो तेव्हातेव्हा तू मला माझ्या इच्छेबाहेरचं काही ना काही करायला भाग पाडतोस.”

“आजवर कधीतरी मी तुला अयोग्य मार्ग दाखवला आहे का?”

“इतक्या छोट्या संधीचा प्रस्ताव तरी मला कधीच दिला नव्हतास तू.”

“त्यातून मिळणारे पारितोषिक इतके मोठे असणार आहे- आपोआप तोल राखला जातो.”

आणि सनमास्टर फोर्टीनने मान हलवली, “तुझं बरोबर आहे. जा या दोघांना घेऊन इथून. मायकोजेनबाहेर जा. आणि पुन्हा ते माझ्या दृष्टीस न पडोत- जर तशी वेळ आलीच- पण ती माझ्या आयुष्यात तरी कधीच येणार नाही.”

“कदाचित नाही येणार, ज्येष्ठ गुरू. पण तुम्ही सारे गेली वीस हजार वर्षे त्याची न थकता वाट पाहात आहात. आणखी कदाचित्- दोनशे वर्षे थांबायची तुमची तयारी नसेल?”

“शक्य असतं तर मी क्षणभरही वाट पाहिली नसती, पण माझे लोक कितीही काळ वाट पाहू शकतात.”

आणि मग तो उभा रहात म्हणाला, “मी रस्ता मोकळा करतो, जा यांना घेऊन.”

६०

अखेर ते पुन्हा एका भुयारात परतले. ह्युमिन आणि सेल्डन दोघांनी इंपेरिअल सेक्टरमधून स्ट्रीलिंग विद्यापीठाकडे प्रयाण केले होते तेव्हा ते अशाच एक भुयारातून एअर टॅक्सीने गेले होते. आता ते वेगळ्या भुयारात होते- मयाकोजेनकडून कुठेतरी- कुठे ते सेल्डनला माहीत नव्हतं. आणि त्याला विचारायचा धीर होत नव्हता. ह्युमिनची मुद्रा जणू ग्रेनाईटमधून कोरून काढल्यासारखी दिसत होती- संभाषणाची फारशी संधी देणार नव्हता तो.

ह्युमिन पुडे बसला होता. उजवीकडची जागा रिकामी होती. सेल्डन आणि डॉर्स मागे बसले होते.

डॉर्सकडे बघून तो किंचित हसला, पण तीही हुप्प दिसत होती. "पुन्हा एकदा खरेखुरे कपडे घालून बरं वाटतंय नाही?"

"परत कधीही मी कर्टलसारखं साधारण दिसणारं काहीही घालणार नाही. आणि स्किनकॅप तर कधीच नाही. आता मला अगदी कुणी साधा टकल्या माणूस दिसला तरीही मी बिचकणार आहे." डॉर्स म्हणाली.

आणि अखेर डॉर्सने सेल्डनच्या मनातला प्रश्न विचारला, "चेटर," तिचा स्वर जरासा तक्रारखोर होता, "कुठे चाललोय आपण, काही सांगशील की नाही?"

ह्युमिनने जरासं वळत डॉर्स आणि सेल्डनकडे गंभीर मुद्रेने पाहिलं, "कुठेतरी अशा ठिकाणी," तो म्हणाला, "जिथे काही गोंधळात अडकणं तुम्हाला कठीण जावं- अर्थात अशी कुठली जागा आहे का मला शंकाच आहे."

डॉर्सचा चेहरा उतरला, "खरं म्हणजे माझीच चूक आहे. स्ट्रीलिंगमध्ये मी हॅरिला अपरसाईडवर एकट्याला जाऊ दिलं. मायकोजेनवर मी बरोबर होते, पण मी त्याला सॅक्रॅटोरियममध्ये जाण्यापासून रोखायलाच हवं होतं."

“मी आग्रहच धरलेला.” सेल्डन मऊपणे म्हणाला, “डॉर्सची त्यात काहीच चूक नव्हती.”

ह्युमिनने कुणालाच दोष देण्यात रस दाखवला नाही. तो म्हणाला, “तुला तो रोबॉट बघायचा होता एवढं कळलं मला. त्या मागे काय कारण होतं? सांगशील मला?”

सेल्डन जरासा लाल झाला. “माझं चुकलंच ते, ह्युमिन. मला आशा-अपेक्षा होती तसं काहीच दिसलं नाही मला. आय़रीत काय आहे हे मला माहीत असतं तर मी तिथे गेलो नसतोच. सगळाच गोंधळ घातला मी.”

“पण सेल्डन, तुला काय पाहायची आशा होती? सांग मला. हवा तितका वेळ घे. भरपूर लांबचा रस्ता आहे हा. आणि मला ऐकायचंय.”

“ह्युमिन, मला वाटत होतं की ह्युमेनिफॉर्म रोबॉट्स असत पूर्वी, आणि त्यांचं आय़ुष्य बरंच लांबलचक असे. मला वाटलेलं त्यातला कदाचित् एखादा तरी जिवंत असेल. आणि तोच त्या आय़रीमध्ये असेल. तिथे रोबॉट होता- पण तो धातूचा. आणि मृत. केवळ प्रतीक म्हणून जपलेला. मला माहीत असतं तर-”

“होय. पण आपल्याला सगळं माहीत असतं तर मग कसल्या संशोधनाची गरजच नव्हती. तुला ह्युमेनिफॉर्म रोबॉट्सची माहिती कुठून मिळाली? कुठल्याही मायकोजेनियनने हे तुला सांगितलेलं असणं शक्य नाही- म्हणजे एकच माहितीचा स्रोत उरतो. ते मायकोजेनियन पुस्तक- प्राचीन ऑरोरन आणि मॉडर्न गॅलाक्टिक भाषेत लिहिलेलं छापील पुस्तक. होय ना?”

“होय.”

“तू त्याची प्रत मिळवलीस तरी कशी?”

uसेल्डन थबकला आणि पुटपुटला, “थोडं शरम वाटण्यासारखं आहे ते.”

“मला सहजासहजी शरम नाही वाटत, सेल्डन.”

सेल्डनने त्याला सांगून टाकलं आणि ह्युमिन अगदी हलकेच हसला.

ह्युमिन म्हणाला, “ते जे झालं ते केवळ एक नाटकच असेल असा विचार तुला शिवलाही नाही? कोणतीही भगिनी असं काही कधीच करणार नाही- तशी आज्ञा असल्याशिवाय नाहीच. तेही बराच दबाव टाकल्यानंतरच.”

सेल्डन जरा तिखट स्वरात म्हणाला, “असं काही अजिबात वाटलं नाही. कितीतरी लोक विकृत असतात. तुला हसायला काय जातंय. तुला जे माहीत होतं त्यातलं मला आणि डॉर्सला काहीच माहीत नव्हतं. मी सापळ्यात अडकू नये असं वाटत होतं, तर मला सगळी माहिती नीट द्यायला हवी होतीस.”

“बरोबर आहे तुझं. मी माझा शेरा मागे घेतो. ते जाऊ दे, ते पुस्तक तुझ्याकडे आहे का अजूनही?”

“नाही, सनमास्टर फोर्टीनने ते काढून घेतलं माझ्याकडून.”

“किती वाचून पूर्ण केलेलंस ते?”

“अगदी थोडंसं. वेळ नव्हता तेवढा. मोठं पुस्तक आहे ते, आणि तुला सांगतो ह्युमिन- भयंकर कंटाळवाणं.”

“हो, माहीत आहे चांगलंच. कारण तुझ्यापेक्षा जास्त वाचलंय मी ते नक्कीच. नुस्तच कंटाळवाणं नाही, तर अगदीच अविश्वासार्ह आहे ते. मायकोजेनियन दृष्टीकोनातून लिहिलेला इतिहास आहे तो, अगदी अधिकृत. त्यात वस्तुनिष्ठ सत्यापेक्षा त्यांचा दृष्टीकोन मांडणेच महत्त्वाचे मानले आहे. आणि काही ठिकाणीतर ते हेतुपुरस्सर धूसर ठेवलं आहे- समजा बाहेरच्यांनी ते वाचलं तर त्यांना आपण काय वाचलंय ते कळू नये अशाच रीतीने लिहिलेलं. उदाहरणार्थ, तू असं काय वाचलंस की तुला रोबॉट्समध्ये रस आला?”

“सांगितलं ना तुला, त्यात ह्युमेनिफॉर्म्सबद्दल उल्लेख आहे- असे रोबॉट्स जे माणसांहून वेगळे आहेत असं ओळखताही येत नसे. दिसायला अगदी हुबेहूब माणसांसारखे.”

“असे किती होते?” ह्युमिनने विचारलं.

“त्यात तसं म्हटलेलं नाही- निदान मी तरी वाचलं नाही तिथवर. दिलीही असेल संख्या. मूठभर असतील कदाचित्. पण त्यातल्या एकाचा उल्लेख त्या पुस्तकात रेनेगेड म्हणून केला आहे. काहीतरी विशिष्ट अर्थ असणार त्याला. फारसा आनंददायक नसणारा. पण मला काय ते कळलं नाही.”

“तू मला यातलं काहीही सांगितलं नाहीस,” डॉर्सने हटकलं, “तू मला विचारलं असतंस तर मी सांगितलं असतं की हे काही विशेषनाम नाही. हा अगदी प्राचीन शब्द आहे. त्याचा अर्थ होतो फितूर. गॅलॅक्टिक भाषेत तो ट्रेटर असतो. पण साधा फितूर नव्हे, तर आपल्या फितुरीचा अभिमान बाळगणारा.”

“प्राचीन भाषेचे तपशील आपण तुझ्यावरच सोडू, डॉर्स, पण, जर असा रेनेगेड रोबॉट खरोखरच असेल तरीही त्याला त्यांनी ज्येष्ठांच्या आयरीत जपून ठेवण्याची, श्रद्धेय मानण्याची काही शक्यताच नव्हती.”

सेल्डन म्हणाला, “मला रेनेगेडचा अर्थच माहीत नव्हता, पण तो शत्रुत्व पत्करलेला कुणी असावा एवढं मला जाणवलं. मला वाटलं त्याचा पराभव केला असेल आणि म्हणून त्याला मायकोजेनियन्सच्या विजयाचं प्रतीक म्हणून ठेवलं असेल.”

“त्या पुस्तकात कुठे उल्लेख होता का रेनेगेडच्या पराभवाचा?”

“नाही, पण मला वाटलं मी वाचला नसेल तो भाग.”

“शक्य नाही. मायकोजेनचा कुठलाही विजय असो, तो त्या पुस्तकात जोरजोरात, अनेकवार सांगितला गेला असता.”

“आणखी एक मुद्दा होता त्या पुस्तकात रेनेगेड संबंधी.” सेल्डन जरा चाचरत म्हणाला, “पण मला ते नीटसं कळलं असेल याची खात्री नाही वाटत.”

ह्युमिन म्हणाला, “मी सांगितलं तसं... कधीकधी ते काही गोष्टी मुद्दाम धूसर ठेवतात.”

“तरीही, ते असं काहीसं सुचवतात, की कसं काय माहीत नाही पण रेनेगेड मानवी भावभावनांवर कब्जा करू शकतो आणि त्यांच्यावर प्रभाव टाकू शकतो.”

“कोणताही राजकारणी हे करू शकतोच की.” ह्युमिनने खांदे उडवले, “ते प्रभावी ठरतं तेव्हा त्याला करीष्मा म्हणतात.”

सेल्डन सुस्कारला, “मला त्यावर विश्वास ठेवायचा होता खरा. तेवढंच होतं ते. प्राचीन ह्युमेनिफॉर्म रोबॉट जिवंत असता तर- त्याच्याशी बोलून मला खूप माहिती मिळू शकली असती. प्रश्न विचारता आले असते.”

“त्याने काय साध्य झालं असतं?”

“अतिप्राचीन आरंभीच्या गॅलॅक्टिक समाजाचे तपशील कळले असते. ज्या काळात अगदी मूठभर जगे अस्तित्वात असतील त्या काळातले तपशील. अशा लहानशा गॅलॅक्टिक परिवाराच्या आधारे सायकोहिस्ट्रीची रचना करणं सोपं गेलं असतं.”

ह्युमिन म्हणाला, “जे ऐकायला मिळालं असतं त्यावर तुला विश्वास ठेवता आला असता कां? इतक्या हजारो वर्षांनंतर रोबॉटच्या स्मृतीवर विश्वास ठेवणं तुला योग्य वाटलं असतं? त्यात किती फेरफार होऊ शकले असतील?”

"बरोबर," डॉर्स अचानक म्हणाली, "ती स्मृती म्हणजे कॉम्प्युटराइज्ड नोंदींसारखीच असती- मी तुला बोलले होते हॅरि त्याबद्दल. अशा रोबॉट स्मृती सावकाशीने फेकून दिल्या जातात, हरवतात, खोडल्या जातात, आणि बदलल्याही जातात. काही काळापुरतंच मागे जाणं शक्य असतं- नंतर ती माहिती विश्वासार्ह रहात नाही- काहीही करा."

ह्युमिनने रुकार दर्शवला, "मी याला माहितीविश्वातील अनसर्टन्टी प्रिन्सिपल- अनिश्चिततेचे तत्व म्हणून संबोधलेलं ऐकलं आहे."

"पण असं नाही होऊ शकत?" सेल्डन विचारात पडून म्हणाला, "काही विशिष्ट माहिती, काही विशिष्ट कारणांसाठी जतन केली जाईल? मायकोजेनियन पुस्तकातील काही भाग वीस हजार वर्षांपूर्वीच्या घडामोडींबद्दल बोलतही असतील आणि तरीही जसेच्या तसे टिकून राहिले असतील. एखादी माहिती जितकी महत्त्वाची, जितकी मोलाची असेल, तितकी ती चांगल्या प्रकारे, जशीच्या तशी टिकून राहिलेली असू शकते."

"यात 'विशिष्ट' हा शब्द महत्त्वाचा आहे. तुला जे जतन व्हायला हवं असं वाटेल ते त्या पुस्तकात महत्त्वाचं मानलं गेलं नसेल, किंवा रोबॉटला जे लक्षात ठेवावं असं वाटेल ते काहीतरी वेगळंच असेल- तुला जे महत्त्वाचं वाटतं तेच नसेल."

सेल्डन निराश होऊन म्हणाला, "सायकोहिस्ट्रीवर काम करण्यासाठी मी कुठल्याही दिशेला वळलो तरी जणू सगळीकडेच काही ना काही गोंधळच होतो- सगळं अशक्यच होऊन बसतं. कशासाठी प्रयत्न करायचा?"

"आत्ता नसेल आशादायी," ह्युमिन कोरेपणाने म्हणाला, "पण योग्य प्रतिभावंताला सापडेलच मार्ग- आत्ता आपल्याला अपेक्षितही नसेल असा एखादा

मार्ग सामोरा येईल. जरा वेळ लागेल- तेवढी कळ काढ. अरे- आता थांबू या आपण इथे. समोर रेस्ट एरिया दिसतोय. जेवून घेऊ.''

अगदी बेचव अशा ब्रेडवर- मायकोजेनच्या अन्नानंतर सगळंच बेचव वाटलं असतं- लॅम्ब पॅटीज खाताना सेल्डन म्हणाला, ''ह्युमिन, तुला वाटत असेल की मी फार मोठा प्रतिभावंत आहे, पण तसं नसेलही.''

ह्युमिन म्हणाला, ''तू नसशीलही, खरं. पण सध्या तरी माझ्या समोर दुसरा कुठला उमेदवार नाही. त्यामुळे मला तुलाच चिकटून रहावं लागेल.''

सेल्डन सुस्कारत म्हणाला, ''ठीक आहे, मी प्रयत्न करतो, पण मला तरी आशेचा एकही किरण दिसत नाहीये. हे शक्य आहे पण व्यवहार्य नाही हे मी आधीच सांगितलं होतं- आणि आता माझी त्याबद्दल चांगलीच खात्री पटलीय.''

----

## हीटसिंक

ॲमारिल, युगो-... हॅरि सेल्डनच्या सोडीने काम करणारा हा गणितज्ञ. सायकोहिस्ट्रीची तपशीलवार मांडणी करण्याचे बहुतांश काम यानेच केले. त्यानेच...

... पण त्याच्या गणिती कर्तृत्वापेक्षाही नाट्यमय होती त्याच्या जीवनाची सुरुवातीची पार्श्वभूमी. डाह्ल या ट्रॅन्टोरवरील अगदी खालच्या वर्गाच्या वस्तीत, अत्यंत दारिद्र्यात त्याचा जन्म झाला, आणि अगदी निव्वळ अपघाताने त्याची सेल्डनशी गाठ पडली नसती तर त्याचे जीवन बिनओळखीचे, बिनकर्तृत्वाचे ठरले असते...

दीर्घिका ज्ञानकोष

६१

साऱ्या दीर्घिकेच्या त्या सम्राटाला अगदी थकून गेल्यासारखे वाटत होते. ठारविक वेळानंतर त्याला जे स्मितहास्य करावे लागत असे त्याने त्याचे ओठ जणू दुखून आले होते. आपल्याला ऐकून घेण्यात रस आहे असे दाखवताना मान एकदा इकडे, एकदा तिकडे वळवत राहिल्यामुळे मान अवघडून आली होती. सतत ऐकून घेतल्यामुळे कानही ठणकत होते. सतत उठ-बस करकरून, हात पुढे करून, मान डोलावून त्याचं शरीर आता जणू दणके देत होतं.

ट्रॅन्टोरवरचे महापौर, व्हाइसरॉय, मंत्री, त्यांच्या बायका यांच्या औपचारिक भेटीगाठी, आणि त्याहून कहर म्हणजे दूरदूरच्या जगांतून साऱ्या दीर्घिकेतून आलेल्या लोकांना भेटणं... हेच त्याचं राजकार्य होतं. जवळपास हजार लोक आले होते, प्रत्येकाची वेषभूषा वेगळी, कुणाची अती सजलेली कुणाची अगदीच विचित्र...

आणि त्याला प्रत्येक जगातील विविध उच्चारांत बोललेली गॅलॅक्टिक ऐकावी लागत होती... सम्राटाच्या जगातील विद्यापीठांत शिकवल्या जाणाऱ्या गॅलॅक्टिकची नक्कल करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाने त्यांचे उच्चार अधिकच वाईट वाटत होते. सगळा गोंधळ. सगळयात मोठे पथ्य त्याला सांभाळावं लागत होतं- ते बोलताना कितीही मृदुमुलायम मलईदार बोललं तरी कोणतीही ठोस वचनं तोंडातून बाहेर पडू द्यायची नव्हती. पोकळ गोडी कितीही चालत होती.

सारं रेकॉर्ड होत होतं, सगळे आवाज, सगळी दृश्ये अगदी गुप्तपणे टिपली जात होती. आणि मग एटो डेमेर्झेल पुन्हा ते सारं तपासून पाहाणार होता- क्लिऑन नीट बोलला वागला आहे की नाही याची खात्री करून घेणार होता. असं निदान क्लिऑनला वाटत होतं. डेमेर्झेल म्हणाला असता की मी केवळ डाटा गोळा करतोय पाहुण्यांबद्दल- ते स्वतःबद्दल नकळत काही गोष्टी उघड करतील ते पाहातोय. असेलही तसं.

डेमेर्झेल भाग्यवान आहे!!!

सम्राटाला प्रासाद आणि त्याचा बगीचा सोडून जाणं शक्य नव्हतं, तर डेमेर्झेल अख्ख्या दीर्घिकेभर फिरू शकत होता. सम्राटाला सतत प्रदर्शनीय बनून रहाणं भाग होतं- आल्या गेल्या पाहुण्यांना भेटणं भाग होतं, महत्त्वाचे असोत वा अडमडे. डेमेर्झेल मात्र अनाम रहात असे, प्रासादाच्या चतुःसीमांमध्ये तो कुणाच्या दृष्टीसही पडत नसेल. त्याचं नाव कुणाच्याही मनात भय जागवत असे- तो दिसत नसल्यामुळे त्याची उपस्थिती अधिकच भयप्रद वाटत असे.

सम्राट हा साम्राज्याचा आतला माणूस होता- सगळ्या सजावटीसकट आणि सत्तेच्या देखाव्यासकट. पण डेमेर्झेल हा साम्राज्याचा बाहेरचा खेळीया होता- साधं पदही नसलेला, अव्यक्त वाटणारा पण त्याचे हात आणि मन सर्वत्र पोहोचत होते.

आपल्या सततच्या कष्टांसाठी कोणतंही बक्षीस तो मागत नसे- पण सत्ता मात्र वास्तवात त्याच्याच हातता होती.

सम्राट कधीकधी मनातल्या मनात एक विकृत आनंददायी चाळा करत असे. आपण डेमेर्झेलला काहीही पूर्वसूचना न देता काहीतरी फडतूस सबब काढून अटक करू शकतो, तुरुंगात टाकू शकतो, तडीपार करू शकतो, छळ करू शकतो किंवा ठार करवू शकतो... अखेर या साऱ्या मागल्या शतकांत सतत असंतोष, सतत बंडाळी चालत आलेली असताना सम्राटाला सगळ्या दीर्घिकेतील जगांवर, ट्रॅन्टोरच्या विविध भागांवरच्या बारीकसारीक स्थानिक प्रशासकांवर अंमल गाजवणे जरा कठीणच असले तरीही सारे राजकाज बाजूला ठेवून या प्रासादावर केवळ त्याची आणि त्याचीच सत्ता होती.

आणि तरीही क्लिऑनला चांगले माहीत होते की अशा सत्तेचे स्वप्न पाहाणेही व्यर्थ होते. डेमेर्झेलने त्याच्या वडिलांसाठीही काम केले होते. आणि एखादी गोष्ट डेमेर्झेलशिवाय पार पाडल्याचे क्लिऑनला आठवतही नव्हते. डेमेर्झेलला सारे काही माहीत होते, तोच सारे पाहात होता, तोच सारे घडवत होता. शिवाय काहीही चूक झाली तर डेमेर्झेलवरच त्याचा दोष येत असे हे अधिक महत्त्वाचे होते. सम्राटाला टीकेचा स्पर्शही होत नसे- त्याला भीती होती ती फक्त प्रासादातील कारस्थानांची, आणि अगदी निकटच्या परिवाराकडून हत्या केली जाण्याची. आणि हे टळण्यासाठी तो फक्त डेमेर्झेलवरच अवलंबून होता.

डेमेर्झेल नसेल तर काय या कल्पनेनेच सम्राट क्लिऑन किंचित शहारला. असे अनेक सम्राट होऊन गेले असतील. जे स्वतः राज्यकारभार पाहात. त्यांच्या पदरी फारशी क्षमता नसलेले प्रशासनप्रमुख एकामागोमाग एक येऊन जात- ते कसेबसे काम करत आणि त्यांना काही काळ चालवून घेतले जात असे.

पण क्लिऑनला हे शक्य नव्हते. त्याला डेमेर्झेलची गरज होती. आणि आता तर त्याच्या मनात हत्येचा विचार डोकावून गेला होता. अलिकडल्या इतिहासात जे काही घडून गेले ते पाहाता हे होऊ शकलेच असते आणि म्हणूनच डेमेर्झेलला वाटेला लावणे अशक्य होते. करताच आले नसते असे. क्लिऑन कितीही हुषार असला तरीही, डेमेर्झेलला काय चालले आहे याचा अंदाज आधीच आला असता. आणि मग तो त्याची पावले टाकत राहिला असता. मग त्यानेच सम्राटाला उलथवण्याचा डाव टाकला असता. डेमेर्झेलपर्यंत बेड्या पोहोचण्याआधीच क्लिऑन मेला असता आणि मग डेमेर्झेलला सोयीचा दुसरा सम्राट त्याच्या जागी आला असता.

किंवा मग या सगळ्याला वैतागून डेमेर्झेल स्वतःच सम्राट झाला असता?

शक्य नाही! अनाम राहाण्याची सवय त्याच्यात भिनून गेली होती. डेमेर्झेल उघडपणे जगासमोर आला तर त्याची शक्ती, त्याची बुद्धी, त्याचे सुदैव किंवा जे काय असेल ते- नक्कीच त्याची साथ सोडतील. क्लिऑनला खात्री होती. अगदी निःसंशय.

त्यामुळे जोवर नीट वागतोय तोवर तो सुरक्षित होता. डेमेर्झेलला काहीही व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा नसल्यामुळे तो क्लिऑनची सेवा इमानेइतबारे बजावत राहिला असता.

हा आला डेमेर्झेल- अगदी कठोरपणे साधे कपडे घातलेला- इतके साधे की क्लिऑनला आपल्या नक्षीदार, भरजरी, निरर्थक कपड्यांची बोचरी जाणीव होऊ लागली- नशीब की दोन सेवक आले आणि त्याचा तो पोषाख उतरवायला त्यांनी मदत करायला सुरुवात केली. अर्थातच, तो एकटा असल्याशिवाय आणि जवळपास सगळ कपडे उतरल्याशिवाय काही डेमेर्झेल प्रकट होणार नव्हता.

“डेमेर्झेल, मी आता पार थकलोय!” साऱ्या दीर्घिकेचा सम्राट उद्गारला.

“असले शासकीय सोहळे थकवणारेच असतात, सम्राट,” डेमेर्झेल पुटपुटला.

“मग ते रोज संध्याकाळी ठेवणं आवश्यक आहे कां?”

“रोज संध्याकाळी नाही, पण आवश्यक तर आहेतच. इतरांना तुम्हाला भेटून बरं वाटतं, आणि तुम्ही त्यांची दखल घेतली की ते खूष असतात. साम्राज्याचा कारभार सुरळीत चालण्यासाठी मदत होते त्याची.”

“साम्राज्य सुरळीत चालण्यासाठी आधी सत्ता पुरेशी असायची.” सम्राट दुःखी स्वरात म्हणाला, “आता त्यासाठी स्मितहास्य, हस्तांदोलने, गोड शब्द आणि कसली तरी पदके नि ढाली लागतात.”

“यामुळे शांती टिकून रहाणार असेल तर, सम्राट, या गोष्टी चांगल्याच आहेत की. तुमची अधिसत्ता चांगली टिकून आहे.”

“त्याचं कारण तू जाणून आहेस. तू आहेस म्हणून चाललंय सगळं सुरळीत. माझी बुद्धीमत्ता एवढीच आहे- की मी तुझं महत्त्व जाणून आहे.” त्याने धूर्त नजरेने डेमेर्झेलकडे पाहिलं, “माझा मुलगा माझा वारस असण्याचं काहीच कारण नाही. तो काही फार हुषार मुलगा नाही. समज, मी तुलाच वारस नेमलं तर?”

डेमेर्झेल गोठल्यासारखा बोलला, “सम्राट, असा विचारही करू नये. मी सिंहासनाचा ताबा कदापि घेणार नाही. तुमच्या वारसाचा हक्क मी कधीही छिनावून घेणार नाही. माझी काही चूक झाली असेल तर मला हवी ती शिक्षा करा. मी असा काहीही गुन्हा केलेला नाही, की ज्यामुळे मला सम्राट होण्याची शिक्षा देणार तुम्ही?”

क्लिऑन खदखदून हसला, “सम्राट असण्याचं हे जे तू कठोर मूल्यमापन केलं आहेस ना, त्यासाठी मी तुला शिक्षा करण्याचा कोणताही विचार सोडून दिला-

चल- दुसरं काहीतरी बोलू. खरं मला आता झोपायचंय, पण मला झोपवताना ते जे सोपस्कार करतात, ते सहन करायची अजून माझी तयारी नाही. चल बोलत बसू.”

“कशाबद्दल, सम्राट?”

“कशाबद्दलही बोलू. त्या गणिती माणसाबद्दल बोलू, त्याच्या त्या सायकोहिस्ट्रीबद्दल बोलू. मी अनेकदा त्याचा विचार करतो. आज मेजवानीच्या वेळीही मी त्याचा विचार करत होतो. मला प्रश्न पडलेला, की त्याच्या सायकोहिस्ट्रीच्या विश्लेषणातून असं काहीतरी करता येईल का- की सम्राटाला अशा परंपरांचे अथक पालन करणे भाग पडणार नाही?”

“मला वाटतं, की अगदी सगळ्यात बुद्धीमान सायकोहिस्टोरियनलाही हे शक्य करता येणार नाही.”

“बरं, आता मला सांग, तो अजूनही त्या मायकोजेनच्या वेडपट टकल्यांच्यातच लपून आहे कां? तू त्याला तिथून बाहेर काढशील असं वचन दिलेलंस तू मला.”

“मी तसा प्रयत्न केला, सम्राट. पण सांगायला दुःख होतं आहे- माझे प्रयत्न अय़शस्वी ठरले... “

“अयशस्वी ठरले?” सम्राटाच्या कपाळावर आठ्या चढल्या. “हे काही मला पसंत नाही.”

“मलाही नाही, सम्राट. मी त्या गणितज्ञाने काहीतरी पावित्र्यभंगाची कृती करावी आणि मग त्याला तिथल्या नियमांनुसार कठोर शिक्षा मिळावी असं काही नियोजन केलं होतं. मग त्याला आपोआपच सम्राटाच्या आश्रयाला यावं लागलं असतं- आणि मग अर्थातच तो माझ्या ताब्यात आला असता. आपल्या दृष्टीने काही

बिनमहत्त्वाच्या सवलती देऊ करण्याच्या बदल्यात मी ते घडवणार होतो- मी स्वतः थेट यात पडणार नव्हतो. अगदी गुप्तपणे सगळं झालं असतं."

"आणि तरीही-" क्लिऑन म्हणाला, "त्यात यश आलं नाही. मायकोजेनच्या मेयरने-"

"त्याला ज्येष्ठ गुरू म्हणतात, सम्राट."

"पद काय ते महत्त्वाचं आहे का? त्या ज्येष्ठ गुरूने नकार दिला?"

"अजिबात नाही, सम्राट, उलट त्याने हे मान्य केलं आणि तो गणिती -सेल्डन त्या सापळ्यात अडकलाच."

"आणि मग?"

"त्याला निघून जाण्याची परवानगी देण्यात आली."

"का?" क्लिऑन रागाने म्हणाला.

"नक्की काय झालं मला कळलेलं नाही, सम्राट. पण मला शंका आहे- की कुणीतरी आपल्यापेक्षा चांगला वायदा केला असावा."

"कुणी? वाय प्रांताच्या मेयरने?"

"शक्य आहे, सम्राट, पण मला त्याबद्दलही शंका आहे. मी वाय प्रांतावर सतत लक्ष ठेवून असतो. तो गणिती त्यांच्या ताब्यात असेल तर मला एव्हाना खबर लागली असती."

आता सम्राटाच्या कपाळावर नुसत्याच आठ्या नव्हत्या, तर तो संतापला होता. "डेमेर्झेल, हे वाईट आहे. मला फार राग आलाय. अशा प्रकारचं अपयश- तू पहिल्याइतका कुशल राहिला नाहीस अशी शंका येतेय मला. मायकोजेनच्या विरुद्ध आपण आता काय कारवाई करायला हवी? त्यांनी सम्राटाचा अधिक्षेप केला आहे."

डेमेर्झेलने मान तुकवली. जणू येणाऱ्या वादळाच्या सपाट्यापुढे तो झुकला, पण तरीही पोलादी स्वरात म्हणाला, "मायकोजेनच्या विरुद्ध तसं काही आत्ताच करणं ही चूक ठरेल आपली. त्यामुळे जो काही गोंधळ माजेल त्यातून वाय प्रांताला फायद्याचं असंच काहीतरी घडेल."

"पण आपण काहीतरी केलंच पाहिजे-"

"कदाचित काहीही करायला नको, सम्राट. जे झालं ते इतकं काही वाईट नाही."

"इतकं काही वाईट नाही म्हणजे कसं?"

"तुम्हाला आठवत असेल, सम्राट, या गणितज्ञाने सांगितलेलं की सायकोहिस्ट्री अजिबात व्यवहार्य नाही. खात्रीच होती त्याची."

"चांगलंच आठवतंय, पण त्याने काय फरक पडतो? आपल्या उद्दिष्टांसाठी काय फरक पडतो?"

"नसेल पडत. पण ते व्यवहार्य होणार असेल तर आपल्यासाठी निश्चितच अमर्याद फायदा आहे, आपली उद्दिष्टे अधिक चांगल्या रीतीने सफल होतील, सम्राट. आणि मला जे काही कळलंय त्यानुसार हा मनुष्य सायकोहिस्ट्री व्यवहार्य होण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करतो आहे. अगदी त्याची ती मायकोजेनवरची पावित्र्यभंगाची कृतीसुद्धा त्याच्या सायकोहिस्ट्रीचे कोडे सोडवण्यासाठी केलेली होती असं मला कळलंय. आणि तसं असेल तर, सम्राट, काही काळ त्याला तसंच मोकळं सोडणं, त्याचं त्याला काम करू देणं अधिक फायद्याचं असेल. तो जेव्हा त्याच्या ध्येयाच्या जवळपास पोहोचेल तेव्हा आपण त्याला उचललं तर अधिक चांगलं."

"पण वाय प्रांताने त्याला आधीच उचललं नसलं तरच."

“ते मी पाहातो- तसं घडणार नाही.”

“जसं आता तू मायकोजेनवरून त्याला सोडवण्यात यशस्वी झालास तसंच?”

“मी पुढल्या वेळी पुन्हा तशी चूक करणार नाही, सम्राट.” डेमेर्झेल थंडपणे उत्तरला.

सम्राट म्हणाला, “डेमेर्झेल, ते बरं राहील. पुन्हा एकदा असलीच चूक या बाबतीत मी खपवून घेणार नाही.” आणि मग तो जरा चिडक्या स्वरात म्हणाला, “एकंदर, आज रात्री मला झोप काही लागणार नाही.”

६२

डाह्ल सेक्टरचा जिराड टिसाल्वर अगदीच ठेंगणा होता. त्याचा माथा सेल्डनच्या नाकापर्यंतच पोहोचत होता. पण त्याला त्याचं काही विशेष वाटत नव्हतं. पण त्याची चेहरपट्टी तशी देखणी होती, रेखीव हसरा चेहरा होता त्याचा. कुरळे केस आणि भरघोस काळीभोर मिशी होती.

तो आपल्या पत्नीबरोबर आणि आपल्या किशोरवयीन मुलीसोबत ज्या अपार्टमेंटमध्ये रहात होता, ते सात लहानलहान खोल्यांचं घर होतं. अगदी चकचकीत स्वच्छ आणि फर्निचर नावालाच असलेलं.

टिसाल्वर म्हणाला, “मी आपली क्षमा मागतो, सेल्डन साहेब आणि वेनाबिली मॅडम- माझ्या घरात तुम्हाला तुमच्या नेहमीच्या सुखसोयी फारशा मिळणार नाहीत. पण डाह्ल हा तसा गरीब भाग आहे, आणि आमच्यातल्याही जरा बऱ्या परिस्थितीत मोडणाऱ्या लोकांसारखा मी नाही.”

“मग तर आम्हीच क्षमा मागायला हवी. आमचं ओझं तुमच्यावर टाकल्याबद्दल.” सेल्डन म्हणाला.

“ओझं अजिबात नाही, सेल्डन साहेब. ह्युमिन साहेबांनी तुमच्या इथे रहाण्याच्या सोयीसाठी मला भरपूर मोबदला दिला आहे. आणि तुम्ही जरी स्वागतार्ह नसता तरी क्रेडिट्स तर स्वागतार्ह आहेत- पण तुम्हीही स्वागतार्हच आहात.”

सेल्डनना ह्युमिनने जाताजाता ऐकवलेले शब्द आठवले. तो म्हणालेला, “सेल्डन, ही मी तुमच्यासाठी ठरवलेली तिसरी सुरक्षित जागा. पहिल्या दोन्ही बऱ्यापैकी सम्राटाच्या अधिकार कक्षेबाहेर होत्या. तुम्ही तिकडे जाल याची अपेक्षा असेलच त्यामुळे तुमच्याकडे त्यांचं लक्ष जाण्याची जास्त शक्यता होती. ही जागा मात्र वेगळी आहे. अगदीच दारिद्र्याने गांजलेला भाग, कसलेच विशेष नाहीत- आणि उलट काही दृष्टीने अगदीच असुरक्षित आहे. तुमच्यासाठी ही काही योग्य जागा नाही, त्यामुळे सम्राट आणि त्याच्या प्रशासनप्रमुखाचं लक्ष तुमच्याकडे जाणार नाही कदाचित्. तुम्ही यावेळी तरी कुठल्याही उपद्व्यापापासून दूर रहाल का?”

“प्रयत्न करतो, ह्युमिन,” सेल्डन जरासा दुखावून म्हणालेला. “एवढंच लक्षात घे, की उपद्व्याप मी काही स्वतःसाठी शोधत जात नाही. जे काही शिकायचा प्रयत्न करतो आहे ते शिकायला तीस जन्म घ्यावे लागतील... तरच सायकोहिस्ट्रीची मांडणी करण्याची थोडीफार संधी असेल.”

“समजतंय मला,” ह्युमिन म्हणाला, “तुझ्या त्याच प्रयत्नांमुळे तू स्ट्रीलिंगमध्ये अपरसाईडवर गेलास, मायकोजेनच्या ज्येष्ठांच्या आयरीवर गेलास- आता डाह्लमध्ये काय करशील माहीत नाही. आणि डॉ. वेनाबिली, तू सेल्डनची काळजी घेण्याचा प्रयत्न करते आहेस हे माहीत आहे मला- पण जरा अधिक प्रयत्न कर. एक गोष्ट डोक्यात घट्ट बसवून घे, की तो ट्रॅन्टोरमधलाच नव्हे तर संपूर्ण

दीर्घिकेमधला सर्वात महत्त्वाचा माणूस आहे- आणि पडेल त्या किंमतीला त्याला जपलंच पाहिजे.''

''मी सर्वतोपरी प्रयत्न करते आहे आणि करेन,'' डॉर्सने कडकपणे उत्तर दिले.

''आणि तुमचं यजमान कुटुंब- त्यांचे काही विशेष आहेत. पण ते तसे मुळात फार भले लोक आहेत. मी त्यांच्याबरोबर मी आधीही व्यवहार केले आहेत. ते कुठल्या संकटात पडणार नाहीत एवढं बघा.''

पण टिसाल्वरला तरी या नव्या भाडेकरूकडून काहीही धोका होईल अशी भीती वाटत नव्हती. आणि ते दोघे आल्याचा- भाडं मिळणार या व्यतिरिक्त आनंद झाला असल्याचं त्याने अगदी प्रामाणिकपणे सांगितलं.

तो यापूर्वी कधीही डाह्लच्या बाहेर गेला नव्हता त्यामुळे बाहेरच्या जगाच्या गोष्टी ऐकण्यात त्याला प्रचंड रस होता. त्याची पत्नीही अगदी नम्र, हसतमुख होती आणि तिलाही गोष्टी ऐकायला आवडत होतं. त्यांची मुलगी तोंडात बोट घालून दाराआडून एका डोळ्याने पाहात रहायची.

बरेचदा रात्रीच्या जेवणानंतर सगळं कुटुंब एकत्र येई तेव्हा सेल्डन आणि डॉर्सने बाहेरच्या जगाबद्दलच्या गोष्टी सांगाव्यात अशी त्यांची अपेक्षा असे. जेवण भरपूर असे, पण अगदीच बेचव आणि वातड. मायकोजेनमधल्या चवदार अन्नानंतर ते फारच बेचव वाटायचं.

जेवणाचं टेबल म्हणजे भिंतीला लागून ठेवलेलं एक फडताळच होतं. त्यावरून वाढून घेऊन सगळे उभ्यानेच जेवत.

सेल्डनने जरा नाजूकपणेच काही प्रश्न विचारले होते, त्यावरून कळलं की सगळ्याच डाह्ल प्रांतात कमीअधिक प्रमाणात अशीच परिस्थिती होती- केवळ दारिद्र्य हेच एक कारण नव्हतं त्यासाठी. मिसेस टिसाल्वर म्हणाल्या की डाह्लमधल्या

सरकारी नोकऱ्या करणाऱ्या लोकांकडे या नवीन परंपरा पाळल्या जात. ही बसण्याची फडताळं- ती खुर्च्यांसाठी हा शब्द वापरत होती. पण डाह्लमधल्या मध्यमवर्गाला मात्र हे अजिबात आवडत नाही.

नको त्या सुखसोयी त्यांना नापसंत असल्या तरीही टिसाल्वर मंडळींना त्यांच्याबद्दल ऐकायला बेहद्द आवडत होतं. तोंडाने हज्जारदा चकचक् आवाज काढत ते हलक्याफुलक्या गाद्यांची, नक्षीदार कपाटांची, टेबल्सची वर्णन चवीने ऐकत असत. आणि टेबलवर मांडायच्या अनावश्यक प्लेट्स, कप्सची वर्णन ऐकत रहात.

मायकोजेनियन रूढीपरंपरांची वर्णनेही त्यांनी खूप रस घेऊन ऐकली. जिराड टिसाल्वरने स्वतःच्या केसांवर मोठ्या समाधानाने हात फिरवला आणि केस उपटून काढणे हे पौरुष हरवण्याइतकंच वाईट आहे असं मानतो म्हणाला... मिसेस टिसाल्वर स्त्रियांच्या तिथल्या दुय्यम स्थितीबद्दल ऐकून भयंकर संतापल्या होत्या. आणि त्या भगिनी हे सारं शांतपणे स्वीकारतात हे त्यांना अजिबात मान्य नव्हतं.

पण सेल्डनने जेव्हा सम्राटाच्या बागेचा उल्लेख केला तेव्हा त्यांचे कान खरोखर टवकारले. आणि मग त्यांच्या प्रश्नांच्या सरबत्तीला उत्तर देताना जेव्हा सेल्डनने सम्राटाला भेटल्याचं, पाहिल्याचं सांगितलं तेव्हा ते संपूर्ण कुटुंब आश्चर्यमिश्रित कौतुकात बुडून गेलं. त्याबद्दल पुढचे प्रश्न विचारायची त्यांनी थोड्या वेळाने सुरुवात केली, पण सेल्डनला त्यांना फार काही सांगता आलं नाही. कारण तो प्रासादाच्या अगदी थोड्या भागात, अगदी थोड्या वेळासाठी होता.

टिसाल्वर मंडळी हे ऐकून फारच नाराज झाली, आणि बराच वेळ काही ना काही प्रश्न विचारून आणखी माहिती काढण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू राहिला. आणि सेल्डनचं एवढं मोठं सम्राटाला भेटण्याचं साहस ऐकल्यानंतर डॉर्स सम्राटाच्या बागेत

कधीच गेली नव्हती या वर त्यांचा विश्वासच बसत नव्हता. शिवाय सेल्डनने सम्राटाची वागणूक अगदी साध्यासुध्या माणसासारखी होती हे सांगितल्यावर त्यांचा त्यावरही मुळीच विश्वास बसला नाही. असं काही होणं टिसाल्वर्सच्या दृष्टीने निव्वळ अशक्य होतं.

अशा प्रकारे तीन संध्याकाळी घालवल्यानंतर सेल्डन कंटाळून गेला. सुरुवातीला काहीही न करावं लागणं हे एकदम मस्त वाटलं खरं- निदान दिवसातरी. तो फक्त डॉर्सने सुचवलेल्या बुकफिल्म्स पाहात होता. टिसाल्वरने त्यांच्याकडचा बुकफिल्मस् व्ह्यूअर दिवसा पाहुण्यासाठी राखून ठेवला होता. त्यांच्या मुलीला अभ्यास पुरा करण्यासाठी ते शेजारच्यांचा बुकफिल्म्स व्ह्यूअर पाहायला पाठवून देत. ती जरा खट्टू होत असे.

“काहीच उपयोग होत नाही याचा,” सेल्डन अस्वस्थ होत म्हणाला. भिंतींच्या कानांना काही ऐकू जाऊ नये म्हणून त्याने कसलं तरी संगीत लावून ठेवलं होतं. “तुला इतिहास आवडतो हे मला माहीत आहे, पण त्यात नुसते तपशीलावर तपशील मिळतात. डोंगराएवढा ढिगारा- छे गॅलॅक्सीएवढा ढिगारा असतो तपशीलांचा- पण त्यात मला मूलभूत संरचनेचा थांगपत्ताही लागत नाही.”

“मी म्हणेन,” डॉर्स म्हणाली, “कधीकाळी माणसांना आकाशातल्या ताऱ्यांच्या पसाऱ्यात काही रचना आहे असं शक्यही वाटलं नसेल. पण अखेर त्यांना त्यातील दीर्घिकेची संरचना लक्षात आलीच ना.”

“त्याला काही आठवडे नव्हेत तर पिढ्यानपिढ्या लागल्या असतील नक्कीच. भौतिकशास्त्र हे काही काळ तर वेगवेगळया असंबद्ध निरीक्षणांची गोळाबेरीज वाटत असेल लोकांना- जोवर केंद्रीभूत असे निसर्ग नियम लक्षात आले नव्हते तोवर नक्कीच. आणि टिसाल्वर मंडळींचं काय?”

“त्यांचं काय? भले लोक आहेत ते मला वाटतं.”

“फार चौकस आहेत ते.”

“अर्थातच आहेत. तू त्यांच्या जागी असतास तर तुलाही औत्सुक्य वाटलंच असतं ना?”

“नक्की फक्त औत्सुक्य आहे? त्यांना माझ्या नि सम्राटाच्या भेटीत जरा अतीच रस आहे असं वाटतं मला.”

डॉर्स जरा वैतागून उत्तरली, “तेही स्वाभाविकच आहे. तू त्यांच्या जागी असतास तर तुला नसतं वाटलं औत्सुक्य?”

“मी जरा अस्वस्थच होतो त्यामुळे.”

“ह्युमिनने आणलंय इथे आपल्याला.”

“हो, पण तो काही अगदी अचूक निर्णयच घेतो असं नाही. त्याने मला स्ट्रीलिंगला नेलं, तिथे मला अपरसाईडला नेण्याचा प्रयत्न झाला. त्याने आपल्याला सनमास्टर फोर्टीनकडे नेलं, त्याने आपल्याला सापळ्यात अडकवलं. अडकवलं हे खरं आहे की नाही? दोनदा तोंड भाजल्यावर एकदा तरी फुंकून पिणारच ना. आता मला त्यांच्या प्रश्नांच्या सरबत्तीचा कंटाळा आलाय.”

“मग आता तू प्रश्न विचार, हॅरि. तुला डाह्लबद्दल काही कुतूहल आहे की नाही?”

“अर्थातच. सुरुवात करण्यासाठी सांग- तुला डाह्लबद्दल काय माहिती आहे?”

“काहीही नाही. आठशे प्रभागांपैकी तो एक आहे एवढंच. मीही ट्रॅन्टोरवर उणीपुरी दोनच वर्षं रहातेय.”

“बरोबर. आणि इथे आपल्या दीर्घिकेत पंचवीस दशलक्ष जगे आहेत, आणि मी या समस्येवर काम करायला लागून उणेपुरे दोन महिनेही उलटलेले नाहीत. मी तुला सांगतो- मला हेलिकॉनला परतावंसं वाटतंय आणि पुन्हा एकदा माझ्या पीएचडीच्या विषयावर काम करावंसं वाटतंय. टर्ब्युलन्सच्या गणितावर काम करावं शांतपणे- टर्ब्युलन्स- चलबिचल... कल्लोळ यामुळे समाजाची घडण समजू शकते असा विचार माझ्या मनात आला होता हे मी विसरून जावं...”

पण त्या रात्री टिसाल्वरश बोलताना तो म्हणाला, “टिसाल्वरसाहेब, तुम्ही मला तुमच्याबद्दल काहीच सांगितलं नाहीत कधी- तुम्ही काय करता, कसल्या प्रकारचं काम करता.”

“मी?” टिसाल्वरने आपला तळवा छातीवर ठेवला. त्याने एका साधा पांढरा टीशर्ट घातलेला, त्याच्या खाली काहीच नव्हतं- डाह्लमध्ये सगळे पुरुष असेच कपडे घालत असं दिसत होतं. “विशेष काहीच नाही. मी इथल्या होलोव्हिजन स्टेशनवर प्रोग्रॅमिंगचं काम करतो. अगदीच कंटाळवाणं काम आहे. पण जगायला पुरतं.”

“शिवाय ते प्रतिष्ठेचं आहे.” टिसाल्वरबाई म्हणाल्या, “त्याला हीटसिंक्समध्ये काम करावं लागत नाही, हे खूप महत्त्वाचं आहे.”

“हीटसिंक्स?” डॉर्सने भुवया उंचावत, आपल्याला खूप कुतूहल, खूप आश्चर्य वाटल्याचं दाखवत विचारलं.

“ओ वेल,” टिसाल्वर म्हणाला, “डाह्ल त्यासाठीच तर प्रसिद्ध आहे. ट्रॅन्टोरवरच्या चार हजार लक्ष लोकांची ऊर्जेची गरज भागवण्याचं काम डाह्लमधून चालतं. आम्हाला त्यासाठी कुणी नावाजतही नाही, पण ट्रॅन्टोरवरचे काही नखरेबाज सेक्टर ऊर्जेशिवाय चाललेले पाहायला आवडेलच मला.”

सेल्डन जरा गोंधळल्यासारखा वाटला. “ट्रॅन्टोरची ऊर्जेची गरज भोवतीने भ्रमण करणाऱ्या सौरऊर्जा स्टेशनकडून भागत नाही?”

“काही प्रमाणात,” टिसाल्वर म्हणाला, “काही न्यूक्लियर फ्यूजनमधून- ती केंद्रं बेटांवर आहेत, काही मायक्रोफ्यूजन मोटर्समधून आणि काही अपरसाईडवरच्या विंड स्टेशन्समधून- पण अर्ध्याहून अधिक-” त्याने आपलं म्हणणं ठासून मांडण्यासाठी बोट वर केलं, त्याचा चेहराही नेहमीपेक्षा गंभीर होता, “-अर्ध्याहून अधिक ऊर्जा हीटसिंक्समधून येते. बऱ्याच ठिकाणी हीटसिंक्स आहेत- पण डाह्लमधलं हीटसिंक एकदम मोठ्ठं आहे. सर्वात समृद्ध. तुम्ही काय म्हणता तुम्हाला हीटसिंक्स म्हणजे काय ते माहीतच नाही? तुम्ही असे आ वासून बघताय की-”

डॉर्स पटकन उत्तरली, “आम्ही बाहेरच्या जगातून आलो आहोत, माहीतीये ना,” (ती चुकून आम्ही टोळीवाले आहोत असंच म्हणणार होती- पण तिने शब्द आवरले.) “विशेषतः डॉ. सेल्डन- ते ट्रॅन्टोरवर नुकतेच म्हणजे दोनच महिन्यांपूर्वी आले आहेत.”

“खरंच?” मिसेस टिसाल्वर उद्गारली. ती नवऱ्यापेक्षा बरीच ठेंगणी होती, आणि जाडी वाटत नसली तर गुबगुबीत होती. तिने आपले काळे केस एका घट्ट आंबाड्यात बांधलेले आणि तिचे डोळे फारच सुंदर होते. तीही नवऱ्याच्याच वयाची म्हणजे तिशीतली असावी.

मायकोजेनमध्ये काही काळ घालवल्यानंतर- काळ काही खूप मोठा नव्हता, पण जो काय होता त्याचा डोस चांगलाच तीव्र होता- डॉर्सला एक स्त्री इतक्या सहज संभाषणात सामील होते आहे हे पाहून जरा दचकल्यासारखंच झालं. विचार करण्याच्या पद्धती, वागण्याच्या रीती किती पटकन बदलू शकतात, तिच्या मनात

आलं. हे सेल्डनला सांगायला हवं तिने मनात ठरवलं. त्याच्या सायकोहिस्ट्रीसाठी आणखी एक मुद्दा.

“हो ना,” ती उत्तरली, “डॉ. सेल्डन हेलिकॉनवरून आले आहेत इथे.”

मिसेस टिसाल्वरने विनयाने विचारलं, “आणि ते कुठेशी आलं?”

“ते-” डॉर्स हॅरिकडे वळून म्हणाली, “कुठेशी आहे तो हॅरि?”

सेल्डन जरासा शरमला, “खरं सांगायचं तर, मला नाही वाटत की मी त्याची जागा गॅलॅक्टिक मॉडेलवर नक्की कोऑर्डिनेट्स हाताशी असल्याशिवाय दाखवू शकेन. एवढंच सांगू शकतो, की मध्यवर्ती कृष्ण विवराच्या एका बाजूला ट्रॅन्टोर आहे- तर त्याच्या विरुद्ध बाजूला हेलिक्रॉन आहे. आणि हायपरशिपने तिथवर जाणं वा तिथून येणं म्हणजे त्रास असतो.”

मिसेस टिसाल्वर म्हणाली, “मी आणि जिराड हायपरशिपवर कधीतरी जाऊ शकू का- शंकाच आहे.”

“जाऊ कधीतरी, कॅसिलिया,” टिसाल्वर मजेत म्हणाला, “शक्यता असतेच. पण मला हेलिक्रॉनबद्दल सांगा ना थोडं, सेल्डनसाहेब.”

सेल्डनने मान हलवली, “काही विशेष नाही. कंटाळवाणंच आहे ते. कुठल्याही जगासारखं आणखी एक जग. बाकी सगळ्या जगांपेक्षा अगदी वेगळं असं फक्त ट्रॅन्टोरचंच जग आहे. हेलिकॉन काय किंवा कुठल्याही ग्रहावरच्या जगात हीटसिंक्स नाहीत- फक्त ट्रॅन्टोरवरच. मला सांगा ना त्याबद्दल.”

(बाकी सगळ्या जगांपेक्षा अगदी वेगळं असं फक्त ट्रॅन्टोरचंच जग आहे.- हे वाक्य सेल्डनच्या मनात पुन्हापुन्हा येत राहिलं. आणि क्षणभर त्याने ते पकडून ठेवलं- डॉर्सची मांडीवरच्या हाताची गोष्ट पुन्हा एकदा त्याला आठवली. पण टिसाल्वर बोलू

लागला होता. आणि तो विचार आला तितक्याच झर्रकन सेल्डनच्या मनातून गेलाही.)

टिस्लावर म्हणाला, “तुम्हाला खरोखरच हीटसिंक्सबद्दल माहिती हवी असेल तर मी तुम्हाला दाखवू शकतो.” तो बायकोकडे वळून म्हणाला, “कॅसिलिया, उद्या संध्याकाळी मी सेल्डनसाहेबांना हीटसिंक्स दाखवायला नेलं तर चालेल?”

“आणि मलाही.” डॉर्स चटकन् म्हणाली.

“हे आणि वेनाबिली मॅमनासुद्धा.”

टिसाल्वर बाईंनी कपाळाला आठ्या घातल्या आणि त्या जोरात म्हणाल्या, “काही फार चांगली कल्पना नाहीये ही. आपल्या पाहुण्यांना कंटाळाच येईल.”

“मला नाही वाटत तसं, मिसेस टिसाल्वर,” सेल्डन अगदी गोडपणे म्हणाला, “आम्हाला हीटसिंक्स बघायला खरंच खूप आवडेल. तुम्हीसुद्धा चला बरोबर- आणि तुमच्या लेकीलाही घेऊन जाऊ बरोबर.”

“हीटसिंक्समध्ये?” मिसेस टिसाल्वर शहारल्याच, “सभ्य स्त्रियांनी जाण्यासारखी जागा नाही ती.”

सेल्डनला आपण अजाणता काहीतरी भलतंच सुचवलं हे कळलं आणि तो शरमला, “मला असं काही अभिप्रेत नव्हतं.”

“नाही नाही, काहीही चुकलं नाही तुमचं.” टिसाल्वर म्हणाला, “कॅसिलियाला ती जागा अगदी आपल्या प्रतिष्ठेच्या खाली वाटते. आणि तसं असेलही, पण मी काही तिथे काम करत नाही. नुसताच पाहुण्यांना दाखवण्यासाठी जातोय. पण ती जागा जरा गैरसोयीची आहे... आणि कॅसिलिया तिथे येताना कपडे तरी कोणते घालणार हा मलाच प्रश्न आहे,”

ते सगळे जवळपास उकिडवे बसले होते, तिथून उठले. डाह्लमधल्या खुर्च्या म्हणजे केवळ चाकं लावलेल्या प्लास्टिकच्या बैठका होत्या. त्यावर बसून सेल्डनचे गुडघे आखडून जात आणि जराशी हालचाल केली तर ते दुखून थरथरत. पण टिसाल्वर मंडळी अगदी सहज उठत आणि बसत. सेल्डनला जसे हात टेकवून आधार घेत उठावं लागे तसं त्यांना अजिबात करावं लागत नसे. डॉर्ससुद्धा सहज उठत बसत असे. आणि सेल्डनला पुन्हा एकदा तिच्या डौलदार सहज हालचालींचं कौतुक वाटत राहिलं.

ते दोघे आपापल्या खोल्यांमध्ये जाण्यापूर्वी सेल्डन डॉर्सला म्हणाला, "तुला हीटसिंक्सबद्दल काहीच माहीत नाही कां? टिसाल्वर बाई ज्या प्रकारे बोलत होत्या, त्यावरून ती भयंकर जागा असावी असं वाटतंय."

"एवढी भयंकर असती, तर मिस्टर टिसाल्वरनी तिथे आपल्याला घेऊन जाण्याचं सुचवलंच नसतं. चला, काहीतरी आश्चर्यकारक पाहायला मिळेल अशी अपेक्षा करू."

६३-

टिसाल्वर म्हणाला, "तुम्हाला कपडे जरा व्यवस्थित घालावे लागतील." मिसेस टिसाल्वरनी तुच्छतादर्शक आवाज घशातून काढला.

कर्टल्सची आठवण मनात ताजीच होती- सेल्डनने जरा बिचकून विचारलं, "व्यवस्थित कपडे म्हणजे?"

"जरा हलके कपडे लागतील. तोकड्या बाह्यांचा टी शर्ट, ढिल्या पॅन्ट्स, ढिल्या चड्ड्या, पायमोजे, उघड्या सॅंडल्स- आहे हे सगळं माझ्याकडे."

"चालेल की, यात काहीच अडचण नाही."

“आणि व्हेनिबिली मॅडमसाठीही आहेत माझ्याकडे असलेच कपडे. बसले तर बरंय.”

टिसाल्वरने दिलेले कपडे त्याचे स्वतःचेच होते. जरा अंगासरसेच बसत होते, पण चांगले होते. तयार झाल्यावर त्यांनी मिसेस टिसाल्वरचा निरोप घेतला. ती शांत होती पण दारातून त्यांच्याकडे बराच वेळपर्यंत जराशा नापसंतीच्या नजरेनेच पाहात राहिली.

नुकतीच संध्याकाळ झालेली. आणि वर घुमटातून छानसा संधिप्रकाश खेळवला गेला होता. डाह्लध्ये दिवेलागण होत चालली होती. हवा छान उबदार होती. आणि कुठेही एकही वाहन दिसत नव्हतं, सगळेजण पायीपायी फिरत होते. दूरवरून एक्स्प्रेसवेवरच्या वाहतुकीची गुणगुण सतत ऐकू येत होती आणि मधूनच तिथले दिवे चकाकताना दिसत होते.

सेल्डनच्या लक्षात आलं की हे डाह्लकर कुठल्याही विशिष्ट दिशेने चालले नव्हते. एक सहज फिरणं होतं ते. आनंदात फेरफटका मारत होते सारे. टिसाल्वरने सांगितलेलं खरं असेल तर गरीबीमुळे डाह्लच्या लोकांना स्वस्त करमणूक हवीशी होती आणि संध्याकाळी पाय मोकळे करण्याइतकी स्वस्त आणि मस्त करमणूक कोणती असणार?

सेल्डनही नकळत त्यांच्याच सारखा सहज, रमतगमत चालू लागला. कुठेही पोहोचायची घाई नसल्यासारखा आणि मग त्याला सभोवार पसरलेली मैत्रीपूर्ण भावना जाणवू लागली. लोक चालताचालता एकमेकांकडे पाहून हसत होते, विचारपूस करत होते. वेगवेगळ्या जाडीच्या, लांबीच्या मिशा सगळीकडेच दिसत होत्या. डाह्लच्या पुरुषांचे ते व्यवच्छेदक लक्षण असणार. मायकोजेनमधल्या बांधवांचे जसे तुळतुळीत टक्कल हेच लक्षण होते तसेच इथे मिशा.

हे फिरणे म्हणजे त्यांचा संध्याकाळचा ठरलेला कार्यक्रम असणार... आणखी एक दिवस सुरक्षितपणे पार पडला, सगळी मित्रमंडळी व्यवस्थित आहेत, आनंदात आहेत याची खात्री पटण्याचा कार्यक्रम. काही वेळातच त्यांच्या लक्षात आलं की सर्वांच्याच नजरा डॉर्सवर रेंगाळत होत्या. त्या तांबूस संधिप्रकाशात तिच्या केसांचा लालसर रंग गहिरा झालेला, पण बाकीच्या काळ्या केसांच्या, क्वचित पिकल्या केसांच्या मस्तकांमध्ये तिचे केस कोळशाच्या ढिगात सोन्याचं नाण चमकावं तसे उठून दिसत होते.

“हे खूप मस्त वाटतंय,” सेल्डन म्हणाला.

“आहेच मस्त,” टिसाल्वर म्हणाला, “मी नेहमी माझ्या बायकोबरोबरच फिरायला येतो. आणि ती अगदी फॉर्मात असते. या एक किलोमीटरच्या परिसरात ती ज्यांना नावाने ओळखत नाही, त्यांचा कामधंदा माहीत नाही असं कुणीच नसेल. कोण कुणाचा काय लागतो सगळं माहीत असतं तिला. मला नाही बुवा जमत ते. आत्ताही- जे लोक माझ्याशी हसतायत, बोलतायत त्यांच्यापैकी अर्ध्यांची नावं मला माहीत नाहीत. पण आता चला, इतकं रमतगमत जायला नको. एलेव्हेटरपाशी पोहोचायचंय आपल्याला. खालीखाली जाऊ तसं सगळे जण खूप कामात असतात.”

ते एलेव्हेटरमध्ये शिरल्यावर डॉर्स म्हणाली, “मास्टर टिसाल्वर, मला वाटतं हीटसिंक्स म्हणजे ट्रॅन्टरची अंतर्गत उष्णता वापरून वाफ तयार करून टर्बाइन्स फिरवून वीज तयार करण्याची जागा ना?”

“छे छे. अतिशय मोठ्या प्रमाणावर उष्णतेच्या साठ्यातून थेट वीज निर्माण केली जाते. पण मला तपशील विचारू नका बाबा. मी केवळ हॉलोव्हिजनचा प्रोग्रॅमर आहे. किंबहुना तिथं खाली गेल्यावरही जास्त तपशील विचारूच नका. हा सगळा

प्रकार म्हणजे एक भला मोठा ब्लॅक बॉक्स आहे. काम होतं- पण कसं नि काय कुणालाच माहीत नसतं.”

“आणि काही चुकलं तर?”

“नाही चुकत सहसा, पण चुकलंच तर मग कुठूनतरी कोणीतरी तज्ज्ञ येतात. कॉम्प्युटरची समज असलेलं कुणीतरी. हे सगळं अगदी पूर्णपणे कॉम्प्युटराइज्ड आहे अर्थात.”

एलेव्हेटर थांबला आणि ते सगळे बाहेर पडले तसा एक उष्णतेचा झोत त्यांच्यावर आदळला.

“केवढं गरम आहे,” सेल्डन उगीचच बोलला.

“गरम तर आहेच.” टिसाल्वर म्हणाला. “म्हणून तर डाह्लचं महत्त्व. एवढा प्रचंड ऊर्जेचा स्रोत आहे इथे. जगात कुठेही नसेल इतक्या जवळ- पृष्ठभागाच्या लगत मॅग्माचा थर आहे इथे. म्हणून तर उष्णतेत काम करावं लागतंय.”

“एअर कंडिशनिंग नाही वापरता येत?” डॉर्स म्हणाली.

“येईल ना. पण खर्चाचा प्रश्न आहे. आम्ही हवा खेळवतो, आर्द्रता कमी करतो आणि थंड करतो, पण त्यापेक्षा अधिक काही केलं तर मग खूप जास्त ऊर्जा वापरली जाईल आणि सगळंच खर्चाच्या आवाक्याबाहेर जाईल.”

टिसाल्वर एका दाराकडे बोट दाखवत तिथंच थांबला. ते उघडताच एकदम थंड हवेचा झोत बाहेर आला. तो पुटपुटला, “इथे तुम्हाला फिरून दाखवायला कुणीतरी दुसरं हवं होतं, मॅडम डॉर्सवर होणाऱ्या शेरेबाजीवर जरा लगाम ठेवू शकेल असं कुणीतरी- हे इथले पुरुष...”

“माझ्यावर कुणी काहीही शेरेबाजी केली तरी मला त्याचं फारसं काही वाटत नाही.” डॉर्स म्हणाली.

“पण मला वाटतं ना, शरम वाटते मला.” टिसाल्वर म्हणाला.

एक तरुण मुलगा ऑफिसच्या बाहेर आला, त्याने स्वतःची ओळखही दिली- हॅनो लिंडॉर. तो जवळपास टिसाल्वरसारखाच दिसत होता. पण तिथले सगळेच जवळपास सारख्याच उंचीचे, सावळे, काळ्या केसांचे आणि मिशाळ असल्यामुळे सेल्डनने त्यांच्यातील साम्याबद्दल काही बोलायचं टाळलं.

लिंडॉर बोलू लागला, “मी तुम्हाला फिरवू शकतो इथे, जे काय आहे ते दाखवण्यासाठी. पण इथे काही तुमच्या जगातल्यासारखं नेत्रदीपक असं काहीच नाही बरं.” तो सर्वांशीच बोलत होता, पण त्याची नजर मात्र डॉर्सवर खिळली होती. “इथं काही फार सुखावह नाही. आपापले शर्टस् काढून ठेवा म्हणेन मी.”

“का, इथे तर चांगलं छान गार वाटतंय की.” सेल्डन म्हणाला.

“हाः, कारण आम्ही अधिकारी लोक बसतो इथे, उच्च पदावरच्या लोकांना काही सोयी मिळतात. पण बाहेर आम्ही एअरकंडिशनिंग चालवू शकत नाही. त्यामुळेच त्यांना माझ्यापेक्षा जास्त पगार मिळतो. तिथे बाहेर काम करण्याचा पगार सर्वात जास्त आहे. अख्ख्या डाह्लमधे सर्वात जास्त. म्हणून तर लोक इथे काम करायला तयार होतात. तरीही हीटसिंकर्स मिळणं कठीणच होत जातंय दिवसेंदिवस.” त्याने एक दीर्घ श्वास घेतला आणि म्हणाला, “चला, उतरूया कढईत.”

त्याने आपला शर्ट काढला आणि कमरेच्या पट्ट्यात खोचला. टिसाल्वर आणि सेल्डननेही तेच केलं.

लिन्डॉरने डॉर्सकडे पाहिलं आणि म्हणाला, “तुमच्याच सोयीसाठी सुचवतोय. सक्ती नाही.”

"हां, ठीक आहे." डॉर्स म्हणाली. आणि तिनेही तिचं शर्ट काढून टाकलं. तिची ब्रेसियर पांढरी, पॅडिंग नसलेली होती. आणि तिची छाती बरीच भरदार होती.

"मॅडम," लिंडॉर म्हणाला, "मला म्ह-" तो क्षणभर गप्प राहिला, मग खांदे उडवत म्हणाला, "ठीक आहे, जाऊ आपण पुढे."

सुरुवातीला सेल्डनला फक्त कॉम्प्युटर्स, यंत्रं, पाईप्स, उघडझाप करणारे दिवे आणि जिथेजिथे उजळलेले स्क्रीन्स दिसत होते.

एकंदरीत सौम्य प्रकाशच होता, पण काही भागांत यंत्रे प्रखर प्रकाशात होती. सेल्डनने त्या झाकोळात वर नजर टाकली.

"इथे पुरेसा प्रकाश का नाही?" त्याने विचारलं.

"गरज असेल तिथे आहे पुरेसा उजेड." लिंडॉर उत्तरला. त्याचा आवाज संथ होता, तो भरभर बोलत होता, पण स्वर जरासा कठोर होता. "एकंदरीत उजेड कमी ठेवला जातो त्याची कारणं मानसशास्त्रीय आहेत. अधिक प्रकाशाची सांगड मनात उष्णतेशी घातली जाते. उजेडाची मात्रा वाढवली की तक्रारी वाढतात, अगदी तापमान कमी केलेलं असतं तरीही."

"हे अगदी व्यवस्थित कॉम्प्युटराईज्ड आहे. मला वाटतं सगळंच काम कॉम्प्युटर्सवर सोडता येईल. ही व्यवस्था, हे वातावरण सगळंच आर्टिफिशियल इंटेलिजन्स- एआयच्या वापरासाठी योग्य आहे."

"अगदी बरोबर," लिन्डॉर म्हणाला, "पण आम्हाला कुठेही जराशीही चूक होण्याची जोखीम घेऊन चालत नाही. काहीतरी गडबडलंच तर तिथे जितीजागती माणसं असावीच लागतात. एका कॉम्प्युटरची छोटीशी चूक आणि दोन हजार किलोमीटर अंतरावर घोळ होऊ शकतात."

"पण हे तर मानवी चुकांतूनही घडू शकतं, नाही का?" सेल्डन म्हणाला.

“हो, पण माणसं आणि कॉम्प्युटर्स असं दोन्ही कामाला लावली की कॉम्प्युटरची चूक माणसांच्या लक्षात येऊ शकते आणि तसंच माणसांची चूक कॉम्प्युटरकडून झटक्यात दुरुस्त होऊ शकते. माणसांनी आणि कॉम्प्युटरने एकदम एकाच वेळी चुका केल्या तर गंभीर प्रसंग येऊ शकेल खरा, पण तसं बरेचदा होत नाही.”

“बरेचदा होत नाही, पण कधीच नाही असंही नाही, हं?” सेल्डन म्हणाला.

“जवळपास कधीच नाही- म्हणजे कधीच नाही असं नाहीच. कॉम्प्युटर्स आजकाल पहिल्यासारखे नसतात, आणि माणसंही पूर्वीसारखी काम करत नाहीत.”

“ही तक्रार तर सार्वत्रिकच दिसते आहे,” सेल्डन किंचित् हसून म्हणाला.

“नाही नाही, मी काही स्मरणरंजन करत नाहीये, जुने दिवस किती छान होते वगैरे म्हणत नाहीये. मी बोलतोय आकड्यांच्या आधारावर.”

सेल्डनला आठवलं, ह्युमिन व्यवस्थेच्या घसरणीचा काळ आल्याचं बोलला होता.

“ते पहा, तिकडे- मी काय म्हणतोय ते लक्षात येईल...” लिंडॉर दबक्या आवाजात बोलू लागला, “तिथे- सीथ्री लेवलला पहा काही लोक घोळका करून बसले आहेत. त्यांच्या आविर्भावावरून कळतंय- पीत बसले असणार. त्यातला एकही जण- बाई किंवा पुरुष आपल्या नेमलेल्या जागेवर नाही.”

“काय पितायत ते?” डॉर्सने विचारलं.

“घामाने जे इलेक्ट्रोलाईट्स शरीराबाहेर जातात ते भरून काढायला- फळांचा रस असणार.”

“मग त्यांना दोष कसा देणार तुम्ही?” डॉर्सने रागानेच विचारलं, “या कोरड्या उष्णतेत द्रव पोटात जाणं आवश्यकच आहे.”

"खरा कुशल सीथ्री कामगार किती वेळानंतर काही पितो माहीत आहे का तुम्हाला? त्याबद्दलही काही करू शकत नाही म्हणा. पिण्यासाठी त्यांना आम्ही जे पाच मिनिटांचे ब्रेक देतो ते जर विखरून दिले- त्यांना असं जमा होऊन पिण्याची परवानगी नाकारली तर बंडाळीच करतील ते."

ते आता त्या घोळक्याच्या दिशेने जाऊ लागले. त्यात बायका-पुरुष दोघेही होते. डाह्लचा समाज तसा समानता पाळणारा होता. आणि दोघांनीही कमरेच्या वर काहीही कपडे ठेवले नव्हते. बायकांनी ब्रेसियर म्हणता येतील असं काहीतरी घातलं होतं. पण ते अगदीच कामापुरतं होतं. घाम साचू नये म्हणून स्तन उचलले जावेत एवढ्यापुरतं. झाकणं हे कामच नव्हतं.

डॉर्स सेल्डनला म्हणाली, "हे चांगलंय. मी घामाने चिप्प भिजलेय."

"काढून टाक मग तुझी ब्रेसियर." सेल्डन म्हणाला, "मी तुला अजिबात थांबवणार नाही."

"त्याचा अंदाज आलाच मला." पण तिने ब्रेसियर तशीच ठेवली.

ते आता त्या घोळक्याच्या जवळ पोहोचले. दहाबाराजण असतील.

डॉर्स म्हणाली, "त्यांनी कुणीही काही आचरट शेरेबाजी केली तरी मी पाहून घेईन."

"थँक्यू," लिंडॉर म्हणाला, "ते करणारच नाहीत असं नाही. पण मला तुमची ओळख करून द्यावीच लागेल त्यांच्याशी. तुम्ही कुणी इन्स्पेक्टर्स आहात आणि माझ्या सोबत त्यासाठी आलात असं वाटलं तर ते खवळतील. इन्स्पेक्टर्सनी व्यवस्थापनाच्या कुणाबरोबर न फिरता आपली आपण पाहाणी करायची असते."

त्याने हात उंचावले.

"हीटसिंकर्स, दोन पाहुणे आले आहेत आपल्याकडे- बाहेरच्या जगातून आलेले, अभ्यासक आहेत ते. त्यांच्या जगात ऊर्जेची टंचाई झाली आहे आणि आपण इथे डाह्लमध्ये काय करतो ते पाहून शिकायला आले आहेत ते. काहीतरी उपयोग करता येईल तिथे असं वाटतंय त्यांना."

"घाम कसा गाळायचा ते शिकतील चांगलंच." एकजण ओरडला. आणि सगळे खदखदून हसले.

"तिची छाती बघा केवढी घामटलीय..." एक बाई ओरडली, "कायपण झाकून ठेवतेय..."

डॉर्स उत्तरादाखल ओरडली, "मी काढेन माझी ब्रा, पण माझी छाती तुझ्या छातीशी कुठून बरोबरी करायला..." सगळा ताण हलका झाला, आणि सगळेच खुशीत हसू लागले.

पण एक तरुण मुलगा थोडा पुढे आला, आणि सेल्डनकडे टक लावून पाहात राहिला. त्याचे डोळे प्रखर होते, आणि त्याचा चेहरा अगदी गंभीर मुखवटा जडवल्यासारखा.

तो म्हणाला, "मी ओळखतो तुम्हाला. तुम्ही ते गणिती आहात."

तो आणखी पुढे सरकला आणि सेल्डनचा चेहरा अगदी उत्सुकतेने निरखून पाहू लागला. डॉर्स जणू आपोआप बटण दाबल्यासारखी त्याच्या आणि सेल्डनच्या मधे जाऊन उभी राहिली. लिंडॉर तिच्याही पुढे जाऊन उभा राहात ओरडला, "मागे हो. काही पद्धत आहे की नाही तुला!"

सेल्डन म्हणाला, "थांबा, त्याला बोलू दे माझ्याशी. सगळे असे मधे का येताय माझ्या पुढ्यात?"

लिंडॉर हलकेच म्हणाला, “त्यातले कुणीही जवळ आले की तुम्हाला कळेल- ग्रीनहाऊसमधल्या फुलांचा वास नसतो तो.”

“मी सहन करू शकतो तेवढं.” सेल्डन झटक्याने म्हणाला, “बोल मुला, तुला काय हवं आहे?”

“माझं नाव अमारिल, युगो अमारिल. मी तुम्हाला होलोव्हिजनवर पाहिलंय.”

“असेल, पण पुढे काय?”

“मला तुमचं नाव नाही आठवत.”

“त्याची गरजही नाही.”

“तुम्ही सायकोहिस्ट्री म्हणून विषयावर बोलला होता.”

“नसतो बोललो तर फार बरं झालं असतं...”

“काय?”

“काही नाही. तुला काय हवंय?”

“मला फक्त तुमच्याशी बोलायचंय. थोडा वेळ. अगदी आत्ताच.”

सेल्डनने लिंडॉरकडे पाहिलं- त्याने मानेनेच ठाम नकार दिला. “त्याच्या कामाची पाळी सुरू आहे. शक्यच नाही.”

“तुझी कामाची वेळ कधी सुरू होते, अमारिल?” सेल्डनने विचारलं.

“सोळा वाजता.”

“मला उद्या चौदा वाजता भेटू शकशील?”

“नक्की. कुठे भेटू?”

सेल्डन टिसाल्वरकडे वळून म्हणाला, “तुमच्या घरात मी याला भेटू शकतो?”

टिसाल्वरचं तोंड अगदीच पडलं, “काय गरज आहे? तो केवळ एक हीटसिंकर आहे.”

सेल्डन उत्तरला, “त्याने मला चेहऱ्यावरून ओळखल. त्याला माझ्याबद्दल काहीतरी माहिती आहे. तो अगदीच काही मठ्ठ नाहीये. मी त्याला माझ्या खोलीत भेटेन.” आणि मग टिसाल्वरचं तोंड काही सरळ होत नाही हे पाहून तो म्हणाला, “मी माझ्या खोलीचं भाडं भरतो आहे. आणि तुम्ही कामावर असाल- घराबाहेर.”

टिसाल्वर खालच्या आवाजात सांगू लागला, “माझा प्रश्न नाही, सेल्डन साहेब. माझी बायको- कॅसिलिया... ती हे खपवून घेणार नाही.”

“मी बोलेन तिच्याशी.” सेल्डन अगदी कठोर स्वरात बोलला, “तिला ऐकावंच लागेल.”

६४-

कॅसिलिया टिसाल्वर डोळे विस्फारून पाहात राहिली. “हीटसिंकर? माझ्या घरात अजिबात चालणार नाही.”

“का नाही चालणार? शिवाय तो माझ्या खोलीत येणार आहे.” सेल्डन म्हणाला, “चौदा वाजता.”

“अजिबात चालणार नाही.” टिसाल्वरबाई म्हणाल्या. “हे असं हीटसिंकला भेट देण्याचा परिणाम हा असाच होतो. जिराड मूर्ख आहे.”

“मुळीच नाही, मिस्ट्रेस टिसाल्वर. आम्ही तिथे गेलो ते मी तशी विनंती केली होती म्हणून- आणि मला फार मस्त वाटली ती जागा. मला या तरुण मुलाला भेटलंच पाहिजे, कारण ते माझ्या अभ्यासासाठी महत्त्वाचं आहे.”

“तसं असेलही, पण सॉरी, मला हे चालणार नाही.”

डॉर्सने हाताने त्याला थांबवलं आणि म्हणाली, “हॅरी, मी बघते. मिसेस टिसाल्वर, डॉ. सेल्डनना कुणाला त्यांच्या खोलीत बोलवून भेट घ्यायची असेल तर एकच गोष्ट त्यात पाहायला पाहिजे. एक ज्यादा माणूस म्हणजे थोडं अधिक भाडं. तेवढं समजू शकतं आम्हाला. मग आजच्या दिवसापुरतं डॉ. सेल्डनच्या खोलीचं भाडं दुप्पट.”

मिसेस टिसाल्वर त्यावर क्षणभर विचार करत राहिल्या. “हा तुमचा भलेपणा आहे, पण हा प्रश्न काही फक्त क्रेडिट्सचा नाही. शेजाऱ्यांचा विचार करायला हवा. घामट अंगाचा वास दरवळत आणणारा हीटसिंकर-”

“मला नाही वाटत, तो चौदा वाजता घामट वास अंगावर घेऊन तसाच इथे येईल, मिसेस टिसाल्वर, पण मला बोलू दे. डॉ. सेल्डनना त्याची भेट घेणं आवश्यक वाटतं, आणि ते इथे शक्य होणार नसेल तर मग ते त्याला इतर कुठेतरी भेटतील, पण त्यासाठी इथेतिथे धावाधाव करणं आम्हाला जमणार नाही. ते फारच गैरसोयीचं असेल. त्यामुळे आम्हाला दुसरीकडे जागा शोधावी लागेल. ते काही फार सोपं असणार नाही आणि तसं आम्हाला करायची इच्छाही नाही, पण अखेर तसं करावंच लागेल. आम्ही असं करतो- आम्ही आजवरचं भाडं देतो आणि जागा सोडतो, आणि अर्थातच, मास्टर ह्युमिन यांना हे सारं कळवावं लागेलच, की आम्हाला हे का करावं लागलं. त्यांनी बिचाऱ्यांनी आमच्यासाठी ही सोय करून दिली होती.”

“थांबा,” मिसेस टिसाल्वरच्या मुद्रेवर त्यांच्या मनात चाललेली गणितं स्पष्ट दिसत होती, “आम्हाला मास्टर ह्युमिनना दुखवायचं नाहीये. किंवा तुम्हालाही. हा प्राणी किती वेळ थांबणार आहे इथे?”

“तो इथे चौदा वाजता येईल, त्याला सोळा वाजता कामावर जायचंय. दोन तासांपेक्षा कमी वेळ- बराच कमी वेळ असेल तो इथे. आपण दोघी त्याला बाहेर भेटू आणि डॉ. सेल्डनकडे घेऊन जाऊ. जे कुणी शेजारी त्याला इथे पाहातील त्यांना वाटेल की तो आमचा पाहुणा आहे- कुणीतरी बाहेरच्या जगातला.”

“ठीक आहे मग. मास्टर सेल्डनच्या खोलीचं भाडं आजच्या दिवसापुरतं दुप्पट आणि हा हीटसिंकर इथे फक्त एकदाच येईल.”

“हो, एकदाच.”

पण नंतर, जेव्हा सेल्डन आणि ती डॉर्सच्या खोलीत बसले होते, तेव्हा डॉर्सने त्याला विचारलं, “तुला त्याला का भेटायचंय, हॅरी? हीटसिंकरची गप्पा करणं सायकोहिस्ट्रीसाठीही महत्त्वाचं आहे की काय?”

ती किंचित् उपरोधाने हे बोलतेय असं वाटून सेल्डन जरा तिखट स्वरात उत्तरला, “मला या माझ्या सर्वच कृती या माझ्या प्रकल्पावर बेतायची गरज नाही. या प्रकल्पाच्या यशाबद्दल मला फारसा विश्वास वाटत नाहीच नाहीतरी. मी अखेर एक माणूसही आहे... मला मानवी कुतूहल आहेच. आपण कितीतरी तास हीटसिंक मधे होतो आणि तू पाहिलंस तिथे काम करणार लोक कसे होते. ते अगदीच अशिक्षित होते हे तर स्पष्टच आहे. ते अगदीच खालच्या पातळीवरचे लोक होते- श्लेष नाही- खरोखरच. आणि तरीही त्यात एकजण असा निघाला की ज्याने मला ओळखलं. त्याने मला होलोव्हिजनवर पाहिलं असणार- दशवार्षिक परिषदेच्यावेळी. आणि त्याला सायकोहिस्ट्री हा शब्द बरोबर लक्षात राहिला. मला

तो वेगळा वाटला. त्याच्या सभोवतीच्या लोकांपेक्षा वेगळा- म्हणून मला बोलायचंय त्याच्याशी.”

“कारण तुझा अहम् डाह्लमधला हीटसिंकरही आपल्याला ओळखतो याने सुखावतो म्हणून?”

“तसं असेल कदाचित्. पण माझं कुतूहल चाळवलंय नक्कीच.”

“पण तुला कसं कळणार- त्याला कदाचित् मुद्दाम तुझ्यावर कुणी सोडलं असेल... तुला त्रास देण्यासाठी. यापूर्वीही झालंय असं.”

सेल्डनने ओठ मुडपले, “मी त्याला तसं काही करू देणार नाही. घोळात घेऊ देणार नाही. आता तशी आपली बऱ्यापैकी तयारी झाली आहे, हो की नाही? आणि तू असशीलच ना सोबत. म्हणजे तू मला अपरसाईडवर एकट्याला जाऊ दिलंस, तू मला रेनड्रॉप फॉर्टीथ्रीबरोबर मायक्रोफार्म्समधे जाऊ दिलंस- आता तू तसं मला एकट्याला सोडणार नाहीस, हो ना?”

“अगदी निश्चिंत रहा. अजिबात एकट्याला सोडणार नाही मी तुला.” डॉर्स म्हणाली. “बरं तर, मी या मुलाशी बोलताना, तू तो काही सापळे रचतोय की काय ते पहात रहा. माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे.”

६५-

अमारिल चौदा वाजण्याच्या आधीच हजर झाला. तो जरा सावधपणेच इकडेतिकडे पाहात होता. त्याचे केस नीट विंचरलेले होते. त्याची झुबकेदार मिशीही त्याने नीट विंचरली होती, टोकं वर वळवली होती. त्याचं टीशर्ट अगदी पांढरंशुभ्र होतं. त्याच्या अंगाला वास येत होता खरा, पण तो होता कुठल्यातरी गोड अत्तराचा. जरा जास्तच शिंपडून घेतलेलं बहुधा. त्याच्याकडे एक पिशवीसुद्धा होती.

सेल्डन त्याची वाट पाहात बाहेरच थांबला होता. त्याने त्याच्या एका दंडाला पकडलं, डॉर्सने दुसऱ्या बाजूने दुसरा दंड पकडला. आणि ते अगदी झपाझप एलेव्हेटरकडे गेले. आपल्या मजल्यावर पोहोचताच ते अपार्टमेन्ट उघडून सरळ सेल्डनच्याच खोलीत गेले.

अमारिलने अगदी बापुडवाण्या स्वरात विचारलं, "घरात कुणीच नाहीये का?"

"सगळे कामात आहेत," सेल्डनने थंडपणे उत्तर दिलं. त्याने खोलीतल्या एकुलत्या एका खुर्चीकडे बोट दाखवलं, ती खुर्ची उघड्या जमिनीवरच होती.

"नको नको," अमारिल म्हणाला, "तुम्हा दोघांपैकी कुणीतरी एकाने बसा त्यावर. मला त्याची गरज नाही." आणि तो सहजपणे खाली मांडी ठोकून बसला. त्याच्या हालचालींची नक्कल करत डॉर्सही खाली बसली. जमिनीवर अंथरलेल्या सेल्डनच्या गादीच्या कोपऱ्यावर टेकली. पण सेल्डन मात्र कसाबसा धडपडत हात खाली टेकवत बसला. आणि मग पाय कसे दुमडावेत ते न कळून तसाच बसला.

सेल्डन म्हणाला, "बोल, मुला, तुला मला का भेटायचं होतं?"

"कारण तुम्ही गणिती आहात. मला भेटलेला पहिला गणिती. तुम्हाला जवळून पाहायचं होतं."

"गणिती काय चारचौघांसारखाच असतो."

"मला नाही तसं वाटत... डॉ... डॉ... सेल्डन?"

"हो, बरोबर. सेल्डनच नाव आहे माझं."

अमारिल सुखावला, "अखेर आठवलं मला तुमचं नाव. मी- मलापण गणिती व्हायचं आहे."

“फारच छान, मग कुणी थांबवलंय तुला?”

अमारिलच्या कपाळावर आठ्या उमटल्या, “तुम्ही माझी मस्करी करताय?”

“नाही. तुला काहीतरी, कुणीतरी त्यापासून थांबवतंय एवढं कळतंय मला. खरंच विचारतोय.”

“मला काय थांबवतंय... मी डाह्लाइट आहे हीच गोष्ट मला थांबवायला पुरेशी आहे. डाह्लमधला हीटसिंकर. माझ्याकडे पैसाही नाही शिकायला आणि क्रेडिट्सही नाहीत. म्हणजे खरोखरचं शिक्षण घ्यायला. लिहावाचायला शिकलोय मी. कॉम्प्युटरही वापरतो. हीटसिंकर होण्यासाठी जेवढं लागतं तेवढं सगळं शिकलो. पण मला अधिक काही हवं होतं. मग स्वतःच शिकत गेलो.”

“काही वेळा, स्वतःचं स्वतः शिकणं हेच उत्तम असतं. तू कसं काय साधलंस ते?”

“माझ्या ओळखीच्या एख लायब्रेरियन बाई होत्या. त्यांनी मला मदत करायची तयारी दाकवली. फार चांगल्या होत्या त्या, आणि त्यांनीच मला गणित शिकण्यासाठी कॉम्प्युटर कसा वापरायचा ते दाखवलं. इतर लायब्ररींशी संपर्क व्हावा म्हणून मला सॉफ्टवेअर सिस्टिम सेट करून दिली. मी सुट्टीच्या दिवशी येऊन किंवा रात्रपाळीनंतर सकाळी येऊन लायब्ररीत बसायचो. कधीकधी तर त्या मला त्यांच्या केबिनमध्येही बसू देत. आणि बाहेरून कुलूप घालून जात. म्हणजे मला कुणी उगीच त्रास द्यायला नको. किंवा कधीकधी लायब्ररी बंद असतानाही त्या मला आत जायची व्यवस्था करत. त्यांना गणितातलं काहीही कळत नव्हतं, पण त्यांनी मला शक्य तितकी मदत केली. वय झालं होतं त्यांचं. नवरा वारलेला. त्या मला मुलासारखंच मानत बहुतेक... कोण जाणे. त्यांना मूलबाळ नव्हतंच.”

(कदाचित दुसरीही काही भावना वाटत असेल, सेल्डनच्या मनात आलं. पण त्याने तो विचार झटकून टाकला. आपल्याला काय करायचंय.)

"मला संख्यांचा सिद्धांत आवडत असे." अमारिल म्हणाला. "मी काहीकाही गोष्टी कॉम्प्युटरवर जे काही शिकलो त्यावरून पुढे नेत शिकत गेलो. बुकफिल्म्समधूनही गणित शिकलो. मला काही गोष्टी नवीन अशा सुचत- ज्या बुकफिल्म्समधे नव्हत्या."

सेल्डनने भुवया उंचावल्या. "अरे वा, हे काहीतरी छान वाटतंय. नेमकं काय नवीन?"

"मी आणलंय तुम्हाला दाखवायला. मी आजपर्यंत दाखवलं नाही हे कुणाला-" त्याने खांदे उडवत सांगितलं, "माझ्या आसपासचे लोक ते बघून मला हसतील तरी किंवा संतापतील तरी. एकदा मी एका मुलीशी बोललो याबद्दल. तर ती म्हणाली विचित्रच आहेस तू- मी नाही भेटणार परत कधी तुला. तुम्हाला दाखवलं तर चालेल?"

"अगदी नक्की चालेल. निश्चिंतपणे दाखव."

सेल्डनने हात पुढे केला. जरासा कुचमतच अमारिलने त्याच्याकडची पिशवी पुढे सरकवली.

कितीतरी वेळ सेल्डन अमारिलच्या त्या कागदांवरून नजर फिरवत राहिला. ते सारंच अगदी प्राथमिक, भाबडेपणाने केलेलं गणित होतं, पण त्याने चेहऱ्यावर तसं अजिबात दिसू दिलं नाही. जराही हसला नाही तो. त्याने ती सारी उदाहरणं तपासली- निष्कर्ष वाचले. त्यातील एकही नवीन नव्हतं. काहीही नवीन किंवा महत्त्वाचं नव्हतं त्यात.

पण त्यात विशेष काही नव्हतं. सेल्डनने त्याला विचारलं, "हे सगळं तुझं तूच केलंस?"

अमारिलने घाबरतघाबरत मानेनेच होकार भरला.

सेल्डनने त्यातून अनेक कागद बाहेर काढले. "याचा असा विचार तू का बरं केलास?" त्याने त्यातील गणिताच्या पायऱ्यांवरून बोट फिरवलं.

अमारिलने त्या भागाकडे पाहिलं. थोडा विचार करत थबकला आणि मग त्याने त्यातला आपला विचार नीट समजावून दिला.

सेल्डन ऐकत राहिला. मग म्हणाला, "तू कधी अनॅट बायजेलचं पुस्तक वाचलं आहेस?"

"संख्यांच्या सिद्धांतावरचं?"

"त्याचं नाव होतं- मॅथेमेटिकल डिडक्शन्स. त्यात संख्या सिद्धांतावर फार काही नव्हतं."

अमारिलने मान हलवली, "मी कधी नावही ऐकलेलं नाही. सॉरी."

"त्याने हे तू मांडलेलं प्रमेय तीनशे वर्षांपूर्वी सोडवून ठेवलंय."

अमारिलचं तोंड पडलं, "मला नव्हतं माहीत."

"नक्कीच माहीत नसणार. पण तू तेच प्रमेय खूप हुषारीने मांडलं आहेस. फार क्लिष्ट न करता-"

"क्लिष्ट म्हणजे?"

"जाऊ दे, ते महत्त्वाचं नाही." सेल्डनने ते कागद एकत्र करून पुन्हा पिशवीत ठेवले आणि म्हणाला, "याच्या अनेक प्रती काढ. त्यातली एक प्रत काढून कॉम्प्युटरवर तारीख घालून घे. त्यावर कॉम्प्युटराइज्ड सील लावून घे. माझी ही

मैत्रीण- मिस डॉर्स वेनाबिली तुला स्ट्रीलिंग विद्यापीठात दाखल करेल. तुला फी भरावी लागणार नाही, किंवा शिष्यवृत्ती मिळेल. तुला अगदी सुरुवातीपासूनच सुरुवात करावी लागेल. गणिताबरोबरच इतरही काही विषय शिकावे लागतील, पण…”

एव्हाना अमारिलने श्वास रोधून धरलेला. “स्ट्रीलिंग विद्यापीठ? ते मला घेणारच नाहीत.”

“का नाही? डॉर्स, तुला एवढं करता येईल, येईल ना?”

“नक्की करता येईल.”

“नाही. नाही करता येणार.” अमारिल जोरात म्हणाला, “ते मला घेणार नाहीत. कारण मी डाह्लचा आहे.”

“वेल?”

“ते डाह्लच्या लोकांना घेत नाहीत आत.”

सेल्डनने डॉर्सकडे पाहिलं. “काय म्हणतोय हा?”

डॉर्सने मान नकारार्थी हलवत म्हणाली, “मला खरंच कळत नाहीये.”

अमारिल म्हणाला, “कारण तुम्ही बाहेरच्या जगातून आला आहात. किती दिवस झाले तुम्हाला स्ट्रीलिंगमधे येऊन?”

“दोन वर्षांपेक्षा थोडा अधिक काळ असेल, मि. अमारिल.”

“कधी पाहिलं आहे तिथे कुणा डाह्लाइटला- बुटके, कुरळ्या केसांचे, झुबकेदार मिशांचे कुणी लोक दिसले कधी तिथे तुम्हाला?”

“अगदी भिन्नभिन्न दिसणारे विद्यार्थी आहेत तिथे.”

“पण डाह्लाइट्स नाहीत. परत गेलात तर नीट निरीक्षण करा.”

“पण का?” सेल्डन उद्गारला.

“त्यांना आम्ही आवडत नाही. आम्ही वेगळे दिसतो. त्यांना आमच्या मिशा अजिबात आडत नाहीत.”

“काढून टाकायच्या मिशा-” पण सेल्डननचा आवाज त्याच्या रागीट नजरेसमोर घरंगळला.

“कधीच नाही? माझ्या मिशा ही माझ्या पौरुषाची खूण आहे.”

“दाढी काढून टाकताच. ती पण पौरुषाचीच खूण आहे.”

“आमच्या लोकांसाठी मिशा महत्त्वाच्या असतात.”

सेल्डन डॉर्सकडे पाहात पुटपुटला, “चकोट डोकी, मिशा... मूर्खपणाच आहे सगळा.”

“काय?” अमारिलने रागात विचारलं.

“काही नाही. मला सांग, आणखी डाह्लाइट्सबद्दल कायकाय नापसंत आहे त्यांना?”

“नापसंत करायचं ठरवतात, मग आणखी कायकाय बहाणे शोधत रहातात. कधी म्हणतात, आमच्या अंगाला वास येतो. कधी म्हणतात, आम्ही घाणेरडे आहोत. मग आम्ही चोर असतो म्हणतात. कधी म्हणतात आम्ही फार हिंसक असतो. आणि आम्ही बिनडोक आहोत हे तर त्यांना वाटतंच.”

“असं सगळं का म्हणतात ते?”

“कारण सोपं असतं ते म्हणणं. तसं म्हटल्यावर त्यांना स्वतःच्या श्रेष्ठतेबद्दल छानछान वाटतं. आम्ही हीटसिंक्समधे काम करतो म्हणून आमच्या अंगाला वास येतो, आम्ही मळकट दिसू लागतो. आम्ही गरीब आहोत, सतत दडपलेले असतो.

मग कधीकधी आमच्यातले लोक चोऱ्या करतात, मारामाऱ्या करतात. पण आम्ही सारेच काही तसे नसतो. इंपेरियल सेक्टरमधल्या सोनेरी केसांच्या उंच लोकांना वाटतं सगळी गॅलक्सी त्यांचीच आहे- त्यांची आहेच ती म्हणा. ते कधी हिंसक होत नाहीत की काय? कधी चोऱ्या करतच नाहीत? आमच्यासारखं हीटसिंक्समधे काम करायला लागलं तर त्यांच्या अंगाला वास येणार नाही? माझ्या परिस्थितीत जगावं लागलं तर तेही कळकट होतील."

"सगळ्या ठिकाणी सर्व प्रकारचे लोक असतात हे कुणी नाकारलंय?" सेल्डन म्हणाला.

"कुणीच तसं काही म्हणत नाही! मास्टर सेल्डन, सगळे गृहीत धरतात. मला ट्रॅन्टॉरच्या बाहेर जावं लागेल. इथे ट्रॅन्टॉरवर मला अजिबात संधी मिळणार नाही, क्रेडिट्स मिळणार नाहीत- शिक्षणाची काही संधीच नाही... गणिती होण्याचा इथे मी विचारच करू शकणार नाही. मी काहीही साध्य करू शकणार नाही इथे- ते मला जे ठरवतात- फालतू- तेवढंच होऊ शकतो मी इथे." तो शेवटचं वाक्य खूप निराशेने, हताशपणे म्हणाला.

सेल्डनने पुन्हा संवाद सुरू करायचा प्रयत्न केला. "मी ही खोली ज्यांच्याकडून भाड्याने घेतली ते लोकही डाह्लाइट्स आहेत. त्याची नोकरी स्वच्छ कामाची आहे. तो शिकलेलाही आहे."

"हो हो," अमारिल त्वेषाने म्हणाला, "आहेत ना असे काही. ते काही लोकांना शिकू देतात. फक्त आम्ही हे शक्य केलं आहे दाखवण्यापुरतंच आहे ते. ते डाह्लमधे असेपर्यंत जरा बऱ्या वस्तीत राहू शकतात. पण बाहेर कुठे गेले तर- तर मग कळेल त्यांना कशी वागणूक मिळते ते. पण असले लोक इथे असतात तेव्हा आमच्यासारख्यांना अगदी तुच्छ, कचऱ्यासारखंच समजतात. स्वतःला जणू सोनेरी

केसाचे गोरे लोकच समजतात. तुम्ही ज्यांच्याकडून खोली भाड्याने घेतलीय ते अगदी चांगले-भले लोक एक हीटसिंकर इथे येणार म्हटल्यावर काय म्हणाले सांगाल? मी कसा असेन म्हणाले ते? ते घरातून बाहेर गेलेत आता... मी इथे असताना ते कसे रहातील."

सेल्डनने ओठांवरून जीभ फिरवली. "मी तुला विसरणार नाही. मी तुला ट्रॅन्टॉरवरून बाहेर पाठवण्याचा प्रयत्न करीन. हेलिकॉनला परत जाईन तेव्हा तिथल्या माझ्या विद्यापीठात मी तुला दाखल करेन."

"वचन देणार? तुमचा शब्द? मी डाह्लाइट असलो तरीही?"

"तू डाह्लाइट आहेस की नाहीस याने मला काहीच फरक पडत नाही. तू स्वतःचं स्वतः गणित शिकला आहेस याने पडतो. पण तू हे जे सांगतो आहेस ते अजूनही माझ्या पचनी पडत नाहीये. अगदी निरुपद्रवी असलेल्या लोकांबद्दल असा अकारण राग कसा काय वाटू शकतो कुणाला, मला समजू शकत नाही."

अमारिल कडवटपणे म्हणाला, "कारण असल्या गोष्टींत रस घेण्याची वेळच आली नाही तुमच्यावर. तुम्हाला ज्याची धग लागत नाही ती गोष्ट अगदी नाकाखाली घडली तरीही तुम्हाला वास लागणार नाही."

डॉर्स म्हणाली, "मि. अमारिल, डॉ. सेल्डन हे तुझ्यासारखेच गणिती आहेत. आणि त्यांचं मन अनेकदा ढगात असल्यासारखं असतं, हे तू तरी समजू शकतोस. मी इतिहासाची अभ्यासक आहे. आणि मला हे माहीत आहे की एखादा लोकसमूह दुसऱ्या लोकसमूहाला उगाचच तुच्छ मानत असतो. त्यांना वाटणारा द्वेष हा अगदी विचित्र असतो- जणू त्या द्वेषाचंच एक कर्मकांड असतं- त्याला काहीही तार्किक समर्थन देता येत नाही. आणि त्याचा प्रभाव इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर राहू शकतो. वाईट आहे हे."

अमारिल म्हणाला, “काहीतरी वाईट आहे हे म्हणणं किती सोपं असतं. तुम्ही म्हणता हे तुम्हाला पसंत नाही- झालं, तुम्ही भल्या आहात- संपलं. मग तुम्ही आपापल्या कामाला लागणार. पुढे काहीही करणार नाही. वाईट आहे म्हणण्यापेक्षा खूप जास्त वाईट आहे हे. कुठल्याही दृष्टीने ते सभ्यतेला धरून नाही, स्वाभाविक नाही. आपण सगळेच सारखेच आहोत- सोनेरी केसांचे उंच लोक असोत वा पूर्वेकडचे, पश्चिमेकडचे, दक्षिणेकडचे आणि बाहेरच्या जगातले बुटके लोक... सगळे सारखेच आहोत. तुम्ही, आम्ही, अगदी आपला सम्राटही अखेर पृथ्वीवरच्या लोकांचेच वंशज आहोत ना?”

“कुठल्या लोकांचे वंशज?” सेल्डनने डोळे विस्फारून विचारलं. तो डॉर्सकडे पाहू लागला.

“पृथ्वीवरच्या लोकांचे!” अमारिल ओरडलाच. “ज्या एका ग्रहावर मानवजात प्रथम वसली होती.”

“एका ग्रहावर? फक्त एका ग्रहावर?”

“हो एका ग्रहावर. पृथ्वी.”

“तू पृथ्वी म्हणतोस, तो ग्रह म्हणजे ऑरोराच ना, तेच म्हणायचंय ना?”

“ऑरोरा? म्हणजे कुठला? मला पृथ्वीच म्हणायचंय. तुम्ही कधी ऐकलंच नाही पृथ्वी हे नाव?”

“नाही,” सेल्डन म्हणाला, “खरंच नाही.”

“ते एक दंतकथेतलं जग आहे.” डॉर्स बोलू लागली, “ते-”

“अजिबात दंतकथेतलं नाही. तो खरोखरचा ग्रह होता.”

सेल्डनने सुस्कारा सोडला. “मी ऐकलंय हे सगळं पूर्वी कधीतरी. वेल. आपण पुन्हा एकदा उजळणी करू. यासंबंधी- पृथ्वीबद्दल काही सांगणारं पुस्तक वगैरे आहे का डाह्लमधे?”

“काय?”

“मग काही सॉफ्टवेअर आहे?”

“तुम्हाला काय म्हणायचंय मला कळलं नाही.”

“अरे मुला, तू पृथ्वीबद्दल कुठे ऐकलंस?”

“माझ्या बाबांनी सांगितलं मला. सर्वांनाच माहीत आहे ते.”

“याबद्दल जास्त काही माहिती असलेलं कुणी आहे? हे तुमच्या शाळेत शिकवत कां?”

“शाळेत त्याबद्दल एक शब्दही काढत नव्हते.”

“मग हे सर्वांना कसं माहीत झालं?”

अमारिलने खांदे उडवले... ही प्रश्नांची सरबत्ती त्याला अनाठायी वाटत होती.

“माहीत आहे सर्वांना. तुम्हाला त्याबद्दलच्या गोष्टी ऐकायच्या असतील तर मदर रिटा सांगू शकेल. ती मेल्याची बातमी आली नाही, म्हणजे असेल अजून.”

“तुझी आई? तुला कसं माहीत नाही-”

“माझी आई नाही. तिला सगळे मदर रिटा म्हणतात. खूप म्हातारी बाई आहे. बिलीबॉटनमधे रहाते. किंवा रहायची.”

“ते कुठे आहे?”

“त्या बाजूला आहे...” त्याने हाताने दाखवलं.

“तिथे कसं जायचं?”

“कसं जायचं? तुम्हाला कशाला जायचंय तिथे? परत नाही येऊ शकणार सुखरुप.”

“का नाही?”

“विश्वास ठेवा माझ्यावर. तिथे जाण्यासारखं नाहीये.”

“पण मला त्या मदर रिटाला भेटायचंय.”

अमारिलने जोरात मान हलवली. “तुम्हाला चाकू चालवता येतो का?”

“कशासाठी? कसला चाकू?”

“धारदार चाकू. हा असला.” अमारिलने वाकून कंबरेवरच्या घट्ट पट्ट्यावर हात ठेवला. त्या पट्ट्याचा एक भाग सुट्टा झाला आणि त्याच्या एका टोकाला एक पातळ, लखलखीत पातं दिसू लागलं... खतरनाक.

डॉर्सचा पंजा झप्पकन त्याच्या मनगटावर आवळला गेला.

अमारिल हसत सुटला, “मी त्याचा वापर करायच्या विचारात नाहीये. फक्त दाखवतोय तुम्हाला.” त्याने तो चाकू पुन्हा पट्ट्यात बंद केला. “तुम्हाला स्वसंरक्षणार्थ चाकू बाळगावाच लागतो, आणि तो नसेल तर किंवा तुम्हाला तो चालवता येणार नसेल तर बिलीबॉटनमधून तुम्ही जिवंत बाहेर पडू शकत नाही. बरं तर-” त्याची मुद्रा अचानक गंभीर झाली, तो त्यांचय्कडे निरखून पाहू लागला, “तुम्हाला मला मदत करण्यात, हेलिकॉनवर घेऊन जाण्यात खरोखरच रस आहे का, मास्टर सेल्डन?”

“अगदी खरंच. हे वचन दिलं तुला. तुझं नाव लिही, हायपरकॉम्प्युटरने तुझ्यापर्यंत कसं पोहोचता येईल ते तपशील लिही. तुझा काही तरी कोड नंबर असेल ना?”

“हीटसिंकमधल्या माझ्या तुकडीचा नंबर असेल. तो चालेल?”

“हो.”

“बरं तर मग,” अमारिल सेल्डनकडे डोळे खिळवून पाहात होता, “याचा अर्थ असा की माझं भविष्य आता सर्वस्वी तुमच्या हातात आहे. त्यामुळे प्लीज तुम्ही बिलीबॉटनला जाऊ नका, मास्टर सेल्डन. तुम्हाला हरपून बसणं मला आता परवडणार नाही.” त्याने आर्जवाने डॉर्सकडे पाहिलं आणि म्हणाला, “मिस वेनाबिली, तुमचं ते ऐकत असतील तर... त्यांना प्लीज तिकडे जाऊ देऊ नका. प्लीज.”

# बिलीबॉटन

डाह्ल- या प्रांताचा सर्वात प्रसिद्ध भाग आहे बिलीबॉटन, हे जरा विचित्रच. दंतकथेतलीच जागा झाली आहे आता ही. अनेक कहाण्यांचा उगम या प्रांतात झाला. खरे तर साहित्याची एक उपशाखाच आहे बिलीबॉटनबद्दल- अनेक नायक, साहसवीर आणि बळी पडलेले काही लोक वगैरे बिलीबॉटनमधे कसे अनेक धोके पत्करून शिरतात आणि बाहेर पडतात वगैरे गोष्टी रचल्या गेल्या आहेत. या कहाण्या इतक्या सुरसपणे सांगितल्या गेल्या आहेत की हॅरी सेल्डन आणि डॉर्स वेनाबिली तिथून बाहेर पडल्याचा खरोखरचा इतिहास त्यात हरवून गेला आहे.

-गॅलॅक्टिक ज्ञानकोष

६६

हॅरी सेल्डम आणि डॉर्स वेनाबिली दोघेच होते तेव्हा डॉर्सने विचारमग्न होत त्याला विचारलं, "तू या मदरला भेटायचा खरोखरच विचार करतो आहेस की काय?"

"मी विचार तर करतोय, डॉर्स."

"तू एक नमुनाच आहे, हॅरी. वाईटाकडून अधिक वाईटाकडे जायचं... अपरसाईडला गेला होतास ते समजण्यासारखं होतं- तू स्ट्रीलिंगमधे होतास, जावंसं वाटू शकतं. ठीक. मग मायकोजेनवर असताना तू त्या ज्येष्ठांच्या मनोऱ्यात घुसलास, केवढा मोठा धोका पत्करलास- आणि वेडेपणाच होता तो. आणि आता डाह्लमधे तुला या कुठल्याशा जागेत जायचा मोह होतोय. तो मुलगा सांगतोय त्यावरून ते

आत्महत्येसारखंच दिसतंय... आणि तुला का जायचंय तिथे त्या कारणही तसं बावळटपणाचं आहे...''

''मला कुतूहल आहे या पृथ्वी नावाच्या ग्रहाच्या उल्लेखाबद्दल- त्यात काही तथ्य आहे का ते कळायला हवं मला.''

''ही एक दंतकथा आहे, आणि फारशी रंजकही नाही. नेहमीचंच आहे हे. फक्त नावं बदलतात. प्रत्येक ग्रहावर वेगळं नाव... पण सारांश तोच. मूळ ग्रह, महान युग... वगैरे. गुंतागुंतीच्या, अनेक दुष्टाव्यांनी भरलेल्या समाजांमध्ये भूतकाळातल्या तथाकथित साध्यासोप्या आणि सत्प्रवृत्त जीवनशैलीबद्दलचं आकर्षण दिसतच. या ना त्या प्रकारे हे सगळ्या पातळ्यांवरच्या समाजांत दिसून येतं. प्रत्येकाला स्वतःचा समाज फार गुंतागुंतीचा आणि दुष्प्रवृत्त वाटतो, कितीही साधा असला तरीही. हे तुझ्या सायकोहिस्ट्रीसाठी नोंदून ठेव.'' डॉर्स म्हणाली.

''तरीही,'' सेल्डन म्हणाला, ''कधीकाळी, खरोखरच एकाच जगावर माणसं वसली होती, ऑरोरा, पृथ्वी काहीही नाव असेल ही शक्यता मला तपासून पाहिली पाहिजे. खरं तर-'' तो थबकला. अखेर डॉर्सने विचारलं, ''काय?''

सेल्डनने मान हलवली, ''तुला आठवतेय का, तू मला मायकोजेनवर असताना सांगितलेली मांडीवरच्या हाताची गोष्ट? रेन्ड्रॉप फॉर्टीथ्रीकडून ते पुस्तक मी घेतलं त्यानंतर लगेच तू सांगितलेलीस. मला हल्लीच पुन्हा एकदा आठवली ती गोष्ट- टिसाल्वरशी बोलताना. मी काहीतरी बोललो आणि मला निमिषभरासाठी आठवलं-''

''काय आठवलं?''

“मला नाही आठवत. डोक्यात आलं आणि गेलं, पण जेव्हाजेव्हा मी एकच जग असण्याच्या कल्पनेचा विचार करतो तेव्हा मला असं वाटतं की काहीतरी अगदी हाताशी आहे आणि मग ते हरवून जातं.”

डॉर्स आश्चर्याने सेल्डनकडे पाहात राहिली. “मला कळत नाही काय. मांडीवरच्या हाताची गोष्ट आणि पृथ्वी... ऑरोरा कशाचाच काही संबंध नाही.”

“हो... माहीत आहे मलाही, पण हे... माझ्या मनाच्या सीमेवर रेंगाळून जाणारं काहीतरी आहे ते या एक-जगाच्या संकल्पनेशी जोडलेलं आहे. आणि मला असं वारंवार वाटतं की हे काय आहे त्याची अधिक माहिती घेतली पाहिजे. ते आणि रोबॉट्स.”

“रोबॉट्सही? मला वाटलं त्या ज्येष्ठांच्या मनोऱ्यात त्याची अखेर झाली.”

“अजिबात नाही. मी त्यांचा विचार सतत करतोय.” तो बराच वेळ डॉर्सकडे अस्वस्थपणे पाहात राहिला. मग म्हणाला, “पण मला खात्री नाहीये...”

“कसली खात्री नाही, हॅरी?”

पण सेल्डन फक्त मान हलवत राहिला आणि गप्पच झाला.

डॉर्सच्या कपाळावर आठ्या चढल्या होत्या. मग ती म्हणाली, “हॅरी, एक गोष्ट स्पष्ट करते मी. मी जे बोलतेय ते नीट समजूनउमजून बोलतेय- आणि माझ्यावर विश्वास ठेव, खरोखरच्या इतिहासात कुठेही एकाच जगातून मानवजात पसरली वगैरे कशाचाही उल्लेखही नाही... हे लोकांचे लाडके समज आहेत हे मान्य आहे मला. म्हणजे फक्त काही अंधविश्वासू मायकोजेन, डाह्लाईट हीटसिंकर्स वगैरेंमधे नाहीत हे समज- तर अगदी काही जीवशास्त्रज्ञही तसं मानतात की साऱ्यांचा उगम एकाच कुठल्यातरी जगातून झाला असावा. मला त्यात गती नाही म्हणा. शिवाय काही गूढवादी इतिहासतज्ञही याबाबत काही अंदाज वेळोवेळी व्यक्त करत असतात.

आणि रिकामटेकड्या ऐषारामी बुद्धीजीवींमध्येही याबद्दल बोलणं ही फॅशन आहे. पण अभ्यस्त इतिहासात यासंबंधी काहीही म्हटलेले नाही.''

सेल्डन म्हणाला, ''मग तर अधिकच योग्य वाटतं मला- अभ्यस्त इतिहासाच्या पलिकडे जाऊन डोकावणं. मला एक अशी गोष्ट हवी आहे की ज्यामुळे सायकोहिस्ट्रीवर काम करणं मला सोपं जाईल. आणि ती गोष्ट कुठून मिळेल, काय असेल, गणितासंबंधी असेल की ऐतिहासिक गंमतजंमत असेल, की अगदी काल्पनिक असेल वगैरेशी मला कर्तव्य नाही. हा आताचा मुलगा बघ, त्याला थोडंसं जरी नीट औपचारिक शिक्षण मिळालं असतं, तर मी त्याला याच प्रश्नावर लावून दिलं असतं. त्याच्या विचारात स्वयंप्रज्ञेची खूण पटते मला, स्वतःचा स्वतः व्यवस्थित विचार करू शकतोय तो-.''

डॉर्स म्हणाली, ''म्हणजे तू त्याला खरोखरच मदत करणार आहेस तर?''

''अर्थातच. मला शक्य होईल तेव्हा नक्कीच.''

''पण आपल्याला कसलीही शाश्वती नसताना, असे शब्द देणं योग्य वाटतं तुला?''

''मला शब्द पाळायची इच्छा आहे. दिलेले शब्द पाळण्याच्या शक्यतेबद्दल तू एवढा काटेकोर विचार करत असलीस तर मग जरा आठवून पहा... ह्युमिनने सनमास्टर फोर्टीनला काय सांगितलं होतं- जेव्हा सायकोहिस्ट्री वापरली जाईल तेव्हा मायकोजेनियन्सना त्यांचं जग परत मिळेल. त्याची शाश्वती तर नाहीच, शक्यताही शून्य आहे. समज मला सायकोहिस्ट्रीचं गपित उलगडता आलं तरीही इतक्या मर्यादित, विशिष्ट उद्देशासाठी ते वापरता येईल का ते कुणाला माहीत? शक्य नसताना शब्द देण्याचं हे एक खरंखुरं उदाहरण आहे.''

पण डॉर्स जोरात उत्तरली, “चेटर ह्युमिन आपले जीव वाचवायचा प्रयत्न करत होता, आपल्यापर्यंत डेमेर्झेल किंवा सम्राटाचे हात पोहोचू नयेत म्हणून प्रयत्न करत होता. ते विसरू नकोस. आणि मला वाटतं त्याला मायकोजेनियन्सना मदत करायला खरोखरच आवडेल.”

“आणि मला युगो अमारिलला मदत करायला खरोखरच आवडेल. आणि मी त्याला मदत करू शकण्याची शक्यता खूप जास्त आहे. मायकोजेनियन्सना माझी मदत होईल त्यापेक्षा खूपच जास्त. त्यामुळे तू जर पहिल्या वचनाबद्दल काटेकोर नसलीस तर मग या दुसऱ्या वचनाबद्दलही काही बोलू नकोस. आणखी सांगतो, डॉर्स,”- त्याच्या नजरेत राग होता- “मला खरोखरच मदर रिटाला शोधून काढायला आवडेल. आणि मी एकटाही जायला तयार आहे.”

“शक्य नाही!” डॉर्स ओरडलीच, “तू गेलास तर मी येणारच.”

६७-

अमारिल कामावर जाण्यासाठी म्हणून घरातून बाहेर पडल्यावर तासाभराने मिसेस टिसाल्वर तिच्या मुलीसोबत परतल्या. सेल्डन आणि डॉर्सकने हेलो म्हटल्यावर त्यांनी मानेने किंचित अभिवादन केलं, पण शब्दही बोलल्या नाहीत. आत आल्यावर त्यांनी घरावरून एक तीक्ष्ण नजर फिरवली- जणू त्या हीटसिंकरचा काही मागमूस राहिलाय की काय ते तपासून घेतलं. मग नाकाने जोरात हुंगत काही वास राहिलाय का हवेत तेही पाहिलं. सेल्डनकडे रागाने बघत बघत ती हॉलमधून आपल्या बेडरूममधे गेली.

टिसाल्वर कधीतरी नंतर घरी परतला. डॉर्स आणि सेल्डन जेवायला आले तेव्हा बायको आत असल्याचा फायदा घेऊन त्याने कुजबुजत विचारलं, “ती व्यक्ती आली होती का?”

“येऊन गेली,” सेल्डन गंभीरपणे उत्तरला, “तुमची पत्नी तेव्हा इथे नव्हती.”

“तुम्हा हे पुन्हा करायला लागणार आहे?” टिसाल्वरने विचारलं.

“तसं नाही वाटत मला.” सेल्डन उत्तरला.

“छान.”

जेवण सन्नाट्यात पार पडलं. पण जेव्हा त्यांची मुलगी जेवून उठली आणि आपल्या बेडरूममधे कॉम्प्युटरवर सराव की खेळ करायला गेली तेव्हा सेल्डन खुर्चीवर मागे रेलला, आणि म्हणाला, “मला बिलिबॉटनबद्दल माहिती सांग.”

टिसाल्वर दचकून पाहू लागला आणि काही क्षण त्याच्या तोंडातून शब्दच बाहेर पडले नाहीत, नुसतेच ओठ हलत राहिले. कॅसिलिया मात्र अशी सहजासहजी निःशब्द होणारांतली नव्हती.

ती म्हणाली, “तुमचा नवा मित्र तिथे रहातो कां? त्याला भेटायला तिथे जाताय आता? पुनर्भेट?”

“अजूनतरी,” सेल्डन शांतपणे उत्तरला, “मी फक्त बिलिबॉटनबद्दल विचारलंय.”

कॅसिलियाचा स्वर तिखट होता, “झोपडपट्टी आहे ती. दुनियेवरून ओवाळून टाकलेले लोकच रहातात तिथे. तिथे कुणीही जातयेत नाही. तिथंच घरं बांधून रहाणारी घाण तेवढी तिथे असते.”

“तिथे कुणी मदर रिटा रहाते म्हणे.”

“मी नाही ऐकलं कधी हे नाव.” तिने खाटकन् तोंड मिटून घेतलं. तिला बिलीबॉटनमध्ये रहाणाऱ्या कुणाचंही नावही माहीत करून घेण्यात रस नव्हता हे तिने पुरेसं स्पष्ट केलं.

टिसाल्वर जरा दबकत, घाबरट नजर बायकोकडे टाकत म्हणाला, , घाबरट नजर बायकोकडे टाकत म्हणाला, “मी ऐकलंय तिच्याबद्दल. वेडी म्हातारी आहे ती- भविष्य सांगते, भाकितं करते असं म्हणतात.”

“आणि ती बिलिबॉटनमधे रहाते?”

“मला माहीत नाही, मास्टर सेल्डन. मी तिला पाहिलेलं नाही कधी. कधीकधी ती काही विशेष भविष्य वर्तवते तेव्हा तिचं नाव बातम्यांमधे होलोकास्टमधे सांगितलं जातं.”

“तिची भाकितं खरी ठरतात?”

टिसाल्वर खिदळला, “भाकितं कधी खरी होतात का? ती बोलते त्याला तर अर्थही नसतो काही.”

“ती कधी पृथ्वीबद्दल बोलली आहे काही?”

“माहीत नाही. पण बोलली तर नवल नाही.”

“मी आता पृथ्वीचं नाव घेतलं तर तुला काही विशेष वाटलं नाही... तुला माहीत आहे काही पृथ्वीबद्दल?”

आता मात्र टिसाल्वरच्या मुद्रेवर नवल उमटलं. “अर्थात, मास्टर सेल्डन. त्याच जगातून सगळीकडची माणसं आली... असं म्हणतात.”

“असं म्हणतात? तुझा त्यावर विश्वास नाही?”

“माझा? मी सुशिक्षित आहे. पण अनेक अडाणी लोकांचा त्यावर विश्वास आहे.”

“पृथ्वीसंबंधी इथे काही बुकफिल्म्स आहेत?”

“लहान मुलांच्या गोष्टीत असतात उल्लेख. मी लहान होतो तेव्हा माझी एक लाडकी गोष्ट होती- तिची सुरुवातच होत असे- ‘फार फार वर्षांपूर्वी, पृथ्वीवर घडलेली गोष्ट आहे ही. पृथ्वी हा एकच ग्रह असा होता...’ आठवते का तुला ती, कॅसिलिया?”

कॅसिलियाने खांदे उडवले. ती अजून फुरंगटून होती.

“मला कधीतरी वाचायला आवडेल,” सेल्डन म्हणाला, “पण मला खरोखरच्या बुकफिल्म्स हव्या आहेत त्यावरच्या. जरा अभ्यासपूर्वक केलेल्या किंवा छापलेल्यासुद्धा चालतील.”

“मी तरी ऐकलेलं नाही काही. पण लायब्ररीत-”

“मी पाहातो तिथे. पृथ्वीसंबंधी बोलायला काही हरकत असते का लोकांची- की तसं बोलणं निषिद्ध आहे वगैरे?”

“निषिद्ध म्हणजे?”

“पृथ्वीचा उल्लेख करू नये, त्याबद्दल बोलू नये असे काही समज तुमच्या समाजात आहेत का?”

टिसाल्वर अगदीच बावचळून गेला. उत्तराची अपेक्षा करण्यात अर्थच नव्हता.

डॉर्स म्हणाली, “बाहेरच्या लोकांनी बिलिबॉटनला जाऊ नये असे काही नियम आहेत का?”

आता मात्र टिसाल्वर अगदी मनापासून उत्तरला, "नियम नाही, पण तिथे कुणीच जाऊ नये. मी नाही जाणार कधी."

"का बरं?" डॉर्सने विचारलं.

"फार धोकेशीर जागा आहे ती, भयानक हिंसक! सर्वांकडे शस्त्र असतात. डाह्लमधे अशीही बरीच शस्त्र असतात. पण बिलिबॉटनमधे ते शस्त्रं खरोखर वापरतात. तुम्ही इथेच थांबा. इथं सुरक्षित आहे."

"अजूनपर्यंत तरी," कॅसिलिया रागात म्हणाली, "ही जागा आपण पूर्णपणेच सोडून दिली पाहिजे. ते हीटसिंकर्स आजकाल कुठेही जात असतात." हे म्हणताना तिची रागीट नजर सेल्डनकडे वळली.

सेल्डनने विचारलं, "डाह्लमधे शस्त्र असतात म्हणजे काय म्हणायचंय तुला? शस्त्र बाळगण्याविरोधात कडक कायदे आहेत या संपूर्ण साम्राज्यात."

"ते माहीत आहे मलाही," टिसाल्वर उत्तरला, "आणि इथेही काही स्टन-गन्स, किंवा सायकिक प्रोब्स सारखी शस्त्र नाहीत. चाकू असतात." तो जरा ओशाळलेला.

डॉर्सने विचारलं, "टिसाल्वर, तुझ्याकडेही चाकू असतो?"

"माझ्याकडे?" त्याचा चेहरा भयाने जणू थरथरला, "मी शांतीप्रिय माणूस आहे, आणि हा भाग अगदी सुरक्षित आहे."

"घरात ठेवलेत एक दोन चाकू आम्हीही." कॅसिलिया फुसफुसत म्हणाली, "हा भाग सुरक्षित असल्याची तितकीशी खात्री नाही आम्हालाही."

"सगळ्यांकडेच असतात का चाकू?" डॉर्सने विचारलं.

"जवळपास सगळ्यांकडे असतात, मिस. वेनाबिली," टिसाल्वर म्हणाला, "तशी रीतच आहे. पण ते सर्वांना वापरावे लागतात असं काही नाही."

"पण बिलिबॉटनमधे मात्र चाकू प्रत्यक्ष वापरले जातात..." डॉर्स म्हणाली.

"कधीकधी. म्हणजे त्यांच्यात मारामाऱ्या झाल्या तर."

"आणि सरकार ते चालवून घेतं? म्हणजे मध्यवर्ती साम्राज्याचं सरकार हे चालवून घेतं?"

"कधीकधी ते बिलिबॉटनची स्वच्छता मोहीम करतात. पण चाकू काय... कुठेही लपवता येतात. शिवाय ती इथली परंपरा आहे. शिवाय मारणारे डाह्लाइट नि मरणारे पण डाह्लाइटच. सरकार काय पडलंय त्याचं एवढं... काहीच नाही."

"कुणी बाहेरचा माणूस यात मारला गेला तर?"

"ते बाहेर फुटलं तर सरकार जागं होईल कदाचित्. पण तिथे कसंय ना-कोणाला काही दिसत नाही, कोणाला काही ऐकू येत नाही. बाहेर काहीही कळू शकत नाही. सरकारी पोलीस कधीकधी नेहमीची कारवाई म्हणून काही लोकांना उचलतात. पण सिद्ध काहीच होत नाही. मग निष्कर्ष असा निघतो की चूक त्या बाहेरच्याचीच होती- गेला कशाला तिथे... त्यामुळे बिलीबॉटनला जाऊ नका. चाकू सोबत असला तरीही जाऊ नका."

सेल्डनने हट्टीपणे मान हलवली, "मी काही चाकू घेऊन जाणार नाही. मला काही चाकू हाताळता येत नाही नीटसा."

"मग सोप्पंय. मास्टर सेल्डन. भानगडीत पडू नका." टिसाल्वरने जरा कुर्ऱ्यातच मान झटकली, "दूर रहा."

"मला तेही जमणार नाही." सेल्डन म्हणाला.

डॉर्स त्याच्याकडे वैतागून रागाने पाहात पाहात टिसाल्वरला म्हणाली, "चाकू विकत कुठून मिळतील? की तुमचा चाकू द्याल आम्हाला?"

कॅसिलिया पटकन उत्तरली, "इथे कुणीही दुसऱ्या कुणाचे चाकू घेत नाही. तुमचे तुम्हाला विकत घ्यावे लागतील."

टिसाल्वर म्हणाला, "सगळीकडे मिळतात चाकू. चाकू विकणारी दुकानं तशी बेकायदा आहेत, तरीही असतातच. कुठल्याही वस्तूंच्या दुकानांत चाकू विकले जातात. बाहेरच्या शोकेसमधे वॉशिंग मशीन दिसलं की समजायचं इथे चाकू नक्की मिळणारच."

"आणि बिलिबॉटनला कसं जायचं?" सेल्डनने विचारलं.

"एक्स्प्रेसवेने." टिसाल्वरचं लक्ष डॉर्सच्या आठ्यांनी भरलेल्या कपाळाकडे गेलं आणि तो बावरलाच.

सेल्डनने विचारलं, "आणि एक्स्प्रेसवेपाशी पोहोचल्यानंतर?"

"पूर्व दिशेकडे जा. तिथे तुम्हाला सापडतील साइनबोर्ड्स. पण तुम्हाला जायचंच असेल तर मग-" टिसाल्वर चाचरत बोलू लागला, "तर मग मिस वेनाबिलींना नेऊ नका अजिबात. तिकडे बायकांना तर- काहीही होऊ शकतं. फारच वाईट."

"त्या नाही येणार." सेल्डन म्हणाला.

"स्पष्टच सांगतेय- त्या येणारच." डॉर्सच्या स्वरात थंड निर्धार होता.

६८-

वस्तूंच्या त्या दुकानाच्या मालकाच्या मिशा तरुणपणी असतील तेवढ्याच झुबकेदार होत्या. फक्त आता जरा पांढरे केस डोकावत होते. डोक्यावरचे केस मात्र

अजूनही काळेभोर होते. डॉर्सकडे लक्ष जाताच त्याने सहजच मिशीवरून ताव मारला.

तो म्हणाला, "तुम्ही डाह्लाइट नाही दिसत."

"हो, तरीही मला चाकू हवाय."

"चाकू विकणं बेकायदा आहे." तो म्हणाला.

डॉर्स म्हणाली, "मी काही पोलीस नाही किंवा कुठली सरकारी अधिकारी नाही. मला बिलीबॉटनला जायचंय."

तो विचारात पडून तिच्याकडे पाहात राहिला, "एकट्या?"

"माझ्या मित्राबरोबर." दुकानाबाहेर तोंड पाडून वाट पाहात उभ्या असलेल्या सेल्डनकडे तिने बोट दाखवलं.

"तुम्ही चाकू त्यांच्यासाठी घेताय?" तो सेल्डनकडे क्षणभर पाहात राहिला आणि मग निर्णय झाल्यासारखा उत्तरला, "तो ही तर बाहेरचाच आहे. त्याला आत येऊन करू द्या की खरेदी."

"तोही सरकारी माणूस नाही. आणि मी चाकू माझ्यासाठी घेतेय."

दुकानदाराने मान हलवत म्हटलं, "बाहेरचे लोक वेडेच असतात म्हणा. पण तुम्हाला खर्च करायचा असेल तर करा- मी कशाला धंदा सोडू!" तो खाली वाकला आणि त्याने एक लाकडी पट्टी काढली. तिला किंचितसा झटका सहजपणे देत त्याने तिच्यासमोर उघडलेलं पातं धरलं.

"याच्या पेक्षा लांबडा नाहीच का तुमच्याकडे?"

"बायकांसाठी तयार केलेला सर्वोत्तम चाकू आहे तो."

"मला पुरुषांसाठी केलेले चाकू दाखवा."

“फार जास्त जड चाकू तुम्हाला चालणार नाही. तुम्हाला चाकू चालवता येतो का?”

“शिकेन मी. आणि तो जड असला तरी चालेल मला. दाखवा मला पुरुषांचे चाकू.”

दुकानदार हसला, “बघायचाच असेल तर दाखवतो-” तो पुढे जाऊन एका कप्प्यावर वाकला आणि एक जाडजूड मुठीचा चाकू त्याने बाहेर काढला. तो त्याने किंचित झटकताच, एक भलामोठा खाटकाचा सुराच बाहेर आला. मुठीच्या बाजूने तो तिच्या हातात देताना तो किंचित हसत होता.

“तो तुम्ही कसा झटकलात ते परत एकदा दाखवा.” ती म्हणाली.

त्याने दुसरा चाकू बाहेर काढत तिला तो झटका दाखवला. त्याने सावकाश मूठ तिरकी करताच पातं बाहेर आलं. आणि पुन्हा तिरकी करताच पातं आत गेलं. “झटकायचं आणि मग दाबायचं.” तो म्हणाला.

“परत दाखवा, प्लीज.”

त्याने दाखवलं.

डॉर्स म्हणाली, “ठीक आहे. आता बंद करून माझ्याकडे फेका तो.”

त्याने तो हलकेच वर भिरकावला. तिने तो झटकन पकडला आणि परत दिला.

आणि म्हणाली ,”अधिक वेगाने.”

त्याने भुवया उंचावल्या, आणि तिला उसंत न मिळू देता, अचानक तिच्या डाव्या हाताकडे फेकला. तिने उजव्या हाताने पकडायचा प्रयत्नही केला नाही.

डाव्याच हाताने पकडला आणि दुसऱ्याच क्षणी चाकूचं पातं बाहेर निघालेलं आणि पुन्हा पुढच्या क्षणी नाहीसंही झालेलं. दुकानदाराने आ वासला.

“आणि हा तुमच्याकडचा सगळ्यात मोठा चाकू आहे?” ती म्हणाली.

“होय. हा वापरायला गेलात तर थकून जाल तुम्ही.”

“मी दीर्घ श्वास घेत राहीन नं. मला हा दुसराही द्या.”

“तुमच्या मित्रासाठी?”

“नाही. माझ्याचसाठी.”

“दोनदोन चाकू एकदम वापरणार तुम्ही?”

“दोन हात आहेत मला.”

दुकानदाराने सुस्कारा टाकला आणि म्हणाला, “मॅडम. तुम्ही बिलीबॉटनला जाऊ नये हेच बरं. ते बायकांचं काय करतात तुम्हाला कल्पना नाही.”

“अंदाज करू शकते. हे चाकू माझ्या पट्ट्यात कसे बसवायचे?”

“तुम्ही घातला आहे तो पट्टा चाकू बसवण्याचा. हवं तर दुसरा देतो.”

“त्यात दोन चाकू बसतील?”

“कुठेतरी डबलपट्टा असेल माझ्याकडे. पाहातो. एवढा खप नसतो त्याला.”

“मला हवाय.”

“तुमच्या मापाचा नसेल.”

“आपण कापून मापात करू, काहीतरी करू.”

“बराच महाग आहे तो.”

“माझ्या क्रेडिट टाईलला झेपेल.”

अखेर ती बाहेर पडली तेव्हा सेल्डन तोंड वाकडं करत म्हणाला, “केवढा मोठा धबाडा पट्टा आहे तो. कशीतरीच दिसते आहेस. विनोदी.”

“खरंच कां? बिलीबॉटनला तुझ्याबरोबर जायला योग्य अवतार नाही कां? चला, मग दोघं परत जाऊ घरी.”

“नको. माझा मी जाईन. मी एकटा गेलो तर कदाचित् जास्त सुरक्षित असेन.”

डॉर्स म्हणाली, “हे सगळं बोलून काही उपयोग नाही, हॅरी. आपण दोघे जायचंय किंवा दोघांनी घरी परतायचंय. कुठल्याही परिस्थितीत आपण वेगवेगळ्या दिशांना जाणार नाही.”

आणि मग तिच्या निळ्या डोळ्यांतला निर्धार, घट्ट मिटलेले ओठ आणि चाकूच्या पट्ट्यावर ठेवलेले हात बघून ती काही मागे हटणार नाही हे सेल्डन समजून चुकला.

“ठीक तर,” तो म्हणाला, “पण यातून तू वाचलीस आणि माझी नि ह्युमिनची पुन्हा भेट झालीच तर मी त्याला एक नक्कीच सांगणार आहे- की मी सायकोहिस्ट्रीवर काम करायचं असेल- तर तू मला कितीही प्रिय वाटत असलीस तरीही तुला यातून बाजूला करायचं- ही माझी किंमत असेल.”

आणि डॉर्स खुदकन हसली, “सोड सोड, तुझं स्त्रीदाक्षिण्य मला नको दाखवूस. मला कुणीही बाजूला करू शकत नाही. समजलं?”

69

बिलीबॉटनची निऑन साईन चमचमताना दिसली तेव्हा ते एक्स्प्रेसवे सोडून खाली उतरले. पुढे काय असणार त्याची जणू झलक म्हणून पुढच्याच क्षणी तिथले दिवे बंद पडले. आणि अगदी मंद असा एकच दिवा तिथे राहिला.

ते कारमधून उतरले आणि खालच्या वॉकवेवर उतरून चालू लागले. अजूनही टळटळीत दुपार होती. आणि प्रथमदर्शनी तरी बिलीबॉटन डाह्लमधल्या कुठल्याही भागासारखंच वाटत होतं.

पण हवेत कसलासा उग्र वास होता आणि वॉकवेवर भरपूर कचरा होता. या भागात कचरा उचलणारी यंत्रे क्वचितच येत असावीत. किंवा नाहीच.

वॉकवे जरी साधाच दिसत असला तरीही वातावरणात काहीसा तणाव होता. दडपून ठेवलेल्या स्प्रिंगसारखा.

कदाचित् तिथल्या लोकांमुळे असेल. तिथं चालणारे लोक काही फार कमी वा फार जास्त नव्हते. पण ते इतरत्र असलेल्या पादचाऱ्यांसारखे दिसत नव्हते याची सेल्डनने नोंद घेतली. सर्वसाधारणपणे असे कुठलेही पादचारी आपापल्या घाईत, कामाच्या विचारात मग्न असतात. ट्रॅन्टॉवरच्या अथांग, अपरिमित गर्दीत स्वतःला सांभाळायचं तर इतरांकडे मनाने दुर्लक्ष करून आपापल्या विश्वात मग्न रहाणं हेच शहाणपणाचं होतं. नजरा घरंगळत. मेंदू बंद होत. सगळ्यांचीच विचारविश्वं एक प्रकारच्या मखमली धुक्यात लपेटलेली असत- हेच एक कृत्रिम खाजगीपण शक्य होतं तिथे. आणि मग संध्याकाळी फिरायला जाण्याच्या ठिकाणी परिसरातील लोकांशी थोडंफार बोलणं हे मैत्रीचं कर्मकांडंही पाळलं जात असे.

पण इथे- बिलिबॉटनमधे, कुठेच मैत्रीचा भावही जाणवत नव्हता किंवा संपूर्ण उदासीनताही. निदान बाहेरून आलेल्यांसाठी तर नक्कीच नाही. समोरून किंवा मागून येणाराजाणारा प्रत्येकजण सेल्डन आणि डॉर्सकडे निरखून पाहून घेत होता. डोळ्यांची प्रत्येक जोडी जणू अदृश्य धाग्यांनी या दोघा परक्यांना वेढून घेत होती, आणि त्यांच्याबद्दल दुष्टावा दाखवत होती.

सगळ्याच बिलीबॉटनकरांचे कपडे विटके, मळके आणि अनेकदा फाटकेही होते असं लक्षात येत होतं. सगळ्या आसमंतावर जणू कळकट गरीबीचा थर जमलेला आणि सेल्डनला स्वतःच्या छानदार कपड्यांची जाणीव होऊन थोडं अस्वस्थच वाटू लागलं.

तो म्हणाला, "आता या बिलीबॉटनमधे मदर रिटा कुठे रहात असेल म्हणे?"

"मला नाही माहीत." डॉर्स म्हणाली, "तू आणलंस- तूच काय ते म्हणे. मी तुझं संरक्षण करण्याची जबाबदारी सांभाळते, त्यापलिकडे काही नाही. आणि ते करावंच लागेल असं दिसतंय."

सेल्डन म्हणाला, "मला वाटतं, कुणालातरी विचारावं लागेल आपल्याला. पण कुणालाही विचारावंसं वाटत नाहीये."

"तुझा दोष नाही. तुला कुणाचा पत्ता सांगायला कुणीही टुणकन उडी मारून तयार होण्याची शक्यता नाही."

"पण बघू- लहान पोरांचं काही सांगता येत नाही असं." त्याने हलकेच निर्देश केला. एक मुलगा- बारा वर्षांचा असेल नसेल- मिसरूड नक्कीच फुटली नव्हती त्याला- त्यांच्याकडे टक लावून पाहात जागच्या जागी थांबला होता.

"तुझा असा अंदाज आहे की या वयाच्या मुलाकडे इतरांबद्दलचा बिलिबॉटनियन छापाचा द्वेष अजूनतरी मुरला नसेल."

"काहीही असो," सेल्डन म्हणाला, "तो निदान बिलिबॉटनियन छापाची हिंसा तरी नक्कीच करू शकणार नाही, इतका तो लहानखुरा आहे अजूनतरी. आपण त्याच्या जवळ जाऊन विचारलं तो कदाचित् पळून जाईल आणि पुढे जाऊन मागे बघत शिव्याबिव्या देईल. पण निदान हल्ला तरी करणार नाही."

सेल्डनने जरा चढ्या सुरातच हाक मारली, “ए मुला,” तो मुलगा एक पाऊल मागे हटला आणि पुन्हा तसाच एकटक पाहात राहिला.

“इकडे ये बरं.” सेल्डन म्हणाला.

तो मुलगा उत्तरला, “कशाला?”

“मला पत्ता विचारायचाय. जवळ ये म्हणजे मला ओरडून बोलावं लागणार नाही.”

तो मुलगा दोन पावलं जवळ आला. त्याचा चेहरा धुळीने माखला होता. पण त्याचे डोळे मोठे पाणीदार होते, तेजतर्रार. त्याच्या पायांत दोन वेगवेगळ्या चपला होत्या. पॅन्टच्या एका पायावर भलं मोठं ठिगळ होतं.

त्याने विचारलं, “कसला पत्ता?”

“आम्ही मदर रिटाला शोधतोय.”

त्या मुलाचे डोळे लकाकले.

“कशासाठी?”

“मी अभ्यासक आहे. अभ्यासक म्हणजे काय माहीत आहे?”

“हां, शाळेत गेलेला?”

“तू नाही गेलास?”

तो बाजूला तोंड करत तुच्छतेने थुंकला- “छया.”

“मला मदर रिटाकडून सल्ला हवाय. मला तिथं नेलंस तर बरं.”

“तुला भविष्य सांगून हवंय? मी सांगतो. छानछान कपडे घालून तू बिलीबॉटनला येतोस... मी सांगतो- एकदम वाईट भविष्य आहे. वाईट्ट.”

“मुला, तुझं नाव काय?”

“तुम्हाला काय करायचंय?”

“जरा जास्त मैत्रीनं बोलू ना. म्हणजे तू मला मदर रिटाच्या घरी घेऊन जाशील. कुठे रहाते माहीत असेल ना तुला?”

“असेल किंवा नसेल. माझं नाव रॅच आहे. समजा मी तुम्हाला मदत केली तर मला काय फायदा?”

“तुला काय हवंय सांग.”

त्या मुलाची नजर डॉर्सच्या पट्ट्यावर स्थिरावली होती. “या बाईंकडे सुरे आहेत दोन. मला एक द्या, मी नेतो तुम्हाला रिटाकडे.”

“अरे हे सुरे मोठ्या माणसांसाठी आहेत. तू अजून खूप लहान आहेस.”

“मग मदर रिटा कुठे रहाते ते माझ्यासारख्या लहान मुलाला कसं माहीत असणार?”

आणि त्याची नजर वर झाली तेव्हा डोळ्यांवर आलेल्या केसांतूनही त्यातला कावेबाजपणा कळत होता. सेल्डन जरा अस्वस्थ झाला. उगीच गर्दी जमा व्हायला नको. आजुबाजूने जाणारे काही पुरुष थबकून पाहू लागलेच होते. काहीच झालं नाही तेव्हा ते पुढे चालू लागले. पण समजा या पोराला रागबिग आला आणि काहीतरीच बोलायला नाहीतर करायला लागला तर लोक नक्की गोळा होतील हे त्याला कळत होतं. सेल्डन हसला आणि म्हणाला, “रॅच तुला वाचता येतं?”

“छया! कुणाला वाचायचंय इथं?” तो पुन्हा थुंकला.

“तुला कॉम्प्युटर वापरता येतो?”

“बोलणारा कॉम्प्युटर ना- येतो की. कुणालाही येतो तो.”

“मला मी सांगतो. मला जवळच्या एखाद्या कॉम्प्युटर स्टोअरमधे घेऊन चल. तुला एक लहानसा कॉम्प्युटरच घेऊन देतो. सॉफ्टवेअरही घेऊन देतो. तुला काही दिवसांतच वाचता येऊ लागेल.” सेल्डनला वाटलं या ऑफरने निमिषार्ध रॅचचे डोळे लकाकले, पण दुसऱ्याच क्षणी त्याची मुद्रा कठोर झाली.

“नाही, सुरा द्या, नाही तर काहीच नको.”

“तेच तर सांगतोय मी. तू वाचायला शीक. कुणालाही सांगू नकोस. लोकांना एकदम आश्चर्याचा धक्का दे. मग कधीतरी कुणाशी तरी पैज लाव तुला वाचता येतंय अशी. पाच क्रेडिट्सची पैज. अश्शी पैज जिंकशील. की मग त्या पैशातून तुला हवा तो चाकू घे.”

तो पुन्हा जरासा विचारात पडला, पण म्हणाला, “छे. माझ्याशी कोण पैज लावणार. कुणाकडे पैसा आहे.”

“बघ, तुला वाचता आलं तर सुऱ्यांच्या दुकानात तुला नोकरीच मिळेल. पगार वाचवलास तर कमी किंमतीत हवा तो चाकू घेता येईल की तुला, हो की नाही?”

“कधी घेऊन देणार तुम्ही मला कॉम्प्युटर?”

“आत्ताच घेणार. लगेच विकत घेतो. आणि मदर रिटाशी भेट झाली की तुला तो देऊन टाकणार.”

“पैसे आहेत तुझ्याकडे?”

“कार्ड आहे.”

“बघू या तरी खरंच घेतोयस का ते.”

व्यवहार पुरा होताच तो त्या दिशेने झेपावला. पण सेल्डनने तो पटकन खिशात टाकला.

"रॅच, आधी तू मला मदर रिटाकडे घेऊन जायचं. तुला नक्की माहीत आहे ना पत्ता?"

रॅचने तोंडावर तुच्छतेचे भाव आणत म्हटलं, "हो हो माहीत आहे. फक्त तिथे पोहोचल्यावर माझ्याकडे द्या तो. नाही तर माझ्या ओळखीच्या काही लोकांना तुझ्यावर आणि या बाईंवर सोडेन मी. सावध रहा."

"आम्हाला धमक्या देण्याची गरज नाही." सेल्डन म्हणाला, "आम्ही आमच्याकडून दिलं वचन पाळू."

रॅच त्यांना भराभर पुढे नेऊ लागला. चौकस नजरांसमोरून ते पुढे जात राहिले. सेल्डन चालताना गप्पच होता, डॉर्सही गप्प होती. मात्र डॉर्स स्वतःच्या विचारात वगैरे मग्न नव्हती. ती आजुबाजूच्या लोकांची सतत नोंद घेत होती. समोरून येणाऱ्या प्रत्येकाच्या नजरेला तिची जरबेची नजर भिडत होती. क्वचित त्यांच्या पाठून पावलं वाजली की ती मागे वळून कठोर नजरेने पाहात होती. मग रॅच म्हणाला, "इकडून या, ती रस्त्यात नाही रहात बरं." ते त्याच्या मागोमाग एका अपार्टमेन्ट कॉम्प्लेक्समधे शिरले. सेल्डनने आधी ठरवलं होतं की रस्ता कुठंकुठं वळतो ते लक्षात ठेवायचं, पण काही वळणांतच तो सगळं विसरला.

"तुला या गल्ल्यांच्या गुंत्यातून कसा काय रस्ता सापडतो बाबा, रॅच?"

"लहानपणापासून इथेच भटकत आलोय." तो म्हणाला, "शिवाय या अपार्टमेन्ट्सना नंबर घातलेत ना. काही ठिकाणी मोडून गेलेत- पण शिवाय बाणबिण काढलेत कुठेकुठे. काही युक्त्या माहीत असल्या की सापडतो रस्ता." रॅचला सगळ्या युक्त्या ठाऊक असाव्यात. ते आणखी आणखी आतवर शिरत गेले.

सगळ्या परिसरावर एक अवकळा होती. पडझड होती. ढिगारे पडलेले. तिथले रहिवासी त्यांच्या शेजारून जाताना त्यांच्याकडे तिरस्काराने पाहात होते- डॉर्स आणि सेल्डन दोघांनींही त्यांच्या राज्यावर जणू आक्रमण केलं होतं.

द्वाड पोरटी काहीबाही खेळ खेळत इकडून तिकडे धावत होती.

“ओ, बाजू व्हा-” डॉर्सला कुणाचा तरी चेंडू लागतालागता राहिला तेव्हा ते पोर किंचाळलं.

अखेर रॅच एका अंधाऱ्या दारासमोर थांबला. मोडकळीला आलेल्या त्या दारावर २७८२ आकडा अंधुकसा दिसत होता.

“इथंच रहाते ती.” रॅचने हात पुढे केला.

“आधी आत कोण आहे ते तर पाहू दे.” सेल्डन हलकेच म्हणाला. त्याने दारावरचं बटण दाबलं, पण घंटा वाजली नाही.

“ते बंद पडलंय. जोरात दार वाजवा. जोरात. तिला नीट ऐकायला येत नाही.”

सेल्डनने दारावर दोनतीनदा मूठ आपटली, आणि आतून हालचाल झाली. एक किनरा आवाज आला, “कुणाला काम पडलं मदर रिटाशी?”

सेल्डन उत्तरला, “दोन अभ्यासक.” त्याने तो छोटासा कॉम्प्युटर आणि सॉफ्टवेअरचं छोटं पॅक रॅचकडे फेकलं. त्याने हसत झडप घातली आणि तो पटकन पळाला. दार उघडलं. मदर रिटा दारात उभी होती.

## ६९

मदर रिटाने सत्तरी ओलांडलेली असावी, पण प्रथमदर्शनी तसं वाटायचं नाही. गुबगुबित गाल, छोटीशी जिवणी आणि डबल हनुवटी. जाडी बुटकीशी होती ती. दीड मीटरच्या आतच जेमतेम असेल. पण तिच्या डोळयांभोवती सुरकुत्या होत्या आणि त्यांना पाहून ती हसली तेव्हा त्या सुरकुत्यांचं जाळं चेहराभर पसरलं. तिला हालचाल करायला कष्ट पडत होते.

“या, या, आत या.” तिचा आवाज मऊ होता पण जरा वरच्या पट्टीतलाच. डोळे बारीक करून पाहात होती म्हणजे नीट दिसत नसावं. “बाहेरचे लोक, बाहेरच्या जगातले लोक, बरोबर ना? तुम्हाला ट्रॅन्टरचा वास लागलेला दिसत नाही.”

वास... सेल्डनच्या नाकात त्या जागेचा वास घुसला. त्या अपार्टमेन्टमधे अपार पसारा होता. सगळया छोट्यामोठ्या वस्तू धुळकटलेल्या. काहीतरी आंबून पडल्यासारखा शिळया अन्नाचा दर्प घरभर पसरला होता. इथून निघाल्यावर आपल्या कपड्यांनाही हाच वास लागलेला असेल असं सेल्डनच्या मनात आलं.

“बरोबर, मदर रिटा, मी हेलिकॉनहून आलो आहे- नाव हॅरी सेल्डन. आणि या माझ्या सहकारी, वेनाबिली सिन्नामधून आल्या आहेत.”

“हं तर-” ती इकडेतिकडे बघू लागली. त्यांना बसण्यायोग्य जागा शोधत असावी, पण तशी जागाच नव्हती. डॉर्स म्हणाली, “मदर, आम्ही उभे राहू, चालेल आम्हाला.”

“काय?” ती डॉर्सकडे पाहात म्हणाली, “जरा मोठ्याने बोल हं, बेटा. आता पहिल्यासारखं नीट ऐकू येत नाही.”

“हिअरिंग एड का नाही वापरत?” सेल्डनने मोठ्याने विचारलं.

“काही उपयोग नाही, मास्टर सेल्डन. नसांवरच परिणाम झालाय. आणि नसांवरचे उपचार करून घ्यायला पैसा नाही मजजवळ. -तर तुम्ही भविष्य जाणून घ्यायला आला आहात ना?”

“नाही…” सेल्डन म्हणाला, “मी भूतकाळ जाणून घ्यायला आलो आहे.”

“फारच छान. लोकांना काय ऐकायला हवंय हे ठरवणं म्हणजे तापच असतो.”

“कलाच असणार ती एक.” डॉर्स स्मित करत म्हणाली.

“सोपं वाटतं, पण ते खऱ्यासारखं वठवणं कठीण असतं. मी जी फी लावते ती वसूल झाल्यासारखं वाटलं पाहिजे.”

“तुमच्याकडे खातं असेल तर,” सेल्डन बोलू लागला, “मी योग्य तो मोबदला देईनच. आम्हाला पृथ्वीबद्दल माहिती हवीच- पण आम्हाला काय ऐकायचंय याचा विचार करून बाता मारायच्या नाहीत. सत्य काय आहे तेवढंच जाणून घ्यायचंय आम्हाला.”

एवढा वेळ इकडेतिकडे फिरून बारीकसारीक आवराआवर करण्याचा प्रयत्न करणारी ती म्हातारी टक्कन थबकली.

“काय जाणून घ्यायचंय तुम्हाला पृथ्वीबद्दल?”

“पृथ्वी म्हणजे काय? इथून सुरुवात.”

ती वळली आणि तिची नजर जणू अवकाशात भिरभिरू लागली. ती बोलू लागाली तेव्हा तिचा आवाज खाली गेलेला आणि अगदी शांत होता, “एक जग आहे ते. खूप जुना ग्रह. विस्मरणात गेलेला, हरवून गेलेला.”

डॉर्स म्हणाली, “इतिहासात कुठेही नोंद नाही अशी. एवढं तर आम्हाला माहीत आहे.”

“इतिहास सुरू होण्याच्या आधीची गोष्ट आहे ही, बेटा,” मदर रिटा गंभीरपणे बोलत होती. दीर्घिकेच्या पहाटवेळेची गोष्ट- पहाटेच्याही आधीची. तेव्हा ते एकच जग अस्तित्वात होतं. त्या एकाच जगात मानवी अस्तित्व होतं.” तिने आपल्या बोलण्यावर जोर द्यायला मानेला झटका दिला.

“पृथ्वीला दुसरंही काही नाव होतं का- ऑरोरा?”

मदर रिटाच्या कपाळावर हजार आठ्या पडल्या. “हे कुठे ऐकलंत?”

“माझ्या भटकंतीत. एका फार प्राचीन- आता विस्मरणात गेलेल्या जगात- ऑरोरा नाव होतं त्याचं- मानववंश अगदी आदिम अशा शांतीत जगत होता, असं ऐकलं होतं मी.”

“खोटंय हे.” तिने तोंड पुसून आत्ता ऐकलं त्याची चव पुसल्यासारखं केलं. “तू आत्ता जे नाव घेतलंस ना, ते नाव फक्त एक अगदी दुष्ट जागा म्हणूनच घेण्यासारखं आहे. तिथूनच साऱ्या दुष्टाव्याची सुरुवात झाली. हे पाप आलं त्याआधी पृथ्वीचं जग एकटंच होतं- थोडी भावंडंही होती पृथ्वाला. या दुष्टग्रहाने पृथ्वीला नष्ट करायचा प्रयत्न केला, पण पृथ्वी लढली आपल्या वीरांनिशी, आणि या दुष्टग्रहाला नष्ट केलं तिने.”

“पृथ्वी या दुष्टग्रहाच्या आधीपासून होती, खात्री आहे तुझी?”

“खूप आधीपासून. हजार नव्हे, लक्षलक्ष वर्षे आधीपासून पृथ्वी या दीर्घिकेत एकटीच होती.”

“लक्षलक्ष वर्षं? मानववंश दुसऱ्या कोणत्याही जगात माणसं असण्याआधीपासून- लक्षावधी वर्षे आधीपासून होता?”

“हो हेच खरंय, हेच आणि हेच खरंय.”

“पण हे तुला कसं माहीत? हे कुठल्या कॉम्प्युटरमधे नोंदलंय? किंवा काही कागद आहे छापलेला? काही वाचायला मिळू शकेल याबद्दल?”

मदर रिटाने मान हलवली, “मी या प्राचीन जगाच्या कहाण्या माझ्या आईकडून ऐकल्या, तिने तिच्या आईकडून- तिने तिच्या, तिने तिच्या... मला काही मुलं नाहीत, त्यामुळे मी इतरांना सांगते या गोष्टी. पण ते सगळं संपणार. आजकाल कुणी कशावर विश्वास ठेवत नाही.”

डॉर्स म्हणाली, “असं नाही, मदर, अनेक लोक प्राचीन काळाचा अंदाज बांधत असतात. जुन्या जगांच्या कथाकहाण्यांचा अभ्यास करत असतात.”

मदर रिटाने हवेतच हात फिरवून ते उडवून लावल्यासारखं केलं. “ते या सगळ्याकडे अगदी थंडपणे पाहातात. अभ्यास म्हणे. मग ते सगळं आपल्या मनातल्या कल्पनांच्या चौकटीत दामटून बसवू पाहातात. मी तुला एक अख्खं वर्षभर बा-ली नावाच्या नायकाच्या गोष्टी सांगू शकते. पण तुला वेळ कुठून असणार त्या ऐकायला- आणि माझ्यात आता सगळं सांगत बसायची ताकदही उरलेली नाही.”

सेल्डन म्हणाला, “तू कधी रोबॉट्सबद्दल ऐकलंयस काही?”

ती थकलेली म्हातारी शहारली. जरा किंचाळूनच बोलली, “तू कशासाठी असले प्रश्न विचारतो आहेस? ते कृत्रिम मानव होते. मूर्तीमंत पाप. दुष्ट ग्रहांचं काम. नष्ट झाले ते पूर्णपणे. आणि त्यांचं नावही काढू नये आपण.”

“पण एक रोबॉट असा होता ना- सारं दुष्ट जग त्याचा द्वेष करायचं असा एक?”

मदर रिटा तोल सावरत सेल्डनजवळ गेली, आणि तिने त्याच्या डोळ्याला डोळा भिडवला. तिचा उष्ण श्वास त्याला चेहऱ्यावर जाणवला. “तू काय माझी चेष्टा

करायला आला आहेस? तुला सगळं माहीत आहे, तरीही विचारतोस? कशासाठी विचारतोस?"

"कारण मला माहिती हवी आहे."

"पृथ्वीला मदत करणारा एक कृत्रिम मानव होता. त्याचं नाव डा-नी, बा-ली चा मित्र होता तो. तो मेला नाही कधी. आहे तो कुठेतरी- वाट पाहातोय योग्य वेळी परतण्याची. कधी ते सांगता येणार नाही कुणालाच. पण येईल तो कधीतरी, प्राचीन काळाची सुखशांती पुन्हा आणील. सगळं क्रौर्य, अन्याय आणि दुःख दूर करेल. हे नक्की." आणि तिने डोळे मिटून घेतले, काहीतरी आठवत असल्यासारखं तिच्या मुद्रेवर स्मितहास्य पसरलेलं...

सेल्डन थोडा वेळ शांत बसून राहिला. मग सुस्कारा सोडत म्हणाला, "थँक्यू, मदर रिटा. खूप मदत केलीस तू. किती फी द्यायची तुझी?"

"बाहेरच्या जगातल्या लोकांना भेटून किती बरं वाटतं," ती उत्तरली, "दहा क्रेडिट्स. काहीतरी खायला आणू का तुमच्यासाठी?"

"नको नको." सेल्डन मनापासून म्हणाला, "वीस क्रेडिट्स घे. आता फक्त परत एक्स्प्रेसवेला कसं जायचं ते जरा सांग. आणि मदर रिटा, तू जर या तुझ्या पृथ्वीच्या गोष्टी सीडीवर टाकल्यास तर मी तुला आणखी चांगले पैसे देईन."

"बरीच ताकद खर्ची पडेल माझी. किती देशील?"

"किती सविस्तर असतील गोष्टी त्यावर अवलंबून आहे. किती चांगल्या सांगितल्या असतील त्यावरही अवलंबून आहे. मी हजार क्रेडिटपर्यंत देईन."

मदर रिटाने लालचावून ओठांवरून जीभ फिरवली, "हजार क्रेडिट्स? पण माझी गोष्ट सांगून झाली की तुला शोधू कुठे मी?"

"मी माझा कॉम्प्युटर कोड नंबर देऊन ठेवतो ना, त्याच्यावर निरोप दे."

ते बाहेर पडले आणि गल्लीत आले तेव्हा तुलनेत जरा स्वच्छ हवेत त्यांना बरंच बरं वाटलं. मदर रिटाने दाखवलेल्या दिशेने ते झपझप चालू लागले.

७०-

डॉर्स म्हणाली, “फार काही लांबली नाही ही मुलाखत, हॅरी.”

“तिथं फार वेळ काढणं अवघड होतं, आणि तशी पुरेशी माहिती मिळाली मला. या लोककथा, दंतकथा कशा फुगत जातात ते पाहाणं मोठं नवलाचं असतं.”

“फुगत? म्हणजे?”

“ते मायकोजेनियन्स आपल्या ऑरोरावर शतकानुशतकं जगणारे मानव असल्याचं सांगतात. डाह्लाईट्स आपल्या पृथ्वीवर लक्षलक्ष वर्षे टिकून असलेला मानववंश असल्याचं सांगतात. आणि दोघेही कुणा अमर अशा रोबॉटबद्दल सांगतात. तरीही – विचार करायला भाग पाडणाऱ्या गोष्टी आहेत या.”

“लक्षावधी वर्षांपूर्वी म्हटल्यानंतर अखेर थोडी- आपण कुठे चाललोत?”

“मदर रिटाने सांगितलंय की या दिशेने पुढे जात रहायचं. मग एक रेस्ट एरिया येईल. मग बुलेव्हारची पाटी दिसली की डावीकडून त्या पाट्यांसोबत जात रहायचं. आपल्याला येताना कुठला रेस्ट एरिया लागला होता का?”

“आपण आलो तो रस्ता वेगळा होता बहुतेक. मला तरी असा काही रेस्ट एरिया आठवत नाही- पण माझं लक्षही नव्हतं. माझं सगळं लक्ष वाटेतल्या लोकांवर होतं आणि...” तिचा आवाज घरंगळला. पुढे दिसणाऱ्या गल्लीच्या दोन्ही बाजू रुंदावलेल्या दिसत होत्या. सेल्डनला आठवलं. इथून गेलो होतो आपण. दोन्ही बाजूंच्या कडांवर मोडक्या सोफ्यांच्या गाद्या पडल्या होत्या.पण आता डॉर्सला येणाराजाणारांकडे लक्ष ठेवायची गरज नव्हती. रस्त्यात कुणीच नव्हतं. फक्त जरा पुढे

काही माणसं घोळका करून उभी होती. डाह्लाईट्सच्या मानाने सगळेच जरा आडदांड दिसत होते. झुबकेदार मिशावाले पुरुष. त्यांचे उघडे पिळदार दंड रस्त्यावरच्या पिवळट दिव्यांच्या प्रकाशात चमकत होते. ते अर्थातच या बाहेरच्या जगातल्या लोकांचीच वाट पाहात उभे होते. सेल्डन आणि डॉर्स आपोआपच थबकले. क्षण दोन क्षण सगळं सुन्न होतं. सेल्डनने पटकन मागे वळून पाहिलं. मागेही दोघेतिघे अवतीर्ण झाले होते. सेल्डन दात रगडत उद्गारला, "आपणम फसलोत, तुला उगीच आणलं मी सोबत, डॉर्स."

"उलट आहे. याचसाठी तर मी इथे आले आहे- पण मदर रिटाला भेटणं उपयोगी होतं का?"

"यातून सहीसलामत बाहेर पडलो तर नक्कीच उपयोगी होतं म्हणेन." सेल्डन सावकाश पुढे गेला आणि खंबीर स्वरात म्हणाला, "आम्ही पुढे जाऊ का?"

त्यांच्यातला एकजण एक पाऊल पुढे आला. सेल्डनच्याच उंचीचा होता तो. पण रुंद खांदे आणि पिळदार यष्टीमुळे धिप्पाड वाटत होता. पण पोटाचा घेर जरा जास्तच होता हे सेल्डनने पाहून ठेवलं.

"माझं नाव मॅरन." तो स्वतःवरच खूष असल्यासारखा बोलला- जणू हे नाव म्हणजे सर्वज्ञात होतं. "आणि मी इथे आलोय ते तुम्हाला सांगायला, की आम्हाला बाहेरच्या जगातली माणसं इथे आलेली आवडत नाहीत. आलात ते आलात. पण बाहेर पडायचं असेल तर पैका मोजावा लागेल."

"बरं. किती?"

"जे आहे ते सगळं. तुम्हा श्रीमंतांकडे क्रेडिट टाईल असतात ना- द्या त्या माझ्याकडे."

"नाही."

“नाही म्हणण्यात काही पॉइंट नाही. आम्ही त्या घेऊच.”

“त्या घेण्यासाठी तुम्हाला मला मारावं लागेल, किंवा मला इजा करावी लागेल. आणि त्या क्रेडिट टाईल्स माझ्या नॉर्मल आवाजाशिवाय चालणार नाहीत.”

“असं काही नाही बरं का, महोदय, बघा मी किती विनम्रपणे बोलतोय. तुम्हाला फारशी दुखापत न करता आम्ही त्या काढून घेऊ शकतो.”

“कितीजणांशी लढणार आहात तुम्ही? नऊ? नाही.”

सेल्डन स्वतःशीच माणसं मोजत होता- “दहा.”

“एकच. मी.”

“मदत नाही घेणार?”

“फक्त मी.”

“ठीक. तुम्ही सगळे जरा बाजूला व्हा. आम्हाला जागा द्या. मॅरन, प्रयत्न करून पहा,चल.”

“तुमच्याकडे सुरा नाहीये, महोदय. हवाय?”

“नको. तू वापर तुझा- मी नाही वापरणार. म्हणजे मारामारी समसमान होईल.”

मॅरन इतरांकडे पाहात म्हणाला, “अरे हे मरतुकडं बिन्धास्तै. घाबरल्यासारखंही वाटत नाहीये. मस्तंय हे. त्याला इजा करायला नको वाटते बे. पण हे बघा महोदय. मी या पोरीला घेणार. आणि मला थांबवायचं असेल तर दोघांनी आपापली कार्डं द्यायची, आवाज वापरून ती चालू करायची. नाही म्हणलास, तर मग- या पोरीचं काय ते करून झालं माझं- जरा वेळ घेईन बरं का त्याला – तो हसला- आणि मग तुला चांगलाच घेईन. वाट लावेन.”

“नाही.” सेल्डन म्हणाला, “बाईंना जाऊ देत. मी तुला आव्हान दिलंय- एकास एक लढतीचं. तुझ्याकडे चाकू आहे. माझ्याकडे नाही. तुला आणखी हवं तर मी दोघांशी लढतो. पण बाईंना जाऊ देत.”

“हॅरी, थांब,” डॉर्स ओरडली, “त्याला मी हवी असेन तर येऊ दे त्याला माझ्याकडे. तू आहेस तिथेच थांब, हॅरी. हलू नकोस.”

“ऐकलं का बाबा?” मॅरन खिदळत म्हणाला, “तू तिथंच थांब बॅरी, हलू नकोस. मला वाटतं या छोकरीला मी हवाय. ऐ, तुम्ही दोघं सांभाळा त्याला.”

सेल्डनचे दोन्ही हात जणू लोखंडी पकडीत सापडले होते. आणि त्याच्या पाठीला सुऱ्याचं तीक्ष्ण टोक रुपलं. “हलू नको,” त्याच्या कानात एक चरचरीत आवाज कुजबुजला, “आणि बघायला हरकत नाही. या बाईंना मजा येणार आहे. मॅरन एकदम तरबेज आहे यात.”

डॉर्स पुन्हा एकदा त्याला म्हणाली, “हलू नकोस, हॅरी.” मग ती वळली, आणि मॅरनकडे बारीक नजरेने पाहू लागली. तिचे हात तिच्या कंबरेच्या पट्ट्यावर अर्धवट टेकलेले. तो तिच्याकडे पाहात सावकाश जवळ गेला. तो हाताच्या अंतरावर येईपर्यंत स्थिर उभी होती ती- आणि झटक्यात तिचे हात हलले त्यासरशी मॅरनच्या तोंडासमोर दोन भले मोठे सुरे आले होते.

क्षणभर तो मागे झुकला, आणि मग खदाखदा हसू लागला.

“छोकरीकडे दोनदोन सुरे आहेत. तगड्या पोरांकडे असतात तसले हां. आणि माझ्याकडे एकच. पण ते योग्यच आहे.” त्याने आपला सुरा बाहेर काढला, “तुझ्यावर वार करायला जिवावर येतं गं पोरी, कारण तसं करावं लागलं नसतं तर जास्त मज्जा आली असती आपल्याला दोघांनाही. त्यापेक्षा असं करतो, तुझ्या हातातले हे सुरे उडवून लावतो, काय?”

डॉर्स म्हणाली, “मला तुला ठार मारायचं नाहीये. शक्यतो नाहीच मारणार मी. पण तरीही सगळ्या साक्षीदारांना सांगून ठेवते, तुला मी ठार केलंच तर केवळ माझ्या मित्राला वाचवण्यासाठीच- ते तर माझं कर्तव्य आहे.”

मॅरनने घाबरल्याचं नाटक केलं, “ओः, कृपा कर माझ्यावर, मला ठार मारू नको, पोरी,” आणि मग पुन्हा तो हसत सुटला. बाकीचे डाह्लाईट्ससुद्धा खिदळू लागले.

मॅरनने सुरा उगारत झेप घेतली, पण तो तिच्यापासून दूरच गेला. त्याने परत प्रयत्न केला- परतपरत त्याने तोच प्रयत्न केला. पण डॉर्स एक तसूभरही जागची हलली नाही. तिच्यावर जोवर खऱ्या अर्थाने त्याने वार केला नव्हता तोवर तिने कसलीही हालचाल केली नाही. मॅरनच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. तिने घाबरून काहीतरी हालचाल करावी असा त्याचा डाव होता, पण चित्र उभं राहिलं की त्याचा वार चुकतोय. त्याची पुढची झेप थेट तिच्यावर होती, आणि डॉर्सच्या डाव्या हातातलं पातं सर्र्रकन पुढे आलं आणि त्याच्या पात्यावर जोरात आपटलं. त्याचा हात हिसका खाऊन मागे गेला. त्याच्या उजव्या हातातला सुरा उलटा फिरला आणि त्याच्या टीशर्टला तिरकं कापत गेला. एक बारीक रक्ताची रेघ उमटत गेली. मॅरन आश्चर्यचकित होऊन स्वतःकडे बघत राहिला. बाकीचे बघेही सर्द झाले. सेल्डनच्या भुजांवरची पकड थोडी सैलावली. समोर जे काही घडलं होतं ते त्यांच्या अपेक्षेप्रमाणे नव्हतं त्यामुळे ते दचकले होते. सेल्डनही जरासा ताठरला. आता मॅरन पुन्हा तिच्या अंगावर गेला आणि या वेळी त्याने तिचं उजवं मनगट आपल्या डाव्या हाताने पकडायचा प्रयत्न केला. पुन्हा डॉर्सच्या डाव्या हातातला सुरा त्याच्या सुऱ्यावर आदळला आणि तिने तो तिथंच घट्ट अडवून धरला- आणि तेवढ्यात तिचा उजवा हात वळला आणि मॅरनने तिचं मनगट पकडायचा प्रयत्न करताच त्याच्या हातात

सुऱ्याचं पातंच आलं. त्याच्या हाताचा तळवा कापला गेला होता. डॉर्स एकच उडी घेऊन मागे सरकली आणि मॅरनला आपल्या छातीवरच्या, हातावरच्या रक्ताची जाणीव झाली. तो कसाबसा ओरडला, "कुणीतरी मला एक सुरा द्या, फेका इकडे." क्षणभर सगळेच चाचरले असावेत. मग कुणी एकाने त्याच्याकडे सुरा फेकला. मॅरनने तो पकडण्याचा प्रयत्न केला, पण डॉर्स त्याच्यापेक्षा चपळ होती. तिच्या उजव्या हातातला सुरा त्या भिरकावलेल्या सुऱ्यावर खण्णकन आदळला आणि तो सुरा गरगरत मागच्या मागे फेकला गेला. आपल्या हातांवरची पकड आणखी सैल झाल्याचं सेल्डनला जाणवलं. त्याने झटकन हात वर करत सोडवून घेतले आणि मोकळा झाला. त्याला धरून ठेवणारे दोघे आरोळी ठोकून त्याच्यावर झेपावले पण त्याने एकाच्या दोन पायांमध्ये गुडघा मारला आणि दुसऱ्याच्या पोटात कोपरा मारला. दोघेही कळवळून खाली पडले. त्याने खाली बसून दोघांचेही सुरे हिसकावून घेतले आणि डॉर्ससारखाच दोन्ही हातांत सुरे धरून उभा ठाकला. डॉर्ससारखं कौशल्य त्याच्याकडे नाही हे त्या डाह्लाईट्सना माहीत नव्हतं हे त्याला माहीत होतं. डॉर्स म्हणाली, "त्यांना फक्त दूर ठेव. हल्ला करू नकोस. -मॅरन, माझा पुढचा वार केवळ चाटून जाणारा नसेल."

मॅरन संतापाने वेडावलेला. तो काहीतरी निरर्थक शब्द किंचाळला, आंधळयासारखा तिच्यावर धावला- आपल्या वजनानेच तिला चिरडून टाकू असं काहीतरी त्याला वाटत होतं. डॉर्सने त्याला सहज चुकवत त्याच्या उजव्या हाताखालून झेप घेतली. तिने त्याच्या उजव्या पायाच्या घोट्यावर लाथ मारताच तो खालीच कोसळला आणि त्याचा एक सुराही दूर उडून पडला.

मग तिने गुडघ्यावर टेकत त्याच्या मानेवर एक सुरा टेकवला आणि दुसरा त्याच्या गळयावर टेकवला. आणि म्हणाली, "शरण ये!" आणखी एक आरोळी देत

मॅरनने तिला एका हाताने बाजूला ढकललं, पण त्याला उभं रहाणं शक्य होण्याआधीच तिने पुन्हा एकदा त्याच्यावर वार केला. या वेळी तिचा सुरा लखलखून त्याच्या मिशीवर उतरला. हात तोंडावर धरत तो जखमी जनावरासारखा विव्हळत ओरडू लागला. त्याने हात बाजूला करून पाहिला तेव्हा त्याच्या नाकाखालून रक्ताची धार लागली होती.

डॉर्स ओरडून बोलली, "मॅरन, आता परत कधीच वाढणारा नाही तुझी मिशी. थोडा ओठही गेलाय तिच्यासोबत. परत एकदा हल्ला केलास तर मरशील फुकट."

ती थांबून राहिली. पण मॅरनचा जोश आता गळाला होता. तो ओरडत, विव्हळत, रक्त सांडत, धडपडत चालता झाला. डॉर्स इतरांकडे वळली. सेल्डनने पाडलेले दोघे अजूनही तिथंच कळवळत पडून होते. निःशस्त्र असल्यामुळे त्यांची उठण्याची इच्छाही नव्हती. ती वाकली आणि हातातल्या सुऱ्याने तिने त्यांच्या कंबरेचे पट्टे कापून टाकले, मग त्यांच्या पॅन्ट्स फाडून टाकल्या. "आता तुम्हाला पॅन्ट हाताने सावरत चालत जावं लागेल," ती म्हणाली.

मग तिथे अजूनही उभ्या असलेल्या, तिच्याकडे नजर खिळवून पाहाणाऱ्या, भयकंपित अशा सात जणांवरून करडी नजर फिरवत ती म्हणाली, "आणि तुमच्यापैकी सुरा कुणी फेकला होता?" कुणीच उत्तर दिलं नाही.

ती म्हणाली, "मला काही फरक पडत नाही. एकेकाने या किंवा सर्वांनी मिळून या. पण प्रत्येक घावात कुणीतरी मरेल हे लक्षात ठेवा." आणि सगळे एकसाथ पाठ दाखवत पळत सुटले. डॉर्सने भुवया उंचावत सेल्डनला म्हटलं, "या वेळी तरी ह्युमिनला तक्रारीला जागा नाही, की मी तुझं रक्षण करू शकले नाही."

“मी जे काही पाहिलं त्यावर माझा अजूनही विश्वास बसत नाहीये. तुला हे असं काही जमतं हे मला माहीतच नव्हतं.” डॉर्स किंचित हसत म्हणाली, “तुझ्याकडेही कलाकारी आहे की. चांगली जोडी आहे आपली. चला. ती सुऱ्यांची पाती बंद कर आणि ठेव खिशात. मला वाटतं ही बातमी आता भराभर पसरणार आहे आणि आपल्याला बिलीबॉटनच्या बाहेर पडण्यात काहीही अडचणी येणार नाहीत.” अगदी बरोबर होता तिचा अंदाज.

१५

# गुप्त कामगिरीवर

डॅवान- पहिल्या वहिल्या दीर्घिकाव्यापी साम्राज्याच्या उतरणीच्या काळातील अखेरच्या शतकांत असंतोषाचे काही उगमबिंदू दिसू लागले. राजकीय आणि लष्करी नेत्यांमध्ये सर्वोच्च सत्तेसाठी चढाओढ सुरू झाल्यामुळे हा असंतोष अधिकाधिक स्पष्ट होऊ लागला- खरं तर सर्वोच्च सत्तेचे महत्त्व येणाऱ्या प्रत्येक दशकासरशी ओहोटीलाच लागले होते. सायकोहिस्ट्रीचा विकास होण्यापूर्वी, क्वचितच कुठेतरी खरोखरची जनआंदोलने दिसत होती. याच संबंधातील एक उदाहरण होते डॅवानचे- यासंबंधी काही ठोस माहिती नाही मिळत, पण याची भेट हॅरि सेल्डनशी झाली असावी असा अंदाज आहे. जेव्हा-

दीर्घिका ज्ञानकोष

७१-

हॅरी सेल्डन आणि डॉर्स वेनाबिली दोघांनी बराच वेळ आंघोळ केली. टिसाल्वरच्या घरी जी काय प्राथमिक सोय होती तिचा पुरेपूर वापर करत अगदी घासघासून आंघोळी केल्या. कपडे बदलून ते दोघे सेल्डनच्या खोलीत बसले होते, तेवढ्यात जिराड टिसाल्वर कामावरून परत आला आणि त्याने अगदी हलकेच घाबरतघाबरतच त्यांचं दार वाजवलं. त्याला फार वेळ थांबावं लागलं नाही. सेल्डनने दार उघडून त्याचं हसून स्वागत केलं, “गुड इवनिंग, मास्टर टिसाल्वर आणि मॅडम.”

त्याची बायको कपाळाला आठ्या घालून त्याच्या मागेच उभी होती. टिसाल्वर चाचरत बोलू लागला. जणू त्याला परिस्थितीचा नेमका अंदाज आला नव्हता. “तुम्ही दोघं, म्हणजे तुम्ही आणि वेनाबिली मॅडम बरे आहात ना?”

उत्तरादाखल तो स्वतःच मान हलवत होता. जणू त्याच्या होकारार्थी देहबोलीमुळे उत्तरही होकारार्थी येणार होतं.

“अगदी छान. बिलीबॉटनमधे जाऊन आलो. काहीही त्रास झाला नाही. आणि येऊन व्यवस्थित आंघोळीही केल्या आम्ही. अजिबात वास राहिलेला नाही.” सेल्डनने हे उत्तर टिसाल्वरबाईंच्या दिशेने जणू मानेनेच फेकलं. तिनेही जोरात हुंगल्यासारखा आवाज केला.

टिसाल्वर पुन्हा कुचमत बोलला, “मला असं कळलं की सुरे घेऊन मारामारी झाली म्हणे.”

“असं म्हणतायत का लोक?” सेल्डनने भुवया उंचावल्या.

“तुम्ही आणि मॅडमनी म्हणे शंभर गुंडांचा सामना केलात आणि असं कळलं की सर्वांना ठार केलंत. खरंय का हे?” त्याच्या आवाजातून त्याच्या मनाविरुद्ध प्रचंड आदर निथळत होता.

“अजिबात नाही असं काही.” डॉर्स वैतागून उद्गारली. “अगदीच हास्यास्पद आहे हे. आम्हाला समजता काय तुम्ही? कत्तल करणारे खूनी लोक? आणि शंभर गुंड मी -आम्ही त्यांना ठार करेपर्यंत वाट पाहात रहातील की काय- सर्वांना ठार केलं!? जरासा विचार तरी करा.”

“असे ते म्हणतायत.” कॅसिलिया टिसाल्वर जोरातच बोलली. “हे असलं काही माझ्या घरात मी चालवून घेणार नाही.”

“एक म्हणजे-” सेल्डन बोलू लागला, “जे घडलं ते या घरात घडलेलं नाहीये. आणि दुसरं म्हणजे शंभर गुंड नव्हते तिथे. दहाजण होते. आणि तिसरं म्हणजे कुणीही ठार झालेलं नाहीये. थोडी वादावादी सुरू झाली, भांडण झालं, आणि मग ते त्यांच्या वाटेने निघून गेले, आम्ही आमच्या वाटेने निघून आलो.”

“ते त्यांच्या वाटेने निघून गेले!! यावर मी विश्वास ठेवावा अशी तुमची अपेक्षा आहे काय, पाहुण्यांनो?” टिसाल्वर बाई रागारागात बोलल्या. सेल्डन सुस्कारला. जरासा ताणतणाव सुरू होण्याचा उशीर की माणसं लगेच स्वतःला दोन विरोधी गटांत विभागून घेताता. तो म्हणाला, “त्यातल्या एकाला थोडं कापलं खरं. पण फार नाही.”

“आणि तुम्हाला अजिबात कुठेही लागलं नाही?” टिसाल्वरच्या आवाजातलं कौतुक या वेळी लपत नव्हतं.

“अजिबात नाही. वेनाबिली मॅडमनी दोन सुरे अगदी सुरेख हाताळले.”

“मी सांगून ठेवू इच्छिते,” टिसाल्वर बाईंची नजर डॉर्सच्या पट्ट्यावर स्थिरावली, “हेच मला इथे नको आहे.”

डॉर्स कडक आवाजात बोलू लागली, “जोवर आमच्यावर इथे कुणी हल्ला करत नाही, तोवर ते इथे होणार नाही.”

“पण तुमच्यामुळे आमच्या दाराशी कचरपट्टी लोटली आहे.” टिसाल्वर बाई बोलल्या.

“माय लव्ह, त्यांना उगाच राग-” टिसाल्वर तिला समजावू लागला.

“का?” त्याची बायको त्याच्यावर तुच्छतेने ओरडली, “तिच्या सुऱ्यांची भीती वाटते की काय तुला? बघतेच मी इथे कशी वापरते ती सुरे.”

“इथे सुरे वापरण्याचा माझा हेतूच नाही,” डॉर्स तिच्या इतक्याच जोरात आणि तुच्छ स्वरात म्हणाली, “आणि कसली कचरपट्टी आली आहे म्हणताय तुम्ही?”

“बिलीबॉटनचा एक मुलगा दारात आलाय, त्यासंदर्भात बोलतायत त्या,” टिसाल्वर उत्तरला, “म्हणजे त्याच्या अवतारावरून तो तिथलाच असावा असं

वाटतंय. त्याला तुम्हाला भेटायचंय म्हणतोय. या भागात असलं काही कधी होत नाही आणि चालवून घेतलं जात नाही. आमची बदनामी होते त्यात." त्याच्या स्वरात क्षमायाचना होती.

सेल्डन म्हणाला, "ठीक आहे, मि. टिसाल्वर, आम्ही बाहेर जाऊन बघतो कोण आहे. आणि त्याला लागलीच परत पाठवून देतो."

"नाही, थांब," डॉर्स संतापून बोलू लागली, "या खोल्या आमच्या आहेत. आम्ही त्यासाठी पैसे मोजतोय. आम्हाला भेटायला कुणी यायचं कुणी नाही, ते आम्ही ठरवणार. बाहेरचा मुलगा बिलीबॉटनमधून आलेला असेल तर डाह्लाईट आहे हे तर नक्की. शिवाय तो ट्रॅन्टोरियन तर आहेच आहे. त्यापेक्षाही महत्त्वाचं म्हणजे तो या साम्राज्याचा नागरिक आहे आणि मनुष्य आहे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे तो आम्हाला भेटायला आला आहे त्याअर्थी तो आमचा पाहुणा आहे." टिसाल्वर बाई स्तब्ध उभ्या होत्या. टिसाल्वरबुवा अनिश्चितपणे चुळबुळ करत होते.

डॉर्स पुन्हा बोलू लागली, "तुम्ही म्हणताय, की मी बिलीबॉटनमधे शंभर गुंडांना ठार केलं, तर मग मी एका पोराला घाबरत नाही हे तर स्पष्टच आहे किंवा तुम्हाला दोघांनाही..." तिचा हात सहजच गेल्यासारखा तिच्या पट्ट्याकडे गेला.

टिसाल्वर अचानक उत्साहित झाल्यासारखा जोरात बोलू लागला, "वेनाबिली मॅडम, आम्हाला तुम्हाला अजिबात दुखवायचं नाहीये. अर्थात या खोल्या तुमच्याच आहेत, आणि तुम्हाला तिथे ज्याला कुणाला बोलवायचंय त्याला बोलवू शकता तुम्ही." तो एक पाऊल मागे सरला आणि रागावलेल्या बायकोला हाताला धरून ओढत त्याने बाहेर नेलं. त्याच्या या दृढ निश्चयाबद्दल त्याला नंतर किंमत मोजावी लागणार होतीच.

डॉर्स ते गेले त्या दिशेने तिखट नजरेने पाहात राहिली. सेल्डन कडवटपणे हसला. "किती वेगळी वाटलीस तू आत्ता, डॉर्स. मला वाटलं मीच कधीकधी जरा विचित्र वागतो आणि त्रास करून घेतो- आणि तू अगदी शांततेची पुतळी, अगदी व्यवहारी... आणि गुंतागुंत कशी टाळावी हे एकच ध्येय असतं तुझं."

डॉर्सने मानेनेच नकार दिला. "कुणीतरी अमुकतमुक गटातलं आहे म्हणून त्या माणसाबद्दल तुच्छतेने बोललेलं मला अगदी सहन होत नाही- अगदी इतर माणसांनीच ते केलं असलं तरीही मला संताप येतो. हे इथे रहाणारे सन्माननीय लोक आहेत ना, त्यांनीच हे तिकडचे गंडपुंड निर्माण केले आहेत."

"इथलेच नव्हे, सगळीकडच्याच सन्माननीय लोकांनी हे केलंय," सेल्डन म्हणाला, "तिथले सन्माननीय लोक इथल्या सन्माननीय लोकांची घडण करतात. परस्पर वैर हा मानवतेचा भागच झालाय असं वाटतं."

"मग तुझ्या सायकोहिस्ट्रीत याचा विचार तुला करावा लागेल, हो की नाही?"

"नक्कीच. खरोखरच सायकोहिस्ट्री तेवढी विकसित होऊ शकली तर मग कशाचाही विचार करता येईल त्या बैठकीवर- आःहाः, आपल्या चर्चेचा विषय असलेला मुलगा आलाय इथे. आणि तो रॅच आहे. यात मला नवल वाटलं नाही खरं."

७२-

रॅच इकडे तिकडे पाहात आत आला. चांगलाच बुजला होता तो. उजव्या हाताचं बोट ओठांच्या वरची लव चाचपत होतं. त्याने संतप्त दिसणाऱ्या टिसाल्वर बाईंकडे वळून पाहिलं आणि कशीबशी मान लववून अभिवादन केलं.

"थँक्यू मॅडम, फारच छान घर आहे तुमचं." मग त्याच्या पाठीवर दरवाजा धाडकन् बंद होत आपटला तेव्हा तो सेल्डनकडे, डॉर्सकडे वळला आणि काहीतरी मौल्यवान वस्तूची किंमत ठरवत असल्याच्या आवेशात म्हणाला, "छानच जागा आहे ही, बरं का."

"तुला आवडली ना. फारच छान." सेल्डन गंभीरपणे म्हणाला. "पण मला सांग, आम्ही इथे रहातो हे तुला कसं कळलं?"

"तुमच्या मागेमागे आलो होतो. कसं कळणार आणखी? ओ, मॅडम," तो डॉर्सकडे वळला, "तुम्ही मारामारी करता ना तशी मारामारी कोणीच बाई करू शकत नाही."

"बऱ्याच बायका मारामारी करताना पाहिल्या आहेस का तू?" डॉर्सने हसत विचारलं. रॅचने नाक चोळलं. "नाही. कुणालाच नाही. त्या तर सुरे घेऊन फिरतच नाहीत. कधीकधी अगदी बारके चाकू ठेवतात सोबत, बारक्या पोरांना घाबरवायला. पण मला तर कधीच भीती वाटत नाही."

"नक्कीच घेत नसणार. पण त्यांनी तुला घाबरवायचा प्रयत्न करावा असं तू काय करतोस?"

"काही नाही करत. जराशी गंमत- जरा ओरडायचं- म्हणायचं, ओ मॅडम मला..." मग तो क्षणभर थबकला आणि म्हणाला, "नाही, काही नाही..."

"माझ्यावर प्रयोग नको करूस हां." डॉर्स म्हणाली.

"मस्करी करताय का? तुम्ही मॅरनचं जे काय केलं त्यानंतर कुणाची बिशाद? कुठे शिकलात अशी मारामारी करायला?"

"आमच्या जगातच."

"मला शिकवाल?"

“त्यासाठी भेटायला आलास की काय मला?”

“खर्तर्र... नाही. मी कुणाचा तरी निरोप घेऊन आलोय.”

“माझ्याशी लढायचंय का कुणाला?”

“तुमच्याशी कुणालाच लढायची हिंमत नाही, मॅडम. तुमचं लय नाव झालंय. सगळ्यांना माहीत झालाय तुम्ही. तुम्ही बिलिबॉटनमधे आता गेलात ना, तर सगळे बाजूला सरकून, हसून तुम्हाला पुढे जाऊ देतील. कुणी वाकड्या नजरेनं बघणारही नाही. काय मॅडम कमाल केलीत. म्हणूनच त्याला तुम्हाला भेटायचंय.”

सेल्डन म्हणाला, “रॅच, नक्की कोणाला भेटायचंय आम्हाला?”

“डॅवान नाव आहे त्याचं.”

“कोण आहे तो?”

“एक माणूस आहे. बिलिबॉटनमधेच रहातो, आणि सुरेबिरे काही वागवत नाही जवळ.”

“आणि जिवंत रहातो?”

“तो लय वाचत असतो. कुणी सरकारकडून अडचणीत आलं, तर तो मदत करतो. मग त्याला कुणी त्रास देत नाहीत. त्याला सुऱ्याचाकूची गरजच पडत नाही.”

“मग तो स्वतःच का नाही आला? तुला का पाठवलं?”

“त्याला इकडच्या बाजूला यायला आवडत नाही. तो म्हणतो त्याला शिसारी येते. तो म्हणतो इथली सगळी माणसं सरकारची-- “ तो जरा अवघडून त्या दोघांकडे बघत क्षणभर गप्प राहिला, “चाटत असतात. तो इथं काही येणार नाही. तो म्हणाला, ते मला येऊ देतील कारण मी तसा लहान आहे.” तो हसला. “त्यांनी मलाही येऊ दिलं नसतं, हो ना? म्हणजे त्या बाईचं नाक इतकं वाकडं झालेलं-

काहीतरी घाण वास नाकात शिरल्यासारखं.” तो दचकून थांबला आणि जरा कावराबावरा होऊन स्वतःकडे खाली पाहू लागला. “आमच्या इथं ना, आंघोळपांघोळ करायची फारशी सोय नाय ना.”

“असू दे रे, ठीक आहे,” डॉर्स हसून म्हणाली, “इथे नाही मग कुठे भेटायचंय त्याला? शेवटी काय- जे झालं त्यानंतर मला बिलीबॉटनला जायची इच्छा नक्कीच नाही.”

“मी सांगितलं ना तुम्हाला?” तो जरा रागेजत म्हणाला, “आता तुम्हाला बिलिबॉटनमधे काहीच त्रास होणार नाही. शप्पथ. शिवाय तो जिथे रहातो तिथे तुम्हाला कुणी भेटणारही नाही.”

“कुठे जायचंय?” सेल्डनने विचारलं.

“मी नेईन तुम्हाला. फार लांब नाही.”

“पण त्याला आम्हाला का भेटायचं आहे?” डॉर्सने विचारलं.

“माहीत नाही, पण तो असं म्हणाला...” रॅचने डोळे मिटून त्याचे शब्द आठवण्याचा प्रयत्न केला. “म्हणाला- ‘त्यांना सांग की मला डाह्लाईट हीटसिंकरशी तो माणूसच असल्याप्रमाणे बोलणाऱ्या माणसाला भेटायचंय आणि मॅरनकडे सुरा असतानाही त्याला हरवणाऱ्या, पण संधी असूनही त्याला ठार न करणाऱ्या बाईंना भेटायचंय. मला वाटतं मी बरोबर सांगितलं हे.”

सेल्डनच्या मुद्रेवर हसू उमटलं, “बहुतेक. त्याला आत्ता भेटलेलं चालेल?”

“तो तर वाट बघतो आहे.”

“चल मग, येतो आम्ही तुझ्याबरोबर.” मग त्याने थोडं साशंक नजरेने डॉर्सकडे पाहिलं.

“ठीक आहे,” ती म्हणाली, “येऊ शकते मी. बहुतेक हा काही सापळा वगैरे नसावा. आशा चिरंतन आहे...”

७३-

ते बाहेर आले तेव्हा बाहेरच्या प्रकाशाला छानदार सायंतेजाची छटा होती. कृत्रिम ढगांची आरास किंचित गुलाबी जांभळ्या छटेची होती. डाह्ल विभागात बाकी काही तक्रारी असतील सम्राटाच्या सरकारबद्दल, पण कॉम्प्युटरने वातावरण निर्मितीत त्यांच्या बाबतीतही काही कसर सोडलेली नव्हती.

डॉर्स कुजबुजत म्हणाली, “आपण फारच सेलेब्रिटी झालोय असं दिसतंय. शंकाच नाही.” सेल्डनने आकाश निरखणारी नजर खाली आणली आणि टिसाल्वरच्या अपार्टमेन्टच्या भोवती जमलेली गर्दी त्याला दिसली. गर्दीतल्या सगळ्यांच्या नजरा त्यांच्याकडेच लागलेल्या. जेव्हा या दोघा परजगीय माणसांचं लक्ष आपल्याकडे गेलंय हे गर्दीच्या लक्षात आलं तेव्हा कुजबुजीची एक लहर दौडत गेली आणि आता जणू ते टाळ्यांचा कडकडाट करणार असं वाटून गेलं.

“आता समजलं, टिसाल्वर बाई एवढ्या का वैतागल्या होत्या. मी थोडी सहानुभूती दाखवायला हवी होती.” गर्दीतले बरेच लोक अगदीच फाटके होते आणि त्यातले बरेचसे बिलीबॉटनमधून आले असणार हे ओळखू येत होतं. सेल्डनने अगदी सहजपणे हात किंचित् उंचावून त्यांच्याकडे हसून पाहिलं तसे सगळे खूश होऊन टाळ्या वाजवू लागले. त्यातून एक आवाज जणू गर्दीचा फायदा घेत ओरडला, “मॅडम आम्हाला एक दोन सुरामारीच्या ट्रिक्स दाखवतील का?”

डॉर्सने ओरडूनच उत्तर केलं, “नाही, मला राग आला तरच मी सुरे उपसते.” आणि सगळेच हसू लागले.

त्यातला एकजण पुढे आला. तो नक्कीच बिलीबॉटनमधला नव्हता, डाह्लाईट असण्याच्या परिचित खुणाही वागवत नव्हता. छोटीशीच मिशी होती हे एक- दुसरं म्हणजे मिशी काळी नसून पिंगट होती. तो बोलू लागला, “मी मार्लो टॅन्टो- ट्रॅन्टोरियन एच् व्ही न्यूजकडून आलोय. जरा आमच्या रात्रीच्या बातम्यांसाठी तुमच्यावर फोकस करू का?”

“नाही.” डॉर्स चटकन् उत्तरली. “मुलाखती वगैरे काहीही नाही होणार इथे.”

तो पत्रकार अजिबात मागे हटला नाही. “मला असं कळलं की तुम्ही बिलीबॉटनच्या एका मोठ्या गटाशी लढलात आणि जिंकलात-” तो हसला, “आणि ही बातमी आहे.”

“नाही.” डॉर्स उत्तरली, “आम्हाला काही माणसं भेटली बिलीबॉटनमध्ये. आम्ही त्यांच्याशी चर्चा केली आणि पुढे निघालो. एवढंच झालं. आणि तुम्हाला हे एवढंच माझ्याकडून मिळेल.”

“तुमचं नाव काय? तुमचं बोलणं ट्रॅन्टोरियनसारखं वाटत नाही.”

“मला नाव नाही.”

“आणि तुमच्या या मित्राचं काय नाव?”

“त्यांनाही नाव नाही.”

तो पत्रकार जरा चिडलेला दिसला, “हे पहा मॅडम, तुम्ही बातमीचा विषय आहात, आणि मी फक्त माझं काम करायचा प्रयत्न करतोय.”

रॅचने डॉर्सची बाही खेचली. ती खाली वाकून त्याचं बोलणं ऐकू लागली. मग मानेनेच होकार देत ती उभी राहिली आणि म्हणाली, “मला वाटतं, मि. टॅन्टो, तुम्ही काही पत्रकार वगैरे नाहीत. मला वाटतं तुम्ही सरकारचे दलाल आहेत आणि डाह्लसाठी काहीतरी संकट उभं करायचा तुमचा विचार आहे. कसलीही मारामारी

तिथे झाली नसताना, तुम्ही बातमी तयार करायच्या प्रयत्नात आहात- बिलिबॉटनमध्ये पोलीस घुसवायचा बहाणा तयार करायची कामगिरी आहे का तुमच्यावर. तुमच्या जागी मी असते तर इथे फार वेळ थांबले नसते. फारसे लोकप्रिय दिसत नाही तुम्ही इथे.'' डॉर्सच्या पहिल्याच वाक्यानंतर गर्दीतून कुजबूज वाढत गेली होती. आता ती आणखी वाढली. सगळेच मि. टॅन्टोच्या दिशेने सावकाशीने सरकत होते. तो हडबडला आणि सटकायची वाट शोधू लागला. डॉर्स खणखणीत आवाजात म्हणाली, ''जाऊ दे त्याला. कुणी बोटही लावू नका. काहीतरी हिंसाचार झाल्याची खोटी बातमी देण्याची सबब पुरवू नका त्याला.'' आणि लोकांनी त्याला जायला वाट करून दिली.

रॅच म्हणाला, ''आः मॅडम, थोडं पिटून काढायला हवं होतं त्याला.''

''रक्तपिपासू मुला,'' डॉर्स हसून म्हणाली, ''चल आता, ने आम्हाला तुझ्या मित्राकडे.''

७४-

एका खानावळीच्या मागच्या बाजूच्या खोलीत डॅवान नावाचा तो माणूस त्यांना भेटला. खूपच आतआत होती ती जागा.

रॅच अगदी सहज त्यांना रस्ता दाखवत आला होता. हेलिकॉनच्या भूमीगत बिळांतून एखादी चिचुंद्री सहज पळेल तसा तो पुढे जात होता. डॉर्स प्रथम सावध झाली- तिने हाक मारली, ''रॅच, रॅच, मागे ये, आपण नक्की कुठे चाललो आहोत?''

''डॅवानकडे.'' रॅचच्या तोंडावर वैतागल्याचे भाव होते, ''सांगितलं ना तुम्हाला मी.'' ''पण इथे तर कुणीच दिसत नाहीये. कुणी रहातच नाहीये इथे.''

डॉर्सच्या नजरेत किळस होती. सगळा परिसर निर्मनुष्य, निर्जीव वाटत होता, दिवे लागलेले नव्हते किंवा अगदीच मिणमिण प्रकाश टाकत होते.

“डॅवानला असंच बरं वाटतं.” रॅच म्हणाला, “तो नेहमी जागा बदलत रहातो. कधी इथे तर कधी तिथे. बदलतो ठिकाणा.”

“पण का?” डॉर्सने विचारलं.

“ते बरं असतं. धोका कमी होतो.”

“कुणापासून धोका?”

“सरकारपासून.”

“सरकारला डॅवानशी काय घेणं आहे?”

“मला नाही माहीत. तुम्हाला मी यायला नको असेल तर तुम्हाला मी डॅवान इथे आहे असं सांगतो, मग तुम्ही जा त्याला शोधत- “

सेल्डन म्हणाला, “नाही, रॅच. तू नसलास तर आम्हाला रस्तेच सापडणार नाहीत. मी तर म्हणेन, तू इथेच थांब आमची भेट होईपर्यंत, आणि आम्हाला बाहेर पडायचा रस्ता दाखव.”

रॅच लगेच म्हणाला, “त्यात माझा काय फायदा? मला भूक लागली तर- तरीही थांबून राहू काय मी?”

“हो, भूक लागली तरी थांबून रहा, मग मी तुला पोटभर जेवायला घालीन. काय म्हणशील ते.”

“ते आत्ता म्हणताय. नंतर कराल कशावरून?”

डॉर्सचा हात लक्कन हलला आणि पुढल्या क्षणी त्यात सुरा दिसू लागला.

“तू आम्हाला खोटं ठरवतो आहेस का, रॅच?”

रॅचचे डोळे विस्फारले. धमकीने तो घाबरला वगैरे नाही.

तो म्हणाला, “मला दिसलंच नाही ते. परत करा ना.”

“नंतर करीन. तोवर तू इथे असलास तर. नाहीतर,” डॉर्स त्याच्याकडे रागात पाहात राहिली, “मी तुला बरोब्बर शोधून काढेन.”

“ओ- मॅडम, ठीकै ना,” रॅच म्हणाला, “तुम्ही मला शोधायला येणार नाही. तुम्ही त्यातल्या नाहीतच. पण मी इथेच असेन बरं.” मग जरा नखऱ्यात उभा राहून म्हणाला, “शब्द देतोय.” मग तो त्यांना घेऊन पुढे निघाला. सारं कसं शांत होतं. फक्त त्यांच्याच बुटांचा आवाज येत राहिला.

ते आत आले तेव्हा डॅवानने वर पाहिलं. घाबरून दचकला तो, पण रॅचला पाहाताच शांत झाला. त्याने त्या दोघांकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिलं.

रॅच म्हणाला, “हेच ते दोघे.” आणि हसून तो तिथून चालता झाला.

सेल्डन म्हणाला, “मी हॅरी सेल्डन. आणि या डॉर्स वेनाबिली.” तो डॅवानला बारकाईने न्याहाळत राहिला. डॅवान सावळा होता, आणि डाह्लाईटला शोभेशी भलीमोठी काळी मिशी होतीच, पण थोडी दाढीही होती. नीट गुळगुळीत दाढी न केलेला तो पहिलाच डाह्लाईट आजवर सेल्डनने पाहिला होता. अगदी बिलीबॉटनचे ते गुंडसुद्धा घोटून दाढी करून आले होते.

सेल्डनने विचारलं, “आणि आपलं नाव?”

“डॅवान, रॅचने सांगितलं असेलच.”

“तुमचं आडनाव काय?”

“फक्त डॅवान. मास्टर सेल्डन तुमचा कुणी पाठलाग केला का?”

“नसणार. पाठलाग झाला असता तर रॅचला कळलंच असतं. आणि रॅचला कळलं नसतं तरी मॅडम वेनाबिलींना नक्कीच कळलं असतं.”

डॉर्स किंचित् हसून म्हणाली, “माझ्यावर विश्वास बसलाय तुझा, हॅरी.”

“रोज तो वाढतोच आहे.” तो विचार करत उत्तरला.

डॅवान जरासा चलबिचल करत म्हणाला, “आणि तरीही तुमचा पत्ता सापडलाय त्यांना.”

“सापडलाय?”

“हो, त्या तथाकथित पत्रकाराबद्दल ऐकलं मी.”

“पोहोचलीसुद्धा बातमी?” सेल्डन नवलाने उद्गारला, “पण मला वाटतं तो खरोखरीचाच पत्रकार असेल. निरुपद्रवी वाटला तो. आम्ही त्याला रॅचच्या सूचनेनुसार सरकारी दलाल म्हटलं- उत्तमच सूचना होती ती. आणि जमाव जरा संतप्त झाल्याचं दिसताच तो निघून गेला.”

“नाही,” डॅवान म्हणाला, “तो खरोखरच दलाल होता. माझ्या लोकांनी ओळखलं त्याला- तो खरंच सरकारची दलाली करतो. पण अखेर तुम्ही काही माझ्यासारखं वागत नाही. खोटी नावं वापरत नाही, आणि घरंही बदलत नाही तुम्ही. खरी नावं वापरता आणि भूमीगत रहाण्याचा एवढासासुद्ध प्रयत्न करत नाही. तुम्ही- हॅरी सेल्डन- गणितज्ञ आहात.”

“हो आहे.” सेल्डनने म्हणाला, “आणि मी खोटं नाव कशाला घेऊन?”

“साम्राज्यसरकारला तुम्ही हवे आहात, हो ना?”

सेल्डनने खांदे उडवले. “मी अशा ठिकाणी रहातो की जिथे सरकारचे हात पोहोचू शकत नाहीत.”

"उघडपणे नाही, पण सरकारला उघड काम करण्याची गरज काय? मी म्हणेन की तुम्ही अदृश्य व्हा- खरोखर गायब व्हा."

"तुमच्यासारखं राहू म्हणता?" त्याने आजुबाजूला नजर फिरवली त्यात घृणाच डोकावत होती. ते ज्या गल्ल्यांतून चालत आलेले तिथल्यासारखीच ही खोलीही निर्जीव, बकाल दिसत होती. सगळ्या भिंतींवर बुऱ्हा चढलेला आणि भयानक निराश वाटावं असं एकूण चित्र होतं.

"होय," डॅवान म्हणाला, "तुम्ही आम्हाला उपयोगी पडू शकता."

"ते कसं काय?"

"तुम्ही एका तरुणाशी बोलला होतात- यूगो अमारिलशी."

"हो, बोललेलो ना."

"अमारिल मला सांगत होता की तुम्ही भविष्यवेध घेऊ शकता."

सेल्डनने एक जडशीळ सुस्कारा सोडला. त्याला आता त्या रिकाम्या खोलीत उभं राहून थकवा आलेला. डॅवान खाली एका उशीवर बसला होता, तिथे आणखीही काही उशी होत्या. पण त्या अस्वच्छ दिसत होत्या. आणि भिंतीला टेकावं तर तिच्यावरही चिकट बुरशी धरलेली.

तो उत्तरला, " अमारिलला काय सांगायचंय ते समजण्यात तुमचा तरी गैरसमज झालाय किंवा अमारिलचा गैरसमज झालाय मला समजून घेण्यात. मी एवढंच केलंय- की भविष्यातील इतिहासासंबंधी अंदाज वर्तवताना, सुरुवातीच्या काही घटना निवडून पुढे त्यांची परिणती कशात होईल- बेबंदशाहीत होईल की अंदाज करण्याइतक्या सुविहित असतील ते एका मर्यादेपर्यंत सांगता येणे शक्य आहे. पण त्या सुरुवातीच्या घटनांची निवड काय असेल ते मला सांगता येणार नाही. कदाचित् अशा सुरुवातीच्या घटना एकाच माणसाला मांडता येतील की नाही ते

मला सांगता येणार नाही किंवा अनेक माणसांना देखील त्या एका कालमर्यादेत मांडता येतील की नाही तेही मला माहीत नाही. कळतंय का मी काय म्हणतोय ते?"

"नाही." डॅवान उत्तरला.

सेल्डन पुन्हा सुस्कारला, "पुन्हा प्रयत्न करतो. भविष्याचा वेध घेणं शक्य आहे. पण त्या शक्यतेचा फायदा घेता येईल की नाही हे सांगता येत नाही. कळतंय?"

डॅवानने एकदा सेल्डनकडे, एकदा डॉर्सकडे जरा निराशेनेच पाहिलं. "म्हणजे तुम्हाला भविष्य सांगता येत नाही."

"आता तुम्हाला मुद्दा कळला, मास्टर डॅवान."

"नुसतंच डॅवान म्हणा. पण कधीतरी तुम्हाला थोडं फार भाकित करता येऊ शकेल."

"शक्य आहे."

"आणि म्हणूनच साम्राज्याला तुम्ही हवे आहात."

"नाही." सेल्डनने शिकवण्याच्या थाटात बोट वर केलं, "मला वाटतं, की त्याचमुळे साम्राज्याकडून मला थेट धोका नाही- ते फारसा प्रयत्न करणार नाहीत मला ताब्यात घेण्याचा. काही प्रसिद्धी न होता, त्यांना मला उचलता आलं तर उचलतीलही. पण आत्ताच्या घडीला मला काहीच येत नाही हे त्यांना माहीत आहे. आणि म्हणून ट्रॅन्टरवरची नाजूक काचेसारखी शांती टिकावी या कारणासाठी तरी साम्राज्याचं सरकार मी रहात असलेल्या कुठल्याही विभागाच्या स्थानिक स्वराज्यावर आघात करू धजणार नाही. मी माझ्या नावानिशी फिरण्याचं हेच एख पुरेसं कारणम आहे."

डॅवानने तोंड ओंजळीत लपवलं आणि पुटपुटला, “वेडेपणा आहे सगळा...” मग त्याने वर पाहात डॉर्सला सावधपणे विचारलं, “तुम्ही मास्टर सेल्डनच्या पत्नी आहात का?”

डॉर्स शांतपणे उत्तरली, “मी त्यांची मैत्रीण आहे आणि रक्षणकर्ती आहे म्हणू.”

“तुम्ही त्यांना कितपत ओळखता?”

“गेले काही महिने आम्ही एकत्र आहोत.”

“बस्स?”

“बस्स.”

“ते खरं सांगतायत असं वाटतं तुम्हाला?”

“ते खरं सांगत आहेत हे मला माहीत आहे. पण तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवत नाही तर माझ्यावर कशासाठी विश्वास ठेवाल? हॅरी जर तुम्हाला खोटं सांगत असेल तर मीही तेवढंच खोटं सांगून त्याला पाठिंबा देणारच ना?”

डॅवान असाहाय्यपणे दोघांकडे आळीपाळीने पाहात राहिला. मग अखेर त्याने विचारलं, “ते काहीही असलं तरीही तुम्ही आम्हाला मदत कराल का?”

“हे ‘आम्हाला’ म्हणजे कुणाला आणि कसली मदत लागेल तुम्हाला?”

डॅवान उत्तरला, “तुम्ही डाह्लमधली परिस्थिती पाहिलीत. आमच्यावर खूप अन्याय होतो. तुम्हाला हे लक्षात आलं असणारच- आणि युगो अमारिलशी तुम्ही ज्या पद्धतीने वागलात त्यावरून तुम्हाला आमच्याबद्दल काहीही सहानुभूती न वाटणं अशक्य आहे एवढं मला समजतं.”

“आम्हाला पूर्ण सहानुभूती आहे.”

“आणि अन्यायाचं मूळ काय आहे हे देखील तुम्हाला माहीत आहे.”

“तुम्ही म्हणणार साम्राज्याचं सरकार हे अन्यायाचं मूळ आहे, आणि खरोखर त्यांचा यात सहभाग आहेच. पण दुसरीकडे माझ्या लक्षात हेही आलं आहे की डाह्लमधलाच मध्यमवर्ग जो आहे तो हीटसिंकर्सचा तिरस्कार करतो आणि दुसरा एक वर्ग आहे- गुन्हेगार टोळयांचा- तो उरलेल्या सर्वांना दहशतीखाली वागवतो.”

डॅवानचे ओठ घट्ट मिटले गेले, पण त्याने फार काही दर्शवलं नाही.

“खरंय, अगदी खरंय. पण साम्राज्याचं सरकार याच गोष्टींना तत्त्वतः मान्यता देऊन खतपाणी घालतं. डाह्ल प्रदेशातून फार गंभीर प्रकारचे आव्हान उभे राहू शकेल. हीटसिंकर्सनी संप केला तर ट्रॅन्टॉरवर भयंकर उर्जाटंचाई होईल... त्याचे जे काही भयानक परिणाम होतील ते होतीलच. पण डाह्लमधलेच उच्चभ्रू लोक बिलीबॉटनमधल्या भाडोत्री गुंडांना पैसे देऊन संप फोडायला लावतील. आधीही हे झालंय. साम्राज्याचं सरकार डाह्लमधल्या काही लोकांना बऱ्यापैकी संपन्न होऊ देते आणि मग त्यांना चमचेगिरी करायला सांगते. इथल्या शस्त्रवापरावर बंदी घालणारा कायदा सरकार कधीच अंमलात आणत नाही, त्यामुळे गुंडगिरीला कधीच पायबंद बसत नाही.अर्थात सरकार हे प्रकार फक्त डाह्लमधेच नाही, तर इतरत्रही करत असते. त्यांचा जो काय हेतू असतो तो थेट पद्धतीने त्यांना राबवता येत नाही. पूर्वी जसा थेट जुलूम करून मनमानी व्हायची तशी आता होत नाही. आजघडीला ट्रॅन्टॉर इतकं गुंतागुंतीचं झालंय की फट् म्हणता दंगाफसाद होऊ शकतो. म्हणून सरकारला जरा जपून काम करावं लागतं-”

“अधोगतीचा आणखी एक प्रकार,” सेल्डन म्हणाला. त्याला ह्युमिनची तक्रार आठवली.

“काय?” डॅवानने विचारलं.

“काही नाही.” सेल्डन उत्तरला, “पुढे बोल.”

“साम्राज्याच्या हस्तकांना अंतर राखणं गरजेचं आहे, पण तसं करूनही त्यांना बरंच काही साध्य करता येतं. प्रत्येक विभागाला दुसऱ्या विभागाबद्दल सतत संशय वाटावा यासाठी साम्राज्याचं सरकार प्रोत्साहनच देत असतं. प्रत्येक विभागांतर्गत सामाजिक आणि आर्थिक स्तर विलग राहून एकमेकांशी भांडत रहातील असं पाहिलं जातं. त्यामुळे ट्रॅन्टॉरमधे लोक एकत्र येऊन एकजुटीने काही करतील अशी शक्यताच उरत नाही. लोक एकमेकांत भांडत रहातात, मारामाऱ्या करतात आणि केंद्राच्या जुलूमशाहीविरुद्ध एक होऊन भूमिका घेत नाहीत. साम्राज्य सरकारला काहीही दडपशाही केल्याशिवाय सुखेनैव राज्य करता येतं.”

“मग? त्यासंबंधात काय करता येईल असं वाटतं तुम्हाला?”

“मी गेली काही वर्षं ट्रॅन्टॉरच्या लोकांमधे एकतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करतो आहे.”

“कल्पना करू शकतो मी. हे तर केवळ अवघटच नव्हे, अशक्य आहे- आणि हे काम केल्याबद्दल कुणी तुम्हाला थँक्यूसुद्धा म्हणणार नाही.”

“बरोबर म्हणालात.” डॅवान म्हणाला, “पण आमचा पक्ष अधिकाधिक बलवान होत चालला आहे. आमच्यातल्या अनेक सुरेबाजांना आता कळलंय की एकमेकांवर सुरे चालवण्यात काही अर्थ नाही. बिलीबॉटनच्या गल्ल्यांत तुमच्यावर हल्ला करणारे जे होते ते अजूनही आमच्यात सामील न झालेले लोक होते. पण तो जो दलाल- ज्याला तुम्ही पत्रकार समजलात- त्याच्यापासून तुमचं रक्षण करण्यासाठी तयार असलेले लोक माझे लोक होते. मी इथे त्यांच्यातच रहातो. फार काही छानदार रहाणीमान नाहीये इथे, पण मी सुरक्षित आहे. शेजारच्या विभागांतूनही आमचा मार्ग स्वीकारलेले लोक आहेत आणि दिवसागणिक वाढत आहेत.”

“पण यात आमचा संबंध कुठून येतो?” डॉर्सने विचारलं.

“एक गोष्ट पुरेशी आहे,” डॅवान म्हणाला, “तुम्ही दोघे परजगातून आला आहात, आणि अभ्यासक आहात. तुमच्यासारख्या लोकांचं नेतृत्व आम्हाला गरजेचं आहे. आमची शक्ती गरीब, निरक्षर लोकांच्या पाठिंब्यातून उभी रहाते, कारण त्यांना या व्यवस्थेचा सर्वात जास्त त्रास होतो. पण ते दिशादर्शन करू शकत नाहीत हे नक्की. तुमच्यासारखे दोघे शंभर लोकांच्या तोडीचे आहेत.”

“दीनदुबळयांची सुटका करू पाहाणाऱ्याकडून असलं समीकरण येणं जरा विचित्रच वाटातं.” सेल्डन म्हणाला.

“मी लोकांना कमी लेखत नाहीये,” डॅवान घाईघाईने म्हणाला, “फक्त नेतृत्वापुरतंच बोलतो आहे मी. पक्षाकडे बौद्धिकदृष्ट्या सक्षम असं नेतृत्व असायला हवं.”

“म्हणजे आमच्यासारखे लोक तुमच्या पक्षाला सन्मान्यतेचा वर्ख लावायला गरजेचे आहेत, म्हणताय.”

डॅवान म्हणाला, “तुम्ही याची खिल्ली उडवत बोलू शकताच. पण मास्टर सेल्डन, तुम्ही खूप जास्त सन्मान्य आहात, खूप जास्त बुद्धीशाली आहात. जरी तुम्ही धुक्यात दडलेला भविष्यवेध घेऊ शकाल हे आत्ता नाकारत असलात तरीही-”

“प्लीज, डॅवान,” सेल्डन म्हणाला, “काव्यात्म बोलू नकोस आणि जरतर नकोच. यात मान्य करण्याचा प्रश्नच नाही. मी भविष्यवेध घेऊ शकत नाही आणि भविष्यावर धुक्याचा नाही तर पोलादी पडदा आहे.”

“माझं म्हणणं पुरं तरी करू दे मला. तुमच्याकडे अजूनही अचून भाकित करण्यासाठी- तुम्ही काय म्हणता ते सायकोहिस्टॉरिकल अचूकता नसली तरीही-

तुम्ही इतिहासाचा अभ्यास केला आहे. आणि त्याचे भविष्यातील परिणाम काय असतील हे कळण्याइतकी अंतस्फूर्ती तुमच्याकडे असू शकेल. असं नाही वाटत?"

सेल्डनने मान नकारार्थी हलवत सांगितलं, "मला गणिती भाषेतले परिणाम कदाचित् अंतस्फूर्तीने जाणवू शकतील, पण ऐतिहासिक महत्त्वाच्या दृष्टीने मी त्याचं अर्थनिर्णयन करू शकेन असं नाही. खरं म्हणजे मी इतिहासाचा अजिबात अभ्यास केलेला नाही. केला असता तर बरं झालं असतं. खूप नुकसान करून घेतलं मी असं फार तीव्रतेने वाटत रहातं."

डॉर्स सहजच म्हणाली, "मी इतिहासतज्ञ आहे, डॅवान आणि हवं तर मी माझं मत देऊ शकते."

"प्लीज, द्या." त्याच्या स्वरात विनम्रतेसह थोडंसं आव्हानही मिसळलेलं.

"एक म्हणजे दीर्घिकेच्या इतिहासात अनेक क्रांती, अनेक उठाव घडून गेले आहेत आणि त्यांनी जुलूमशहांना फेकून दिलं आहे. कधीकधी एकेकट्या ग्रहांवरच्या जगांत हे घडलं, क्वचित कधी काही ग्रहांतील जगांनी एकत्र येऊन बदल घडवला. कधीकधी साम्राज्यातही हे घडून आलं, कधी साम्राज्यपूर्व काळातील प्रादेशिक सरकारांच्या विरुद्धही उठाव झाले. बरेचदा या उठावांचं फलित इतकंच होतं की जुलूमशाही थांबली नाही, जुलूमशहा बदलले. वेगळ्या शब्दांत सांगायचं तर एका सत्ताधारी वर्गाला मात देऊन दुसरा सत्ताधारी वर्ग त्या जागी आला. काही वेळा हा बदल झाल्यावर कुशल राज्यकर्ते सत्तेवर आले- जे स्वतःला फार चांगल्या रीतीने सांभाळत होते, पण दीनदुबळ्यांना, पददलितांना आहे तिथेच ठेवत होते. काही वेळा त्यांची परिस्थिती अधिकच बिघडत गेली असंही दिसलं."

लक्षपूर्वक ऐकत असलेला डॅवान म्हणाला, "मला कल्पना आहे याची. आम्हा सर्वांनाच आहे. कदाचित् आपण भूतकाळातून धडे घेऊ शकतो आणि काय

टाळायला हवं ते ठरवू शकतो. शिवाय, जी जुलूमशाही आत्ता आहे ते आजच वास्तव आहे. भविष्यात काय होईल ती तर फक्त एक शक्यता आहे. बदल झाला तर तो फार काही भलं करणार नाही असंच मानून आपण चाललो तर मग अन्याय दूर करण्याची कधीच आशा करायला नको."

डॉर्स म्हणाली, "दुसरा मुद्दा असा की, तुमच्या बाजूने सत्य असेल आणि न्याय तुमच्याच बाजूने गर्जत असेल तरीही जुलूमशाही ही सर्वतोपरीने अधिक बलाढ्य असते हे वास्तव आहे. तुमचे सुरेबाज फारतर दंगल घडवून आणतील, निदर्शनं करतील, पण त्याचा टिकाऊ परिणाम असणार नाही. कारण दुसऱ्या टोकाला वेगवान, रासायनिक, मज्जाघात करणारी शस्त्रं लोकांना हरवण्यासाठी वापरण्यास सज्ज असलेले सरकार आहे. तुम्ही सगळ्या शोषितदलितांना आपल्या बाजूला करून घ्याल किंवा सन्माननीय व्यक्तीही तुमचम्या बाजूने येतील- पण तुम्हाला खरोखरी पाठिंबा मिळवावा लागेल तो पोलिसदलाचा किंवा लष्कराचा, निदान त्यांची सरकारप्रति निष्ठा तरी तुम्हाला पुरेशी ढळवावी लागेल."

डॅवान बोलू लागला, "असं आहे, ट्रॅन्टॉर हा तेवढासा एकछत्री नाही. प्रत्येक प्रभागाची आपापली सरकारं आहेत. त्यातली अनेक साम्राज्यसरकारच्या विरोधातली आहेत. एखादा बलाढ्य प्रभाग आपल्या बाजूने आला तर परिस्थिती बदलेल, नाही कां? म्हणजे केवळ गुंडमवाली सुरेबाजांचा, किंवा दगडफेक करणारांचा संघर्ष उरणार नाही हा."

"आहे का एखादा बलाढ्य प्रभाग तुमच्या बाजूने की नुसतीच तशी आकांक्षा आहे?"

डॅवान गप्प झाला. डॉर्स म्हणाली, "मी गृहीत धरते की तुमच्या मनात वाय प्रभागाच्या प्रमुखांचा विचार आहे. त्या प्रमुखांनी समजा लोकांच्या मनातील

असंतोषाचा फायदा उचलून सम्राटाला पदच्युत करण्याची संधी घेतलीच तर तुम्हाला नाही वाटत की नंतर कधीतरी त्यांनाच सम्राटाच्या सिंहासनावर बसण्याची इच्छा होईल असं? त्यांचं सध्याचं सुरक्षित पद सोडून दुसऱ्या कशाच्यातरी मागे धावायचं तर त्यासाठी पुरेसं मोठं कारण असावं लागेल ना? न्यायासाठी की त्यांच्याशी काहीही संबंध नसलेल्या दीनदुबळयांना चांगले दिवस यावेत म्हणून हे करण्यात त्यांना रस असेल?"

"तुम्ही म्हणताय-" डॅवान म्हणाला, "कुणीही बलाढ्य नेता- आम्हाला मदत करेल आणि मग आमचा विश्वासघात करेल?"

"दीर्घिकेच्या इतिहासात अशी अनेक उदाहरणं घडली आहेत, अशी परिस्थिती बरेचदा उद्भवली आहे-"

"या गोष्टीसाठी आमची पूर्वतयारी असेल तर आम्हीसुद्धा त्यांचा घात करू शकू असंही शक्य आहे ना?"

"म्हणजे त्यांचा वापर करायचा आणि नेमक्या वेळी त्याच्या सेनादलाच्या मुख्य अधिकाऱ्यांना फोडायचं किंवा कुठल्याही नेत्याला फोडायचं आणि त्याची हत्या घडवून आणायची, असं?"

"अगदी असंच नाही, पण गरज पडलीच तर काहीतरी करून त्याच्यापासून सुटका करून घेण्याचा काहीतरी मार्ग असेलच."

"म्हणजे आपल्या या आंदोलनातील सगळे प्रमुख लोक एकमेकांचा विश्वासघात करण्याच्या मानसिक तयारीत आणि संधीच्या शोधात असतील. म्हणजे सगळा सावळागोंधळ होण्याची पाककृती तयारच आहे म्हणू."

"मग म्हणजे तुम्ही आम्हाला मदत करणार नाही?" डॅवानने विचारलं.

डॅवान आणि डॉर्समधला हा संवाद लक्षपूर्वक ऐकणाऱ्या सेल्डनच्या कपाळावर गोंधळलेले भाव होते आणि आठ्या. तो म्हणाला, "एवढं सरधोपट नाही ते. आम्हाला तुम्हाला मदत करायला नक्की आवडेल. आम्ही तुमच्या बाजूनेच आहोत. कुणीही शहाणासुर्ता माणूस समाजात द्वेष आणि संशय पेरून आपले स्थान अबाधित ठेवू पाहाणाऱ्या साम्राज्यव्यवस्थेच्या बाजूने असूच शकत नाही. ही व्यवस्था नीट काम करते आहे असं वाटलं तरीही ती छद्मस्थिरताच असते. म्हणजे, कधीही ती या बाजूला नाहीतरी त्या बाजूला कोसळू शकते. पण प्रश्न असा आहे, आम्ही मदत करणार ती नेमकी कशी? माझ्याकडे सायकोहिस्ट्रीचं शास्त्र विकसित झालेलं असतं- तर मी काय होऊ शकेल हे थोडंफार सांगू शकलो असतो. किंवा कोणकोणत्या शक्यतांचे पर्याय वापरले तर सगळ्यात जास्त कल्याणकारी शेवट कशातून संभवतो ते सांगू शकलो असतो. मी माझी ही क्षमता तुमच्यासाठी वापरू शकेन. पण सध्या माझ्याकडे ती क्षमता नाही. मी तुम्हाला सर्वात प्रभावी मदत करू शकेन ती सायकोहिस्ट्रीचं शास्त्र विकसित करण्याकडे लक्ष केंद्रित करून."

"त्याला किती वेळ लागेल?"

"सांगू शकत नाही," सेल्डन खांदे उडवत उत्तरला.

"आम्ही अनिश्चित काळापर्यंत वाट पाहात थांबावं असं तुम्ही कसं म्हणू शकता?"

"माझ्याकडे पर्याय तरी काय आहे? मी जसा आहे तसा तुमच्यासाठी निरुपयोगी आहे. पण एक सांगतो, मला अघदी अलिकडेपर्यंत वाटत होतं, की सायकोहिस्ट्रीचं तंत्र विकसित होणं अगदी पूर्णपणे अशक्य आहे. आता मला तसं वाटत नाही."

"म्हणजे तुम्हाला काहीतरी उत्तर सापडतंय?"

“नाही. एवढंच की उत्तर सापडू शकेल असं मला वाटू लागलंय. असं मला का वाटतंय हेही मी नक्की नेमकेपणाने सांगू शकणारा नाही. कदाचित् ती फसवी भावनाही असू शकेल... पण मी प्रयत्न करतोय. आणि मला तेच करू द्या. आपण कदाचित् परत भेटू.”

“किंवा कदाचित्, तुम्ही आता जिथे रहाताय तिथे गेल्यानंतर तुम्हाला कळेल की तुम्ही सम्राटाच्या सापळ्यात अडकला आहात. तुम्हाला वाटतंय की सायकोहिस्ट्रीच्या विकासाचा प्रयत्न तुम्ही करत असताना, साम्राज्याचं सरकार तुम्हाला सोडून देतील. पण मला खात्री आहे की सम्राट आणि त्याचा तो कुत्रा डेमेर्झेल काही अनिश्चित काळापर्यंत वाट पाहाण्याच्या मनस्थितीत नाहीत- माझ्यासारखेच.”

“घाई करणं त्यांच्या फायद्याचं नसेल.” सेल्डन शांतपणे म्हणाला, “मी तुमच्या बाजूने आहे तसा त्यांच्या बाजूने नाही. चल, डॉर्स, जाऊ या.”

ते वळले आणि बाहेर पडले. बाहेर रॅच त्यांची वाट पाहात होता. त्या कळकटलेल्या खोलीत डॅवान एकटाच बसून राहिला.

७५-

रॅच खात होता, बोटं चाटत होता आणि त्याचवेळी त्या खाऊची कागदी पिशवी चुरगाळत होता. कांद्याचा उग्र वास त्याच्या भोवती दरवळत होता. यीस्ट वापरल्याचा आंबूस दर्प होता त्याला.

डॉर्स त्या वासाला बिचकून मागे सरत म्हणाली, “तुला खायला कुठून मिळालं इथे, रॅच?”

“डॅवानच्या माणसांनी. माझ्यासाठी आणलं त्यांनी. डॅवान बराय तसा.”

“म्हणजे आता तुला जेवण द्यायला नको ना आम्ही?” सेल्डनच्या स्वतःच्याच

पोटात भूक गडगडत होती.

“काहीतरी तर द्यायलाच हवं तुम्ही मला.” तो हावऱ्या नजरेने डॉर्सकडे पाहू लागला, “या मॅडमचा सुरा कसा राहील? एक पुरे.”

“सुरा मिळणार नाही.” डॉर्स म्हणाली, “आम्हाला सोड, त्यानंतर मी तुला ५ क्रेडिट्स देईन.”

“पाच क्रेडिट्समधे सुरा मिळत नाही.” रॅच कुरकुरला.

“पाच क्रेडिट्सच्या वर काहीही मिळणार नाहीये तुला.” डॉर्स म्हणाली.

“फार बेक्कार आहात तुम्ही.” रॅच म्हणाला.

“एकदम बेक्कार आणि तेज सुरावालीपण आहे, रॅच. त्यामुळे, चल आता.”

“ठीकै ठीकै. एवढं काय करकरायला नकोय.” रॅचने हात हलवला आणि म्हणाला, “या इकडून.”

पुन्हा त्या रिकाम्या सुनसान गल्ल्यांतून ते चालू लागले, पण या वेळी डॉर्स इकडे तिकडे बघत चालली होती आणि अचानक थांबली. “जरा थांब, रॅच. आपला पाठलाग होतोय.” रॅच वैतागलाच. “ऐकू कसं आलं तुम्हाला. असं नाही होऊ शकत.”

“मला काहीच ऐकू येत नाहीये.” सेल्डन मान कलती करत म्हणाला.

“मला येतंय,” डॉर्स म्हणाली, “रॅच, मला काहीही नसते धंदे चालणार नाहीत. सांग सरळपणे, हा काय प्रकार आहे- नाहीतरी डोक्यावर असा दणका देईन

ना की आठवडाभर मान वर करून पाहाता येणार नाही. आणि मी हे खरोखर सांगतेय.''

रॅचने जणू तिच्या दणक्यापासून स्वतःला वाचवायला एक हात समोर धरला, ''काय करायचं ते करा, बेक्कार कुठल्या. करा करा... ती डॅवानची माणसं आहेत. आपल्या सुरक्षेसाठी आलेत ते बरोबर- कुणी सुरेवाले आले तर भिडायला.''

''डॅवानची माणसं?''

''हो, ते बाजूच्या चिंचोळया वाटांवर आहेत.''

डॉर्सचा उजवा हात खाटकन् त्याच्या शर्टच्या कॉलरवर पडला आणि तिने त्याला वरच्यावर उचलून धरलं. तो ओरडू लागला, ''ओ ओ, बाई...''

''डॉर्स! किती कडक वागतेस त्याच्याशी?'' सेल्डन म्हणाला.

''आणखी कठोर होईन- तो खोटं बोलतोय असं मला वाटलं तर. मला तुझं रक्षण करायचंय, हॅरी, त्याचं नव्हे.''

''मी खोटं सांगत नाहीये,'' रॅच धडपड करत केकाटला, ''खरंच सांगतो.''

''मला तर वाटतं तो खरं बोलतोय.'' सेल्डन म्हणाला, ''बघू आपण, रॅच, त्यांना बाहेर यायला सांग, आम्हाला दिसतील अशा बेताने.''

डॉर्सने त्याला सोडून दिलं, आणि हात झटकले.

''तुमचा आटा जरा ढिल्ला आहे मॅडम.'' रॅच कळवळत म्हणाला. मग तो जरा मोठ्याने बोलला, ''याय्, डॅवान... तुमच्यापैकी कुणीतरी पुढे या.'' मग जरा वेळ शांतताच होती. मग त्या गल्लीच्या एका बाजूच्या दुकानाच्या बोळातून दोन माणसं पुढे आली. काळ्या मिशावाली. एकाच्या गालावर एक उभा लांबलचक व्रण होता. दोघांच्याही हातात एकेक खुला सुरा होता.

“कितीजण आहात तुम्ही आणखी?” डॉर्सने कडक आवाजात विचारलं.

“आहेत काहीजण,” नव्यानेच पुढे आलेला एकजण उत्तरला. “आदेश आहेत तसे आम्हाला. आम्ही तुमच्या सुरक्षेसाठी तैनात आहोत. डॅवानला तुम्ही सुरक्षितपणे पोहोचावं याची काळजी आहे.”

“थँक्यू. आणखी सावधपणे, आवाज न करता चाला. चल रॅंच, पुढे हो.”

रॅंच रुसक्या आवाजात म्हणाला, “मी खरं सांगत होतो, तरी तुम्ही माझ्याशी हिसकफिसक केलीत.”

“बरोबर आहे तुझं,” डॉर्स म्हणाली, “तू बरोबर म्हणतोयस. आणि मी तुझी माफी मागते.”

“मी कशाला मानू तुमचा शब्द?” रॅंचने मान ताठ केली, “पण ठीकै, एकदा माफ केलं.” आणि तो पुढे चालू लागला.

जेव्हा ते हमरस्त्याला पोहोचले तेव्हा त्यांचे ते अदृश्य रक्षक खरोखरच नाहीसे झाले. निदान डॉर्सच्या तिखट कानांवरतरी त्यांची चाहून लागेनाशी झाली होती.

आता ते डाह्लच्या जरा बऱ्या वस्तीत पोहोचले होते. डॉर्स विचारात पडून म्हणाली, “तुला बसतील असे कपडे आमच्याकडे नाहीत, रॅंच.”

“मला बसतील असे कपडे कशाला हवेत तुम्हाला, मिस?” त्या गल्लीतून बाहेर पडल्यावर ती बरी वस्ती त्याच्यावर जणू चाल करून येत होती. “माझ्याकडे कपडे आहेत.”

“मला वाटलेलं तुला आमच्याकडे येऊन आंघोळ करायला आवडलं असतं.”

“कशाला?” रॅच म्हणाला, “करीन मी उद्यापरवा आंघोळ. आणि माझ्याकडचा दुसरा शर्टपण घालेन.” मग त्याने धूर्तपणे डॉर्सकडे बघत विचारलं, “मला हिसकफिसक केलं त्याचं वाईट वाटतंय ना तुम्हाला? म्हणून मांडवली करताय...”

डॉर्स हसली, “हं, तसंच काहीतरी.”

रॅचने ऐटीत हात हवेत फिरवत सांगितलं, “ठीकाय ठीकाय. एवढं काय दुखवलं नाही तुम्ही मला. हे पहा, तुम्ही बाई असून खूप ताकदवान आहात. तुम्ही मला असं काय उचललंत जणू मला काही वजनच नव्हतं.”

“मी चिडलेले, रॅच. मास्टर सेल्डनची काळजी करावीच लागते मला.”

“तुम्ही काय त्याचा बॉडीगार्ड आहात काय?” रॅचने सेल्डनला विचारलं, “बाईला बॉडीगार्ड म्हणून नेमलंत तुम्ही?”

“अरे बाबा, मी काही करू शकत नाही,” सेल्डन जरा तोंड वाकडं करत हसला, “ती ऐकत नाही. आणि तिला ते चांगलं जमतंही.”

डॉर्स म्हणाली, “बघ परत एकदा विचार कर, रॅच. आंघोळ नाही करायची तुला? छान मस्त, गरमगरम पाण्याची आंघोळ?”

रॅच म्हणाला, “शक्यच नाही ते. तुम्हाला वाटतं का ती त्या घरातली बाई मला पुन्हा घरात घेईल असं?”

डॉर्सने पाहिलं,तर कॅसिलिया टिसाल्वरबाई अपार्टमेन्ट कॉम्प्लेक्सच्या मुख्य फाटकातच उभ्या होत्या आणि परजगातल्या बाईकडे आणि त्या झोपडपट्टीतल्या पोराकडे रोखून बघत होत्या. कुणाकडे बघताना त्यांचे डोळे जास्त आग ओकत होते ते सांगता आलं नसतं.

रॅच म्हणाला, “ठीक तर, मिस्टर आणि मिस. तुम्हाला तरी त्या घरात घेतील की सांगता येत नाही.” तो दोन्ही हात खिशात घालून चालू लागला, आपण कुणाची पर्वा करत नाही असं त्याच्या चालीतून स्पष्ट होत होतं.

सेल्डन म्हणाला, “गुड इवनिंग, मिसेस टिसाल्वर. बराच उशीर झालाय नाही कां?”

“फारच जास्त उशीर,” ती म्हणाली, “आज इथे दंगलच व्हायची- तुम्ही त्या पत्रकाराला त्या किड्यामकोड्यांपुढे ढकललंत तेव्हा.”

“आम्ही कुणालाही कुणापुढे ढकललेलं नाही,” डॉर्स उत्तरली.

“मी होते तिथेच,” मिसेस टिसाल्वर हेकटपणे म्हणाल्या, “मी स्वतः पाहिलं.”

मग त्यांना आत घेण्यासाठी ती जराशी बाजूला सरकली, पण मनाविरुद्ध आपण हे करतोय हे पुरेसं स्पष्ट करत अगदी सावकाशपणे.

“ही एक शेवटची काडी पडल्यासारखी वागतेय ती.” डॉर्स जिन्याने वर जाताजाता सेल्डनला म्हणाली.

“करून करून काय करणार ती?” सेल्डन उत्तरला.

“काय माहीत!” डॉर्स म्हणाली.

१६

# अधिकारी

रॅच- हॅरी सेल्डनच्या सांगण्यानुसार रॅचबरोबरची पहिली भेट ही केवळ योगायोगाची होती. त्याला सेल्डनने पत्ता विचारला तेव्हा अगदीच रस्त्यावरचं भिकारडं पोर होतं ते. पण त्या क्षणापासून त्याचं आयुष्य या महान गणितज्ञाच्या आयुष्याशी जणू घट्ट धाग्यांनी बांधलं गेलं. अगदी-

दीर्घिका ज्ञानकोष

७६-

दुसऱ्या दिवशी सकाळी आंघोळ करून, दाढी करून, फक्त पॅन्ट घातलेली असताना सेल्डनने डॉर्सच्या खोलीच्या दरवाजावर टकटक केली आणि म्हणाला, “दार उघड, डॉर्स.” तिने दार उघडलं. तिचे पिंगट सोनेरी केस अजून ओले होते, आणि तिनेही नुसतीच पॅन्ट घातली होती. सेल्डन शरमून, दचकून मागे सरकला. डॉर्सने आपल्या छातीकडे निर्विकारपणे पाहात डोक्याभोवती टॉवेल गुंडाळून घेतला.

“काय झालं?” तिने विचारलं.

सेल्डन नजर उजवीकडे लावत म्हणाला, “मी तुला वाय प्रांताबद्दल विचारणार होतो.”

डॉर्स अगदी सहज स्वरात म्हणाली, “कशाच्या संदर्भात काय? आणि अरे काय हे- मी काय तुझ्या कानाकडे पाहून बोलू काय? तू काय अजून कौमार्य राखून आहेस की काय?”

“मी फक्त नम्रतेपोटी तिकडे बघतोय. तुला काही हरकत नसेल तर मलाही नाही. आणि मी ‘वाय’ प्रांताबद्दल विचारणार होतो.”

“काय माहिती हवीय? वाय बद्दल काय?”

“मी गंभीरपणे विचारतोय, डॉर्स. अनेकदा येताजाता वाय प्रांताचं नाव कुणीतरी घेतं. किंबहुना वाय प्रांताच्या प्रमुखांचं. महापौर. ह्युमिननेही उल्लेख केला होता. तू केलास. डॅवाननेही काले. मला त्या विभागाबद्दलही काही माहीत नाही आणि त्या महापौराबद्दलही.”

“मी तरी कुठे ट्रॅन्टोरियन आहे मूळची, हॅरी? मलाही फारशी माहिती नाही. तरीही जे माहीत आहे तेवढं सांगते. वाय दक्षिण ध्रुवाजवळ आहे, बराच मोठा प्रांत आहे आणि खूप मोठी लोकसंख्या आहे तिथली. “

“ध्रुव प्रदेशात एवढी लोकवस्ती?”

“आपण काही हेलिकॉनवर नाही, किंवा सिन्नावरही नाही, हॅरी. हे ट्रॅन्टॉर आहे. सगळं भूमीगत आहे इथे. ध्रुवांवरही भूमीगत, विषुववृत्तावरही भूमीगत. अर्थात दिवसरात्रीचा काळ जरा ध्रुवीय दिवसरात्रीसारखा ठेवतात ते. उन्हाळ्यात लांबलचक दिवस आणि हिंवाळ्यात लांबलचक रात्री वगैरे सांभाळतात. खऱ्या पृष्ठभागावर असतात तसे. हे विषम हवामान वगैरे केवळ तांत्रिक खेळ असतो. ध्रुव प्रदेशात असल्याचा काहीसा अभिमान असतोच त्यांना.”

“पण अपरसाईड तर नक्कीच थंडगार असेल नाही...”

“हो तर, वायच्या अपरसाईडवर बर्फ आणि बर्फच असतं. पण तरीही फार जाड थर लागत नाही. तसं झालं तर मग तिथला घुमट भारानेच कोसळेल. पण तसं होत नाही, म्हणून तर वाय प्रांत बलाढ्य आहे.” ती आरशाकडे वळली. ओला टॉवेल काढून टाकत एक कोरडं जाळीदार कापड तिने डोक्यावर ठेवलं तसं काही सेकंदांत तिचे केस छान चमकू लागले.

“ती कातडी टोपी घालावी लागत नाही याचा मला काय आनंद होतोय सांगू...” असं म्हणत तिने अंगात शर्ट चढवलं.

“बर्फाच्या थराचा आणि वायच्या बलाढ्यपणाचा काय संबंध?”

“विचार कर ना. चार कोटी लोक भरपूर ऊर्जा वापरतात. त्यातील प्रत्येक उष्मांक अखेर उष्णतेत बदलतो- ती उष्णता काढून टाकावी लागते. ती उष्णता ध्रुवांच्या म्हणजे विशेषतः दक्षिण ध्रुवाच्या- तो अधिक विकसित प्रदेश आहे ना- त्या टोकाकडून अंतराळात पाईपने सोडून दिली जाते. या प्रक्रियेत तिथलं बर्फ वितळत रहातं. त्यातूनच ट्रॅन्टॉरवरचे ढग, पाऊस वगैरे तयार होतं. वेधशाळेचे लोक काहीही म्हणू देत- ते म्हणतात ही प्रक्रिया इतक सरळसोट नाही वगैरे.”

“वाय प्रदेश ही ऊर्जा सोडून देण्याअगोदर तिचा काही वापर करतो का?”

“शक्य आहे. पण नक्की काही माहीत नाही. आणि बरं का- उष्णता बाहेर फेकण्याचं तंत्रज्ञान काहीही असो, मी बोलतेय ते राजकीय ताकदीबद्दल. जर डाह्लने ऊर्जा निर्माण करणं थांबवलंच तर ट्रॅन्टॉरची फार मोठी गैरसोय होईल, पण इतर काही विभागांतूनही ऊर्जानिर्मिती होत असते- ते आपलं उत्पादन वाडवतील आणि मग अर्थात ऊर्जेचा साठी इथे नाही तर तिथे असतोच. डाह्लकडे बघून घेतील सावकाशीने- तेवढा वेळ असेल. पण वाय भागाचं वेगळं आहे-”

“काय?”

“वायमधून ट्रॅन्टॉरवरच्या उष्णतेपैकी जवळपास नव्वद टक्के उष्णता बाहेर फेकली जाते. आणि त्यांना पर्याय नाही. वायने जर उष्णता बाहेर फेकायचं थांबवलं तर ट्रॅन्टॉरवर सगळीकडे तापमान वाढू लागेल.”

“वायमध्येही होईलच ते ना-”

“हो, पण वाय दक्षिणध्रुवावर आहे, ते बाहेरून थंड हवा आत घेऊ शकतील. फार काही छान नसेल ते, पण बाकीच्या ट्रॅन्टॉरपेक्षा ते अधिक टिकाव धरतील नक्की. मुद्दा असा आहे, की सम्राटाच्या दृष्टीने वाय भयंकर नाजूक बाब आहे. आणि वायचे महापौर हे फार शक्तीशाली ठरू शकतात.”

“काय प्रकारचा इसम आहे हा वायचा महापौर?”

“ते नाही माहीत मला. कानावर आलंय की ते फार वृद्ध आहेत आणि कुणाशी फार संपर्क ठेवत नाहीत. पण एखाद्या अंतराळयानाच्या टोकासारखे कठोर आणि कणखर आहेत आणि चलाखपणे खेळ्या करत सत्तेला घट्ट धरून आहेत.”

“पण मला प्रश्न पडतो... एवढे वृद्ध असतील तर किती काळ सत्तेला चिकटून बसतील?”

“कोणास ठाऊक, हॅरी? जन्मभर तोच एक जुनून असेल तर राहू शकतील. शिवाय सत्तेसाठी खेळ्या करणं हा सुद्धा एक खेळच असू शकतो त्यांच्यासाठी- सत्तेची खरी हांव नसेलही- खेळाचीच मजा घेत असतील. समजा त्यांच्याकडे सत्ता चालून आली आणि त्यांनी डेमेर्झेलची जागा घेतली किंवा अगदी सिंहासनावरही बसले तर त्यांना थोडी निराशाच वाटेल- कारण खेळ संपून गेलेला असेल. अर्थात जगले वाचले तर आहे ती सत्ता टिकवण्याच्या खेळ्या नव्याने करू लागतीलच. जे अवघड असलं तरीही त्यांना समाधान देणारं असेल.”

सेल्डनने मान झटकली, “मला वाटत नाही कुणालाही सम्राट होण्याची स्वतःहून इच्छा असेल असं.”

“कुणाही शहाण्या माणसाला नाही वाटणार, मान्य, पण म्हणतात ना साम्राज्याची स्वप्ने- हा एक रोग असतो, एकदा जडला की शहाणपण सुटतं. आणि सत्तेच्या जवळ पोहोचलात की मग प्रत्येक पावलासरशी-”

“रोग वाढतच जातो. स्पष्टच आहे. पण मला असंही वाटतं की ट्रॅन्टॉर हे इतकं प्रचंड जग आहे, त्याच्या गरज इतक्या एकमेकांत गुंतलेल्या आहेत, त्यातील महत्त्वाकांक्षांचे नाट्य इतके जबरी आहे, की सम्राटाला राज्य करता येणेच दुरापास्त व्हावे. त्यापेक्षा ट्रॅन्टॉर सोडून कुठल्यातरी जरा साध्या जगात स्वतःला प्रस्थापित करणं त्याला सोपं जाईल नाही?”

डॉर्स हसली, “इतिहास माहीत असता तर असा प्रश्न तू विचारलाच नसतास. सम्राटाच्या प्रासादात नसेल तर तो सम्राटच नसतो. तो एक व्यक्तीच नसतो तर एक स्थानही असतो.” सेल्डन गप्प होत विचारात बुडाला. त्याचा चेहरा पाषाणवत् झाला. काही वेळानंतर डॉर्सने विचारलं, “काय झालं काय, हॅरी?”

“विचार करतोय.” त्याचा आवाज घशातल्या घशातून आला.

“जेव्हापासून तू ती मांडीवरच्या हाताची गोष्ट सांगितलीस,तेव्हापासून माझ्या मनात चलबिचल चालली आहे- आणि आता हा तुझा शेरा- सम्राट हा एक व्यक्ती नसून एक स्थान आहे- त्यानेही एक तार झंकारलीय जणू.”

“कसली तार?”

सेल्डनने मान हलवली, “अजून विचार करतोय... कदाचित् चुकत असेन.” डॉर्सकडे पाहाणारी त्याची नजर आता जणू जमिनीवर आली. “ते जाऊ दे,

आपल्याला खाली जाऊन नाश्ता घेतला पाहिजे. उशीर झालाय, आणि मला नाही वाटत मिस्ट्रेस टिसाल्वेर आपला नाश्ता इथं आणून देतील आपल्याला.''

''काय अपेक्षा, काय अपेक्षा.'' डॉर्स म्हणाली, ''मला तर वाटतं, की नाश्ता सोड ती आपल्याला इथं राहू देण्याच्याही मनस्थितीत नसावी. आपण इथून लवकरात लवकर जावं असंच वाटतंय तिला.''

''असेलही. पण आपण तिला पैसे देतोय.''

''पण तिला आपला एवढा राग आलाय की आपले पैसेही तिला तुच्छ वाटतायत.''

''कदाचित् तिच्या नवऱ्याला आपल्या पैशाचं कौतुक असेल.''

''तो एक शब्दही बोलू शकला तर मला नवल वाटेल- म्हणजे मिसेस टिसाल्वेरपेक्षा कमीच. चल, जाऊ या.''

आणि ते दोघे टिसाल्वेर रहात असलेल्या खोलीकडे जिना उतरून गेले. तिथं नाश्ता नाही तर टिसाल्वेर बाईच मोठ्या तयारीत वाट पाहात उभ्या होत्या.

७७

कॅसिलिया टिसाल्वेर ताठ उभी होती, तिच्या गोलमटोल चेहऱ्यावर एक स्मितरेषा ताणली गेली होती आणि तिचे काळे डोळे चकचकत होते. तिचा नवरा भिंतीला टेकून उभा होता. खोलीच्या मध्यभागी दोन पुरुष उभे होते. जमिनीवर मांडलेल्या उशा त्यांनी पाहिलेल्या, पण त्यांच्याकडे तुच्छ नजर टाकून ते उभे होते. दोघांचेही केस काळे कुळकुळीत, कुरळे होते आणि डाह्लाईटला शोभेशी जाड काळी मिशीही दोघांच्या ओठांवर होती. दोघेही काटकुळे होते आणि दोघांचाही पोषाख गडद रंगाचा होता- जणू गणवेषच. त्यांच्या खांद्यावरून खाली योणारी पांढरी

पायपिंग पॅन्टच्या पायांवरून खाली उतरत होती. प्रत्येकाच्या छातीवर उजव्या बाजूला साऱ्या दीर्घिकेभर साम्राज्याचं चिन्ह म्हणून मान्य असलेलं अवकाशयान आणि सूर्य हे चिन्ह मंदपणे झळकत होतं. सूर्याच्या चित्राच्या मध्यावर काळया रंगात डी लिहिलेलं- म्हणजे हे डाह्लाईट पोलीस असणार असं सेल्डनने ताडलं.

"हे काय चाललंय?" सेल्डनने कठोर आवाजात विचारलं.

त्यातला एकजण पुढे येत म्हणाला, "मी लॅनेल रुस, सेक्टर ऑफिसर आहे इथला. आणि हा माझा सहकारी, गेबोर आस्टिनवाल्ड." दोघांनीही आपापले चकाकते होलोटॅब्स काढून दाखवली. सेल्डनने तिकडे नजरही टाकली नाही. "काय हवंय तुम्हाला?"

"तुम्ही हेलिकॉनचे हॅरी सेल्डन का?" रुसने शांतपणे विचारलं.

"होय."

"आणि मॅडम तुम्ही, डॉर्स वेनाबिली, सिनाच्या नागरिक?"

"होय." डॉर्स उत्तरली.

"मी इथे चौकशीसाठी आलो आहे. कुणी हॅरी सेल्डन नावाच्या माणसाने इथे काल दंगलीला चिथावणी दिली होती अशी तक्रार आहे."

"मी असं काहीही केलेलं नाही." सेल्डन उत्तरला.

"आमची माहिती अशी आहे..." रुस त्याच्या हातातल्या छोट्या कॉम्प्युटर पॅडकडे पाहात बोलू लागला, "की तुम्ही एका वार्ताहरावर साम्राज्याचा दलाल असल्याचा आरोप केलात- आणि त्याच्या विरुद्ध लोकांना चिथावलेत."

डॉर्स म्हणाली, “ते तर मी म्हणालेले, ऑफिसर. आणि तो तसा होता असं वाटायला कारणच घडलं होतं. आपलं मत मांडणं हा काही गुन्हा नाही. या साम्राज्यात अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे.”

“मुद्दाम दंगलीला चिथावणी देण्यासाठी केलेलं भाषण त्यात मोडत नाही.”

“तसं ते होतं असं तुम्ही कशाच्या आधारे म्हणता, ऑफिसर?”

या वेळी मिस्ट्रेस टिसाल्वेर मधेच किंचाळत बोलू लागल्या. “मी सांगू शकते, ऑफिसर. तिने पाहिलं, जमलेली गर्दी एकदम गटारगर्दी होती. त्यांना काहीतरी निमित्तच पाहिजे होतं. काहीही माहीत नसताना तिने जाणीवपूर्वक त्याला साम्राज्याचा दलाल म्हटलं- गर्दीकडे पाहून ती कारण नसताना ओरडली- त्यांना चिथवण्यासाठीच. तिला बरोब्बर कळत होतं ती काय करतेय ते.”

“कॅसिलिया,” तिचा नवरा विनवणीच्या सुरात विव्हळला, पण तिने एकच नजर टाकली नि तो गप्पच झाला.

रुस टिसाल्वेर बाईकडे वळला, “तुम्हीच तक्रार केली काय?”

“होय. हे दोघे गेले काही दिवस इथे रहात आहेत- तेव्हापासून त्यांनी नुसता वैताग आणलाय. खालच्या थरातल्या लोकांना इथे बोलवून घेतात- माझ्या शेजाऱ्यांमध्ये माझं नाक खाली झालं यांच्यामुळे.”

“हा गुन्हा आहे का?” सेल्डन बोलू लागला, “स्वच्छ, सुस्वभावी डाह्लच्या नागरिकांना घरी बोलावणं हा गुन्हा आहे का? इथल्या वरच्या दोन खोल्यांत आम्ही रहातो. पैसे भरून भाड्याने घेतल्यात त्या आम्ही. डाह्लमध्ये डाह्लाईट्सशी बोलणं हा गुन्हा आहे का, ऑफिसर?”

“नाही, अजिबात नाही,” रुस उत्तरला. “आणि तक्रार त्याबद्दल नाहीये. मिस्ट्रेस वेनाबिली, ज्याच्यावर तुम्ही आरोप केलात तो साम्राज्याचा दलाल आहे असं तुम्हाला कशामुळे वाटलं?”

डॉर्स म्हणाली, “त्याच्या मिशा तपकिरी आणि अगदीच खुरट्या होत्या. म्हणजे तो डाह्लाईट तर नव्हताच. त्यावरून मला वाटलं की तो साम्राज्याचा दलाल असेल.”

“तुम्हाला वाटलं? तुमच्या या सहकाऱ्याला- मास्टर सेल्डनना तर मिशाच नाहीत. मग ते काय साम्राज्याचे दलाल आहेत?”

“आणि काही असलं तरी,” सेल्डन घाईघाईने बोलला, “दंगलबिंगल काही झाली नाही. आम्ही जमलेल्या गर्दीला सांगितलंही की त्या तथाकथित वार्ताहराविरुद्ध काही करू नका, जाऊ द्यात म्हणून. माझी खात्री आहे, तसंच झालं असेल.”

“खात्री आहे तुमची, मास्टर सेल्डन?” रूस म्हणाला. “आमची माहिती अशी आहे की हा आरोप केल्यावर तुम्ही लगेचच तिथून निघून गेलात. तुम्ही गेल्यानंतर काय झालं हे तुम्हाला कसं दिसलं?”

“नाही दिसलं,” सेल्डन उत्तरला, “पण मी विचारतो, तो मनुष्य मेलाय का? जखमी झालाय का?”

“त्याच्याशी बातचीत झालीय. आपण साम्राज्याचा दलाल असल्याचं तो नाकारतो. आणि आपल्याला धक्काबुक्की झाली असंही तो सांगतोय.”

“दोन्ही गोष्टी तो खोट्या सांगत असेल. सायकिक प्रोब वापरून पहा म्हणेन मी.”

"त्याच्या परवानगीशिवाय ते करता येणार नाही." रुस म्हणाला, "या प्रभागाच्या शासनाचा नियम आहे तसा. तुम्ही दोघांनी सायकिक प्रोब घेणं मान्य केलंत तर ते कदाचित् विचार करतील. तुम्हाला मान्य आहे का?"

सेल्डन आणि डॉर्सची नजरानजर झाली आणि सेल्डन उत्तरला, "अजिबातच नाही."

"शक्यच नाही नै का?" रुसच्या स्वरात किंचित उपरोध होता. "पण दुसऱ्या कुणावर तरी ते वापरण्याची सूचना तुम्ही करताय खुशाल." दुसरा ऑफिसर आस्टिनवाल्ड जो आतापर्यंत चूप होता, यावर हसला.

रुस म्हणाला, "आम्हाला अशीही माहिती मिळाली आहे, की दोन दिवसांपूर्वी तुम्ही दोघे बिलिबॉटनमध्ये एका मारामारीतही होतता. सुऱ्यांची मारामारी. आणि एका डाह्लाईट नागरिकाला त्यात गंभीर दुखापत झाली- काय बरं त्याचं नाव..." त्याने हातातल्या पॅडकडे पाहिलं.

"एल्गिन मॅरॉन." डॉर्स म्हणाली. "ही मारामारी कशी सुरू झाली याविषयीची काही माहिती आहे का आपल्याकडे?"

"त्याचा काही संबंध नाही इथे, मॅडम. अशी मारामारी झाली हे तुम्ही नाकारताय का?"

"अर्थातच नाही. मारामारी झाली हे खरंय." सेल्डन रागात म्हणाला, "पण आम्ही ती मारामारी सुरू केली नाही. आमच्यावर हल्ला झाला. मिस्ट्रेस वेनाबिली यांच्यावर या मॅरॉनने झडप घातली आणि त्यांच्यावर बलात्कार करण्याचा त्याचा उद्देश होता हे स्पष्ट होतं. त्यानंतर जे झालं ते स्वसंरक्षणार्थ होतं. की डाह्लमध्ये बलात्कार क्षम्य मानला जातो?"

रुसचा आवाज सपाट होता, “तुमच्यावर हल्ला झाला म्हणताय? किती जण होते हल्लेखोर?”

“दहाजण.”

“आणि तुम्ही एकटे? एका स्त्रीबरोबर एकटे असताना तुम्ही दहाजणांपासून स्वसंरक्षण केलंत म्हणताय?” “मिस्ट्रेस वेनाबिली आणि मी आम्ही दोघांनी आपापलं संरक्षण केलं. हो.”

“मग तुम्हा दोघांनाही कुठे साधा ओरखडाही नाही. कसलीच जखम नाही, हे कसं काय? दिसणार नाही अशा ठिकाणी लागलंय का?”

“नाही, ऑफिसर,”

“मग हे कसं काय शक्य आहे- एकजण- बरोबर फक्त एक बाई असताना दहाजणांशी लढतो. आणि कुठेही जखमा नाहीत. आणि तक्रारदार एल्गिन मॅरॉन इस्पितळात दाखल आहे आणि त्याच्या ओठांच्या वरच्या बाजूला स्किन ट्रान्स्प्लांट करावं लागतंय.”

“आम्ही फारच चांगल्या प्रकारे लढलो.”

“अगदी विश्वास न बसण्याइतकं चांगलं लढलेला दिसताय. तीन माणसांनी साक्ष दिलीय की तुम्ही दोघांनी काहीही कारण नसताना मॅरॉनवर हल्ला करून त्याला जखमी केलंत- काय म्हणणंय यावर?”

“विश्वास ठेवावा लागेल- कारण मॅरॉनची ख्याती मारामाऱ्या करणारा आणि सुरामारी करणारा म्हणून चांगलीच असणार याची मला खात्री आहे. मी सांगतो तिथे दहाजण होते. अर्थातच बाकी सहाजणांनी शपथेवर खोटं सांगायला नकार दिला असणार. त्या बाकीच्या तिघांनी हे सांगितलं का की ते निष्पाप मॅरॉनवर उगाचच

हल्ला होत असताना, त्याचे प्राण धोक्यात असताना त्याच्या मदतीला का नाही धावून गेले? ते खोटं बोलतायत हे तुम्हाला कळलं असेल बहुतेक.''

''आता त्यांच्यावरही सायकिक प्रोब वापरायला सुचवताय?''

''होय, आणि तुम्ही विचारायच्या आधीच सांगतो- आम्ही सायकिक प्रोबला नाहीच म्हणू.''

रुस पुढे म्हणाला, ''आम्हाला शिवाय अशी ही माहिती मिळाली की काल तुम्ही इथली दंगल सोडून निघून गेलात आणि एका डॅवान नावाच्या इसमाला भेटलात. तो तर नामचीन बंडखोर आहे. हे खरंय का?''

''आमच्या मदतीशिवाय हे सिद्ध करून दाखवा,'' सेल्डन म्हणाला, ''आम्ही यापुढे कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देणार नाही.''

रूसने पॅड बाजूला सारलं. आणि म्हणाला, ''माझा नाईलाज आहे, तुम्हाला आणखी चौकशीसाठी मुख्य कार्यालयात यावं लागेल आमच्यासोबत.''

''त्याची काही गरज पडणार नाही, ऑफिसर,'' सेल्डन म्हणाला, ''आम्ही बाहेरच्या जगातून आलेले लोक आहोत, आणि आम्ही कोणताही गुन्हा केलेला नाही. जो आम्हाला त्रास देऊ पाहात होता त्या वार्ताहराला आम्ही टाळलं. ज्या भागात बलात्कार आणि खून अशा दोन शक्यता असतातच त्यापासून आम्ही स्वसंरक्षणासाठी जे आवश्यक ते केलं. आणि आम्ही काही डाह्लाईट नागरिकांशी संवाद साधला. यात आणखी चौकशी करण्यासारखं काहीही उरलेलं नाही. तसं झालं तर ते त्रास, छळ या मथळ्याखाली जाईल हे नक्की.''

''हा निर्णय आमचा आहे,'' रुस म्हणाला, ''तुमचा नाही. येताय ना आमच्यासोबत, प्लीज?''

''नाही. आम्ही येणार नाही.'' डॉर्स उत्तरली.

“सावधान, तिच्याकडे दोन सुरे आहेत,” टिसाल्वेर बाई ओरडल्या.

“थँक्यू मॅडम, पण मला कल्पना आहे त्याची.” रुस डॉर्सकडे वळून म्हणाला. “तुम्हाला कल्पना आहे का, की या भागातल्या रस्त्यांवर परमिटशिवाय सुरे बाळगता येत नाहीत? तुमच्याकडे परमिट आहे?”

“नाही, ऑफिसर, नाहीये.”

“म्हणजे बेकायदा बाळगलेल्या सुऱ्याने तुम्ही मॅरॉनवर हल्ला केलात. तुम्हाला या गुन्ह्याचं गांभीर्य समजतंय का?”

“हा गुन्हा नव्हता, ऑफिसर,” डॉर्स म्हणाली, “मॅरॉनकडेही सुरा होता, आणि परमिट नव्हतं. हे नक्की.”

“तसा पुरावा नाहीये. आणि मॅरॉनवर सुऱ्याचा वार झाल्याची जखम आहे. तुम्हा दोघांवर साधा ओरखडाही नाही.”

“त्याच्याकडे सुरा होता. तुम्हाला माहीत आहे, बिलिबॉटनमधल्या प्रत्येक पुरुषाकडे आणि डाह्लमध्ये इतरत्रही अनेक पुरुषांकडे सुरे असतात, आणि बहुतेकांकडे परमिट नसतं. हे तुम्हाला माहीत नसेल तर डाह्लमधले तुम्ही असे एकमेव असाल. कुठेही गेलात तर तुम्हाला एक नाही अनेक सुऱ्यांची दुकानं अगदी खुले आम दिसतील. माहीत नाही हे तुम्हाला?”

“मला काय माहीत आहे, काय नाही त्याचा काही संबंध नाही इथे. लोक बेकायदा वागतायत की नाही, किती लोक बेकायदा वागतायत याचाही इथे संबंध नाही. आत्ता इथे प्रश्न आहे तो मिस्ट्रेस वेनाबिली यांनी सुरा बाळगण्याच्या विरुद्धचा कायदा मोडण्याचा. ते सुरे आत्ताच्या आत्ता माझ्या ताब्यात द्या, मिस्ट्रेस वेनाबिली आणि तुम्ही दोघेही माझ्या सोबत मुख्य कार्यालयात यायचं आहे.”

डॉर्स म्हणाली, “तसं असेल तर माझे सुरे काढून घ्या.”

रुसने सुस्कारा सोडला. “डाह्लमध्ये सुरे हे एकमेव शस्त्र नाही, मिस्ट्रेस, आणि तुमच्या बरोबर सुरामारी करण्याचीही मला गरज नाही. माझ्याकडे आणि माझ्या सहकाऱ्याकडे ब्लास्टर्स आहेत- एका क्षणात तुम्हाला उडवू शकतील ते- तुम्ही सुऱ्याच्या मुठीवर हात ठेवण्यापूर्वीच तुमच्या चिंध्या झालेल्या असतील. कितीही वेगात हालचाली करा. अर्थात आम्ही ब्लास्टर वापरणार नाही, कारण आम्ही तुम्हाला ठार मारायला आलेलो नाही. पण आमच्याकडे न्यूरॉनिक व्हिपसुद्धा आहे- तो वापरायला आम्हाला कसलीच आडकाठी नाही. तुम्हाला त्याचं प्रात्यक्षिक बघायची गरज नसावी- त्याचा आघात तुम्हाला ठार मारत नाही. काहीही कायमचं नुकसान करत नाही, कसली जखमही होत नाही- पण ज्या वेदना होतात ना, त्या महाभयंकर असतात. माझा सहकारी तुमच्या दिशेने न्यूरॉनिक व्हिप उगारून या क्षणी उभा आहे. आणि हा माझा. त्यामुळे मिस्ट्रेस वेनाबिली,तुमचे सुरे काढून द्या, आत्ता.”

एक क्षणभर शांतता पसरली. आणि मग सेल्डन म्हणाला, “काही उपयोग नाही, डॉर्स, त्यांना दे तुझे सुरे.”

आणि त्याच क्षणी दरवाजावर जोरजोरात दणके बसल्याचे आवाज आला, आणि एक जोरदार विनवणी त्यासोबत चित्कारत होती.

७८

त्यांना घरी सोडल्यावर रॅच काही तिथून निघून गेला नव्हता.

डॅवानबरोबर झालेल्या त्यांच्या भेटीच्यावेळी त्याने भरपूर खाल्लं होतं. नंतर थोडी झोपही त्याला मिळाली. मग एक पाण्याचा नळ असलेलं बाथरूमही त्याला मिळालं होतं. काम झाल्यावर जाऊन रहावं अशी कुठलीच जागा नव्हती त्याच्याकडे. एक घर होतं- आणि आई म्हणावी अशी एक बाई होती. तो कुठेही

जाऊन उलथला तरी तिला काही फरक पडत नव्हता. कधीच नाही. त्याला आफले वडील माहीत नव्हते. वडील होते का प्रश्नच होता. कुणीतरी सांगितलेलं होते- आणि कशावरून होते याची कारणं त्या कुणीतरी अगदी वाईट शब्दांत सांगितली होती. त्या गोष्टीवर विश्वास ठेवावा की नाही त्याला प्रश्नच पडलेला. पण त्यातले तपशील त्याला फारच रसरशीत वाटत होते. या तपशीलांचा विचार करतानाच त्याला या बाईंची आठवणही झाली खरी. वयाने मोठी होती, पण आकर्षक होती, आणि पुरुषमाणसासारखी लढू शकत होती ती- पुरुषमाणसापेक्षा मस्त. त्याच्या मनात भावना, कल्पना साराच गोंधळ उडालेला. त्याने तिला आंघोळ करायला यायची ऑफर दिली होती.. तो कधीकधी पैसे असले आणि ते दुसऱ्या कशावर खर्च करायची गरज नसली तर बिलीबॉनच्या पोहण्याच्या तलावात पोहायला जात असे किंवा कधी चोरून घुसत असे. संपूर्ण अंगाला पाणी लागण्याची तेवढीच एक वेळ असे. पण ते पाणी थंडगार असे. आणि अंग कोरडं व्हायची वाट पाहात उभं रहावं लागे तेव्हा आणखी थंडी लागत असे.

आंघोळ करणं वेगळं. गरम पाणी, साबण, टॉवेल आणि उबदार हवा. कसं वाटत असेल त्याला कल्पना नव्हती- पण ती तिथे असेल तर छानच वाटेल असंही त्याला वाटलं. त्याला शहराचे कानेकोपरे माहीत होते. ती जिथे गेली होती तिथून जवळच असलेल्या रेस्टरूम्सजवळ त्याला लपून रहाता आलं असतं. आणि त्याला कुणी पकडून हाकलून लावू शकलं नसतं. तो रात्रभर विचार करत राहिलेला. चित्रविचित्र विचार. खरंच आपण लिहायला वाचायला शिकलो तर? काही करता येईल का त्यातून? त्याला नक्की माहीत नव्हतं- पण कदाचित् ‘ती’ सांगू शकेल. त्याला अंधुकसं वाटत होतं, की आपल्याला सध्या जे जमत नाही, ते करायला आपल्याला पैसे मिळतील- पण म्हणजे काय करायला तेही त्याला कळत नव्हतं.

त्याला सांगतील ते करायला- पण कसं, कोण सांगेल? आपण या माणसाबरोबर आणि त्या बाईच्या बरोबर राहिलो तर ते कदाचित् मदत करतील. पण ते कशाला मला बरोबर राहू देतील? त्याला गुंगीतून जाग आली ती उजळत्या प्रकाशामुळे नाही- तर दिवस सुरू झाल्याचे आवाज येऊ लागले ते त्याच्या तिखट कानांनी टिपले. त्याला जवळपास प्रत्येक आवाजाची चाहूल ओळखण्याचं वळणच पडून गेलं होतं- त्या गल्ल्यागल्ल्यांतून वावरल्याचा परिणाम. अगदी कमीत कमी सोयींत जगायचं तर घटना समोर उभ्या ठाकण्याअगोदर त्यांची चाहूल घेता येण्याचं तंत्र जमावं लागतं. आणि आता ऐकू येणाऱ्या मोटरचा आवाज त्याच्या कानात धोका धोका धोका असंच ओरडत होता. त्या आवाजात अधिकाराची जरब होती, शत्रुत्वाचा आवाज होता तो. तो ताडकन् उठून बसला आणि चोरपावलांनी गल्लीतून पुढे सरकला. त्या ग्राउंडकारवरचं अंतराळयान आणि सूर्याचं चिन्ह नीट पाहायचीही गरज नाही वाटली त्याला. तिचा आकार पुरेसा होता. ते दोघे डॅवानला भेटले होते- म्हणजे ते त्यांच्या मागावर येणारच एवढं त्याला कळलंच. त्याने क्षणाचाही विचार केला नाही, मागेपुढे पाहिलं नाही. तो वाढत चाललेल्या रहदारीतून रस्ता कापत धावला. पंधरा मिनिटांत तो तिथे पोहोचला. ती कार तिथेच होती आणि लोक तिच्याभोवती उभे राहून अंतर राखून पण संशयाने तिचं निरीक्षण करीत होते. गर्दी वाढतच जाणार होती. तो धावत पायऱ्या चढून वर गेला... एलेव्हेटर घ्यायला वेळ नव्हता. त्याला दरवाजा सापडला- निदान असं त्याला वाटलं. त्याने हातांच्या मुठी वळून दरवाजावर दणादण बुक्के मारायला सुरुवात केली आणि किंचाळला- "बाई! बाई!" तिचं नाव त्याला आठवत नव्हतं. मग त्या माणसाचं नाव त्याला अर्धवट आठवलं- "हॅरि हॅरि!!" तो ओरडला, "मला आत येऊ दे."

दरवाजा उघडताच तो आत घुसला, ऑफिसरचा दणकट हात त्याच्या दंडावर पडला. “थांब रे ए पोरा! कुठं चाललायस?”

“सोडा मला! मी काही केलं नाहीये!” त्याने त्यांच्याकडे पाहिलं.

“ओ बाई, ते काय करतायत?”

“आम्हाला अटक करतायत.” डॉर्स मख्खपणे उत्तरली.

“कशासाठी?” रॅच धापा टाकत, हात सोडवायची धडपड करत म्हणाला.

“हे, बॅचवाल्या, सोड माझा हात. त्याच्याबरोबर जाऊ नका बाई. जायचं काहीच कारण नाही.”

“तू पहिला चालता हो इथून.” रुस त्याला गदगदा हलवत म्हणाला.

“अजिबात जाणार नाही. आणि तू सुद्धा जाणार नाहीस, बॅजवाल्या, माझी सगळी गॅन्ग येतेय इथे. या दोघांना जाऊ दिलं नाहीस तर तुला इथून बाहेरही पडता येणार नाही.”

“कसली गँग?” रूसच्या कपाळावर आठ्या पडलेल्या.

“बाहेर आलेच असतील ते सगळे. तुझी कार मोडूनतोडून ठेवतील आता. मग तुझी मोडतोडही करतील बघ.”

रुस त्याच्या सहकाऱ्याकडे वळला, “फोन कर. त्यांना मॅक्रोस घेऊन, ट्रक्स घेऊन यायला सांग.”

“नाही!” रॅच किंचाळला आणि हात सोडवून घेऊन आस्टिनवाल्डच्या दिशेने धावला. “अजिबात फोन करू नको, सांगतोय.”

रुसने त्याचा न्यूरॉनिक व्हिप सरळ धरला आणि उडवला. रॅच कळवळून किंचाळला, आणि आपला उजवा खांदा डाव्या हाताने गच्च पकडत खाली कोसळून विव्हळू लागला.

रूस अजून सेल्डनकडे वळलाच नव्हता, तेवढ्यात सेल्डनने त्याचं मनगट पिरगाळलं आणि त्याचा न्यूरॉनिक व्हिप उडवून दिला. मग त्याला पलटवत त्याने पाठीकडून त्याला एका हाताने विळखा घातला आणि त्याच्या पायावर पाय ठेवला. त्याचा खांदा निखळल्याचा कट् आवाज होतानाच रुसच्या घशातून भयंकर वेदनेची किंकाळी बाहेर पडली.

आस्टिनवाल्डने आपला ब्लास्टर झटकन वर उचलला, पण डॉर्सचा डावा हात त्याच्या डाव्या खांद्यावर पडला आणि सुरा गळ्यापाशी टेकला.

“हलू नकोस!” ती म्हणाली, “एक मिलीमीटर जरी हललास, शरीराचा कुठल्याही भागाची हालचाल केलीस तर तुझा गळा आरपार मानेपर्यंत चिरेन. तो ब्लास्टर खाली टाक. टाक! आणि तो न्यूरॉनिक चाबूकही.” सेल्डनने कळवळणाऱ्या रॅचला उचलून घेतलं आणि छातीशी धरलं. मग तो टिसाल्वेरकडे वळला आणि म्हणाला, “बाहेर लोक जमलेत. संतप्त जमाव आहे. मी त्यांना आत येऊ दिलं तर- ते तुझ्या घरातली वस्तू न वस्तू तोडूनफोडून टाकतील. ही शस्त्रं घे या पोलिसाची आणि पुढल्या खोलीत टाकून ठेव. आणि या जमिनीवर पडलेल्या पोलिसाचीही शस्त्रं उचल. पटकन्! तुझ्या बायकोला लाव कामाला. निर्दोष लोकांबद्दल तक्रार करताना दहादा विचार करेल पुढल्या वेळी- डॉर्स, हा जमिनीवर लोळवलेला इतक्यात काहीही करू शकणार नाही. पण या दुसऱ्याला जरा लोळव, ठार नको करूस मात्र.”

“बरोबर!” डॉर्स उत्तरली आणि तिने चाकू उलट्या बाजूने धरत त्याच्या मुठीने त्याच्या कवटीवर हाणला. चेहरा वेडावाकडा करत ती उद्गारली, “हे करणं पसंत नाही मला.”

“त्याने रॅचवर चाबूक चालवला.” सेल्डन स्वतःचा तिटकारा लपवत म्हणाला.

त्यांनी घाईघाईने ते घर सोडलं आणि रस्त्यावर आले. रस्ता गर्दीने भरला होता. त्यांना पाहाताच लोकांनी आरोळ्या ठोकल्या. घामाच्या वासाने हवा गच्च झाली होती- ते पुढे सरकले.

कुणीतरी ओरडलं, “आणि ते बॅजवाले कुठायत?”

“आत आहेत.” डॉर्स उत्तरली. “त्यांना सोडून द्या. थोडा वेळ गप पडून रहातील ते. पण मग कुमक मागवतील. त्यामुळे इथून लवकरात लवकर सटका.”

“पण तुमचं काय?” एकाच वेळी डझनभर आवाज विचारू लागले.

“आम्हीही निघतोय. आणि परत येणार नाहीच.”

“मी घेतो त्यांची काळजी.” रॅच ओरडला. सेल्डनच्या हातातून सुटका करून घेऊन तो जमिनीवर उतरला. उजवा खांदा जोरजोरात चोळत होता तो.

“मी चालू शकतोय. पुढे जाऊ दे मला.”

गर्दीने त्याला रस्ता करून दिला, आणि तो म्हणाला, “बाई आणि मिस्टर, लवकर चला. माझ्या मागून!”

तेवढा रस्ता संपेपर्यंत त्यांच्या सोबत डझनभर माणसं चालत राहिली. आणि मग रॅच अचानक हाताने जागा दाखवत पुटपुटला, “इकडे आत. मी तुम्हाला अशा जागी नेतोय की कुणालाच सापडणार नाही. डॅवानलाही बहुतेक पत्ता नाही या

जागेचा. फक्त जरा गटारांच्या भुयारांमधून जावं लागेल पुढे. कुणाला दिसणार नाही आपण- पण जरा वास मारतो- कळलं ना?”

“करू... राहू तगून.” सेल्डन पुटपुटला.

आणि ते पुढेपुढे जात राहिले. ते भुयार खालीखाली वळत राहिलं- आणि नरकगंधाच्या वाफा उसळत राहिल्या.

७९

रॅचने त्यांना जागा शोधून दिली. लोखंडी शिड्या चढून जावं लागलं. पण ते एका लांबटशा पण ऐसपैस खोलीत पोहोचले. कशासाठी होती ही खोली- सेल्डनला कळेना. तिथं कसलीकसली जडजड बंद पडलेली यंत्रं पडून होती. ती खोली बऱ्यापैकी स्वच्छ होती, सतत येणाऱ्या वाऱ्यामुळे धूळ कुठं टिकून राहिलेली नव्हती. आणि मुख्य म्हणजे इथं वाऱ्यामुळे दुर्गंधीही बरीच कमी होती.

रॅच खूष दिसत होता, “छान आहे की नाही?” त्याने विचारलं.

तो अजूनही खांदा चोळत होता. मधूनच त्याच्या चेहऱ्यावरून वेदनेची कळ चमकून जात होती.

“या पेक्षाही वाईट परिस्थिती नक्कीच ओढवणार होती,” सेल्डन म्हणाला, “ही जागा कशासाठी वापरत, काही माहीत आहे तुला, रॅच?”

रॅच खांदे उडवायला गेला आणि परत कळवळला, “नाही माहीत,” तो म्हणाला, “आणि काय करायचंय ते?” त्याने जरा कुऱ्यात उत्तर दिलं.

डॉर्स हाताने जमीन पुसल्यासारखी करत खाली बसली. मग आपल्या हाताकडे निरखून धूळ आहे का बघत म्हणाली, “माझा अंदाज आहे ती हा सगळा

भाग भंगाराचं रिसायक्लिंग करण्यासाठी ठेवला असावा. कचऱ्याचंही. त्यातली टॉक्सिक्स काढून टाकल्यावर ते खत म्हणून वापरत असतील.''

''म्हणजे मग, हे चालवणारे लोक अधूनमधून खाली येत असणार. कधीही येऊ शकतील ते.'' सेल्डन म्हणाला.

''मी आलोय इथे पूर्वीही. कुणी नाही दिसलं कधी.''

''ट्रॅन्टॉरवर शक्य तिथे ऑटोमेशन आहे. आणि कचऱ्याचं रिसायक्लिंग तर नक्कीच ऑटोमेटेड असणार.'' डॉर्स म्हणाली, ''थोडा काळ तरी आपण सुरक्षित असू.''

''फार वेळ नाही. आपल्याला तहानभूक लागेलच ना.''

''खायचंप्यायचं मी आणेन ना,'' रॅच म्हणाला, ''गल्ल्यांत वाढलोय मी- सगळं जमवावं लागतंच.'' रॅच म्हणाला.

''थँक्यू, रॅच,'' सेल्डन म्हणाला, ''पण सध्यातरी मला भूक नाहीये.'' त्याने हुंगल्यासारखं केलं, ''मला कधी भूक लागेल असं वाटत नाहीये इथे.''

''भूक तर लागेलच तुला,'' डॉर्स म्हणाली, ''आणि भूक गेली तरी पाणी लागेलच. नशीब की पोटातून बाहेर टाकण्याची सोय आहे इथे भरपूर. आपण उघड्या गटारावर रहातोय हे तर सरळच आहे.'' जरा वेळ सगळेच गप्प झाले. उजेड कमीच होता. आणि सेल्डनला प्रश्न पडला, इथे अंधारच ठेवला असता तरी चाललं असतं- कशासाठी उजेडाची सोय केलीय कोण जाणे. मग त्याला जाणवलं, ट्रॅन्टॉरवर कुठल्या सार्वजनिक ठिकाणी पूर्ण अंधार कधीच नसतो. ऊर्जेचा कधीच तुटवडा नसलेल्या समाजाची सवय. चारशे कोटी लोकांचं जग ऊर्जेबाबत एवढं श्रीमंत आहे हे केवढं मोठं नवल आहे. पण ग्रहाच्या पोटातल्या उष्णतेतून ऊर्जा निर्माण करणं, शिवाय अवकाशातील आण्विक ऊर्जानिर्मिती केंद्रे, सौर ऊर्जा ही साधनेही आहेतच.

कधीकाळी अशीही परिस्थिती असेल का की ऊर्जेच्या बाबतीत प्रचंड दारिद्र्य असेल? तो मागच्या पाइपांच्या जाळ्यावर रेलला- त्यातून बहुतेक सांडपाणीच वाहून नेलं जात असावं, हा विचार मनात येताच तो पटकन उठून डॉर्सच्या शेजारी येऊन बसला.

मग त्याने विचारलं, "काहीतरी करून चेटर ह्युमिनला कळवता येईल का?"

"खरं सांगते, मनाविरुद्धच- पण मी त्याला निरोप पाठवलाय आधीच." डॉर्स उत्तरली.

"मनाविरुद्ध?"

"तुझं संरक्षण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. जेव्हा जेव्हा मी त्याला मदतीसाठी हाक मारते तेव्हा तेव्हा मी अपेशी ठरलेय असा त्याचा अर्थ होतो."

सेल्डन डोळे बारीक करून तिच्याकडे बघत राहिला, "तुला इतकं टेन्शन घेण्याचं काही कारण आहे का, डॉर्स? एका विभागाच्या सगळ्या अधिकाऱ्यांपासून तू मला कशी वाचवू शकतेस?"

"नाही वाचवू शकत- काहींना जरा लोळवू शकते बस्स."

"माहीत आहे मला. ते केलंही आपण. पण ते कुमक पाठवतील. रणगाडे, न्यूरॉनिक तोफा, झोपेचा गॅस... आणि कायकाय माहीत नाही. पण ते सर्व शस्त्रास्त्रे कामाला लावतील नक्की."

"बरोबर आहे तुझं," तिचे ओठ घट्ट मिटले गेले.

"त्यांना तुम्ही सापडणारच नाही, बाई." रॅच अचानक जोरात बोलला. त्याची नजर त्याच्यावरून तिच्याकडे भिरभिरत होती. "त्यांना डॅवानही कधी सापडला नाही."

डॉर्स हसली- पण त्यात आनंदाचा लवलेशही नव्हता. तिने त्या मुलाचे केस प्रेमाने विस्कटले. मग तिने आपल्या हाताकडे जरा निराशेनेच पाहिलं. ती म्हणाली, “तू आमच्याबरोबर रहाता कामा नये, रॅच. तू त्यांच्या हाती पडता कामा नयेस.”

“मी नाही हाती लागणार त्यांच्या. आणि मी गेलो तर तुम्हाला जेवणखाण कोण आणून देईल? नवीन जागा कोण शोधून देईल...? सनबॅजर्सना तुम्हाला कुठे शोधायचं तेच कळता कामा नये.”

“नाही, रॅच, ते आम्हाला शोधून काढतीलच. ते डॅवानला शोधण्याचा फार प्रयत्नच करत नाहीत. त्याचा राग करतात ते, पण त्याला ते फार गांभीर्याने घेत नाहीत. कळतंय तुला?”

“म्हणजे- तुम्ही म्हणताय त्याचा त्यांना त्रास वाटतो, पण त्याच्यावर फार कष्ट घ्यावेसे नाही वाटत त्यांना.”

“बरोबर. पण आम्ही दोन ऑफिसर्सना फारच जोरदार जखमी केलंय. आणि ते आम्हाला सोडणार नाहीत. सगळी शक्ती लावतील ते- कानाकोपरा विंचरून काढतील या भागाचा आणि आम्हाला पकडतील.”

रॅच म्हणाला, “हे म्हणजे... मला तर आता वाटतंय- जाऊ दे... मला वाटतंय की मी तिथे आलोच नसतो, मला त्यांनी त्या चाबकाने मारलं नसतं, तर तुम्ही त्या दोघांना काही केलं नसतत. ही भानगडही उद्भवली नसती, तुम्हाला त्रास झाला नसता.”

“तसं काही नाही... काहीतरी होऊन आम्ही त्यांना हाणलंच असतं. काय सांगावं? आणखीही काही जणांना लोळवावं लागेल कदाचित्.”

“वेल, तुम्ही तर मस्तच काम केलंत. मला एवढं दुखत नसतं तर मला बघायला आणखी मजा आली असती.” रॅच म्हणाला.

“सगळ्या सुरक्षाव्यवस्थेला अंगावर घेण्यात काही अर्थ नाही. प्रश्न असा आहे की आता त्यांनी आपल्याला पकडलं तर ते आपलं काय करतील? तुरुंगात टाकतील हे तर नक्कीच.”

“तसं काही नाही- आपण सम्राटाला अपील करू शकतो.”

“सम्राटाला?” रॅचचे डोळे विस्फारले होते. “तुम्ही सम्राटाला ओळखता?” सेल्डनने हातानेच त्याला नाही सांगितलं, “साम्राज्याचा- गॅलक्सीचा कुठलाही नागरिक सम्राटाकडे अपील करू शकतो. पण डॉर्स, वेळ चुकीची असेल आपली. कारण सम्राटाचा विभाग सोडल्यावर आपण सतत सम्राटाला टाळत आलो आहोत.”

“तरीही डाह्लाईट तुरुंगात पडण्याइतकं गंभीर नागी ते. अपील केलं तर ते पुढे ढकलता येईल. निदान विषयाला फाटे तर फुटतील. आणि वेळ मिळेल त्यात आपल्याला काहीतरी विचार करता येईल.”

“शिवाय ह्युमिन आहेच.”

“हो, ते आहेच.” डॉर्स अस्वस्थपणे उत्तरली, “पण तो सारंच काही सांभाळून घेईल अशी अपेक्षा नाही करू शकत आपण. एकतर- अगदी माझा निरोप त्याला पोहोचला तरीही- आणि तो डाह्लमधे पोहोचला तरीही, या जागेचा पत्ता त्याला कसा लागेल? शिवाय आपण त्याला सापडलो तरीही डाहलाईट सुरक्षेची फौज तो एकटा कशी थोपवणार?”

“तसं असेल तर,” सेल्डन म्हणाला, “त्यांना आपला सुगावा लागण्याआधी आपल्याला काहीतरी हालचाल करावी लागेल.”

“माझ्या मागोमाग आलात तर मी त्यांना चुकवत तुम्हाला बरोब्बर नेईन- इथली जागा न जागा मला ठाऊक आहे.”

"तू एकाला चुकवशील, पण सगळीकडून ते घुसले तर -कितीतरी कॉरिडॉर्स आहेत इथे. एका गटाला चुकवलं तर दुसरा सामोरा येईल." ते बराच वेळ विमनस्कपणे शांत बसून राहिले. प्रत्येकजण मनातल्या मनात काय होऊ शकेल याचा अंदाज करत होतं.

आणि मग डॉर्स वेनाबिली किंचित ताठरली आणि अगदी खालच्या स्वरात कुजबुजत म्हणाली, "ते आलेत इथे, ऐकू येतंय मला."

सारेचजण कान लावून ऐकू लागले, आणि काही क्षणातच रॅच उठून उभा राहिला. आणि फूत्कारला, "ते या बाजूने येतायत. आपल्याला तिकडे जायला हवं."

सेल्डन गोंधळला, कारण त्याला काहीच ऐकू आलं नव्हतं- पण त्या दोघांच्या कानांवर त्याने डोळे झाकून विश्वास ठेवला असता. पण रॅचने आवाजाच्या विरुद्ध दिशेने सरकायला सुरुवात केली न केली तोच एक आवाज त्या गटारांच्या भिंतीवर आपटत दुमदुमला. "हलू नका तिथून."

तो आवाज ऐकताच रॅच म्हणाला, "हा तर डॅव्हानचा आवाज. त्याला कसं कळलं आपण इथे आहोत हे?"

"डॅव्हान?" सेल्डनने विचारलं, "खात्री आहे तुझी?"

"अगदी. खात्रीच आहे. तो मदत करेल आपल्याला."

८०

डॅव्हानने विचारलं, "काय घडलं नेमकं?"

सेल्डनला थोडंसं सुटल्यासारखं वाटलं. डॅव्हान आल्यामुळे डाह्ल विभागाच्या सुरक्षा फौजेशी लढता आलं असतं असं नाही, पण तरीही, तो काही लोकांना जमवून गोंधळ तरी नक्कीच माजवू शकला असता- तो म्हणाला, "तुला

माहीत झालंच असेल, डॅव्हान. टिसाल्वेरच्या घराबाहेर जमलेल्या गर्दीतले बरेचजण तुझेच लोक असणार.”

“होय बरेच होते. मला त्यांच्याकडून एवढंच कळलं की तुम्हाला अटक होणार होती आणि तुम्ही सनबॅजर्सच्या एक तुकडीशी दोन हात केलेत. पण तुम्हाला अटक का होत होती?”

“दोन.” सेल्डनने दोन बोटं दाखवत म्हटलं, “दोघं सनबॅजर्स होते ते. तेवढं पुरेसं आहे ना. आम्हाला अटक होणार होती याची जी काही कारणं त्यांनी दिली त्यातलं एक होतं- की आम्ही तुला भेटायला आलो होतो.”

“ते पुरेसं कारण नाहीये. सनबॅजर्स माझा फारसा विचार करत नाही कधी. कदाचित् मला कमी लेखतात.” तो जरा कडवटपणे म्हणाला.

“शक्य आहे,” सेल्डन म्हणाला, “पण आम्ही ज्यांच्याकडे भाड्याने रहात होतो त्या बाईंनी आमच्याविरुद्ध दंगल सुरू केल्याची तक्रार केली. तुझ्याकडे येताना तो पत्रकार आडवा आला होता, त्याच्यावरून. ते तुला माहीतच आहे. तुझे लोक कालही तिथे होते, आजही होते. शिवाय दोन ऑफिसर्स बऱ्यापैकी घायाळ झालेत. ते कदाचित् हे कॉरिडॉर्स साफ करायच्या कामाला लागतील, आणि याचा अर्थ तुला त्रास होईल. मला खरंच वाईट वाटतंय. हे अशा प्रकारे होईल अशी कल्पनाच नव्हती मला. आणि तसा हेतू तर अजिबातच नव्हता.”

पण डॅव्हानने मान हलवत नकार दिला.

“तुला सनबॅजर्सबद्दल फार काही माहिती नाही. तेवढंच पुरेसं नाही. त्यांना आम्हाला साफबिफ करायचंच नाहीये. तसं केलं तर या प्रभागाला आमच्याबद्दल काहीतरी करावं लागेल. बिलीबॉटन आणि इतर वस्त्या आहे तशा ठेवण्यात त्यांना आनंद आहे. नाही- ते तुमच्याच मागे लागले आहेत. तुम्ही काय केलंय असं?”

डॉर्स जरा वैतागून म्हणाली, “आम्ही काहीही केलेलं नाही. आणि समजा असलं तरी काय फरक पडतो? ते तुमच्यामागे नसतील- आमच्या मागे असतील तरीही ते इथे येऊन आम्हाला बाहेर पडायला भाग पाडतील. आणि तुम्ही मधे आलात तर तुम्हालाही त्रास होईल.”

“नाही, मला नाही त्रास होणार. मला चांगले मित्र आहेत- बलाढ्य मित्र.” डॅव्हान म्हणाला, “मी काल सांगितलं तुम्हाला. आणि ते तुम्हालाही मदत करतील- आणि मलाही करतील. काल तुम्ही जेव्हा आम्हाला उघड मदत करायला नकार दिलात, तेव्हाच मी त्यांच्याशी संपर्क साधला. डॉ. सेल्डन, ते तुम्हाला ओळखतात. तुम्ही ख्यातनाम आहात. ते डाह्लच्या मेयरशी बोलणी करून तुम्हाला सोडवतील. काहीही केलं असलंत तरी. पण तुम्हाला डाह्लच्या बाहेर काढावं लागेल.”

सेल्डन जरा सैलावून हसला, आणि म्हणाला, “ तू कुणातरी बलाढ्य माणसाला ओळखतोस? जो तुला ताबडतोब प्रतिसाद देतो- जो डाह्लच्या शासनाशी बोलून जे चाललंय ते थांबवू शकतो? आणि आम्हाला इथून बाहेर काढू शकतो? फारच छान. नवल नाही.” तो हसत डॉर्सकडे वळला, “मायकोजेनचीच पुनरावृत्ती. ह्युमिन कसं काय जुळवतो सगळं?”

पण डॉर्सने मानेनेच नकार दिला, “नाही. हे सारं फारच जलद झालंय. मला समजत नाही.”

“तो काहीही करू शकतो यावर आता माझा विश्वास बसलाय,” सेल्डन म्हणाला.

“मी त्याला तुझ्यापेक्षा जास्त आणि जास्त काळापासून ओळखते. आणि माझा यावर विश्वास नाही.”

सेल्डन हसून म्हणाला, “तू त्याला कमी लेखू नकोस.”

पण जणू हा विषय वाढून डोक्याला ताप नको म्हणून त्याने डॅव्हानकडे वळत विचारलं, “पण तुला आम्ही कसे सापडलो? रॅच म्हणाला या जागेबद्दल तुला काही माहिती नाही.”

“नाहीच त्याला माहीत. ही जागा सगळीच्या सगळी माझी आहे. मीच शोधून काढली ती.” रॅच रागारागाने ओरडला.

“माहीत नव्हती ही जागा मला,” डॅव्हान इकडेतिकडे पाहात म्हणाला, “छान जागा आहे ही. रॅच म्हणजे गल्लीतून उगवलेला प्राणी आहे. या सगळ्या चक्रव्यूहात एकदम मजेत फिरू शकतो तो.”

“ते कळलंच आम्हाला. पण मग तुला आम्ही सापडलो कसे?”

“उष्णता केंद्र. माझ्याकडे हे यंत्र आहे. इन्फ्रारेड रेडिएशन शोधून काढतं ते. ३७ अंश सेल्सियस तापमानात जो उष्णतेचा पॅटर्न मिळतो तो त्याला शोधता येतो. तो फक्त माणसाच्या अस्तित्वाचीच दखल घेतो- बाकी कशाचीही नाही. तुम्हा तिघांची दखल त्याने घेतली.”

डॉर्स कपाळाला आठ्या घालून विचार करत होती. “ट्रॅन्टॉरवर- जिथे सर्वत्र माणसंच माणसं असतात तिथे त्याचा काहीच उपयोग नाही. बरोबर. पण वस्त्यांमध्ये, अशा निर्मनुष्य कॉरिडॉर्समध्ये ते काम करतं.”

“हे कुठे मिळालं तुला?” सेल्डनने विचारलं.

डॅव्हान उत्तरला, “माझ्याकडे ते आहे एवढं पुरे की. पण चला, तुम्हाला बाहेर काढायला हवं, मास्टर सेल्डन. फार जास्त लोकांना तुम्ही हवे आहात आणि मला माझ्या ताकदवर मित्राकडेच तुम्हाला सोपवायला हवं.”

“आहे कुठे तुमचा तो ताकदवर मित्र?”

“येतोय इकडेच. निदान एक नवीन ३७ अंश सेल्सियसचा उगम दिसतोय या यंत्रावर- आणि दुसरं कुणी असूच शकत नाही ते.”

दरवाजातून एक नवागत आत शिरला, आणि सेल्डनचा आनंदोद्गार ओठांवरच विरला.

तो चेटर ह्युमिन नव्हता.

१७

# वाय

वाय हा प्रभाग ट्रॅन्टर या शहरजगाचा एक प्रभाग होता- दीर्घिका साम्राज्याच्या नंतरच्या शतकांत वाय प्रांतात सर्वात बलाढ्य आणि स्थिर शासन असे. तेथील राज्यकर्त्यांना साम्राज्याची गादी हवी होती. आधीच्या सम्राटांशी काही वारसा दाखवणारे नाते असल्याचा त्यांचा दावा होता. चौथा मॅनिक्स याच्या राजवटीत वाय प्रांताने लष्कर बाळगायला सुरुवात केली होती (सम्राटाचे अधिकारी सांगत) की संपूर्ण ग्रहावर राज्यक्रांती घडवण्याची त्यांची मनिषा होती.

दीर्घिका ज्ञानकोष

८१

आत आलेला माणूस उंच, धिप्पाड होता. भुऱ्या केसांच्या टोकदार वळवलेल्या मिशा आणि डोक्यावरून आलेले केस गालांवरून हनुवटीच्या थेट खालपर्यंत वाढलेले. हनुवटीचं टोक आणि खालच्या ओठाखाली सगळं तुळतुळीत होतं- थोडं ओलसर चकचकीत. त्याचं विरळ केसांचं डोकं अगदी बारीक भादरलेलं- इतकं विरळ की सेल्डनला मायकोजेनची नकोशी आठवण झाली.

त्याच्या अंगावर गणवेष होता. लाल-पांढरा. कंबरेभोवती रुंद पट्टा आणि त्यावर चांदीची बटणं.

तो बोलू लागला तेव्हा जणू आवाज गडगडत होता, आणि त्याच्या उच्चारांची पद्धत आजवर कुठेच ऐकलेल्या उच्चारांसारखी नव्हती. कधी न ऐकलेले

हेल नकोसे किंवा मागास वाटू शकतात, पण सेल्डनने पाहिलं, त्याचे हेल अगदी सुरेल होते... खालच्या पट्टीत निघालेले खर्जातले स्वर.

“मी सार्जंट एमर थॅलस.” त्याचा आवाज एकेका अक्षरातून घरंगळला. “मी डॉक्टर हॅरि सेल्डनना शोधत आलो आहे.”

“मीच तो.” सेल्डन म्हणाला. आणि मग डॉर्सकडे वळून तो पुटपुटला, “ह्युमिन स्वतः येऊ शकला नाही पण काय जबरदस्त मांसल पार्सल पाठवलंय त्याने.”

सार्जंडने त्याच्याकडे मख्खपणे पण बराच वेळ पाहून घेतलं. आणि मग म्हणाला, “हं... तुमचं वर्णन केलं होतं माझ्याकडे त्यांनी त्याप्रमाणेच आहात. चला माझ्याबरोबर, डॉ. सेल्डन.”

“व्हा पुढे, आलोच मागोमाग.”

सार्जंट मागे सरकला. सेल्डन आणि डॉर्स वेनाबिली पुढे झाले. सार्डंट थबकला आणि त्याने आपला जाडजूड पंजा डॉर्सच्या दिशेने पसरला. “मला डॉ. सेल्डनला घेऊन येण्याचे आदेश आहेत. बाकी कुणाला आणण्याचे नाहीत.”

क्षणभर सेल्डन त्याच्याकडे काहीच न समजल्यासारखा पाहात राहिला. आणि पुढच्याच क्षणी त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्याऐवजी संताप उमटला. “असं होणं शक्यच नाही, सार्जंट. डॉ. डॉर्स वेनाबिली या माझ्या सहकारी आहेत आणि सोबतीही आहेत. त्या माझ्याबरोबर असल्याच पाहिजेत.”

“माझे आदेश तसे नाहीत, डॉक्टर.”

“तुझे आदेश काय आहेत काय नाहीत याची मला काडीइतकी पर्वा नाही, सार्जंट थॅलस, तिला येता येणार नसेल तर मी इथून इंचभरही हलणार नाही.”

“आणि हे पहा,” डॉर्स चिडलेलीच, “डॉ. सेल्डनचं सतत संरक्षण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. माझे आदेश आहेत ते. मी त्यांच्याबरोबर असेन तरच ते शक्य आहे. त्यामुळे- ते जिथे तिथे मी.”

सार्जंट चांगलाच गोंधळलेला, “माझे आदेश तुम्हाला कसलाही त्रास होणार नाही हे पाहाण्याचेच आहेत- अगदीच कडक आदेश आहेत मला. तुम्ही स्वतःहून आला नाहीत तर मी तुम्हाला माझ्या वाहनापर्यंत उचलून नेईन. अगदी अलगद नेण्याचा प्रयत्न करीन.”

आणि त्याने सेल्डनला उचलण्यासाठी हात पुढे केले.

सेल्डन मागे सरकून त्याच्या हाताच्या पकडीपासून दूर गेला. ते करताकरताच त्याचा उजवा पंजा सार्जंटच्या उजव्या दंडावर जिथे स्नायू अगदी कमकुवतच असतात तिथे पडला आणि आतल्या हाडावर आपटला.

सार्जंटने श्वास रोधला आणि किंचित थरथरला- पण लगेच सावरत तो मख्ख चेहऱ्याने पुन्हा पुढे सरकला. डॅवान गपचूप पाहात उभा होता, पण रॅच मात्र चपळाईने सार्जंटच्या मागे गेला.

सेल्डनने पुन्हा एकदा पंजा मारला, मग पुन्हा एकदा मारला- पण आता सार्जंट थॅलस सावध झाला होता- त्याने तिसरा आघात दंडाच्या दणकट स्नायूंवर झेलला.

डॉर्सने आता तिचे चाकू बाहेर काढलेले. “सार्जंट,” ती जोरात म्हणाली, “जरा इकडे पहा. डॉक्टर सेल्डनना तू जबरदस्तीने नेण्याचा प्रयत्न केलास तर तुला मी नाईलाजाने जखमी करू शकते हे समजून घे.”

सार्जंट थबकला, त्या चाकूंची सावकाश होणारी हालचाल पाहात राहिला, मग म्हणाला, “डॉ. सेल्डन सोडून दुसऱ्या कुणाला दुखवायचं नाही असं काही माझ्या आदेशात म्हटलेलं नाही.”

त्याचा उजवा हात विद्युतवेगाने त्याच्या मागच्या खिशातल्या शस्त्राकडे गेला. डॉर्सचे चाकू लखलखले आणि ती पुढे झाली.

पण दोघांच्याही हालचाली पूर्ण होण्याच्या आत, रॅचने सार्जंटला डाव्या हाताने पुढे ढकलंत त्याचं शस्त्र उजव्या हाताने उपसून काढलं. चटकन दूर पळत, त्याने ते शस्त्र दोन्ही हातांनी घट्ट धरलं आणि ओरडला, “हात वर कर, सार्जंट, नाहीतर तुला फटका बसेल याचा.”

त्या शस्त्राची निरुंद नळी पाहाता तो न्यूरॉनिक चाबूक होता हे स्पष्ट होतं. तो सार्जंट गर्रकन् वळला आणि त्याच्या लालबुंद होत चाललेल्या चेहऱ्यावर आता भीतीही उमटली. क्षणभरच. पुन्हा एकदा तो त्याच मख्खपणे गुरगुरत म्हणाला, “खाली ठेव ते, मुला. ते कसं चालवायचं तुला माहीत नाही.”

रॅच ओरडला, “माहीत आहे मला- त्याची सेफ्टीक्लिप काढलेली आहे आणि हे झटक्यात काम करेल. माझ्यावर येण्याचा प्रयत्न केलास तर उडवेन मी तो.”

सार्जंट थिजून पाहात राहिला. रागावलेल्या बारा वर्षाच्या मुलाच्या हातात असलं शक्तीशाली शस्त्रं... काय होऊ शकतं त्याची त्याला कल्पना आली. पण सेल्डनलाही ते बरं वाटलं नाही.

“रॅच, जरा सांभाळून. तो चालवू नकोस. कॉन्टॅक्टजवळून बोटं दूर ठेव.” तो म्हणाला.

“माझ्यावर यायचा प्रयत्न करू नको म्हणाव त्याला.”

"नाही करणार तो. सार्जंट, प्लीज, जागचा हलू नकोस. एक गोष्ट समजून घे. मला इथून न्यायचे तुला आदेश आहेत. बरोबर?"

"बरोबर," सार्जंट उत्तरला. त्याचे डोळे विस्फारलेले आणि नजर रॅचवर खिळलेली. रॅचची नजरही त्याच्यावरून हटत नव्हती.

"पण तुला आणखी कुणाला घेऊन यायचं ते सांगितलं नव्हतं, बरोबर?"

"नव्हतं सांगितलं, डॉक्टर." सार्जंट ठामपणे उत्तरला. अगदी न्यूरॉनिक चाबकाला भिऊनही तो आपलं म्हणणं मागे घेणार नव्हता. स्पष्टच होतं.

"बरं तर, पण ऐक, सार्जंट. कुणालाही घेऊन यायचं नाही असं तुला सांगितलेलं का?"

"आत्ताच सांगितलं ना-"

"नाही, नाही, सार्जंट, नीट ऐक. एक फरक आहे. तुझे आदेश काय होते- डॉक्टर सेल्डनला घेऊन ये! आदेश तेवढाच होता की इतर काही तपशील होते आदेशात? म्हणजे डॉ. सेल्डनला आण- बाकी कुणाला आणू नकोस असं होतं?"

सार्जंट जरा विचार करत राहिला आणि मग म्हणाला, "तुम्हाला आणायचं एवढंच सांगितलं होतं, डॉ. सेल्डन."

"म्हणजे बाकी कुणाचा काही उल्लेखच नव्हता, बरोबर?"

तो थांबून राहिला. "नव्हता."

"तुला असं सांगितलं नव्हतं की डॉ. वेनाबिलींना आण. पण आणू नकोस असंही सांगितलं नव्हतं. बरोबर?"

तो पुन्हा थांबून राहिला, "बरोबर."

"त्यामुळे त्यांना सोबत घ्यायचं की नाही हे तुझ्यावर आहे, बरोबर?"

तो बराच वेळ गप्प राहून उत्तरला, “असं दिसतंय.”

“आता पहा, हा रॅच. हे लहानच पोर आहे. पण तो न्यूरॉनिक चाबूक तुझ्यावर रोखून उभं राहिलंय. तुझा चाबूक- होय ना? आणि तो वापरायची त्याला फार खुमखुमी आहे.”

“होsss” रॅच ओरडला.

“श्श्, इतक्यात नाही, रॅच.” सेल्डन म्हणाला, “शिवाय या इथे डॉ. वेनाबिली आपले दोनदोन सुरे घेऊन उभ्या आहेत. एकदम तरबेज आहेत त्या. आणि वर मी आहेत. मला संधी मिळाली तर तुझ्या गळयाचं हाड असं मोडू शकतो की त्यानंतर तू पुन्हा कुजबुजल्याशिवाय बोलूच शकणार नाहीस. आता तू ठरव- डॉ. वेनाबिलींना सोबत घ्यायचं की नाही? तुझ्या आदेशांवरून दिसतंय की तू दोन्ही करू शकतोस.”

अखेर सार्जंट हरलेल्या आवाजात म्हणाला, “नेईन मी सोबत या बाईंना.”

“आणि या मुलाला सुद्धा.”

“हो, मुलालासुद्धा.”

“छान. आता मला शब्द दे- सैनिक म्हणून तुझा शब्द दे की आता तू जे मान्य केलंस ते तू प्रामाणिकपणे करशील.”

“मी शब्द देतो. सैनिक म्हणून वचन देतो.” सार्जंट म्हणाला.

“रॅच, चल ती गन परत कर. आत्ता. मला वाट पाहायला लावू नकोस.”

रॅचचा चेहऱ्यावर वैताग उमटला. त्याने डॉर्सकडे पाहिलं. ती एक क्षण घुटमळली, आणि मग तिने होकारार्थी इशारा केला. तिच्या चेहऱ्यावरही रॅचइतकाच वैताग होता.

रॅचने सार्जंटच्या समोर ती गन धरली, “ते मला हे तुला द्यायला भाग पाडतायत म्हणून $#$@$” त्याचा शेवटचा शब्द कळला नाही.

सेल्डन म्हणाला, “डॉर्स, ते सुरे बाजूला ठेव आता.” डॉर्सने निषेधाने मान झटकली. पण ते सुरे आत ठेवले.

“आता, बोल, सार्जंट.” सेल्डन म्हणाला.

सार्जंट त्या गनकडे पाहात म्हणाला, “तुम्ही फार चांगले आहात, डॉ. सेल्डन. मी दिलेलं वचन मी पाळेन.” त्याने खटक्यात ती गन खिशात ठेवली.

सेल्डन डॅव्हानकडे वळून म्हणाला, “डॅव्हान, इथे काय पाहिलंस ते विसरून जा. आम्ही तिघे सार्जंट थॅलस यांच्याबरोबर स्वेच्छेने जात आहोत. तुला युगो अमारिल भेटला तर त्याला माझा निरोप दे. की मी त्याला विसरणार नाही. आणि हे सगळं संपून मी स्थिरस्थावर झालो की मी त्याला विद्यापीठात प्रवेश मिळवून देईन. आणि तुझ्या कार्यात माझी काही मदत होण्यासारखी असेल तीही मी करेन, डॅव्हान. सार्जंट, चला निघू या आपण.”

## ८२

“कधी विमानात बसला आहेस का तू रॅच?” हॅरि सेल्डनने विचारलं. रॅचचे शब्दच हरवले होते. त्याने मानेनेच नाही म्हटलं. तो खालून सरकणाऱ्या अपरसाईडच्या दृश्याकडे भयचकित नजरेने पाहात होता. सेल्डनना पुन्हा एकदा जाणवलं, ट्रॅन्टॉरचं जग किती एक्स्प्रेसवेज् आणि टॅक्सीटनेल्सनी गच्च भरलेलं होतं. साध्यासुध्या जनतेला अगदी लांबच्या प्रवासासाठी भुयारी मार्गच वापरावे लागत होते. हवाई प्रवास बाहेरच्या जगांत अगदी सहज शक्य असला तरी ट्रॅन्टॉरवर मात्र ती चैन होती. आणि त्यात हे असलं विमान- ह्युमिनने कसं काय मिळवलं असेल हे?

सेल्डन विचार करत होता. तो खिडकीतून बाहेर दिसणारे खालीवर जाणारे घुमट पाहात होता. ग्रहाच्या या भागात हिरवळही होती, थोडंफार उरलेलं जंगलही दिसत होतं, समुद्राच्या काही भुजा पसरलेल्या मधूनच दिसत होत्या आणि पाषाणवत् स्थिर पाण्यावर डोक्यावरच्या ढगांच्या थरातून डोकावणाऱ्या सूर्याचा चुकार किरण पडून क्षणभर झळाळत होता. विमानात बसून तासभर उलटला असेल- डॉर्सने आपली खिडकी बंद करून टाकली. तिला ते दृश्य पाहाण्यात फारसा रस नव्हताच.

"आपण कुठे चाललो आहोत हे कळलं असतं तर मला जास्त बरं वाटलं असतं."

"तुला कळलं नसेल तर मला तरी कसं कळणार. माझ्यापेक्षा ट्रॅन्टॉरवर जास्त काळ तू काढला आहेस." सेल्डन म्हणाला.

"हो, पण ते आत राहून. इथे बाहेर अपरसाईडच्या वरून मला काहीच कळत नाहीये." डॉर्स म्हणाली.

"हं... ठीकै. ह्युमिनला कळत असेल तो काय करतोय ते."

"ते तर कळतच असेल- फक्त आता जे चाललंय त्याचा त्याच्याशी काही संबंध नसावा." डॉर्स जरा तिखटपणे उद्गारली, "हे जे चाललंय ते त्यानेच घडवून आणलंय असं तू गृहीत का धरतो आहेस?"

सेल्डनच्या भुवया उंचावल्या, "अरे! मी गृहीत धरलं खरं. मला माहीत नाही तसं आहे का नाही ते. का नसावं हे त्याचंच काम?"

"कारण ज्याने कुणी हे घडवलं त्याने तुझ्याबरोबर मी असेन आणि मला घेऊन यायचंय हे स्पष्ट केलं नव्हतं. ह्युमिनला माझा विसर पडावा हे शक्य नाही. आणि स्ट्रीलिंग आणि मायकोजेनवर तो स्वतः आला होता."

“त्याला नेहमीच वेळ मिळेल असं नाही, डॉर्स. कामात असेल तो. तो आधीच्या दोन्ही वेळा स्वतः आला हा त्याचा चांगुलपणा.”

“त्याला यायला जमत नसताना, तो हा असला ऐषारामी उडता महाल पाठवेल?” विमानाकडे हात दाखवत ती म्हणाली. प्रचंड ऐषारामी विमान होतं ते.

“उपलब्ध असेल ते पाठवलं असेल. फरारी झालेल्यांना असल्या महागड्या विमानात जायला थोडंच जाणार असा विचार बाकीचे लोक करतील अशी शक्कल लढवली असेल त्याने. डबल डबलक्रॉस हे तंत्र माहीत आहेच.”

“फार लोकांना माहीत असतं ते माझ्या मते. आणि तसं असेल तर सार्जंट थॅलससारख्या येडपटाला त्याने नक्कीच पाठवलं नसतं.”

“सार्जंट थॅलस काही येडपट नाहीये. संपूर्णपणे आज्ञाधारक असण्याचं प्रशिक्षण आहे त्याचं. त्याला जे सांगितलं ते तो नीट करेल हे नक्की.”

“हेच, हेच म्हणतेय मी. हॅरि, त्याला नीट सांगितलं का गेलं नाही? चेटर ह्युमिन त्याला तुला डाह्लच्या बाहेर घेऊन यायला सांगेल, आणि माझा उल्लेखही करणार नाही- असं अशक्य आहे. अशक्य.”

सेल्डनकडे यावर उत्तर नव्हतं. तो खचल्यासारखा झाला.

आणखी तासभर गेला आणि डॉर्स म्हणाली, “बाहेर थंडी वाढली असावी. अपरसाईडवरची हिरवळ पिवळट दिसते आहे, आणि हीटर्स सुरू केलेले दिसतायत.”

“काय अर्थ असेल याचा?”

“डाह्ल उष्ण कटिबंधात आहे- म्हणजे आपण अगदी उत्तरेकडे चाललो आहोत, किंवा अगदी दक्षिणेकडे. आणि खूप दूरवर. रात्र कधीकुठे सुरू होतेय हे कळलं असतं तर सांगता आलं असतं.”

काही वेळाने ते एका किनाऱ्यावरून जाऊ लागले- समुद्राच्या किनाऱ्याला लागून असलेले घुमट बर्फाच्या रिंगणाने वेढलेले दिसत होते. आणि मग अचानक विमान खाली जाऊ लागलं. रॅच किंचाळला. "आपण खाली पडणार- कोसळणार खाली!"

सेल्डनच्या पोटाचे स्नायू आवळले गेले. त्याने खुर्चीचे हात घट्ट पकडून ठेवले. डॉर्सवर काहीच परिणाम दिसत नव्हता.

"पायलट शांत दिसतोय. आपण भुयारात जात असणार." हे ती म्हणतेय तोच विमानाचे पंख झप्पकन मिटून पोटात गेले आणि एखाद्या बंदुकीच्या गोळीसारखं विमान एका बोगद्यात शिरलं. क्षणार्धात काळ्याकुट्ट अंधारात विमान बुडालं, आणि दुसऱ्याच क्षणी उजेडही झाला. बोगद्याच्या दोन्ही कडांच्या भिंतींवरच्या प्रकाशमान पट्ट्या झगमगू लागल्या

"या बोगद्यात पुढे कुणी आहे की नाही याची त्यांना खात्री असते का याची मला कधीच खात्री वाटत नाही," सोल्डन पुटपुटला.

"कित्येक किलोमीटर आधीपासून बोगदा रिकामा असल्याची खात्री त्यांना मिळालेली असते," डॉर्स म्हणाली. "आणि ते काही असो, आपला प्रवास आता संपत आलाय हे मी खात्रीपूर्वक सांगू शकते. आणि लवकरच आपण कुठे आहोत ते आपल्याला कळेल." ती किंचित् थबकून म्हणाली, "जेव्हा ते आपल्याला कळेल तेव्हा आपल्याला फारसं बरं वाटणार नाही हेही मी सांगू शकते."

## ८३

ते विमान बोगद्यातून बाहेर आलं आणि एका लांबलचक रनवेवर धावू लागलं. त्याचं छप्पर इतकं उंच होतं की खरोखरच दिवसाच्या उजेडाच्या अगदी

जवळ असल्यासारखं वाटत होतं. इंपिरिअल प्रभागातही त्याने एवढा उजेड पाहिला नव्हता. विमान अपेक्षेपेक्षा लवकर आणि झटकन् थांबलं, आणि ते सगळे पुढे ढकलले गेले. रॅच तर जवळपास पुढल्या खुर्चीवर आपटलाच. त्याला श्वासही घेत येत नव्हता. डॉर्सने त्याला खांद्याला धरून मागे ओढलं.

सार्जंट थॅलस ताठ चालत विमानाबाहेर पडला. आणि मागे जाऊन त्याने प्रवाशांच्या कंपार्टमेन्टचं दार उघडून धरलं. तिघांनाही हाताने धरून त्याने उतरायला मदत केली. सेल्डन शेवटी उतरला. सार्जंटजवळून जाताना त्याने वळून त्याला सांगितलं, “छान प्रवास झाला, सार्जंट.”

त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य पसरलं आणि त्याचे ओठ किंचित विलग झाले. मग आपल्या कॅपला किंचित हात लावून त्याने किंचित् सलाम केला आणि म्हणाला, “पुन्हा एकदा तुमचे आभार, डॉक्टर.”

मग त्यांना एका आलिशान ग्राउंडकारमध्ये बसवण्यासाठी तो पुढे आला. स्वतः पुढच्या सीटवर बसला आणि अगदी सहजपणे त्याने गाडी हलकेच सुरू केली. ते जात असलेले रस्ते प्रशस्त होते, बाजूने दिसणाऱ्या इमारती छानदार बांधणीच्या होत्या, दिवसाच्या प्रसन्न उजेडात दिमाखदार दिसत होत्या. ट्रॅन्टॉरवर सर्वत्र एक्स्प्रेसवेवरून येणाऱ्या रहदारीचा आवाज इथेही होताच. रस्त्याच्या कडेने लोकांची गर्दी होती. सगळे अगदी छान कपडे घालून चालणारे लोक दिसत होते. आणि सारा परिसर अगदी धुतल्यासारखा स्वच्छ- अतीस्वच्छ दिसत होता. सेल्डनला पुन्हा एकदा असुरक्षित वाटू लागलं. डॉर्सला जो संशय वाटत होता तो खरा असण्याची शक्यता जास्तच होती. तो तिच्याकडे झुकून म्हणाला, “आपण पुन्हा इंपिरिअल विभागात आलो आहे की काय?”

“नाही. इंपिरिअल विभागातल्या इमारती जास्त रोकोको धर्तीच्या आहेत. आणि इंपिरिअल भागातली बागशाहीसुद्धा इथे जरा कमीच दिसतेय.”

“मग आपण आहोत तरी कुठे, डॉर्स?”

“विचारावं लागेल, हॅरि.”

फार दूर जावं लागलं नाही त्यांना. ते एका कार पार्किंग बेसमोर येऊन थांबले. समोर एक चार मजली भारदस्त इमारत होती. वरच्या पट्टीवर काल्पनिक प्राण्यापक्ष्यांची कोरीव चित्र होती. आणि हलक्याशा गुलाबी रंगाचा दगड सढळ हस्ते वापरलेला दिसत होता. ही बाहेरची फसाड तर छान होती.

“हे तरी पुरेसं रोकोको वाटतंय.” सेल्डन म्हणाला.

डॉर्सने खांदे उडवले. रॅचने शीळ भरली- आपल्याला काही फार थोर वाटलेलं नाही हे असं दाखवण्याचा फुटकळ प्रयत्न होता त्याचा, “ओय, काय नखरेल जागा आहे पहा.”

थॅलसने सेल्डनकडे पाहात हातानेच इशारा केला. पुढे येण्याची खूण होती ती. सेल्डन जरा थांबून राहिला, आणि त्यानेही इशाऱ्याचाच आधार घेत हात पसरले. रॅच आणि डॉर्सही बरोबर येणार हे सुचित केलं. सार्जंट जरासा घुटमळला आणि त्या भव्य प्रवेशद्वाराकडे शरमेने पाहात राहिला. त्याच्या मिशा जणू खाली ओघळल्या.

मग तो तुटकपणे म्हणाला, “वचन मोडणार नाही मी. तिघंही चला. पण आत असलेल्या बाकीच्यांना माझ्या वचनाची फिकीर असणार नाही एवढं सांगू शकतो.”

सेल्डनने मान डोलावली. “सार्जंट, मी तुला फक्त तुझ्याच कृतीसाठी जबाबदार धरेन, काळजी नको.”

सार्जंटच्या मनाला ते भिडलं असावं. त्याचा चेहरा जरा उजळला- जणू आता तो सेल्डनशी हस्तांदोलन करण्याच्या किंवा काहीतरी करून आपला आनंद, कृतज्ञता व्यक्त करण्याच्या बेतात होता. पण मग त्याने स्वतःवर नियंत्रण मिळवले आणि वरच्या महाद्वाराकडे नेणाऱ्या जिन्याच्या पहिल्या पायरीवर पाय ठेवला. तो जिना आपोआप वरवर सरकू लागला. डॉर्स आणि सेल्डनला याची सवय होती. ते सहज तोल राखत चढले. रॅच जरासा चकित होत अडखळला. पण मग ही एक्स्प्रेसवेची काहीतरी नवीन सेवा आहे असं गृहीत धरून पळतपळत येऊन पायरीवर चढला. एक पाय वरच्या पायरीवर, एक पाय खाली ठेवून, खिशात हात घालून, बेदरकारपणे शीळ घालत तो उभा राहिला.

वरचा दरवाजा उघडला आणि दोन स्त्रिया बाहेर आल्या. दोन बाजूला दोघी मांडून ठेवल्यासारख्या उभ्या राहिल्या. दोघी तरुण होत्या, आकर्षक होत्या. कंबरेभोवती घट्ट पट्ट्याने बांधलेले त्यांचे झगे घोट्यांच्याही खाली येऊन जमिनीवर लोळत होते. दोघींचेही केस पिंगट तपकिरी होते आणि डोक्याच्या दोन्ही बाजूंना त्यांच्या घट्ट वेण्या गोलगोल गुंडाळलेल्या दिसत होत्या. (सेल्डनला ते आवडलं, पण रोज सकाळी हे करायला त्यांचा किती वेळ जात असेल याचा विचार त्याच्या मनात आलाच. रस्त्यात दिसलेल्या बायकांचे केस एवढे सजवलेले दिसले नव्हते.) या दोघी स्त्रिया या नवागतांकडे तुच्छतेने पाहात होत्या. सेल्डनला आश्चर्य वाटलं नाही. दिवस कसा गेला होता... डॉर्स आणि तो दोघेही अगदीच गचाळ दिसत असणार, अगदी रॅचइतकेच. तरीही त्या दोघींनी रीतीप्रमाणे झुकून अभिवादन केले आणि अर्धवट वळून एकाच वेळी कवायत केल्यासारखे त्यांना आत जाण्याचे निर्देश केले. हातांच्या हालचालींचीही सिमेट्री तुटली नाही. किती सराव करत असतील या!

त्यांनी आत शिरावं ही अपेक्षा होतीच. ते आत शिरले तो दिवाणखाना अगदी भव्य होता. आणि त्यात भरपूर फर्निचर होतं, कसल्याकसल्या वस्तू होत्या- त्यांचा उपयोग काय हेही सेल्डनला कळत नव्हतं. जमीनीवर हलकीशी प्रसन्न रंगछटा होती, आणि त्यातून एक लकाकी सांडत होती. सेल्डनच्या लक्षात आलं तेव्हा तो चांगलाच शरमला- त्यांच्या बुटांचे धूळभरले ठसे त्यावर उमटत होते.

आणि इतक्यात आतला एक दरवाजा उघडला आणि आणखी एक स्त्री बाहेर आली. ती पहिल्या दोघींपेक्षा वयाने ज्येष्ठ होती- ती येताच त्या दोघी पाय मुडपून खालीखाली झुकत गेल्या. त्यांचा तोल कसा रहात असेल- सेल्डन नवल करत राहिला. बराच सराव असावा. आपणही असंच काहीतरी आदर दाखवायला करणं अपेक्षित आहे की काय असा विचारही मनात आला त्याच्या. पण म्हणजे काय करायचं ते माहीत नसल्यामुळे त्याने मान किंचित् झुकवून अभिवादन केलं. डॉर्स तशीच ताठ उभी राहिली, ती मुद्दाम तुच्छता दर्शवत होती अशी सेल्डनला शंका आली. रॅच तोंडाचा आ वासून सगळीकडे पाहात होता- त्याचं आत्ताच आलेल्या बाईकडे लक्षही नव्हतं. ती जरा जाडीच होती पण गुबगुबित म्हणावी एवढीच. तिनेही तिचे केस त्या दोन मुलींसारखेच बांधले होते. तिचा झगाही तसाच होता. पण अधिक श्रीमंती होता... सेल्डनच्या मते जरा जास्तच झगमगणारा.

ती मध्यमवयीन होती हे स्पष्टच होतं, तिच्या केसांतून अधूनमधून पांढरे केस डोकावत होते. पण तिच्या गालावरच्या खळीमुळे तिच्या मुद्रेला आपोआप एक तरुणपणाचा स्पर्श झाला होता. तिच्या पिंगट डोळ्यांत सहज आनंदी भाव होता... एकूणच ती वृद्ध वाटण्यापेक्षा मातृसदृश दिसत होती.

ती म्हणाली, "कसे आहात तुम्ही? तुम्ही सारे?" (डॉर्स आणि रॅच तिथे असल्याबद्दल तिला आश्चर्य वाटलं नाही. तिने त्यांनाही संभाषणात सहभागी करून घेतलं.)

"तुम्ही डॉ, हॅरि सेल्डन, तुमची तर मी फार काळापासून वाट पाहाते आहे. आणि तुम्ही डॉ. डॉर्स वेनाबिली असणार- तुम्ही यांच्या सोबत असाल हे कळवण्यात आलं होतं मला. आणि छोटासा मुलगा, याचं काय नाव बरं... ते नाही कळलं, पण तुलाही भेटून आनंद झाला मला बरं का रे. पण आपल्याला आता बोलण्यात वेळ घालवायचा नाहीये. कारण तुम्हाला विश्रांतीची गरज असणार नक्कीच."

"आणि आंघोळीचीही, मॅडम," डॉर्स जरा जोरातच म्हणाली, "आम्हा सर्वांनाच अगदी स्वच्छ आंघोळी करण्याची गरज आहे."

"हो हो, नक्कीच," ती म्हणाली, "कपडेही बदलायला हवेत तुम्हाला. विशेषतः या छोटूला." ती रॅचकडे पाहात होती, पण त्या इतर दोघींच्या नजरेत जसा तुच्छ भाव होता त्याचा लेशही तिच्या नजरेत नव्हता.

ती म्हणाली, "तुझं नाव काय, मुला?"

"रॅच," रॅच उत्तरला तेव्हा त्याचा आवाज श्वास कोंडल्यासारखा आला, तो फार खजिलही झाला होता. मग त्याने पुढे जोडलं, "रॅच, मिस्सस."

"काय आगळाच योगायोग आहे हा," ती म्हणाली. तिचे डोळे चमकत होते, "शकुनच म्हणायचा. माझं नाव आहे- रॅचेल. गंमत आहे की नाही? पण या आता, आम्ही तुमची नीट काळजी घेऊ. जेवताना भरपूर वेळ आहे आपल्याला गप्पा मारायला." "थांबा, मॅडम," डॉर्स म्हणाली, "आम्ही कुठे आहोत, विचारू का?"

“वाय, डियर! आणि मला प्लीज रॅचेल म्हणा- थोडी जवळीक झाली की तेच बरं. मला अनौपचारिकपणे वागलेलंच बरं वाटतं.”

डॉर्स ताठरली, “आम्ही विचारलं याचं आश्चर्य वाटलं तुम्हाला? आम्ही कुठे आहोत ते जाणून घ्यावंसं वाटणं स्वाभाविक नाही का?”

रॅचेल छानसं किणकिणतं हसली. “खरंच, डॉ. वेनाबिली, या आमच्या जागेच्या नावाचं काहीतरी केलं पाहिजे. मी प्रश्न विचारला नव्हता- मी नाव सांगितलं. तुम्ही विचारलंत तुम्ही कुठे आहात- मी सांगितलं- वाय. व्हाय हा प्रश्न नाही- तुम्ही वाय सेक्टरमधे आहात.”

“वाय मध्ये?” सेल्डन जोरात उद्गारला. “होय, खरंच, डॉ. सेल्डन. तुम्ही त्या डिसेनियल कॉन्फरन्समधे भाग घेतल्यापासून आम्हाला तुम्ही हवे होतात... आणि आता तुम्ही इथे आहात, याचा मला मनापासून आनंद होतोय.”

८४

विश्रांती, अंग लांबवण्यात, आंघोळी करण्यात, नवीन कपडे- झुळझुळीत सॅटिनी आणि ढिलेढाले, वायच्या ढंगातले कपडे- मिळण्यात, घालण्यात आणि मग छान झोप काढण्यात जवळपास अख्खा दिवस सरला.

वाय मधल्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मॅडम रॅचेलनी दिलेलं डिनरचं आश्वासन प्रत्यक्षात आलं.

भलं मोठं टेबल होतं ते- हॅरि सेल्डन, डॉर्स वेनाबिली, रॅच आणि रॅचेल इतकेच लोक असताना त्या मानाने खूपच मोठं. भिंती आणि छतावर हलकासा प्रकाश होता. त्यावरच्या रंगछटा थोड्याथोड्या वेळाने बदलत होत्या... पण

डोळ्यांना त्रास होईल अशी उघडझाप नव्हती. टेबलवरचं कापड- कापड नव्हतंच ते- कळत नव्हतं ते काय होतं- पण त्याला लकाकी होती.

रॅशेल एक डौलदार यजमानीण होती, मित्रत्वाने बोलत होती आणि तिला रॅच खूपच आवडला होता- त्याने तिच्या शेजारीच बसावं असा आग्रह तिने धरला.

रॅच आता घासून, चकचकीत झाल्यासारखा चमकदार दिसत होता. नव्या कपड्यात त्याला ओळखताच येत नव्हतं. त्यांचे केसही धुवून, छानदार कापून, विंचरून झाले होते. एक शब्दही त्याच्या तोंडून फुटत नव्हता. त्याला जणू वाटत होतं आपल्या तोंडून निघणारी भाषा आताच्या आपल्या अवताराला साजेशी नसेल. तो फारच अस्वस्थ झालेला... डॉर्सकडे पाहात होता. ती कोणती सुरू, चमचे उचलते, काय ठेवते हे पाहातपाहात तस्संच करायचा प्रयत्न करत होता.

जेवण फारच छान होतं पण मसालेदार होतं. इतके मसाले की मूळ पदार्थ कोणता आहे हे सेल्डनला कळतच नव्हतं.

रॅशेलच्या गोलमटोल चेहऱ्यावर छानसं हसू होतं आणि तिचे शुभ्र दातही हसताना छानच दिसत होते.

“तुम्हाला वाटेल की या पदार्थांत मायकोजेनियन चवी घातल्या आहेत. पण तसं नाही. सगळं इथंच तयार झालेलं आहे. वायच्या तुलनेत या ग्रहावरचा कुठलाच विभाग स्वावलंबी नाही. खूप मेहनत करतो आम्ही त्यासाठी.”

सेल्डनने गंभीरपणे मानेने होकार दर्शवला आणि म्हणाला, “आम्हाला तू जे काही देऊ केलंस ते सर्व अगदी उत्तम असंच होतं. खूप आभार.” पण मनातल्या मनात तो म्हणाला, मायकोजेनियन अन्नाच्या तुलनेत हे कमीच चवदार होतं. शिवाय त्याच्या मनात मघापासून येत होतं- जे त्याने डॉर्सला बोलूनही दाखवलेलं... आपण

आपलाच पराभव साजरा करतोय- किंवा ह्युमिनचा. अखेर त्यांना वायवाल्यांनी पकडून ताब्यात घेतलंच. अपरसाईडवर जे झालं तेव्हाही ह्युमिनला तीच शंका होती.

रॅचेल म्हणाली, "मी यजमानीण आहे- तेवढ्याच भूमिकोतून काही व्यक्तिगत प्रश्न विचारले तर मला क्षमा करा. मी एक गोष्ट गृहीत धरली ती बरोबर आहे का- की तुम्ही तिघे एका कुटुंबातले नाहीत. तुम्ही दोघांचं लग्न झालेलं नाही आणि रॅच तुमचा मुलगा नाही. "

"आम्हा तिघांचं काहीही नातं नाही," सेल्डन उत्तरला, "रॅच ट्रॅन्टॉरवर जन्मला, मी हेलिकॉनवर आणि डॉर्स सिन्नावर."

"मग तुम्ही तिघे भेटलात तरी कुठे?"

सेल्डनने थोडक्यात, फार तपशील न देता सांगितलं. "आमच्या भेटण्यात काही रोमांचक नव्हतं किंवा काही खास महत्त्वाचंही नव्हतं." तो म्हणाला.

"पण तरीही फक्त तुम्हालाच डाह्लमधून बाहेर घेऊन जाण्याचा सर्जंट थॅलसने आग्रह धरला तेव्हा तुम्ही बरीच हुज्जत घातलीत असं मला कळलं. तो माझा वैयक्तिक सहाय्यक आहे."

सेल्डन गंभीरपणे उत्तरला, "आता माझा डॉर्स आणि रॅच दोघांवरही जीव आहे. त्यांच्यापासून वेगळं व्हायची माझी इच्छा नव्हती."

रॅचेल मंद हसली, "भावनाप्रधान आहात तर तुम्ही."

"होय, भावनाप्रधानही आहे आणि गोंधळलेलाही आहे."

"गोंधळलेला?"

"हो ना, आणि आपण इतक्या मित्रत्वाने व्यक्तिगत प्रश्न विचारलेतच तर मीही एक व्यक्तिगत प्रश्न विचारला तर चालेल का तुम्हाला?"

“अगदी जरूर विचारा, डॉ. हॅरि. अगदी मनात असेल ते काहीही विचारा.”

“आम्ही प्रथम इथे आलो, तेव्हा तुम्ही म्हणालात, की मी जेव्हा दशवार्षिक परिषदेत बोललो तेव्हापासून मी तुम्हाला हवा होतो. त्याचं काय बरं कारण असेल?”

“त्याचं कारण न कळण्याइतके साधेभोळे तर तुम्ही नक्कीच नाही. तुमच्या सायकोहिस्ट्रीसाठीच तुम्ही आम्हाला हवे आहात हे स्पष्टच आहे.”

“तेवढं तर कळलंच मला. पण मी ताब्यात आलो म्हणजेच सायकोहिस्ट्री तुमची झाली असा विचार तुम्ही कसा काय करता?”

“तुम्ही ती निष्काळजीपणे कुठे हरवून तर टाकू शकत नाही.”

“त्यापेक्षाही वाईट आहे, रॅशेल, ती माझ्याकडे कशी नव्हतीच.”

रॅशेलच्या गालावरच्या खळया स्पष्ट झाल्या, “पण तुमच्या भाषणात तर तुम्ही म्हटलं होतं तसं. मला काही तुमचं भाषण कळलं नव्हतं म्हणा. मी काही गणितज्ञ नाही. आकड्यांचा तर मला फार वैताग येतो. पण मी अनेक गणितज्ञांना नोकरीवर ठेवलंय. त्यांनी मला सांगितलं तुम्ही काय सुचवताय ते.”

“तसं असेल तर, रॅशेल, जरा अधिक काळजीपूर्वक ऐक. मी कल्पना करू शकतो की त्यांना तुला काय सांगितलं असणार- त्यांनी सांगितलं असणार की सायकोहिस्टॉरिकल भाकितं शक्य आहेत, पण त्यांनी हेही नक्कीच सांगितलं असेल की हे व्यवहारात शक्य नाही.”

“माझा यावर विश्वास नाही, हॅरि. दुसऱ्याच दिवशी तुला त्या तोतया सम्राटाने- क्लिऑनने बोलावून घेतलं.”

“तोतया सम्राट?” डॉर्स उपहासाने पुटपुटली.

"मग काय तर?" रॅशेल गंभीर प्रश्नाला उत्तर देत असल्यासारखी बोलू लागली, "तोतया सम्राटच. सिंहासनावर त्याचा लेशमात्र अधिकार नाही."

"रॅशेल," हॅरि हा संवाद गैरलागू असल्यासारखा उडवून देत म्हणाला, "आणि मी त्यालाही तुला जे दिलं तेच उत्तर दिलं. आणि त्याने मला जाऊ दिलं."

आता मात्र रॅशेलची मुद्रा हसरी राहिली नव्हती. तिच्या स्वरालाही हलकीशी धार आली. "हो तर, त्याने तुला जाऊ दिलं. लहान मुलांच्या गोष्टीतली मांजर उंदराला जाऊ देते तसं. तो तुझा पाठलाग सतत करतो आहे. स्ट्रीलिंग, मायकोजेन, डाह्ल सारीकडे तो तुमचा पाठलाग करत होताच. हिंमत झाली नाही म्हणून, नाही तर इथेही झाला असता तुझा पाठलाग. पण जाऊ दे ते. आपण फारच गंभीर झालोत. जरा सुखाने खाऊपिऊ, मजा करू. काही संगीत ऐकू." तिच्या तोंडून शब्द बाहेर पडताहेत तोच सौम्य, सुरेल संगीताचे सूर वातावरणात पसरले. ती रॅचच्या बाजूला झुकली आणि म्हणाली, "बेटा, तुला काटेसुऱ्यांनी खाता येत नसेल तर चमचा वापर किंवा हाताने खाल्लंस तरीही चालेल. माझी काही हरकत नाही."

रॅच उत्तरला, "होय, मॅम," त्याने आवंढा गिळला, पण डॉर्सने त्याला ओठ मूकपणे हलवत सांगितलं- काट्यानेच खा. तो काट्यानेच खात राहिला.

डॉर्स म्हणाली, "अतिशय सुरेल आहे हे संगीत, मॅडम." तिने अनौपचारिक संबोधन जाणीवपूर्वक टाळलं होतं. "पण त्यातून आपलं लक्ष मूळ विषयावरून विचलित होता कामा नये. या सर्व प्रांतात आमचा पाठलाग करणारे सारे लोक वाय प्रांताचेच असू शकतील की काय असा मला प्रश्न पडतो... एक शंका. वाय प्रांताची यात भूमिका नसती, तर तुम्हाला एवढी सगळी साद्यंत माहिती कशी काय मिळाली असती बरं?"

रॅशेल मोठ्याने हसली,”वाय प्रांताचे डोळे आणि कान सर्वत्र असतात, पण पाठलाग मात्र आम्ही केला नाही. तसं असतं तर तुम्हाला ताबडतोब उचललं असतंच आम्ही- पण अखेर तुम्ही जेव्हा डाह्लमध्ये आलात- तेव्हा मात्र आम्हीच पाठलाग केला होता. जिथे कुठे पाठलागाला अपयश येतं, किंवा हाताची पकड निसटते तेव्हा तो प्रयत्न डेमेर्झेलचाच असणार हे धरूनच चाला.”

“डेमेर्झेलला तुम्ही फारच तुच्छ लेखता काय?” डॉर्स पुटपुटली.

“हो, आश्चर्य वाटतंय? आम्ही त्याला हरवलं.”

“तुम्ही? की वाय प्रांताने?”

“वाय प्रांताने अर्थातच. वाय प्रांताचा विजय तो माझाच विजय असतो.”

“किती विचित्र आहे हे. सगळ्या ट्रॅन्टॉरवर एकंदर समज असा आहे, की वाय प्रांताच्या रहिवाशांचा विजय, पराजय किंवा कशाशीही संबंध नसतो. वाय प्रांतात एकच इच्छा चालते, एकच मूठ वळते- ती म्हणजे वाय प्रांताच्या महापौराची. तुम्ही किंवा इतर कुठल्याही वायनचं काही फारसं वजन पडत नसतं.” डॉर्स म्हणाली.

रॅशेलने लांबरूंद हसू मुद्रेवर पसरू दिलं. तिने रॅचकडे दयाळू नजर टाकत त्याचा गालगुच्चा घेतला आणि म्हणाला, “आमचे महापौर अधिकारशहा आहेत आणि केवळ त्यांची एकच इच्छा इथे प्रमाण आहे असं तुम्ही सुचवत असाल तर तुमचं तसं बरोबरच आहे. पण मी प्रथम पुरुषी सर्वनाम वापरू शकते कारण माझी इच्छा महत्त्वाची आहेच.”

“तुमचीच का?” सेल्डनने विचारलं.

“का नाही?” रॅशेल म्हणाली, सेविका टेबल रिकामं करू लागल्या होत्या, “वाय प्रांताची महापौर मीच आहे.”

## ८५

पहिली प्रतिक्रिया रॅचकडून आली. सभ्य, सुसंस्कृत, शिस्तीत वागण्याचा बळेच पांघरलेला बुरखा विसरून तो खदखदून हसतच ओरडला, "ओ मॅडम, तुम्ही कशा महापौर असाल, महापौर तर एक पुरुष माणूस आहे." रॅशेलने त्याच्याकडे गोड हसून पाहिलं, आणि त्याच्या आवाजाची नक्कल करत म्हणाली, "ओ बच्चा, काही महापौर पुरुषमाणूस असतात आणि काही बाईमाणूस असतात. जरा डोक्यात शिरवून घे हे, आणि चांगलं शिजू दे तिथे." रॅचचे डोळे विस्फारले, तो अचंबित झाला होता. अखेर तो म्हणाला... "हाहाः, मॅडम, तुम्ही तर एकदम मस्तच बोलता."

"अगदी, तुला हवं त्या प्रकारे बोलू शकते मी," रॅशेल हसतच म्हणाली.

सेल्डन किंचित खाकरत म्हणाला, "रॅशेल, काय व्यवस्थित ॲक्सेन्ट जमतोय तुला!"

रॅशेलने किंचित् मान उडवली. "बऱ्याच वर्षांत वापरायची वेळ आली नव्हती. पण सहसा अशा गोष्टी विसरल्या जात नाहीत. एक मित्र होता माझा- डाह्लाईट होता. मी अगदी तरूण होते तेव्हाची गोष्ट," ती सुस्कारला. "तो या ढंगात बोलायचा नाही खरं तर. तो सुशिक्षित होता- पण मनात आणलं तर बोलू शकायचा. त्याने मला शिकवलं तसं बोलायला. त्याच्याशी त्या ढंगात बोलायला मजा यायची मला. आमच्या बाकीच्या पार्श्वभूमीपासून दूर गेल्याची भावना यायची. मस्त वाटायचं. अर्थात हे अशक्यच होतं. माझ्या वडिलांनी तसं स्पष्टच सांगितलं होतं. आणि आता हा छोटासा बदमाष मुलगा, रॅच... मला त्या दिवसांची आठवण करून देतो आहे. त्याची बोलण्याची ढब, त्याचे डोळे, त्याच्या व्यक्तिमत्वातील औद्धत्य... अजून सहासात वर्षं- आणि तरूण पोरींची धडधड वाढवणार हा- गोड धडधड. होय की नाही, रॅच?"

रॅच गडबडला, “अं... म मी मला... मला नाही माहीत, मॅम.”

“नक्कीच नक्कीच. तू माझ्या त्या जुन्या मित्रासारखाच दिसू लागशील. आणि मग तुला मी न भेटणंच बरं राहील माझ्यासाठी... चला, जेऊन झालं असेल तर तुझ्या खोलीत जा बरं, रॅच. थोडा वेळ हवं तर होलोव्हिजन बघ. तू वाचत नसणारच बहुतेक.”

रॅच वरमून लाल हो म्हणाला, “वाचायला शिकणार आहे मी. मास्टर सेल्डन म्हणालेत तसं.”

“नक्की शिकशील.”

एक तरूण मुलगी तिथे आली. रॅशेलला झुकून अभिवादन करून ती रॅचकडे वळली. तिला बोलवून घेण्याचा इशारा केलेला सेल्डनला कळलाही नव्हता. रॅच म्हणाला, “मी मास्टर सेल्डन आणि मिस वेनाबिलींच्या बरोबर राहिलो तर नाही चालणार?”

“नंतर भेटतीलच ते तुला,” रॅशेल अगदी शांत समजावणीच्या सुरात बोलत होती, “पण आत्ता मला त्या दोघांशी बोलायचं आहे. त्यामुळे तुला जायला हवं.” डॉर्सने त्याला शब्द न उच्चारताच जायला सांगितलं. रॅच तोंड वाकडं करत खुर्चीतून उतरला आणि त्या सेविकेच्या मागोमाग गेला.

रॅच गेल्यावर रॅशेल सेल्डन आणि डॉर्सकडे वळून म्हणाली, “तो सुरक्षित असेल आणि त्याला अर्थातच छान वागवलं जाईल. प्लीज काळजी करू नका. आणि मीही सुरक्षित आहे. आत्ताच तुम्ही पाहिलंत- ती सेविका कशी नकळत आत आली. तसेच- त्यापेक्षाही अधिक जलद गतीने एक डझनभर सशस्त्र सैनिक माझ्या एका इशाऱ्यासरशी आत येतील. हे तुम्ही समजून घ्यावं अशी माझी इच्छा आहे.”

सेल्डन सहजपणे उत्तरला, "तुझ्यावर हल्ला करण्याचा आमचा अजिबात विचार नाही, रॅशेल. की आता मदाम मेयर म्हणायचं?"

"रॅशेलच म्हणायचं. हॅरि, मला असं कळलं की तू एक विशिष्ट शैलीचा कुस्तीगीर वगैरे आहे. आणि डॉर्स चाकूसुरे चालवण्यात पटाईत आहे. आम्ही काढून घेतले आहेत तुझे सुरे, डॉर्स. तू विनाकारण त्यांचा वापर करू नयेस म्हणूनच. मला हॅरि जिवंतही हवाय आणि मित्रत्वानेच हवा आहे."

"अगदी नीटच कळलंय ते, मदाम मेयर," डॉर्सने मैत्रीचा अभाव स्वरातूनही अधोरेखित केला, "गेली चाळीस वर्षे- ते आतापर्यंत- वायचे अधिपती असलेले चौथे मॅनिक्स, अजूनही जिवंत आहेत आणि पूर्णतः कार्यक्षम आहेत. मग तुम्ही कोण आहात नक्की?"

"मी जे सांगितलं तेच आहे मी, डॉर्स. चौथे मॅनिक्स हे माझे वडील आहेत. ते अर्थातच जिवंत आहेत आणि कार्यक्षम आहेत. सम्राटाच्या नजरेत आणि इतर अनेकांच्या नजरेत तेच वायचे मेयर आहेत, अधिपती आहेत- पण आता त्यांना सत्तेचा ताण सहन होईनासा झाला आहे त्यामुळे त्यांनी अखेर सूत्रे माझ्या हाती सोपवण्याची तयारी दर्शवली आहे- माझी तर तयारी होतीच. मी त्यांचे एकमेव अपत्य आहे आणि बालपणापासून माझी जोपासना राज्यकारभार करण्यासाठीच करण्यात आली होती. त्यामुळे माझे वडील कायद्यानुसार आणि नामधारी मेयर आहे. पण वास्तवात मीच मेयर आहे. वाय मधील सशस्त्र सेनेने माझ्यापाशी निष्ठा वाहिलेल्या आहेत- आणि वायमध्ये यालाच सर्वात जास्त महत्त्व आहे."

सेल्डनने मान डोलावत म्हटलं, "तसंच असो. पण तरीही मेयर चौथे मॅनिक्स असोत की मेयर रॅशेल पहिल्या असोत- पहिल्याच नाही का... तर तुम्ही मला इथे धरून ठेवण्यात काहीच अर्थ नाही. मी तुम्हाला सांगितलं की माझ्याकडे वापर करता

येण्यासारखं सायकोहिस्ट्रीचं मॉडेल नाही. किंवा इतर कुणालाही ते करता येण्याची काहीच शक्यता नाही. हेच मी सम्राटालाही सांगितलंय. तुला किंवा त्याला माझा काहीही उपयोग होणार नाही.''

रॅशेल म्हणाली, ''किती भाबडा आहेस तू. तुला या साम्राज्याचा इतिहास माहीत आहे?''

सेल्डनने मानेनेच नकार देत म्हटलं, ''अगदी अलिकडेच मला याबदद्ल अधिक माहिती असावी अशी निकड वाटू लागलीय खरी.''

डॉर्स म्हणाली, ''मला माहीत आहे साम्राज्याचा इतिहास बऱ्यापैकी. साम्राज्यपूर्व काळाचा माझा विशेष अभ्यास आहे, मदाम मेयर. पण आम्हाला तो माहीत आहे की नाही याने काय फरक पडतो?''

''तुम्हाला तो इतिहास नीट माहीत असता तर तुम्हाला हे माहीत असतं, की वायचं हे राजघराणं डेसियन राजघराण्याचा वंश आहे- अतिशय प्राचीन आणि सन्मान्य असं हे राजघराणं आहे.''

डॉर्स म्हणाली, ''डेसियन राजवंश पाच हजार वर्षांपूर्वी राज्य करत होता. या घराण्याचे वंशज- एकशेपन्नास पिढ्यांतून जितके जन्मले-मेले त्यांची संख्या- या घराण्याशी संबंध असल्याचे सर्व हास्यास्पदही दावे मान्य केले तर- आजच्या गॅलेक्सीच्या लोकसंख्येच्या निम्म्याने तर नक्कीच भरेल.''

''डॉ. वेनाबिली,'' रॅशेलचा स्वर प्रथमच कठोर होता, ''आमचे राजवंशाचे दावे हास्यास्पद नसून व्यवस्थित नोंदींतून स्पष्ट पुरावे असलेले आहेत. वाय राजवंशाने पिढ्या दर पिढ्यांतून सतत सत्तास्थाने भूषवली आहेत, आणि अनेकवार आमचे पूर्वज साम्राज्याच्या सिंहासनावरही आरूढ झाले होते.''

“इतिहासाच्या पुस्तकांतून वाय राजवंशाच्या सत्ताधाऱ्यांचे बहुतेक उल्लेख हे साम्राज्यविरोधी असल्याबद्दलचेच आहेत आणि त्यांना साम्राज्याच्या फार मोठ्या हिश्शाने कधीच मान्यता दिली नव्हती.”

“इतिहासाची पुस्तकं कुणी लिहिली त्यावर बरंच काही अवलंबून असतं. भविष्यात आम्ही लिहू ती पुस्तकं. ज्या सिंहासनावर आमचा अधिकार होता ते पुन्हा आम्ही मिळवूच.”

“ते साध्य करण्यासाठी तुम्हाला नागरी युद्ध करावं लागेल.”

“फारशी जोखीम नाही त्यात.” रॅशेल म्हणाली. तिची मुद्रा पुन्हा हसरी झालेली. “तेच तर मला तुम्हाला सांगायचंय- कुठलीही आपत्ती टाळण्यासाठीच तर मला डॉ. सेल्डन यांची मदत हवी आहे. माझे वडील- चौथे मॅनिक्स अगदी प्रथमपासून शांतीप्रेमी होते. सम्राटाच्या राजप्रासादात जे कुणी असे त्यांच्याशी निष्ठावंत असत ते. आणि संपूर्ण साम्राज्याच्या कल्याणाचा विचार करून काम करताना, वाय प्रांताला समृद्ध करतानाच ट्रॅन्टोरियन अर्थकारणालाही आधार दिला आहे.”

“असं असलं तरीही सम्राटाने त्यांच्यावर विश्वास टाकलाय असं काही मी तरी ऐकून नाही.” डॉर्स म्हणाली.

“ते तर आहेच,” रॅशेल शांतपणे बोलत होती, “कारण अखेर माझ्या वडिलांच्या काळापासून जे कुणी सम्राटपदी बसले आहेत ते सारे गादीवर खरा हक्क नसलेलेच आहेत आणि त्याची त्यांना जाणीव आहेच. खऱ्या राजवंशजांवर विश्वास टाकणं सध्याच्या सत्ताधाऱ्यांना जमण्यासारखं नाहीच. तरीही माझ्या वडिलांनी शांती राखली. या प्रांताची समृद्धी, शांती, स्थैर्य अबाधित ठेवण्यासाठी त्यांनी अतिशय उत्तम दर्जाचे सुरक्षासैन्य प्रशिक्षित करून घेतले आहे. आणि सम्राटाच्या

अधिकाऱ्यांनी या गोष्टीला परवानगी दिली कारण त्यांनाही वाय प्रांतात शांती, समृद्धी, स्थैर्य असणे महत्त्वाचे वाटते आणि वाय प्रांताची निष्ठाही.”

“पण निष्ठा आहे का?” डॉर्सने विचारलं.

“खऱ्या राजवंशासाठी निष्ठा अवश्य आहे.” रॅशेल म्हणाली, “आणि आत्ता आम्ही अशा तयारीत, अशा पायरीवर आहोत की अतिशय झटकन- विद्युतवेगाने आम्ही सत्ता ताब्यात घेऊ शकतो- आणि कुणी नागरी युद्ध हे शब्दही उच्चारण्याअगोदर खऱ्या सम्राटाने किंवा सम्राज्ञी म्हणा हवं तर- सूत्रं हाती घेतलेली असतील, आणि ट्रॅन्टॉर अगदी पूर्ववत् शांत राहील.” डॉर्सने मान झटकली.

“मी थोडं काही सांगू का? इतिहासाची अभ्यासक म्हणून?”

“मी नेहमीच ऐकून घेते सर्वांचं.” आणि तिने डॉर्सच्या दिशेने मान किंचित् झुकवली.

“तुमच्या फौजफाटा आकाराने कितीही मोठा असो, प्रशिक्षित असो वा शस्त्रसज्ज असो- पंचवीस कोटी जगांचे पाठबळ असलेल्या साम्राज्याच्या सैन्याशी त्याची तुलना होऊच शकत नाही.”

“आः, पण काय नेमकं बोट ठेवलंत तुम्ही या खोट्या सम्राटाच्या दुबळ्या जागेवर, डॉ. वेनाबिली. २५ लक्ष जगांत विखरून राहिलेले सम्राटाचे सैन्य... या सैन्याची शक्ती आपल्या अवाढव्य दीर्घिकेच्या अंतराळात विखरून विरळ झालेली आहे. त्यांचे अगणित अधिकारी आहेत, आणि त्यातले कुणीही आपापल्या ठरलेल्या प्रांतांना सोडून लढाई करण्यासाठी सज्ज नाहीत. त्यातले अनेकजण तर साम्राज्याचे हित वगैरे बाजूला ठेवून स्वतःच्या हितसंबंधांसाठी प्रथम लढतील. या उलट आमची फौज मात्र या इथेच- ट्रॅन्टॉरवरच आहे. दूरदूरच्या सेनापती आणि

सरसेनानायकांपर्यंत काहीही खबर पोहोचण्याच्या, आणि ते इथे पोहोचण्याच्या आतच आम्ही सम्राटाचं काम तमाम केलेलं असेल.”

“पण तरीही त्यांचा प्रतिहल्ला तर होईलच- आणि तो जबरदस्त असेल.”

“खात्री आहे खरंच तुम्हाला?” रॅशेल म्हणाली, “आम्ही प्रासादात असू. ट्रॅन्टॉर आमचं असेल आणि शांत असेल. साम्राज्याचे अधिकारी कशासाठी मधे पडतील? त्यापेक्षा त्यांना आपापाले प्रांत सांभाळत स्वतःची सत्ता राखणं अदिक सोयीचं पडेल नाही कां?”

“पण तेच हवंय का खरंच तुला?” सेल्डन नवलाने म्हणाला, “चिरफळ्या उडालेल्या साम्राज्यावर सत्ता गाजवण्याचीच तुमची इच्छा आहे का फक्त?”

रॅशेल म्हणाली, “अगदी बरोबर. मी ट्रॅन्टॉरवर राज्य करेन- ट्रॅन्टॉरियन हद्दीत येणारे काही प्रांत आणि सीमावर्ती भागालगतच्या काही अंतराळ वसाहती- बस्स. दीर्घिकेचे साम्राज्य सांभाळत बसण्यापेक्षा ट्रॅन्टॉरची सम्राज्ञी म्हणून सत्ता गाजवणं मला केव्हाही अधिक बरं वाटेल.”

“म्हणजे तुम्हाला फक्त ट्रॅन्टॉरवरच समाधान आहे...” डॉर्सच्या स्वरात अविश्वास होता, अचंबा होता.

“का नाही?” रॅशेल आता पेटल्यासारखी बोलू लागली. तिने आपले दोन्ही तळवे टेबलवर टेकले. “गेली चाळीस वर्षे माझे वडील हीच योजना आखत आहेत. हे स्वप्न पूर्ण झालेलं पाहाण्यासाठीच ते जीव धरून आहेत. काय गरज आहे, लाखो, करोडो जगांची... त्यांचं महत्त्व ते काय. त्यांच्यामुळे आपली शक्ती उगाच वाया जात रहाते- निरर्थक अंतराळीय अंतरांच्या क्युबिक पार्सेक्समध्ये नाहक खेचले जातो आपण. प्रशासकीय गोंधळ, न संपणारे वादविवाद, समस्या- काहीही उपयोग नाही या दूरच्या जगांचा आपल्याला. आपलं जग सर्वाधिक मोठं आहे, लोकसंख्या भरपूर

आहे, आपल्या ग्रहाचा एकसंध समाज हा संपूर्ण दीर्घिकेहून महत्त्वाचा आहे. आपली काळजी घ्यायला आपण समर्थ आहोत. बाकीची दीर्घिका- होऊ देत ना तिच्या चिरफळ्या. मिळू दे बारीकसारीक लष्करशहांना त्यांची स्वतःची चिरफळी. मग तेही भांडणार नाहीत. सर्वांसाठी पुरेसे तुकडे असतील.''

''पण तरीही ते भांडतील हे तर नक्कीच.'' डॉर्स म्हणाली, ''कुणीच आहे त्यात समाधान मानणार नाही. प्रत्येकाला शेजारी आपलं राज्य हिसकावून घेईल याची भीती वाटत राहील. प्रत्येकाला असुरक्षित वाटेल आणि त्यातून सुटण्यासाठी प्रत्येक जण दीर्घिकेच्या सम्राटपदाची स्वप्न पाहू लागेल. हे नक्कीच होणार, मदाम शून्याच्या सम्राज्ञी, जाणून असा. न संपणाऱ्या युद्धांच्या गर्तेत तुम्ही आणि ट्रॅन्टॉर खेचले जाल आणि साराच विनाश ओढवले.''

रॅशेलच्या स्वरात आता स्पष्ट तुच्छता होती, ''असं वाटू शकतं- ज्यांना फार दूरचं दिसू शकत नाही त्यांना तर नक्कीच... इतिहासाचे सर्वसामान्य धडे लक्षात घेणाऱ्या कुणालाच हे कळणार नाही.''

''दूरवरचं काय बरं बघायचं?'' डॉर्सने कुत्सित स्वरात विचारलं. ''इतिहासाच्या धड्यांपलिकडे कशावर अवलंबून रहाणार आहात तुम्ही?''

''पलिकडे काय?'' रॅशेल म्हणाली, ''का बरं? पलिकडे हा आहे.'' ती सेल्डनकडे बोटाने जोरजोरात निर्देश करत होती.

''मी?'' सेल्डन उद्गारला, ''सायकोहिस्ट्रीबद्दल मी तुम्हाला आधीच स्पष्ट सांगितलं आहे-''

रॅशेल त्याला तोडत म्हणाली, ''जे आधीच सांगितलंय ते पुन्हा पुन्हा सांगूच नका माननीय डॉ. सेल्डन. त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. तुम्हाला असं वाटतं का, डॉ. वेनाबिली, की माझ्या वडिलांना यादवी युद्ध न थांबता सुरू राहील याबद्दल

काहीच कल्पना नव्हती? त्यांची अतिशय प्रभावशाली बुद्धी हे काहीही करून थांबवण्याचा काही विचार करत नसेल असं वाटतं की काय तुम्हाला? गेली दहा वर्षे- दहा वर्षे ते सज्ज आहेत- एका दिवसात साम्राज्य हाती घेण्यासाठी सज्ज आहेत. त्यांना फक्त विजयानंतर सुरक्षा कशी राखता येईल याची हमी हवी होती.''

''ती हमी नाहीच.'' डॉर्स म्हणाली.

''दशवार्षिक परिषदेत डॉ. सेल्डन यांचा निबंध ऐकल्याक्षणी ती हमी आम्हाला मिळाली. आम्हाला कशाची गरज आहे ते आम्हाला कळलं. माझ्या वडिलांना वृद्धत्वामुळे ते लगेच लक्षात आलं नाही. पण मी त्यांना समजावून सांगितल्यानंतर मात्र त्यांना ते समजलं. आणि तेव्हाच त्यांनी सारी सूत्र माझ्या हाती सोपवली. म्हणजे खरं तर, हॅरी, भविष्यात माझ्या हाती सत्ता आल्याचं श्रेय तुलाच जाणार आहे.''

''मी तुला पुन्हापुन्हा सांगतो आहे-'' हॅरि अगदी वैतागूनच म्हणाला.

पण त्याचं वाक्य तोडत ती म्हणाली, ''काय शक्य आहे काय नाही, हे सारं महत्त्वाचं नाहीच. असं होण्याची शक्यता आहे यावर लोकांचा विश्वास बसला तरी पुरेसं आहे. आणि त्यांचा तुझ्यावर विश्वास बसेल, हॅरि. ट्रॅन्टॉरचं राज्य फक्त याच ग्रहापुरतं असेल आणि बाकीची सारी जगे आपापली प्रशासने सांभाळून शांतीत जगू शकतात हे जर तू त्यांना सायकोहिस्टॉरिक भाकित म्हणून सांगशील तर त्यांचा नक्की विश्वास बसेल.''

''असलं काहीही भाकित मी करणार नाही.'' सेल्डन म्हणाला, ''सायकोहिस्ट्रीचं शास्त्र प्रगत होत नाही तोवर मी असल्या लबाड्या करणार नाही. तुला हवं तर तूच कर तसलं भाकित.''

“हॅरि, अरे बाबा, ते माझ्यावर विश्वास ठेवणार नाहीत. तुझ्यावर ठेवतील. तू मोठा गणितज्ञ आहेस. खूष करून टाक त्यांना!”

“खरं सांगायचं तर,” सेल्डन म्हणाला, “सम्राटांनाही माझा वापर अशाच प्रकारे सोयिस्कर भाकितं वर्तवण्यासाठी करून घ्यायचा होता. मी त्यांना नकार दिला, तर तुमच्यासाठी हो म्हणेन असं वाटलं का तुम्हाला?”

रॅशेल जरा वेळ गप्प राहिली, आणि मग ती जेव्हा पुन्हा बोलू लागली तेव्हा तिच्या आवाजातला उत्साह ओसरला होता आणि त्यात आर्जव आलं होतं.

“हॅरि,” ती म्हणाली, “क्लिऑन आणि माझ्यात जो फरक आहे त्याचा थोडासा विचार कर. क्लिऑनला तुझ्याकडून केवळ त्याचं राजसिंहासन शाबूत ठेवण्यासाठी लागणारा प्रचार हवा होता. त्यात काही अर्थ नव्हता कारण ते राजसिंहासन आता सावरण्याच्या पलिकडे गेलंय. गॅलॅक्टिक साम्राज्य सडत चाललंय, फार काळ ते जीव धरून रहाणार नाही हे तुला माहीत नाही कां? ट्रॅन्टॉर सुद्धा हळुहळू घसरणीला लागलंय. पंचवीस दशलक्ष जगांचा कारभार सांभाळता सांभाळता त्या ओझ्याखाली दबून चाललंय. तू क्लिऑनसाठी काही केल्याने वा न केल्याने काही फरक पडणार नाही, नागरी युद्ध आणि फाटाफूट अटळ आहे.”

सेल्डन म्हणाला, “मी हे सुद्धा ऐकलंय कुणाकडून तरी. खरंही असेल. पण मग काय?”

“युद्धाशिवाय फाटाफूट घडवून आणण्यासाठी मला मदत कर. ट्रॅन्टॉरचा ताबा घ्यायला मला मदत कर. छोट्या राज्यावर स्थिर आणि कुशल कारभार देऊ शकेल असे सरकार स्थापन करायला मला मदत कर. बाकी साऱ्या दीर्घिकेला मी स्वातंत्र्य देऊन टाकेन. ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या संस्कृतीनुसार, परंपरांनुसार वागू दे. दीर्घिकेची एकात्मता व्यापार, पर्यटन आणि संपर्क यासारख्या मुक्त

सस्थांमार्फत टिकून राहील. आणि सध्याच्या कारभारात जे चाललं आहे, जे काही गोंधळ माजले आहेत ते थांबेल. विघटनाची रक्तलांच्छित प्रक्रिया थांबेल. माझी महत्त्वाकांक्षा ही अगदी छोटीशी आहे. एकच जग. लक्षावधी जगे नकोत. शांती हवी, युद्ध नको. स्वातंत्र्य हवं, गुलामी नको. विचार कर, आणि मला मदत कर.''

सेल्डन म्हणाला, ''गॅलॅक्सी तुझ्यावर विश्वास ठेवणार नाही म्हणतेस, तसंच मग माझ्यावरही कशासाठी विश्वास ठेवेल? मला तर ते ओळखतही नाहीत, आणि कुठला फ्लीट कमांडर केवळ 'सायकोहिस्ट्री' हा शब्द ऐकून प्रभावित होईल?''

''आत्ता तुझ्यावर कुणीच विश्वास ठेवणार नाही, पण मी कुठे आत्ताच काही करायला सांगतेय. वाय राजघराण्याने हजारो वर्षं वाट पाहिली आहे, अजून हजारभर दिवस वाट पाहायला काहीच हरकत नाही. माझ्याशी सहकार्य कर, मी तुझ्या नावाला प्रसिद्धी देईन. सायकोहिस्ट्रीचे आश्वासन साऱ्या जगांत झळाळून उठेल. आणि जेव्हा मला वाटेल की योग्य क्षण आला आहे तेव्हा तू तुझी भाकिते जाहीर करशील- आपण मर्मभेद करू. आणि मग इतिहासाचा तो क्षण लखलखून उठेल आणि सारी गॅलक्सी नव्या व्यवस्थेखाली नांदू लागेल.''

१८-

# सत्तापालट

थॅलस एमर- ट्रॅन्टॉरच्या वाय प्रभागातील सशस्त्र सुरक्षा दलातील सार्जंट.

याची उंची-वजन वगैरे सामान्य मापे सोडली तर याच्याबद्दल काहीही माहिती नाही. मात्र एका क्षणी त्याच्या मुठीत साऱ्या गॅलेक्सीचे भवितव्य होते एवढेच ज्ञात आहे.

- दीर्घिका ज्ञानकोष

८६-

दुसऱ्या दिवशी सकाळी या तीन अपहृतांना त्यांच्या खोल्यांजवळच्याच एका दालनात नाश्ता देण्यात आला. अतिशय विलासी असे दालन होते ते. खाद्यपदार्थांचे वैविध्य आणि वैचित्र्य मुबलक होते आणि सारेच भरपूर. सेल्डनच्या समोर मसालेदार सॉसेजेसचा ढीग होता. डॉर्स वेनाबिलीने गंभीर स्वरात त्याला कुपचन, पोटदुखीबद्दल सावध करूनही काहीही परिणाम झाला नव्हता. रॅच म्हणाला, "त्या बाई- मॅडम मेयर काल रात्री आल्या होत्या मला भेटायला. त्या म्हणाल्या-"

"तुला भेटायला आलेल्या?" सेल्डनने विचारलं.

"हो, मी व्यवस्थित आहे ना ते पाहायला आल्या होत्या. मग त्या म्हणाल्या, संधी मिळाली की त्या मला प्राणीसंग्रहालयात नेऊन आणतील."

"प्राणीसंग्रहालय?" सेल्डनने डॉर्सकडे पाहिलं. "ट्रॅन्टॉरवर कसलं प्राणीसंग्रहालय असेल? कुत्रीमांजरं ठेवतात की काय?"

“काही अगदी इथलेच पूर्वीपासून असलेले प्राणी आहेत,” डॉर्स म्हणाली, “आणि काही असेच मूळ प्राणीपक्षी दुसऱ्या काही जगांतून आणवलेले असतील. आणि अर्थात सर्वत्र मिळणारेही काही प्राणी आहेतच. ते इतर जगांमध्ये ट्रॅन्टॉरपेक्षा जास्त प्रमाणात आहेत. वाय प्रांतातलं प्राणीसंग्रहालय फारच प्रसिद्ध आहे. सम्राटाच्या प्राणीसंग्रहालयाइतकंच चांगलं आहे म्हणजे- दुसऱ्या क्रमांकावर.”

रॅच म्हणाला, “चांगली म्हातारी आहे ती.”

“फार काही म्हातारी नाही ती हं,” डॉर्स म्हणाली, “पण आपल्याला खायला प्यायला भरपूर घालतेय हे नक्की.”

“हे अगदी नक्की.” सेल्डन म्हणाला.

नाश्ता उरकल्यानंतर रॅच भटकायला गेला आणि ते दोघे डॉर्सच्या खोलीत जाऊन बसले. सेल्डन वैतागून म्हणाला, “किती काळ ती आपल्याला सुटं सोडील माहीत नाही मला. आपल्याला कशात तरी गुंतवून ठेवण्याचे अनेक मार्ग शोधून ठेवले असणार त्या बयेने... वेळ घालवायला.”

“खरं म्हणजे आत्ता तरी आपल्याला तक्रारीला जागा नाहीये. मायकोजेन किंवा डाह्लमधे होतो त्या पेक्षा फारच सुखात आहोत आपण.”

“त्या बयाने तुला जिंकून घेतलं की काय?”

“मला? रॅशेलने? काहीही काय. असा विचार तरी कसा येतो तुझ्या मनात?”

“आता... सुखात आहे म्हणते आहेस. जेवणखाण चांगलं आहे. जरा सैलावणं आणि काय पुढ्यात येईल त्याची वाट पाहाणं- स्वाभाविक आहे.”

“होतर, अगदीच स्वाभाविक. करू या का तसंच?”

“हे बघ, तूच मला रात्री सांगत होतीस, की ती जिंकली तर काय होईल. मी काही इतिहासतज्ज्ञ नाही, पण तुझ्या शब्दावर माझा विश्वास आहे आणि अगदी इतिहासाचा गंधही नसलेल्या माणसालाही त्यातलं तथ्य पटेल. साम्राज्याला तडे जातील. त्याचे तुकडे पडून ते एकमेकांत सतत लढाया करत रहातील... किती काळपर्यंत हे चालेल सांगवत नाही. तिला थांबवावंच लागेल.”

“मान्यच,” डॉर्स म्हणाली. “तिला थांबवलं पाहिजेच. फक्त मला हे कळत नाही, की ही बारीकशी गोष्ट आपण आत्ताच्या घडीला कशी काय साध्य करणार··· ” ती नजर रोखून सेल्डनकडे पाहात राहिली, “हॅरी, काल रात्री तू झोपला नव्हतास?... काय रे... झोपला नाहीस ना?” त्याच्या तारवटलेल्या डोळयांवरून ते स्पष्टच दिसत होतं. तिच्या चेहऱ्यावरून काळजीचा झाकोळ सरकत गेला.

“गॅलेक्सीच्या विनाशाबद्दल मी जे बोलले त्याचा तू विचार करत जागलास?”

“ते आणि हे... चेटर ह्युमिनला काही निरोप देणं शक्य आहे का?” हे शब्द तो अगदी कुजबुजत बोलला.

डॉर्स उत्तरली, “ डाह्लमधून निघत असतानाच मी त्याच्याशी संपर्क करायचा प्रयत्न केला होता. तो आला नाही. मला माहीत आहे त्याला निरोप मिळाला असणार. पण तो आला नाही. काहीही कारणं असू शकतात, तो नाही पोहोचू शकला आपल्यापर्यंत, पण जमेल तेव्हा तो नक्की येईल.”

“त्याच्यावर काही संकट तर आलं नसेल ना?”

“नाही,” डॉर्स शांतपणे उत्तरली, “मला नाही वाटत तसं.”

“तुला कसं माहीत असणार?”

“काही झालं तर माझ्यापर्यंत खबर पोहोचेल नक्की- या ना त्या प्रकारे. खात्री आहे मला. तसं काही कळलेलं नाही मला.”

सेल्डन कपाळाला आठ्या घालत म्हणाला, “मला काही एवढी खात्री वाटत नाही या सगळ्याबद्दल. म्हणजे मला जराही विश्वास वाटत नाही. जरी ह्युमिन आला, तरीही तो या प्रकरणात करणार तरी काय? तो काही अख्ख्या वाय प्रांताशी लढाई करू शकणार नाही. रॅशेल म्हणते तसे तिच्याकडे ट्रॅन्टॉरमधले सर्वोत्तम सैन्य असले तर तो त्याविरुद्ध काय करू शकतो?”

“यावर चर्चा करण्यात काहीच अर्थ नाही. रॅशेलची खात्री पटवू शकतोस का तू? तिच्या डोक्यात हे घुसव की तुझ्याकडे सायोकहिस्ट्री नाही.”

“तिला ते चांगलं माहीत असणार... आणि येती अनेक वर्षं माझ्याकडे काहीही नसेल हेही तिला कळतंय. असण्याची शक्यता असलीच तर... पण ती तरीही म्हणत राहील की माझ्याकडे सायकोहिस्ट्री आहे. आणि तो खेळ कौशल्याने खेळली तर लोकांचाही त्यावर विश्वास बसेल, आणि ती सांगेल त्या भाकितांना मी केलेली भाकितं समजून ते त्यानुसार वागतील. मी एक शब्दही उच्चारला नाही, तरीही ते विश्वास ठेवतील की हे मीच सांगितलं.”

“त्याला अर्थातच वेळ लागेल. ती काही तुला एका रात्रीत या अर्थाने उभं करू शकणार नाही. आठवडाभरातही नाही. हे सारं व्यवस्थित करायचं तर निदान एक वर्षं तरी तिला घालवावं लागेल.”

सेल्डन खोलीतल्या खोलीत येरझारे घालत होता. तो तटकन् वळला आणि मागे आला.

“ते असेल, माहीत नाही मला. पण जे काय करायचं ते लवकर करायचा दबाव तिच्यावर असेल. फार धीर धरण्याचा गुण नसावा तिच्याकडे असं वाटतंय

मला. शिवाय तिचा वृद्ध बाप, मॅनिक्स चौथा- हासुद्धा अधीर झाला असणार. मृत्यूच्या छायेत आहे तो. आयुष्यभर हेच स्वप्न रंगवत आल्यानंतर जे काही व्हायचं ते मेल्यानंतर आठवड्याभरात होण्यापेक्षा मरण्याच्या आठवडाभर आधीच व्हावं अशी घाई त्याला लागली असणार. शिवाय-" तो थबकला.

"शिवाय काय?"

"शिवाय आपल्याला आपलं स्वातंत्र्य असलंच पाहिजे. कळलं का तुला- सायकोहिस्ट्रीचा प्रश्न मी सोडवलाय."

डॉर्सचे डोळे विस्फारले, "तू सोडवलास? सगळं झालं पूर्ण?"

"सगळं नाही झालं पूर्ण. त्याला काही दशकं जावी लागतील. कदाचित् शतकंही. सांगू शकत नाही मी. पण ते व्यवहारात येऊ शकणारं शास्त्र आहे. केवळ सैद्धांतिक मांडणी नव्हे हे मी सांगू शकतो. पण त्यासाठी मला शांतता हवी, वेळ हवा आणि काम करण्यासाठी सुविधा हव्याच. जोवर मी किंवा माझे वैचारिक वारसदार हे शास्त्र परिणत करत नाहीत, आणि समजा काही आपत्ती आलीच तर नुकसान कमीत कमी कसं करता येईल हे ताडू शकत नाहीत तोवर हे साम्राज्य एकत्र बांधून राहिलं पाहिजे. याच विचाराने मी माझं काम सुरू केलं होतं- आणि त्यावर काम करायची संधी मिळत नाही या विचारानेच मला काल रात्री झोप लागली नव्हती."

८७-

वाय मधील हा त्यांचा पाचवा दिवस होता. सकाळ झाली होती. रॅचला त्याचा उंची औपचारिक पोषाख घालायला डॉर्स मदत करत होती. दोघांनाही ते काही जमत नव्हतं. रॅच जरा साशंक नजरेनेच स्वतःला होलोआरशात न्याहाळत होता आणि त्याचं प्रतिबिंब डाव्या-उजव्याचा घोळ न करता त्याची नक्कल करताना

दिसत होतं. त्याने प्रथमच असला आरसा पाहिला होता. त्यामुळे त्याला स्पर्श करून पाहायचा मोह अर्थातच झाला त्याला. आणि हात आरपार गेला तेव्हा तो हसत सुटला. अखेर तो उद्गारला, "मी काय विचित्र दिसतोय."

त्याने आपला सदरा निरखून पाहला. अगदी मऊ कापड होतं ते आणि कंबरेवर जाळीचा नाजूकसा पट्टा. त्याची गळपट्टी एखाद्या कपसारखी मानेभोवती उंच जात कान झाकत होती.

"एखाद्या वाडग्यात माझं डोकं बसवलंय असं वाटतंय."

"हं. पण इथली श्रीमंत मुलं असलेच कपडे घालतात. तुला बघून अनेकांना मत्सर वाटेल. कौतुकाने बघतील सगळे." डॉर्स म्हणाली.

"केस सगळे चपट झालेत माझे, तरीही?"

"होहो. ही बघ ही छोटी गोल टोपी घालायचीय वर. की झालं."

"याच्याने तर माझं डोक गरगरीत चेंडूसारखंच दिसतंय."

"कुणाला लाथ मारू देऊ नको म्हणजे झालं. आता हे बघ- मी काय सांगितलं लक्षात ठेवायचं. जरा सावध रहा. अगदीच लहान पोरासारखं वागू नको."

"पण मी लहानच आहे ना," तो तिच्याकडे डोळे मोठेमोठे करून निरागसपणे विचारू लागला.

"अरे वा, हे तुझ्या तोंडून ऐकणं म्हणजे नवलच भारी." डॉर्स म्हणाली, "मला वाटायचं की तू स्वतःला बारा वर्षांचा मोठा माणूस समजतोस."

रॅश खुदुखुदू हसला, "बरं बरं, मी करतो चांगली हेरगिरी."

“मी तुला तसं काहीही करायला सांगत नाहीये. उगीच काहीतरी करायला जाऊ नकोस. दरवाजांना कान लावू नकोस. पकडला गेलास तर बरं होणार नाही- तुझ्या दृष्टीने तर नाहीच.”

“ओः काय पण तुम्ही... मी कोण वाटलो कोण तुम्हाला? काय लहाना आहे का मी?”

“अरे आत्ताच तर तू म्हणालास ना- की तू लहान आहेस म्हणून? कुणाला काही कळू न देता सगळं नीट ऐकून ठेव. आणि ते लक्षात ठेवून आम्हाला सांग. अगदी सोपंय.”

“सोपंय म्हणायला सोपंय तुम्हाला- मिस वेनाबिली,” रॅच हसत म्हणाला, “आणि माझ्यासाठी करायलाही सोपंय.”

“काळजी घे, हं.”

“पैज लावा,” रॅच डोळा मारत म्हणाला.

एक हरकाम्या नोकर रॅचला घेऊन रॅशेलकडे न्यायला आला. त्याचा उद्धट आविर्भाव बघून तो नोकरच आहे हे कळत होतं.

सेल्डन त्यांच्या पाठमोऱ्या आकृत्यांकडे बघत राहिला आणि म्हणाला, “ते पोर बहुतेक प्राणीबिणी काही बघणारच नाही. जिवाचा कान करून ऐकत राहील सगळं. एवढ्या लहान मुलाला आपण धोक्यात घालतोय हे काही मला पटत नाहीये.”

“धोक्यात? मला नाही वाटत. रॅच बिलिबॉटनच्या झोपडपट्टीत वाढलाय हे लक्षात ठेव. तू आणि मी मिळून जेवढे चलाख असू त्यापेक्षा जास्त चलाख आहे तो. शिवाय रॅशेलला तो खूप आवडलाय त्यामुळे तो जे काही करेल त्यातून तिच्या मनातलं कौतुकच वाढेल- पहा तू. बिचारी.”

“तुला तिचं वाईट वाटतंय की काय, डॉर्स?”

“का- ती मेयरची मुलगी आहे म्हणून किंवा ती स्वतःला मेयर समजते म्हणून किंवा ती साम्राज्य तोडू पाहातेय म्हणून तिला काहीच सहानुभूती देऊ नये की काय? हं... बरोबर आहे तुझं, पण काही बाबतीत तिला सहानुभूती दाकवू शकतो आपण. उदाहरणार्थ तिची अधुरी प्रेमकहाणी. उघडच आहे ते. नक्कीच कधीतरी तिचा प्रेमभंग झाला असणार- थोडा काळ तरी दुःखी झालीच असणार ती.”

सेल्डन म्हणाला, “तुझा कधी प्रेमभंग झालाय, डॉर्स?”

डॉर्स क्षण-दोन क्षण थांबली, आणि उत्तरली, “नाही खरं तर. मी माझ्या कामात एवढी मग्न असते की हृदय भंगायला वगैरे वेळच नाही.”

“वाटलंच मला.”

“मग कशाला विचारलंस?”

“कदाचित् मी चुकत असेन- म्हणून.”

“तुझं काय?”

सेल्डन जरासा अवघडला.

“हं. हो. झाला बाबा एकदा प्रेमभंग... हृदयभंग. तेवढा वेळ दिला होता मी. बरीच ठेच लागली होती...”

“वाटलंच मला.”

“मग कशाला विचारलंस?”

“मी चूक ठरू शकते म्हणून नव्हे हे नक्की. मला फक्त तू खोटं बोलतोस का ते पाहायचं होतं. तसं तू केलं नाहीस याचा आनंद आहे.”

काही क्षण तसेच सरले. मग सेल्डन पुन्हा बोलू लागला. “पाच दिवस सरलेत. आणि काहीही घडलं नाही.”

“फक्त आपल्याला चांगली वागणूक मिळतेय, हॅरि.”

“पशूंना विचार करता आला असता, तर त्यांनाही वाटलं असतं आपल्याला चांगली वागणूक दिली जातेय. पण खरं म्हणजे त्यांना धष्टपुष्ट केलं जातं ते कापून खाण्यासाठीच.”

“ती साम्राज्याला धष्टपुष्ट करतेय ते कत्तलीसाठीच हे मला मान्यच आहे.”

“पण कधी?”

“जेव्हा तिची तयारी पूर्ण झालेली असेल तेव्हाच ना!”

“ती फुशारकी मारत होती की ती एका दिवसात सत्ता उलथवू शकते. आणि मला असं वाटलं की ती हे कधीही करेल.”

“ती करू शकत असली तरीही तिला एका गोष्टीची खात्री करून घ्यावी लागेल- साम्राज्याची जी काही प्रतिक्रिया असेल तीच लुळी पाडायची गरज भासेल तिला. आणि त्या गोष्टीला वेळ लागेल.”

“किती वेळ? उमटणारी प्रतिक्रियाच माझा वापर करून तोडायचा तिचे डाव असेल, तरीही ती त्या दृष्टीने काही हालचाल करताना दिसत नाही. माझं महत्त्व वाढवण्याचा कोणताच प्रयत्न करताना ती दिसत नाहीये. मी रस्त्याने जाताना मला कुणी ओळखत नाही. वायन लोकांची गर्दी जमत नाही. हायपरन्यूजवरही काहीच नाही.”

डॉर्स हसली, “जणू काही प्रसिद्धी नाही म्हणून दुःखीच झालायस असंच वाटेल कुणालाही. भोळा आहेस तू, हॅरि. किंवा मग इतिहासाचं ज्ञान नाही तुला. दोन्हीचा अर्थ एकच. सायकोहिस्ट्रीच्या अभ्यासामुळे साम्राज्य वाचवता येईल की

नाही हा दुय्यम भाग झाला- तुला आनंद वाटायला हवा की त्यामुळे तुझी इतिहासाची जाण वाढेल. सगळ्या माणसांना इतिहास समजला असता तर निदान त्याच त्या नादानपणाच्या चुका तरी मानवजात टाळू शकली असती.''

"कोणत्या दृष्टीने मी भोळा आहे?'' सेल्डनने मान वर उचलून नाक उडवत तिच्याकडे खाली पाहात विचारलं.

"रागावू नकोस, हॅरि. ते तुला शोभूनच दिसतं म्हणेन मी.''

"हां हां. त्यामुळे तुझं वात्सल्य जागं होतं आणि माझी काळजी घेण्याची जबाबदारी तुझ्यावर आहेच. पण मी भोळा कशामुळे आहे म्हणतेस?''

"रॅशेल सगळ्या साम्राज्यवासीयांमध्ये तू कुणी मोठा द्रष्टा आहेस हा प्रचार करेल हा तुझा विचार भोळेपणाचा आहे. तसं केल्याने तिला काहीही लाभ नाही. अब्जावधी लोकांना झटकन् हलवणं मोठं अवघड नव्हे- अशक्य असतं. त्यातही पुन्हा शारीरिक जडतेसोबत सामाजिक आणि मानसशास्त्रीय जडतेचा प्रश्न येतो. आणि तिने उघडपणे काहीही केलं तरी डेमेर्झेलपर्यंत खबर ताबडतोब पोहोचेल.''

"मग ती करतेय तरी काय?''

"मला वाटतं, तुझ्याबद्दलची माहिती- बऱ्यापैकी फुगवून, चकचकीत करून काही निवडक लोकांपर्यंत पोहोचवली जाते आहे. प्रभागांच्या वाइसरॉयपर्यंत, आरमाराच्या ॲडमिरल्सपर्यंत... तिच्या दृष्टीने जे लोक तिच्या जवळचे होऊ शकतात आणि सम्राटाच्या विरुद्ध जाऊ शकतात- त्यांच्यापर्यंत. त्यातले शंभरएक लोक तिच्या बाजूने ठाम उभे राहिले, तर साम्राज्याच्या इतर निष्ठावंतांचा गोंधळ उडेल. त्यातून तिला- रॅशेल द फर्स्टला नवीन व्यवस्थेवर पकड बसवण्यास अवधी मिळेल- जो काही विरोध होणार असेल तो मोडून काढायला संधी मिळेल. ती असा विचार करेल असा माझा अंदाज आहे.''

“आणि आपल्याला अजूनही ह्यूमिनकडून काहीही खबर नाही.”

“तरीही तो काहीतरी करत असेल असं मला वाटतं. एवढ्या महत्त्वाच्या गोष्टीकडे तो दुर्लक्ष करणार नाही.”

“तो मरण पावला असेल तर- असंही होऊ शकतं ना?”

“शक्य आहे. पण तसं वाटत नाही मला. तसं झालं असतं तर माझ्यापर्यंत बातमी नक्की पोहोचली असती.”

“इथे?”

“हो. इथेसुद्धा.”

सेल्डनने भुवया उंचावल्या, पण काही बोलला नाही.

रॅच दुपारी उशीराने परतला. आनंदात, उत्साहात होता तो. माकडांची वर्णनं करत होता, जादूई प्राण्यांच्या गमती सांगत होता. जेवणाच्या टेबलवर त्याचीच टकळी सुरू होती. गेल्या पाच दिवसांत प्रथमच रॅशेल त्यांच्यासोबत जेवायला नव्हती. पण जेवणाचा थाटमाट तसाच होता. तेवढेच शाही पदार्थ होते आणि अदबीने वाढणारे सेवकही तेवढेच होते. जेवण झाल्यानंतर जेव्हा ते आपापल्या खोल्यांकडे गेले तेव्हाच डॉर्सने रॅचला विचारलं, “बरं, आता मला सांग, रॅच, मॅडम मेयर कायकाय म्हणाल्या... त्यातलं आम्हाला माहीत असायला पाहिजे असं सगळं सांगून टाक.”

“एक म्हणजे,” रॅचचा चेहरा उजळला, “त्याचमुळे ती जेवायला आली नसणार, पैजेवर सांगतो.”

“काय?”

“ते झूपार्क बाकी सर्वांसाठी बंद होतं. फक्त आम्हीच होतो तिथे. म्हणजे बरेच लोक होते- पण सगळे युनिफॉर्ममधले. रॅशेल, मी आणि बाकी ते सगळे- शिवाय

छानछान कपडे घालून आलेल्या त्या बायकाही होत्या. मग हा एकजण युनिफॉर्ममधलाच- तो वेगळा होता- आधी नव्हता तो- शेवटीशेवटी आला आणि तो काहीतरी कुजबुजला रॅशेलजवळ जाऊन. आणि रॅशेल सर्वांकडे पाहात वळली आणि तिने हात असा काही हलवला- जणू इथून हलू नका असं सांगितलं. आणि ते सगळे जिथल्या तिथे उभे राहिले. आणि मग ती थोडी बाजूला गेली त्या नव्या माणसाला घेऊन. त्याच्याशी बोलताना कुणालाही काही ऐकायला जाणार नाही इतकी दूर. मी लक्ष नसल्याचं दाखवलं आणि असाच इकडे तिकडे बघत असल्यासारखा तिच्या जवळ सरकलो. तिचं बोलणं ऐकायला येईल इतपत जवळ. ती म्हणाली, "हिंमत कशी होते त्यांची?" खूपच संतापलेली असणार. तो नवा युनिफॉर्मवाला भेदरलेलाच दिसत होता- मला नीट दिसला नाही तो कारण मी प्राणी बघत असल्यासारखं दाखवत होतो. त्यामुळे मला काही शब्दच तेवढे ऐकू आले. तो म्हणाला- तो कोणीतरी जनरल की काहीतरी- नाव नाही आठवत. तो सांगत होता की या जनरलने रॅशेलच्या वडिलांना शिष्टा वाहिल्या होत्या-"

"निष्ठा वाहिल्या होत्या," डॉर्स म्हणाली.

"हां, असंच काहीतरी. आणि आता एका बाईचा हुकूम पाळायचा म्हणजे त्यांना त्रास वाटत होता. तो सांगत होता की त्यांचं म्हणणं म्हातारा मेयर आजारी असेल तर त्याने कुणीतरी पुरुष वारस निवडावा. बाई नको."

"बाई नको? असं म्हणाला खात्रीने?"

"असंच. तो कुजबुजत होता. तो एवढा घाबरलेला आणि रॅशेल संतापलेली- तिला बोलताही येत नव्हतं. ती म्हणाली, 'त्याचा शिरच्छेद करेन. ते सगळे माझ्या पायाशी ते- शिष्- नाही निष्ठा वाहातील. उद्याच. आणि जे नकार देतील त्यांना तासाभराच्या आत पश्चात्ताप होईल.' अगदी हेच म्हणाली ती. मग तिने सगळा

कार्यक्रम गुंडाळला आणि आम्ही परत आलो. येताना ती माझ्याशी एक शब्द बोलली नाही. बसून होती. चेहरा रागीट करूनच बसली होती.''

डॉर्स म्हणाली, ''छान, हे कुणालाही सांगू नकोस बरं, रॅच.''

''अजिबात नाही. हेच हवं होतं ना तुला?''

''अगदी हेच. मस्त काम केलंस, रॅच. आता जा झोपायला आणि विसरून जा. विचारही करू नकोस.''

तो गेल्यावर ती सेल्डनकडे वळून म्हणाली, ''हे फारच मजेशीर आहे. आजवर कितीतरी मुलींकडे वडिलांकडून किंवा आईकडूनही वारसा आला आहे आणि त्यांनी मेयर पद किंवा आणखीही काही उच्च पदे सांभाळली आहेत. सम्राज्ञीही होऊन गेल्या आहेत- माहीत असेल तुला आणि साम्राज्याच्या इतिहासात कुणीही बाईच्या सत्तेखाली काम करायला नकार दिलेला नाही. हा प्रश्न वाय प्रांतात आत्ताच का उठावा ही आश्चर्याचीच बाब वाटते मला.''

सेल्डन म्हणाला, ''का नाही? अलिकडेच तर आपण मायकोजेनला जाऊन आलो. तिथे स्त्रियांना काहीच किंमत दिली जात नाही. सत्तेचं पद देण्याचा प्रश्नच नाही. बारीकसंही काही देत नाहीत.''

''बरोबर, पण तो अपवाद आहे. इथे अनेक भागांत स्त्रिया बलाढ्य ठरल्या आहेत. अनेक ठिकाणी सरकार आणि सत्ता यांचं वितरण फारसं समानतेच्या तत्त्वाने होत नाही हेही खरंय. स्त्रिया मुलांमुळे, शरीरधर्मांमुळे बांधल्या जातात- म्हणून अधिक पुरुष उच्च पदांवर दिसतात.''

''पण वाय मधली परिस्थिती काय होती?''

''समान लैंगिक वागणूक दिली जात असे असं मला तरी माहीत होतं. रॅशेलला मेयर पदाच्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यात काही हरकत वाटली नाही आणि

मॅनिक्सला त्या तिच्याकडे देण्यात काही हरकत वाटली नाही. असा पुरुषी विरोध झाल्यानंतर ती चकित झालेली दिसते आणि संतापलेलीही दिसते. तिची अपेक्षाच नसणार अजिबात.”

सेल्डन म्हणाला, “तुला याचा आनंद झालाय हे स्पष्ट दिसतंय. का?”

“कारण साधंय. हे अनैसर्गिक आहे. म्हणजेच याची सूत्र कुणीतरी हलवतंय. आणि मला वाटतं- ह्यूमिन याच्या मागचा सूत्रधार असावा.”

सेल्डन विचारात पडून म्हणाला, “हं. खरंय. मलाही तसंच वाटतंय.”

## ८८

हा त्यांचा वाय मधला दहावा दिवस होता. आणि सकाळीच हॅरि सेल्डनच्या दरवाजावरची घंटी वाजली. आणि रॅच ओरडत होता, “मिस्टर... मिस्टर सेल्डन- लढाई सुरू झालीय!”

सेल्डनला भानावर यायला काही क्षण लागले, पण तो धडपडत उठला. त्याला थोडी थंडी वाजत होती. वायन लोकांना घरं जरा थंडच ठेवणं पसंत असतं. हॅरिला ते आल्याआल्याच कळलं होतं. त्याने दार उघडलं तसा डोळे विस्फारलेला रॅच धडपडतच आत आला.

“मिस्टर सेल्डन, त्यांनी म्हाताऱ्या मेयरला, मॅनिक्सला ताब्यात घेतलंय. त्यांनी-”

“कुणी त्यांनी, रॅच?”

“साम्राज्याचे लोक. त्यांची विमानं काल रात्री आली, सगळ्याभर पसरलं. हायपरविजन टीव्हीवर दाखवतायत सगळं. मिस वेनाबिलींच्या खोलीतल्या

टीव्हीवर दिसतं. त्या म्हणाल्या झोपू देत तुम्हाला. पण मला वाटलं की तुम्हाला सांगायला पाहिजे.”

“अगदी बरोबर वाटलं तुला.” सेल्डनने अंगावर बाथरोब चढवला आणि तो डॉर्सच्या खोलीत शिरला. ती व्यवस्थित कपडे करून तयार बसली होती. आणि भिंतीवर दिसणाऱ्या प्रतिमा पाहात होती. एका छोट्याशा डेस्कमागे एक माणूस बसला होता. त्याच्या सदऱ्यावर डावीकडे अवकाशयान आणि सूर्य यांची प्रतिमा स्पष्ट दिसत होती. दोन बाजूंना दोन सशस्त्र शिपाई होते, त्यांच्याही शर्टवर अवकाशयान आणि सूर्याची तीच प्रतिमा होती. तो माणूस सांगत होता, ‘-शांतता प्रस्थापित झालेली आहे. सारे काही ठीक आहे. मेयर मॅनिक्स सुरक्षित आहे आणि मित्रत्वाच्या भावनेने मदतीसाठी आलेले साम्राज्याचे सैन्य त्यांचे अधिकार सुरक्षित राखत आहेत. लवकरच ते वायन्सना शांती राखण्याचे आवाहन करायला तुमच्यासमोर येतील. वायन सैन्याला शस्त्रे खाली ठेवायचे आवाहन करतील.’

आणखीही काही बातम्या होत्या, त्या गंभीर चेहऱ्याचे साम्राज्याचे वृत्त निवेदक वाचून दाखवत होते. सगळ्या बातम्या सारख्याच होत्या. वाय प्रांताच्या अमक्या तुकडीने शरणागती पत्करली, तमक्यांनी थोडा गोळीबार करून शस्त्रे खाली ठेवली, अमक्यांनी काहीही विरोधाशिवाय, प्रतिकाराशिवाय शस्त्रे खाली ठेवली. अमुक शहराचा किंवा तमुक केंद्रावर साम्राज्याच्या सैन्याने ताबा मिळवला- साम्राज्याच्या सैन्याची पलटण रस्त्याने जाताना शांतपणे पाहाणारे वायन नागरिक अनेकदा दाखवले जात होते.

डॉर्स म्हणाली, “अगदी कौशल्याने सारी योजना अंमलात आणली गेली, हॅरि. आश्चर्याचा धक्का दिलाय त्यांनी. कुणी प्रतिकार करण्याचा प्रश्नच आला नाही आणि परिणामांची धमकीही द्यावी लागली नाही.”

मग आधी जाहीर केल्यानुसार मेयर मॅनिक्स चौथे पडद्यावर आले. ते ताठ उभे होते. आणि निदान तसा देखावा उभा रहावा म्हणून त्यांच्या जवळपास साम्राज्याचे कुणीही प्रतिनिधी नव्हते. कॅमेऱ्यात दिसणार नाहीत अशा तऱ्हेने ते तिथे असणारच याची खात्री होती सेल्डनला. मॅनिक्स म्हातारा झाला होता, पण ताठ होता ते स्पष्ट दिसत होतं. पण त्याने कॅमेऱ्याकडे एकदाही पाहिलं नाही. त्याचे शब्द यंत्रवत घटवून घेतल्यासारखे उमटत होते. आधीच जाहीर केल्याप्रमाणे त्याने वायन्सना शांतता राखण्याचे आवाहन केले, प्रतिकार करू नका, वाय प्रांताचे नुकसान होईल असे वर्तन करू नका आणि सम्राटाशी (त्याला दीर्घायुष्य लाभो) सहकार्य करा असे त्याने सांगितले.

"रॅशेलचा उल्लेखही नाही, जणू त्याला कधी कुणी मुलगी नाहीच." सेल्डन म्हणाला.

"कुणीच तिचा उल्लेख केला नाही." डॉर्स म्हणाली, "तिला पकडलंय असंही कुणी म्हणत नाहीये- त्यामुळे ती मोकळीच असेल. ही जागा- इथे रहाते ती, तिच्या अनेक निवासस्थानांपैकी एक असेल, पण इथं कुणी हल्ला केलेला नाही. कदाचित् ती निसटली असेल आणि शेजारच्या प्रांतात तिने आसरा घेतला असेल. पण यापुढे ट्रॅन्टॉरवर ती कुठेही सुरक्षित राहू शकणार नाही मला वाटतं."

"कदाचित् नाही," मागून आवाज आला, "पण मी इथेच काही काळ सुरक्षित असेन असं वाटतं मला." रॅशेल आत आली होती. तिने व्यवस्थित पोषाख केलेला, आणि शांत दिसत होती. तिच्या चेहऱ्यावर स्मितहास्य होतं- पण त्यात आनंद नव्हता. दात विचकून भेडसावल्यासारखं थंडगार हसू होतं ते.

आश्चर्याने खिळून ते तिघे तिच्याकडे क्षणभर पाहात राहिले. तिच्या सेविका तिच्यासोबत आहेत की संकट येताच पळून गेल्या- सेल्डनच्या मनात विचार आला.

डॉर्स जरा तुटकपणे म्हणाली, "मॅडम मेयर, बंड होईल अशी आशा बाळगणं व्यर्थ आहे असं दिसतंय. तुम्हाला थांबवण्यात यश आलंय त्यांना."

"मला थांबवलं गेलं नाही. माझ्याशी फितुरी झालीय. माझे अधिकारी कुणालातरी वश झालेत. भूतकाळातील आमचे संबंध, विचार सारे काही बाजूला ठेवून त्यांनी एका स्त्रीसाठी लढायला नकार दिला- केवळ जुन्या धन्यासाठीच लढतील ते. आणि तरीही ते अखेर गद्दारच आहेत- आपल्या जुन्या धन्यालाही त्यांनी त्यांच्या कब्जात जाऊ दिलं. आता तोही काही विरोध करू शकणार नाही." इकडे तिकडे पाहात एका खुर्चीवर ती विसावली. "आणि आता, साम्राज्याचा ऱ्हास आणि विनाश ठरलेला आहे. मी त्याला नवजीवन देऊ शकले असते."

"मला वाटतं," डॉर्स म्हणाली, "साम्राज्याने उद्दिष्टहीन संघर्ष आणि विनाशाचा अमर्याद काळ टाळला आहे. तेवढ्यात सांत्वन माना, मेयर मॅडम."

पण रॅशेलने ते काही जणू ऐकलंच नव्हतं. "इतकी वर्षे मी तयारी केली- पण एका रात्रीत सारं संपलं." ती पराभूत मनाने तिथे बसून राहिली, जणू अनेक चाबकांचा मार खाल्लेला तिने. अचानक वीस वर्षं वय वाढल्यासारखी दिसत होती ती.

"एका रात्रीत हे झालेलं असणं शक्य नाही." डॉर्स म्हणाली, "तुमच्या अधिकाऱ्यांना पटवण्याचं, वश करण्याचं काम पूर्ण होण्यासाठी भरपूर वेळ खर्ची पडला असणार."

"त्यात डेमेर्झेल एकदम तरबेज आहे. मी त्याला फारच कमी लेखलं हे स्पष्टच आहे. त्याने कायकाय केलं असेल कल्पना नाही- धमक्या, लाच, गोड, लाघवी भाषा... गुप्तता राखून काम करण्याची कला, दगाबाजीची कला त्याला चांगलीच अवगत आहे- मला समजायला हवं होतं." ती थोडी थबकून बोलत राहिली, "त्याने निव्वळ बलप्रयोग केला असता, तर त्याच्या सैन्यदळाचा निःपात

करणं मला अजिबात कठीण नव्हतं. वाय प्रांताशी दगाबाजी- कल्पनाही करू शकत नाही कुणी- निष्ठेची शपथ अशी सहजगत्या बाजूला टाकली गेली?"

सेल्डन सहजच बोलून गेला, "पण ती शपथ तुमच्या वडिलांसाठी घेतलेली मला वाटतं, तुमच्यासाठी नाही."

"निव्वळ मूर्खपणा," रॅशेल संतप्त स्वरात उद्गारली, "जेव्हा मेयरपद माझ्या वडिलांनी माझ्याकडे सोपवलं, कायदेशीररित्या- तेव्हा त्यांना वाहिलेल्या निष्ठा आपोआप माझ्याकडे संक्रमित झाल्या. असं पूर्वीही घडल्याची अनेक उदाहरणं आहेत. नवीन सत्ताधीशापुढे पुन्हा शपथा वाहिल्या जातात, पण तो केवळ कर्मकांडाचा भाग आहे. कायदेशीर गरज नाही. आणि माझ्या अधिकाऱ्यांना हे माहीत होतं- त्यांनी त्याचा विसर पडल्यासारखं दाखवलं ते वेगळं. मी स्त्री आहे ही सबब त्यांनी वापरली कारण साम्राज्याचा रोष पत्करायची त्यांची तयारी नव्हती. ते निर्भय असते तर ही भीती त्यांना वाटली नसता. किंवा ज्या काही बक्षिसांची आश्वासनं त्यांना मिळालीत ती त्यांना माझ्यासोबत राहून मिळाली नसती. मी आमच्या डेमेर्झेलला चांगलीच ओळखून आहे." ती सेल्डनकडे तटकन् वळून म्हणाली, "त्याला तू हवा आहेस, माहीत आहे ना तुला? डेमेर्झेलने आमच्यावर आक्रमण केले ते तुझ्यामुळे."

"मी- मी कशासाठी?" सेल्डन उद्गारला.

"वेड पांघरू नकोस. ज्या गोष्टीसाठी मला तू हवा होतास, त्याचसाठी. तुझा साधन म्हणून वापर करण्यासाठी." तिने सुस्कारा सोडला. "पण निदान माझ्याशी संपूर्ण गद्दारी झालेली नाही. अजूनही माझ्याशी निष्ठावंत असलेले सैनिक आहेत माझ्याजवळ- सार्जंट!"

सार्जंट एमर थॅलसने खोलीत प्रवेश केला. त्याच्या आकाराला शोभणार नाही इतक्या हळुवार पावलांनी त्याने प्रवेश केला- त्याचा गणवेष कडक होता, त्याची लांब, पिंगट मिशी वर वळलेली.

“मॅडम मेयर,” तो खाडकन् टाचा जुळवत म्हणाला. हॅरिने त्याचं वर्णन बीफ स्टेक असं केलं होतं- तसाच दिसत होता तो. आणि तसाच आंधळेपणाने आदेशांचं पालन करत होता- काहीतरी नवीन घडलंय, परिस्थिती बदलली आहे याचं त्याला काहीही भान नव्हतं.

रॅशेल रॅचकडे पाहून थोडी करूण हसली. “आणि तू कसा आहे, रॅच बाळा? तुझ्यासाठी काहीतरी करणार होते मी. पण आता नाही ते शक्य.”

“हेलो, मिस्स्... मॅडम,” रॅच अवघडून बोलला.

“तुमच्यासाठीही काहीतरी करणार होते मी, डॉ. सेल्डन,” रॅशेल म्हणाली, “आणि इथेही मी क्षमा मागते. नाही करू शकणार मी काही.”

“माझ्यासाठी काहीच वाईट वाटून घेऊ नका, मॅडम.”

“मला वाटतंच वाईट. आणि तुम्हाला डेमेर्झेलच्या ताब्यात देणंही मला मान्य नाही. तो एक विजय त्याला मिळू देणं जरा जास्तच होईल- आणि मी निदान तेवढं तरी थांबवू शकते.”

“मी त्याच्यासाठी अजिबात काम करणार नाही, मॅडम. मी जसं तुमच्यासाठी काम केलं नसतं तसंच त्याच्यासाठीही काम करणार नाही.”

“हा काही काम करण्याचा प्रश्न नाही. वापर केला जाण्याचा प्रश्न आहे. निरोप घेते तुमचा, डॉ. सेल्डन. -सार्जंट, उडव त्यांना.”

सार्जंटने आपला ब्लास्टर बाहेर काढला आणि डॉर्स एक किंकाळी फोडत त्याच्यावर झेपावली- पण सेल्डनने हात लांबवून तिचा दंड पकडला आणि धडपडून

गच्च पकडून धरला. “मागे हो, डॉर्स, नाहीतर तो तुला ठार मारेल. तो मला मारणार नाही. रॅच, तू सुद्धा. मागे हो. हलू नकोस जागचा.” सेल्डन सार्जंटला सामोरा उभा राहिला. “मला मारायचा धीर होत नाही, सार्जंट- कारण तुला माहीत आहे तू मला मारू शकत नाहीस. मी तुला दहा दिवसांपूर्वीच ठार करू शकलो असतो. पण मी तसं केलं नाही. आणि तू मला तेव्हा शब्द दिलास की- तू माझं संरक्षण करशील.”

“थांबलास का?” रॅशेल किंचाळली, “त्याला ठार कर, सार्जंट.”

सेल्डन काहीच बोलला नाही. तो तिथेच उभा राहिला. सार्जंटचे डोळे विस्फारून बाहेर आलेले, हातातला ब्लास्टर सेल्डनच्या डोक्यावर रोखलेलं.

“आदेशाचं पालन कर.” रॅशेल किंचाळली.

“शब्द दिलास तू मला,” सेल्डन शांतपणे म्हणाला.

सार्जंटच्या घशातून कसेबसे शब्द बाहेर पडले, “काहीही केलं तरी मी चूकच ठरणार आहे... “ त्याच्या हातातून ब्लास्टर गळून पडला आणि जमिनीवर आपटला. रॅशेल ओरडली, “म्हणजे तू ही गद्दार निघालास.”

सेल्डनने हालचाल करण्याआधी, किंवा डॉर्सने दंड सोडवून घेण्याआधीच रॅशेलने ब्लास्टर उचलला, सार्जंटवर रोखला- आणि चाप ओढला. सेल्डनने यापूर्वी कधीच ब्लास्टरने कुणी मेलेलं पाहिलं नव्हतं. त्या शस्त्राच्या नावामुळे त्याला वाटायचं की खूप मोठा आवाज होऊन रक्तामांसाच्या चिळकांड्या उडत असतील. पण हा वायन ब्लास्टर तसा नव्हता. सार्जंटच्या छातीच्या आतमधील अवयवांच्या काय चिंधड्या उडाल्या असतील माहीत नाही, पण सार्जंटच्या चेहऱ्यावरचे भाव पालटले नाहीत, वेदनेची कळ उमटली नाही, तो फक्त जागच्या जागी कोसळला- जगला असण्याची कणभरही आशा नव्हती- तो मरून गेला. आणि रॅशेल तो ब्लास्टर घेऊन सेल्डनकडे वळली- तिच्या नजरेतला थंड निग्रह त्याची पुढल्या

क्षणासाठी जगण्याचीही आशा घेऊन गेला. पण सार्जंट खाली कोसळल्यानंतर प्रथम रॅच मधे आला. सेल्डन आणि रॅशेलच्या मधोमध उभा राहून हात जोरजोराने हलवत तो ओरडला, “मिसस्, मिस्सस्, शूट करू नका.” क्षणभर रॅशेल विचलित झाली. “बाजूला हो रॅच. मला तुला दुखापत करायची नाहीये.”

तो एक अनिर्णित क्षण डॉर्सला पुरला. सेल्डनच्या हातातून दंड सोडवत ती सुसाट रॅशेलवर धावली आणि तिला धडक देत खाली पाडलं. रॅशेल पुन्हा एकवार किंचाळली आणि तिच्या हातातून ब्लास्टर जमिनीवर पडला. तो रॅचने उचलला.

सेल्डन एक खोल सुस्कारा सोडत म्हणाला, “रॅच, माझ्याकडे दे तो.”

पण रॅच मागे सरला. “तुम्ही तिला मारणार नाही ना, हां, मिस्टर सेल्डन? ती माझ्याशी खूप चांगली वागली.”

“मी कुणालाही मारणार नाही, रॅच.” सेल्डन म्हणाला, “तिने त्या सार्जंटला मारलं. मलाही मारलं असतं, पण तू जखमी होऊ नयेस म्हणून ती थांबली. आणि तेवढ्यासाठी तिला जगू द्यायला हवं आपण.”

आता सेल्डन खाली बसला. त्याच्या हातात तो ब्लास्टर होता, पण पकड नव्हती. डॉर्सने त्या सार्जंटच्या पट्ट्यातून नीडल-गन काढली.

एवढ्यात एक नवीनच आवाज उमटला.

“आता मी तिची काळजी घेईन, सेल्डन.” सेल्डनने वर पाहिलं आणि आनंदून उद्गारला, “ह्यूमिन! आलास तू अखेर!”

“खूप वेळ लावला मी. सॉरी, सेल्डन. खूप काही काम करावं लागलं. कशा आहात तुम्ही डॉ. वेनाबिली? आणि ही मला वाटतं- मॅनिक्सची कन्या,- रॅशेल. पण हा मुलगा कोण?”

“रॅच आमचा डाह्लाइट मित्र आहे.” सेल्डन उत्तरला. आता सैनिक आत शिरले होते आणि ह्युमिनचा इशारा होताच त्यांनी रॅशेलला अगदी अलगद उचलून घेतले. आता अखेर डॉर्सने नजर तिच्यावरून हटवली आणि ती आपले कपडे झटकू लागली, सरळ करू लागली. सेल्डनला अचानक जाणवलं- तो अजून बाथरोबमध्येच होता. रॅशेलने तुच्छता दर्शवत सैनिकांकडून स्वतःला किंचित सोडवून घेतलं आणि ह्युमिनकडे बोट दाखवत सेल्डनला विचारलं.

“हा कोण आहे?”

“हा चेटर ह्युमिन, माझा मित्र आणि या ग्रहावरचा माझा संरक्षक.” सेल्डन म्हणाला.

“तुझा संरक्षक?” रॅशेल वेड्यासारखी मोठमोठ्याने हसू लागली. “अरे मूर्खा! भोळसटा! हा आहे डेमेर्झेल- आणि तू तुझ्या प्रिय वेनाबिलीबाईकडे नीट पाहिलंस तर तुला कळेल- तिला हे चांगलंच माहीत आहे. माझ्याकडे जेवढा अडकला होतास त्यापैक्षा कैक पटींनी जास्त मोठ्या सापळ्यात तू आधीपासूनच अडकलेला आहेस!”

८९-

त्या दिवशी दुपारी ह्युमिन आणि सेल्डन दोघेच जेवायला बसले. आसपास कुणीही नव्हतं. त्या दोघांमध्ये एक विचित्र शांततेची भिंत उभी होती. जेवण संपतासंपता सेल्डन जरासा हलला आणि आवाजात उत्साह आणत म्हणाला, “वेल, सर, तुम्हाला काय नावाने हाक मारायची मी? तुमचा विचार मी चेटर ह्युमिन म्हणून करतो अजूनही. पण तुमचं दुसरं व्यक्तिमत्त्व जरी मान्य केलं, तरी मी तुम्हाला एटो

डेमेर्झेल तर म्हणून शकत नाही. त्या नावाने तुम्हाला काही पद आहे, आणि त्याला योग्य असं काय संबोधन असेल बरं. सांगा मला.''

अतिशय गंभीर आवाजात उत्तर आलं, ''मला ह्युमिन म्हणूनच हाक मारा, हरकत नसल्यास. किंवा चेटर. होय, मी एटो डेमेर्झेल आहे, पण तुझ्यासाठी मी ह्युमिन आहे. किंबहुना दोन्हींमध्ये फरक नाहीच. मी तुला सांगितलं होतं, की हे साम्राज्य सडत चाललंय, घसरत चाललंय. दोन्ही भूमिकांमध्ये हे तर सारखंच आहे. सत्य आहे. मी तुला सांगितलेलं की मला सायकोहिस्ट्रीचं शास्त्र हवंय आणि हा ऱ्हास, अपयश मला रोखायचंय. तेही मला दोन्ही भूमिकांतून मान्य आहे.''

''पण मी तर तुझ्या मुठीत होतो- मी सम्राटांशी बोलत होतो तेव्हा तू जवळच असणार.''

''क्लिऑनशी बोलताना- हो अर्थात.''

''तू माझ्याशी तेव्हाच बोलू शकला असतास. नंतर जे, जसं बोललास ते, तसंच.''

''आणि काय साध्य केलं असतं मी? डेमेर्झेल म्हणून माझ्या खांद्यांवर खूप प्रचंड जबाबदारी आहे. मला क्लिऑनला हाताळावं लागतं- त्याचे हेतू वाईट नसतात, पण तो काही फार कुशल सम्राट नाही नक्की. त्याच्या हातून चुका होऊ नयेत याची काळजी मला घ्यावीच लागते. ट्रॅन्टॉरचंच नव्हे तर साम्राज्याचं प्रशासनही सांभाळावं लागतं. आणि आता तू पाहिलंस, वाय प्रांतातून गडबड होऊ नये म्हणून मला खूप वेळ खर्च करावा लागला.''

''हं, माहीत आहे,'' सेल्डन पुटपुटला.

''सोपं नव्हतं हे- मी अगदी निसटता जिंकलो. मॅनिक्सबरोबर लढायला मी फार काळजीपूर्वक शिकलो. तो काय विचार करत असेल, काय हालचाली करेल हे

सगळं आधीच समजून मग आपली खेळी करायची- वर्षानुवर्षं चाललंय हे. जिवंत असतानाच तो आपल्या मुलीकडे सत्ता सोपवेल असा मी विचारही केला नव्हता. तिचा मी अभ्यास केला नव्हता. ती सगळी सावधगिरी फेकून देऊन अशा प्रकारे वागेल असं मला वाटलं नाही कधी. वडिलांपेक्षा वेगळी आहे ती. सत्ता गृहीत धरते. आणि सत्तेच्या मर्यादा काय असतात याची तिला अजिबात जाणीव नाही. त्यामुळे तिने तुला ताब्यात घेतलं- माझी काहीही पूर्वतयारी नसताना मला निर्णय घेणं भाग पाडलं."

"परिणामतः तू मला गमावूनच बसला असतास. ब्लास्टरचं तोंड माझ्यावर दोनदा वळलेलं."

"माहीत आहे मला," ह्युमिनने मान हलवली, "आणि अपरसाईडवरही आम्ही तुला गमावून बसलो असतो- तो आणखी एक अपघात- ज्याची मी अपेक्षा केली नव्हती."

"पण तू माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलेलं नाहीस. तू स्वतःच डेमेर्झेल असताना मला डेमेर्झेलपासून वाचवण्यासाठी तू मला साऱ्या ट्रॅन्टॉरभर कशासाठी फिरवलंस?"

"तू क्लिऑनला सांगितलं, की सायकोहिस्ट्री ही केवळ सैद्धांतिक संकल्पना आहे, निव्वळ गणिताचा खेळ- व्यवहार्यता नसलेला. ते तसंही असलं असतं- पण मी तुझ्याशी अधिकृत संपर्क साधला असता तर तू नक्कीच हेच मत पुन्हापुन्हा वाजवलं असतंस. पण मला या संकल्पनेविषयी फारच आकर्षण वाटत होतं. हा केवळ गणिती खेळ नसून काहीतरी अधिक असेल तर- हा प्रश्न सतत मनात रुंजी घालत होता. मला तुला केवळ वापरायचं मनात नव्हतं हे तू समजून घ्यायला हवंस. मला खरोखरचं सायकोहिस्ट्रीचं व्यवहारी रूप हवं होतं. त्यामुळेच- तू म्हणतोस तसं मी तुला ट्रॅन्टॉरभर फिरवलं- डेमेर्झेलच्या भीतीचं भूत मागे लावून दिलं. मला वाटलं

त्यामुळे तू तुझी बुद्धी अधिक टोकदारपणे एकाग्र करशील. सायकोहिस्ट्री केवळ गणिती खेळ न रहाता अधिक वेधक होऊ शकेल. ह्युमिनसारखी आदर्शवादी व्यक्ती सोबत असेल तर तू त्यावर गांभीर्याने काम करशील- साम्राज्याच्या हस्तकासाठी- डेमेर्झेलसाठी अजिबात करणार नाहीस असं मला वाटलं. शिवाय तुला ट्रॅन्टॉरचे वेगवेगळे भाग, अंगे माहीत करून घ्यायची होती. मग कुठेतरी दूरच्या ग्रहावर हस्तीदंती मनोऱ्यात बसून काम करण्यापेक्षा फक्त गणिती लोकांच्या घेरावात बसण्यापेक्षा अशा प्रकारे ट्रॅन्टॉर पाहाणं तुला अधिक उपकारक ठरलं असतं असंही मला वाटलं. माझं बरोबर होतं की नाही? तू काही प्रगती केली आहेस?"

सेल्डन उत्तरला, "सायकोहिस्ट्रीमध्ये? हो. केलीय थोडी प्रगती, ह्युमिन. मला वाटलं तुला कळलं असेल."

"कसं कळणार?"

"मी डॉर्सला सांगितलं होतं."

"पण मला नव्हतं सांगितलंस. तरीही- आता सांगतो आहेसच. फारच चांगली बातमी आहे ही."

"अगदी तसंच नाही," सेल्डन म्हणाला, "अगदी सुरुवातीची सुरुवात आहे म्हणेन. पण सुरुवात आहे."

"गणिताचा गंध नसलेल्याला समजावून देता येईल असं काही आहे का?"

"असं वाटतं मला. ह्युमिन, असं आहे ना, की मी अगदी सुरुवातीपासूनच हे म्हणतोय की सायकोहिस्ट्रीचं शास्त्र हे ४० हजार दशलक्ष लोकसंख्या असलेल्या दोनशेपन्नास लक्ष जगांच्या आपसातल्या देवाणघेवाणीवर, अवलंबून आहे. फारच प्रचंड आहे हे. एवढ्या गुंतागुंतीचं काहीही हाताळू शकेल अशी काही यंत्रणाच नाही. मला यश मिळायचं असेल तर, सायकोहिस्ट्रीचा काहीही उपयोग व्हायचा असेल

तर प्रथम मला एखादी साधीसोपी व्यवस्था शोधून काढावी लागेल. त्यामुळे मला असं वाटलं की मला अगदी काळाच्या सुरुवातीस जाऊन तेव्हा असलेल्या एकमेव जगापर्यंत पोहोचावं लागेल. साऱ्या गॅलेक्सीभर पसरण्याआधी मानवजात ज्या एकाच ग्रहावर होती, त्या मंदावल्या काळाचं निरीक्षण घ्यावं लागेल. मायकोजेनवर ते ऑरोरा नावाच्या एका मूळ ग्रहाबद्दल बोलत होते. डाह्लमध्ये मी एका अर्थ् नावाच्या मूळ जगाचं नाव ऐकलं. मला वाटलं की ही वेगवेगळी नावं- त्या एकाच ग्रहाची असतील. पण ती विभिन्न होती- एका मुख्य मुद्द्याबाबत अगदी भिन्न होती त्यामुळे ते शक्यच नव्हतं. आणि फार काही फरक पडला नाही... दोघांबद्दलही इतकी कमी माहिती आहे, आणि तीही दंतकथा, कहाण्यांमध्ये लुप्त आहे की त्यांच्याशी सायकोहिस्ट्रीचा काहीही संबंध जोडणं सर्वस्वी अशक्य आहे.''

तो समोरच्या थंडगार रसाचा घुटका घेण्यासाठी थबकला. त्याची नजर मात्र ह्युमिनच्या मुद्रेवरून ढळली नव्हती.

ह्युमिन म्हणाला, ''बरं? मग पुढे काय?''

''दरम्यान डॉर्सने मला एक गोष्ट सांगितली. त्याला मी मांडीवरच्या हाताची गोष्ट म्हणतो. त्याला तसं काही महत्त्व नाही. गंमत आहे केवळ आणि तशी फालतूच. पण त्या चर्चेच्या ओघात डॉर्सने वेगवेगळया जगांतील आणि अगदी ट्रॅन्टॉरवरच्या वेगवेगळया भागातील लैंगिक जीवनाबाबतच्या वेगवेगळया मूल्यधारणांचा उल्लेख केला. मला अस जाणवलं की ती ट्रॅन्टॉरमधल्याच विभागांचा स्वतंत्र जगांसारखा विचार करते. मी विचार केला की दोनशेपन्नास लक्ष जगांचा विचार करण्याऐवजी मी दोनशेपन्नास लक्ष अधिक आठशे जगांचा विचार करायला हवा. हा फरक तसा बारीकसाच होता त्यामुळ मी त्याबद्दल सारे काही विसरूनही गेलो. पण जसजसा मी सम्राटाच्या भागातून स्ट्रीलिंग विद्यापीठात गेलो- मग मायको जेनला गेलो- तिथून

डाह्ल आणि मग वाय प्रांतात गेलो तसतसं माझ्या लक्षात आलं की हे विभाग एकमेकांपेक्षा किती वेगवेगळे आहेत. ट्रॅन्टॉर हे एकच जग म्हणून त्याचा विचार न करता अनेक जगांचे एकत्र असे गुंतागुंतीचे जाळे आहे असा विचार करायला हवा हे माझ्या मनात स्पष्ट होत गेलं- पण त्यातला महत्त्वाचा मुद्दा मात्र निसटत होता. मी जेव्हा रॅशेलचं बोलणं ऐकलं- ते एक बरंच झालं की रॅशेलने आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी मला वायमध्ये पळवून नेलं आणि तिचे विचार मला सांगितले- तिने मला तिची योजना सांगितली- तिला ट्रॅन्टॉर किंवा शेजारच्या काही जगांसाठी काय हवंय ते सांगितलं. ती म्हणाली हेच तर साम्राज्य आहे. अगदी दूरचे जगे म्हणजे दूरातली शून्यं आहेत असं तिचं म्हणणं होतं.

"त्या क्षणी माझ्या मनात बरेच दिवस खेळणारे धूसर, सुप्त विचार एकदम स्पष्ट झाले. एकीकडे ट्रॅन्टॉरमध्ये एक आगळीच अवाढव्य, गुंतागुंतीची समाजरचना आहे, आणि एवढी लोकसंख्या असलेल्या ग्रहाच्या एकाच जगात आठशे वेगवेळी छोटीछोटी जगे सामावली आहेत. सायकोहिस्ट्रीचा अर्थ लावण्यासाठी ही गुंतागुंतीची व्यवस्था उपयोगी आहे. साऱ्या गॅलेक्सीतील जगांचा विचार करण्यापेक्षा बरीच अधिक सुटसुटीत आणि व्यवहार्य. आणि ती बाहेरची दोनशेपन्नास लक्ष जगे- त्यांचे काय? ती तर दूरची शून्ये. अर्थातच त्यांचा ट्रॅन्टॉरवर परिणाम होतोच- पण ते दुय्यम परिणाम आहेत. मला जर सायकोहिस्ट्रीचा वापर ट्रॅन्टॉर या एकाच एककासाठी प्रभावीपणे करता आला- तर नंतर बाहेरच्या जगांचे लहानमोठे परिणाम लक्षात घेऊन काही बदल करता येतीलच. तुला समजतंय मी काय म्हणतोय? मी एकाच एका जगाच्या शोधात होतो, जिथे मला व्यवहार्य सायकोहिस्ट्रीचे विज्ञान बसवता येईल. मी प्राचीन काळात शोध घेत राहिलो होतो, पण ते जग तर इथेच आत्ताच माझ्या पायाखाली आहे."

ह्युमिनचा आनंद लपला नाही, तो म्हणाला, "मस्तच झालं हे!"

"पण अजून सारं काम व्हायचं आहे, ह्युमिन. मला ट्रॅन्टॉरचा तपशीलवार, बारकाईने अभ्यास करावा लागेल. त्यावर गणिती काम करण्यासाठी पद्धती पाडाव्या लागतील. मी भाग्यवान असलो आणि भरपूर जगलो तरच मरण्याआधी सारी उत्तरे मिळवू शकेन. तसं नाही झालं तर माझ्यानंतर यावर काम करत रहाणारे गणिती असावे लागतील. सायकोहिस्ट्री एक उपयुक्त तंत्र म्हणून विकसित होण्याआधीच कदाचित साम्राज्याचा विध्वंस झालेला असेल अशीही शक्यता आहे."

"तुला हवी ती सगळी मदत मी देईन."

"मला माहीत आहे ते," सेल्डन म्हणाला.

"म्हणजे मी डेमेर्झेल असूनही तुझा माझ्यावर विश्वास आहे तर?"

"अगदी पूर्णपणे. पण तो विश्वास तू डेमेर्झेल आहेस म्हणून नाही."

"पण मी आहेच डेमेर्झेल." ह्युमिन आग्रही स्वरात म्हणाला.

"पण तसं नाही. ह्युमिन म्हणून तुझं व्यक्तिमत्त्व जितकं सत्यापासून दूर आहे तितकंच दूर तुझं डेमेर्झेलपणही सत्यापासून दूर आहे."

"म्हणजे काय म्हणायचंय तुला?" ह्युमिनचे डोळे विस्फारले आणि तो सेल्डनपासून एक पाऊल मागे सरकला.

"मला म्हणायचंय- की तू ह्युमिन हे नाव निवडलंस ते एका विचित्र भावनेतून- काय बरं दिसेल- ह्युमिन हे ह्यूमन या शब्दाचं अपरूप आहे, नाही का?" ह्युमिन काहीच बोलला नाही, केवळ सेल्डनकडे बघत राहिला.

आणि अखेर सेल्डन म्हणाला, "कारण तू ह्यूमन नाहीस, हो ना, ह्यूमिन/डेमेर्झेल? तू रोबॉट आहेस."

८९-

# डॉर्स

सेल्डन हॅरि- हॅरि सेल्डनचा विचार केवळ सायकोहिस्ट्रीच्या संबंधाने केला जातो, गणित आणि सामाजिक परिवर्तन याचे तो मूर्त रूप होता. त्याने स्वतःच फार काळापर्यंत हीच छाप कायम ठेवायचा प्रयत्न केला. त्याच्या लेखनातून त्याने कधीही सायकोहिस्ट्रीतील समस्या, कूटप्रश्न कसे सोडवले याचे काहीही संदर्भ दिले नाहीत. त्याच्या विचाराची झेप जणू त्याने हवेतून जादू केल्यासारखी काढली असावी असा समज होऊ शकतो. त्याने केलेल्या चुका किंवा अवलंबलेल्या पद्धतींतील त्रुटींबद्दल त्याने काहीही लिहिलं नाही- त्याचे खाजगी आयुष्य कसे होते त्याबद्दलही काहीच माहिती नाही. त्याच्या पालकांबद्दल किंवा भावंडांबद्दल जुजबी माहिती आहे, फारशी नाही. त्याचा एकुलता एक मुलगा- रॅच सेल्डन- याला त्याने दत्तक घेतलं होतं, पण तेही नेमकं कसं झालं याची माहिती नाही. त्याला पत्नी होती एवढेच माहीत आहे. सायकोहिस्ट्री वगळता त्याचे आयुष्य रहस्य रहावे अशीच त्याची इच्छा असावी. असं दिसतं की त्याची इच्छा अशी होती, की तो व्यक्ती म्हणून जगल्याची माहितीच लोकांना होऊ नये. तो म्हणजे मूर्तीमंत सायकोहिस्ट्री म्हणूनच ज्ञात राहिला.

-दीर्घिका ज्ञानकोष

९०-

ह्युमिन शांत बसून होता, त्याचा एकही स्नायू हलत नव्हता. तो हॅरि सेल्डनकडे पाहात होता आणि सेल्डन वाट पाहात बसून होता. आता पुढे ह्युमिनने बोलायला हवं असा तो विचार करत होता.

ह्युमिन बोलू लागला, पण इतकंच म्हणाला, “रोबॉट? मी? मायकोजेनच्या सॅक्रेटोरियममध्ये तू पाहिलेला तो कृत्रिम प्रकार म्हणायचाय तुला असं मी गृहीत धरतो.”

“अगदी तसंच नाही,” सेल्डन म्हणाला.

“धातूचा नाही? झाळलेला नाही? निर्जीव प्रतिकृती नाही?” गंमत वाटल्याचं कोणतंही चिन्ह ह्युमिनच्या चेहऱ्यावर अजिबात उमटलं नव्हतं.

“नाही. कृत्रिम अस्तित्व हे धातूचंच असायला हवं असं नाही. मी बोलतोय ते मनुष्यापेक्षा जराही वेगळं ओळखू न येणाऱ्या रोबॉटबद्दल.”

“वेगळं ओळखू येत नसेल तर मग, हॅरि, तू कसं काय वेगळं ओळखू शकतोस?”

“दिसण्यावरून नाही.”

“स्पष्ट कर.”

“ह्युमिन, डेमेर्झेलपासून म्हणजे तुझ्यापासूनच- दूर पळत असताना दोन अतिप्राचीन जगांची माहिती मला मिळाली. सांगितलं मी तुला- ऑरोरा आणि अर्थ्. दोघांबद्दलही बोलताना ती पहिली मानवी जगे होती असा उल्लेख होता. आणि दोन्हींच्या बाबतीत रोबॉट्सचा उल्लेख होता- थोडासा फरक होता.” सेल्डन विचारात पडून समोरच्या माणसाकडे पाहात होता- तो माणूस नसल्याचं काहीतरी चिन्ह दर्शवेल म्हणून निरखत होता... काहीतरी वेगळे भाव उमटतील.

तो म्हणाला, “जेव्हा ऑरोराचा प्रश्न आला तेव्हा एका रोबॉटचा उल्लेख झाला- जो गद्दार होता, त्याने आदेश मोडले आणि आपले कार्य सोडून दिले. अर्थ् ग्रहाबाबत एका रोबॉटची चर्चा झाली, आणि तो एकदम हीरो होता- तो सर्वांची

सुटका करणारा होता. हा जो रोबॉट होता, तो एकच असेल असं गृहीत धरणं अती होईल?”

“एकच होता का तो?” ह्युमिन पुटपुटला.

“मी असा विचार केला, ह्युमिन. मला वाटलं की अर्थ आणि ऑरोरा ही दोन वेगवेगळ्या ग्रहांवरची जगे होती, एकाच काळात वसत होती. कुठले आधी, कुठले नंतर माहीत नाही. मायकोजेनियन्समध्ये दिसणारं औद्धत्य, श्रेष्ठत्वाचा जाणीवपूर्वक जपलेला अहंकार पाहून मला वाटतं की ऑरोरा हाच मूळ ग्रह असावा आणि त्यांना पृथ्वीवरच्या माणसांबद्दल तिरस्कार वाटत असावा- त्यांच्यामधून निपजलेले असूनही ते इतके विकृत झाले असं काहीतरी त्यांना वाटत असावं. आणि दुसरीकडे मदर रिटाने मला पृथ्वीबद्दल काही सांगितलं- पृथ्वी हाच मानवांचा मूळ ग्रह आहे अशी तिची खात्री होती. आणि मायकोजेनियन्सची एकंदर गॅलेक्सीतील नगण्य संख्या, त्यांच्या विचित्र श्रद्धांबद्दल इतर जगांत असलेली अनास्था पाहाता असाच निष्कर्ष जवळचा वाटतो की पृथ्वी हा मूळ ग्रह असेल आणि ऑरोरा ग्रहावर त्याची उपशाखा सुरू झाली असेल. मला सांगता येणार नाही नक्की, पण मला काय वाटतं ते मी तुझ्यापर्यंत पोहोचवतोय, म्हणजे तुला माझे अंतिम निष्कर्ष तसे का आहेत हे कळू शकेल.”

ह्युमिनने मान डोलावली, आणि म्हणाला, “कळतंय मला तुझं काय चाललंय ते. बोलत रहा.”

“ही दोन जगे एकमेकांची शत्रू होती. निदान मदर रिटाने जे सांगितलं त्यातून तरी असंच ध्वनित होत होतं. ऑरोरातून आल्याचा दावा करणाऱ्या मायोकजेनियन्सची तुलना मी पृथ्वीशी नातं सांगणाऱ्या डाह्लाइट्सशी करतो तेव्हा मला ऑरोरा नक्कीच पृथ्वीपेक्षा अधिक तंत्रप्रगत असावा असं वाटतं- त्यांनी असे

रोबॉट्स अनेक बारकाव्यांनिशी तयार केले असावेत- अगदी माणसांहून वेगळे ओळखताही येणार नाहीत असेही. असा रोबॉट ऑरोरावर विकसित केला गेला. पण तो इतका फितूर झाला की त्याने ऑरोराचा त्याग केला. पृथ्वीवरच्या लोकांसाठी तो हीरो ठरला म्हणजे तो त्यांना जाऊन मिळाला असेल. कशासाठी त्याने असं केलं असेल, मी सांगू शकत नाही.''

''त्या यंत्राने असं का केलं म्हणायचंय तुला.'' ह्युमिन म्हणाला.

''कदाचित् तसंच, पण तू इथे असा समोर बसलेला असताना मला त्याला वस्तू ठरवणं जड जातंय. मदर रिटाची खात्री होती की तो रोबॉट, तिच्यासाठी नायक असलेला रोबॉट अजूनही अस्तित्वात आहे, आणि त्याची गरज पडेल तेव्हा तो परतून येईल. अमरत्व लाभलेल्या रोबॉटचा विचार करणं मला तरी अजिबात अवघड वाटत नाही, किंवा निदान त्याचे बिघडलेले भाग बदलण्याची सोय असेपर्यंत तो अमर असू शकतो.''

''मेंदू सुद्धा?'' ह्युमिन म्हणाला.

''मेंदू सुद्धा. मला रोबॉट्सविषयी फार काही माहिती नाही, पण मला वाटतं, जुन्या मेंदूला पुन्हा रेकॉर्ड करून नवा तयार होऊ शकतो- आणि काही विचित्र बौद्धिक क्षमता असतात असंही मदर रिटा सुचवत होती. -मला वाटून गेलं, असंच असेल. मी तसा बराचसा कल्पनेत रमणारा आहे- पण एवढाही नाही की एका रोबॉटने बाजू बदलल्यामुळे सारा इतिहास बदलू शकतो यावर विश्वास ठेवेन. पृथ्वीचा विजय निश्चित करणे हे रोबॉटचे काम नव्हते तसेच ऑरोराचा पराभव नक्की करणे हेही नव्हते... पण तेच जर हा रोबॉट अगदी विशेषत्वाने विशेष असेल तर कदाचित् हे शक्य आहे.''

ह्युमिन म्हणाला, "तुला जराही असं वाटत नाही का, हॅरि, की तू दंतकथांबद्दल बोलतो आहेस- ज्या दंतकथा गेल्या अनेक शतकांमध्ये नव्हे सहस्रकांमध्ये हव्या तशा बदलत गेल्या, अगदी साध्यासुध्या घटनांवरही अलौकिक अशा शक्तींच्या कारणपरंपरांचा झिरझिरीत बुरखा पडला? एक रोबॉट- जो केवळ माणसासारखा दिसतो एवढेच नव्हे तर अमर आहे आणि ज्याच्याकडे मनोव्यापार आहेत, बुद्धी आहे? सुपरह्यूमनवर विश्वास ठेवू लागला आहेस?"

"मला दंतकथा म्हणजे काय ते चांगलंच माहीत आहे, आणि मी त्यांच्यावर विश्वास ठेवत नाही, परिकथांवरही नाही. पण तरीही त्यांच्या मागे काही आगळ्याच घटनांची जोड असलेली मी पाहिली, किंवा तसा काही अनुभव मी घेतला- मी स्वतः-"

"उदाहरणार्थ?"

"ह्युमिन, मी तुला भेटलो आणि अगदी प्रथमपासून तुझ्यावर विश्वास टाकला. हां, तू मला दोन गुंडांशी लढताना मदत केलीस- गरज नसताना- तेव्हापासून तुझ्यावर विश्वास टाकायला मी प्रवृत्त झालो हे खरंय. तूच नेमलेल्या लोकांनी तुझ्या सूचनांनुसार माझ्यावर हल्ला केला- पण ते जाऊ दे."

"नाही," ह्युमिन म्हणाला, त्याच्या स्वरात प्रथमच जराशी मौज वाटल्याची भावना डोकावली होती.

"मी तुझ्यावर पूर्णपणे विश्वास टाकला. हेलिकॉनला न जाता ट्रॅन्टॉरभर भटक्या बनून जगायला मी तयार झालो. मी स्वतःला पूर्णपणे तुझ्या स्वाधीन केली. आज मागे वळून बघताना, मला वाटतंय की मी माझा राहिलो नव्हतो. मी काही सहज कुणाच्या मागे जाणारा माणूस नव्हे, पण तरीही हे झालं. त्याहूनही अधिक मला विचित्र वाटतंय ते मी माझ्या स्वभावापेक्षा फारच वेगळ्या प्रकारे वागत होतो."

“तुझ्याबद्दल तूच जाणेस, हॅरि.”

“फक्त मीच नव्हे. डॉर्स वेनाबिलीसारखी सुंदर स्त्री, जिचं स्वतःचं करीअर आहे- तिने कशासाठी स्वतःची सगळी कामं सोडून माझ्याबरोबर पळत रहावं? माझा जीव वाचवण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालावा... जणू काही तिच्या खांद्यावर कुणी काही पवित्र अशी माझं संरक्षण करण्याची जबाबदारी टाकलीय अशा तऱ्हेने ती वागत होती- जणू तेच एक काम तिला जीवनात करायचं होतं? केवळ तू तिला ते करायला सांगितलंस म्हणून?”

“मी तिला सांगितलं होतं हे सत्य आहे, हॅरि.”

“पण केवळ कुणीतरी करायला सांगितलं म्हणून असा काही बदल ती आपल्या आयुष्यात करून घेईल अशा प्रकारची ती स्त्री वाटत तरी नाही. माझ्या प्रेमात पडून ती असं काही तिने करायला घेतलं असंही मला अजिबात वाटत नाही. तसं झालं असतं तर फारच छान झालं असतं, पण नाही- तिचा तिच्या भावनांवर अगदी चांगला ताबा आहे- एवढंच नव्हे- आता मी तुला अगदी मोकळेपणाने सांगतो आहे माझ्यापेक्षा तिचं भावनांवरचं नियंत्रण खूप चांगलं आहे.”

“फार उत्तम व्यक्तिमत्त्व आहे तिचं,” ह्युमिन म्हणाला.

“मी तुला दोष देत नाहीये,” सेल्डन बोलत राहिला. “मला हे कळत नाही, सन मास्टरसारखा उद्धटपणाचा कळस असलेला मनुष्य- जो आपल्यासारख्याच उद्धट, नाक वर करून जगणाऱ्या लोकांचे नेतृत्व करतो- तो आमच्यासारख्या टोळीवाल्यांना आसरा द्यायला तयार कसा झाला, आम्हाला इतकी तरी चांगली वागणूक त्यांनी कशी दिली? आम्ही सर्व नियम तोडले, सर्व प्रकारे त्यांच्या पवित्र गोष्टींचा अवमान केला, आणि तरीही त्याच्याशी बोलून तू आमची सुटका कशी काय करू शकलास?

“तू टिसाल्वेर दांपत्य- किती फुटकळ पूर्वग्रह जपणारी माणसं होती ती- त्यांना तू कसं काय पटवलंस? जगात कुठेही फिरतोस- सगळीकडे तुला सहकार्य कसं काय मिळतं- सर्वांवर तू कशी काय छाप पाडतोस, मैत्री कशी करतोस? तसंच म्हणायचं तर पुढे- क्लिऑनला कसं काय गुंडाळू शकलास तू? समजून चालू तो फारच साधासरळ आहे, हाताळायला सोपा आहे- पण मग त्याचा बाप तो तर अगदी रांगडा होता, क्रूर अधिकारशहा होता, त्याला कसं हाताळलंस तू? कसं काय शक्य केलंस हे? विशेष म्हणजे, वाय प्रांताचा चौथा मॅनिक्स- त्याने गेली काही दशकं आपलं सैन्य बांधलं, जबरदस्त प्रशिक्षित सैन्य होतं ते- आणि तरीही त्याच्या मुलीने ताबा घेण्याचा प्रयत्न करताच ते सारं कोसळून पडलं? त्या सर्वांना तू कसं काय फितवलंस- जशी कधीतरी तू स्वतः फितुरी केली होतीस तसंच?”

ह्युमिन म्हणाला, “कदाचित् याचा अर्थ असाही निघू शकेल ना- की मी फार चलाख इसम आहे- वेगवेगळ्या परिस्थितींमधल्या लोकांशी वागण्याची कला मला अवगत आहे, किंवा योग्य आणि नेमक्या व्यक्तींना काहीतरी देऊ करण्याचा तल्लखपण माझ्यात आहे... भविष्यातही मी त्यांना काय देऊ शकेन याचा आश्वासक विचार मी मांडू शकतो? मी जे काही केलं ते, नीट पहा, त्यातील कशासाठीही अलौकिक शक्तीची गरज नाही.”

“तू केलेल्या कशासाठीही नाही? तू वायन सैन्य निष्प्रभ केलंस तेही नाही?”

“त्यांना एका स्त्रीच्या हाताखाली काम करायचं नव्हतं.”

“गेली अनेक वर्षे त्यांना हे माहीत होतं- जेव्हा मॅनिक्स पायउतार होईल किंवा मरण पावेल तेव्हा रॅशेलच मेयरपदावर असणार आहे. पण त्यांनी कधीही असंतोष प्रकट केला नाही. जेव्हा तुला तशी गरज भासली तेव्हाच ते घडलं. डॉर्सने मला एकदा सांगितलं होतं तुझ्याबद्दल की तू खूप चिकाटीचा माणूस आहेस- तसा

तर तू आहेसच. इतर कुणाही मनुष्याला शक्य होणार नाही इतक्या चिकाटीचा. पण बौद्धिक क्षमता विलक्षण असलेल्या एखाद्या अमर रोबॉटच्या तुलनेत कदाचित् कमीच क्षमता असेल तुझी. – काय म्हणतोस, ह्युमिन?”

ह्युमिन उत्तरला, “तुझी अपेक्षा तरी काय, हॅरि? मी रोबॉट आहे असं मी मान्य करावं अशी अपेक्षा आहे तुझी? की मी फक्त माणसासारखा दिसतो? मी अमर आहे? की मी धातूचा चमत्कार आहे?”

सेल्डन थोडासा ह्युमिनच्या दिशेने पुढे झुकून म्हणाला, “होय, ह्युमिन. तशी माझी अपेक्षा आहे. तू मला सत्य सांगावंस ही माझी अपेक्षा आहेच- आणि मला शंका आहे- की आत्ताच तू जे प्रश्नरुपात म्हटलास तेच सत्याच्या जवळ आहे. ह्युमिन, तूच आहेस तो रोबॉट- मदर रिटाने ज्याला डा-नी म्हटलं, जो बा-ली चा मित्र होता. तू हे मान्य करायलाच हवंस. तुझ्या समोर पर्यायच नाही दुसरा.”

९१-

जणू ते त्यांच्याच स्वतःच्या स्वतंत्र अशा चिमुकल्या जगात बसले होते. वाय प्रांताच्या मध्यात, वायन सैन्याची शस्त्रे काढून घेण्याचं काम साम्राज्याची सेना करत होती- तिथेच ते शांतपणे बसून होते. ट्रॅन्टॉरवर घडत असलेल्या घटनांच्या ऐन मध्यात- किंबहुना साऱ्या गॅलेक्सीच्या नजरा वाय प्रांतावर वळलेल्या असताना सेल्डन आणि ह्युमिन दोघे एकांतात एखाद्या बुडबुड्यात बसल्यासारखे चर्चा करत होते- हल्ला-प्रतिहल्ला खेळ चालला होता.

सेल्डन नवे वास्तव उघड करण्याच्या प्रयत्नात होता आणि ह्युमिन काहीही मान्य करत नव्हता. सेल्डनला कुणीही अडवणार नव्हतं. त्यांचा खेळ संपेपर्यंत ते ज्या बुडबड्यात बसून बोलत होते, त्याची सीमा ओलांडणं कुणालाही शक्य होणार

नव्हतं. ह्युमिनची- अंहं- त्या रोबॉटची शक्ती तसं कुणालाही करू देणार नव्हती- खेळ संपेपर्यंत.

अखेर ह्युमिन म्हणाला, "तू फारच विलक्षण बुद्धीमान आहेस, हॅरि, पण मला कळत नाही, की मी रोबॉट आहे असं मी मान्य करावं हा तुझा आग्रह मला समजूच शकत नाही आणि तसं करण्यावाचून मला पर्याय नाही हेसुद्धा मला समजू शकत नाही. तू ज्या काही घटना मांडतो आहेस त्या साऱ्याच सत्य आहेत. तुझं वर्तन, डॉर्सचं वर्तन, सनमास्टरचं, टिसाल्वेरचं, वाय प्रांतातील सैन्याधिकाऱ्यांच- सर्वांचं वर्तन हे सारं घडलेलं आहेच. पण म्हणून तू जो अर्थ लावतो आहेस तो त्यामुळे खरा ठरत नाही. जे काही घडलं त्याचं स्वाभाविक स्पष्टीकरण सहज मिळू शकतं. तू माझ्यावर विश्वास टाकलास, कारण मी जे सांगितलं ते तुला मान्य झालं, डॉर्सला मनापासून वाटलं की तुझी सुरक्षा महत्त्वाची आहे कारण तिला सायकोहिस्ट्रीचं महत्त्व वाटलं- ती स्वतः इतिहासअभ्यासक असल्यामुळे तसं झालं असेल. सनमास्टर आणि टिसाल्वेर यांच्यावर पूर्वी केलेले काही उपकार त्यांना स्मरले- ज्याबद्दल तुला काहीच माहीत नाही. वायन सैनाधिकाऱ्यांना मनापासून स्त्रीने नेतृत्व करणं पटलेलं नाही- एवढंच. पारलौकिकाची पळवाट का शोधावी आपण?"

सेल्डन म्हणाला, "हे बघ, ह्युमिन, हे साम्राज्य ढासळतंय आणि ते असं ढासळता कामा नये, निदान ते कोसळलं तरी जरा कमी कठोर पृष्ठभागावर पृष्ठभागावर कोसळावं यासाठी काहीतरी प्रयत्न व्हावेत असं तुला वाटतं की नाही?"

"हो, खरंच वाटतं." आणि सेल्डनला त्या वाक्यातला प्रामाणिकपणा जाणवला.

“आणि मी सायकोहिस्ट्रीच्या तपशीलांवर काम करावं अशी तुझी मनापासून इच्छा आहे- आणि तुला स्वतःला ते करता येणार नाही असं तुला वाटतं का?”

“माझ्याकडे ती क्षमताच नाही.”

“आणि तुला वाटतं की मला सायकोहिस्ट्री तडीस नेता येईल- मला स्वतःलाच संभ्रम आहे तरीही?”

“होय.”

“आणि म्हणून तू मला लागेल ती मदत द्यायला तयार आहेस- हरप्रकारे- बरोबर?”

“हो, आहे.”

“वैयक्तिक भावना, स्वार्थी हेतू यांचा यात काही भाग असणार नाही?”

ह्युमिनच्या गंभीर मुद्रेवरून अगदी हलकी, किंचितशी स्मितछाया सरकत गेली आणि क्षणभरासाठी ह्युमिनच्या शांतपणामागचं प्रचंड, थोडाही ओलावा न लाभलेलं कंटाळ्याचं वाळवंट सेल्डनला जाणवून गेलं.

“माझं लांबलचक करीअर बांधत असताना व्यक्तिगत भावना आणि स्वार्थी हेतूंना थारा मिळू नये यावर खूप लक्षपूर्वक काम केलंय मी.”

“मग मी तुझी मदत मागतो. ट्रॅन्टॉर या एकाच ग्रहाच्या आधारावर मी सायोकहिस्ट्री विकसित करू शकतो, पण माझ्यासमोर अडचणी येतील. या अडचणी मी दूर करू शकेन. पण काही ठाशीव आणि कळीची सत्ये मला खात्रीपूर्वक माहीत असतील तर ते अधिक सोपं होईल. उदाहरणार्थ, पृथ्वी किंवा ऑरोरा या ग्रहांवरची जगे हीच माणसाची पहिली वसतीस्थानं होती की कुठलं तरी दुसरंच जग होतं ते? पृथ्वी आणि ऑरोरा या दोन ग्रहांमधील संबंध काय होते? यातील एकाने

की दोघांनी मिळून गॅलेक्सी वसवली? एकाने वसवली तर दुसऱ्याने काही नाही? दोघांनीही वसवली असेल तर त्यांनी त्यातील समस्या कशा सोडवल्या? आजची ही जगे त्या दोहोंची वंशज आहेत की कुणा एकाची? रोबॉट्सचा त्याग कसा आणि कधी करण्यात आला? ट्रॅन्टॉरमधील जग हे साम्राज्याचे स्थान कसे बनले- दुसरे कोणतेही जग का नाही बनले? दरम्यान, ऑरोरा आणि पृथ्वी या दोन जगांचं नेमकं काय झालं? हजारो प्रश्न विचारू शकतो मी- आणि पुढे जाताजाता आणखी लाखो प्रश्न माझ्या मनात उद्भवतील? मला हवी असलेली सर्व माहिती तुला देणं शक्य असूनही तू मला मदत न करता अज्ञानीच राहू देणार, ह्युमिन- आणि मला अपयशाचा धनी करणार? “

ह्युमिन म्हणाला, “मी रोबॉट असते, तर माझ्या मेंदूत वीस हजार वर्षांचा लाखभर वेगवेगळ्या जगांचा इतिहास साठवून ठेवण्याची क्षमता असली असती?”

“रोबॉटिक मेंदूंची क्षमता काय असते मला माहीत नाही. तुझी क्षमता काय आहे मला माहीत नाही. पण तशी क्षमता नसली तरीही, तुला साठवता येणार नाही अशी माहिती कुठेतरी सुरक्षितपणे नोंदण्याची काहीतरी सोय असेल- जी तुला कधीही मिळवता येईल. तुझ्याकडे तशी माहिती असेल- तर मला त्या माहितीची गरज असताना तू ती मला कशी काय नाकारू शकतोस? आणि तू ती माझ्यापासून लपवणार नसलास, तर मग तू रोबॉट आहेस- तूच तो ‘फितूर’ रोबॉट आहेस हे तू नाकारू शकत नाहीस.” सेल्डन बसून राहिला, आणि मग एक दीर्घ श्वास घेत म्हणाला, “म्हणून- मी पुन्हा एकदा तुला विचारतो, तूच तो रोबॉट आहेस का? तुला सायकोहिस्ट्री हवी असेल तर ते मान्य कर. तू रोबॉट नाहीस म्हणाला, आणि तशी माझी खात्री पटवलीस, तर मग मी सायकोहिस्ट्रीपर्यंत पोहोचण्याचा योग अगदी कमी आहे. तुझ्यावर आहे आता. तू रोबॉट आहेस का? तू डा-नी आहेस का?”

आणि नेहमीच्याच शांतगंभीर मुद्रेने ह्युमिन उत्तरला.

“तुझा युक्तीवाद अगदी अचूक आहे. मीच आहे आर. डानील ओलिव्हाव. यातील आर हे अक्षर रोबॉटचे दर्शक आहे.”

९२-

आर डानील ओलिव्हाव अजूनही तितक्याच शांतपणे बोलत होता, पण सेल्डनला जाणवलं की आता तो अधिक सहजपणे बोलत होता. नाटक वठवण्याचे ओझे सरले होते.

“वीस हजार वर्षांमध्ये,” डानील म्हणाला, “मी रोबॉट आहे असा अंदाज कुणालाही आला नाही- जोवर मी त्यांना तसा अंदाज करण्याची मुभा दिली नाही तोवर नाही. याचं कारण इतकंच की मानवजातीने रोबॉट्सना केव्हाच सोडून दिलं, एके काळी रोबॉट्स अस्तित्वात होते याची स्मृतीही अगदी मोजक्या लोकांकडे आहे. शिवाय आणखी एक कारण- मानवी भावना ओळखण्याची आणि त्यांवर परिणाम घडवून आणण्याची क्षमता माझ्याकडे आहे. भावना ओळखण्यात काही समस्या येत नाहीत, पण त्यांच्यावर परिणाम घडवून आणणे हे जरा अवघड जाते याला माझी रोबॉटिक संरचना कारणीभूत आहे- पण मला इच्छा असेल तर मी तसेही करू शकतो. मला शक्य असते, पण तसे करू नये ही माझी इच्छा त्याच्या आड येत रहाते. मी भावनांना परिणाम करणे शक्यतो टाळतो- अगदीच नाईलाज झाला तरच मी ते करतो. आणि जेव्हा मी ते करतो तेव्हा फक्त सूक्ष्म रुपात असलेल्या काही भावनांना थोडे बळ देतो. तसे काही न करता काम होणे शक्य असेल तर मी ते निश्चितच टाळतो. सनमास्टरने तुम्हाला स्वीकारावे यासाठी त्याच्या भावनांशी खेळण्याची गरज नव्हती- मी त्याला भावनांशी खेळणे म्हणालोय हे तुझ्या लक्षात

आलं असेल- कारण तसं करणं काही आनंददायक नसतं. मला ते करावं लागलं नाही कारण मी त्याला पूर्वी मदत केली होती, ऋणात होता तो माझ्या आणि तुम्हाला त्याचे इतर जे काही अवगुण दिसले असतील ते असोत- तरीही ऋण मानणारा भला माणूस होता तो. दुसऱ्या वेळी मात्र मी त्याच्या भावनांमध्ये हस्तक्षेप केला- त्याच्या दृष्टीने जेव्हा तुम्ही पावित्र्यभंग केलात तेव्हा- पण तेव्हाही फार काही करावं लागलं नाही. तुम्हाला साम्राज्याच्या अधिकाऱ्यांकडे देणं त्याला पसंत नव्हतं- त्यांच्याबद्दल फारच राग आहे त्याच्या मनात. मी तो राग थोडा अधिक तीव्र केला आणि त्याने तुम्हाला माझ्या अधीन केले. मी केलेले युक्तीवाद एरवी त्याने वरवरचे म्हणून नाकारले असते- ते त्याने मान्य केले.

"तसंच, मी तुझ्या भावनांतही फारशी ढवळाढवळ केली नाही. तुला साम्राज्याच्या अधिकाऱ्यांबद्दल अविश्वास होता. आजकाल अनेक माणसांना वाटतोच तो तसा, साम्राज्याच्या ढासळण्याच्या प्रक्रियेतला तो फार महत्त्वाचा मुद्दा आहे. शिवाय तुला सायकोहिस्ट्रीच्या संकल्पनेबाबत अभिमान वाटत होता- आपण ही संकल्पना जन्माला घातली याचा अभिमान वाटत होता. ती व्यवहारात येणं तुला आवडण्यासारखंच होतं. त्या मुळे तुझा अभिमान अधिकच पोसला गेला असता."

सेल्डनने कपाळावर आठ्या चढवत म्हटलं, "मला क्षमा कर, मास्टर रोबॉट, मला कल्पना नव्हती की एवढा भयंकर राक्षसी अभिमान बाळगतो."

डानील सौम्यपणे म्हणाला, "अजिबात राक्षसी अभिमान नाहीये तुला. तुला अगदी चांगलं ठाऊक आहे की अभिमानापोटी कृती करणं हे काही कौतुकास्पद नाही किंवा उपयोगीही नाही. त्यामुळे ती भावना तू फारशी वरचढ होऊ देत नाहीस, पण आपल्या हृदयाच्या ठोक्यांमुळे आपण चालतो हेसुद्धा तुला फारसं रुचत नाही. या दोन्ही गोष्टी आहेतच. तुझा इलाज नाही. तुला वाटणारा स्वतःबद्दलचा अभिमान

तू स्वतःच्या मनःशांतीसाठी स्वतःपासून लपवून ठेवत असलास तरी माझ्यापासून तो लपू शकत नाही. तू कितीही झाकून ठेवलास तरीही तो आहेच. मला ती अभिमानाची भावना थोडीशीच फुंकर घालून फुलवावी लागली बस्स. आणि मग काही क्षणांपूर्वी तू ज्या गोष्टी करायला तयार नव्हतास त्या गोष्टी तू केवळ डेमेर्झेलपासून लपण्यासाठी करायला राजी झालास. सायकोहिस्ट्रीवर काम करण्याची तीव्र आस तुला काही क्षणांपूर्वी हास्यास्पद वाटली असती- पण तू ती आस मान्य करून काम करायला लागलासही. मला बाकी काहीच करायची गरज राहिली नाही... आणि मग तू मी रोबॉट असल्याची कारणं ओळखू शकलास.

"असं तू करशील याची शक्यता मला वाटली होती. मी ते थांबवलंही असतं, पण माझी दूरदृष्टी आणि माझी क्षमता काही अमर्याद नाही. मला त्यात यश आलं नाही याबद्दल मला वाईटही वाटत नाही, कारण तुझे युक्तीवाद अगदी योग्य आहेत. मी कोण हे तुला माहीत असणं महत्त्वाचं आहे आणि तुला जे करण्यासाठी मी मदत करेन ते मला वापरायचं आहे.

"सेल्डन, दोस्ता, भावना या मानवी कृतीला गती देणाऱ्या फार शक्तीशाली एंजिन्स असतात. माणसांना समजतात त्यापेक्षा कैक पटींनी अधिक. आणि तुला समजणारही नाही किती थोडासा हस्तक्षेप किती गोष्टी साध्य करू शकतो ते... आणि ते करायला मी किती नाखूष असतो ते."

सेल्डनचा श्वास जरा जडावला होता, आपण इतके अभिमानी खरंच आहोत का याच विचारात गुंगला होता- त्याला रुचलं नव्हतं ते.

"नाखूष का असतोस?"

"कारण त्याचा अती वापर करू लागणं कधीही होऊ शकतं. मला रॅशेलला थांबवावं लागलं कारण ती संपूर्ण साम्राज्याला सरंजामशाही अराजकाकडे घेऊ जाऊ

लागली होती. थोडी ढवळाढवळ मनामनांत केली असती तर अचानक रक्तरंजित क्रांती झाली असती. पुरुष अखेर पुरुष असतात, आणि वायन सेनाधिकारी सगळेच पुरुष होते. त्यांच्या मनात स्त्रियांच्या वर्चस्वाबद्दल थोडासा तिरस्कार जागवला, भय जागवलं की पुरतं. हे जैविक लैंगिक असं जे काही असतं ते मला रोबॉट असल्यामुळे नीटसं समजू शकत नाही.

“मला त्यांच्या भावनांना थोडंसंच जागवावं लागलं आणि तिची सारी योजना बारगळली. जरासं जास्त केलं असतं तर मग रक्तहीन परिवर्तनाचा मार्ग खचला असता. माझे सैनिक येतील तेव्हा त्यांनी विरोध करू नये एवढीच गोष्ट मला साध्य करायची होती.” डानील थबकला, जणू शब्द शोधत होता- मग म्हणाला, “माझ्या पॉझिट्रॉनिक मेंदूच्या गणितात मला शिरायचं नाहीये. माझ्या समजेच्या जरा पलिकडचंच आहे ते. तू त्यावर विचार केलास तर तुला जे समजेल त्यापेक्षा फार काही नाहीच. पण माझ्यावर सत्ता चालते ती रोबॉटिक्सच्या तीन नियमांची- हे नियम फार काळापूर्वी शब्दांत कसे नोंदवले गेले सांगतो. असे आहेत ते नियम... एक- रोबॉटने माणसाला इजा पोहोचवू नये, किंवा कृतीहीन राहून माणसाला इजा पोहोचू देऊ नये. दोन- माणसाने दिलेले आदेश रोबॉटने पाळलेच पाहिजेत, फक्त पहिल्या नियमांच्या विरुद्ध जाणारे आदेश याला अपवाद असतील. तिसरा नियम- रोबॉटने स्वतःचेही रक्षण करावे- पहिल्या व दुसऱ्या नियमांच्या विरोधात हे जाणार असल्यास अपवाद करावा.

“पण वीस हजार वर्षांपूर्वी माझा एक मित्र होता. दुसरा एक रोबॉट. माझ्यासारखा नव्हता तो- माणसासारखा अजिबात दिसत नसे, पण त्याच्याकडे बौद्धिक क्षमता होती, आणि माझी बौद्धिक क्षमता मला त्याच्याकडूनच मिळाली.

“त्याला वाटत होतं की या तीन नियमांपेक्षा वेगळा असा आणखी एक समावेशक नियम असावा. तो त्याला शून्यवा नियम म्हणत असे. शून्य एकच्या आधी येते म्हणून शून्यवा. तो असा होता- शून्यवा नियम- कोणीही रोबॉटने मानवजातीला धोक्यात आणता कामा नये, रोबॉटच्या निष्क्रियतेमुळे मानवजातीला इजा पोहोचता कामा नये.

“म्हणजेच पहिला नियम असा झाला- कुणीही रोबॉटने कुठल्याही मानवाला इजा करता कामा नये, त्याच्या निष्क्रियतेमुळे कुणीही माणूस धोक्यात येऊ नये. मात्र- जेव्हा हे शून्यव्या नियमाविरोधात जात असेल त्यावेळी अपवाद करावा. पुढले सर्व नियम अशाच प्रकारे थोडेथोडे बदलतील. समजतंय तुला?”

डानील उत्तराची वाट पाहात थांबला, आणि सेल्डन उत्तरला. “समजतंय मला.”

डानील पुढे बोलू लागला, “अवघड कुठे होतं सांगतो- एक माणूस ओळखता येतो. तो दाखवून देता येतो. एका माणसाला नक्की काय इजा होऊ शकते, कुठूनन धोका पोहोचू शकतो, कुठून नाही हे कळणे तसे बरेच सोपे असते. पण मानवजात म्हणजे काय? मानवजातीबद्दल बोलताना आपण नेमके कुणाबद्दल बोलतो? मानवजातीला धोका याची व्याख्या आपण कशी करायची? कुठल्या कृतीमुळे मानवजातीचे कल्याण होते आणि दूरलक्षी प्रभावाने कशामुळे मानवजातीचे नुकसान होते, हे कसं सांगणार? ज्या रोबॉटने हा शून्यवा नियम बांधला तो मरून गेला- म्हणजे कायमचा निष्क्रीय झाला- कारण त्याला मानवजातीला वाचवण्यासाठी जी कृती करणं भाग पडत होतं ती कृती कार्यक्षम ठरेल याची त्याला खात्री नव्हती. त्याचे काम बंद पडण्यापूर्वी त्याने या गॅलेक्सीची काळजी घेण्याचं काम माझ्यावर सोपवलं.

“तेव्हापासून मी प्रयत्न करत आलो आहे. कमीत कमी हस्तक्षेप करत आलोय, माणसांनी चांगलं काय वाईट काय याची निर्णय शक्य तो स्वतःच्या धारणांनुसार करून कल्याण साधावं असाच प्रयत्न केलाय. ते जुगार खेळू शकत होते, मी नाही. त्यांची उद्दिष्टे पूर्ण झाली नाहीत तरी चाललं असतं- मला तसं करण्याची मुभाच नाही. त्यांच्या हातून चुका झाल्या तरी चालल्या असत्या. मी चूक केली तर मी मात्र बंद पडलो असते. शून्यवा नियम चुकून चूक होण्यासाठी वाव ठेवत नाही.

“पण कधीकधी मला कृती करणं भाग पडतं. मी अजूनही बंद पडलेलो नाही याचा अर्थ माझं काम तसं सौम्य होतं किंवा लपून जात होतं. पण जेव्हा हे साम्राज्य ढासळू लागलं, घसरणीला लागलं तेव्हापासून मला फार वेळा हस्तक्षेप करावा लागला आहे. गेली काही दशके डेमेर्झेलची भूमिका निभावतो आहे मी, शासन चालवतो आहे- कमीत कमी नुकसान होईल, पुरता विध्वंस टळेल अशा प्रकारे काम करतो आहे- आणि अजूनतरी बंद पडलेलो नाही, पहातो आहेस तू.

“जेव्हा तू त्या गणित परिषदेत तुझं व्याख्यान दिलंस तेव्हा मला जाणवलं की सायकोहिस्ट्रीचं साधन हाती आलं तर मानवजातीसाठी काय भलं काय बुरं ते ठरवणं सोपं होईल. आपल्याला भविष्यासंबंधी जे निर्णय घ्यावे लागतात त्यातला आंधळेपणा कमी होईल. मी तर म्हणेन की मला माझी क्षमता फक्त मोठ्या आपत्तींच्या वेळी वापरावी लागेल, एरवी माणसांच्या निर्णयावर अवलंबून रहायला हरकत असणार नाही.

“त्यामुळे मी ताबडतोब सम्राट क्लिऑनच्या कानावर तुझं भाषण घातलं आणि तुला बोलवून घेण्याची व्यवस्था केली. मग तू अशी काही शक्यता

नाकारल्याचं मी ऐकलं, सायकोहिस्ट्रीचं महत्त्व तू नाकारलं होतंस. पण मग तुला कसंही करून प्रयत्न करायला लावायचाच असं मी ठरवलं. समजतंय तुला, हॅरि?''

सेल्डन अजूनही थोडासा अनिश्चित होता, ''समजतंय मला, ह्युमिन.''

''लक्षात ठेव, तुझ्यासाठी-आपण क्वचित कधी भेटू तेव्हा मी ह्युमिन रहाणंच आवश्यक आहे. माझ्याकडे असलेली माहिती मी तुला देत राहीन. तुला जी गरज वाटेल ती मला सांग- डेमेर्झेल या नात्याने मी तुझं शक्य तितकं रक्षण करीन. पण डानील म्हणून तू माझा कधीही उल्लेखही करता कामा नये.''

''तसा उल्लेख मी अजिबात करू इच्छित नाही.'' सेल्डन घाईघाईने म्हणाला, ''तुझी मदत मला हवी आहे आणि तुझ्या नियोजनात बाधा आणून मला सारं बिघडवून ठेवायचं नाहीये...''

''हो, मला माहीत आहे तसं तू करणार नाहीस,'' आणि डानील थकिस्त हसला. ''अखेर सायकोहिस्ट्री प्रगत झाल्यानंतर तुला त्याचं संपूर्ण श्रेय हवं असेल. तुला एका रोबॉटच्या मदतीची गरज पडली होती हे कुणालाही कधीही कळू नये अशीच तुझी इच्छा असणार.''

सेल्डन वरमून म्हणाला, ''तसं नाही...''

''पण तसं असणारच. ते तू स्वतःपासूनही काळजीपूर्वक दडवून ठेवलं आहेस. आणि हे महत्त्वाचं आहे, आणि त्याचसाठी मी तुझ्यातील ती इच्छा किंचितशी वाढवणार आहे... की तू आपोआपच या सर्वाबद्दल कुणाशीही बोलूच शकणार नाहीस. कुणाशी बोलावं असा विचारही तुझ्या मनाला शिवणार नाही.''

सेल्डन म्हणाला, ''मला वाटतं... डॉर्सला हे माहीत असावं.''

''तिला माहीत आहे. आणि ती सुद्धा याबद्दल कुणाशीही बोलू शकणार नाही. आता तुम्हा दोघांनाही माझं स्वरूप कळलं आहे तर, तुम्ही आपसात

माझ्याबद्दल बोलू शकता, इतर कुणाशीही नाही.” डानील उठला. “हॅरि, आता मला काम आहे. थोड्याच वेळात तू आणि डॉर्स दोघे शाही विभागात पोहोचाल-”

“तो मुलगा, रॅच, त्यालाही माझ्याबरोबर न्यायचंय मला. त्याला सोडून देऊ शकत नाही मी. आणि एक तरूण डाह्लाइट आहे- युगो आमारिल नावाचा-”

“समजतंय मला. रॅच येईल तुमच्यासोबत. आणि आणखी जे कोणी मित्र तुला बरोबर हवे असतील ते सारे येतील. तुझी यथास्थित काळजी घेतली जाईल. आणि तू सायकोहिस्ट्रीवर काम करायचं आहेस. तुझ्या हाताखाली कर्मचारी असतील. कॉम्प्युटर्स असतील, संदर्भासाठी जे लागेल ते सारं असेल. मी कमीतकमी हस्तक्षेप करेन आणि तुला कुणाचा विरोध असलाच आणि तो अगदी टोकाला पोहोचला नसेल, कामात अडथळा नसेल तर ते तुझं तू सांभाळायचं.”

“थांब, ह्युमिन,” सेल्डनच्या स्वरात अस्वस्थता होती, “समज, तुझी सारी मदत, माझे प्रयत्न सारं असूनही समजा असं लक्षात आलं की सायकोहिस्ट्री व्यवहारात येणं अशक्य आहे तर? मला अपयश आलं तर?”

डानील उठून उभा राहिला, “तसं झालं तर माझ्याकडे पर्यायी योजना आहे. त्यावर मी बरीच शतके काम करतोय- इथून दूरवरच्या एका वेगळयाच ग्रहावर- वेगळा मार्ग आहे तो. तोही अवघडच आहे, काही बाबतीत तो सायकोहिस्ट्रीपेक्षा अधिक टोकाचा आहे. मलाही अपयश येऊ शकतं. पण दोन मार्ग मोकळे ठेवले तर- उपाय सापडण्याची शक्यता अधिक आहे. एक से भले दो.

“माझा एक सल्ला मान, हॅरि... जेव्हा कधी तुला असं वाटेल की आपत्ती टाळण्यासाठी तू काही एक यंत्र किंवा साधन तयार करू शकतोस- तेव्हा एका ऐवजी दोन साधनं तयार करायचा विचार कर. त्यामुळे एक बिघडलं तरी दुसरं सुरू राहील. साम्राज्य स्थिरावलंच पाहिजे किंवा मग नवीन पायाभरणी करून नवीन साम्राज्य

बांधलं गेलं पाहिजे. एका ऐवजी अशी दोन असणं शक्य असेल तर केव्हाही चांगलंच.” आता तो जायला निघाला. “आता मला माझी रोजची काम उरकायला जायला हवं आणि तुलाही जायला हवं. तुझी सर्व व्यवस्था केली जाईल.” आणि अखेरचं एकदा मानेने अभिवादन करून तो गेला.

सेल्डन त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत हलकेच म्हणाला, “आता आधी मला डॉर्सशी बोलायला हवं.”

९३-

डॉर्स म्हणाली, “सगळं स्वच्छ झालं. रॅशेलला कुणीही शारीरिक दुखापत करणार नाही हे नक्की. आणि तुला शाही विभागात जायचं आहे, हॅरि.”

“आणि तू, डॉर्स?” सेल्डनच्या मंदावल्या स्वरात ताण होता.

“मी पुन्हा विद्यापीठात जाईन बहुतेक.” ती विचार करून उत्तरली, “माझं काम बरंच मागे पडलंय. माझे वर्ग कुणी घेतले नाहीत फारसे.”

“नाही, डॉर्स, तुझ्यावर मोठी जबाबदारी आहे.”

“आणि ती कोणती?”

“सायकोहिस्ट्री. मी यावर तुझ्याविना काम करूच शकणार नाही.”

“का नाही करू शकणार! मी तर गणितात ढ आहे.”

“आणि मी इतिहासात ढ आहे. आपल्याला दोन्ही शाखांची गरज आहे.”

डॉर्स मोठ्याने हसली, “गणिती म्हणून तुझी प्रज्ञा एकमेवाद्वितीय आहे. तर मी इतिहास अभ्यासक म्हणून अगदीच साधीसुधी- काही फार थोर काम नाही माझं.

तुला कितीतरी उत्तमोत्तम इतिहास अभ्यासक मिळतील- जे सायकोहिस्ट्रीच्या अभ्यासासाठी अधिक साहाय्य करू शकतील.”

“तसं असेल तर, डॉर्स, मला तुला हे सांगायला हवं की सायकोहिस्ट्रीसाठी केवळ एक गणिती आणि एक इतिहास अभ्यासक असणं पुरेसं नाही. त्यासाठी आयुष्यभर याच एका समस्येशी झगडत रहाण्याची तयारी आणि इच्छाशक्ती हवी. डॉर्स, तुझ्याशिवाय माझ्याकडे ती इच्छाशक्ती असणार नाही.”

“का नाही, नक्की असेल.”

“डॉर्स, तू माझ्याबरोबर असणार नसलीस तर मला हे करायचंच नाहीये.” डॉर्स विचारात पडून सेल्डनकडे पाहात राहिली.

“या चर्चेला काही अर्थ नाही, हॅरि. ह्युमिन काय तो निर्णय घेईल. त्याने मला विद्यापीठात परत जायला सांगितलं तर-”

“तसं नाही सांगणार तो.”

“तुला एवढी खात्री कशावरून वाटते?”

“कारण मी तसं त्याला स्पष्ट सांगेन. त्याने तुला विद्यापीठात परत पाठवलं तर मी चाललो परत हेलिकॉनला. साम्राज्य गेलं खड्ड्यात.”

“तुला खरोखर असं वाटूच शकत नाही.”

“मी सांगतोय ना वाटतंय म्हणून.”

“तुला हे कळत नाही का की ह्युमिन तुझ्या भावना हलकेच बदलून टाकू शकतो- जेणेकरून तू माझ्याशिवाय सुद्धा सायकोहिस्ट्रीवर काम करत रहाशील?”

सेल्डनने मानेनेच नकार दिला. “तो असं काहीही मनमानी करणार नाही. मी बोललोय त्याच्याशी. तो मानवी मनात फारशी ढवळाढवळ करणार नाही, कारण तो

स्वतः रोबॉटिक्सच्या नियमांनी बांधला गेलाय असं त्यानेच मला सांगितलं. मला तू बरोबर नको वाटावीस असा बदल माझ्या मनात करण्यासाठी त्याला जो बदल करावा लागेल तो जोखमीचा आहे, डॉर्स. तेच जर त्याने मला माझ्या मर्जीवर सोडलं आणि तू माझ्यासोबत या प्रकल्पात आलीस तर मग त्याला जे हवंय ते मिळू शकेल- सायकोहिस्ट्रीवरचं काम यशस्वी ठरण्याची शक्यता वाढेल. त्याने तो पर्याय का निवडू नये?"

डॉर्सने मानेनेच नकार दिला, "त्याची स्वतःचीही काही कारणं असतील हे मान्य न करण्यामागे."

"कशाला नकार देईल तो? तू माझं संरक्षण करावंस असं त्याने तुला सांगितलं होतं ना, डॉर्स- रद्द केली का त्याने ती विनंती आता?"

"नाही."

"मग तू अजूनही माझं संरक्षण करावंस अशीच त्याची इच्छा आहे. आणि मलाही तुझं संरक्षण हवं आहे."

"कशापासून? तुला तर आला ह्युमिनचं संरक्षण आहे- डेमेर्झेल म्हणूनही आणि डानील म्हणूनही- या पेक्षा जास्त काय लागणार तुला?"

"मला या गॅलेक्सीतल्या प्रत्येक माणसाचं, प्रत्येक सैन्याचं संरक्षण मिळालं तरीही- मला तुझंच संरक्षण हवं आहे."

"म्हणजे तुला मी सायकोहिस्ट्रीसाठी नको आहे. संरक्षणासाठी हवी आहे."

सेल्डन रागेजून पाहू लागला, "नाही! माझ्या शब्दांचा विपर्यास का करतेस?मी जे म्हणतोय ते तुला चांगलं कळतंय. मी ते बोलून दाखवावं असा आग्रह का? मला तू सायकोहिस्ट्रीसाठी हवी आहेस असंही नाही, आणि संरक्षणासाठी हवी आहेस असंही नाही. या सबबी आहेत. कोणतीही सबब वापरेन मी. मला तू हवी

आहेस- फक्त तू. आणि त्याचं खरं कारण जाणून घ्यायचं असेल तर सांगतो- कारण तू तू आहेस...”

“तू तर मला नीटसं ओळखतही नाहीस.”

“त्याने काहीही फरक पडत नाही. मला पर्वाच नाही- आणि तरीही मी तुला ओळखतो एक प्रकारे. तुला माहीत नसेल इतका चांगला ओळखतो मी तुला.”

“खरंच की काय?”

“अर्थात्. तू आदेशांचं पालन करतेस. जराही न बिचकता माझ्यासाठी जीव धोक्यात घालतेस आणि परिणामांची पर्वा तर नसतेच तुला. तू टेनिस खेळायला किती पटकन् शिकलीस. तू चाकूसुरे चालवायला किती सहज शिकलीस आणि मॅरॉनशी लढताना किती सराईतपणे लढलीस. अमानवी होतं ते म्हणेन मी. तुझे स्नायू जबरदस्त शक्तीमान आहेत आणि तुझी प्रतिक्रिया विद्युतवेगाची असते. आपल्या खोलीच्या दाराला कान लागले आहेत का ते तुला झटकन् कळतं. आणि कोणत्याही साधनाचा वापर न करता तू ह्युमिनशी संपर्क साधू शकतेस.”

डॉर्स म्हणाली, “आणि या सगळयाबद्दल तुझं मत काय आहे?”

“मी असा विचार करत होतो... की ह्युमिन म्हणजे त्याचं आर डानील ओलिव्हाव हे रूप- त्याच्यासमोर केवढं मोठं आव्हान आहे. एकटादुकटा रोबॉट साऱ्या साम्राज्याला दिशा दाखवण्याचं काम कसं काय पार पाडू शकेल? त्याला साहाय्य करणारे कुणीतरी असणारच.”

“ते तर आहेच. लाखो साहाय्यक असतील त्याला मला वाटतं. तू एक साहाय्यक आहेस, आपला छोटा रॅचही साहाय्यक आहे.”

“पण तू वेगळ्या प्रकारातली साहाय्यक आहेस.”

“ती कशी? हॅरि, बोल. तू स्वतःचेच शब्द ऐकलेस तरी तुला कळेल की हा केवढा वेडेपणा आहे.”

सेल्डन तिच्याकडे काही क्षण पाहात राहिला, मग अगदी खालच्या पट्टीत म्हणाला, “मी तसं म्हणणार नाही, कारण- मला पर्वा नाही.”

“खरंच नाही? मी जशी आहे तशी स्वीकारण्याची तुझी इच्छा आहे?”

“तुझी साथसोबत करणं ही माझी गरज आहे. तू डॉर्स आहेस, आणि बाकी काहीही असलीस तरीही- साऱ्या जगात मला दुसरं काहीही नको आहे.”

डॉर्स हळुवार स्वरात म्हणाली, “हॅरि, मी जे काही आहे त्यानुसार, तुझ्या भल्यासाठी जे काही करायला हवं ते मला करायचं आहे. पण मी जे आहे ते नसते तरीही मी तुझ्यासाठी भल्याचीच इच्छा केली असती. आणि मला वाटतं, मी तुझ्यासाठी चांगली नाही.”

“माझ्यासाठी चांगली की वाईट, मला पर्वा नाही.”

हॅरि येरझाऱ्या घालताघालता खाली पाहू लागला, आणि पुढे जे बोलायचं ते बोलावं की नाही याचा विचार करत राहिला. “डॉर्स, तुझं कुणी कधी चुंबन घेतलंय?”

“अर्थात्, हॅरि, जगण्याचा सामाजिक भाग आहे तो. आणि मी समाजातच जगते.”

“नाही नाही! मला म्हणायचं, कुठल्या पुरुषाने तुझं चुंबन घेतलंय का? अगदी आसक्तने घेतलेलं चुंबन.”

“होय हॅरि. घडलंय तसंही.”

“तुला त्यातून आनंद मिळाला का?”

डॉर्स जराशी थबकली, मग म्हणाला, "मी जेव्हा चुंबन घेऊ दिलं, तेव्हा मला आवडणाऱ्या तरूण मुलाला निराश केलं नाही याचा आनंद मला अधिक वाटला होता. त्याची मैत्री माझ्या दृष्टीने महत्त्वाची होती." या वेळी तिचा चेहरा जरा लाल झाला आणि तिने चेहरा वळवला, "प्लीज, हॅरि, मला हे स्पष्ट करून सांगणं अवघड वाटतं."

पण हॅरी बोलतच राहिला, "म्हणजे तू चुकीच्या कारणांसाठी चुंबन घेतलंस, कुणाची तरी भावना दुखावू नये म्हणून."

"कदाचित् सगळेच असं कधीतरी करत असतील."

सेल्डन यावर विचार करत राहिला, आणि मग अचानक त्याने प्रश्न केला. "कुणी तुझं चुंबन घ्यावं अशी इच्छा तू व्यक्त केलीस कधी?"

डॉर्स गप्प झाली. जणू आपल्या मागल्या आयुष्याचा आढावा घेत राहिली. मग उत्तरली, "नाही."

"किंवा एकदा चुंबन घेतल्यानंतर तुला परत आपलं चुंबन कुणी घ्यावं असं वाटलं का कधी?"

"नाही."

"कुणा पुरुषासोबत झोपली आहेस तू?" त्याने हळुवारपणे पण अतिशय तीव्र भावनेने विचारलं.

"अर्थात. मी सांगितलं तुला. या गोष्टी जगण्याचा भाग आहेत."

हॅरिने तिचे खांदे पकडले, जणू तो तिला गदगदा हलवणार होता. "पण तुला तशी इच्छा कधी झाली होती? एकाच कुणाच्या तरी निकट आपण आत्ता असावं असं कधी वाटलं तुला? डॉर्स, तुला कधी प्रेम वाटलं?"

डॉर्सने सावकाश वर पाहिलं, तिच्या नजरेत दुःखच असावं... तिने हॅरिच्या डोळ्यांत पाहून सांगितलं, "सॉरी, हॅरि, पण नाही."

सेल्डनने तिला सोडून दिलं. त्याचे हात निर्जीव असल्यागत खाली आले.

मग तिने आपला तळवा त्याच्या दंडांवर ठेवला, "कळतंय तुला, हॅरि? तुला जे हवंय ते माझ्यात नाहीये." सेल्डनचं मस्तक झुकलं आणि तो जमिनीकडे पाहात राहिला. तो विचार करत होता, विवेक जागा ठेवून विचार करण्याचा प्रयत्न करत राहिला. मग त्याने तो प्रयत्न सोडून दिला. त्याला जे हवं होतं ते हवं होतं- विचार आणि विवेक सारं बाजूला सारून हवं होतं. त्याने नजर वर केली.

"डॉर्स. डिअर, तरीही, मला पर्वा नाही."

त्याने तिच्या भोवती हातांचा विळखा घातला आणि तिच्या चेहऱ्याजवळ आपला चेहरा आणून तो वाट पाहू लागला. ती झटक्याने दूर होईल की काय... पण तो तिला जवळ ओढत राहिला. तिने तसं काहीच केलं नाही आणि त्याने तिचं चुंबन घेतलं, संथपणे, सावकाश आणि मग आवेगाने... तिचे बाहू अचानक त्याच्या भोवती घट्ट कवळले गेले. अखेर, तो जेव्हा थांबला तेव्हा ती त्याच्याकडे पाहू लागली, तिच्या डोळ्यांत तिच्या ओठांवरचं हास्य प्रतिबिंबित झालं होतं, आणि ती म्हणाली, "पुन्हा एकदा... पुन्हा एकदा माझं चुंबन घे, हॅरि. प्लीज."

तळटीपः

दीर्घिका ज्ञानकोष

दीर्घिका ज्ञानकोषातून दिलेली सारी अवतरणे दीर्घिका ज्ञानकोष प्रकाशक कं.ने एफ ई (फाउंडेशन एरा) १०२० साली, टर्मिनस येथे प्रसिध्द केलेल्या ११६व्या आवृत्तीमधून त्यांच्या अनुमतीने घेतली आहेत.